म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. १९९८.

(१० वी), H. S. (M. P.) C. (११ वी)
११ वी आणि पश्चिम महाराष्ट्रांतील १० वी
अभ्यासक्रमावर आधारलेलें पुस्तक.

मराठी रूप-दर्शन

व्याकरण, लेखन, वाङ्मय-प्रकार, वृत्तें, अलंकार, शुद्धलेखन
इत्यादि भाषेच्या अंगांची सुबोध चर्चा करणारा नवा ग्रंथ.



REFBK-0013117

प्रा. डांगे, प्रा. पठाण, प्रा. आंबेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०

मराठवाड्यांतील H. S. C. (१० वी), H. S. (M. P.) C. (११ वी)
विदर्भातील १० वी व ११ वी आणि पश्चिम महाराष्ट्रांतील १० वी
व ११ वीच्या अभ्यासक्रमावर आधारलेलें पुस्तक.

मराठी रूप-दर्शन

व्याकरण, लेखन, वाङ्मय-प्रकार, वृत्तें, अलंकार, शुद्धलेखन
इत्यादि भाषेच्या अंगांची सुबोध चर्चा करणारा नवा ग्रंथ.

ग्रंथालय
सं. क्र. ९३९६
वर्ग
ग्रंथांक
ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
क्रमांक ६२३९ दि: ...
वर्ग क्रमांक ४९९२ बॉ: दि: २२३।७१



लेखक

प्रा. चंद्रकुमार ढांगे, एम्. ए., एम्. ईडी.
मराठी आणि शिक्षणशास्त्र या विषयांचे प्राध्यापक,
टिळक कॉलेज ऑफ् एज्युकेशन, पुणें २.

प्रा. डॉ. यू. म. पठाण, एम्. ए., पीएच्. डी.
मराठीचे प्राध्यापक, मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

श्री. जयंत शंकर आंबेकर, एम्. ए.
मल्टिपर्पज हायस्कूल, जालना.

किंमत सहा रुपये

मुद्रक :
प्र. भा. काळे,
प्रतिभा मुद्रणालय,
सदाशिव पेठ, टिळक रस्ता,
पुणें २.

*

प्रकाशन दिनांक २६-१-६३
प्रथमावृत्ति १९६३

प्रकाशक :
दे. श्री. जोशी आणि म. द. लोखंडे,
चिरंजीव ग्रंथ-प्रकाशन,
सदाशिव पेठ, टिळक रस्ता,
पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ६६३१ दि: ...
वर्ग क्रमांक ... बी: दि: ...

प्रिय विद्यार्थी आणि शिक्षकमित्रांनो,

तुमच्या हातीं 'मराठी रूप-दर्शन' हें व्याकरण आणि लेखन या मराठी भाषेच्या अंगांची सुबोध चर्चा करणारें पुस्तक देतांना फार आनंद होत आहे. मराठी ही आपली मायबोली. या मायबोलींतच आपले सर्व व्यवहार चालतात. आपले मनोगत उत्तम तऱ्हेने व्यक्त करण्यासाठी मातृभाषेसारखे समर्थ साधन दुसरे नाही. या आपल्या भाषेचा अभ्यास आपण करतो म्हणजे तिच्या जडण-घडणीचा अभ्यास करतो. तिच्यातील विविध रसांनी नटलेल्या वाङ्मयाचा आस्वाद घेतो. आपले जीवन अंतर्बाह्य उजळून टाकण्याचे सामर्थ्य भाषेंत असते. अशा, भाषा या मूलभूत आणि प्रभावी साधनाचें रूपदर्शन घेणें हें एक आपल्या शालेय आणि महाविद्यालयीन जीवनांतील सुखद पर्व आहे.

आपण जो प्रत्येक शब्द बोलतो किंवा लिहितो त्याला स्वतःचे असे रूप असते. या रूपांत, इतर शब्दांच्या सान्निध्यात बदल घडतो. आपल्याला येणाऱ्या अनुभवानुसार बोलल्या किंवा लिहिल्या जाणाऱ्या वाक्यांची जडण-घडण देखील बदलते; नवी लय निर्माण होत असते. आपण जसजसे अनुभव-संपन्न होत जातो, तसतशी भाषा देखील अनुरूप वळण घेत जाते. असामान्य लेखक आणि कवि भाषा वाकवितात, तिची मोडतोडहि करतात. या साऱ्या घडामोडीतूनच शैलीचा विकास होतो. ' Style is the man ' असे एक फार अर्थपूर्ण वचन या घडामोडीचेच निदर्शक आहे. पण या शैलीच्या मागे विलक्षण परिश्रम असतात, सराव असतो, काही भाग्यवंतांना प्रतिभेचें देणें असते. असे प्रतिभावंत भाषेचे शिल्पकार असतात. त्यांनी निर्माण केलेल्या वाङ्मयकृति भाषेचीं लेणी ठरतात. या साऱ्या घडामोडींचा डोळस अभ्यास म्हणजेच मातृ-भाषेचा अभ्यास होय.

कोणत्याही भाषेचा अभ्यास करणे, ती भाषा शिकणे हा एक संवयींचा भाग आहे (Language learning is the process of habit-formation), असे विचारवंत शिक्षणतज्ज्ञ सांगतात. हा विचार आपण अनुभवितो. तो परिचयाचा आहे. पण वाढत्या वयाबरोबर आपण जो सराव करणें अगत्याचे असते तेच नेमके टाळतो-जाणता, अजाणता. क्षणभर थांबून शब्दांच्याकडे पहात नाही. त्यांचे रूप न्याहाळीत नाही. त्यांचा नाद मनात घुमवीत नाही. त्यांचा जन्म कसा ते शोधीत नाही. त्यांच्यात लपलेली अर्थांची वलये जाणून घेत नाही. साऱ्या शब्दकलेच्या सौंदर्याला आपण हरवून बसतो. शब्दांना आपण पारखे होतो. ही दूरता, हे अंतर वाढले की शब्दाची रूपसिद्धि नकोशी वाटते.

व्याकरणाचा कंटाळा येतो. मग अनुभव असूनही ते व्यक्त करण्यासाठी शब्द गवसत नाहीत. एकदा अनुभव आणि नेमके, यथार्थ शब्द यांची चुकामूक झाली कीं साधें पत्र लिहिणें देखील जीवावर येते. मग निबंध म्हटला कीं अंगावर काटा येतो. निबंधदेखील पाठ करण्याची दुर्बुद्धि होते.

वास्तविक हे सारे रोजच्या संवयीचे, सरावाचे काम आहे. पाठ्य पुस्तकांतील वाक्य घेऊन प्रत्येक शब्द तपासणें, कवितेच्या ओळीचे वृत्त मापन करणे, त्या ओळीतील अलंकाराची फोड करणे हा एक मनोरम छंद आहे. आपल्याला आवडलेली कथा कां चांगली आहे, या कवितेने आपल्याला कां मोहिनी घातली असे प्रश्न सतत विचारीत त्यांच्या उत्तरांचा शोध घेणे हाच वाङ्मयाचा अभ्यास होय. कितीतरी सुंदर गद्य-पद्य उतारे आपण वाचतो. न कळत आपल्याला स्वतःच्या अनुभवांची आठवण येते. मग उताऱ्यात व्यक्त झालेला अनुभव आणि स्वतःला आलेला अनुभव यांची तुलना मनात सुरू होते. या घडामोडीत, क्रिया-प्रक्रियेत आपले मन संपन्न होते. हा मनोविकास आपले जीवन, आपले व्यक्तित्व उजळून टाकतो. म्हणून एक खुणगाठ मनाशी बांधा, की व्याकरण काय किंवा लेखन काय या परक्या गोष्टी नाहीत. त्या कशा परक्या नाहीत, त्यात कोणते नियम आहेत याची सुबोध फोड म्हणजेच हे रूपदर्शन होय.

या पुस्तकाची रचना प्रस्थापित अभ्यासक्रमावर आधारलेली आहे. प्रत्येक चर्चेच्या अखेरीस अभ्यासासाठी निवडक प्रश्न दिलेले आहेत. मराठीतील थोर लेखकांचे वाङ्मय या सर्व चर्चेशी उदाहरणाच्या अभ्यासाच्या रूपाने निगडित केलेले आहे. या पुस्तकाचा अभ्यास केल्याने आपल्या मराठीचे रूपदर्शन खास सुकर होईल अशा विश्वासानें हें कार्य केलेलें आहे.

पण याचा अर्थ वाङ्मयाचा परिपूर्ण अभ्यास याने झाला असे नाही. आजची मराठी कथा, कविता, कादंबरी अगदी वेगळ्या सामर्थ्यानिशी प्रकट होत आहेत. या बदलाचा प्रपंच करणे या पुस्तकाच्या कक्षेत अभिप्रेत नाही. हा वाङ्मयाच्या प्रवृत्तींचा इतिहास नाही किंवा तंत्राच्या विकसनाचा आढावाही नाही. कारण आपल्याला वाङ्मयप्रकाराच्या तंत्राचे महत्त्व तितकेसे नाही. त्याच्या अभ्यासाचा काळ महाविद्यालयीन व त्याही पुढचा आहे. लघुनिबंध (गुजगोष्ट), कथा, नाट्यछटा यासारख्या वाङ्मयप्रकारांच्या रचनेची रहस्ये इतक्या सुलभतेने विषद करता येण्यासारखी नाहीत. या वाङ्मय-प्रकारांचे ठोकळेबाज वर्णन करण्याचा व त्यांचे अभिजात सौंदर्य बिघडविण्याचा येथे प्रयत्न केलेला नाही. पण या कलाप्रकारांची ओझरती ओळख, केवळ अंगुलीनिर्देश

केलेला आहे, तो केवळ पुढच्या अभ्यासाचा दिशादर्शक म्हणूनच. पण उत्कृष्ट वाङ्मयकृतींचा अभ्यास तर मना केलेला नाही ना ? मुळीच नाही. म्हणूनच यापूर्वी आवर्जून सांगितले की, आपलेच अनुभव अचूक शब्दात पकडण्याचा सराव हीच खरी भाषेची सेवा, अभ्यास होय.

परिच्छेदरचना, सारांशलेखन, कल्पनाविस्तार, अहवाललेखन हे सारे प्रकार म्हणजे अभ्यास करण्याच्या वेगवेगळ्या तऱ्हा आहेत. भाषेतील विचार, भावना, रचना, सौंदर्य समजून घेणे, समजण्याची पात्रता अंगी आणणे या सूत्राभोवती हा अभ्यास गुंफलेला आहे. याचा अखेरचा टप्पा म्हणजे रसास्वाद (रसग्रहण) घेणे हा होय. एखाद्या वाङ्मयप्रकाराचे ठोकळेबाज रसग्रहण (जे कोणीतरी आपल्यासाठी लिहिलेले असते, तयार कपड्यासारखे) पाठ करून लिहिणें म्हणजे रसास्वाद घेणें नाही. एखादी कविता वाचल्यानंतर आपण ती मनात घोळविली पाहिजे, चिंतन केलें पाहिजे म्हणजे मगच आपले मन जागे होऊन रससेवनास उद्युक्त होते. स्वतःच्या कल्पना उदय पावू लागतात. हेही सरावाने सहजसाध्य होते. हे सारे विस्ताराने लिहिण्याचे कारण असे की, **मराठी रूपदर्शनाच्या** मागील भूमिका स्पष्ट व्हावी, अभ्यासाची दिशा स्पष्ट व्हावी.

मराठी रूपदर्शनाच्या निर्मितीत अनेकांचे अनमोल साहाय्य झालेले आहे. अहमदनगर येथील प्रसिद्ध शिक्षक श्री. शं. बा. ऊर्फ बाबूराव आंबेकर यांनी आम्हाला मार्गदर्शन केले. प्रतिभा प्रेसचे चालक श्री. जोशी–लोखंडे यांनी प्रकाशनाची जबाबदारी अंगिकारली. कामगार-बंधूंनी हें पुस्तक त्वरेनें साकार केलें. या सर्वांबद्दल आम्ही मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

मराठी रूपदर्शनाचे पुस्तक आपण आता मनन करण्यास प्रारंभ करा. उणीवांची नोंद करून आम्हाला कळवा. आपल्या सहकार्यावर या **रूपदर्शनाचे** भवितव्य विसंबून आहे याचा विसर आम्हाला कधीही पडणार नाही. मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील १० वी व ११ वीच्या सर्व विद्यार्थ्यांना हे पुस्तक उपयुक्त ठरेल असा आमचा विश्वास आहे.

१४–१–६३
मकरसंक्रमण
पुणें २

चंद्रकुमार डांगे.
यू. म. पठाण.
जयंत आंबेकर.

अनुक्रम

१. व्याकरण (पृष्ठे १ ते १५९)

आपल्या मायबोलीची कुळकथा–भाषेची उत्पत्ति–महाराष्ट्र आणि मराठी–मराठीचे कालिक व प्रांतिक भेद–व्याकरणाचा अभ्यास-वर्णमाला–लिपी विचार–वर्णाचे वर्गीकरण–संधि विचार–शब्द–जाति–नामें–सर्वनामें–विशेषणें–क्रियापदें–अव्ययें–शब्दाचें व्याकरण सांगणे–वाक्यपृथक्करण–समास–शुद्धलेखन–

२. लेखन (पृष्ठे १६१ ते १८१)

काव्यांगें–वृत्तें आणि अलंकार–गद्य आणि पद्य–इंद्रवज्रा–उपेंद्रवज्रा–पृथ्वी–भुजंगप्रयात–मंदाक्रांता–मंदारमाला–मालिनी–शार्दूलविक्रीडित –शिखरिणी–स्त्रग्धरा–वसंततिलका–जाति–उद्धव –परिलीना –पादाकुलक –मुक्तछंद–शब्दालंकार–यमक–अनुप्रास–अर्थालंकार–उपमा –उत्प्रेक्षा –रूपक –अपन्हुति–अनन्वय–व्यतिरेक–प्रतीप–भ्रांतिमान–विरोधाभास–अतिशयोक्ति –व्याजस्तुति–दृष्टांत- अर्थांतरन्यास –स्वभावोक्ति–अन्योक्ति –पर्यायोक्त –प्रश्नालंकार –परिकर–सार–श्लेष. गद्य वाङ्मयप्रकार–लघुकथा–निबंध–लघुनिबंध (गुजगोष्ट)–नाट्यछटा–शब्दचित्र–चरित्र–आत्मचरित्र–नाटक–कादंबरी.

३. काही काव्यप्रकार (पृष्ठे १८२ ते १८६)

सुनीत–भावगीत–उद्देशिका–विलापिका–नाट्यगीत–बालगीत–विडंबन-काव्य–गद्य काव्य–

४. रस आणि रसग्रहण (पृष्ठे १८६ ते १९४)

रस म्हणजे काय ?–रसनिर्मिती–रससंख्या–रसग्रहण–लघुनिबंध –नाट्यछटा–कविता.

५. निबंधलेखन (पृष्ठे १९५ ते २२२)

तंत्र आणि मंत्र–स्वरूपविचार–अंतरंग–बाह्यांग–भाषा–निबंधप्रकार–वर्णन, कथनात्मक, कल्पनाप्रधान, विचार, चिंतनपर, नमुनेदार निबंध.

६. पत्रलेखन (पृष्ठे २२२ ते २४४)

स्वरूप व कला–प्रकार–नित्य किंवा अनौपचारिक पत्रें–नैमित्तिक किंवा औपचारिक पत्रें –पत्रें आणि ताजा कलम–नमुने.

७. कल्पनाविस्तार (पृष्ठे २४५ ते २४८)

प्रास्ताविक–प्रत्यक्ष कल्पनाविस्तार कसा करावा–उदाहरणें–स्वाध्याय.

८. कल्पनांग्रहण व सारांशलेखन (पृष्ठे २४९ ते २६६)

एका नाण्याच्या दोन बाजू–कल्पनाग्रहण कसे करावे–सारांशलेखन पद्धति–नमुने–स्वाध्याय.

९. भाषांतर (पृष्ठे २६७ ते २७८)

एक कला–वाक्यरचनेकडून भाषांतराकडे–नमुने–स्वाध्याय.


१०. निवडक पुस्तकें

विद्यार्थ्यांसाठी.

शिक्षकांसाठी.

मराठी रूप-दर्शन

व्याकरण



(१) आपल्या मायबोलीची कुळकथा

मानवी जीवन व भाषा

"मनुष्य हा बोलणारा प्राणी आहे" असें म्हणतात. मनुष्य व इतर प्राणी ह्यांच्यामधील मुख्य फरक म्हणजे मनुष्याला बोलतां येतें हा होय. आपल्या विचारशक्तीच्या सहाय्याने मानवांनी 'भाषा' हें एक बोलण्याचें साधन उत्पन्न केलें व त्यायोगें आपली सुधारणा घडवून आणली. 'भाषा' ह्या प्रभावी साधनाच्या द्वारें माणसांनी आपलें जीवन सुखकर, सुरक्षित व आनंद-दायक केलें. भाषा हें व्यवहार व दळणवळण ह्यांचें माध्यम हातीं आल्यामुळे मनांतील विचार व भावना ह्या सुकरतेने व्यक्त होऊं लागल्या व इतर प्राण्यां-पेक्षा मानवी जीवन क्रमाक्रमाने अधिक प्रगत व परिणत झालें. भाषा मुळीच अस्तित्वांत आली नसती तर मनुष्य आणि पशु ह्यांचा जीवितक्रम जवळ जवळ सारखाच राहिला असता. आपल्या मनांतील विचार व भावना योग्य प्रकारें व्यक्त करण्याचें 'भाषा' हें साधन आदिमानवांनी निर्माण केलें. म्हणून आज मनुष्यप्राणी अधिक बुद्धिमान्, अधिक कल्पक, अधिक ज्ञानी ठरला आहे व सर्व विद्यमान चराचर सृष्टीचा मालक होण्याची महत्त्वाकांक्षा तो उराशीं बाळगून राहिला आहे.

मनांतील विचार प्रकट करण्यास भाषा अगर भाषण हें साधन आहे. त्याचप्रमाणे विचार करतांना सुद्धा भाषेची आवश्यकता लागते. मनुष्याला बुद्धीची देणगी स्वभावतःच मिळालेली आहे. बुद्धीचें कार्य म्हणजे विचार आणि विचारांना भाषेमुळे सुसंगत व विकसित स्वरूप प्राप्त होतें. भाषा ही विचारप्रक्रियेला सहाय्यभूत होते. आपण अगदी बारीकसारीक अगर महत्त्वाच्या गोष्टीविषयी मनांत जेव्हा चिंतन करतों तेव्हा मनांतल्या मनांत आपण शब्दांच्या म्हणजे भाषेच्या साहाय्याने एक प्रकारचा वादविवाद करीत असतों व शेवटीं जो निर्णय पक्का होतो तो भाषेच्या स्वरूपांत मनांत ठेवून

देतों व वेळ येईल तेव्हा तो बोलून दाखवितों. विचार करतांना मनुष्य मनांतल्या मनांत बोलत असतो म्हणून 'विचार म्हणजे स्वगत भाषण' असें म्हटलें आहे. भाषा ही मनुष्याच्या विचारशक्तीच्या विकासास सहाय्यभूत आहे.

माणसाच्या मनोव्यापारांत विचाराइतकेंच भावनांनाहि महत्त्व आहे. भाषा ही जशी विचाराला सहाय्य करते तशी ती भावनांनाहि उपयोगीं पडते. दुसऱ्याच्या सुखदुःखांशीं आपण समरस होतों व दुसरे आपल्या सुखदुःखाशीं समरस होतात, ही जी सहानुभूतीची वृत्ति ती भाषेमुळे अस्तित्वांत येते व विकसित होते. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. तो पहिल्यापासून समाज करून राहात आला. सामाजिक जीवनांत आवश्यक अशी विचारांची व भावनांची देवाणघेवाण भाषेच्याद्वारें सिद्ध झाली व विविध मानवी समाजांची बौद्धिक व भावनिक क्षेत्रांत प्रगति होत गेली.

आवाज किंवा ध्वनि उत्पन्न करण्यास सहाय्यक अशा आपल्या कंठांतील व मुखांतील इंद्रियांच्या आधारें मनुष्य ध्वनियुक्त शब्दांनी बोलतो. हे शब्द वाचेच्या वाटें, तोंडाच्या वाटें बाहेर पडतात. पण ते बाहेर पडल्याबरोबर हवेंत विरून जातात. ते कायम टिकून राहावेत, डोळ्यांना दिसेल असें स्वरूप त्यांना देतां यावें, ते ग्रंथगत व्हावेत, म्हणून मानवाने आपल्या कल्पनाचातुर्याने लिपी उत्पन्न केली व जें बोललें जातें तें लिहिलें जावें ह्या उद्देशाने प्रत्येक ध्वनीला विशिष्ट खूण किंवा रेखात्मक चिन्ह ठरवून लेखनाची लिपी सिद्ध केली. ध्वनींना डोळ्यांना दिसणाऱ्या खुणांचें रूप दिलें व त्या खुणांतून लेखनाची सोय केली. भोवतालच्या सृष्टीशीं झगडतांना मिळालेले बरेवाईट अनुभव, आपले विचार व भावना ग्रथित केल्या गेल्या व एका पिढीचे अनुभव, विचार, भावना व ज्ञान ह्यांचा ठेवा पुढील पिढीला मिळण्याची सोय झाली. मानवाला आपले अनुभव संग्रहित करतां येऊ लागले व त्याची ज्ञानविकासास फार मदत झाली. इतर प्राणिमात्राला जें शक्य झालें नाही, तें मानवानें केलें. भाषा बोलणें व लिहिणें ह्या गोष्टी साध्य करून घेऊन मानवाने निसर्गावर विजय मिळविला; आपला ज्ञानविकास करून घेतला व सुख, आरोग्य व सुरक्षितता ह्या दृष्टीने समाजोपयोगी विविध सुधारणांचा मार्ग आक्रमिला आणि वैयक्तिक व सामाजिक जीवन हें आचारविचारांच्या स्थिर तत्त्वावर व परंपरेवर अधिष्ठित केलें. मानवी जीवनांतील भाषेचें महात्म्य लक्षांत घेतलें म्हणजे प्रत्येक देशांतील शिक्षणक्रमांत भाषा विषयाला प्रथम स्थान कां दिलें जातें हें सहज लक्षांत येईल.

भाषेची उत्पत्ति

'भाषा' हा शब्द 'भाष्' म्हणजे 'आवाज करणें' 'बोलणें' ह्या

धातूपासून आला आहे. ह्या धात्वर्थाप्रमाणे 'भाषा' म्हणजे 'ध्वनींचा समूह' असें स्थूलार्थाने म्हणतां येईल. 'ध्वनि' हें भाषेचें माध्यम होय. आवाज अगर ध्वनि उत्पन्न करण्याचें सामर्थ्य ईश्वराने सर्व प्राण्यांना दिलेलें आहे. मानवप्राणी ज्याप्रमाणे निरनिराळे ध्वनि निर्माण करून आपल्या मनांतील भाव प्रकट करतो, त्याप्रमाणे चिमणी, कावळा, पोपट, गाय इत्यादि कांही प्राणी ध्वनि निर्माण करून आपले भाव मर्यादित रीतीने प्रकट करतात, हा आपला अनुभव आहे. प्रसंगपरत्वें प्राण्यांनी काढलेल्या ध्वनीमध्येहि फरकाच्या सूक्ष्म छटा दिसतात. भांडणतंडण, संकट, भक्ष्यप्राप्ति, अभंकाला भक्ष्य भरविणें इत्यादि प्रसंगीं पशुपक्षी जे ध्वनि काढतात, जे आवाज करतात त्यांमध्ये निरनिराळे प्रकार दिसतात. हे ध्वनिसमूह म्हणजे त्यांची एकप्रकारची भाषाच होय. पण ह्यापेक्षा अधिक विकसित अर्थ ते आपल्या ध्वनिसमूहांना देऊं शकले नाहीत. मनुष्याच्या अंगीं जें बौद्धिक सामर्थ्य आहे त्या बौद्धिक सामर्थ्याच्या सहाय्याने आपल्या आवाजांना किंवा ध्वनींना एक व्यवहारोपयोगी अर्थ देणें, ध्वनि आणि वस्तु ह्यांचें साहचर्य साधणें किंवा ध्वनींत निरनिराळे 'संकेत' उत्पन्न करणें हें मनुष्याला शक्य झालें.

ध्वनियुक्त भाषेच्या निर्मितीपूर्वी हस्तविक्षेप, अंगविक्षेप, नेत्रविक्षेप, मुद्राविक्षेप इत्यादि विक्षेपांच्या द्वारा मानवाने मनांतील भाव प्रकट केले असतील असें भाषा शास्त्रज्ञांनी एक अनुमान केलें आहे आणि त्या अनुमानांतहि सत्यांश आहे. आजच्या शब्दयुक्त बोलण्याच्या भाषेच्या प्रगत कालांतहि हावभावाच्या भाषेचा उपयोग करण्यांत येतो. आरंभींच्या अवस्थेंत हावभावांना प्राधान्य देण्यांत आलें असावें; पण परिणाम, उपयोग व सुकरता ह्या दृष्टीने आवाजाद्वारे प्रकट होणारे विविध ध्वनि व ध्वनिसमुच्चय हेच मनांतील विचार व भावना प्रकट करण्याचें प्रमुख साधन मानवाने वापरलें असावें, असा निष्कर्ष निघतो. क्रमाक्रमाने व कालांतराने अमूक स्थिति आली की एक विशिष्ट आवाज करावा, अमूक वस्तु किंवा प्राणी पाहिल्यावर एक विशिष्ट उच्चार करावा, अमूक वस्तूला अमूक म्हणावें, अमूक क्रियेला अमूक शब्द योजावा, असें संकेत रूढीने ठरले. वस्तु अगर स्थिति ह्यांचें दर्शन अगर अनुभव आल्याबरोबर विशिष्ट ध्वनिसमुच्चयात्मक शब्द निघून ती वस्तु अगर स्थिति यांचें साहचर्य साधलें गेलें.

पृथ्वीच्या पाठीवर मनुष्याच्या उत्पत्तीस व वाढीस अनुकूल अशी परिस्थिति जेथे जेथे सांपडली तेथे तेथे मनुष्यसमाजाचे पुंज उत्पन्न झाले आणि वाढले. त्यांच्याबरोबर त्यांच्या भाषा उत्पन्न झाल्या व वाढल्या; त्या त्या ठिकाणाहून ते ते मानवी पुंज दुसरीकडे वसाहत करण्यासाठी गेले. तेव्हा त्यांनी आपल्या

भाषाहि बरोबर नेल्या. निरनिराळे मानवपुंज निरनिराळ्या ठिकाणीं राहात होते व त्यांनी आपल्या परिस्थित्यनुसार ध्वनियुक्त भाषा निर्माण केल्या. हें लक्षांत घेतां सर्व जगांतील मनुष्यांचा पूर्वज असा एकच मानवसमाज होता व त्याची एकच भाषा होती व त्या पहिल्या समाजापासून व त्याच्या भाषेपासून इतर समाज व इतर भाषा उद्भवल्या असें संभवत नाही, असें भाषाशास्त्रज्ञ मानतात.

भारतांतील पूर्वकालीन भाषा

पृथ्वीच्या पाठीवर प्राचीन काळापासून व्यवहारांत असलेल्या भाषा, त्याचप्रमाणे सांप्रत चालू असलेल्या भाषा ह्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचें जें शास्त्र त्याला 'भाषाशास्त्र' म्हणतात. हें शास्त्र जाणणाऱ्या विद्वानांनी म्हणजेच भाषाशास्त्रज्ञांनी सध्या ज्या प्रचलित भाषा आहेत त्यांच्या कुळी कोणत्या, ह्याचे कांही निश्चित निर्णय बांधले. भाषेच्या कुळी ठरवितांना त्या त्या भाषांतील शब्दांच्या व्युत्पत्ति व त्या त्या भाषेंतील अन्वित शब्दांचे संबंध हे लक्षांत घेऊन त्यांनी विचार केला व भाषांचें वर्गीकरण केलें. त्यांपैकी 'आर्यन भाषा' किंवा 'आर्यभाषा' हा एक वर्ग किंवा एक कुळी मानिली आहे. ह्या कुळींत मोडणाऱ्या ज्या अनेक भाषा आज व्यवहारांत आहेत, त्यांतील सर्वसामान्य खूण म्हणजे या भाषांतील बहुतेक शब्द धातूवरून बनले आहेत. त्याचप्रमाणे या कुळींतील बहुतेक भाषा 'बोलभाषा' (लोकांत बोलल्या जाणाऱ्या भाषा) म्हणून सुधारलेल्या देशांत आज वापरांत आहेत. 'आर्यन भाषा' या वर्गांतील 'आर्य भारतीय' ही शाखा भारतांत फोफावली. याच शाखेपासून आपल्या देशांतील आज प्रचलित असलेल्या बऱ्याच भाषा निर्माण झाल्या आहेत. आपली मराठी भाषा ही ह्या शाखेंतच येते. 'आर्यन्' कुळीप्रमाणे 'द्राविडी' ही एक स्वतंत्र कुळी मानिली आहे व ह्या द्राविडी शाखेंतून दक्षिण हिंदुस्थानांत बोलल्या जाणाऱ्या तामीळ, तेलगू, कानडी व मल्याळी ह्या भाषा आल्या, असें भाषाशास्त्रज्ञांचें मत आहे.

आशिया खंडांतील भाषांपैकी संस्कृत व तिच्यापासून निघालेल्या इतर भाषा ह्या सर्व आर्यभाषाच होत. आर्य लोक आर्यभाषा बोलत. 'आर्यन' ह्या कुळीचें आद्य स्वरूप म्हणजे वेदकाळापूर्वीची जी भाषा ती होय. या भाषेची माहिती विद्वान् लोक अनुमानाने देऊं शकतात. आर्य लोकांच्या या भाषेस 'पूर्ववैदिक भाषा' असें संबोधिलें जातें. भाषेंत कालान्तराने व देशान्तराने फरक पडत जातात. आर्यलोकांची आर्यभाषा घेतली तर पूर्ववैदिक, वैदिक, संस्कृत, पाली, प्राकृत, अपभ्रंश व मराठी हे मूळ आर्य भाषेचे कालिक भेद म्हणतां येतील.

पूर्ववैदिक भाषेनंतर जी भाषा आपणांस दिसते ती वेदभाषा अर्थात् वैदिक भाषा होय. जगांतील अत्यंत जुन्या वाङ्मयांत वेद-वाङ्मयाचा समावेश होतो. किंबहुना भाषाशास्त्राच्या दृष्टीने वेद-वाङ्मयाला अग्रस्थान देण्यांत येतें.

या वैदिक भाषेची पुढली पायरी म्हणजे संस्कृत भाषा ही होय. ह्या भाषेचें महत्त्व भारतवासियांना सांगण्याची आवश्यकता नाही. ह्या संस्कृत भाषेवर मोहित होऊन कित्येक पाश्चात्य पंडितांनी संस्कृत भाषेचा अभ्यास हें आपल्या जीविताचें ध्येय ठरविलें. 'महाभारत' व 'रामायण' हीं भारताला भूषणभूत अशीं महाकाव्यें संस्कृत भाषेंतच रचिलीं आहेत. कालिदास, भवभूति, बाणभट्ट, जगन्नाथ पंडित आदि कविवर्यांनी ह्या संस्कृत भाषेला आपले ललित अलंकार अर्पण केले. शंकराचार्य, रामानुजाचार्य इत्यादि जगन्मान्य आचार्यांनी आपलें तत्त्वज्ञानविवेचन ह्या भाषेंतून करून तिला जागतिक कीर्ति मिळवून दिली. अशा ह्या संस्कृत भाषेने आपलें वर्चस्व भारतावर कित्येक शतकें गाजविलें.

वेदपूर्व भाषा, वैदिक भाषा व संस्कृत भाषा ह्यांच्या बरोबरीने अति प्राचीन काळापासून लोकांच्या व्यवहारांतील ज्या बोलण्याच्या भाषा होत्या त्यांना 'प्राकृत भाषा' म्हणतात. प्राकृत भाषा म्हणजे 'प्रकृती'च्या भाषा. 'प्रकृतीनां साधारणजनानामिदं प्राकृतम्' ही उपपत्ति भाषाशास्त्रज्ञांनी दिली आहे. त्या बोलभाषा निरनिराळ्या प्रांतांत बोलल्या जात व त्या त्या प्रांताचें नांव त्या त्या बोलभाषेला मिळालें. पाली, पैशाची, शौरसेनी, मागधी, अर्धमागधी आणि माहाराष्ट्री या प्राकृत भाषा होत व या संस्कृत भाषेच्या बरोबरीने साधारण लोकांकडून उपयोजिल्या जात होत्या. आपला धर्मसंदेश सर्वांना कळावा म्हणून भगवान् बुद्धाने पाली भाषेचा आश्रय केला. इतर प्राकृतांमध्येहि त्या काळांत उत्पन्न झालेलें वाङ्मय आहे. मथुरेच्या आसपासच्या प्रांतांत शौरसेनी बोलली जाई. मगध देश म्हणजे सध्याचा बिहार मागधीने व्यापला होता. वायव्येकडील डोंगराळ प्रदेशांत पैशाची भाषा बोलली जाई. महाराष्ट्रामध्ये 'माहाराष्ट्री' अस्तित्वांत होती. कित्येक शतकांनी याच प्रांतिक प्राकृत भाषांचीं स्वरूपें बदललीं. त्या बदललेल्या स्वरूपांना 'अपभ्रंश भाषा' असें संबोधिलें जाई.

महाराष्ट्र आणि मराठी

भाषावार प्रांतरचनेच्या धोरणानुसार आता महाराष्ट्र राज्य निर्माण झालें आहे. महाराष्ट्र राज्यांतील लोकांची भाषा मराठी ही आहे. ह्या राज्यांतील शिक्षणाच्या अभ्यासक्रमांत मराठी भाषेच्या अभ्यासाला अग्रस्थान देण्यांत आलें आहे तेंहि क्रमप्राप्त आहे. आज आपल्या राज्याला आपण 'महाराष्ट्र'

हें नांव दिलें आहे. 'महाराष्ट्र' ह्या नांवाचा प्रथम उल्लेख वराहमिहिर (इ. स. ५०५) याच्या ग्रंथांत व सत्याश्रय पुलकेशी याच्या इ. स. ६११ सालांतील बदामीच्या शिलालेखांत सांपडतो. महाराष्ट्र या नांवाने जो प्रदेश सध्या संबोधिला जातो त्या प्रदेशाला पूर्वी 'दक्षिणापथ' ह्या नांवाने ओळखीत असत. 'दक्षिणापथ' ह्याचा अर्थ दक्षिणेच्या मार्गाकडील प्रदेश असा होतो. 'दक्षिणापथ' हें नांव 'महाराष्ट्र' ह्या नांवापेक्षा पुरातन आहे. 'महाराष्ट्र' ह्या प्रदेशाची व्याप्ति निरनिराळ्या काळीं निरनिराळी होती. 'महाराष्ट्र' ह्या शब्दाच्या व्युत्पत्तीसंबंधाने निरनिराळीं मतें आहेत. देशाच्या विस्तारावरून या प्रदेशास महाराष्ट्र–मोठें राष्ट्र–असें नांव मिळालें आणि गुणवाचक असें हें नांव पुढे या प्रांताचें विशेषनाम झालें. या 'महा' राष्ट्रांत अनेक 'लघु' राष्ट्रांचा समावेश होत होता. कर्मराष्ट्र, पूर्वराष्ट्र, गोपराष्ट्र इत्यादि महाराष्ट्रांतील लघुराष्ट्रांचीं नांवें ताम्रपटांत व शिलालेखांत आढळतात. डॉ. भांडारकर यांच्या मतें 'रट्ट' आणि 'महारट्ठ' या जनवाचक शब्दावरून 'महाराष्ट्र' हें नांव पडलें.

मराठी ही महाराष्ट्राची मुख्य भाषा होय. मराठी भाषेच्या उत्पत्तीसंबंधी विद्वानांमध्ये बराच मतभेद आहे. भारतामध्ये ज्या संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश भाषा होत्या, त्यांपैकी कोणत्या भाषेपासून मराठी उत्पन्न झाली असावी ह्यासबंधी भाषशास्त्रज्ञांमध्ये मतभेद दिसून येतात. पूर्ववैदिक, वैदिक, संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, ह्या भाषांचे अवशेष व सार्म्ये मराठींत आढळून येतात. ह्यामुळे कांही विद्वान् मराठी ही संस्कृतपासून उत्पन्न झाली असें म्हणतात, तर दुसरे तिचा पालीशीं संबंध जोडतात. कोणी मराठीला प्राकृतोद्भव मानतात, तर कोणी महाराष्ट्रीस मराठीची जननी मानतात. मराठी भाषेच्या उद्गमासंबंधी असे पक्षोपपक्ष आहेत. ह्या सर्व मतांचा परामर्श श्री. कृ. पां. कुलकर्णी ह्यांनी आपल्या 'मराठी भाषा–उद्गम व विकास' ह्या ग्रंथांत घेतला आहे. निरनिराळ्या प्राकृत भाषा व अपभ्रंश भाषा ह्यांचे जे अवशेष मराठींत दिसतात त्यांचीं उदाहरणें त्यांनी आपल्या पुस्तकांत सविस्तर दाखवून त्यांची चर्चा केली आहे. प्राकृत व प्राकृत अपभ्रंश ह्यांचे मराठींत दिसणारे ठसे किंवा अवशेष दिङ्मात्रीत करून मराठीने संस्कृतमधून शब्दसंपदा व व्याकरण ह्याबाबत कोणतें व किती ऋण घेतलें हें सोदाहरण निदर्शित केलें आहे व शेवटीं मराठीच्या उत्पत्तीसंबंधी जो सिद्धान्त मांडला आहे तो असा, "ह्या सर्व विवेचनावरून व उदाहरणांवरून मराठी भाषा अमूक एका प्राकृत भाषेपासून उत्पन्न झाली असें आपणांस म्हणतां येत नाही. सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश व संस्कृत ह्या भाषांनी आपापल्या परीने मराठीस जन्माला आणण्यास हातभार

लावलेला दिसतो. निरनिराळ्या प्राकृत भाषा बोलणारे निरनिराळे समाज निरनिराळ्या काळीं वरून आर्यावर्तांतून अनेक कारणांमुळे महाराष्ट्रांत उतरले आणि येथे स्थायी झाले. त्यांच्या संमिश्र बोलण्यानेच मराठी भाषा बनली. महाराष्ट्र देश ज्याप्रमाणे गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अश्मक, कुंतल, विदर्भ, कोकण इत्यादि लहान लहान देशविशेषांचा मिळून बनला व महाराष्ट्राची लोकवसाहत ज्याप्रमाणे निरनिराळ्या लोकघटकांची मिळून झाली, त्याचप्रमाणे मराठी भाषा ही निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या—विशेषतः माहाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांच्या मिश्रणाने बनली."

मराठीचा जन्मकाल

आज उपलब्ध असलेला मराठींतील पहिला ग्रंथ म्हणजे मुकुंदराजानें रचिलेला 'विवेकसिंधु' हा होय. ह्या ग्रंथाचा काळ शक १११० आहे. ह्यानंतर मराठीचें ग्रांथिक स्वरूप आपल्याला चक्रधरादिकांच्या महानुभावीय वाङ्मयांत सांपडतें (श. ११८५). ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीचा अवतार शके १२१२ मध्ये झाला. ज्ञानेश्वरी, विवेकसिंधु ह्यांसारखे ग्रंथ प्रसविण्याची शक्ति कोणत्याहि भाषेंत तिच्या जन्माबरोबर येत नाही. ह्या अभिजात उत्कृष्ट मराठी वाङ्मयाची निर्मिति बाराव्या शतकांत झाली. तत्पूर्वी मराठी भाषेचा जन्म होऊन ती ग्रंथनिविष्ट होण्याइतकें सामर्थ्य तिच्यामध्ये उत्पन्न झालें असावें असें अनुमान काढतां येतें. मराठीला हें ग्रंथनिविष्ट स्वरूप येण्यापूर्वी ही भाषा केव्हापासून बोलली जात होती, ह्याचा विचार शिलालेख व ताम्रपट ह्यांच्या आधारें संशोधकांनी केला. ज्या शिलालेखांत व ताम्रपटांत मराठी शब्द अगर वाक्यें दिसतात त्या सर्वांची पाहणी करून मराठींतील पहिलें उपलब्ध वाक्य हें म्हैसूरजवळील श्रवणबेळगोळ येथील एका पुतळ्यावर कोरलेलें आहे तें असावें असा निर्णय केला आहे. श्रवण बेळगोळगांवाजवळ दोड्ड बेट्ट (इंद्रगिरी) नांवाचा पर्वत आहे. त्या पर्वतावर एक भव्य असा पुतळा आहे. हा पुतळा जैन तीर्थंकर गोमतेश्वर ह्याचा आहे. सर्व लोकांच्या माहितीसाठी ह्या पुतळ्यावर निरनिराळ्या देशभाषांत हा पुतळा कोणीं उभारला ही माहिती कोरविली आहे. ह्या शिलालेखांत पुढील मराठींतील मजकूर आहे.

श्री चावुण्डराजे करवियले
गंगराजे सुत्ताले करवियले

मराठींतील शिलालेखांपैकी हा पहिला आद्य शिलालेख होय. ह्या लेखाचा काळ शक ९०५ (सन ९८३) असा आहे. ह्या लेखांतील दुसरी ओळ कांही वर्षें मागाहून म्हणजे इ. स. १११७ मध्ये कोरली असावी असें

तज्ज्ञांचें मत आहे. म्हैसूरप्रांतीं गंग नांवाचें घराणें राज्य करीत होतें. त्या राज्यांत राजमल्ल नांवाचा राजा इ. स. ९७४ ते ९८४ ह्या काळांत राज्य करीत होता. राजमल्ल ह्याचा 'चावुण्डराय' हा प्रधान होता. तो जैन होता. त्याने हा पुतळा उभारला. ह्या पुतळ्याची उंची ७० फूट आहे. ह्यांतील पहिल्या 'श्री' ची उंची सुमारें दीड फूट आहे. आशिया खंडांत ह्याच्या इतका भव्य व मोठा दुसरा पुतळा नाही. "श्री चावुण्डराये करवियले" हें मराठींतील पहिलें उपलब्ध वाक्य व मराठींतल्या ह्या पहिल्या वाक्याची ही जन्मकथा आहे. वाक्य शब्दांनी तयार होतें. तेव्हा शब्द वाक्याच्या आधी जन्मास आले असले पाहिजेत. मराठी शब्दाचा शोध करीत करीत शक ६०२ पर्यंत जातां येतें. शक ६०२ मध्ये खोदलेल्या एका ताम्रपटांत 'पन्नास' 'प्रिथिवी' हे मराठी शब्द आढळतात. मराठी वाक्य शक ९०५ मधील शिलालेखांत व मराठी शब्द शक ६०२ मधील ताम्रपटांत सांपडतात. ह्यावरून मराठी भाषा इ. स. ७०० च्या सुमारास अवतीर्ण झाली असावी असें म्हणावयास हरकत नाही. हजारो वर्षांपूर्वी आपण महाराष्ट्रीय लोक बोलत असलेल्या मराठी भाषेचें स्वरूप कसें होतें ह्याची कांही कल्पना ह्या शिलालेखांतील वाक्यावरून येते. आपली मराठी मायबोली ही सुमारें गेलीं तेराशें-चवदाशें वर्षें आपणां महाराष्ट्रीयांच्या बोलण्यांत व लिहिण्यांत आहे. ह्या कालावधींत तिचें प्रकटीकरणाचें सामर्थ्य वाढलें आहे.

मराठीचे कालिक व प्रांतिक भेद

मराठीच्या प्रारंभकालापासून ते आजतागायत जवळजवळ बाराशें शतकांहून अधिक वर्षांचा काळ लोटला. आज जें मराठीचें स्वरूप आपल्याला दिसतें तेंच ह्या सर्वकाळांत होतें असें नाही. दर दोनशे वर्षांनी भाषेचें रूप बदलतें असें भाषाशास्त्रज्ञांचें मत आहे. पूर्वकालीन ग्रंथ-उदाहरणार्थ ज्ञानेश्वरी, दासबोध-वाचीत असतां मराठी भाषेचें स्वरूप आजच्यापेक्षा निराळें होतें हें आपणांस दिसून येतें. बखर वाङ्मयांतील भाषेचें स्वरूप म्हणजे वाक्यरचना व शब्दयोजना हींहि आजच्यापेक्षा निराळी दिसतात. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि आध्यात्मिक अशीं जीं स्थित्यंतरें ह्या प्रदीर्घ काळांत महाराष्ट्रांत झालीं त्यांचा परिणाम भाषेच्या स्वरूपावर झाला. त्या त्या काळांतील ग्रंथ-संपत्तीचा शोध घेऊन विद्वानांनी मराठीच्या स्वरूपांचे कालिक भेद मानले आहेत ते असे-(१) यादवकालीन मराठी (२) बहामनीकालीन मराठी (३) शिवकालीन मराठी (४) पेशवेकालीन मराठी (५) आंग्लकालीन मराठी.

दर बारा कोसांवर भाषा बदलते अशी एक म्हण लोकांत रूढ आहे.

भाषा तीच बोलली जाते पण स्वरभेदावरून, उच्चारप्रक्रियेच्या लकबीवरून, विशिष्ट शब्दयोजनेवरून, मूळ भाषेंत थोडाफार फरक पडतो. मराठी ज्या प्रदेशांत बोलली जाते त्या प्रदेशांचा क्षेत्रविस्तार एक लाख चौरस मैल आहे व मराठी भाषा बोलणारांची संख्या सुमारें तीन कोट आहे. एवढ्या मोठ्या क्षेत्रांत एकाच स्वरूपाची भाषा एकाच पद्धतीने बोलली जाणें अशक्य आहे. ग्रंथ-निविष्ट भाषा सोडली तर मराठीमध्ये प्रांतपरत्वें निरनिराळीं स्वरूपें किंवा भेद दिसतात. ह्यांना मराठीच्या बोली किंवा प्रांतिक भेद असें म्हणतात. कोकणी, मराठी, वऱ्हाडी मराठी, खानदेशी मराठी इत्यादि मध्यवर्ती मराठीचे प्रांतिक भेद मानले आहेत.

विष्णुशास्त्री चिपळूणकर हे मराठी भाषेचे शिवाजी ! त्यांच्यापासून मराठी भाषेच्या नवयुगास आरंभ झाला. या नवयुगांत तुम्ही आम्ही वावरत आहोंत. १८७४ पासून सुरू झालेल्या ह्या कालखंडांत आपल्या मायबोलीचें वैभव विविध वाङ्मयप्रकारांतून वाढलें आहे. तें वैभव आपल्यासमोर आहे. अशा ह्या आपल्या वैभवपूर्ण मायबोलीचा अभिमान धरून आपल्याला तिचा सर्वांगांनी अभ्यास करावयाचा आहे.

व्याकरणाचा अभ्यास

आपल्या मनांतील भावना व विचार प्रकट करण्याचें भाषा हें एक साधन आहे. भाषा बोलतां आली नाही, लिहितां आली नाही, तर आपली केवढी गैरसोय होईल ! ज्या शास्त्रामध्ये भाषेचें निरीक्षण करून त्या भाषेंतील शब्द, शब्दप्रकार (शब्दयोजना), शब्दांचीं रूपें, वाक्यरचना इत्यादीसंबंधीं नियम काढलेले असतात, त्या शास्त्रास ' व्याकरण–शास्त्र ' असें म्हणतात. प्रचारांत असलेल्या भाषेचा कसा उपयोग किंवा प्रयोग होतो हें पाहणें हें व्याकरणाचें काम आहे. बोलण्यांत व लिहिण्यांत झालेल्या चुका, दोष ह्यांचें स्पष्टीकरण व्याकरणशास्त्राच्या अभावीं करतां येत नाही. बोलण्यांतील व लेखनांतील शुद्धता व काटेकोरपणा हीं व्याकरणाच्या नियमांनी सिद्ध केलीं जातात, म्हणून मातृभाषेच्या अभ्यासांत मातृभाषेच्या व्याकरणाच्या अभ्यासालाहि स्थान दिलें जातें.

आपण नेहमी वाक्यावाक्यांनी बोलतों. तेव्हा ' वाक्यरचना ' अगर ' वाक्याची जडणघडण ' हा व्याकरणाचा मुख्य विषय होतो. पण वाक्यें हीं शब्दांनी बनलेलीं असतात. शब्द विशिष्ट क्रमांनी येऊन त्यांचा परस्परसंबंध जोडला गेला असेल तर वाक्य बनतें, वाक्याला अर्थपूर्णता येतें, म्हणून वाक्याच्या अभ्यासाबरोबर व्याकरणांत ' शब्दविचार ' हा विषय येतो. शब्द

हे अक्षरांनीं बनलेले असतात व अक्षरें मूळ ध्वनींनी बनलेलीं असतांत, हें आपण पाहिलें आहे. म्हणून शब्दविचाराबरोबर 'वर्णविचारहि' करावा लागतो. अशा तऱ्हेनें **वर्ण, शब्द** व **वाक्य** हे व्याकरणाचे तीन मुख्य विषय आहेत. पुढे मराठीच्या दृष्टीने **वर्णविचार, शब्दविचार** व **वाक्यविचार** ह्यांचें विवेचन केलेलें आहे.

अभ्यास

(१) "मानवी जीवनांत भाषेचें महत्त्व काय?" ह्यावर छोटा निबंध लिहा.

(२) भाषेच्या उत्पत्तीची मीमांसा करा.

(३) भारतांत पूर्वकालीन भाषा कोणत्या? त्यांच्याशीं मराठीचा संबंध कसा पोहोंचतो?

(४) 'महाराष्ट्र' हें नांव कसें पडलें?

(५) 'मराठीची' उत्पत्ति कोणकोणत्या भाषांपासून झाली?

(६) मराठीच्या जन्मकालाचा निर्णय करण्याचीं साधनें कोणतीं? जन्मकाल कोणता व तो कसा ठरविला?

(७) मराठींतील पहिल्या उपलब्ध वाक्याची जन्मकथा लिहा.

(८) कालिक भेद व प्रांतिक भेद होण्याचीं कारणें कोणतीं? मराठीचे कालिक भेद व प्रांतिक भेद सांगा.

(९) व्याकरणशास्त्रांत कोणत्या विषयाचें विवेचन केलें जातें? भाषाभ्यासांत व्याकरणाच्या अभ्यासाचें महत्त्व कोणतें?

---

(२) वर्णमाला

अक्षर व वर्ण

भाषा कशी उत्पन्न झाली हें आपण पाहिलें. 'ध्वनि' हे भाषेचें माध्यम आहेत. स्थूलार्थाने भाषा म्हणजे ध्वनींचा समूह. भाषेंतील शब्द निरनिराळ्या ध्वनींच्या सहाय्याने बनले आहेत. तोंडाच्या द्वारे आपण ध्वनि काढतों, त्या ध्वनींच्या साहाय्याने शब्द बनवितों, शब्दांच्या साहाय्याने वाक्य तयार होतें व वाक्या-वाक्यांनी बोलून आपण आपलें मनोगत प्रकट करतों. अमूक वस्तूला अमूक शब्द असें अनेकवार उपयोग झाल्यामुळे रूढ झालें.

'गाय' हा शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या मनापुढे एक विशेष प्राणी उभा राहतो व ऐकणाराच्या मनामध्येहि तोच प्राणी उभा राहतो. प्रथम कोणी तरी 'गाय' हा शब्द तो विशेष प्राणी दाखविण्याकरिता वापरला. इतर लोक तोच शब्द त्या प्राण्याकरिता वापरूं लागले व तोच प्रघात पडला. ह्या प्रघाताला 'संकेत' असें म्हणतात. तेव्हा भाषेतील शब्द हे एक प्रकारचे संकेतच आहे. शब्दाचा आधार असे जे ध्वनि त्याचा मराठी भाषेच्या दृष्टीने आता आपल्याला विचार करावयाचा आहे.

मराठी भाषेतील मूलध्वनींचा विचार करण्याकरिता आपण एक वाक्य घेऊं. 'मराठी ही आमची मायबोली आहे.' हें पुऱ्या अर्थाचें बोलणें म्हणजे वाक्य आहे. ह्या वाक्यांत एकूण पांच शब्द आहेत. मराठी ह्या शब्दांत म रा ठी अशीं तीन अक्षरें आहेत. ही ह्या शब्दांत एकच अक्षर आहे. आमची हा शब्द तीन अक्षरांनीं बनला आहे, तर मायबोली व आहे ह्या शब्दांत अनुक्रमें चार व दोन अक्षरें आहेत. म्हणजे शब्द एक किंवा अधिक अक्षरांनी बनलेले असतात.

मराठी हा शब्द प्रथम आपण उच्चारतों व नंतर लिहितों. म हा एक पूर्ण उच्चार, रा हा दुसरा पूर्ण उच्चार, ठी हा तिसरा पूर्ण उच्चार. म रा ठी ह्या शब्दांतील तीन अक्षरें हीं आपल्या पूर्ण उच्चाराच्या खुणा किंवा रेखात्मक चिन्हें आहेत. पूर्ण उच्चार व त्याची रेखात्मक खूण ह्याला अक्षर म्हणतात.

'मराठी' ह्या शब्दांतील म रा ठी ह्या उच्चारांचा किंवा ध्वनींचा विचार केला तर असें दिसून येतें की, म ह्या उच्चारांत, ह्या ध्वनींत, म् हा एक अपूर्ण उच्चार व अ हा पूर्ण उच्चार असे दोन उच्चार आहेत. रा ह्या मध्ये र् हा अपूर्ण उच्चार व आ हा पूर्ण उच्चार असे दोन उच्चार आहेत. पण आमची व आहे ह्यामधील 'आ' ह्या ध्वनीचा उच्चार पूर्ण आहे. म हें अक्षर म् हा अपूर्ण उच्चार व अ हा पूर्ण उच्चार ह्या दोन उच्चारांनी तयार झालें आहे. पण आमची मधील आ हें अक्षर एक पूर्ण उच्चाराने बनलें आहे. ह्यावरून कांही अक्षरें एका पूर्ण उच्चाराने किंवा पूर्ण मूलध्वनीने बनलेलीं आहेत व कांही एक अपूर्ण उच्चार अगर ध्वनि व एक पूर्ण उच्चार अगर ध्वनि मिळून बनलेलीं आहेत.

मुखावाटे निघणारे मूळचे पूर्ण उच्चार अगर ध्वनि आणि मूळचे अपूर्ण उच्चार अगर ध्वनि व त्यांच्या लिहिण्यासाठी ठरविलेल्या खुणा अगर रेखात्मक चिन्हें ह्यांना वर्ण असें म्हणतात.

आपल्या भाषेतील कांही ध्वनि म्हणजे वर्ण अपूर्ण उच्चाराचे आहेत व कांही ध्वनि किंवा वर्ण हे पूर्ण उच्चाराचे आहेत हें आपण पाहिलें.

अपूर्ण उच्चाराचा ध्वनि कसा लिहितात तें पहा—

म्, र्, ठ्, ह्, म्, च् इत्यादि.

स्वर व व्यंजनें

ज्या वर्णांचा उच्चार स्वतंत्रपणें दुसऱ्या वर्णाच्या सहाय्यावाचून होतो त्यांस स्वर म्हणतात.

मराठी भाषेत **स्वर** एकूण **बारा** आहेत.

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ऌ, ए, ऐ, ओ, औ.

दीर्घ ऋ व दीर्घ ऌ मानून कांही लोक एकूण १४ स्वर मानतात पण हे स्वर अगर ह्या स्वरांनी युक्त असे शब्द मराठी भाषेत आढळत नाहीत म्हणून त्यांना मराठीच्या स्वरांमध्ये स्थान देऊं नये, असें कै० दामले ह्यांनी आपल्या शास्त्रीय मराठी व्याकरणांत मत प्रदर्शित केलें आहे व तें मत ग्राह्य मानलें गेलें आहे. तेव्हा मराठीमध्ये एकूण स्वर बारा होतात.

'मराठी' ह्या शब्दाचा विचार करतांना आपण पाहिलें की, म ह्या अक्षरांत दोन वर्ण आहेत. एक म् व दुसरा अ. म हें अक्षर सिद्ध होण्यास म् ह्या मूळ अपूर्ण ध्वनीस अगर वर्णास आपण 'अ' ह्या स्वराचें सहाय्य घेतलें. र् ह्या अपूर्ण ध्वनीचा उच्चार पूर्ण करण्यास आ ह्या स्वराचें सहाय्य घेतलें व रा हा ध्वनि बनविला. म मधील म्, रा मधील र् व ठी मधील ठ् ह्या वर्णांचे उच्चार पूर्ण होण्यास कोणत्या तरी स्वराची मदत घ्यावी लागत. ही मदत घेतल्याशिवाय त्यांचा स्वतंत्रपणें पूर्ण उच्चार होत नाही. अशा अपूर्ण उच्चार असणाऱ्या वर्णांना **व्यंजनें** म्हणतात.

ज्या वर्णांचा उच्चार पूर्ण होण्यास स्वरांचें (मागून) साहाय्य घ्यावें लागतें, त्यांना व्यंजनें म्हणतात.


स्वरांच्या साहाय्याशिवाय त्यांचे उच्चार लंगडे पडतात. म्हणून आपण त्यांचे पाय मोडतों व म्, र्, ठ् अशा तऱ्हेनें तीं लिहितों. मराठींतील व्यंजनें एकूण ३४ आहेत.

क् ख् ग् घ् ङ् | च् छ् ज् झ् ञ् | ट् ठ् ड् ढ् ण् |
त् थ् द् ध् न् | प् फ् ब् भ् म् | य् र् ल् व् |
श् ष् स् | ह् ळ् |

मराठी मूळ व्यंजनांत क्ष् व ज्ञ् ह्यांचा अन्तर्भाव केलेला नाही. क्ष् व ज्ञ् हीं संयुक्त व्यंजनें आहेत. (क्ष् = क् + ष्. ज्ञ् = ज् + ञ्) व्यंजनांतील पहिल्या २५ व्यंजनांचे पांच वर्ग केले आहेत. त्यांस अनुक्रमें कवर्ग, चवर्ग, टवर्ग, तवर्ग, पवर्ग असें म्हणतात.

अनुस्वार व विसर्ग हे दोन उच्चार आहेत. त्यांचा मराठी भाषेच्या वर्णमालेंत अन्तर्भाव करावा लागतो. कित्येक शब्दांत हे दोन उच्चार येतात. व्यंजनाप्रमाणे हे उच्चार अपूर्ण आहेत. व्यंजनाचा अपूर्ण उच्चार पूर्ण करण्यास आपल्याला स्वरांची त्या व्यंजनाच्या मागून मदत घ्यावी लागते. पण अनुस्वार व विसर्ग ह्यांच्या बाबतींत उच्चार पूर्ण होण्यास स्वरांचें साहाय्य अगोदर, आरंभीं घ्यावें लागतें. अंबारी, कांदा, स्वतः, दुःख, हे शब्द पाहा. ह्यांतील अनुस्वार व विसर्ग ह्यांचे उच्चार:पूर्णपणें करण्यास स्वरांचें अगोदर साहाय्य घ्यावें लागतें. म्हणून 'अनुस्वार' व 'विसर्ग' हे उच्चार म्हणजेच वर्ण मानून त्यांना 'स्वरादि' अशी व्याकरणांत संज्ञा दिली आहे.

अशा तऱ्हेने मराठी भाषेतील वर्णमालेंत एकूण ४८ वर्ण आहेत. त्यांची विभागणी पुढीलप्रमाणे होते—



मराठी भाषेची लिपी

मराठी भाषेतील वर्णमाला कोणती तें आपण पाहिलें. ह्या वर्णांच्या साहाय्यानें शब्द बनतात. शब्दांनी वाक्य बनवून तें उच्चारून किंवा बोलून आपण आपलें मनोगत प्रकट करतों. पण आपलें हें बोलणें लिहितां यावें म्हणून मानवाने लिपीची उत्पत्ति केली. विशिष्ट ध्वनीला विशिष्ट रूप किंवा रेखात्मक चिन्ह ठरवून लेखनाकरिता लिपी सिद्ध झाली. वर स्वर व व्यंजनें हीं लिहून दाखविलीं आहेत. ती मराठी वर्णमाला व वर्णमालेपासून उत्पन्न होणारी अक्षरें लिहिण्याची पद्धति किंवा लिपी होय. ह्या लिपीस देवनागरी लिपी असें म्हणतात. ही आर्यांची लिपी व ती आर्यांनी आपल्याबरोबर भारतांत आणली. प्राचीन आर्य हे त्या वेळच्या हिंदुस्थानांतील मूळच्या द्रविडी

रहिवाश्यांपेक्षा अधिक तेजःपुंज व रंगाने गोरे होते. त्यांना देव (दिव्–प्रकाशणें ह्या संस्कृत धातूपासून देव शब्द निघाला) असें अन्वर्थक नांव मिळालें. त्यांच्या वसतिस्थानास ग्रामाच्या उलट 'नगरी' असें संबोधण्यांत येई. 'देवनगरी' मध्यें उपयोगांत येणारी ती 'देवनागरी' अशी ह्या नांवाची उपपत्ति कै. दामले ह्यांनी आपल्या शास्त्रीय व्याकरणांत दिलेली आहे. लहान मुलांना म्हणजे बालांना लेखनाच्या दृष्टीने हिचा बोध सुलभतेने होतो म्हणून ह्या लिपीला 'बालबोध' अशी संज्ञा पुढे मिळाली. यादवांच्या काळांत हेमाद्रि ह्या नांवाचा यादवांचा करणाधिप म्हणजे फडणवीस होऊन गेला. त्याने ह्या देवनागरी लिपीस मोडी लिपीचें स्वरूप दिलें. देवनागरी लिपींतील वर्णांच्या रेखात्मक चिन्हांत जलद व एकटाकी लिहिण्यास अनुकूल असे बदल ह्या हेमाद्रीने केले व मोडी लिपी उत्पन्न केली. देवनागरींतील वर्ण मोडून, मुरडून, जलद लिहिण्याच्या लिपीस मोडी हें सार्थ नांव मिळालें. ही मोडी लिपी १२ व्या शतकांत उत्पन्न झाली. मराठी ऐतिहासिक कागदपत्रें हीं मोडींत लिहिलेलीं आहेत.

कानडी, तामीळ, तेलगू या द्राविडी भाषा व अरबी, फारशी ह्या सेमिटिक भाषा वगळल्या तर भारतांतील इतर भाषांत लिहिण्याकरिता ह्या देवनागरी लिपीचा उपयोग केला जातो. देवनागरी लिपी ही बहुतांशीं पूर्ण आहे. निदान इतर लिपीपेक्षा पुष्कळच पूर्ण आहे. भाषेंत जे वर्ण किंवा ध्वनि आहेत त्यांचीं द्योतक चिन्हें लिपींत असलीं पाहिजेत. तशीं तीं असलीं म्हणजे ती लिपी पूर्ण असें म्हणतात. इंग्रजी भाषेंतील पांच स्वर व एकवीस व्यंजनें यांवरच भाषेंतील सर्व ध्वनींचें काम भागविण्यांत जी तारेवरची कसरत करावी लागते तितकी मराठींत ह्या देवनागरी लिपीमुळें करावी लागत नाही. मराठींत बहुतेक ध्वनींना स्वतंत्र वर्ण आहेत व बहुतेक सर्व वर्णांना लिपींत रेखात्मक चिन्हें ठरवन देऊन सोय केलेली आहे. स्वर हा पूर्ण उच्चार असल्यामुळे स्वर हें अक्षर आहे. व्यंजनांत स्वर मिळविला कीं, तें स्वरयुक्त व्यंजन अक्षर होतें. प्रत्येक व्यंजनामध्ये ऋ व ऌ हे स्वर वगळून बाकीचे स्वर त्याचप्रमाणे दोन स्वरादि मिळवून आपल्या भाषेंत बाराक्षरी (बाराखडी) तयार होते; ह्या बाराक्षरीमुळे आपल्या लिपीला पूर्णता आलेली आहे. 'क्' हें व्यंजन ह्यांत 'अ' स्वर मिळविला की क हें अक्षर होतें. म्हणजे क हें अक्षर लिहितांना व्यंजनाची पाय मोडल्याची खूण गेली. इतर स्वर मिळवून जीं बाराक्षरींतील अक्षरें होतात त्यांच्या खुणा ठरलेल्या आहेत व त्या खुणांना विशिष्ट नांवें आहेत. बाराक्षरी कशी बनते व व्यंजनांत स्वर मिळविला असतां त्याचें चिन्ह कोणतें तें खालील तक्त्यावरून लक्षांत येईल.

व्यंजन	मिळविलेला स्वर	बनलेलें अक्षर	स्वरचिन्ह	चिन्हाचें नांव
क्	अ	क		
क्	आ	का	ा	काना
क्	इ	कि	ि	डावी वेलांटी
क्	ई	की	ी	उजवी वेलांटी
क्	उ	कु	ु	पहिला उकार
क्	ऊ	कू	ू	दुसरा ऊकार
क्	ए	के	े	एक मात्रा
क्	ऐ	कै	ै	दोन मात्रा
क्	ओ	को	ो	एक मात्रा व काना
क्	औ	कौ	ौ	दोन मात्रा व काना
क्	ं	कं	ं	व्यंजनांत 'अ' स्वर मिळवून त्यावर शीर्ष-बिंदु
क्	:	कः	:	व्यंजनांत 'अ' स्वर मिळवून त्याच्यापुढे दोन बिंदु

र् ह्या व्यंजनास उ हा स्वर लागून होणारें अक्षर साधारण नियमाप्रमाणे रु असें लिहावयास पाहिजे. पण रूढीप्रमाणें तें अक्षर रु असें लिहितात. दुसरा ऊकार असेल तर रू असें लिहितात.

बाराक्षरी बनवितांना ऋ व ऌ हे गाळले आहेत; पण त्यांचा व्यंजनाशीं संयोग होऊन अक्षरें होतात 'कृपा' ह्यामधील 'कृ' हें अक्षर क् + ऋ मिळून झालें. क + ऌ = क्लृप्ति.

क्ष् व ज्ञ् ह्या संयुक्त व्यंजनांचीहि बाराखडी वरीलप्रमाणें बनविली जाते व त्या बनलेल्या अक्षरांचा उपयोग लिहिण्यांत व बोलण्यांत होतो.

एक व्यंजन व एक स्वर मिळून अक्षर तयार होतें हें आपण पाहिलें. एकापेक्षा जास्त व्यंजनें व एक स्वर मिळून जें अक्षर तयार होतें त्याला जोडाक्षर म्हणतात. स्वच्छ हा शब्द दोन जोडाक्षरांनी युक्त आहे. स्व = स् + व् + अ, च्छ=च् +छ्+अ, कृपा ह्यांतील कृ हें अक्षर आहे कारण क् + ऋ अशी त्याची फोड आहे. पण क्रूर ह्यामधील क्र हें जोडाक्षर आहे. क् + र् + अ = क्र.

जोडाक्षरें लिहितांना त्यांच्या उच्चारांतील पौर्वापर्याप्रमाणेच त्यांचा वर्णानुक्रम लिहिण्याची दक्षता घ्यावी लागते. पुढील उदाहरणें पाहा. **शब्द, चमत्कार, तत्पर, समाप्त, कल्पना, गुप्त, विशिष्ट, पत्नी.**

र् ह्याचा इतर व्यंजनाशीं संयोग होऊन जें अक्षर बनतें तें कसें लिहितात तें पुढे दिलें आहे.

नक्र—क्र—क् + र् + अ

अर्क—र्क—र् + क् + अ

राष्ट्र—ष्ट्र—ष् + ट् + र् + अ

स्वरांचे प्रकार

उच्चारांचा सारखेपणा आणि आखूडपणा किंवा लांबटपणा ह्यावरून स्वरांचे प्रकार पडतात. ज्या स्वरांचा उच्चार आखूड आहे त्यांना **ह्रस्व स्वर** म्हणतात व ज्या स्वरांचा उच्चार लांबट आहे त्यांना **दीर्घ स्वर** म्हणतात. ह्रस्व व दीर्घ असे हे भेद उच्चाराला लागणाऱ्या कालमानाप्रमाणे केलेले आहेत. उच्चारास लागणाऱ्या कालमानास '**मात्रा**' असें म्हणतात. ह्रस्व स्वरांच्या उच्चाराला एक मात्रा लागते तर दीर्घ स्वरांच्या उच्चाराला दोन मात्रा लागतात.

ह्रस्व स्वर—अ, इ, उ, ऋ, ऌ.

दीर्घ स्वर—आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ.

अकल्याण, अखाडा, अगाध, अगस्ति, अथवा, अपेक्षा ह्या शब्दांच्या आरंभीं 'अ' हा ह्रस्व स्वर आला आहे.

आकाश, आगर, आग, आघात, आटा, आनंद, आश्रय ह्या शब्दांच्या आरंभीं 'आ' हा दीर्घ स्वर आला आहे.

इकडे, इच्छा, इमारत, इरलें, इस्त्री ह्या शब्दांच्या आरंभीं इ हा ह्रस्व स्वर आला आहे.

ईडलिंबू, ईश्वर ह्यांतील आरंभींचा ई हा दीर्घ स्वर आहे.

उकड, उकिडवा, उगवणें, उघडा, उणा, ह्यांतील आरंभींचा उ हा ह्रस्व स्वर आहे.

ऊद, ऊन्ह, ऊब, ऊस ह्यांतील आरंभींचा 'ऊ'चा उच्चार दीर्घ आहे.

ऱ्हस्व स्वरांचें सहाय्य घेऊन व्यंजनाचा उच्चार पूर्ण करून अक्षर बनविलें कीं तें **ऱ्हस्व अक्षर** व दीर्घ स्वरांचें साहाय्य घेऊन व्यंजनाचा उच्चार पूर्ण करून अक्षर बनविलें कीं तें **दीर्घ अक्षर** होय.

चिमणी—ह्यांतील चि ही ऱ्हस्व व णी ही दीर्घ.

सुपारी—ह्यांतील सु ही ऱ्हस्व व री ही दीर्घ.

कुरूप—ह्यांतील कु ही ऱ्हस्व व रू ही दीर्घ.

शुद्धलेखनाच्या दृष्टीने इकार व उकार हे ऱ्हस्व केव्हा ह्याचा विचार करून शुद्ध लिहावें लागतें.

उच्चारांच्या सारखेपणावरून स्वरांचे **सजातीय** व **विजातीय** असे दोन प्रकार मानले आहेत. अ व आ ह्यांच्या उच्चारांत सारखेपणा आहे. अ व आ हे परस्पर सजातीय स्वर आहेत. त्याचप्रमाणे इ व ई हे परस्पर सजातीय व उ व ऊ हे परस्पर सजातीय स्वर होत. ज्यांच्या उच्चारांत सारखेपणा नाही ते **विजातीय** स्वर होत. इपासून औपर्यंतचे स्वर अ आ ह्या स्वरांचे विजातीय स्वर होत. अ, आ व उपासून औपर्यंतचे स्वर हे इ व ई ह्या स्वरांचे विजातीय स्वर होत. उ व ऊ ह्याच्याखेरीज बाकीचे स्वर उ व ऊ ह्या स्वरांचे विजातीय स्वर होत.

ए, ऐ, ओ, औ ह्यांना **संयुक्त स्वर** म्हणतात. कारण हे स्वर निरनिराळ्या स्वरांच्या संयोगापासून उत्पन्न झालेले आहेत.

अ + इ अथवा ई = ए; अ + ए = ऐ;

अ + उ अथवा ऊ = ओ; अ + ओ = औ.

ए, ऐ, ओ, औ ह्या संयुक्त स्वरांस परस्पर सजातीयत्व नाही कारण की ते मुळीच विजातीय स्वरोत्पन्न आहेत. म्हणजे एकूण स्वरांचे प्रकार किती झाले ते पाहा.

स्वर— (१) ऱ्हस्व स्वर (२) दीर्घ स्वर (३) सजातीय स्वर (४) विजातीय स्वर (५) संयुक्त स्वर.

य्, व्, र्, ल्, ह्या व्यंजनांचा उच्चार अर्धवट इ, उ, ऋ, ऌ, ह्या स्वरांसारखा (अनुक्रमें) होतो म्हणून ह्यांना **अर्धस्वर** म्हणतात.

वर्णांचें उत्पत्तिस्थानावरून वर्गीकरण

मुखावाटे बाहेर पडणारा प्रत्येक वर्ण मुखाच्या कोणत्या भागांतून उच्चारला जातो, तो उच्चारला जात असतां मुखांतील कोणकोणत्या भागांचा उपयोग करावा लागतो, ह्याचें व्याकरणशास्त्रज्ञांनी सूक्ष्म निरीक्षण करून वर्णांचें स्थानपरत्वें वर्गीकरण केलें आहे.

उच्चार करतांना तोंड, फुप्फुसें आणि घशाजवळ असलेली आवाजाची नळी या तिघांचा संबंध येतो. फुप्फुसांतून श्वास किंवा हवा ह्या नळीच्या वाटें तोंडांतून बाहेर पडते आणि निरनिराळे आवाज किंवा ध्वनि उत्पन्न होतात. हवा बाहेर पडतांना आवाजाची नळी कधी आकुंचित होते तर कधी प्रसरण पावते व त्याप्रमाणे उच्चार सूक्ष्म किंवा मोठे होतात. तोंडांतून बाहेर पडणाऱ्या श्वासास कंठ, तालु, मूर्धन्, दांत, ओठ, ह्यांपैकी कोणाकडून तरी अडथळा उत्पन्न होतो व आवाज उत्पन्न होण्यास त्या श्वासास ह्या स्थानांचें साहाय्य मिळतें. कंठ, तालु, मूर्धन्, दांत, ओठ, ह्या मुखांतील पांच स्थानांच्या हालचालीचें जिभेकडून उच्चारल्या जाणाऱ्या वर्णांना साहाय्य होतें. हें पाहून वर्णांचें उत्पत्ति-स्थानदृष्ट्या वर्गीकरण करण्यांत आलें आहे 'कंठ' म्हणजे गळा, 'तालु' म्हणजे दांतालगतचा वरचा भाग, 'मूर्धा' म्हणजे टाळूच्या वरील पालथ्या वाटीसारखा भाग, 'दंत' म्हणजे दांत, 'ओष्ठ' म्हणजे ओठ व 'नासिका' म्हणजे नाक. ह्या स्थानांचें उच्चाराला जें कमीअधिक साहाय्य मिळतें त्यावरून त्या त्या भागांच्या अनुरोधाने वर्णांचे वेगवेगळे गट केले आहेत. ते पुढील तक्त्यांत दिले आहेत. कंठांतून ज्या वर्णांचा उच्चार निघतो व ज्याला मुखांतील इतर स्थानाचें साहाय्य ध्यावें लागत नाही ते **कंठ्यवर्ण** होत. ज्या वर्णांचा उच्चार होतांना जीभ दांतांच्या लगत तालूला स्पर्श करते त्या वर्णांस **तालव्य वर्ण** म्हणतात. ज्या वर्णांचा उच्चार होतांना जिभेचा स्पर्श तालूच्या मध्यभागीं वर होतो त्यांना **मूर्धन्यवर्ण** म्हणतात. ज्या वर्णांचा उच्चार होतांना जिभेचा स्पर्श दांतांना होतो त्या वर्णांस **दंत्यवर्ण** म्हणतात. ज्या वर्णांचा उच्चार होतांना दोन्ही ओठांचा परस्परांस स्पर्श होतो त्या वर्णांस **ओष्ठ्य वर्ण** म्हणतात. कांही वर्ण असे आहेत की, त्यांचा उच्चार होतांना वरीलपैकी दोन अवयवांचा स्पर्श होतो. त्यावरून **कंठतालव्य, कंठौष्ठ्य, दंतौष्ठ्य, दंततालव्य** अशीं नांवें त्यांना दिलीं आहेत.

	वर्ण	स्थान	स्थानपरत्वें संज्ञा
१	अ, आ, क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह्, विसर्ग.	कंठ	कंठ्य
२	इ, ई, च्, छ्, ज्, झ्, ञ्, य्, श्.	तालु	तालव्य
३	ऋ ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, र्, ष्, ळ्.	मूर्धा	मूर्धन्य
४	ऌ त्, थ्, द्, ध्, न्, ल्, स्.	दन्त	दन्त्य
५	उ, ऊ, प्, फ्, ब्, भ्, म्.	ओष्ठ	ओष्ठ्य
६	ङ्, ञ्, ण्, न्, म्, अनुस्वार	नासिका	नासिक्य–अनुनासिक
७	ए, ऐ.	कंठ व तालु	कंठतालव्य
८	ओ, औ.	कंठ व ओष्ठ	कंठौष्ठ्य
९	व्.	दन्त व ओष्ठ	दन्तौष्ठ्य
१०	च्, ज्, झ्.	दन्त व तालु	दन्ततालव्य

ह्याशिवाय वर्णांचे कठोर व मृदु असे दोन विभाग मानिले आहेत. क् ख् ह्या व्यंजनांचा उच्चार करतांना जितका जोराचा आघात द्यावा लागतो तितका ग् घ् ह्यांचा उच्चार करतांना द्यावा लागत नाही. म्हणून क् ख् हीं कठोर व्यंजनें तर ग् घ् हीं मृदु व्यंजनें होत.

(१) क वर्ग, च वर्ग, ट वर्ग, त वर्ग, प वर्ग ह्या पांच वर्गांपैकी प्रत्येक वर्गांतील पहिलीं दोन व्यंजनें आणि श्, ष्, स् हे १३ कठोर वर्ण होत.

(२) सर्व स्वर व पांच वर्गांपैकी प्रत्येक वर्गांतील शेवटचीं तीन व्यंजनें आणि य् र् ल् व् ह् ळ् हे मृदु वर्ण होत.

उत्पत्तिस्थानावरून वर्णांचें जें वर्गीकरण वरील तक्त्यांत दाखविलें

आहे त्यांत च् ज् झ् हीं व्यंजनें तालव्य व दन्ततालव्य अशा दोन्ही वर्गांत घातलेलीं आहेत.

चमत्कार, जित, झेप ह्या शब्दांतील च्, ज्, झ् ह्या व्यंजनांचा उच्चार तालव्य आहे.

चोर, जागा, झाड ह्या शब्दांतील च्, ज्, झ् ह्या व्यंजनांचा उच्चार दन्ततालव्य आहे. हा दन्ततालव्य उच्चार संस्कृत भाषेंत नाही.

च्, ज्, झ्, ह्यांचा तालव्य उच्चार 'य्' मिश्रित आहे. दशरथ हा राजा होता ह्या वाक्यांत 'राजा' ह्यांतील ज् व्यंजन हें दंततालव्य आहे. दशरथ राजाला दुःख झालें. ह्या वाक्यांत 'राजाला' ह्या शब्दांतील ज् हा तालव्य आहे. दोन्ही ठिकाणीं तो 'ज्' ह्या खुणेने लिहिला आहे. म्हणजे उच्चार जरी भिन्न असला तरी त्या व्यंजनाचें रेखाचिन्ह तेंच आहे. तालव्य उच्चार हा य् मिश्रित आहे म्हणून 'राज्याला' असें ह्या ठिकाणीं लिहावयाचें नाही. तालव्य व दन्ततालव्य असे दोन प्रकारचे उच्चार असले तरी त्या वर्णाच्या लिहिण्याच्या खुणा एकच आहेत. वाचतांना मात्र उच्चाराच्या दृष्टीने हा फरक लक्षांत ठेवणें आवश्यक आहे.

च्, ज्, झ् ह्यांचा तालव्य व दन्ततालव्य उच्चार नीट ध्यानांत यावा म्हणून खालील तक्त्यांत तालव्य व दन्ततालव्य उच्चार ज्या शब्दांत आले आहेत असे कांही शब्द दिले आहेत.

तालव्य			दन्ततालव्य		
च्	ज्	झ्	च्	ज्	झ्
विचार	जग	झेला	चावडी	जमाव	झगडणें
चिमटा	जननी	झिजणें	चामडें	जरूर	झुरळ
चिपाड	जन्म	झिमझिम	चवरी	जायफळ	माझा
चिमणी	जेवढा	झेंडा	कुचर	जवस	पाझर
चपळ	गजर	झिरमिळ्या	टाच	गजबजणें	ओझें
खचित	पाजी	झीज	पाचर	ताजा	विझणें
गचाळ	बिजागरी	झिडकारणें	गचपण	कुजका	झडती

स्थानपरत्वें वर्णांचें जें वर्गीकरण दाखविलें आहे त्यांत ङ्, ञ्, ण्, न्, म् ह्या व्यंजनांचा अनुक्रमें कंठ्य, तालव्य, मूर्धन्य, दन्त्य, ओष्ठ्य या वर्गांत

अन्तर्भाव करण्यांत आला आहे. शिवाय त्यांचा नाकांतून उच्चार होतो म्हणून त्यांना नासिक्य–अनुनासिकें ह्या सदरांत घातलें आहे. मराठीमध्ये अनुस्वाराची खूण म्हणून अक्षरावर 'शीर्षबिंदू' किंवा 'टिंब' देतात. मराठीमध्ये अनुस्वाराचा उच्चार कांही ठिकाणीं स्पष्टपणें खणखणित होतो, तर कांहीं ठिकाणीं तो अस्पष्ट व मृदु असतो. म्हणून अनुस्वाराचे दोन भेद कल्पिले आहेत. एक उच्चारित खणखणित व दुसरा अनुच्चारित. 'बोर' ह्याचें अनेकवचन 'बोरें'. 'रें' वरील अनुस्वार अस्पष्ट-मृदु आहे. त्याला अनुच्चारित अनुस्वार म्हणून संबोधिलें जातें. पण चिंच, चंची, डिंक, रंक, सुंदर, परंतु ह्या शब्दांतील अनुस्वार खणखणित उच्चारित आहे. अनुस्वाराचे ज्या वेळीं स्पष्ट व खणखणित उच्चार असतात त्या वेळीं ते उच्चार करतांना ङ्, ञ्, ण्, न्, म् ह्या अनुनासिकांचें साहाय्य घ्यावें लागतें. अनुस्वाराच्या उच्चाराबाबत व्याकरणकारांनी कांही नियम केले आहेत. शुद्ध उच्चाराच्या दृष्टीने हे नियम लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. ते नियम पुढे दिले आहेत—

(अ) अनुस्वारापुढे पहिल्या पाच वर्गांतील कोणतेंहि व्यंजन आल्यास त्या अनुस्वाराचा उच्चार पुढील व्यंजन ज्या वर्गांतील असेल त्या वर्गांतील अनुनासिक व्यंजनाप्रमाणे होतो. जसें—

रंग (रङ्ग), पंचा (पञ्चा), तंटा (तण्टा), प्रांत (प्रान्त), संप (सम्प).

(आ) अनुस्वारापुढे य् ल् आले असतां अनुस्वाराचा उच्चार अनुक्रमें यँ् लँ् असा होतो. जसें— संयोग (सँय्योग), संलग्न (सँल्लग्न).

(इ) अनुस्वारापुढे र्, व्, श्, ष्, स्, ह् आले असतां अनुस्वाराचा उच्चार वँ सारखा होतो–संरक्षण, संवाद, संशय, संसार.

अभ्यास

(१) अक्षर व वर्ण ह्यांमध्ये फरक काय तें सोदाहरण स्पष्ट करा.

(२) स्वर व व्यंजनें ह्यांच्यांत फरक काय? मराठी भाषेंत स्वर किती व व्यंजनें किती?

(३) क्ष् व ज्ञ् ह्यांना संयुक्त व्यंजनें कां म्हणतात?

(४) अनुस्वार व विसर्ग ह्यांना व्यंजनें कां म्हणत नाहीत?

(५) "मराठी भाषेची लिपी ही बऱ्याच अंशाने परिपूर्ण आहे," ह्या विधानाचें स्पष्टीकरण करा.

(६) 'बाराक्षरी' कशी तयार होते तें सोदाहरण लिहा.

(७) वर्णांचें उत्पत्तिस्थानावरून वर्गीकरण करतांना मुखामधील कोणत्या व किती स्थानांचा विचार केला आहे?

(८) खालील व्यंजनांपैकी कोणतीं कठोर व कोणतीं मृदु तें सांगा—

क्, ट्, त्, स्, ल्, ट्, प्, भ्.

(९) पुढील शब्दांतील वर्ण सांगा—

अभिमान, महादेव, राष्ट्र.

(१०) च्, ज्, झ् ह्यांचें दन्ततालव्य व तालव्य उच्चार ज्यांत आहेत असे प्रत्येकीं तीन शब्द द्या.

(११) ग्रह व गृह ह्या शब्दांत जोडाक्षर कोणतें?

---

(३) संधिविचार

'संधि' म्हणजे काय?

आपल्या बोलण्यांत 'सूर्योदय', 'परोपकार', 'देवालय', 'अत्यानंद' अशा प्रकारचे शब्द येतात. ह्या शब्दांचा जरा विचार केला, तर आपल्याला असें दिसून येईल की, हे जोडशब्द आहेत. हे शब्द दोन शब्द मिळून झाले आहेत. बोलतांना आपण सूर्य–उदय, पर–उपकार, देव–आलय, अति–आनंद असे शब्द न उच्चारतां सूर्योदय, परोपकार, देवालय, अत्यानंद असें उच्चारतों. असा उच्चार करतांना आपण सूर्य व उदय ह्या दोन शब्दांचा संयोग केला. 'सूर्य' ह्या शब्दांच्या शेवटीं 'अ' हा वर्ण आहे व 'उदय' ह्या शब्दाच्या आरंभीं 'उ' हा वर्ण आहे. 'सूर्य' ह्याच्या शेवटचा 'अ' व 'उदय' ह्याचा आरंभींचा 'उ' ह्याचा संयोग करून आपण 'सूर्योदय' हा जोडशब्द बनविला. परोपकार इत्यादि शब्दांत आपण असेंच केलें आहे. बोलतांना जवळजवळच्या शब्दांतील वर्ण एकमेकांत मिसळून जातात. पहिल्या शब्दांतील शेवटला वर्ण व दुसऱ्या शब्दांतील पहिला वर्ण एकत्र मिळतात.

जवळजवळच्या दोन शब्दांपैकी पहिल्या शब्दाचा शेवटला वर्ण व दुसऱ्या शब्दाचा पहिला वर्ण ह्यांपैकी एका अथवा दोन्ही वर्णांमध्ये बदल करून ते एकत्र जोडण्याच्या प्रकारास संधि असें म्हणतात.

उच्चार सुलभतेने व जलद करतां यावा हा संधि करण्याचा हेतु असतो. संधि ही एक उच्चारांत स्वाभाविकपणें घडणारी गोष्ट आहे. संधि होतांना पहिल्या शब्दाचा अखेरचा वर्ण व दुसऱ्या शब्दाच्या आरंभींचा वर्ण ह्यांपैकी एकांत अथवा दोहोंमध्ये जो बदल होतो, त्याविषयी निरनिराळ्या उदाहरणां-

वरून व्याकरणांत कांही नियम ठरविले आहेत. ह्या नियमांना संधिनियम म्हणतात. संधि करतांना ह्या नियमांचें परिपालन करावें लागतें. ह्या नियमांची माहिती ह्या प्रकरणांत आपल्याला करून घ्यावयाची आहे.

संधींचे प्रकार

(१) 'सूर्योदय' ह्या शब्दाची फोड आपण पाहिली. ह्या ठिकाणीं पहिल्या शब्दाच्या शेवटीं 'अ' हा स्वर आहे व दुसऱ्या शब्दाच्या आरंभीं 'उ' हा स्वर आहे. अ + उ ह्यांचा आपण 'ओ' केला. म्हणजे अ + उ ह्यांचा संधि ओ झाला. ह्या ठिकाणीं दोन स्वरांचा संधि झाला आहे.

(२) 'जगन्नाथ' हा जोडशब्द घ्या. ह्यांत दोन शब्द आहेत. 'जगत्'–'नाथ'. पहिल्या शब्दाच्या शेवटीं 'त्' हें व्यंजन आलें आहे व दुसऱ्या शब्दाच्या आरंभीं 'न्' हें व्यंजन आलें आहे. संधि करतांना 'त्' चा आपण न् केला व संधि करून 'जगन्नाथ' हा शब्द बनविला. येथें व्यंजनापुढे व्यंजन येऊन संधि झाला.

'सदाचार' ह्याची फोड सत् + आचार अशी आहे. ह्या ठिकाणीं व्यंजनापुढे स्वर आला आहे व संधि करतांना 'त्' ह्या व्यंजनाचा 'द्' केला व त्यांत पुढील 'आ' स्वर मिळवून 'सदाचार' हा शब्द बनविला.

(३) 'पुनरुच्चार' ह्या शब्दाची फोड पुनः + उच्चार अशी आहे. येथे विसर्गापुढे स्वर 'उ' आला आहे. विसर्गाचा 'र्' होऊन त्यांत 'उ' हा स्वर मिळाला व 'पुनरुच्चार' हा शब्द तयार झाला.

वरील उदाहरणांवरून आपल्याला संधि तीन प्रकारचे आहेत हें समजून येतें.

(१) दोन स्वरांत होणारा संधि तो **स्वरसंधि**.

(२) व्यंजन आणि स्वर यांमध्ये किंवा व्यंजन आणि व्यंजन ह्यांमध्ये होणारा संधि तो **व्यंजनसंधि**.

(३) विसर्गाचा पुढील स्वराशीं अगर व्यंजनाशीं होणारा संधि तो **विसर्गसंधि**.

संधींचे तीन प्रकार झाले–– (१) स्वरसंधि, (२) व्यंजनसंधि, (३) विसर्गसंधि.

ह्या तीन प्रकारच्या संधींचे महत्त्वाचे नियम कोणते तें पाहूं.

स्वरसंधीचे नियम—

(१) दोन सजातीय स्वरांचा संधि त्यांच्याच जातीच्या दीर्घ स्वरांत होतो. पुढील उदाहरणांचें निरीक्षण करा.

संधि होण्यापूर्वीचे शब्द	संधि झाल्यानंतर बनलेला शब्द	संधि होणारे स्वर	दोन्ही मिळून झालेला संधि
जोड + अक्षर	जोडाक्षर	अ + अ	आ
देव + आलय	देवालय	अ + आ	आ
विद्या + अर्जन	विद्यार्जन	आ+ अ	आ
महिला + आश्रम	महिलाश्रम	आ+आ	आ
हरि + इच्छा	हरीच्छा	इ + इ	ई
गिरि + ईश	गिरीश	इ + ई	ई
पार्वती + ईश	पार्वतीश	ई + ई	ई
मही + इंद्र	महींद्र	ई + इ	ई
रघु + उत्तम	रघूत्तम	उ + उ	ऊ
भू + उद्धार	भूद्धार	ऊ + उ	ऊ

समजूत— जोड् + अ + अक्षर
विद्यू + आ + अर्जन

(२) अ किंवा आ ह्यांपुढे इ, उ, ऋ (ऱ्हस्व किंवा दीर्घ) हे स्वर आले असतां त्या दोन्ही स्वरांबद्दल अनुक्रमें ए, ओ, अर् असे संधि होतात. पुढील उदाहरणें पाहा.

संधि होण्यापूर्वी शब्द	संधि झाल्यानंतर बनलेला शब्द	संधि होणारे स्वर	दोन्ही मिळून झालेला संधि
मृग + इंद्र	मृगेंद्र	अ + इ	ए
गण + ईश	गणेश	अ + ई	ए
लंका + ईश्वर	लंकेश्वर	आ+ ई	ए
चंद्र + उदय	चंद्रोदय	अ + उ	ओ
धारा + उष्ण	धारोष्ण	आ+ उ	ओ
गंगा + ऊर्मि	गंगोर्मि	आ+ ऊ	ओ
देव + ऋषि	देवर्षि	अ + ऋ	अर्
महा + ऋषि	महर्षि	आ + ऋ	अर्

क्रमांक ७४३९८ दि: २१-७१
वर्ग: दि: २१३।६१

समजूत :— गण + ईश = गण्अ + ईश = गण् ए श = गणेश

महा + ऋषि = मह्आ + ऋषि = मह् अर् षि = महर्षि

(३) अ किंवा आ ह्यांपुढे ए किंवा ऐ आला, तर त्या दोहोंबद्दल ऐ होतो आणि ओ किंवा औ आल्यास त्या दोहोंबद्दल औ होतो.

खालील उदाहरणांवरून हा नियम स्पष्ट होईल—

संधि होण्यापूर्वीचे शब्द	संधि झाल्यानंतर बनलेला शब्द	संधि होणारे स्वर	दोन्ही मिळून झालेला संधि
एक + एक	एकैक	अ + ए	ऐ
देव + ऐश्वर्य	देवैश्वर्य	अ + ऐ	ऐ
सदा + एव	सदैव	आ + ए	ऐ
प्रजा + ऐक्य	प्रजैक्य	आ + ऐ	ऐ
काष्ठ + ओषधि*	काष्ठौषधि	अ + ओ	औ
गंगा + ओघ	गंगौघ	आ + ओ	औ
महा + औषधि*	महौषधि	आ + औ	औ
वन + औषधि	वनौषधि	अ + औ	औ

* संस्कृतमध्ये 'ओषधि' व 'औषधि' असे दोन्ही शब्द आहेत.

समजूत :— सदा + एव = सद्आ + एव = सद्ऐव = सदैव

गंगा + ओघ = गंग्आ + ओघ = गंग्औघ = गंगौघ

(४) इ, उ, ऋ (ह्रस्व किंवा दीर्घ) ह्यांपुढे विजातीय स्वर आल्यास इ, उ, ऋ ह्याबद्दल अनुक्रमें य्, व्, र् हीं व्यंजनें होऊन त्यांत पुढील स्वर मिळून संधि होतो.

ह्या नियमाप्रमाणे झालेल्या संधींचीं उदाहरणें पुढे दिलीं आहेत—

संधि होण्यापूर्वीचे शब्द	संधि झाल्यानंतर बनलेला शब्द	संधि होणारे स्वर	दोन्ही मिळून झालेला संधि
इति + अर्थ	इत्यर्थ	इ + अ	(य् + अ) = य
इति + आदि	इत्यादि	इ + आ	(य् + आ) = या
अति + उत्तम	अत्युत्तम	इ + उ	(य् + उ) = यु
प्रति + एक	प्रत्येक	इ + ए	(य् + ए) = ये
मनु + अंतर	मन्वंतर	उ + अं	(व् + अं) = वं
हेतु + आभास	हेत्वाभास	उ + आ	(व् + आ) = वा
पितृ + आज्ञा	पित्राज्ञा	ऋ + आ	(र् + आ) = रा

समजूत :— इति + अर्थ
= इ त् इ + अर्थ
= इ त् य् + अर्थ
= इत्यर्थ

हेतु + आभास
= हे त् उ + आ भास
= हे त् व् + आ भास
= हेत्वाभास

(५) ए, ऐ, ओ, औ, ह्या स्वरांपुढे त्यांच्याशिवाय कोणताहि स्वर आल्यास ए, ऐ, ओ, औ ह्यांच्याबद्दल अनुक्रमें अय्, आय्, अव्, आव् असा बदल होऊन त्यांत पुढील स्वर मिळून संधि होतो.

संधि होण्यापूर्वीचे शब्द	संधि झाल्यानंतर बनलेला शब्द	संधि होणारे स्वर	दोन्ही मिळून संधि
ने + अन	नयन	ए + अ	एबद्दल अय् + अ
गै + अन	गायन	ऐ + अ	ऐबद्दल आय् + अ
गो + ईश्वर	गवीश्वर	ओ + ई	ओबद्दल अव् + ई
नौ + इक	नाविक	औ + इ	औबद्दल आव् + इ

समजूत :— ने + अन
= न् + ए + अन
= न् + अय् + अन
नयन

नौ + एक
= न् + औ + इक
= न् + आव् + इक
नाविक

आतापर्यंत जे स्वरसंधींचे नियम दिले आहेत, ते सर्व संस्कृत भाषेतील आहेत. मराठी भाषेमध्ये संस्कृत तत्सम शब्द बहुसंख्य आहेत. त्यांचा उपयोग या संस्कृत भाषेतील संधि नियमांन्वयें होतो म्हणून हे संधिनियम माहीत असणें आवश्यक आहे. निव्वळ मराठी देश्य शब्द आहेत. त्या शब्दांत येणाऱ्या स्वरांचा संधि निराळ्या प्रकारांनी होतो. त्यासंबंधी निव्वळ मराठी म्हणून गणलेले असे दोन महत्त्वाचे संधि आहेत. (१) पूर्वरूपसंधि (२) पररूपसंधि.

पूर्वरूपसंधि

कधी कधी मराठींत स्वरसंधीच्या प्रसंगीं पूर्वस्वर तसाच राहून उत्तरस्वर लोप पावतो तेव्हा त्यास पूर्वरूपसंधि असें म्हणतात.

नाही + असा (ई + अ = ई) नाहीसा
नदी + आंतील (ई + आ = ई) नदींतील
केलें + असें (ए + अ = ए) केलेसें

पररूपसंधि

कधी कधी मराठींत स्वरसंधीच्या प्रसंगीं पहिल्या पदाच्या शेवटच्या स्वराचा लोप होतो व दुसऱ्या पदाच्या आरंभींचा स्वर म्हणजे पर स्वर (दुसरा स्वर) कायम राहून संधि होतो त्याला पररूप संधि म्हणतात.

घर + ई (अ + ई = ई) घरीं
बस + ऊन (अ + ऊ = ऊ) बसून

प्रायः अकारान्त नामांना अथवा धातूंना स्वरादि प्रत्यय जोडतांना पररूपसंधि होतो.

व्यंजनसंधींचे नियम

संस्कृतमध्ये व्यंजनसंधींचे नियम पुष्कळ आहेत. त्यांपैकी महत्त्वाचे नियम पुढे दिले आहेत.

(१) पहिल्या पांच वर्गांपैकी अनुनासिकाशिवाय कोणत्याहि व्यंजनापुढे कठोर व्यंजन आल्यास पहिल्या व्यंजनाबद्दल त्याच्याच वर्गांतील पहिलें व्यंजन येऊन संधि होतो.

शरद् + काल = शरत्काल. क्षुध् + पीडा = क्षुत्पीडा.

(२) पहिल्या पांच वर्गांतील अनुनासिकाशिवाय कोणत्याहि व्यंजनापुढे मृदु व्यंजन अथवा स्वर आल्यास पहिल्या व्यंजनाबद्दल त्याच्याच वर्गांतील तिसरें व्यंजन येतें व संधि होतो.

अप् + ज = अब्ज. षट् + रिपु = षड्रिपु.
सत् + आचार = सदाचार. दृक् + गोचर = दृग्गोचर
वाक् + ईश = वागीश. सच्चित् + आनंद = सच्चिदानंद

(३) पहिल्या पांच वर्गांतील कोणत्याहि व्यंजनापुढे अनुनासिक आलें तर पहिल्या व्यंजनाबद्दल त्याच्याच वर्गांतील अनुनासिक (किंवा मागील नियमाप्रमाणे तिसरें व्यंजन) येतें व संधि होतो.

जगत् + नाथ = जगन्नाथ किंवा जगद्नाथ
वाक् + मन = वाङ्मन किंवा वाग्मन
वाक् + निश्चय= वाङ्निश्चय किंवा वाग्निश्चय
षट् + मास = षण्मास किंवा षड्मास

(४) (अ) त् ह्या व्यंजनापुढे च्, छ् आल्यास त् बद्दल च् होतो व ज् झ् आल्यास ज् होतो.

सत् + चरित्र = सच्चरित्र.
उत् + छेद = उच्छेद.
तत् + छत्र = तच्छत्र.
सत् + जन = सज्जन.

(ब) त् च्यापुढे ल् आल्यास त् बद्दल ल् होतो व संधि होतो.

तत् + लीन = तल्लीन.
उत् + लंघन = उल्लंघन.
विद्युत् + लता = विद्युल्लता.

(क) त् च्यापुढे श् आल्यास त् चा च् होतो व श् चा छ् होतो व संधि होतो.

मृद् + शकटिक = मृच्छकटिक.
सत् + शिष्य = सच्छिष्य.
चित् + शक्ति = चिच्छक्ति.
उत् + शृंखल = उच्छृंखल.

विसर्गसंधीचे नियम

(१) विसर्गाच्यामागे अ हा स्वर व पुढे मृदुवर्ण आल्यास विसर्गाचा 'उ' होतो व मागील अ ह्या स्वरांत मिळून 'ओ' असा संधि होतो.

रजः + गुण = रज् + अः + गुण
= रज् + अ + उ + गुण
= रज् + ओ + गुण = रजोगुण

मनः + वृत्ति = मनोवृत्ति अधः + वदन = अधोवदन.

मनः + रथ = मनोरथ मनः + गत = मनोगत

(२) विसर्गाच्यामागे अ आ खेरीज स्वर आल्यास व पुढे मृदुवर्ण आल्यास विसर्गाचा र् होतो.

निः + विकार = निर्विकार दुः + आत्मा = दुरात्मा

बहिः + अंग = बहिरंग दुः + गति = दुर्गति

पण पुढील शब्दांतील आरंभीचा वर्ण जर र् असेल तर विसर्गाचा झालेला र् लोप पावतो आणि पहिल्या शब्दाच्या शेवटी म्हणजे त्यामागचा स्वर ऱ्हस्व असल्यास दीर्घ होतो.

निः + रस → निर् + रस → नि + रस → नीरस.

निः + रव = नीरव.

(३) विसर्गापुढे कठोर व्यंजन आलें असतां विसर्ग कायम राहतो.
रजः + कण = रजःकण. तेजः + पुंज = तेजःपुंज.

(४) विसर्गापुढे च् छ् आल्यास विसर्गा चा श् होतो, ट् ठ् आल्यास विसर्गाचा ष् होतो व त् थ् आल्यास विसर्गाचा स् होतो.

शनैः + चर = शनैश्चर मनः + ताप = मनस्ताप

(५) विसर्गापुढे श्, ष्, स् आल्यास विसर्ग कायम राहतो, किंवा त्याबद्दल अनुक्रमें श् ष् स् होतो.

निःसंदेह किंवा निस्संदेह.

दुःशासन किंवा दुश्शासन.

अभ्यास

१. पुढील संधि करा—

(अ)	नृप	+ आज्ञा	सत्य	+ आग्रह
	सूर्य	+ अस्त	देव	+ आज्ञा
	काव्य	+ आनंद	दीप	+ आवलि
	परि	+ ईक्षा	कवि	+ ईश्वर
	अन्य	+ उक्ति	परम	+ ईश
	प्रश्न	+ उत्तर	सुर	+ ईश्वर
	पर	+ उपकार	जीर्ण	+ उद्धार
	गंगा	+ ऐश्वर्य	क्षण	+ एक
	मम	+ औदार्य	अति	+ उत्साह
	अति	+ आग्रह	स्थिति	+ अंतर
	परि	+ आलोचन	प्रति	+ अंतर
	बुद्धि	+ अनुसार	प्रीति	+ अर्थ
(ब)	षट्	+ रिपु	दिक्	+ विजय
	सत्	+ बुद्धि	सत्	+ मति
	वाक्	+ दान	षट्	+ अंग
	विद्युत्	+ लावण्य	तत्	+ नेत्र
	मत्	+ जनक	दिक्	+ मूढ
	जगत्	+ चक्र	भगवत्	+ भक्ति
	भगवत्	+ नाम	जगत्	+ ईश्वर
(क)	पुनः	+ आगमन	अन्तः	+ गत
	यशः	+ धन	निः	+ सत्त्व

२. पुढील संधि सोडवा. पोटशब्द देऊन संधि कोणत्या नियमाप्रमाणे झाला तें स्पष्ट करा—

(१) भगवद्भजन, (२) चलच्चित्र, (३) निरक्षर, (४) कर्णोदार्य, (५) दुर्गति, (६) अधोवदन, (७) उत्तरोत्तर, (८) आनंदोत्कर्ष, (९) पुरुषोत्तम, (१०) लंकेश्वर, (११) षडानन, (१२) जगन्माया, (१३) विद्वज्जन, (१४) अब्धि, (१५) दिगंबर, (१६) उल्लंघन, (१७) संपत्युत्पादन, (१८) सहाध्यायी, (१९) दुर्बोध, (२०) चिंतातुर, (२१) ज्ञानाधीन, (२२) लोकछंदानुवर्तन, (२३) लोकापवाद, (२४) परावलंबन, (२५) राष्ट्रोत्तेजक, (२६) म्हणून, (२७) साजेसा, (२८) चांगलेंसें.

(४) शब्द-जाति

वाक्य

आपण आपल्या मनांतील भाव, विचार, कल्पना हीं वाक्य किंवा वाक्यें बोलून प्रकट करतों. प्रत्येक वाक्य हें शब्दांनी बनलेलें असतें. 'वाक्य म्हणजे पुऱ्या अर्थाचें बोलणें,' अशी सामान्यतः वाक्याची व्याख्या करतात. आपल्या मनांतील अर्थ पूर्ण व स्पष्ट होईल अशा तऱ्हेने विविष्ट क्रमाने वाक्यांत शब्दांची जुळणी केलेली असते. वाक्यांतील शब्दांचा क्रम व परस्परसंबंध ह्या संबंधीचे नियम प्रत्येक भाषेमध्ये असतात. वाक्य बनवितांना त्या नियमांनुसार हा क्रम व परस्परसंबंध साधावा लागतो. नुसते शब्द एकापुढे एक ठेविले तर अर्थनिष्पत्ति होणार नाही. रांगोळीचे ठिपके कसे तरी नुसते एकत्र येऊन काय उपयोग ? ते ठराविक क्रमाने व पद्धतीने एकत्र आले, ते ठिपके परस्परांशीं आडव्या-उभ्या रेषांनी संलग्न झाले, म्हणजे त्यांतून सुंदर आकृति निर्माण होते. वाक्यांतील शब्दांनाहि हीच गोष्ट लागू आहे.

"तुकारामांच्या प्रासादिक वाणींत मराठी भाषेचें साधें व मनोहर स्वरूप आपल्याला आढळतें."

तुकारामाच्या वाणीसंबंधीचा हा विचार ह्या वाक्यांत प्रकट केलेला आहे. हें पुऱ्या अर्थाचें बोलणें म्हणजे वाक्य आहे. ह्या वाक्यांतील शब्दांचा क्रम बदलला तर बोलणाराच्या मनांतील विचार स्पष्टपणें प्रकट होणार नाही. 'तुकाराम' हा मूळ शब्द. त्याऐवजी 'तुकारामांच्या' हें त्या मूळ शब्दाचें एक रूप योजिलें आहे. 'भाषा' ह्याचें 'भाषेचें' असें रूप योजिलें आहे. 'साधें' 'मनोहर' हे दोन शब्द 'व' ह्या शब्दाने जुळवून घेतले आहेत. 'भाषेचें' ह्याऐवजी 'भाषांची' असेंहि 'भाषा' ह्या शब्दापासून रूप बनतें. 'वाणींत' हें 'वाणी' ह्या शब्दाचें रूप आहे. 'वाणीला' असेंहि एक निराळें रूप आहे. हीं दुसरीं रूपें जर ह्या वाक्यांत योजिलीं तर वाक्य सदोष होईल व मूळ विचार त्या वाक्याद्वारे स्पष्ट होणार नाही. तेव्हा शब्दांचें मूळ रूप अगर त्यांचीं निरनिराळीं विशिष्ट रूपें विशिष्ट क्रमाने योजून त्यांचा एकमेकांशीं संबंध जोडला गेला असेल तरच तें वाक्य म्हणजे पुऱ्या अर्थाचें बोलणें होतें. अशा तऱ्हेने शब्दांचा विशिष्ट क्रम व परस्परसंबंध साधून मनांतील विचार किंवा अर्थ आपण वाक्याद्वारे प्रकट करतों. शब्दांचा क्रम व परस्परसंबंध साधून जो शब्दसमुच्चय आपण एके ठिकाणीं आणतों

त्यालाच व्याकरणांत वाक्य असें म्हटलें आहे. अशा तऱ्हेचें वाक्य बनविणें ह्याला 'वाक्यरचना' असें म्हणतात. वाक्यरचनेच्या नियमांचा अभ्यास व्याकरणांत होतो. ह्या नियमांच्या अभ्यासामुळे व परिपालनामुळे आपण आपली वाक्यरचना बोलण्यांत व लिहिण्यांत निर्दोष ठेवूं शकतों.

विकारी व अविकारी शब्द

वाक्यामध्ये शब्दाशब्दांचें एक नातें असतें, परस्परसंबंध असतो. हे परस्परसंबंध दाखवून वाक्य तयार केलें तरच त्याचा अर्थ स्पष्ट होतो. तेव्हा वाक्यरचना करतांना शब्दाशब्दांमधील परस्परसंबंध दाखविण्याचें कार्य हें महत्त्वाचें ठरतें. वरील वाक्यांत 'तुकाराम' ह्याला 'च्या' हें अक्षर जोडून त्या शब्दाचा संबंध आपण 'वाणी'कडे जोडला. 'वाणी' ह्याला 'त' हें अक्षर जोडून 'वाणींत' ह्याचा संबंध 'आढळतें' ह्या शब्दाशीं जोडला. हीं जीं अक्षरें जोडलीं त्यांना व्याकरणांत 'प्रत्यय' म्हणतात. ह्या वाक्यांत कांही शब्दांना प्रत्यय जोडून त्यांचे परस्परसंबंध साधले आहेत. प्रत्यय लावतांना मूळ शब्दांत बदल झाला आहे. वरील वाक्यांतील 'व' हा शब्द घ्या. कोणत्याहि वाक्यांत तो शब्द 'व' ह्या मूळ रूपांतच येतो. त्यांत बदल होत नाही. उदाहरणार्थ 'साधें व मनोहर रूप', 'बटाटे व कांदे ह्यांची भाजी', 'तुकाराम व रामदास ह्यांचा अभ्यास.' जर–तर, जेव्हा–तेव्हा, साठी, करता, पाशी, पटकन्, झटकन्, इत्यादि शब्द असे आहेत की, कोणताहि विचार प्रकट करतांना त्यांचा उपयोग वाक्यांत करावा लागला तर त्यांच्या मूळ रूपांत बदल होत नाही. ते मूळ रूपांतच वाक्यांत येऊन आपलें कार्य करतात. 'बदल' ह्याला संस्कृतमध्ये 'विकार' असा शब्द आहे व व्याकरणशास्त्रांत 'बदल' ह्या शब्दाऐवजी 'विकार' हा शब्द योजतात. जे शब्द वाक्यांत येऊन वाक्यांतील अर्थ पुरा करण्यास मदत करतांना नेहमी मूळ रूपांतच येत नाहीत तर त्यांच्या रूपांत बदल होतो, त्या शब्दांचा व्याकरणकारांनी एक गट मानला आहे व त्यांना 'विकारी शब्द' असें नांव दिलें आहे. 'बदल' ह्याला 'विकार' ह्याप्रमाणेच 'व्यय' असा संस्कृत शब्द आहे. त्याची योजना करून विकारी शब्दांना 'सव्यय शब्द' असेंहि म्हणतात. जे शब्द वाक्यांत नेहमी मूळ रूपांतच येतात ते अविकारी शब्द किंवा अव्ययें होत. म्हणजे भाषेंतील शब्दांचे दोन प्रधान प्रकार झाले. (१) विकारी शब्द किंवा सव्यय शब्द. (२) अविकारी शब्द किंवा अव्ययें.

वाक्यांतील विचार स्पष्ट व पूर्ण होण्याच्या दृष्टीने शब्दांकडून विशेष कार्य होत असतें. कांही शब्द वस्तुवाचक आहेत. कांही वस्तुवाचक शब्दांऐवजी

येणारे शब्द आहेत. कांही शब्दांनी वस्तूच्या गुणाचा बोध होतो. कांही शब्द हालचाली, क्रिया ह्यांचा बोध करून देतात. कांही क्रिया कोठे घडली, कशी घडली, हें दाखविण्याचें कार्य करतात. वाक्यांत येऊन शब्द जें कार्य करतात त्या कार्यावरून व्याकरणांत शब्दांच्या जाति ठरविल्या आहेत. विकारी शब्दांच्या चार जाति व अविकारी शब्दांच्या चार जाति अशा एकूण शब्दांच्या आठ जाति मानल्या आहेत. नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद ह्या चार जाति विकारी आहेत, तर क्रियाविशेषण अव्यय, उभयान्वयी अव्यय, शब्दयोगी अव्यय, केवलप्रयोगी अव्यय ह्या चार जाति अविकारी शब्दांच्या किंवा अव्ययांच्या आहेत.

विकारी शब्द—(१) नाम, (२) सर्वनाम, (३) विशेषण, (४) क्रियापद.

अविकारी शब्द—(१) क्रियाविशेषण अव्यय, (२) उभयान्वयी अव्यय, (३) शब्दयोगी अव्यय, (४) केवलप्रयोगी अव्यय.

ह्या शब्दांच्या आठ जातींचा सविस्तर उहापोह आता पुढील प्रकरणांत क्रमशः करावयाचा आहे.

अभ्यास

[१] वाक्य कसें बनतें तें स्पष्ट करा.

[२] खालील वाक्यांतील शब्दांचा क्रम म्हणजेच पदक्रम अर्थाच्या दृष्टीने योग्य नाही. तो योग्य करून तीं वाक्यें पुन्हा लिहा—

(१) रानांतील पावसाने जमीन जिकडे तिकडे भिजून हिरवेंगार झालें.

(२) आम्ही बरोबर दोन दिवसांचें अंथरूण-पांघरूण व शिधा घेऊन गड पाहावयास निघालों.

(३) त्या विद्यार्थ्याला रेशमी वस्त्रामध्ये घालून प्राध्यापकांनी बक्षीस दिलें.

(४) आम्हीं एक हरीण आगगाडींतून उड्या मारीत असतांना पाहिलें.

[३] शब्दांच्या एकूण 'जाति' किती? त्यांतील विकारी कोणत्या व अविकारी कोणत्या? 'विकारी व 'अविकारी' ह्यांचा अर्थ स्पष्ट करा.

[४] वाक्याची व्याख्या देऊन त्या व्याख्येचें स्पष्टीकरण करा. "वाक्य म्हणजे शब्दसमूह" ह्या व्याख्येचें परीक्षण करा.

(५) नामें

नाम म्हणजे काय ?

खऱ्या अथवा कल्पित सृष्टींतील कोणत्याहि वस्तूचें नांव दर्शविणारा जो विकारी शब्द त्यास नाम असें म्हणतात.

ह्या व्याख्येंत **वस्तु** हा शब्द विस्तृत अर्थानें योजिलेला आहे. आपल्या नेहमीच्या बोलण्यांत आपण वस्तु हा शब्द बहुतकरून डोळ्यांना दिसणारे पदार्थ ह्या अर्थाने वापरतों. वरील व्याख्येमध्ये ' वस्तु ' या शब्दाच्या अर्थामध्ये सर्व पदार्थ, प्राणी व त्यांच्या ठिकाणीं असणारे गुण किंवा धर्म ह्या सर्वांचा अन्तर्भाव होतो. कांही नामें पदार्थ किंवा प्राणी यांचीं वाचक असतात, तर कांही त्यांच्या अंगच्या गुणांची किंवा धर्मांची वाचक असतात. दौत, लेखणी, घर, मनुष्य, गाय ह्या इंद्रियगम्य ' वस्तु ' आहेत. काम, क्रोध, लोभ, स्वर्ग, देव, कुशलता, औदार्य ह्या ' वस्तु ' इंद्रियगम्य नसून त्यांचें आकलन मनाने होतें. ज्ञानेंद्रियांमार्फत बोध होणाऱ्या त्याचप्रमाणे मनाने आकलन होणाऱ्या वस्तूंचीं जीं नांवें त्या सर्वांना व्याकरणांत 'नामें' म्हणतात. 'विकारी शब्द' ही नामाची जाति होय आणि 'वास्तविक किंवा काल्पनिक सृष्टींतील कोणतीहि वस्तु दाखविणें' हा नामाचा असाधारण धर्म होय. नामाचा हा जो असाधारण धर्म आहे तो इतर विकारी शब्दांमध्ये दृष्टीस पडत नाही. शास्त्रीयदृष्ट्या व्याख्या करावयाची म्हणजे 'जाति' व 'असाधारणधर्म' ह्या दोन्हींचाहि व्याख्येमध्ये अन्तर्भाव होणें आवश्यक असतें.

आपण काव्य, कादंबरी, इत्यादि वाङ्मय वाचतों ह्यांमध्ये कवि अगर कादंबरीकार कल्पित सृष्टी निर्माण करतो. त्या सृष्टींतील प्राण्यांचीं, पदार्थांचीं आणि त्यांच्या गुणधर्मांचीं नांवें हीं नामवर्गांत येतात म्हणून व्याख्येमध्ये ' कल्पित ' ह्या शब्दाची योजना केलेली आहे.

नामांचे प्रकार

नामांचे मुख्यतः तीन प्रकार आहेत.— (१) सामान्यनाम (२) विशेषनाम (३) भाववाचक नाम.

(१) जें नाम समानपणा (सामान्यधर्म) पाहून देतात व जें एका वस्तूला किंवा त्या वस्तूंनीं होणाऱ्या जातीलाहि लावतां येतें तें सामान्यनाम होय.

मुलगा, गाय, शहर हीं नामें पाहा. मुलगा हें नांव कोणत्याहि मुलाबद्दल आपण वापरूं. हें नांव आपण वयाने थोर माणसाबद्दल वापरणार नाही, मुलीबद्दल वापरणार नाही, वय लहान आहे व हा मुलगी नाही असा आपण विचार करून मुलगा हें नांव वापरतों. व्यक्तीव्यक्तींमधील कांही सारखेपणाच्या गोष्टी, कांही सामान्यधर्म लक्षांत घेऊन, हें नांव आपण उपयोगांत आणतों.

गाय हें नांव एका गाईला लावूं, त्याचप्रमाणे त्या जातीपैकी प्रत्येक व्यक्तीलाहि लावूं.

माणूस, गाय, लोखंड, घोडा, पुस्तक हीं सर्व सामान्यनामें होत, कारण हे शब्द त्यांच्यावरून सुचविल्या जाणाऱ्या सामान्यधर्मामुळे, एका व्यक्तीस व त्या व्यक्तींनी मिळून होणाऱ्या सर्व जातीस सामान्यपणें लागतात. हीं नांवें सारखेपणा लक्षांत घेऊन दिलेलीं असतात व तीं त्या जातीबद्दल किंवा त्या जातींतील कोणत्याहि पदार्थाबद्दल किंवा वस्तूबद्दल वापरलीं तरी चालतात.

(२) जें नाम वेगळेपणा (विशेषपणा) समजण्याकरिता व खुणेसाठी एखाद्या वस्तूला ठेवतात तें विशेषनाम होय.

ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम हीं विशेषनामें होत. ह्यांपैकी प्रत्येक नांव त्या त्या व्यक्तीचें आहे, तें व्यक्तिसमूहाचा बोध करून देत नाही. 'कुत्रा' हें सामान्यनाम. तें सर्व कुत्र्यांचा बोध करून देतें, पण 'मोत्या' हें विशेषनाम आहे. कारण तें नांव सर्व कुत्र्यांपैकी ज्याला तें नांव दिलें आहे, त्या विशिष्ट कुत्र्याचाच निर्देश करील. सामान्यनाम हें जातीचें वाचक असतें. अशा जातींतून वेगळी केलेली एकच एक वस्तु अगर व्यक्ति अशा विशेष वस्तूचें अगर व्यक्तीचें वाचकनाम तें विशेषनाम होय. सामान्यनामें हीं समानपणा (सामान्य धर्म) पाहून दिलेलीं असतात; तसें विशेषनामांचें नाही. नर्मदा ह्या नांवाने एका स्त्रीचा, एका नदीचा, एका गाईचा किंवा ज्या कोणाचें किंवा कशाचें नर्मदा हें नांव असेल त्याचा बोध होईल. ज्या वस्तूंना अगर व्यक्तींना 'नर्मदा' हें नांव दिलें आहे, त्या सर्व वस्तूंत अगर व्यक्तींत कोणत्याहि समान धर्माचें अस्तित्व नसतें. ह्या दृष्टीने विशेषनामें हीं सार्थ नसतात. ती अर्थहीन असतात. नांव लक्ष्मीबाई असून ती बाई दरिद्री असते. 'नांव सोनूबाई आणि हातीं कथलाच वाळा,' ह्या म्हणीवरून विशेषनामाचें अर्थहीनत्व स्पष्ट होतें. कांही कांही विशेषनामांस मूळचा अर्थ असतो, पण त्याचा लोप होऊन पुढे फक्त तीं ज्या वस्तूंचीं अगर व्यक्तींचीं नांवें आहेत, त्यांना निर्दिष्ट करण्याचें काम करतात, त्यांच्या अंगचा नांवांत जो मूळ अर्थ आहे, त्याचा निर्देश करीत नाहीत. 'गोपाळ' म्हणजे गाईचा रक्षक हा मूळचा अर्थ. ज्या व्यक्तीला

आपण 'गोपाळ' हें नांव दिलें, त्या नांवावरून त्या व्यक्तीचाच बोध होईल. ती व्यक्ती 'गाईचा रक्षक' ह्या अर्थाने तो गोपाळ आहे असा अर्थ सूचित होणार नाही.

कुंभकर्ण व कर्ण हीं विशेषनामें आहेत. पुढील वाक्यांत त्यांचा कसा उपयोग केला आहे तें पाहा.

आमचा बन्या अगदी कुंभकर्ण आहे.

सर विठ्ठलदास ठाकरसी हे एक कर्णच होऊन गेले.

ह्या वाक्यांत 'बन्या' 'हे' विशेषनाम. 'सर विठ्ठलदास ठाकरसी' हें विशेषनाम. बन्याला 'कुंभकर्ण' म्हटलें आहे. पण 'कुंभकर्ण' हें कांही त्याचें ठेवलेलें नांव नाही. त्या व्यक्तीला हाक मारावयाची असेल तर 'बन्या' ह्या ठेवलेल्या नांवाचा उच्चार करावा लागेल. बन्याला 'कुंभकर्ण' म्हटलें ह्याचा अर्थ कुंभकर्णाच्या अंगचा झोपाळूपणा हा त्याच्यांत आहे. म्हणजे ह्या ठिकाणीं 'कुंभकर्ण' हें ज्या व्यक्तीचें ठेवलेलें नांव आहे त्या व्यक्तीच्या अंगचा गुण अगर दुर्गुण लक्षांत घेऊन ह्या वाक्यांत 'कुंभकर्ण' ह्या नामाचा उपयोग केला आहे. दुसऱ्या वाक्यांत 'कर्ण' ह्या शब्दाने कर्णाचें उदारत्व अभिप्रेत आहे. गुण किंवा धर्म दाखविला जातो म्हणून मूळ विशेषनामाचा ह्या ठिकाणीं सामान्यनामासारखा उपयोग झाला. जेव्हा विशेषनामाचा उपयोग त्याच्या ठिकाणीं असणारा एखादा विशेष गुण अगर धर्म दाखविण्यासाठी करतात तेव्हा तें सामान्यनाम बनतें. विशेषनामाचा जेव्हा असा उपयोग होतो तेव्हा तें सार्थ बनतें. हरिश्चंद्र, कालिदास, शिवाजी, जमदग्नि, त्राटिका इत्यादि विशेषनामांचा सामान्यनामें म्हणून उपयोग केल्याचें आपल्याला दिसून येतें.

(३) सजीव व निर्जीव पदार्थांच्या अंगचे गुणधर्म, स्थिति, धंदा व अधिकार दाखविणारीं नामें हीं भाववाचक नामें होत.

प्रेम, स्नेह, जिव्हाळा, लोभ, राग, मत्सर हीं भावनांचीं अगर मनाच्या विकारांचीं नांवें आहेत.

चतुरपणा, हावरेपणा, हुषारी, पांडित्य हीं चांगल्या अगर वाईट गुणांचीं नांवें आहेत.

गरिबी, श्रीमंती, दारिद्र्य हीं स्थितीचीं दर्शक नांवें आहेत.

पाटिलकी, सुतारकी, लोहारकी हीं धंद्यांचीं नांवें आहेत. विकार, गुण, स्थिति, धंदा, इत्यादिकांना व्याकरणांत 'भाव' ह्या संज्ञेची योजना

करतात, म्हणून हीं सर्व **भाववाचक नामें** होत. भाववाचक नामाऐवजी कांही व्याकरणकार ह्यांना '**धर्मवाचक नामें**' असें म्हणतात.

(४) खालील वाक्यांतील जाड ठशांतील शब्दांचें निरीक्षण करा.

संभाजी महाराजांना धर्मत्याग **करणें** आवडलें नाही.

गांवची व्यवस्था **ठेवण्यांत** सरपंचाचें लक्ष असतें.

ती कशिदा **काढावयास** शिकली.

वडिलांचा मान **राखल्यास** त्यांना बरें वाटतें.

करणें हा शब्द '**कर**' ह्या धातूस '**णें**' हा प्रत्यय लागून बनला.

ठेवणें—'ठेवण्यांत' ह्या शब्दांत **ठेवणें** हा मूळ शब्द. तो '**ठेव**' ह्या धातूला '**णें**' प्रत्यय लागून बनला व नंतर त्याचें 'ठेवण्यांत' हें रूप ह्या वाक्यांत योजिलें आहे.

काढावें— 'काढावयास' ह्यांत मूळ शब्द **काढावें**. '**काढ**' ह्या धातूला '**वें**' प्रत्यय लागून **काढावें** हा शब्द झाला व त्याचें 'काढावयास' हें रूप ह्या ठिकाणीं योजिलें आहे.

राखला—'राखल्यास' ह्यांत मूळ शब्द **राखला**. हा शब्द '**राख**' धातूला '**ला**' प्रत्यय लावून तयार झाला.

हे सर्व शब्द धातूपासून बनले आहेत, साधले आहेत, म्हणून त्यांना करणांत धातुसाधितें असें म्हणतात. '**करणें**' हें '**णें**' प्रत्ययान्त धातुसाधित, '**ठेवणें**' हें '**णें**' प्रत्ययान्त धातुसाधित, '**काढावें**' हें '**वें**' प्रत्ययान्त धातुसाधित व '**राखला**' हें '**ला**' प्रत्ययान्त धातुसाधित होय. वरील वाक्यांत ह्या धातुसाधितांचा उपयोग केला आहे व तीं विशिष्ट क्रियांचीं नांवें आहेत. धातुसाधितांचा उपयोग ह्या वाक्यांत नामाप्रमाणे झाला आहे. **णें, वें, ला** प्रत्यय लागून जीं धातुसाधितें बनतात त्यांचा नामासारखा उपयोग झाला म्हणजे त्यांना **धातुसाधित नामें** अगर **क्रियावाचकनामें** असें म्हणतात. धातुसाधित नामें हीं सामान्यनामेंच होत, पण व्याकरणांत त्यांचा निराळा प्रकार मानण्याची पद्धत पडली आहे.

नामांचें विकरण

नाम हा विकारी शब्द आहे. नामाला लिंग, वचन व विभक्ति हे विकार होतात. नामाला लिंग, वचन, विभक्ति हे विकार होऊन नामाचीं निरनिराळीं

रूपें होतात. हीं निरनिराळीं रूपें वाक्यांत योजिलीं जातात. लिंग, वचन व विभक्ति ह्यामुळे नामाचीं जीं निरनिराळीं रूपें होतात त्याला **नामाचें विकरण** असें म्हणतात. नामाचें लिंग, वचन व विभक्ति ह्यांचा आता विचार करूं.

(१) लिंगविचार

लिंगें तीन आहेत–(१) पुल्लिंग (२) स्त्रीलिंग (३) नपुंसकलिंग.

प्राणिवाचक नामांपैकीं पुरुषजातीच्या नामाचें लिंग पुल्लिंग असतें. बैल, रेडा, मुलगा, नवरा, भाऊ, कोल्हा हीं पुल्लिंगी नामें होत.

प्राणिवाचक नामांपैकी स्त्रीजातीच्या नामांचें लिंग स्त्रीलिंग असतें. गाय, म्हैस, मुलगी, नवरी, बहीण, शेळी, यमू, शालिनी हीं स्त्रीलिंगी नामें होत.

मूल, पोर, वासरूं, शिंगरूं, करडूं हीं नामें घ्या. हे शब्द ज्या प्राण्यांचे वाचक आहेत त्यांच्या ठायीं वास्तविक पुरुषत्व किंवा स्त्रीत्व असलें पाहिजे व हे वास्तविक पुरुषत्व किंवा स्त्रीत्व लक्षांत घेऊन ह्या नामांचें लिंग ठरविलें पाहिजे. पण मराठी भाषेंत हीं नामें नपुंसकलिंगी मानिलीं आहेत.

निर्जीव वस्तूवाचक अशीं जीं नामें आहेत त्यांचें लिंग ठरवतांना त्यांच्यावर काल्पनिक पुरुषत्वाचा अगर स्त्रीत्वाचा आरोप करून तीं ठरवलेलीं दिसतात. 'खांब' हें नाम पुल्लिंगी, 'भिंत' हें नाम 'स्त्रीलिंगी' व 'चाक' हें नपुंसकलिंगी. अशा प्रकारचीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे मराठींतील लिंग-विचार हा बव्हंशीं काल्पनिक व केवळ रूढीने ठरलेला दिसतो.

'रस्ता' व 'सडक' ह्या नामांचा अर्थ एकच आहे पण 'रस्ता' हें नाम पुल्लिंगी व 'सडक' हें नाम स्त्रीलिंगी मानलें आहे. कांही नामें उभय लिंगांत योजिलेलीं आढळतात. 'हरिण' हें नाम पुल्लिंगी तसेंच नपुंसकलिंगी. 'जिन्नस' हें नाम पुल्लिंगी त्याचप्रमाणे स्त्रीलिंगीहि वापरतात.

तेव्हा मराठींतील लिंगव्यवस्था ही अत्यंत अनियमित आणि मनःपूत आहे असेंच म्हटलें पाहिजे. जीं लिंगें मानिलीं आहेत, त्या लिंगांचा वस्तूची ठेवण, धर्म ह्यांच्याशीं कांही संबंध असल्याचें दिसत नाही. त्यामुळे रूढि हेंच लिंगाचें एकमेव प्रमाण ठरतें. तेव्हा भाषेचा विशिष्ट लोकव्यवहार लक्षांत घेऊन व्याकरणकारांनी नामाचें लिंग ठरविणें व ओळखणें ह्याबाबत एक सामान्य नियम करून ठेवला आहे. 'तो, ती, तें' हीं सर्वनामें आहेत. 'तो' ह्या सर्वनामाने जिचा उल्लेख करतां येतो त्या वस्तूचें वाचक असलेलें नाम पुल्लिंगी, 'ती' ह्या सर्वनामाने जिचा उल्लेख करतां येतो त्या वस्तूचें

वाचक असलेलें नाम स्त्रीलिंगी व 'तें' ह्या सर्वनामाने जिचा उल्लेख करतां येतो, त्या वस्तूचें वाचक असलेलें नाम नपुंसकलिंगी होय.

पुल्लिंग, स्त्रीलिंग व नपुंसकलिंग ह्यांच्या मराठी भाषेच्या दृष्टीने व्याख्या करावयाच्या झाल्या तर कै. मो. के. दामले ह्यांनी केल्या आहेत त्या योग्य होत. त्या व्याख्या अशा—

(१) ज्या नामाच्या वाक्यांतील प्रयोगावरून त्याच्या अर्थाच्या ठायीं वास्तविक किंवा काल्पनिक पुरुषत्वाचा बोध होतो त्यास पुल्लिंग म्हणतात.

(२) ज्या नामाच्या वाक्यांतील प्रयोगावरून त्याच्या अर्थाच्या ठायीं वास्तविक किंवा काल्पनिक स्त्रीत्वाचा बोध होतो त्यास स्त्रीलिंग म्हणतात.

(३) ज्या नामाच्या वाक्यांतील प्रयोगावरून त्याच्या अर्थाच्या ठायीं वास्तविक किंवा काल्पनिक उभयभिन्नत्वाचा म्हणजे पुरुषत्व किंवा स्त्रीत्व ह्या दोहोंहून वेगळेपणाचा बोध होतो त्यास नपुंसकलिंग म्हणतात.

तो, ती, तें ह्या सर्वनामांचा उपयोग करून लिंगाचा निर्णय करतांना नामांचें एकवचन घेऊन त्याला हीं सर्वनामें लावून पहावयाचीं हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. 'रस्ता' हें एकवचन. 'तो रस्ता' असें आपण बोलतों म्हणून 'रस्ता' हें पुल्लिंगी नाम होय. 'रस्ता' ह्याचें अनेकवचन 'रस्ते'. 'ते रस्ते' असें आपण म्हणतों. अनेवचनी नामें न घेतां एकवचनी नामें घेऊन मग त्यांचीं लिंगें 'तो, ती, तें' ह्या सर्वनामांचा त्यांच्याबद्दल उपयोग करून ठरवावयाचीं हें विसरूं नये.

हा सर्वसाधारण नियम झाला. मराठी भाषेचा व्यवहार पाहिला तर कांही नामें एकापेक्षा अधिक लिंगांत योजिलेलीं आढळतात.

वेळ (पु. व स्त्री.) हरीण (पु. व न.) वीणा (पु. व स्त्री.)
तंबाखू (पु. व स्त्री.) मजा (पु. व स्त्री.) मका (पु. व स्त्री)
शिक्रण (स्त्री. व न.) मध (पु. व स्त्री.)

प्रत्येक नामास बहुधा एकच लिंग असतें व इतर दोन लिंगांप्रमाणे त्याचें रूप बदलत नाही हा सामान्य नियम आहे. तथापि कांही थोडया प्राणिवाचक नामांचीं रूपें लिंगभेदानें बदलतात. त्यांचा अभ्यास करण्यापूर्वी प्रथम कांही पुल्लिंगी नामांचें स्त्रीलिंगी रूप भिन्न शब्दाने होतें अशीं नामें कोणतीं तें पाहू.

खाली पुल्लिंगी नामाच्या अर्थाचे स्त्रीवाचक शब्द दिले आहेत. ते लक्षांत धरा—

पुल्लिंग	स्त्रीलिंग	पुल्लिंग	स्त्रीलिंग	पुल्लिंग	स्त्रीलिंग
पुरुष	स्त्री	वडील	मातोश्री	मोर	लांडोर
नवरा	नवरी (बायको)	पुत्र	कन्या	बोका	मांजर भाटी
वर	वधू	बैल	गाय	खोंड	कालवड
बाप	आई	नर	मादी	बोकड	शेळी
पिता	माता	रेडा	म्हैस	विधुर	विधवा
दीर	जाऊ			भाऊ	बहीण
सासरा	सासू			राजा	राणी

कांही प्राणिवाचक नामांचीं रूपें लिंगभेदाने कशीं बदलतात त्यासंबंधी कांही सामान्य नियम आहेत. ते पुढे दिले आहेत— (१) कांही प्राणिवाचक पुल्लिंगी नामांस 'ई' हा प्रत्यय लागून त्यांचे स्त्रीलिंगी रूप होतें. मामा–मामी, आजा–आजी, चुलता–चुलती, दास–दासी, हंस–हंसी, गोप–गोपी, पणजा–पणजी, हरीण–हरिणी, बेडूक–बेडकी, तरुण–तरुणी कोल्हा–कोल्ही. (कोल्हा– + इ = कोल्ही– पररूप संधि) (२) कांही प्राणिवाचक पुल्लिंगी नामांस 'ईण' हा प्रत्यय लागून त्यांचें स्त्रीलिंगी रूप होतें. सोनार–सोनारीण, पाटील-पाटलीण, सिंह–सिंहीण, कोळी–कोळीण, माळी–माळीण. (३) कांही प्राणिवाचक आकारान्त पुल्लिंगी नामांस ई आणि ए हे प्रत्यय लागून अनुक्रमें स्त्रीलिंगी आणि नपुंसकलिंगी रूपें साधिलीं जातात. कुत्रा–कुत्री–कुत्रें. कोल्हा–कोल्ही–कोल्हें. पोरगा–पोरगी–पोरगें. (४) कधी कधी आकारात पुल्लिंगी पदार्थवाचक शब्दास 'ई' प्रत्यय लागून स्त्रीलिंगी रूपें बनतात. हीं स्त्रीलिंगी रूपें (सूक्ष्मत्व) किंवा लघुता दाखवितात गोटा–गोटी, खडा–खडी, लोटा–लोटी, गुंडा–गुंडी, गाडा–गाडी.

(२) वचनविचार

शब्दावरून वस्तु एक आहे कीं एकापेक्षा अधिक म्हणजे अनेक आहेत यांचा जो बोध होतो त्यास **वचन** असें म्हणतात. वचनें दोन आहेत. (१) **एकवचन** (२) **अनेकवचन**. शब्दावरून एका वस्तूचा, एका प्राण्याचा बोध होत असेल तर तो **एकवचनी** शब्द आणि अनेक वस्तूंचा, अनेक प्राण्यांचा बोध होत असेल तर तो **अनेकवचनी** शब्द होय.

नामाचें जें मूळ रूप तेंच त्याचें सामान्यपणें एकवचन असतें. जसें :— कागद, घोडा, मनुष्य, भिंत.

मराठींत नामांचें जें मूळ रूप तेंच प्रथमेचें एकवचन असतें. म्हणजे नामाचें मूळ रूप प्रथमेच्या एकवचनीं असतें.

जेव्हा नामाच्या रूपावरून एकापेक्षा अधिक संख्येचा बोध होतो तेव्हा तें रूप त्या नामाचें अनेकवचन होय.

संस्कृत भाषमध्ये तीन वचनें आहेत. एकवचन, द्विवचन आणि बहुवचन. द्विवचनापासून दोन ह्या संख्येचा आणि बहुवचनापासून तीन व तिहींपेक्षा अधिक संख्येचा बोध होतो. पण मराठी भाषेमध्ये दोनच वचनें आहेत. 'अनेकवचन' ह्या संज्ञेऐवजीं कांही व्याकरणकार 'बहुवचन' ही संज्ञा योजतात. पण मराठीमध्ये द्विवचन नसल्यामुळे 'बहुवचन' ह्या संज्ञेपेक्षा 'अनेकवचन' हीच संज्ञा अधिक अन्वर्थक आहे.

(अ) **पुल्लिंगी नामें**—नामाचें मूळ रूप तेंच त्याचें सामान्यपणें एकवचन असतें असें वर सांगितलें आहे. पण आकारान्त पुल्लिंगी नामांशिवाय इतर पुल्लिंगी नामांचीं **अनेकवचनी रूपें एकवचनी रूपांप्रमाणेच राहतात.** उदाहरणार्थ—खांब, तेली, गहूं, लाडू, टाहो, फोनो, पेरू. पुल्लिंगामध्ये फक्त आकारान्त नामांचें अनेकवचन एकवचनाहून भिन्न असतें.

आकारान्त पुल्लिंगी नामांचें अनेकवचन एकारान्त होतें. एकवचनी मूळ रूपाला 'ए' हा प्रत्यय लागून पररूप संधीने अनेकवचनी रूप तयार होतें. आंबा–आंबे, रस्ता–रस्ते, कोल्हा–कोल्हे, मेहुणा–मेहुणे, चुलता–चुलते, (काका, मामा, दादा, नाना, बाबा हीं आकारान्त पुल्लिंगी नामें नेहमी बहुमानार्थी अनेकवचनांतच वापरलीं जातात.)

(ब) **स्त्रीलिंगी नामें**—**अकारान्त स्त्रीलिंगी नामांचें अनेकवचन** तीन प्रकारांनीं होतें—(१) कांही शब्दांत ते आकारान्त, (२) कांही शब्दांत ईकारान्त (३) कांहींत आकारान्त किंवा ईकारान्त (विकल्पाने)

(१) रेघ–रेघा, जीभ–जिभा, वाट–वाटा, वीट–विटा.

(२) मूठ–मुठी, भिंत–भिंती, पंगत–पंगती, विहीर–विहिरी.

(३) शाल–शाला किंवा शाली, परात–पराता किंवा पराती.

आकारान्त स्त्रीलिंगी नामांचें अनेकवचन एकवचनाप्रमाणे राहतें. शाळा, भाषा, आज्ञा, निंदा, आशा, विद्या, सभा, इच्छा, कन्या, लज्जा, दिशा, कला, छाया, पूजा, प्रजा, क्षमा. (हे सर्व शब्द संस्कृत तत्सम होत)

इकारान्त, उकारान्त व ऊकारान्त स्त्रीलिंगी नामें (संस्कृत तत्सम) यांचें अनेकवचन एकवचनाप्रमाणेच होतें.

गति, भूमि, रीति, आपत्ति, स्तुति, प्रीति, तनु, धेनु, वधू.

ईकारान्त स्त्रीलिंगी नामांचें अनेकवचन याकारान्त होतें.

नदी–नद्या, काठी–काठ्या, भाजी–भाज्या, पोथी–पोथ्या, लेखणी–लेखण्या, स्त्री–स्त्रिया, बी–बिया.

जीं ईकरान्त स्त्रीलिंगी नामें मूळ अकारान्त किंवा व्यंजनान्त शब्दापासून आलीं आहेत, त्यांचीं अनेकवचनें एकवचनाप्रमाणेच राहतात. गोपी, देवी, नारी, कुमारी, दासी, श्रीमती, युवती, सुवासिनी, पृथ्वी, सती.

ऊकारान्त स्त्रीलिंगी नामांचें अनेकवचन वाकारान्त होतें.

सासू–सासवा किंवा सास्वा, जाऊ–जावा, पिसू–पिसवा किंवा पिस्वा किंवा पिसा.

कित्येक ऊकारान्त स्त्रीलिंगी नामें उभयवचनी समान असतात. संस्कृत तत्सम–चमू, वधू.

मराठी—काकू.

फारशी (तत्सम) तराजू, अब्रू, कानू.

(क) नपुंसकलिंगी नामें (१) अकारान्त नपुंसकलिंगी नामांचें अनेकवचन एकारान्त (२) ईकारान्त नपुंसकलिंगी नामांचें अनेकवचन येंकारान्त (३) ऊंकारान्त नपुंगकलिंगी नामांचें अनेकवचन एकारान्त किंवा वेंकारान्त (४) ऊंकारान्त नपुंसकलिंगी नामांचें अनेकवचन ईकारान्त होतें. पुढील उदाहरणें पाहा.

(१) घर–घरें, पान–पानें, घड्याळ–घड्याळें.

(२) मोतीं–मोत्यें, मिरीं–मिऱ्यें.

(३) लिंबू–लिंबें, लेकरूं–लेकरें, तारूं–तारवें, गळूं–गळवें.

(४) केळें–केळीं, तळें–तळीं, मडकें–मडकीं.

आकारान्त नपुंसकलिंगी नामें मराठी भाषेंत आढळत नाहीत. आदर दाखविण्याकरिता कित्येक वेळा मनुष्यवाचक एकवचनी नामाची अनेकवचनी योजना करतात तेव्हा त्यास 'आदरार्थी बहुवचन' किंवा 'बहुमानार्थी अनेकवचन' असें म्हणतात. 'पंतप्रधान नेहरू आले.' 'पंतप्रधान नेहरू' हें आदरार्थी बहुवचन झालें.

(३) विभक्तिविचार

विभक्ति म्हणजे काय ?

'महाराजांनी तानाजीला कोंडाण्याची कामगिरी सांगितली.' हें वाक्य आहे. वाक्यामध्ये शब्द विशिष्ट क्रमाने येतात व त्यांचा संबंध एकमेकांशीं जुळलेला असावा लागतो. ह्या वाक्यांत शब्दांचे परस्पर संबंध कसे जुळले आहेत तें पाहा. कोणीं सांगितली ? 'महाराजांनी'. ह्या शब्दाचा संबंध 'सांगितली' ह्या क्रियापदाशीं आहे. 'महाराज' ह्याचें 'महाराजांनी' हें रूप येथे आलें आहे. 'नी' अक्षर काढून टाकलें व नुसता 'महाराज' शब्द ठेवला तर संबंध जुळत नाही. कोणाला सांगितली ? 'तानाजीला'. ह्या शब्दाचा संबंध 'ला' ह्या त्याला जोडलेल्या अक्षरामुळे 'सांगितली' ह्या क्रियापदाशीं जुळला. कशाची कामगिरी ? 'कोण्डाण्याची' येथे 'ची' ह्या जोडलेल्या अक्षरामुळे 'कोंडाण्याची' ह्या शब्दाचा संबंध 'कामगिरी' ह्या नामाकडे जोडला गेला. काय सांगितली ? 'कामगिरी'. 'कामगिरी' हा शब्द मूळ रूपांतच आला आहे. पण त्याचा संबंध 'सांगितली' ह्या क्रियापदाकडे आहे. शब्दांना जीं अक्षरें लागलीं आहेत त्यांना प्रत्यय म्हणतात. हे प्रत्यय लागून शब्दांचीं जीं रूपें झालीं त्यामुळे त्या त्या शब्दांचा वाक्यांतील इतर शब्दांशीं परस्परसंबंध जोडला गेला आहे. 'कामगिरी' हा शब्द मूळ रूपांत आला असला तरी वाक्यांत त्याचा संबंध 'सांगितली' ह्या क्रियापदाकडे आहे. 'त्याने ती पत्करली' ह्या वाक्यांत 'त्याने' हे 'तो' ह्या सर्वनामाचें रूप 'ने' हा प्रत्यय लावून योजिलें आहे. त्यामुळे 'त्याने' ह्याचा संबंध 'पत्करली' ह्या क्रियापदाकडे जोडला गेला. काय पत्करली ? 'ती'—हें सर्वनाम मूळ रूपांत आलें आहे. पण त्याचा संबंध 'पत्करली' ह्या क्रियापदाकडे आहे. ह्यावरून असें दिसून येतें कीं, नाम व सर्वनाम ह्यांचें मूळ रूप किंवा प्रत्यय जोडून तयार झालेलीं रूपें वाक्यांत योजतात व ह्या रूपांमुळे त्यांचा वाक्यांतील इतर शब्दाशीं संबंध जोडला जातो. ह्या संबंध दाखविणाऱ्या रूपांना व्याकरणांत **विभक्ति** हें नांव आहे. विभक्तीची व्याख्या पुढीलप्रमाणे करतां येईल—

नामाचा किंवा सर्वनामाचा वाक्यांतील इतर शब्दांकडे असलेला संबंध दाखविण्याकरिता त्यांचीं मूळ रूपें किंवा प्रत्यय लावलेलीं रूपें योजतात, त्या रूपांस विभक्ति म्हणतात.

विभक्ति व त्यांचे प्रत्यय

विभक्ति एकूण आठ आहेत. नामाला वचन हा विकार होतो हें आपण

पाहिलें आहे. तेव्हा नामाचीं निरनिराळ्या विभक्तींचीं रूपें एकवचनी असतात त्याप्रमाणे अनेकवचनीहि असतात. ह्या आठ विभक्तींचे प्रत्यय दोन्ही वचनांचे आहेत. खाली जे प्रत्येक विभक्तीचे प्रत्यय दिले आहेत ते पाहिल्यास कांही विभक्तीपुढे प्रत्यय नाहीत, मूळ शब्दाचें 'एकवचन' असा उल्लेख आढळतो. कांही विभक्ति अशा आहेत की वाक्यांत नामाचें मूळ रूप त्या विभक्तींत येऊन त्या नामाचा संबंध क्रियापदाकडे जोडला जातो. वर उदाहरणादाखल जीं वाक्यें घेतलीं आहेत, त्यावरून हें दिसून येईल. प्रथमेला प्रत्यय नाहीत. नामाचें जें मूळ एकवचनी रूप तेंच त्या नामाच्या प्रथमेचें एकवचनी रूप. नामाचें जें मूळ अनेकवचनी रूप तेंच त्या नामाच्या प्रथमेचें अनेकवचनी रूप होय. द्वितीयेमध्ये कांही वेळीं प्रत्यय लागतात. कांही वेळीं नामाचीं मूळ एकवचनी रूपें व अनेकवचनी रूपें द्वितीयेंत योजिलीं जातात.

विभक्तींचे प्रत्यय

विभक्तीचें नांव	एकवचनी प्रत्यय	अनेकवचनी प्रत्यय
प्रथमा	प्रत्यय नाहीत शब्दाचें मूळरूप एकवचन	प्रत्यय नाहीत शब्दाचें मूळरूप अनेकवचन
द्वितीय	शब्दाचें मूळरूप एकवचन स, ला, (तें)	शब्दाचें मूळरूप अनेकवचन स, ला, ना, (तें)
तृतीया	ने, शीं, (एं)	नी, शीं, (आं,) (ईं) (हीं)
चतुर्थी	स, ला, (तें)	स, ला, ना, (तें)
पंचमी	ऊन, हून	ऊन, हून
षष्ठी	चा, ची, चें चे, च्या, चीं	चा, ची, चें चे, च्या, चीं,
सप्तमी	त, ईं, (आं)	त, ईं, (आं)
संबोधन	शब्दाचें मूळरूप एकवचन किंवा शब्दाचें एकवचनी सामान्यरूप	नी

वर जे प्रत्यय कंसांत दिले आहेत त्यांचा उपयोग नामाचीं रूपें जीं पद्यांत येतात त्या वेळीं करतात.

प्रथमा, द्वितीया व चतुर्थी

वरील प्रत्यय पाहतां असें दिसून येईल की 'द्वितीया' व 'चतुर्थी' ह्या विभक्तींचे प्रत्यय सारखे आहेत. त्याचप्रमाणे प्रथमेंत शब्दाचें मूळ एकवचनी रूप अगर अनेकवचनी रूप योजिलें जातें. त्याचप्रमाणे तें द्वितीयेंतहि योजिलें जातें. अशा ठिकाणीं विभक्ति कोणती सांगावयाची त्याबद्दल कांही नियम आहेत ते लक्षांत ठेवा.

'तानाजी सिंहगडावर गेला.' येथे 'तानाजी' हा 'गेला' ह्या क्रियापदाचा कर्ता आहे व हा कर्तरिप्रयोग आहे. येथे 'तानाजी' ही प्रथमा विभक्ति. शब्दाचें मूळ रूप एकवचनी अगर अनेकवचनी कर्त्याच्या ठिकाणीं आलें तर ती प्रथमा विभक्ति होय.

ज्ञानेश्वरांनीं **ज्ञानेश्वरी** लिहिली. तुकारामांनी अभंग लिहिले. ह्या ठिकाणीं '**ज्ञानेश्वरी**' व '**अभंग**' हीं नामें मूळ रूपांतच योजिलीं आहेत. वाक्यांत हीं नामें कर्माचें कार्य करीत आहेत. ह्या वाक्यांचे प्रयोग कर्मणि आहेत. कर्मणि प्रयोगांत कर्म प्रथमेचें असतें. येथे 'ज्ञानेश्वरी' व 'अभंग' ह्या नामांची विभक्ति प्रथमा होय.

कर्तरिप्रयोगांत कर्माच्या ठिकाणीं जर मूळ शब्दाचें एकवचनी रूप किंवा अनेकवचनी रूप आलें तर तेथे विभक्ति द्वितीया समजावी. प्रत्यय न लागतां नामाच्या मूळ रूपाचीच योजना झालेली असते म्हणून अशा द्वितीयेस **अप्रत्यय द्वितीया** म्हणतात. कर्तरिप्रयोगांत किंवा भावेप्रयोगांत कर्माच्या ठिकाणीं जें नाम किंवा सर्वनाम येतें तें द्वितीयेचे प्रत्यय लागून आलें तर त्या ठिकाणीं द्वितीया सांगावयाची. प्रत्यय लागून द्वितीया झाली म्हणून तिला **सप्रत्यय द्वितीया** म्हणतात.

शेतकरी **शेत** नांगरतो—**शेत**–अप्रत्यय द्वितीया–कर्तरिप्रयोग.

शेतकरी **बैलास** बांधतो—**बैलास**–सप्रत्यय द्वितीया–कर्तरिप्रयोग.

शेतकऱ्याने **बैलास** बांधलें—**बैलास**–सप्रत्यय द्वितीया–भावेप्रयोग.

नाम किंवा सर्वनाम ह्यांना 'स, ला, तें, स, ला, ना, तें' हे प्रत्यय लागून त्यांचीं रूपें वाक्यांत योजिलीं असल्यास जर तीं क्रियापदाचीं कर्मे असलीं

तर त्यांची द्वितीया विभक्ति, जर तीं कर्मे नसलीं तर त्यांची विभक्ति चतुर्थी सांगावयाची.

गुरुजींनी विद्यार्थ्यांना घडा शिकविला. येथे 'विद्यार्थ्यांना' ही चतुर्थी. गुरुजींनी विद्यार्थ्याला जवळ बोलाविलें येथे 'विद्यार्थ्याला' ही द्वितीया होय.

षष्ठीचें वैशिष्ट्य

षष्ठीच्या प्रत्ययांत एकवचनांत सहा प्रत्यय दिले आहेत व तेच सहा अनेकवचनांत दिले आहेत. सामान्यतः षष्ठीच्या प्रत्ययामुळे नामाचा संबंध पुढील नामाशीं जोडला जातो. षष्ठ्यन्त नामापुढे जें नाम असेल त्या नामाच्या लिंग-वचनाप्रमाणे ह्या सहा प्रत्ययांपैकी योग्य प्रत्ययाचा उपयोग करावा लागतो. षष्ठीचा प्रत्यय नामाला लावतांना त्या नामाचा ज्या नामाशीं संबंध जोडला जात असेल त्या नामाच्या लिंगवचनाचा विचार करावा लागतो. घोड्याचा नाल–'नाल' हें एकवचन पण 'नाल' हें अनेकवचन असेल तर घोड्याचे नाल म्हणजे पुढील 'नाल' हें नाम अनेकवचनी आहे म्हणून 'चे' हा प्रत्यय लागला. पैशाची रास, पैशाच्या राशी, मेंढ्यांचा कळप, मेंढ्यांचे कळप, रुप्याचा तोडा, रुप्याचे तोडे—ह्या उदाहरणांवरून हें स्पष्ट होईल.

आता वरील उदाहरण पाहा. 'घोड्याचा नाल', 'घोड्याचे नाल' येथे पुढील 'नाल' ह्याचें वचन लक्षांत घेऊन एके ठिकाणीं 'चा' हा प्रत्यय लागला व दुसऱ्या ठिकाणीं 'चे' हा प्रत्यय लागला. असें असलें तरी 'घोड्याचा' व 'घोड्याचे' हीं षष्ठ्यन्त रूपें एकवचनी आहेत. 'घराचीं दारें' ह्यांत 'घराचीं' हें एकवचनी षष्ठ्यन्त रूप व त्याचा संबंध 'दारें' ह्या नामाशीं आहे. 'घरांचीं दारें' ह्यांत 'घरांचीं' हें अनेकवचनी षष्ठ्यन्त रूप व त्याचा संबंध 'दारें' ह्या नामाशीं आहे. ह्यावरून ज्या नामाला षष्ठीचे प्रत्यय लागतात त्या नामाच्या वचनावरून षष्ठ्यन्त शब्दाचें वचन ठरतें.

आता 'च्या' ह्या प्रत्ययाचा उपयोग कोठे होतो तें पाहा. 'गोविंदरावांचें घर'. 'गोविंदरावांचें' ह्या षष्ठ्यन्त नामाचा संबंध 'घर' ह्या नपुंसकलिंगी नामाशीं आहे. पुढील नाम 'घर' ह्याची सप्तमी केल्यास मागील षष्ठ्यन्त नामाचा प्रत्यय बदलतो. 'गोविंदरावांच्या घरीं'. 'गोविंदरावांच्या घरावर'. पुढील संबंधी नामास विभक्तिप्रत्यय अथवा शब्दयोगी अव्यय लागल्यास 'च्या' हा प्रत्यय लागतो. कांही व्याकरणकार अशा ठिकाणीं 'च्या' हें 'चे' ह्याचें सामान्यरूप मानतात.

कित्येक ठिकाणीं 'च्या' ह्या षष्ठीच्या सामान्यरूपापुढे कांही विभक्ति-प्रत्यय लागून विभक्तीचीं रूपें होतात. (१) रामाच्यानें, (२) रामाच्याहून,

(३) रामाच्यांत. अशा विभक्तिरूपांस इतर ज्या विभक्तीचे प्रत्यय लागले असतील त्या विभक्तींचें नांव देतात व त्या वेळीं 'सविकरण' हा शब्द वापरतात. जसे-- (१) सविकरण तृतीया, (२) सविकरण पंचमी, (३) सविकरण सप्तमी.

सामान्यरूप व त्याचे प्रकार

विभक्तीचे प्रत्यय लागतांना नामाच्या मूळ रूपांत कांही फेरफार होतो. 'वाडा' हें नाम घेऊं. वाड्यास, वाड्याने, वाड्याला, वाड्याहून, वाड्याचा वाड्यांत,--अशीं 'वाडा' ह्या नामाचीं निरनिराळ्या विभक्तींचीं रूपें होतात. प्रत्येक ठिकाणीं 'वाडा' ह्या मूळ रूपाचें 'वाड्या' हें रूप आलें आहे. ह्यावरून असें म्हणतां येईल कीं, प्रथमेशिवाय इतर विभक्तींचे प्रत्यय लागण्यापूर्वी मूळ शब्दाचें बहुतेक वेळा सर्वसामान्य असें एक निराळेंच रूप तयार होतें आणि मग त्यापुढे विभक्तीचे प्रत्यय लागतात. विभक्तिप्रत्यय लावण्यापूर्वी मूळ शब्दाचें जें आपण बदललेलें रूप घेतों त्याला **सामान्यरूप** असें म्हणतात.

सामान्यरूप नेहमी दीर्घ असतें. अनेकवचनी सामान्यरूपावर नेहमी अनुस्वार देतात.

नामाचें लिंग व नामाचा अन्त्यस्वर लक्षांत घेऊन नामांचें सामान्यरूप बनण्याचे निरनिराळे प्रकार आहेत. ह्या नियमाप्रमाणेच सामान्यरूप बनवून मग विभक्तीचे प्रत्यय लावावयाचे. सामान्यरूपें कशीं होतात ह्याचे महत्त्वाचे नियम पुढे दिले आहेत—

[१] पुल्लिंगी नामांचें सामान्यरूप

(१) अकारान्त पुल्लिंगी नामांचें सामान्यरूप आकारान्त.

खांब	खांबा	खांबां
सुतार	सुतारा	सुतारां

(२) आकारान्त पुल्लिंगी नामांचें सामान्यरूप याकारान्त

रेडा	रेड्या	रेड्यां
कोयता	कोयत्या	कोयत्यां

(३) ज्या आकारान्त पुल्लिंगी नामांचें अनेकवचन एकारान्त होत नाही, त्यांचें सामान्यरूप याकारान्त न होतां आकारान्तच राहतें.

काका	काका	काकां
मामा	मामा	मामां

(४) ईकारान्त पुल्लिंगी नामांचें सामान्यरूप याकारान्त.

धोबी	धोब्या	धोब्यां
शास्त्री	शास्त्र्या	शास्त्र्यां

अपवाद—हत्ती, नंदी, बादी, काजी, आसामी, मशालजी, फिर्यादी, मौलवी, पंतोजी,—ह्यांचीं सामान्यरूपें दीर्घ ईकारान्त राहतात.

(५) इकारान्त पुल्लिंगी नामांचें सामान्यरूप ईकारान्त.

कवि	कवी	कवीं
यति	यती	यतीं

(६) उकारान्त पुल्लिंगी नामांचें सामान्यरूप ऊकारान्त.

साधु	साधू	साधूं

(७) ऊकारान्त पुल्लिंगी नामांचें सामान्यरूप वाकारान्त.

भाऊ	भावा	भावां
विंचू	विंचवा	विंचवां

अपवाद—चाकू, टेकू. ह्यांचें सामान्यरूप ऊकारान्त.

(८) एकारान्त पुल्लिंगी नामांचें एकवचनी सामान्यरूप याकारान्त व विकल्पाने एकारान्त राहतें. अनेकवचनी मात्र याकारान्त होतें.

दामले	दामले	किंवा	दामल्या	दामल्यां

(९) ओकारान्त पुल्लिंगी नामांचें सामान्यरूप ओकारान्त

धनको	धनको	धनकों

२] स्त्रीलिंगी नामांचें सामान्यरूप

(१) अकारान्त स्त्रीलिंगी नामांचें एकवचनी सामान्यरूप एकारान्त व अनेकवचनी आकारान्त.

जीभ	जिभे	जिभां	|	वीट	विटे	विटां

(२) कांही अकारान्त स्त्रीलिंगी नामांचें सामान्यरूप ईकारान्त

भिंत	भिंती	भिंतीं	|	विहीर	विहिरी	विहिरीं

(३) कांही अकारान्त स्त्रीलिंगी नामांचें सामान्यरूप एकवचनी एकारान्त किंवा ईकारान्त व अनेकवचनी आकारान्त किंवा ईकारान्त.

शाल	शाले	शाली	|	शालां	शालीं

(४) आकारान्त स्त्रीलिंगी नामांचें एकवचनी सामान्यरूप एकारान्त व अनेकवचनी सामान्यरूप आकारान्त.

भाषा भाषे भाषां | जिव्हा जिव्हे जिव्हां

(५) इकारान्त स्त्रीलिंगी नामांचें एकवचनी सामान्यरूप ईकारान्त व अनेकवचनी सामान्यरूप ईकारान्त किंवा याकारान्त.

युक्ति, भक्ति | युक्ती भक्ती | युक्तीं, युक्त्यां, भक्तीं.
नदी, पेटी, | नदी, पेटी | नद्यां, पेट्यां
दासी, वहिनी, | दासी, वहिनी | दासीं, वहिनीं

(६) ऊकारान्त स्त्रीलिंगी नामाचें सामान्यरूप ऊकारान्त

काकू, वधू | काकू, वधू, | काकूं, वधूं

कांही ठिकाणीं ऊकारान्त स्त्रीलिंगी नामांचें सामान्यरूप ऊकारान्त होऊन एकारान्तहि होतें व अशा ठिकाणीं अनेकवचनी सामान्यरूप आकारान्त होतें.

सासू | सासू, सास्वे, | सासूं, सास्वां

(७) ओकारान्त स्त्रीलिंगी नामांचें एकवचनी सामान्यरूप ओकारान्त व अनेकवचनी आकारान्त.

बायको | बायको | बायकां

[३] नपुंसकलिंगी नामांचें सामान्यरूप

(१) अकारान्त नपुंसकलिंगी नामांचें सामान्यरूप आकारान्त
घर, पान, घड्याळ | घरा, पाना, घड्याळा | घरां, पानां, घड्याळां
(२) ईकारान्त नपुंसकलिंगी नामांचें सामान्यरूप याकारान्त
मोतीं, मिरीं | मोत्या, मिऱ्या | मोत्यां, मिऱ्यां |
(३) ऊकारान्त नपुंसकलिंगी नामांचें सामान्यरूप आकारान्त
लिंबूं, लेकरूं | लिंबा, लेकरा | लिंबां, लेकरां |
कांही ऊकारान्त नपुंसकलिंगी नामांचें सामान्यरूप वाकारान्त
तारूं, गळूं | तारवा (तार्वा), गळवा | तारवां (तार्वां), गळवां |
(४) एकारान्त नपुंसकलिंगी नामांचें सामान्यरूप याकारान्त
केळें, तळें, | केळ्या, तळ्या | केळ्यां, तळ्यां |

नामें चालविणें

नामाला विभक्तिप्रत्यय लावून नामाचीं विभक्तिरूपें बनविणें ह्याला 'नाम चालविणें' असें म्हणतात. नामाला विभक्तिप्रत्यय लावतांना नामाचें योग्य सामान्यरूप करून मग विभक्तीचे प्रत्यय त्या सामान्यरूपाला लावावयाचे. पुढे 'डोळा' हें आकारान्त पुल्लिंगी नाम चालवून दाखविलें आहे. त्यावरून नामांचीं विभक्तिरूपें कशीं बनवावयाचीं हें ध्यानांत येईल.

विभक्ति	एकवचन	अनेकवचन
प्र.	डोळा	डोळे
द्वि.	डोळा, डोळ्यास, डोळ्याला, डोळ्यातें.	डोळे, डोळ्यांस, डोळ्यांला, डोळ्यांना डोळ्यांतें
तृ.	डोळ्याने, डोळ्याशीं, डोळां.	डोळ्यांनीं, डोळ्यांशीं, डोळ्यांहीं, डोळां, डोळीं.
च.	डोळ्यास, डोळ्याला, डोळ्यांतें	डोळ्यांस, डोळ्यांला, डोळ्यांना डोळ्यांतें
पं.	डोळ्याहून	डोळ्यांहून
ष.	डोळ्याचा, डोळ्याची, डोळ्याचें	डोळ्यांचा, डोळ्यांची, डोळ्यांचें
स.	डोळ्यांत, डोळीं, डोळां	डोळ्यांत, डोळीं, डोळां
सं.	डोळ्या	डोळ्यांनो

'डोळा' ह्याची पंचमी विभक्ति 'हून' हा प्रत्यय लावून केली आहे. पंचमीचा 'ऊन' हा प्रत्यय लागून फार थोड्या नामांचीं विभक्तिरूपें होतात. कांहीं थोड्याशा अकारान्त पुल्लिंगी व नपुंसकलिंगी नामास 'ऊन' हा प्रत्यय लागून पंचमीचीं रूपें होतात. 'ऊन' हा प्रत्यय लागतांना पररूप संधि होतो. उदा. हातून, घरून, माहेरून, तोंडून.

नामाचें सामान्यरूप करून नंतर त्याला विभक्तीचे प्रत्यय लावतात; पण कवितेंत व जुन्या बखरीमध्ये तुसत्या सामान्यरूपावरून अर्थाला जुळेल ती विभक्ति घ्यावी लागते. उदाहरणें पाहा.

तृतीया—स्वकरें चंदन घासी गंगेचें पाणि कावडी भरितो.

चतुर्थी—भरतजनानि धाडी कानना राघवासी.

सप्तमी—शोक केला तो न माये सृष्टि.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वर्गांक ४५३९८ दि: ३१.१२.
क्रमांक २९९४ दि: २१/३/९७

नामें

अशा विभक्तीला प्रत्ययाभाव विभक्ति अशी संज्ञा आहे. 'कावडी'–प्रत्ययाभाव तृतीया. 'कानना' प्रत्ययाभाव चतुर्थी. 'सृष्टि'–प्रत्ययाभाव सप्तमी.

विभक्त्यर्थ

विभक्तींच्या योगाने नामाचा अगर सर्वनामाचा वाक्यांतील क्रियापदार्शी किंवा वाक्यांतील इतर शब्दांशीं संबंध जोडला जातो. हे संबंध निरनिराळ्या प्रकारचे असतात. विभक्तिरूपांमुळे वाक्यांतील शब्दाशब्दांमधील हे जे संबंध साधले जातात, हीं जीं नातीं जोडलीं जातात, त्यांना व्याकरणामध्ये **विभक्तींचे अर्थ** ' किंवा ' **विभक्त्यर्थ** ' असें नांव दिलें आहे. क्रियापदार्शी संबंध जोडणाऱ्या विभक्तीला ' **कारक विभक्ति** ' असें म्हणतात. वाक्यांतील क्रियापदाशिवाय इतर शब्दांशीं संबंध जोडणाऱ्या विभक्तीला **उपपद विभक्ति** असें म्हणतात. कारक विभक्तीच्या अर्थास ' **कारकार्थ** ' आणि उपपद विभक्तीच्या अर्थास ' **उपपदार्थ** ' अशा संज्ञा आहेत.

' सेनापतीने दुर्बिणीने शत्रूच्या सैन्याची पाहणी केली. ' ह्या वाक्यांत ' सेनापतीने ' हा ' केली ' ह्या क्रियापदाचा कर्ता आहे. तृतीया विभक्तीच्या रूपाने कर्त्याचा संबंध क्रियापदाकडे जुळला. पाहणी कशाने केली ? 'दुर्बिणीने'. ह्या तृतीयान्त नामाचा संबंध क्रियापदाकडे व त्यावरून क्रियेचें साधन कोणतें तें समजलें. ' शत्रूच्या ' ही षष्ठी. सैन्य कोणाचें ? ' शत्रूच्या ' ह्या षष्ठीच्या रूपाचा संबंध ' सैन्य ' ह्या नामार्शी आहे. पाहणी कोणाची ? ' सैन्याची ' ह्या षष्ठ्यन्त नामाचा संबंध ' पाहणी ' ह्या नामाकडे आहे. ' केली ' हें क्रियापद. ज्यावर कृति घडते किंवा जें कृतीचा विषय होतें तें कर्म. ' पाहणी ' हें ह्या ठिकाणीं कर्म आहे. हा कर्मणिप्रयोग आहे. ' पाहणी ' ही प्रथमा व ह्या प्रथमेचा क्रियापदार्शी कर्माचा संबंध आहे.

ह्या वाक्यांत ' सेनापतीने ', ' दुर्बिणीने ', ' पाहणी ' ह्या तीन नामांचा संबंध विभक्तीमुळे क्रियापदार्शी आहे. म्हणून ह्या तीन ठिकाणीं ती कारक विभक्ति आहे. ' शत्रूच्या ', ' सैन्याची ' ह्या षष्ठ्यन्त नामांचा संबंध क्रियापदाकडे नाही, तर वाक्यांतील त्याच्या पुढील नामार्शी म्हणजेच क्रियापदाशिवाय इतर शब्दांशीं आहे म्हणून ह्या ठिकाणीं षष्ठी ही उपपद विभक्ति होय.

' सेनापतीने ' ही तृतीया. तृतीयेचा अर्थ (कारकार्थ) कर्ता.
' दुर्बिणीने ' ही तृतीया. तृतीयेचा अर्थ (कारकार्थ) करण.
' साधन ' ह्यास ' करण ' असें नांव देतात.
' पाहणी ' ही प्रथमा. प्रथमेचा अर्थ (कारकार्थ) कर्म.
हे तीन कारकार्थ झाले.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २३२५

'शत्रूच्या', 'सैन्याची' हीं षष्ठीचीं रूपें. षष्ठीचा संबंध पुढील नामाशीं म्हणून षष्ठीचा अर्थ संबंध (उपपदार्थ).

कारकार्थ

वाक्यांतील क्रियापदाने व्यक्त होणारी कृति, स्थिति, जो करतो किंवा अनुभवितो तो **कर्ता**. ज्यावर कृति घडते किंवा जें कृतीचे विषय होतें तें **कर्म**. **करण** म्हणजे कृतीचें साधन. ज्याला उद्देशून कृति घडते तें **संप्रदान**. क्रियापदाने व्यक्त होणाऱ्या कृतीमुळे ज्याच्याशीं किंवा ज्याच्यापासून वियोग होतो तें **अपादान**. कृति किंवा स्थिति ज्या ठिकाणीं किंवा ज्या काळीं घडते त्या काळास आणि स्थळास **अधिकरण** म्हणतात. **कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, अधिकरण** हे मुख्य सहा कारकार्थ आहेत. पुढे प्रत्येक विभक्तीच्या कारकार्थांचीं उदाहरणें दिलीं आहेत. त्यांचें निरीक्षण करा.

प्रथमा

(१) **औरंगजेब** शेवटीं स्वतः दक्षिणेंत आला. 'औरंगजेब' ही प्रथमा विभक्ति. प्रथमेचा अर्थ **कर्ता**, 'आला' ह्या क्रियापदाचा.

(२) अकबराने राजपुतांचीं **मनें** जिंकलीं. 'मनें' ही प्रथमा विभक्ति प्रथमेचा अर्थ **कर्म**, 'जिंकलीं' ह्या क्रियापदाचें (कर्मणिप्रयोग)

(३) वसंता दहा **गांवें** हिंडला. 'गांवें' ही प्रथमा विभक्ति. हिंडला कोठे? प्रथमेच्या रूपाने 'स्थळ' दाखविलें. स्थळ दाखविणाऱ्या रूपाला, संबंधाला अधिकरण म्हणतात. या ठिकाणीं 'गांवें' ही प्रथमा व प्रथमेचा अर्थ **अधिकरण**.

(४) सारा **दिवस** तो खिन्न होऊन बसला आहे. 'दिवस' ही प्रथमा व प्रथमेचा अर्थ **अधिकरण**. किती वेळ बसला आहे? काळ अगर वेळ दाखविणाऱ्या रूपाला अधिकरण म्हणतात.

द्वितीया

(१) भारतीय संस्कृति **त्यागधर्म** शिकविते. 'त्यागधर्म' हें कर्म 'शिकविते' ह्या क्रियापदाचें. 'त्यागधर्म' ही अप्रत्यय द्वितीया. द्वितीयेचा अर्थ **कर्म** 'शिकविते' ह्या क्रियापदाचें (कर्तरिप्रयोग)

(२) गारुडी **नागास** पकडतो. 'नागास' हें कर्म 'पकडतो' ह्या क्रियापदाचें. 'नागास' ही सप्रत्यय द्वितीया. द्वितीयेचा अर्थ **कर्म**, पकडतो ह्या क्रियापदाचें.

(३) इंग्रजांनी पेशव्यांस जिंकलें–'पेशव्यांस' हें कर्म 'जिंकलें' ह्या क्रियापदाचें (भावे प्रयोग). 'पेशव्यांस' ही द्वितीया. द्वितीयेचा अर्थ कर्म, जिंकलें ह्या क्रियापदाचें.

तृतीया

(१) मुलींनी गाणीं म्हटलीं–'मुलींनी' हा तृतीया. 'मुलींनी' हा 'म्हटलीं' ह्या क्रियापदाचा कर्ता. तृतीयेचा अर्थ कर्ता.

(२) त्याने तलवारीने शीर धडापासून वेगळें केलें. 'तलवारीने' ही तृतीया. 'तलवार' हें साधन म्हणून तृतीयेचा अर्थ करण 'केलें' ह्या क्रियापदाकडे.

(३) तो नदीच्या काठाने चालला होता. 'काठाने' ही तृतीया. कोठून चालला होता ? 'काठाने' ह्या तृतीयान्त रूपाने कृति कोठे घडली हें सांगितलें जातें. म्हणजेच कृतीचें स्थळ दाखविलें जातें म्हणून येथे तृतीयेचा अर्थ अधिकरण 'चालला होता' ह्या क्रियापदाकडे.

(४) दोन तासांनी गाडी येईल. 'तासांनी' ही तृतीया. केव्हा येईल ? तृतीयेकडून काळ दाखविला गेला म्हणून येथे 'तासांनी' ह्या तृतीया विभक्तीचा अर्थ अधिकरण.

चतुर्थी

(१) आजीबाईनी मुलांना गोड गोष्टी सांगितल्या. 'मुलांना' ही चतुर्थी. 'सांगितल्या' ह्या क्रियापदाकडे संबंध. चतुर्थीचा अर्थ संप्रदान. देणें, बोलणें, सांगणें, म्हणणें इत्यादि अर्थाच्या क्रिया ज्याला उद्देशून किंवा ज्याच्यासाठी घडतात त्यास त्या क्रियेचें 'संप्रदान' म्हणतात.

(२) माणसाला बोलतां येते, पशूंना बोलतां येत नाही. 'माणसाला' व 'पशूंना' हीं दोन्ही नामें चतुर्थीच्या रूपांत आहेत. ह्या ठिकाणीं चतुर्थीचा संबंध क्रियापदाकडे कर्त्याचा आहे. येथे चतुर्थीचा अर्थ कर्ता. शक्यार्थी क्रियापदाचा कर्ता चतुर्थीचा असतो.

(३) सूर्य पश्चिमेस मावळतो. 'पश्चिमेस' ही चतुर्थी. 'मावळतो' ह्या क्रियापदाशीं संबंध. चतुर्थीच्या रूपामुळे स्थळाचा बोध होतो. चतुर्थीचा अर्थ अधिकरण.

(४) दसऱ्याला सोनें वांटतात. दसऱ्याला ही चतुर्थी. क्रियेचा काळ चतुर्थीकडून दाखविला जात आहे म्हणून चतुर्थीचा अर्थ अधिकरण.

पंचमी

(१) सूनबाई माहेराहून परत आल्या. 'माहेराहून' पंचमी.

(२) पंतप्रधान मुंबईहून दिल्लीला गेले. 'मुंबईहून' पंचमी. पंचमीचा अर्थ अपादान. क्रियापदाने व्यक्त होणाऱ्या क्रियेचा ज्याच्याशीं किंवा ज्यापासून वियोग दाखविला जातो त्या विभक्तीच्या अर्थाला 'अपादान' अशी संज्ञा आहे.

षष्ठी

(१) शिंक्याचें सुटलें व बोक्याचें पिकलें. 'शिंक्याचें' ही षष्ठी. ह्या षष्ठ्यन्त नामाचा संबंध 'सुटलें' ह्या क्रियापदाशीं. षष्ठीचा अर्थ अपादान.

(२) तो दिवसाचा निजतो व रात्रीचा जागतो. षष्ठीचा अर्थ अधिकरण.

सप्तमी

(१) तो संध्याकाळीं फिरावयास जातो. (२) मी पुढच्या महिन्यांत गांवीं जाणार आहे. (३) नवरदेवाने बोटांत अंगठी घातली आहे. जाड अक्षरांतील नामांची विभक्ति सप्तमी आहे. सप्तमीच्या रूपाने काळ व स्थळ दाखविलें आहे. सप्तमीचा अर्थ अधिकरण.

संबोधन

संबोधन ह्या विभक्तीचा उपयोग हाक मारण्याकडे, दुसऱ्याचें लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याकडे होतो म्हणून संबोधन विभक्तीचा अर्थ 'संबोधन' अगर 'आवाहन' असा सांगावयाचा.

उपपदार्थ

उद्देश, विधान, परिमाण, मूल्य, हेतु, कारण, तुलना, संबंध इत्यादि उपपदार्थ महत्त्वाचे आहेत. त्यांचीं उदाहरणें पुढे दिलीं आहेत—

(१) नाना फडणवीस हा मोठा मुत्सद्दी होता. 'नाना फडणवीस' ही प्रथमा आहे. 'नाना फडणवीस' हा प्रथमान्त शब्द वाक्यांतील 'हा' ह्या प्रथमान्त कर्त्याचा खुलासा करण्याच्या उद्देशाने आला आहे म्हणून प्रथमेचा अर्थ उद्देश.

(२) अस, नस, हो, दिस वगैरे कांही अकर्मक धातूंवरून झालेलीं क्रियापदें वाक्यांत आलीं असतां जेव्हां कर्त्यासंबंधाने केलेलें विधान नुसत्या

क्रियापदाने पुरें होत नाही म्हणजे वाक्यार्थ पुरा होत नाही व विधान पूर्ण करण्यासाठी क्रियापदाच्या मागे एखादें 'नाम' येतें, तेव्हा त्या नामाच्या प्रथमेचा अर्थ **विधान** असतो. शिवाजी राजा झाला. माझा भाऊ वकील आहे. ठळक अक्षरांतील नामांची विभक्ति प्रथमा व अर्थ 'विधान' होय.

त्याचप्रमाणें कर, नेम, म्हण, समज, बनव इत्यादि कांही सकर्मक धातू वरून बनलेलीं क्रियापदें वाक्यांत आलीं असता नुसत्या कर्माने विधान पूर्ण होत नाही; म्हणजे वाक्यार्थ पुरा होत नाही. तेव्हाहि क्रियापदाच्या मागे विधानार्थक नाम येतें; त्या नामाच्या प्रथमेचा अर्थ **विधान** असतो. शाहूने बाळाजीस पेशवा नेमिलें. ऋषीने उंदरास कुत्रा बनविलें.

(३) नामाच्या विभक्तिरूपामुळे परिमाण (माप, वजन, लांबी, रुंदी, उंची, जाडी, आकार इत्यादि) दाखविलें जातें त्या वेळीं त्या विभक्तीचा अर्थ **परिमाण** किंवा **मूल्य** असा सांगतात.

ह्या हंडयांत शंभर **बादल्या** पाणी मावेल–'बादल्या' प्रथमा. अर्थ परिमाण.

चाळीस रु. **पल्ल्याने** तांदूळ विकला जातो–'पल्ल्याने' तृतीया. अर्थ परिमाण.

गोडें तेल पूर्वीच्या काळीं दोन **आण्यांस** पावशेर सहज मिळे. 'आण्यांस' चतुर्थी. अर्थ परिमाण.

(४) विभक्तिरूपामुळे जेव्हा तुलना अभिप्रेत असेल किंवा सूचित असेल तेव्हा त्या विभक्तीचा अर्थ **तुलना** किंवा **तारतम्य** असा होतो.

तुम्हां **श्रीमंताशीं** आम्हीं काय बरोबरी करावी? 'श्रीमंताशीं' ही तृतीया. अर्थ तुलना किंवा तारतम्य.

राष्ट्रप्रेमी लोकांना **स्वराष्ट्राहून** दुसरें काय प्रिय असणार? 'स्वराष्ट्राहून' पंचमी, अर्थ तुलना किंवा तारतम्य.

(५) विभक्तीच्या रूपामुळे जेव्हा हेतु किंवा कारण दाखविलें जातें तेव्हा त्या विभक्तीचा अर्थ 'हेतु' किंवा 'कारण' हा होतो.

तो यशाच्या **अभिमानाने** फुगलेला आहे. 'अभिमानाने' ही तृतीया, संबंध 'फुगलेला' ह्या विधिविशेषणाशीं आहे, तृतीयेचा अर्थ हेतु किंवा कारण.

ह्या वाक्यांत **हेतु किंवा कारण** हा उपपदार्थ दाखविला आहे. पण

कांही ठिकाणीं तृतीयेचा 'हेतु किंवा कारण' कारकार्थहि होतो. त्या वेळीं तृतीयान्त नामाचा संबंध क्रियापदाकडे असतो. खालील उदाहरणें पाहा—

पित्याच्या **शिकवणुकीने** मुलाचें कल्याण झालें.
शोकजनक **बातमीने** त्याला धक्का बसला.

(६) षष्ठीचा 'संबंध' हा प्रमुख उपपदार्थ आहे. 'संबंधा-'चें अनेक प्रकार होतात. **स्नानाची** खोली–प्रयोजन किंवा हेतु. **सोन्याचे** दागिने, **दागिन्याचें** सोनें–कार्यकारण भाव संबंध. **मुलाची** आई, **मोरोपंतांचें** काव्य–जन्यजनकभाव संबंध. व्याकरणकारांनीं संबंध निदर्शक असे संबंधाचे विविध पोटभेद दिलेले आहेत. सामान्यतः षष्ठी जेव्हा उपपद विभक्ति असेल तेव्हा त्या षष्ठ्यन्त शब्दाचा ज्या दुसऱ्या शब्दाशीं संबंध असेल तो सांगून उपपदार्थ 'संबंध' असें सांगावें. उदाहरणार्थ, 'स्नानाची' षष्ठी, षष्ठीचा अर्थ संबंध. 'खोली' ह्या नामाकडे.

विभक्ति प्रतिरूपक अव्ययें

नामाला किंवा सर्वनामाला विभक्तिप्रत्यय लागतात. विभक्तिप्रत्यय लागतांना त्यांचें सामान्यरूप होतें. विभक्तिप्रत्यय लागून झालेल्या रूपामुळे त्या नामाचा किंवा सर्वनामाचा संबंध वाक्यांतील इतर शब्दांशीं प्रस्थापित होतो. शब्दयोगी अव्ययांकडून हें विभक्तीचें कार्य होतें. (१) देवळांत नवरात्रांत गर्दी जमते–देवळामध्ये नवरात्रांत गर्दी जमते. (२) पावसाने ओढ्याला पूर आला–पावसामुळे ओढ्याला पूर आला. ह्या ठिकाणीं 'मध्ये' व 'मुळे' ह्या शब्दयोगी अव्ययांनी अनुक्रमें सप्तमी व तृतीया ह्या विभक्तींचें कार्य केलें आहे. जीं शब्दयोगी अव्ययें विभक्तीचें कार्य करतात, त्यांना **विभक्ति प्रतिरूपक अव्ययें** म्हणतात. महत्त्वाचीं विभक्ति प्रतिरूपक अव्ययें पुढे दिलीं आहेत.

प्रथमा— ह्या विभक्तीचें काम करणारीं शब्दयोगी अव्ययें नाहींत.
द्वितीया— प्रत, लागी.
तृतीया— द्वारे, मुळे, कडून, सवे, बरोबर, सह, नजीक, प्रमाणे.
चतुर्थी— करिता, साठी, स्तव, ऐवजी, बद्दल, निमित्त.
पंचमी— पेक्षा, पासून, खेरीज, शिवाय.
षष्ठी— संबंधी, विषयी, बद्दल.
सप्तमी— मध्ये, ठायी, वर, माजी, पूर्वी.
संबोधन— ह्या विभक्तीचें कार्य करणारीं शब्दयोगी अव्ययें नाहीत.

प्रथमा व संबोधन या विभक्तींखेरीज बाकीच्या विभक्तींचीं जशीं प्रत्यय लावून रूपें बनतात, तशींच शब्दयोगी अव्ययें लावून रूपें बनतात. शब्दयोगी अव्ययें लावून रूप बनवितांना नामाचें किंवा सर्वनामाचें सामान्यरूप होतें. वर निरनिराळ्या विभक्तींचें कार्य करणारीं शब्दयोगी अव्ययें दिलीं आहेत, पण प्रत्येक वेळीं शब्दयोगी अव्यय काढून त्याच्या जागीं त्या विभक्तीचा प्रत्यय घालतां येत नाही. कांही ठिकाणीं शब्दयोगी अव्ययाच्या ठिकाणीं प्रत्यय घातला, तर अर्थहानि होत नाही.

'चंद्रापेक्षा सूर्य तेजस्वी आहे.' ह्याऐवजी 'चंद्राहून सूर्य तेजस्वी आहे असें म्हटलें तरी चालतें. पण 'माणसाशिवाय घर सुनें दिसतें' ह्या ऐवजी 'माणसाहून घर सुनें दिसतें' असें म्हणतां येणार नाही.

अभ्यास

(१) नामाची व्याख्या लिहा. नामाला विकारी शब्द कां मानलें त्याचें स्पष्टीकरण करा.

(२) सामान्यनाम व विशेषनाम ह्यांच्यामधील भेद स्पष्ट करा.

(३) त्राटिका, जमदग्नि, हरिश्चंद्र ह्या विशेषनामांचा सामान्यनामें म्हणून वाक्यांत उपयोग करून दाखवा.

(४) 'बहुमानार्थी अनेकवचन' म्हणजे काय तें सोदाहरण दाखवा.

(५) सामान्यरूप म्हणजे काय? खालील नामांचीं सामान्यरूपें द्या— वाडा, बायको, सासू, भाऊ, लेकरूं.

(६) साधु, धोबी हीं नामें सर्व विभक्तींत चालवून दाखवा.

(७) पुढील वाक्यांतील जाड टाइपांतील नामें कोणत्या प्रकारांत पडतात तें सांगून त्यांचें लिंग, वचन, विभक्ति व विभक्तीचा अर्थ सांगा—

१. मुखें बोले **ब्रह्मज्ञान**। मनीं धन अभिमान॥

२. **परशुरामाने कर्णाला विद्या** शिकविली पण तिचा कांही उपयोग झाला नाही.

३. **जगांतील सर्व दुःखाचें मूळ अंतरंगापेक्षा बहिरंगाला महत्त्व देण्याच्या प्रवृत्तींत** आहे.

४. सभे **पांडित्याचा** प्रसर, समरीं **शौर्य** भिरवे।

५. देखोनि **डोळां** हृदयाभिरामा।

६. गळां **तुळशीहार**। कासे **पीतांबर**॥

(८) पुढील पुल्लिंगी नामांचीं स्त्रीलिंगी रूपें द्या—

भिकारी, देव, गायक, गवळी, नवरा, सासरा.

(९) पुढील शब्दांचीं प्रथमेचीं अनेकवचनें द्या—

सतरंजी, सासू, दिवा, देऊळ.

(१०) पुढील वेच्यांतील नामें ओळखा. तीं कोणत्या प्रकारांत पडतात तें सांगा—

१. प्रतापगड, रायगड, तोरणा, सिंहगड वगैरे ठिकाणचें पूर्वकालीन वैभव आणि सामर्थ्य नाशाप्रत गेलेलें पाहून सह्याद्रीचीं शिखरें खिन्न होतात.

२. अश्रूंनींच आजपर्यंत जगांतल्या मानवतेचें पोषण केलें आहे. बुद्धापासून गांधीपर्यंत अनेक महात्म्यांनी गाळलेल्या अश्रूंमुळेच पाशवी मनोवृत्तीच्या वणव्यांत जळणाऱ्या जगाचा अद्यापीहि माणुसकीवरील विश्वास उडून गेला नाही.

३. केल्याने देशाटन, पंडितमैत्री, सभेंत संचार।
शास्त्रग्रंथविलोकन मनुजा चातुर्य येतसें फार॥

---

(६) सर्वनामें

सर्वनामाची व्याख्या

जो विकारी शब्द वाटेल त्या नामाबद्दल योजितां येतो व ज्याला स्वतःचा निश्चित अर्थ नसतो त्यास सर्वनाम म्हणतात.

नामाला निश्चित अर्थ असतो, परंतु सर्वनाम हें अर्थदृष्ट्या नामावर अवलंबून असतें. 'रामा हा फार हुशार मुलगा आहे; तो आपला अभ्यास नियमाने करतो.'

ह्या ठिकाणीं 'तो' हा शब्द कशाचेंहि नांव नाही. 'तो' ह्या शब्दाने 'रामा' ह्या मुलाचा बोध झाला आहे. दुसऱ्या एखाद्या वाक्यामध्ये 'तो' याच शब्दाने 'कुत्रा' ह्या प्राण्याचा बोध होईल. 'दारांशीं कुत्रा बांधला होता, तो भुंकूं लागला.' आणखी एखाद्या वाक्यांत 'तो' या शब्दाने 'रस्ता' ह्या स्थळाचा बोध होईल. ह्यावरून असें म्हणतां येईल कीं, नामाचा

अर्थ स्वतंत्र ठरलेला असतो, तो न बदलणारा असतो, तसें सर्वनामाच्या बाबतींत नाही. सर्वनामाला स्वतःचा अर्थ नसतो आणि निरनिराळ्या वाक्यांत त्याच सर्वनामाला निरनिराळ्या नामांचा अर्थ येतो. म्हणून व्याख्येमध्ये "त्याला स्वतःचा निश्चित अर्थ नसतो' असें म्हटलें आहे. 'सर्वनाम' हा विकारी शब्द विशिष्टार्थद्योतक नाही. त्याचा उपयोग कोणत्याहि नामाऐवजी होऊं शकतो आणि त्याचा अर्थ पूर्वसंबंधावरून समजतो. सर्वनाम ज्या नामाबद्दल येतें त्याचा अर्थ तें धारण करतें. सर्व (सगळ्या) नामांचीं जीं नामें म्हणजे जीं सर्वप्रकारच्या नामाबद्दल येतात तीं सर्वनामें होत. नामाची द्विरुक्ति सर्वनामाच्या उपयोगाने टळते हें खरें, तथापि हा त्याचा उपयोग सर्वनामाचा असाधारण धर्म किंवा लक्षण होऊं शकत नाही. मराठींत एकंदर दहा सर्वनामें आहेत. मी, तूं, तो, आपण, स्वतः, हा, जो, कोण, काय, कोणी. (ह्यांतील कांही सर्वनामांचीं लिंगाप्रमाणे व वचनाप्रमाणे भिन्न रूपें होतात)

सर्वनामांचे भेद

सर्वनामांचे एकूण सहा भेद किंवा प्रकार आहेत—(१) पुरुषवाचक, (२) दर्शक, (३) संबंधी, (४) प्रश्नार्थक, (५) सामान्य, (६) आत्मवाचक.

बोलणाराच्या दृष्टीनें एकंदर सृष्टीचे तीन भाग करतां येतात. बोलणारा तो पहिला, ज्याच्याशीं बोलावयाचें तो दुसरा व ज्याच्याविषयी बोलावयाचें तो तिसरा. या तीन भागास व्याकरणांत 'पुरुष' अशी संज्ञा देतात.

बोलणारा स्वतःबद्दल, ज्याच्याशीं बोलावयाचें त्याच्याबद्दल आणि ज्या तिसऱ्या वस्तूविषयी बोलावयाचें तिच्याबद्दल जीं सर्वनामें योजितो त्यास **पुरुषवाचक सर्वनामें** म्हणतात. बोलणारा तो **प्रथमपुरुष**, ज्याच्याशीं बोलावयाचें तो **द्वितीयपुरुष** व ज्याच्यासंबंधी बोलावयाचें तो **तृतीयपुरुष** असे तीन पुरुष होतात. अशा तऱ्हेने पुरुषवाचक सर्वनामांचे तीन पोट-प्रकार पडतात.

जीं पुरुषवाचक सर्वनामें बोलणारा स्वतःचा उल्लेख करतांना वापरतो तीं **प्रथमपुरुषवाचक सर्वनामें** होत.

जीं पुरुषवाचक सर्वनामें बोलणारा ज्याच्याशीं बोलावयाचें त्याचा उल्लेख करतांना वापरतो, तीं **द्वितीयपुरुषवाचक सर्वनामें** होत.

जीं पुरुषवाचक सर्वनामें बोलणारा स्वतःबद्दल नव्हे किंवा ज्याच्याशीं बोलावयाचें त्याच्याबद्दल नव्हे तर इतर वस्तु व व्यक्ति ह्यांच्याबद्दल वापरतो, तीं तृतीयपुरुषवाचक सर्वनामें होत.

प्रथमपुरुषवाचक—मी.

द्वितीयपुरुषवाचक—तूं.

तृतीयपुरुषवाचक—तो, (हा, जो, कोण, काय, कोणी.)

सर्वपुरुषवाचक (तिन्ही पुरुष दाखविणारीं) आपण, स्वतः.

अशा तऱ्हेने वस्तुतः सगळींच सर्वनामें पुरुषवाचक आहेत. त्यापैकी मी हें प्रथमपुरुषवाचक व तूं हें द्वितीयपुरुषवाचक असून बाकीचीं आठ सर्वनामें म्हणजे तो, हा, जो, कोण, काय, कोणी हीं तृतीयपुरुषवाचक आहेत. ह्यांपैकीं तो, (ती, तें) ह्यांनाच तेवढे तृतीयपुरुषवाचक सर्वनामें (तृतीयपुरुष दाखविण्याच्या कामीं उपयोगी पडणारीं) म्हणतात. तृतीय पुरुषवाचकांपैकी तो, हा, जो, कोण, काय, कोणी ह्या सर्वनामांचा वाक्यांत जो विशिष्ट अर्थाने उपयोग होतो तो लक्षांत घेऊन त्यांचे दर्शक, संबंधी, प्रश्नार्थक व सामान्य असे प्रकार केलेले आहेत.

सर्वनामांचा लिंगवचन विकार

मराठींतील दहा सर्वनामांपैकी, तो, हा, जो हीं तीनच सर्वनामें लिंगभेदाने बदलणारीं आहेत. राहिलेल्या सात सर्वनामांचीं रूपें तिन्ही लिंगीं समान असतात. ज्या नामाबद्दल तें सर्वनाम आलें असेल, त्या नामाचें लिंग त्या सर्वनामास लागतें.

मराठींतील दहा सर्वनामांपैकी मी, तूं, तो, हा, जो ह्या पांच सर्वनामांचीं अनेकवचनी रूपें भिन्न होतात. बाकीच्या सर्वनामांचीं रूपें उभयवचनी सारखींच असतात. सर्वनामाचें वचन तें ज्या नामाकरिता आलें असेल त्या नामावर अवलंबून असतें.

कांही सर्वनामें लिंगभेदाने बदलणारीं व कांही वचनपरत्वें बदलणारीं व कांही न बदलणारीं हें लक्षांत घेऊन सर्वनामांच्या सहा प्रकारांपैकी सर्व सर्वनामांचा उल्लेख खाली केला आहे तो लक्षांत घ्यावा—

प्रकार	एकवचन	अनेकवचन
१. पुरुषवाचक		
प्रथमपुरुषवाचक	मी (तिन्ही लिंगीं समान)	आम्ही (तिन्ही लिंगीं समान)
द्वितीयपुरुषवाचक	तूं (,, ,, ,,)	तुम्ही (,, ,, ,,)
तृतीयपुरुषवाचक	तो (पु.) ती (स्त्री.) तें (नपुं.)	ते (पु.) त्या (स्त्री.) तीं (नपुं.)
२. दर्शक	हा (पु.) ही (स्त्री.) हें (नपुं.)	हे (पु.) ह्या (स्त्री.) हीं (नपुं.)
	तो (पु.) ती (स्त्री.) तें (नपुं.)	ते (पु.) त्या (स्त्री.) तीं (नपुं.)
३. संबंधी	जो (पु.) जी (स्त्री.) जें (नपुं.)	जे (पु.) ज्या (स्त्री.) जीं (नपुं.)
४. प्रश्नार्थक	कोण (तिन्ही लिंगीं समान)	कोण (तिन्ही लिंगीं समान)
	काय (,, ,, ,,)	काय (,, ,, ,,)
५. सामान्य	कोण, काय, कोणी. (तिन्ही लिंगीं समान)	कोण, काय, कोणी. तिन्ही लिंगीं समान)
६. आत्मवाचक*	आपण, स्वतः (तिन्ही लिंगीं समान)	आपण, स्वतः (तिन्ही लिंगीं समान)

* आत्मवाचक सर्वनामांचा उपयोग पुरुषवाचक म्हणूनहि होतो.

सर्वनामांच्या विभक्ति

नामास जे विभक्ति-प्रत्यय लागतात तेच बहुधा सर्वनामांस लागतात. कांही सर्वनामांचीं विभक्तिरूपें अनियमित होतात. सर्वनामांस स्वतःचा असा निश्चित अर्थ नसल्यामुळे व सामान्यतः सर्वनामांची हाक मारण्याकडे योजना होत नसल्यामुळे त्यांचें संबोधन विभक्तीचें रूप होत नाही. पुढे सर्वनामांचीं विभक्तिरूपें दिलीं आहेत म्हणजेच सर्वनामें चालवून दाखविलीं आहेत.

मी प्रथम पुरुषवाचक सर्वनाम–तिन्ही लिंगीं समान.

विभक्ति	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	मी	आम्ही
द्वितीया	मला, मजला, मातें	आम्हांस, आम्हांला, आम्हांतें
तृतीया	मीं, म्यां, मशीं, मजशीं	आम्हीं, आम्हांशीं.
चतुर्थी	मला, मजला, मातें	आम्हांस, आम्हांला, आम्हांतें
पंचमी	मजहून	आम्हांहून
षष्ठी	माझा (पु.), माझी (स्त्री.), माझें (नपुं.)	आमचा (पुं.), आमची (स्त्री.), आमचें (नपुं.)
सप्तमी	—	आम्हांत

तूं—द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम-तिन्ही लिंगीं समान

विभक्ति	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	तूं	तुम्ही
द्वितीया	तुला, तुजला, तूंतें	तुम्हांस, तुम्हांला, तुम्हांतें
तृतीया	तूं, त्वां, तुशीं, तुजशीं	तुम्हीं, तुम्हांशीं
चतुर्थी	तुला, तुजला, तूंतें	तुम्हांस, तुम्हांला, तुम्हांतें
पंचमी	तुजहून	तुम्हांहून
षष्ठी	तुझा (पु.), तुझी (स्त्री.), तुझें (नपुं.)	तुमचा (पु.), तुमची (स्त्री.), तुमचें (नपुं.)
सप्तमी	—	तुम्हांत

मी ह्या प्रथम पुरुषवाचक सर्वनामाचीं माझ्याने, माझ्याशीं, आमच्याने आमच्यांशीं हीं तृतीयेचीं रूपें; माझ्याहून, आमच्याहून हीं पंचमीचीं रूपें; माझ्यांत, आमच्यांत हीं सप्तमीचीं रूपें आहेत. त्याचप्रमाणे तूं ह्या द्वितीय पुरुषवाचक सर्वनामाचीं तुझ्याने, तुझ्याशीं, तुमच्याने, तुमच्यांशीं हीं तृतीयेचीं रूपें; तुझ्याहून, तुमच्यांहून हीं पंचमीचीं रूपें; तुझ्यांत, तुमच्यांत हीं सप्तमीचीं रूपें आहेत. मी व तूं ह्यांचीं हीं विभक्तीचीं रूपें षष्ठीचें सामान्यरूप घेऊन त्याला विभक्तीचे प्रत्यय लावून बनविलेलीं आहेत. म्हणून हीं रूपें अनुक्रमें सविकरणी तृतीयेचीं, सविकरणी पंचमीचीं, सविकरणी सप्तमीचीं सांगावयाचीं.

मी, आम्ही, तुम्ही हीं रूपें प्रथमेचीं असतां त्यांच्यावर अनुस्वार नसतो. तृतीयेचीं असतां त्यांच्यावर अनुस्वार देतात. कर्मणिप्रयोगांत व भावे-प्रयोगांत कर्ता तृतीयेचा असतो. जेव्हा हीं रूपें ह्या प्रयोगांत कर्तृस्थानीं येतात तेव्हा अनुस्वार द्यावयाचा. मीं काम केलें. आम्हीं काम केलें. तुम्हीं काम केलें. मीं सापास मारलें. आम्हीं सापास मारलें. तुम्हीं सापास मारलें.

तूं ह्या सर्वनामावर प्रथमेंत, त्याचप्रमाणे तृतीयेंत अनुस्वार असतो. प्रयोगपरत्वें प्रथमा किंवा तृतीया ही ओळखावयाची.

तूं भाकरी खातोस—कर्तरिप्रयोग—तूं प्रथमा.

तूं निबंध लिहिलास—कर्मणि—तूं तृतीया.

तो तृतीय पुरुषवाचक व दर्शक सर्वनाम–पुल्लिंगी

विभक्ति	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	तो.	ते.
द्वितीया	त्यास, त्याला, त्याजला.	त्यांस, त्यांला, त्यांना, त्यांजला.
तृतीया	त्याने, त्याशीं, त्याजशीं.	त्यांनी, त्यांशीं त्यांजशीं.
चतुर्थी	त्यास, त्याला, त्याजला.	त्यांस, त्यांला, त्यांना, त्यांजला.
पंचमी	त्याहून, त्याजहून.	त्यांहून, त्यांजहून.
षष्ठी	त्याचा, त्याची, त्याचें.	त्यांचा, त्यांची, त्यांचें.
सप्तमी	त्यांत.	त्यांत.

ती—तृतीय पुरुषवाचक व दर्शक सर्वनाम—स्त्रीलिंगी

विभक्ति	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	ती.	त्या.
द्वितीया	तीस, तिला, तिजला.	त्यांस, त्यांला, त्यांना, त्यांजला.
तृतीया	तिने, तिशीं, तिजशीं.	त्यांनी, त्यांशीं, त्यांजशीं.
चतुर्थी	तीस, तिला, तिजला.	त्यांस, त्यांला, त्यांना, त्यांजला.
पंचमी	तीहून, तिजहून.	त्यांहून, त्यांजहून.
षष्ठी	तिचा, तिची, तिचें.	त्यांचा, त्यांची, त्यांचें.
सप्तमी	तींत.	त्यांत.

तें—तृतीय पुरुषवाचक व दर्शक सर्वनाम—नपुंसकलिंगी.

विभक्ति	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	तें	तीं
द्वितीया	त्यास, त्याला, त्याजला.	त्यांस, त्यांला, त्यांना, त्यांजला.

ह्यापुढील विभक्तीचीं रूपें दोन्ही वचनी 'तो' ह्या पुल्लिंगी सर्वनामाप्रमाणे होतात.

तो, ती, तें ह्या सर्वनामांचीं त्याच्याने, त्याच्याहून, त्याच्यांत, तिच्याने, तिच्याहून, तिच्यांत, त्यांच्यांत इत्यादि रूपें योजतात. तीं सविकरणी विभक्ति मानून ज्या विभक्तीचा प्रत्यय लागला असेल ती विभक्ति सांगावयाची.

हा—दर्शक पुल्लिंगी.

प्र. हा— हे. द्वि. ह्यास, ह्याला; ह्यांस, ह्यांना. ह्यापुढील विभक्तिरूपें 'ह्या' हें सामान्यरूप घेऊन 'तो' ह्याप्रमाणे.

ही—दर्शक स्त्रीलिंगी.

प्र. ही— ह्या. द्वि. हीस, हिला; ह्यांस, ह्यांना. ह्यापुढील विभक्तिरूपें 'ह्या' हें सामान्यरूप घेऊन 'ती' ह्याप्रमाणे.

हें—दर्शक नपुंसकलिंगी.

प्र. हें—हीं. द्वि. ह्यास, ह्याला; ह्यांस, ह्यांना. ह्यापुढील विभक्तिरूपें 'तें' ह्याप्रमाणे.

जो, जी, जें ह्या संबंधी सर्वनामांचीं रूपें तो, ती, तें प्रमाणेच करावींत. सामान्यरूप 'ज्या' होतें.

कोण—सामान्य व प्रश्नार्थक—तिन्ही लिंगीं समान

विभक्ति	एकवचन	अनेकवचन
प्रथमा	कोण	कोण
द्वितीया	कोणास–कोणाला	कोणांस, कोणांला
तृतीया	कोणीं	कोणीं–कोणांशीं
चतुर्थी	कोणास–कोणाला	कोणांस, कोणांला
पंचमी	कोणाहून	कोणांहून
षष्ठी	कोणाचा–ची–चें	कोणांचा–ची–चें
सप्तमी	कोणांत	कोणांत

काय–सामान्य व प्रश्नार्थक–तिन्ही लिंगीं समान

प्रथमा	काय	काय
द्वितीया	कशास, कशाला	कशांस, कशांला, कशांना
तृतीया	कशाने, कशाशीं	कशांनी, कशांशीं
चतुर्थी	कशास,कशाला	कशांस, कशांला, कशांना
पंचमी	कशाहून	कशांहून
षष्ठी	कशाचा–ची–चें	कशांचा–ची–चें
सप्तमी	कशांत	कशांत

'काय' ह्या सर्वनामाचीं द्वितीयेपासूनचीं रूपें 'कसा' ह्या विशेषणाचीं रूपें आहेत. 'काय' ह्याचा प्रथमेशिवाय इतर विभक्तींत उपयोग करतांना 'कसा' ह्या विशेषणाचीं रूपें योजतात.

कोणी ह्या सामान्य सर्वनामास प्रत्यय लागून विभक्तिरूपें होत नाहींत. कोणी हें कर्माच्या ठिकाणीं येत नाही. म्हणून कोणी ह्या सर्वनामाची फक्त प्रथमा विभक्ति असते. जसे कोणी हसतो तर कोणी रडतो; कोणी असें बोलतात.

आपण–तिन्ही लिंगीं समान

प्रथमा	आपण	आपण
द्वितीया	आपणास, आपणाला	आपणांस, आपणांला
तृतीया	आपण, आपणाशीं	आपण, आपणांशीं
चतुर्थी	आपणास, आपणाला	आपणांस, आपणांला
पंचमी	आपणाहून	आपणांहून
षष्ठी	आपला–ली–लें	आपला–ली–लें
सप्तमी	आपणांत	आपणांत

स्वतः–तिन्ही लिंगीं समान.

'स्वतः' ह्या सर्वनामाचीं अनेकवचनी रूपें एकवचनाप्रमाणेच होतात. पुढे एकवचनी रूपें दिलीं आहेत. तींच अनेकवचनांत योजावयाचीं.

प्र.–स्वतः. द्वि.–स्वतःस, स्वतःला.
तृ.–स्वतः, स्वतःशीं. च.–स्वतःस, स्वतःला.
पं.–स्वतःहून. ष.–स्वतःचा, स्वतःची, स्वतःचें. स.–स्वतांत.

स्वतः ह्याचें स्वतां असें रूप मराठीमध्ये आता रूढ झालें आहे. त्यासच विभक्तिप्रत्यय लावून स्वतांस, स्वतांशीं, स्वतांहून इत्यादि विभक्तीचीं रूपें उपयोजितात. 'स्वतः' ह्याला विभक्तिप्रत्यय लागून बनलेलीं रूपें मागे पडत चाललीं आहेत. 'स्वतांत' हें सप्तमीचें रूप रूढ नाही. त्याऐवजी 'स्वतःमध्ये,' 'स्वतःविषयी' हीं शब्दयोगी अव्ययें लागून बनलेलीं रूपें योजतात.

नामांच्या विभक्तिरूपांचे जे विभक्त्यर्थ आहेत, तेच लक्षांत धरून सर्वनामांच्या बाबतींत सांगावयाचे.

सर्वनामांचे उपयोग

(१) पुरुषवाचक सर्वनामें—बोलणारा आपल्या एकट्याच्याच संबंधाने ज्या वेळीं विधान करतो, त्या वेळीं तो 'मी' ह्या एकवचनी प्रथम पुरुषवाचक सर्वनामाचा उपयोग करतो. "मीं उत्तरें समाधानकारक लिहिलीं आहेत, तेव्हा मी परीक्षेंत उत्तीर्ण होईन अशी मला खात्री आहे." "आज घरांत अडचण असल्यामुळे मी बहुतेक कचेरींत जाणार नाही." बोलणारा आपल्याबरोबर इतरांच्या वर्तीने अगर आपल्या बाजूच्या किंवा पक्षाच्या माणसासंबंधी बोलत असतो त्या वेळीं 'आम्ही' ह्या अनेकवचनी प्रथम-पुरुषवाचक सर्वनामाचा उपयोग करतो. "लग्नाचा मुहूर्त शनिवारीं आहे, तेव्हा आम्ही येथून बुधवारींच निघूं" "यंदा उन्हाळ्यांत आम्ही महाबळेश्वरीं जाणार आहोंत." 'मी'चें 'आम्ही' हें अनेकवचन. येथें अनेकवचन ह्याचा अर्थ नामाच्या अनेकवचनापेक्षा थोडा निराळा आहे. 'मूल' ह्याचें अनेकवचन 'मुलें'. 'मुलें' म्हणजे एकाहून अधिक 'मुलें' असा अनेकवचनाचा अर्थ अभिप्रेत आहे. पण आम्ही म्हणजे 'एकापेक्षा अधिक मी' असा अर्थ नाही. आम्ही म्हणजे मी + मत्पक्षीय.

वर्तमानपत्राचे संपादक, राजे लोक, हे स्वतःसंबंधी बोलत असतां, विधान करीत असतां, मी ह्या एकवचनी प्रथमपुरुषवाचक सर्वनामाचा उपयोग न करतां आम्ही ह्या अनेकवचनी प्रथमपुरुषवाचक सर्वनामाचा उपयोग करतात. "हा जुलमी कायदा सरकारने मागें घ्यावा असें आम्ही सरकारला सुचवूं इच्छितों."

ज्या व्यक्तीशीं बोलणारा बोलत आहे, ती एकच किंवा एकटीच असली म्हणजे तूं ह्या एकवचनी द्वितीयपुरुषवाचक सर्वनामाचा उपयोग करतात. अशा वेळीं ती व्यक्ति सामान्यतः आपल्यापेक्षा कमी वयाची, कमी दर्जाची किंवा अतिशय प्रेमांतली असते. "आता बराच उशीर झाला आहे तेव्हा तूं निघावेंस हें बरें." "तूं काल उन्हांत हिंडलास म्हणून आज तुला ताप आला आहे."

अनेक मनुष्यांस उद्देशून बोलावयाचें झाल्यास तुम्ही ह्या अनेकवचनी द्वितीय पुरुषवाचक सर्वनामाचा उपयोग करतात. "बांधवहो, तुम्ही विचार-कलहाला कां भितां?" ज्याच्याशीं बोलावयाचें ती व्यक्ति एकच असतांहि तिला मोठेपणा देण्यासाठी, आदर दाखविण्यासाठी, तूं ह्या एकवचनी सर्व-नामाऐवजी तुम्ही हें सर्वनाम योजतात. "बाबा, आज थंडी फार पडली आहे, तुम्ही अंगांत गरम कपडे घालून बसा." अशा ठिकाणीं 'तुम्ही' हें आदरार्थी बहुवचन किंवा बहुमानार्थी अनेकवचन होतें.

जवळ नसलेल्या पण पूर्वी ज्याचा उल्लेख येऊन गेला आहे अशा व्यक्तीबद्दल, पदार्थाबद्दल, तो, ती, तें ह्या तृतीय पुरुषवाचक सर्वनामांचा उपयोग होतो. "महंमद पैगंबरांचें पशुपक्षावर फार प्रेम. एका मुलाने घरट्यांतून पिलें आणलीं तर त्यांनी त्याला तीं परत नेऊन ठेवण्यास सांगितलें." "पैगंबर नवा धर्म सांगूं लागले. जुन्या लोकांना तो पटेना." "एवढीशी लहानशी खार पण ती वाळूचे कण सेतूंत आणून टाकूं लागली. तिला शक्ति होती त्याप्रमाणे ती काम करीत होती."

(२) दर्शक सर्वनामें— हा, ही, हें ह्या दर्शक सर्वनामांचा उपयोग जवळचा पदार्थ, प्राणी अगर वस्तु दाखविण्याकडे होतो. तो, ती, ते ह्या दर्शक सर्वनामांचा उपयोग लांबचा (दूरचा) पदार्थ, प्राणी अगर वस्तु दाखविण्याकडे होतो. "तो समोर दिसतो ना, तो वाडा जोतिरावांचा." येथे तो हें दर्शक सर्वनाम. दर्शक सर्वनामापुढे जर लगेच नाम आलें, तर त्याला दर्शक सर्वनामें न म्हणतां 'दर्शक विशेषण किंवा सर्वनामात्मक विशेषण' म्हणतात. वरील वाक्यांत 'तो वाडा जोतिरावांचा' ह्या ठिकाणीं तो हें वाडा ह्या नामाचें सर्वनामात्मक विशेषण आहे. "तुम्ही वर माडीवर पाहिला तो माझा थोरला भाऊ व हा येथे बसला आहे तो धाकटा." जाड ठशांतील तो व हा हीं दर्शक सर्वनामें आहेत. "सिंह हा हिंस्र पशु आहे." "मुलें हीं राष्ट्राची संपत्ति होत." "राम, लक्ष्मण, सीता हीं पंचवटींत राहात होतीं." ह्या वाक्यांत जाड ठशांतील सर्वनामें दर्शक सर्वनामें आहेत.

(३) संबंधी सर्वनामें-- जो, जी, जें ह्या सर्वनामांचा संबंध पुढे येणाऱ्या ता, ती, तें ह्या दर्शक सर्वनामांशीं असतो. म्हणून तीं संबंधी सर्वनामें होत. संबंधी सर्वनामापुढे जें दर्शक सर्वनाम येतें, त्याला 'अनुबंधी दर्शक सर्वनाम' असें म्हणतात. संबंधी सर्वनाम एकटें कधींच येत नाही, त्याच्यापुढे त्याचें योग्य दर्शक सर्वनाम असलेंच पाहिजे, ही गोष्ट वाक्यरचनेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. संबंधी सर्वनामाचा संबंध 'हा, ही, हें' ह्या दर्शक सर्वनामांशीं कधीहि येत नाही. "जो उद्योग करतो तो यशस्वी होतो." "ज्याने करावें त्याने भरावें". "जें सारें चकाकित दिसें तें सर्व सोनें नसें". "राष्ट्रसेवेसाठी ज्यांनी प्राणार्पण केलें त्यांना आपण आज वंदन केलें पाहिजे". "जो तोषवी स्वजनकास सुपुत्र तोच".

(४) प्रश्नार्थक व सामान्य सर्वनामें-- कोण व काय ह्यांचा उपयोग प्रश्न विचारण्याकडे झाला असेल तर तीं "प्रश्नार्थक सर्वनामें" होत. पण प्रश्न विचारण्याकरिता त्यांचा उपयोग न करतां कोणत्याहि व्यक्तीस अगर वस्तूला उद्देशून म्हणजे सामान्यपणें त्यांचा उपयोग केला जातो, तेव्हा तीं 'सामान्य सर्वनामें' होत. त्यांच्या उपयोगावरून त्यांनी दर्शविलेली व्यक्ति अगर वस्तू ह्यांचा निश्चित बोध होत नाहीं. ह्या दृष्टीने सामान्य सर्वनामांना कांही व्याकरणकार अनिश्चित सर्वनामें अशी संज्ञा योजतात.

सरकारचे कायदे कोण मोडूं शकणार !	प्रश्नार्थक
ही घोरपड कोणी गळ्यांत घ्यावी !	प्रश्नार्थक
अपरिचित ठिकाणीं मी कोणाशीं बोलणार !	प्रश्नार्थक
लाचलुचपतीच्या व्यवहाराने त्याने काय मिळविलें !	प्रश्नार्थक
तेथे तुला कोण भेटलें तेवढें सांग.	सामान्य
ह्या जगांत कोणी दुष्ट तर कोणी सुष्ट असणारच.	सामान्य
त्याच्या पिशवींत काय आहे तें तर पाहूं.	सामान्य

'कोण' व 'काय' ह्या प्रश्नार्थक सर्वनामांचा उपयोग करतांना 'कोण' हें प्राण्यासंबंधाने–विशेषतः मनुष्याबंधाने येतें व 'काय' हें बहुधा निर्जीव वस्तूसंबंधाने येतें.

'कोण' व 'काय' ह्यांचा सामान्य सर्वनाम म्हणून उपयोग करतांना वरील नियमच साधारणपणें अवलंबितात.

कित्येक वेळीं 'कोण' व 'काय' ह्यांची 'द्विरुक्ति' केलेली असते. 'कोण' ह्याच्या द्विरुक्तीमुळे एकाहून अधिक व्यक्तींचा बोध होतो व त्या त्या

व्यक्तीविषयी पृथक्पणें माहिती समजावी असा हेतु असतो. 'काय' ह्याच्या द्विरुक्तीमुळे एकाहून अधिक पदार्थांचा किंवा वस्तूंचा बोध होतो व त्या त्या पदार्थांविषयी अगर त्या त्या वस्तूंविषयी पृथक्पणें माहिती मिळावी असा हेतु असतो. पुढील उदाहरणें पाहा.

" सभेला कोण कोण आले होते ?

" दिवाळीला काय काय करणार ?

(५) आत्मवाचक सर्वनामें—आपण व स्वतः ह्या सर्वनामांचा उपयोग कधी पुरुषवाचक तर कधी आत्मवाचक म्हणून होतो. जेव्हा 'आपण' व 'स्वतः' ह्यांचा उपयोग 'स्वतः' ह्या अर्थाने होतो तेव्हा तीं आत्मवाचक सर्वनामें होतात. पुढील उदाहरणांचें निरीक्षण करा.

आपण मला साहाय्य केलें तर मी आपला आभारी होईन (द्वितीय पुरुषवाचक)

तुम्ही खुशाल जा, आपण कांही येणार नाही. (प्रथम पुरुषवाचक)

आपण वेड्यासारखें बोलतो व मग पस्तावतो. (तृतीय पुरुषवाचक)

मी आपणाला असें दूषण कां लावून घेईन ? (आत्मवाचक)

मी आपण होऊन ही गोष्ट करणार नाही. (आत्मवाचक)

तो आपला फसला व आता लोकांना दोष देतो. (आत्मवाचक)

त्याचें काय सांगूं स्वतः आलों तर येईन. (प्रथम पुरुषवाचक)

स्वतः जा आणि प्रत्यक्ष स्थिति पाहा. (द्वितीय पुरुषवाचक)

स्वतः सारखा वाचीत बसलेला असतो. (तृतीय पुरुषवाचक)

मी स्वतः तुला मदत करीन. (आत्मवाचक)

शिवाजीमहाराज स्वतः हजर राहिले. (आत्मवाचक)

त्यांनी स्वतःला बोल लावून कां घ्यावा. (आत्मवाचक)

अभ्यास

(१) सर्वनामाची व्याख्या सांगून तिचें स्पष्टीकरण करा.

(२) नाम व सर्वनाम ह्यांची तुलना करा.

(३) सर्वनामांचे मुख्य भेद किंवा प्रकार सांगून त्यांपैकी प्रत्येक प्रकारांत कोणतीं सर्वनामें आहेत तीं लिहा.

(४) पुरुषवाचक सर्वनामें म्हणजे काय ? त्याचे प्रकार किती आहेत ? सर्व पुरुषवाचक सर्वनामें लिहा.

(५) दर्शक सर्वनामें व संबंधी सर्वनामें ह्यांचीं उदाहरणें देऊन त्यांचीं लक्षणें स्पष्ट करा.

(६) कोण, काय, कोणी ह्यांचा सामान्य व प्रश्नार्थक सर्वनाम म्हणून उपयोग करून दाखवा.

(७) खालील सर्वनामांचीं त्यांच्यापुढे कंसांत निर्दिष्ट केलेल्या विभक्तीचीं रूपें लिहा.

आपण (षष्ठी), कोण (चतुर्थी), मी (पंचमी), मी (सप्तमी).

(८) 'अनुसंबंधी दर्शक सर्वनाम' म्हणजे काय तें उदाहरण देऊन स्पष्ट करा.

(९) 'तुम्ही' व 'आपण' ह्या सर्वनामांचा आदरार्थी बहुवचनी उपयोग करून दाखवा.

(१०) पुढील वाक्यांतील सर्वनामें ओळखा. तीं कोणत्या पोटप्रकारांत पडतात तें सांगा. त्यांचें लिंग, वचन, पुरुष व विभक्ति सांगा.

१. शिराळशेट राजाला म्हणाला, "आपण फक्त आपले अधिकार मला साडेतीन घटका द्यावेत."

२. जो खरा मातृभक्त आहे तो सर्व मातांना पूज्य मानील.

३. सांदीपनी कृष्ण व बळराम ह्यांना विद्या शिकवीत होते.

४. वर्तमानपत्रें हीं एका दृष्टीने घरचें खाऊन लष्करच्या भाकरी भाजणारीं वाटतात.

५. जवळ पडलेल्या खडावांतली एक लालबिहारीने उचलली व तो आनंदीला म्हणाला, "ज्याच्या पडपानं तूं अशी लांब जीभ काढून बोलतें आहेस त्याला नि तुला बघून घेईन."

६. आम्ही काय कुणाचे खातों । श्रीराम आम्हांला देतो ॥

७. कोणी निंदा कोणी वंदा । आमचा स्वहिताचा धंदा ॥

८. मिठेविण काय करावें मिष्टान्न ?

९. जो जो जयाचा घेतला गुण तो तो म्यां गुरु केला जाण.

१०. महाराज म्हणाले, "आम्ही स्वतः उमरठयास जाऊन सूर्याबाचें लग्न लावूं."

११. महाराजांनी असा हुकूम केल्यावर त्याला कोण विरोध करणार ?

७. विशेषणें

विशेषणाची व्याख्या

नामाचा कोणत्या तरी प्रकारचा गुण किंवा वैशिष्ट्य दाखवून नामाची व्याप्ति मर्यादित करणाऱ्या विकारी शब्दास विशेषण असें म्हणतात.

विशेषणाच्या योगाने नामाची व्याप्ति मर्यादित होते, हें विशेषणाचें प्रधान लक्षण होय. नुसत्या नामाने जितक्या व्यक्तींचा अगर वस्तूंचा निर्देश केला आहे असें कळतें त्यापेक्षा कमी व्यक्तींचा अगर वस्तूंचा निर्देश विशेषण-युक्त नामाने होतो. केवळ 'फूल' ह्या नाम शब्दाने जितक्या फुलांचा निर्देश होतो त्यांहून कमी फुलांचा निर्देश 'पिवळें फूल' ह्या विशेषणयुक्त नाम शब्दांनी होतो. 'फूल' ह्या नामाची व्याप्ति 'पिवळें' ह्या शब्दाने मर्यादित झाली. 'फूल' हा नाम शब्द कोणत्याहि फुलास लागूं पडतो. 'पिवळें' ह्या विशेषणा-मुळे 'फूल' हा नामशब्द कोणत्याहि फुलास लावतां येणार नाही. जेवढीं 'पिवळीं फुलें' असतील तेवढ्यांच्या बाबतींत हे शब्द लागतील. "पिवळें व गोजिरवाणें फूल" ह्यांतील 'पिवळें' आणि 'गोजिरवाणें' ह्या विशेषणांमुळे ज्या पिवळ्या फुलांपैकी जें फूल 'गोजिरवाणें' आहे त्यालाच हे शब्द लागतील म्हणजे विशेषण अगर विशेषणें नामाच्या मागे आलीं असतां नामाची व्याप्ति कमी होते, मर्यादित होते. म्हणजे तें नाम पूर्वी जेवढ्या वस्तूंना लागत असतें तेवढ्या वस्तूंहून कमी वस्तूंना लागूं पडतें. नामाच्या मागे आलेल्या विशेषणा-मुळे पुढील नाम तशाच इतर नामांपासून वेगळें केलें जातें व त्याची व्याप्ति तें कमी करतें, हें विशेषणाकडून होणारें कार्य आहे. 'पिवळें,' 'गोजिरवाणें' ह्या शब्दांनी फुलांचा विशेष गुण अगर वैशिष्ट्य दाखविलें आहे. विशेषणाने नामाची व्याप्ति कमी होते, मर्यादित होते, पण अर्थ वाढतो. 'फूल' ह्या नामाची व्याप्ति 'पिवळें' ह्या शब्दाने मर्यादित झाली तरी 'पिवळें फूल' ह्याचा अर्थ 'फूल' शब्दाच्या अर्थापेक्षा जास्त आहे. म्हणजे "पिवळें फूल" ह्या शब्दांनी फुलाच्या अंगचे सर्व धर्म आणि 'पिवळेंपणा' हा एक विशेष धर्म किंवा गुण इतके दाखविले जातात.

अर्थपूर्ण विशेषणांचा उपयोग कौशल्याने केला तर व्यक्तीचें अगर वस्तूचें वर्णन अधिक परिणामकारक होतें. ती व्यक्ति अगर वस्तू आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते. पुढील उदाहरणें पाहा. 'शीतळ छाया,' 'हिरवेंगार शिवार,'

'पडीक हिरवें रान,' 'हसरें वदन,' 'अपूर्व सोहळा,' 'अलौकिक मातृभक्ति,' 'लाखो वीर,' 'प्रेमळ मूर्ति,' 'भुरकट पांढरे केस,' 'पसाभर तांदूळ,' 'सशाचे निळे काळे डोळे आणि पांढरें शुभ्र शरीर,' 'भावपूर्ण विनम्र वंदन,' 'प्रतिभाशाली भाट,' 'अघोर अरण्य,' 'भयानक गर्जना,' 'स्फूर्तिदायक राष्ट्रगीत'. वरील उदाहरणांत नामशब्दामागे जे शब्द आले आहेत ते शब्द त्यांच्या पुढे आलेल्या नामाने बोधित व्यक्तीबद्दल अगर वस्तूबद्दल कसा, केवढा, किती, अशा प्रकारची विशेष माहिती देण्याचें कार्य करीत आहेत. नामाबद्दल विशेष माहिती देऊन नामाची व्याप्ति मर्यादित करणारे हे शब्द त्या त्या नामाचीं विशेषणें आहेत.

विशेषण ज्या नामाची व्याप्ति मर्यादित करतें त्या नामाला त्या विशेषणाचें 'विशेष्य' म्हणतात. 'अलौकिक' हें विशेषण व 'मातृभक्ति' हें 'अलौकिक' ह्या विशेषणाचें 'विशेष्य' होय. 'विशेष्य' हा शब्द अर्थातच सापेक्ष आहे. म्हणजे एखाद्या नामापूर्वी विशेषण असेल तेव्हाच तें नाम त्या विशेषणाचें 'विशेष्य' होतें; एरवी नाही.

विशेषणांचे प्रकार

विशेषणांचे त्यांच्या वाक्यांतील उपयोगावरून व कार्यावरून पुढील प्रकार मानले आहेत—

(१) गुणविशेषण, (२) संख्याविशेषण, (३) विधिविशेषण, (४) क्रियाविशेषण, (५) धातुसाधित विशेषण, (६) सर्वनामात्मक विशेषण, (७) सर्वनामसाधित विशेषण.

(१) **गुणविशेषण**—संख्या अगर परिमाण ह्यांहून भिन्न असलेला कोणताहि इंद्रियगम्य अथवा मनोगम्य असा वस्तूचा धर्म ह्याला 'गुण' अशी संज्ञा दिली आहे. त्या धर्माचा बोध करून देणारें विशेषण तें 'गुणविशेषण' होय. 'गुणविशेषण' हें नेहमी विशेष्याच्या आधी म्हणजे पूर्वी येतें. 'गुणविशेषण' हें नामानंतर आलें म्हणजे नामाचा गुण दाखविण्याचें कार्य करूनहि त्याच्या हातून अन्य कार्य होतें व हीं दोन्हीं कार्यें लक्षांत घेऊन त्याला निराळी संज्ञा देऊन त्याचा व्याकरणांत निराळा प्रकार मानला आहे. त्याचा विचार पुढे करूं. वर जीं उदाहरणें दिलीं आहेत, त्यांत 'शीतळ,' 'हिरवेंगार,' 'पडीक,' 'हसरें,' 'अपूर्व,' 'अलौलिक,' 'प्रेमळ,' 'भुरकट पांढरे,' 'निळे काळे,' 'पांढरे शुभ्र,' 'भावपूर्ण,' 'भावपूर्ण विनम्र,' 'प्रतिभाशाली' हीं सर्व 'गुणविशेषणें' होत.

(२) **संख्याविशेषण**—ज्या विशेषणाच्या योगाने नामाची संख्या

दाखविली जाते, अगर परिमाण दाखविलें जातें तें 'संख्याविशेषण' होय. आरंभीं जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांत 'लाखो लोक,' 'पसाभर तांदूळ' ह्या ठिकाणीं 'लाखो,' 'पसाभर' हीं संख्याविशेषणें आहेत. ज्या वेळीं संख्याविशेषणांचा गणना किंवा गणती करण्याकरिता उपयोग होतो तेव्हा तीं **गणनावाचक संख्याविशेषणें** होत. 'पांचशे रुपये,' 'एक द्वितीयांश रुपया' ह्या ठिकाणीं 'पांचशे' व 'एक द्वितीयांश' हीं 'गणनावाचक संख्याविशेषणें' आहेत. एक, दोन, चार, पांच, शंभर, पाव, अर्धा, दीड, दशांश, दोघे, चारी, पाची इत्यादि संख्याविशेषणें 'गणनावाचक' होत. जीं संख्याविशेषणें वस्तूंची किंवा प्राण्यांची क्रमवार व्यवस्था दाखवितात तीं '**क्रमवाचक संख्याविशेषणें**' होत. दुसरा, तिसरा, एकादशी, द्वादशी इत्यादि क्रमवाचक संख्याविशषणें होत. ज्या संख्याविशेषणांच्या योगानें संख्येची किती वेळ आवृत्ति झाली ह्याचा बोध होतो तीं '**आवृत्तिवाचक संख्याविशेषणें**' होत. 'चूर्णें चौपदरी फडक्यांतून गाळावीं लागतात.' दुप्पट, तिप्पट, चौप्पट, पांचपट, दुहेरी, तिहेरी, दशगुणित, शतगुणित हीं आवृत्तिवाचक संख्याविशेषणांचीं उदाहरणें आहेत. जेव्हा संख्याविशेषणें कोणत्याच निश्चित संख्येचा बोध करून देत नाहीत, तेव्हा त्यांना **अनिश्चित संख्यावाचक विशेषणें** म्हणतात. थोडा, फार, अल्प, सगळा, अवघा, इतर, कांही, सर्व, वरकड इत्यादि विशेषणें अनिश्चित संख्यावाचक विशेषणाचें कार्य करतात. ज्या संख्याविशेषणांनी अनेकांपैकी प्रत्येकाचा पृथक् पृथक् असा बोध होतो तेव्हा त्यांना **पृथक्त्ववाचक संख्याविशेषणें** म्हणतात. उदा० दरएक, प्रत्येक, हरएक.

(३) **विधिविशेषण**— विशेषणें आपल्या विशेष्याच्या पुढे येऊन विशेष्याबद्दल विशेष माहिती देऊन विशेष्याबद्दलचें सांगणें किंवा विधान पूर्ण करतात, तेव्हा त्या विशेषणांना '**विधिविशेषणें**' म्हणतात. 'सज्जनांचीं मनें लोण्याहून मऊ असतात पण कांही प्रसंगीं तीं मनें वज्रापेक्षा कठीण बनतात' ह्या वाक्यांत 'मऊ' व 'कठीण' हीं विधिविशेषणें आहेत. 'मऊ' व 'कठीण' ह्या विशेषणांनी 'मनें' ह्या नामाचा गुण दाखविला आहे पण तीं त्या नामापूर्वी न येतां त्याच्यानंतर आलीं आहेत. 'असतात' व 'बनतात' ह्या क्रियापदांद्वारे 'मनें' ह्यासंबंधी बोलणाराला जें विधान करावयाचें आहे, जें सांगावयाचें आहे, त्या विधानाला पूर्णता आणण्याचें काम ह्या विशेषणांनी होत आहे. जर हीं विशेषणें वाक्यांतून गाळलीं तर विधानाचो पूर्णता नष्ट होते, विधानाचा अर्थ पुरा होत नाहीं. 'सुंदर स्त्रियांना कांहीहि शोभतें,' ह्या ठिकाणीं 'सुंदर' हें गुणविशेषण आहे. 'शुभ्र वस्त्राने स्त्रिया सुंदर दिसतात,' ह्या ठिकाणीं 'सुंदर' हें विधिविशेषण आहे.

(४) क्रियाविशेषण— जें विशेषण क्रियेबद्दल (क्रियापदाबद्दल) विशेष माहिती देतें किंवा क्रियेचा (क्रियापदाचा) गुण दाखवितें तेव्हा तें क्रियाविशेषण होय. 'पूर्वीच्या काळीं लग्नकार्यांत बोडका पुरुष दिसत नसे,' ह्या ठिकाणीं 'बोडका' हें 'पुरुष' ह्याचें गुणविशेषण आहे. 'तो पुरुष लग्नांत बोडका हिंडत होता,' ह्या ठिकाणीं कसा हिंडत होता? तर 'बोडका.' म्हणजे 'बोडका' ह्या विशेषणाने 'हिंडत होता' ह्या क्रियापदाबद्दल विशेष माहिती दिली किंवा गुण दाखविला, म्हणून येथे 'बोडका' हें क्रियाविशेषण होय. विशेषण कोणत्या प्रकारांत पडतें हें त्या विशेषणशब्दाने वाक्यांत जें कार्य केलें त्यावरून ठरवावें लागतें. पुढील उदाहरण पाहा. 'तिरवा डोळा वाईट दिसतो,' येथे 'तिरवा' गुणविशेषण. 'त्याचा डोळा तिरवा आहे,' येथे 'तिरवा' हें विधिविशेषण. 'तों तिरवें पाहतो' येथे 'तिरवें' हें क्रियाविशेषण होय. 'क्रियाविशेषण अव्ययें' हीं वाक्यांत क्रियाविशेषणाचें कार्य करतात. क्रियाविशेषण अव्ययें हीं अविकारी असतात पण क्रियाविशेषणाला लिंगवचनपरत्वें विकार होतात. दोन्हींमधील हा फरक ध्यानांत ठेवावा.

(५) धातुसाधित विशेषणें— धातूला 'णार, णारा, ता, ला, लेला' हे प्रत्यय लागून जीं धातुसाधितें बनतात अगर कृदन्तें बनतात, त्यांचा वाक्यांत विशेषणासारखा उपयोग होतो. नामासारखा उपयोग होणाऱ्या धातुसाधितांना आपण धातुसाधित नामें म्हणून संबोधिलें आहे. त्याप्रमाणे जेव्हा वरील प्रत्यय लागून बनलेल्या धातुसाधितांचा विशेषण म्हणून उपयोग होतो, तेव्हा तीं धातुसाधित विशेषणें होत. हीं विशेषणें गुणविशेषणाचें कार्य करतात म्हणून तीं गुणविशेषणेंच आहेत; पण त्यांना धातुसाधित विशेषणें असें नांव देऊन त्यांचा निराळा प्रकार मानतात. पुढील उदाहरणें पाहा. खेळणारा मुलगा, रांगतें मूल, राहतें घर, सासरी जाणारी मुलगी, बोलविता धणी, रचलेली कादंबरी, पिकलें पान, झांकली मूठ. कांही कालवाचक व स्थलवाचक अव्ययांस चा, ला, ईल हे प्रत्यय लागून बनलेल्या अव्ययसाधित शब्दांचा विशेषणासारखा उपयोग होतो. त्यांना अव्यय-साधित विशेषणें म्हणतात. पुढचा, मागचा, वरचा, पुढला, मागला, वरला, पुढील, मागील, वरील इत्यादींचा विशेषणें म्हणून उपयोग होतो. वरचा मजला, मागली माडी.

(६) सर्वनामात्मक व सर्वनामसाधित विशेषणें— हा, तो, जो, कोण, काय ह्या सर्वनामांपुढे त्यांचीं नामें आल्यास तीं सर्वनामें विशेषणें होतात, हें 'सर्वनामें' ह्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. सर्वनामापुढे लगेच त्यांचें नाम येतें, त्या वेळीं त्या सर्वनामांचा उपयोग त्या नामाचें वैशिष्ट्य दाखविण्याकडे अगर त्याची व्याप्ति मर्यादित करण्याकरिता होतो म्हणून त्यांना

सर्वनामात्मक विशेषणें म्हणतात. 'हा मुलगा स्वस्थ बसला आहे, पण तो मुलगा उद्योगांत गर्क आहे.' 'जें चित्र फुटलें तें माझेंच कशावरून?' 'त्याने काय वस्तु आणली हें मी पाहिलें नाही.' 'तो कोण मनुष्य होता हें समजलें नाही.' हा, तो, जो, कोण, काय ह्या सर्वनामांच्या रूपांत बदल होऊन कांही शब्द बनतात, त्यांचा उपयोग विशेषणें म्हणून होतो. त्यांचा निराळा प्रकार मानून त्यांना 'सर्वनामसाधित विशेषणें' असें नांव दिलें आहे. महत्त्वाची 'सर्वनामोत्पन्न' अगर 'सर्वनामसाधित विशेषणें' पुढे दिलीं आहेत.

हा-- असा, असला, इतका, एवढा, अमका.

तो-- तसा, तसला, तितका, तेवढा, तमका.

जो-- जसा, जसला, जितका, जेवढा.

कोण-- कसा, कसला, कोणता, केवढा.

काय-- कसा, कसला, कितका.

विशेषणांचे विकार

विशेषण हें विशेष्यावर अवलंबून असतें. म्हणून विशेष्याचें जें लिंग व वचन तेंच त्याच्या विशेषणाचें असतें. तो उद्योगी पुरुष- येथे विशेषणाचें लिंग व वचन पुल्लिंगी व एकवचन आहे. सुवासिक फूल- नपुंसकलिंगी एकवचन. फक्त आकारान्त विशेषणाचें रूप पुढील नामाच्या म्हणजे विशेष्याच्या लिंगवचनानुसार बदलतें. आकारान्ताशिवाय इतर अन्तांचीं विशेषणें विशेष्याच्या लिंगवचनानुसार बदलत नाहीत. शहाणा मुलगा, शहाणे मुलगे, शहाणी मुलगी, शहाण्या मुली, शहाणें मूल, शहाणीं मुलें. पण रानटी माणूस, रानटी माणसें, कडू फळ, कडू फळें.

आकारान्त संख्याविशेषणें ह्या नियमाला अपवाद आहेत. अकरा, बारा, तेरा इत्यादि आकारान्त संख्याविशेषणांच्या रूपांत बदल होत नाही. अकरा पेरू, अकरा काकड्या.

मराठीमध्ये संस्कृतप्रमाणे विशेष्याची जी विभक्ति तीच त्याच्या विशेषणाची असते; पण विशेषणाला विभक्तिप्रत्यय लागत नाहीत व विशेषणाची विभक्ति सांगत नाहीत. प्रथमेशिवाय इतर विभक्तींत विशेष्य असलें तर फक्त आकारान्त विशेषणाचें सामान्यरूप होतें; पण हें सामान्यरूप विशेष्याच्या लिंग-वचनाप्रमाणे बदलत नाही. ते तिन्ही लिंगीं उभयवचनी समान असतें.

शहाण्या मुलाने, शहाण्या मुलांनी, शहाण्या मुलीने, शहाण्या मुलींनी, शहाण्या पुरुषाने, शहाण्या पुरुषांनी.

ह्याला संख्याविशेषणें अपवाद आहेत. एक ह्या अकारान्त संख्याविशेषणाचें पुढील सविभक्तिक किंवा सशब्दयोगिक विशेष्यामुळे सामान्यरूप होतें. एक वाडा, एका वाड्यास. दोनापासून नऊ व वीस, तीस आणि साठ ह्या संख्याविशेषणांचा मनुष्यवाचक शब्दांकडे जेव्हा संबंध असतो, तेव्हा त्यांचें विकल्पेंकरून सामान्यरूप होतें. दोन–दोघां किंवा दोहों, तीन–तिघां किंवा तिहीं, चार–चौघां किंवा चोहों अशीं सामान्यरूपें होतात. पाच पासून नऊ यांचीं सामान्यरूपें पांचां, सहां, सातां, आठां, नवां अशीं होतात. वीस ह्याचें विसां व तीस ह्याचे तिसां व साठ ह्याचे साठां अशीं सामान्यरूपें होतात. साठ माणसांस किंवा साठां माणसांस.

विशेषणांचीं विभक्तिरूपें नसतात असें वर सांगितलें आहे पण कांहीं वेळीं वाक्यांत विशेषणाचें विशेष्य गुप्त असतें व त्या वेळीं तें विशेषण त्याच्या गुप्त विशेष्याचें काम करतें. अशा वेळीं त्या विशेषणाचा उपयोग नामाप्रमाणें होतो व त्यास निरनिराळ्या विभक्ति असतात. आंधळा भीक मागतो. येथे 'मनुष्य' हें विशेष्य गुप्त आहे 'आंधळा' ही प्रथमा व आंधळा ह्या विशेषणाचा उपयोग नामाप्रमाणे. असा जेव्हा विशेषणाचा नामाप्रमाणे उपयोग होतो तेव्हा त्याला **विशेषणात्मक नाम** असें म्हणतात. उदाहरणें पाहा—

"आंधळ्यासी जन सारेचि आंधळे," "शहाण्याला शब्दाचा मार," "सन्मार्ग सोडोनि भले न जाती," "जातीच्या सुंदरांना कांहीहि शोभतें," "खोट्याच्या कपाळीं गोटा," "पुढच्यास ठेच मागला शहाणा."

अभ्यास

१. विशेषण हें आपल्या विशेष्याची व्याप्ति मर्यादित करते पण अर्थ वाढवितें हें उदाहरणें देऊन स्पष्ट करा.

२. पुढील उताऱ्यांतील विशेषणें ओळखून तीं कोणत्या प्रकारांत पडतात तें सांगा; त्यांचें विशेष्य सांगून विशेष्यानुसार प्रत्येक विशेषणाचें लिंग व वचन कोणतें तें स्पष्ट करा.

(१) भव्य, उंच आणि बर्फमय पर्वत, खोल आणि विक्राळ दऱ्या, विविध रंगांच्या सुवासिक फुलांचे गजबजलेले ताटवे असें विविध प्रकारचें वैभव काश्मीरच्या नंदनवनांत लुटावयास मिळतें. महाराष्ट्रांतील पर्वत उघडे-बोडके आहेत. मधूनमधून जरी ह्या पर्वतांच्या आश्रयाने मोठालीं अरण्यें उभीं असलीं तरी इतर कित्येक प्रांतांतील गहन अरण्यापुढे तीं साधारणशीं वाटतात.

(२) हळूवार भावनांचें मनोहर काव्य गुरुजींच्या प्रेमळ मातेने त्यांच्या हृदयांत ओतलें.

(३) संध्याकाळच्या सुमारास मावळत्या सूर्याचे तांबडे पिवळे किरण समुद्राच्या अथांग पाण्यावर चमकूं लागतांच एक मनोवेधक देखावा निर्माण झाला.

(४) या मृतहृदयी, दुःखी जीवाची मला फार कींव येते. जगांतील सुंदर आणि मनोहर गोष्टींची त्यांना मनमुराद स्तुति करतां येत नाही.

(५) मृगजळामागे धावणारीं हरणें वेडीं नसतात; त्यांचा कंठ पाण्या वाचून सुकलेला असतो म्हणूनच तीं धाव घेतात.

(६) कुठे हरिणाच्या वेगाने धावणारें हें विसावें शतक आणि कुठे कासवाच्या मंद गतीने त्याला गाठूं पाहणारीं आम्ही हिंदी माणसें !

(७) तापलेली पृथ्वी तडफडत होती. शिजणारीं माणसें धडपडत होतीं आणि पावसाचे मिरासदार असलेले ते ढग आकाशांत शांत चित्ताने गडगडत होते.

(८) प्रभावशाली परममंगला महाराष्ट्र देशा
तुला प्रभातीं प्रसन्न हृदयें प्रणाम परमेशा ।

(९) त्या निरागस नि कोमल बालकाची ती केविलवाणी दृष्टि पाहून तिचें प्रेमळ हृदय आर्द्र झालें.

३. स्पष्टीकरणात्मक टीपा लिहा—

(१) सर्वनामात्मक विशेषण, (२) सर्वनामसाधित विशेषण, (३) विशेषणात्मक नाम, (४) विधिविशेषण व क्रियाविशेषण यांमधील फरक, (५) संख्याविशेषणाचे प्रकार.

८. क्रियापदें

क्रियापदाची व्याख्या

वाक्यामधील ज्या विकारी शब्दाने क्रियेचा किंवा स्थितीचा बोध होऊन वाक्यार्थास पूर्णता येते आणि बोलणाराच्या दृष्टीने अपेक्षित असणारा त्या क्रियेचा काळ अथवा कांही विशेष अर्थ ह्यांचा बोध होतो, त्या विकारी क्रियावाचक शब्दास क्रियापद असें म्हणतात.

कै. हरिभाऊ आपटे ह्यांचा व्यासंग दांडगा होता. त्यांनी अनेक ग्रंथ वाचले. तुम्हीहि अनेक ग्रंथ वाचा.

ह्या ठिकाणीं होता, वाचले, वाचा हीं क्रियापदें आहेत. ह्या शब्दांनी वाक्यार्थाला पूर्णता आलेली आहे. जर हे शब्द वाक्यांतून गाळले तर वाक्यार्थ पूर्ण समजत नाही. 'होता' ह्या शब्दाने स्थितीचा बोध होऊन भूतकाळचा बोध होतो. 'वाचले' ह्या शब्दाने 'वाच' ह्या क्रियेचा बोध होऊन 'भूतकाळाचा' बोध होतो. 'वाचा' ह्या शब्दावरून 'वाच' ह्या क्रियेचा बोध होऊन बोलणाराच्या मनांतील 'विनंतीचा अगर आज्ञेचा अर्थ' कळून येतो.

ज्या क्रियावाचक मूळ शब्दास कांही प्रत्यय लागून क्रियापद बनतें त्या मूळ शब्दास धातु म्हणतात. वाच हा धातु. ह्यावरून वाचतो, वाचिले, वाचील, वाचा, वाचावें अशीं प्रत्यय लागून क्रियापदें बनलीं आहेत. वाच ह्या धातूपासून हीं जीं प्रत्यय लावून रूपें बनलीं, तीं वाक्यांत येऊन त्यांनी व्याख्येत निर्दिष्ट केलेलें कार्य केलें कीं तीं क्रियापदें होतात.

क्रियापद हा शब्द जरा घोटाळ्याचा आहे. क्रियापद हें धातूपासून सिद्ध होतें. पण प्रत्येक धातु हा कांही 'क्रियादर्शक' नाही. बरेच धातु 'क्रियादर्शक' आहेत हें खरें, पण कांही धातु 'स्थितिदर्शक' आहेत. "हिंवाळ्यांत थंडी असते." "पांडुरंगाच्या दर्शनाने गोरोबांना आनंद झाला." ह्या वाक्यांत 'अस' आणि 'हो' ह्या धातूंपासून बनलेलीं क्रियापदें आहेत. पण त्यांनी कोणत्याही क्रियेचा बोध होत नाही, तर स्थितीचा बोध होत आहे. असें असलें तरी त्यांना आपण क्रियापदेंच म्हणतों.

वाक्यार्थास पूर्णता आणण्याचें कार्य क्रियापदाकडून होतें म्हणून क्रियापद हा वाक्यांतील महत्त्वाचा शब्द आहे. प्रत्येक वाक्यामध्ये क्रियापद असणें आवश्यक आहे. दुसऱ्याला कांहीतरी माहिती देणें, दुसऱ्यापासून कांही-

तरी माहिती विचारणें, दुसऱ्याला कोणती तरी आज्ञा किंवा विनंती करणें, व कोणती तरी मनांतील इच्छा प्रदर्शित करणें हा आपल्या बोलण्याचा हेतु असतो. अशा एकेका पूर्ण अर्थाच्या बोलण्याला आपण वाक्य असें म्हणतों. माहिती देण्याचें, माहिती विचारण्याचें, आज्ञा करण्याचें अथवा इच्छा प्रदर्शित करण्याचें कार्य क्रियापदाकडून होतें. क्रियापद घातल्याखेरीज वाक्याच्या अर्थाला पूर्णता येत नाही. म्हणीसारख्या वाक्यांत क्रियापद 'गुप्त' किंवा 'अध्याहृत' असतें. 'आळशाला दुप्पट काम' ह्या म्हणीचा अर्थ स्पष्ट करून दाखवितांना 'करावें लागतें' हें क्रियापद घालावें लागतें. ह्या ठिकाणीं 'करावें लागतें' हें क्रियापद 'गुप्त' किंवा 'अध्याहृत' आहे.

कर्ता, कर्म व पूरक

क्रियापदाने दाखविलेली क्रिया करणारा किंवा क्रियापदाने दाखविलेली स्थिति असणारा जो तो त्या क्रियापदाचा कर्ता होय. क्रिया करणारा कोण किंवा स्थिति कोणाची हें ज्या शब्दाने समजतें त्या शब्दाला त्या वाक्यांतील त्या क्रियापदाचा 'कर्ता' म्हणतात. वाक्यांतील क्रियापदाचा 'कर्ता' ओळखण्याची सोपी पद्धत म्हणजे क्रियापदाचा जो धातु त्याला 'णारा' हा प्रत्यय लावून प्रश्न विचारणें हा होय. 'मुलें अंगणांत खेळतात.' 'तानाजीने कोंडाणा घेतला.' ह्या ठिकाणीं अनुक्रमें 'खेळणारीं कोण?' 'घेणारा कोण?' असे प्रश्न विचारून वाक्यांतील 'मुलें' व 'तानाजीने' हे कर्ते समजून येतात. 'हिंवाळ्यांत थंडी असते.' येथे 'असते' ह्या क्रियापदाचा कर्ता 'थंडी' हा आहे. असणारी कोण? 'थंडी.' क्रियापद हें कर्त्याची कृति किंवा स्थिति ह्याविषयी माहिती सांगून वाक्याला पूर्णता आणतें. तेव्हा वाक्यामध्ये 'कर्ता' व 'क्रियापद' हे शब्द महत्त्वाचे आहेत. कर्ता व क्रियापद ह्या दोन शब्दांशिवाय वाक्याचा अर्थ पूर्ण होत नाही. क्रियापदाने दाखविली जाणारी क्रिया कर्त्यापासून निघते व ज्या दुसऱ्या कोणावर किंवा कशावर तिचा परिणाम घडतो किंवा निदान ज्याकडे तिचा रोख किंवा कल असतो त्यास त्या क्रियापदाचें कर्म म्हणतात. 'विधानसभा कायदे करते,' येथे करण्याची क्रिया 'कायदे' ह्यावर घडत आहे. करण्याच्या क्रियेचा रोख 'कायदे' ह्या शब्दावर आहे. येथे 'कायदे' हें 'करते' ह्या क्रियापदाचें 'कर्म' आहे. 'महाराजांनी प्रधानास बोलाविलें,' येथे 'प्रधानास' हें कर्म आहे. प्रत्येक क्रियापदाला कर्ता हा असतोच, पण 'कर्म' असतेंच असें नाही. कांही धातूपासून बनलेल्या क्रियापदांना कर्माची आवश्यकता असते. 'कर्म' घातल्याशिवाय त्या क्रियापदाकडून वाक्यार्थ पुरा होत नाही. तर कांही धातूपासून बनलेल्या क्रियापदांना वाक्यार्थ पुरा करण्याच्या दृष्टीने कर्माची आवश्यकता

नसते. 'रामा पडला,' ह्या ठिकाणीं 'पड' ह्या धातूवरून बनलेल्या क्रियापदास कर्माची जरूरी नाही. 'रामा उदाहरण सोडवितो' ह्या ठिकाणीं 'सोड' ह्या धातूपासून बनलेल्या क्रियापदाला कर्माची आवश्यकता आहे. येथे कर्माच्या साहाय्याशिवाय क्रियापद वाक्यार्थ पुरा करूं शकत नाही. ह्यावरून असें म्हणतां येईल की, कांही धातु सकर्मक आहेत तर कांही धातु अकर्मक आहेत. कांही सकर्मक धातूवरून बनलेल्या क्रियापदांना 'कर्ता' व 'कर्म' हीं असूनदेखील विधान पूर्ण करण्याकरिता 'पूरका'ची जरूरी लागते. 'शाहूने बाळाजीस पेशवा नेमिलें,' ह्या ठिकाणीं 'पेशवा' हें विधानपूरक आहे. हा शब्द गाळला तर 'नेमिलें' ह्या क्रियापदाकडून विधान पूर्ण होत नाही. 'शिवाजी राजा झाला,' 'आंबा गोड निघाला,' ह्या ठिकाणीं 'झाला' व 'निघाला' ह्या क्रियापदांना विधान पूर्ण करण्याकरिता 'राजा' व 'गोड' ह्यांचें साहाय्य आवश्यक आहे. ही अकर्मक क्रियापदें आहेत. ह्यावरून कांही सकर्मक धातु व कांही अकर्मक धातु ह्यांना 'विधानपूरक' किंवा 'विधेयपूरक' शब्दांची आवश्यकता असते.

म्हणजे वाक्यांत कर्ता, क्रियापद, सकर्मक क्रियापद असेल तर कर्म आणि जेथे विधान पूर्ण होत नसेल तेथे विधानपूरक किंवा विधेयपूरक हे शब्द अवश्य असले पाहिजेत, हें येथपर्यंच्या विवेचनावरून दिसून येईल.

क्रियापदें व कृदन्तें

'क्रियापदें' हीं धातुरूपें आहेत. त्याचप्रमाणे 'कृदन्तें' किंवा 'धातुसाधितें' हींहि धातुरूपें आहेत. धातूस प्रत्यय लागून क्रियापदें बनतात. त्याचप्रमाणे कृदन्तेंहि बनतात. 'कृदन्तें' हा 'क्रियावाचक शब्द' आहे व क्रियापद हाहि 'क्रियावाचक शब्द' आहे. पण दोन्हींमध्ये वाक्यांतील त्यांच्याकडून होणाऱ्या कार्याच्या दृष्टीने कांही बाबतींत साम्य आहे, तर कांही बाबतींत फरक आहे.

(१) कृदन्तें व क्रियापदें हीं दोन्हीहि क्रियावाचक आहेत व दोन्हीहि मूळ धातूला निरनिराळे प्रत्यय लागून बनतात.

(२) क्रियापदाप्रमाणे कृदन्तालाहि कर्ता, कर्म, करण वगैरे असतें.

(३) कृदन्ताने वाक्य पूर्ण होत नाही, क्रियापदाने वाक्य पूर्ण होतें.

कृदन्त ही शब्दाची मुख्य जात न मानतां त्यांनी वाक्यांत केलेलें कार्य लक्षांत घेऊन तीं नाम, विशेषण व क्रियाविशेषणअव्यय ह्या तीन प्रकारच्या जातींत घातलीं जातात. धातुसाधित नामें व धातुसाधित विशेषणें ह्यांचा

विचार पूर्वी केलेला आहे. धातुसाधित क्रियाविशेषण अव्ययांचा विचार पुढे 'अव्ययें' ह्या सदरांत येईल.

(१) णें, वें, ला; (२) णार, णारा, ता, ला, लेला; (३) त, तां, तांना, ऊ, ऊन; हे प्रत्यय धातूला लागून धातुसाधितें बनतात. ह्या प्रत्ययांना 'कृत्प्रत्यय' अशी संज्ञा आहे म्हणून हे प्रत्यय लागून जो क्रियावाचक शब्द तयार होतो, त्याला 'कृदन्त' असें नांव देतात. 'कृदन्तें' ह्या शब्दाऐवजी 'धातुसाधितें' असें म्हटलें तरी चालतें.

ज्याप्रमाणे वाक्यांत विभक्तीमुळे शब्दांचा कर्ता, कर्म, करण, संप्रदान ह्या प्रकारचा कारकार्थ क्रियापदाकडे जुळला जातो, त्याचप्रमाणे कृदन्ताच्या बाबतींत होतें. पुढील उदाहरणें पाहा—

(१) त्याने घर बांधल्याला पांच वर्षें झालीं. ('बांधल्याला' ह्या कृदन्तांतील क्रियेचा कर्ता 'त्याने' व 'घर' हें कर्म आहे.)

(२) चाकूने लेखणी करतांना त्याचें बोट कापलें. ('करतांना' ह्या कृदन्तांतील क्रियेचें 'चाकूने' हें करण आहे.)

(३) अनाथांना धर्म केल्यास पुण्य लागतें. ('केल्यास' ह्या कृदन्तांतील क्रियेचें 'अनाथांना' हें संप्रदान आहे.)

(४) कलकत्त्याहून निघून तो मुंबईस गेला. ('निघून' ह्या कृदन्तांतील क्रियेचें 'कलकत्त्याहून' हें अपादान आहे.)

(५) नदीवर जाऊन स्त्रियांनीं धुणीं धुतलीं. ('जाऊन' ह्या कृदन्तांतील क्रियेचें 'नदीवर' हें अधिकरण आहे.)

(६) देवळाच्या दाराशीं उभा राहून तो भिकारी भिक्षा मागतो. ('राहून' ह्या कृदन्तांतील क्रियेचें 'उभा' हें क्रियाविशेषण आहे.)

(७) डोळे वर करून तो काय पाहात आहे! ('करून' ह्या कृदन्तांतील क्रियेचें 'वर' हें क्रियाविशेषण अव्यय आहे.)

कृदन्त व त्यावर अवलंबून असणारे शब्द ह्यांमिळून वाक्याचा जो भाग होतो, त्यास वाक्यांश म्हणतात. वरील वाक्यांत जाड टाइपांतील शब्दसमूह हा वाक्यांश आहे. 'डोळे वर करून' हा वाक्यांश आहे.

क्रियापदांचें वर्गीकरण

(१) **सकर्मक व अकर्मक**— क्रियापदाचे हे दोन मुख्य प्रकार होतात. ज्या क्रियापदांना कर्म लागतें, तीं 'सकर्मक क्रियापदें' व ज्यांना कर्म लागत नाही, तीं 'अकर्मक क्रियापदें' होत. कांही धातूंपासून बनलेल्या क्रियापदांचा उपयोग सकर्मक त्याचप्रमाणे अकर्मक म्हणून होतो. अशा धातूंना **उभयविध धातू** म्हणतात. माझें पुस्तक **हरवलें** (अकर्मक). वसंताने माझें पुस्तक **हरवलें** (सकर्मक). वसंताची छत्री **मोडली** (अकर्मक). वसंताने छत्री **मोडली** (सकर्मक).

(२) **अपूर्णविधान सकर्मक व अपूर्णविधान अकर्मक**— ज्या सकर्मक क्रियापदांना विधान पूर्ण करण्यास पूरकाची जरुरी लागते, त्यांना 'अपूर्णविधान सकर्मक क्रियापदें' व ज्या अकर्मक क्रियापदांना विधान पूर्ण करण्यास पूरकाची जरुरी लागते, त्यांना 'अपूर्णविधान अकर्मक क्रियापदें' म्हणतात. आता ह्यांचीं उदाहरणें पाहा:—

'बाजीरावाने बऱ्याच सरदारांना उत्तर हिंदुस्थानांत **सुभेदार नेमिलें**.' ह्या वाक्यांत 'नेमिलें' हें सकर्मक क्रियापद आहे. 'बाजीरावाने' हा कर्ता व 'सरदारांना' हें कर्म. 'नेमिलें' ह्या सकर्मक क्रियापदाने केलेलें विधान पूर्ण करण्याकरिता 'सुभेदार' हें नाम आलें आहे. 'सुभेदार' हें नाम प्रथमान्त आहे व प्रथमेचा अर्थ 'विधान' हें आपण विभक्तिविचारांत पाहिलें आहे. पुढील वाक्यांत अपूर्णविधान सकर्मक क्रियापदें आलेलीं आहेत व जाड टाइपांतील शब्द विधान पूर्ण करण्यास मदत करीत आहेत.

(१) आजच्या खेळांत विद्यार्थी त्याला **म्होरक्या** नेमतील.
(२) हुमायुनाने भिस्त्यास औट घटकेचा **राजा** केलें.
(३) गंधर्वांने आपल्या गाण्याने लोकांना **मंत्रमुग्ध** केलें.
(४) न्यायाधिशाने अपराध्यास **दोषी** ठरविलें.

जाड टाइपांतील शब्द विधान पूर्ण करण्यास क्रियापदाला मदत करीत आहेत म्हणून त्यांना '**विधेयपूरकें**' अगर '**विधानपूरकें**' असें म्हणतात.

'माधवरावांचा मुलगा हुषार निघाला.' ह्या वाक्यांत 'निघाला' हें अकर्मक क्रियापद आहे. 'मुलगा' हा कर्ता आहे; आणि क्रियापदाने केलेलें विधान पूर्ण करण्याचें काम 'हुषार' ह्या विशेषणाने केलें आहे. 'हुषार' हें ह्या ठिकाणीं 'विधानपूरक' आहे. पुढील वाक्यांतील क्रियापदें अपूर्ण-

विधान अकर्मक आहेत व जाड टाइपांतील शब्द विधानपूरकाचें कार्य करीत आहेत.

(१) गणपतराव आपल्या कामांत **तरबेज** आहेत.

(२) सायंकाळीं सूर्याचें बिंब **लालसर** दिसतें.

(३) सुलताना रझिया राज्यकारभारांत **कर्तबगार** होती.

(४) इ. स. १५२६ मध्ये बाबर हिंदुस्थानचा **बादशहा** झाला.

(३) **भावकर्तृक क्रियापदें**— प्रत्येक क्रियापदास कर्ता आवश्यक असतो; पण कांही अकर्मक क्रियापदांचा कर्ता वाक्यांत स्वतंत्रपणें दृश्य नसतो. अशा क्रियापदांचा जो 'भाव' म्हणजे क्रियेचा 'मूळ अर्थ' तोच त्यांचा कर्ता आहे असें मानावें लागतें. अशा क्रियापदांना 'भावकर्तृक क्रियापदें' म्हणतात. कांही व्याकरणकारांनी अशा क्रियापदांना 'अकर्तृक क्रियापदें' अशी संज्ञा दिलेली आहे. भावकर्तृक क्रियापदांचें रूप निरंतर नपुंसकलिंगी, तृतीयपुरुषी, एकवचनी असतें. कळमळणें, मळमळणें, सांजावणें, उजाडणें, करमणें, गडगडणें, चकाकणें इत्यादि थोडे धातु भावकर्तृक आहेत. मला **कळमळतें** (कळमळ + होते). शेतांतून परत येतांना त्याला सांजावलें (सांज + झाली). भावकर्तृक क्रियापदामध्ये कर्ता व क्रियापद मिळून एक शब्द होऊन क्रियापद बनलें आहे. 'भावकर्तृक' ह्या सामासिक शब्दाचा विग्रह 'भाव आहे कर्ता ज्याचा' असा आहे. हें ध्यानांत घेतां ह्या क्रियापदांना 'भावकर्तृक' अशी संज्ञा कां दिली हें स्पष्ट होतें. 'अकर्तृक क्रियापदें' ह्या संज्ञेपेक्षा 'भावकर्तृक क्रियापदें' ही संज्ञा अधिक सार्थ वाटते.

(४) **संयुक्त व सहाय क्रियापदें**—'बाईनी बटाटे चिरले.' ह्या वाक्यांत 'चिरले' हें क्रियापद आहे. 'चिरले' ह्या विकारी शब्दाने कर्त्याने केलेल्या क्रियेचा बोध होऊन वाक्यार्थ पुरा केला आहे. 'बाईनी बटाटे चिरून टाकले.' ह्या ठिकाणीं 'टाकले' हें क्रियापद मानलें तर त्या क्रियापदावरून कर्त्याने केलेल्या कृतीचा बोध होत नाही. ह्या वाक्यांत 'टाकण्याच्या' क्रियेबद्दल बोलणाराला विधान करावयाचें नाही; तर 'चिरण्याच्या' क्रियेबद्दल विधान करावयाचें आहे. वाक्यांत 'चिरून' ह्या कृदन्ताद्वारें 'चिरण्याच्या' क्रियेचा बोध होत आहे. पण ह्या कृदन्ताने वाक्यार्थ पुरा होत नाही. 'चिरून' ह्या कृदन्तापुढे 'टाक' ह्या धातूचें जें भूतकाळीं रूप आलें आहे त्यावरून विधानाला पूर्णता आलेली आहे. म्हणजे 'चिर' ह्या धातूच्या धातुसाधितापुढे (कृदन्तापुढे) येऊन वाक्याचा अर्थ पूर्ण करण्यास 'टाकलें' हें क्रियापद त्या धातुसाधिताला अगर कृदन्ताला

साहाय्य करीत आहे. वाक्यांतील क्रियेचा बोध कृदन्तावरून होत आहे व विधानाला पूर्णता आणण्याचें व बोलणाराच्या दृष्टीने अपेक्षित असणारा कृदन्ताकडून सूचित झालेल्या क्रियेचा काळ दाखविण्याचें कार्य 'टाकले' हें क्रियापदरूप करीत आहे. म्हणून ह्या ठिकाणीं 'चिरून टाकले' हें जोड क्रियापद मानावें लागतें. अशा जोड क्रियापदांना 'संयुक्त क्रियापदें' म्हणतात. 'टाकले' हें क्रियापदरूप कृदन्तापुढे येऊन कृदन्ताचा अर्थ पुरा करण्यास मदत करीत आहे म्हणून त्यास 'सहाय क्रियापद' म्हणतात.

संयुक्त क्रियापदांत कर्त्याची क्रिया दाखविणारें जें कृदन्त त्या कृदन्तांतील धातु 'मुख्य धातु' मानतात व सहाय क्रियापदांतील धातूला 'सहाय धातु' म्हणतात. संयुक्त क्रियापदांत कृदन्तांतील धातूने दाखविलेली क्रिया मुख्य असते व कृदन्ताकडून दाखविलेल्या मुख्य क्रियेच्या अर्थास साहाय्य होण्याकरिता व क्रियेचा काळ दाखविण्याकरिता सहाय क्रियापदांतील धातुरूपाचा उपयोग झालेला असतो. ह्या सर्व चर्चेच्या अनुरोधाने सहाय क्रियापद व संयुक्त क्रियापद ह्यांच्या व्याख्या खालीलप्रमाणे होतात.

'जें क्रियापद वाक्यांतील मुख्य धातूच्या कृदन्तापुढे येऊन त्याचा अर्थ पुरा करण्यास मदत करतें त्यास साहाय्य क्रियापद म्हणतात.' **अस, नस, हो, जा, ये, दे, लाग, टाक, शक, पाहिजे, नको** वगैरे कांही ठराविक धातूंवरून सहाय क्रियापदें बनतात.

'मुख्य धातूच्या कृदन्तापुढे सहाय क्रियापद येऊन जेव्हा त्या दोहोंमिळून एकाच क्रियेचा बोध होतो तेव्हा त्या कृदन्तासहित सहाय क्रियापदास संयुक्त क्रियापद म्हणतात.'

'संयुक्त क्रियापद' मानतांना कृदन्त व सहाय क्रियापद ह्या दोहोंमिळून एकाच क्रियेचा बोध होतो कीं नाही ही महत्त्वाची गोष्ट पहावी लागते. जेव्हा दोहोंमिळून एकाच क्रियेचा बोध होत नसेल म्हणजे त्या दोहोंतील क्रिया (कृदन्ताने दाखविलेली क्रिया व सहाय क्रियापदाने दाखविलेली क्रिया) पृथक्पणें होत असतील तेव्हा संयुक्त क्रियापद मानूं नये. पुढील वाक्यांत जोड टाइपांतील पदें क्रियापदें आहेत. ह्या वाक्यांत कृदन्त व पुढील क्रियापदरूप मिळून एकाच क्रियेचा बोध होत नाही, त्या दोहोंतील क्रिया पृथक्पणें झालेल्या आहेत. (१) त्याने आंबे झाडावर चढून काढले. (झाडावर चढला व आंबे काढले) (२) तो सकाळींच बाजारांतून भाजी घेऊन आला.

संयुक्त क्रियापदांतील जो कृदन्त शब्द त्यावरून मुख्य क्रिया कोणती हें

कळतें. ती कळली म्हणजे ती क्रिया करणारा कोण आणि ती कोणावर घडते हें पाहिलें म्हणजे संयुक्त क्रियापदाचा कर्ता व कर्म हीं सहज ओळखतां येतात.

संयुक्त क्रियापदामधील मुख्य धातूच्या (कृदन्ताने दाखविलेल्या धातूच्या) कृदन्तापुढे जें सहाय क्रियापद येतें तें त्या वेळेपुरतें अर्थहीन बनतें.

साधित धातु—पुढील वाक्यांतील जाड टाइपांतील क्रियापदें पाहा. 'घोडा प्रथम रानटी जनावर होतें पण पुढे तो **माणसाळला.**' 'त्याची वृत्ति जरा चंचल होती पण आता अनुभवाने ती **स्थिरावली.**' 'आजारी पडल्यामुळे त्याची अभ्यासांतील प्रगति **मागासली.**' **माणसाळला, स्थिरावली, मागासली,** हीं क्रियापदरूपें **माणसाळ, स्थिराव, मागास,** ह्या धातूंवरून बनलीं आहेत. 'माणसाळ' हा धातु 'माणूस' ह्या नामाला 'आळ' प्रत्यय लागून बनला आहे. 'स्थिराव' हा धातु 'स्थिर' ह्या विशेषणाला 'आव' प्रत्यय लागून साधला आहे. 'मागास' हा धातु 'मागे' ह्या अव्ययापासून साधला आहे. 'त्याने चाकराकडून पाणी आणविलें.' 'आणविलें' हें क्रियापद 'आणव' ह्या धातूचें रूप आहे व 'आणव' हा धातु 'आण' ह्या धातूला 'अव' प्रत्यय लागून साधला आहे. **माणसाळ, स्थिराव, मागास, आणव** हे धातु नाम, विशेषण, अव्यय व धातु ह्यांना कांही प्रत्यय लागून बनले व नंतर त्यांचीं क्रियापदरूपें झालीं. ह्या धातूंना **साधित धातु** म्हणतात. पाऊस **पडला.** गोविंदराव **जेवतात.** तो पूजा **करतो.** ह्या क्रियापदांतील **पड, जेव, कर** हे धातु मूळचेच तसे आहेत; दुसऱ्या एखाद्या शब्दाला एखादा प्रत्यय जोडल्याने ते अस्तित्वांत आलेले नाहीत. अशा धातूंना **सिद्ध धातु** म्हणतात. साधित धातु हे नाम, विशेषण, अव्यय व धातु ह्यांच्यापासून साधलेले असतात. त्यावरून त्यांचे **नामसाधित धातु, विशेषणसाधित धातु, अव्ययसाधित धातु** व **धातुसाधित धातु** असे चार प्रकार मानतां येतात.

(५) **प्रयोजक व शक्य क्रियापदें**—मूळ धातूस प्रत्यय लागून अगर त्यांच्या रूपांत बदल होऊन साधित धातु तयार होतात. अशा साधित धातूंवरून 'प्रयोजक' व 'शक्य' क्रियापदें बनतात.

'चाकर पाणी आणतो.' ह्या ठिकाणीं 'चाकर' हा कर्ता आहे व 'आणतो' हें क्रियापद. 'वसंतरावांनी चाकराकडून पाणी आणविलें.' ह्या वाक्यांत चाकराकडून क्रिया कोणीतरी घडवून आणीत आहे असा अर्थ आहे व तो अर्थ 'आणविलें' ह्या क्रियापदरूपामुळे उत्पन्न झाला आहे. 'आणविलें' ह्या क्रियापदरूपांत 'आणव' हा साधित धातु आहे. 'आण' ह्या धातूस

'अव' प्रत्यय लागून पररूप संधि होऊन 'आणव' हा साधित धातु झाला व 'आणविलें' हें क्रियापदरूप बनलें. 'आणव' हा जो साधित धातु झाला तो क्रिया दुसऱ्याकडून करविण्याचा अर्थ दाखवीत आहे. 'दुसऱ्याकडून करविणें' ह्या अर्थाचा 'प्रयोजक' हा शब्द आहे. म्हणून अशा धातूंना **प्रयोजक धातु** म्हणतात व त्यांच्यापासून झालेल्या क्रियापदांना **प्रयोजक क्रियापदें** म्हणतात.

'जे साधित धातु क्रिया दुसऱ्याकडून करविण्याचा अर्थ दाखवितात त्यास प्रयोजक धातु म्हणतात व त्यांच्यावरून बनलेल्या क्रियापदांना प्रयोजक क्रियापदें म्हणतात.'

'लिहव, चालव, करव, आणव, ऐकव, बसव, पाहव, हसव' हे साधित साधु 'लिह, चाल, कर, आण, ऐक, बस, पाह, हस,' ह्या धातूंपासून 'अव' हा प्रत्यय लागून साधले आहेत. अकारान्त धातूस हा प्रत्यय लागतांना पररूपसंधि झाला आहे.

एकाक्षरी धातूंस 'अवव' हा प्रत्यय लागून प्रयोजक धातु होतात. हा प्रत्यय लागतांना पूर्वरूप संधि होतो. **दे–देवव, खा–खाववं, पी–पिवव, जा–जाववं.**

कांही धातूंचीं प्रयोजक रूपें 'अव' अगर 'अवव' हे प्रत्यय न लागतां मूळ धातूंतील स्वरास गुणवृद्धि होऊन बनतात. **टळ–टाळ, पड–पाड, फिट–फेड, फूट–फोड, चर–चार** इत्यादि.

मूळ धातु अकर्मक असला तरी त्यापासून झालेला प्रयोजक धातु सकर्मक होतो व मूळ धातूचा 'कर्ता' त्यापासून झालेल्या प्रयोजक धातूचें 'कर्म' होतो. 'मूल खाली बसतें.' 'आई मुलाला खाली बसवते.'

मूळ धातु सकर्मक असला तर त्यापासून झालेला प्रयोजक धातूहि सकर्मक राहतो. प्रयोजक रूपामध्ये मूळ धातूच्या कर्त्याला 'कडून' हें शब्दयोगी अव्यय लागतें. 'चाकर काम करतो.' 'मालक चाकराकडून काम करवितो.'

पुढील वाक्यांत साधित धातूंचीं क्रियापदरूपें आलीं आहेत; पण तीं प्रयोजक नाहीत. त्या क्रियापदरूपांवरून क्रिया दुसऱ्याकडून करविण्याचा अर्थ होत नाही. त्या क्रियापदरूपांवरून ती क्रिया करण्याची 'शक्ति' कर्त्याला आहे असें कळतें.

(१) इतक्या दिवसांच्या विश्रान्तीनंतर मला आता थोडें चालवतें.
(२) खग्रास सूर्यग्रहणाच्या वेळीं सर्वांना सूर्याकडे पाहवतें.

'चालवतें,' 'पाहवतें' हीं क्रियापदरूपें 'चालव,' 'पाहव' ह्या साधित धातूपासून बनलीं आहेत व वरील वाक्यांत त्यांच्यामुळे कर्त्याला क्रिया करण्याच्या शक्यतेविषयी अर्थ उत्पन्न होतो म्हणून त्यांना शक्य क्रियापदें म्हणतात.

'जे साधित धातु कर्त्याला ती क्रिया करण्याची शक्यता आहे असे अर्थ दाखवितात, त्यांस शक्य धातु म्हणतात व त्या धातूंवरून बनलेल्या क्रियापदांस शक्य क्रियापदें म्हणतात.'

शक्य क्रियापदाचा कर्ता चतुर्थीचा अथवा सविकरण तृतीयेचा असतो. मला आता थोडें चालवतें (चतुर्थी). माझ्याच्याने आता थोडें चालवतें. (सविकरण तृतीया).

क्रियापदाचे विकार

क्रियापद हा विकारी शब्द आहे. लिंग, वचन, पुरुष, काळ, अर्थ, इतके विकार क्रियापदाला होतात. ह्यांना अनुसरून धातूला निरनिराळे प्रत्यय लागून क्रियापदाचीं निरनिराळीं रूपें होतात. वाक्यांतील क्रियापदाची योजना करतांना कधी तीं लिंग, वचन व पुरुष ह्यांबाबत कर्त्याप्रमाणे किंवा कर्माप्रमाणे किंवा स्वतंत्र अशी करावी लागते. ह्या योजनेला 'प्रयोग' असें नांव आहे. क्रियापदाचीं रूपें काळ, अर्थ व वाक्यांतील प्रयोग ह्यांवर अवलंबून असतात. धातूला हे विकार होऊन जीं क्रियापदरूपें होतात त्यांचा अभ्यास करावयाचा म्हणजेच क्रियापदांच्या विकाराचा किंवा विकरणाचा अभ्यास करावयाचा.

काळ व अर्थ—क्रियापदाच्या रूपावरून क्रिया केव्हा घडली असा जो वेळेचा बोध होतो त्यास काळ म्हणतात. प्रधान काळ तीन आहेत—(१) वर्तमान, (२) भूत, (३) भविष्य. काळपरत्वें क्रियापदाचीं रूपें बदलतात. म्हणून 'काळ' हा क्रियापदाचा एक विकार मानतात.

क्रियापदाच्या रूपावरून क्रिया चालू आहे असा बोध होतो तेव्हा तो वर्तमानकाळ होय.

क्रियापदाच्या रूपावरून क्रिया पूर्वी झाली असा बोध होतो तेव्हा तो भूतकाळ होय.

क्रियापदाच्या रूपावरून क्रिया पुढे होईल असा बोध होतो तेव्हा तो भविष्यकाळ होय.

विद्वान् गीतेचीं स्तोत्रें गातात. (वर्तमानकाळ)

विद्वानांनी गीतेचीं स्तोत्रें गायिलीं (भूतकाळ)

विद्वान् गीतेचीं स्तोत्रें गातील. (भविष्यकाळ)

जेव्हा क्रियापदाच्या रूपावरून काळाचा निश्चित बोध न होतां आज्ञा, उपदेश, इच्छा, कर्तव्य, संकेत इत्यादि बोलणाराच्या मनांतील जे हेतु किंवा जे भाव ते ध्यानांत येतात, त्यांना क्रियापदाचा **अर्थ** म्हणतात. क्रियापदाच्या अर्थामुळे क्रियापदाचीं रूपें बदलतात. म्हणून ' अर्थ ' हा क्रियापदाचा विकार मानला आहे.

जेव्हा क्रियापदाच्या रूपावरून आज्ञा करणें, इच्छा दाखविणें, आज्ञा मागणें, अनुमति मागणें, आशीर्वाद देणें, उपदेश करणें, प्रार्थना करणें, विनंती करणें इत्यादींचा बोध होतो, तेव्हा त्या क्रियापदाचा **आज्ञार्थ** आहे असें म्हणतात.

जेव्हा क्रियापदाच्या रूपावरून कर्तव्य, शक्यता, इच्छा, उपदेश इत्यादि अर्थ लक्षांत येतात तेव्हा त्या क्रियापदाचा **विध्यर्थ** आहे असें म्हणतात. विध्यर्थांत क्रियापदाच्या रूपावरून जे अर्थ सुचविले जातात त्यांत ' कर्तव्य ' ह्या अर्थाला प्राधान्य आहे. कर्तव्याला ' विधि ' असा शब्द योजून कर्तव्याचा अर्थ दाखविणाऱ्या क्रियापदरूपाला ' विध्यर्थी ' रूपें अशी संज्ञा देतात.

जेव्हा क्रियापदाच्या रूपावरून अमूक केलें असतें तर अमूक झालें असतें, असा संकेताचा अर्थ निघतो तेव्हा त्या क्रियापदाचा **संकेतार्थ** होतो.

आम्ही घरीं **जाऊं** का ? (आज्ञार्थ)

पाऊस वेळेवर **पडो**. (आज्ञार्थ)

शाळेंत रोज वेळेवर **जावें**. (विध्यर्थ)

आज तो मुंबईहून **यावा**. (विध्यर्थ)

जर तो उद्योग **करता** तर तो पोट **भरता**. (संकेतार्थ)

जर तूं त्या वेळीं हें **बोलतास** तर दोषी **ठरतास**. (संकेतार्थ)

क्रियापदाच्या रूपावरून आज्ञार्थ, विध्यर्थ, संकेतार्थ ह्यांपैकी कोणत्याच अर्थाचा बोध होत नाही म्हणजेच आज्ञा, इच्छा, कर्तव्य, संकेत इत्यादि अर्थांचा बोध न होतां फक्त क्रियेचा मूळ अर्थच समजतो, त्या वेळीं त्याला **स्वार्थ** म्हणतात. क्रियापदाच्या काळांचीं सर्व रूपें **स्वार्थी** म्हणावयाचीं.

म्हणजे तीन प्रधान काळ व तीन अर्थ अशीं क्रियापदाचीं सहा प्रकारचीं रूपें होतात. ह्यांतील प्रत्येक रूप तीन लिंगें, दोन वचनें व तीन पुरुष ह्यांप्रमाणे बदलतें. तीन काळ व तीन अर्थ ह्यांचीं रूपें बनवतांना धातूला प्रत्यय लागतात. काळाचीं व अर्थाचीं रूपें बनवतांना धातला जे प्रत्यय लागतात, ते पुढे दिले आहेत—

वर्तमानकाळाचे प्रत्यय

पुरुष	एकवचन			अनेकवचन		
	पुल्लिंग	स्त्रीलिंग	नपुंसकलिंग	पुल्लिंग	स्त्रीलिंग	नपुंसकलिंग
प्रथम पुरुष	तों	तें	तें	तों	तों	तों
द्वितीय पुरुष	तोस	तेस, तीस	तेंस	तां	तां	तां
तृतीय पुरुष	तो	ते	तें	तात	तात	तात

भूतकाळाचे प्रत्यय

पुरुष	एकवचन			अनेकवचन		
	पुल्लिंग	स्त्रीलिंग	नपुंसकलिंग	पुल्लिंग	स्त्रीलिंग	नपुंसकलिंग
प्रथम पुरुष	लों	लों	लें	लों	लों	लों
द्वितीय पुरुष	लास	लीस	लेंस	लां,लांत	लां, लांत	लां, लांत
तृतीय पुरुष	ला	ली	लें	ले	ल्या	लीं

भविष्यकाळाचे प्रत्यय (तिन्ही लिंगीं)

पुरुष	एकवचन		अनेकवचन	
	अकर्म	सकर्मक	अकर्मक	सकर्मक
प्रथम पुरुष	एन	ईन	ऊं	ऊं
द्वितीय पुरुष	शील	शील	आल	आल
तृतीय पुरुष	एल	ईल	तील	तील

आहे

वर्तमानकाळाचे प्रत्यय लावतांना पुढील नियम लक्षांत ठेवावेत

(१) अकर्मक धातूंना हे प्रत्यय जसेच्या तसे लागतात.

(२) सकर्मक धातूंना हे प्रत्यय लागतांना प्रत्ययाच्या अगोदर 'इ' अक्षर विकल्पेकरून येतें. जसे करतो, करितो; धरतो, धरितो. पण कांही सकर्मक धातु असे आहेत कीं, त्यांना 'इ' हा आगम मुळीच होत नाही. समजतो, चावतो, चुकतो, खेळतो. (दोन वर्णांमध्ये दोन्ही वर्णांव्यतिरिक्त तिसराच वर्ण येणें ह्याला आगम होणें असें म्हणतात.)

(३) एकाक्षरी धातूंना मग ते सकर्मक असोत किंवा अकर्मक असोत, हे प्रत्यय लागण्यापूर्वी 'इ' हा आगम होत नाही. जातो, येतो, देतो.

(४) एकाक्षरी धातु ईकारान्त किंवा ऊकारान्त असल्यास हे प्रत्यय लागण्यापूर्वी अन्त्य स्वर ह्रस्व होतो. धू–धुतो, पी–पितो.

(५) धातूच्या उपान्तीं ई किंवा ऊ हे स्वर असले, तर हे प्रत्यय लागतांना ते ह्रस्व होतात. शीक–शिकतो, बूड–बुडतो.

भूतकाळाचे प्रत्यय लावतांना पुढील नियम लक्षांत ठेवावेत—

(१) अकर्मक धातूंना हे प्रत्यय जसेच्या तसे लागतात.

(२) सकर्मक धातूंना हे प्रत्यय लागतांना 'इ' हा आगम विकल्पेकरून होतो. धरलास, धरिलास. कांही थोडे सकर्मक धातु असे आहेत कीं, त्यांचीं रूपें होतांना 'इ' हा आगम होत नाही. उमज, खेळ, चढ, पाव, बोल, विसर, समज, चूक, झोप, लढ इत्यादि.

(३) एकाक्षरी ईकारान्त धातूंना अन्त्य 'ई' च्या जागीं 'या' असा आदेश होतो. पी–प्या–प्यालों. वी–व्या–व्याली. भी–भ्या–भ्यालों.

(४) धातूच्या उपान्तीं ई किंवा ऊ हे स्वर असले तर हे प्रत्यय लागतांना ते ऱ्हस्व होतात. शीक–शिकला, बूड–बुडाला.

(५) कांही धातूंना भूतकाळाचे प्रत्यय लागतांना त्या धातूंच्या रूपांत बदल होतो. असे कांही धातु पुढे दिले आहेत. धातूच्या ज्या बदललेल्या रूपाला भूतकाळीं प्रत्यय लावावयाचे तें रूप जाड टाइपांत दिलें आहे.

पळ–**पळा**–पळाला.	घे–**घेत**–घेतला.
धू–**धुत**–धुतला.	बघ–**बघित**–बघितला.
घाल–**घात**–घातला.	दे–**दि**–दिला.
मर–**मे**–मेला.	हो–**झा**–झाला.
माग–**मागित**–मागितला.	सांग–**सांगित**–सांगितला.
कर–**के**–केलें.	ये–**आ**–आला.
जा–**गे**–गेला.	म्हण–**म्हणा**–म्हणाला. (कर्तरि)
नीघ–**निघा**–निघाला.	म्हण–**म्हट**–म्हटलें (कर्मणि)

भविष्यकाळाचे प्रत्यय लावतांना पुढील नियम लक्षांत ठेवावेतः—

(१) एकाक्षरी धातूंना ते सकर्मक असोत किंवा अकर्मक असोत प्रथमपुरुषी एकवचनी ईन व तृतीयपुरुषी एकवचनी ईल हे प्रत्यय लागतात. नेईन, नेईल. येईन, येईल. जाईन, जाईल.

(२) शील व तील हे प्रत्यय लागतांना विकल्पेकरून इ हा आगम होतो. टाकशील–टाकिशील; टाकतील–टाकितील.

(३) उमज, खेळ, पाव, लढ, चूक इत्यादि धातूंना इ हा आगम होत नाहीं. ह्या धातूंना प्रथमपुरुषी व तृतीयपुरुषी एकवचनी अकर्मक प्रत्ययच लागतात. उमजेन–उमजेल; खेळेन–खेळेल.

आज्ञार्थाचे प्रत्यय (तिन्ही लिंगीं समान)

पुरुष	एकवचन	अनेकवचन
प्रथम पु.	ऊं (?)	ऊं (?)
द्वितीय पु.	मूळ धातु जसाच्या तसा राहतो	आ
तृतीय पु.	ओ	ओत

(१) आज्ञार्थी प्रथमपुरुषी रूपांवरून आज्ञा मागणें हा अर्थ सूचित होतो. प्रथमपुरुषी प्रत्यय दिले आहेत, त्यांच्यापुढे प्रश्नचिन्ह दिलें आहे. प्रथम-पुरुषी प्रत्यय लागून आज्ञार्थाचें जें रूप सिद्ध होतें त्याचा वाक्यांत उपयोग करतांना त्यापुढे प्रश्नचिन्ह द्यावें. जर प्रश्नचिन्ह दिलें नाही तर तें रूप भविष्य-काळाच्या प्रथमपुरुषाच्या अनेकवचनाचें होईल.

त्या म्हणाल्या, " आम्ही भाकरी करूं." (भविष्यकाळ)
त्या म्हणाल्या, " आम्ही भाकरी करूं ?" (आज्ञार्थ)

(२) आज्ञार्थी द्वितीय पुरुषी रूपांवरून आज्ञा करणें हा अर्थ सूचित होतो. द्वितीय पुरुषी एकवचनी प्रत्यय नाही. धातूचें मूळ रूप राहतें. तूं जा, तूं ये, तूं कर, तूं धू, तूं जेव. ह्यास लिह् धातु अपवाद आहे. लिह् धातूचें द्वि. पु. ए. व. आज्ञार्थी रूप लिही असें होतें. पाह्, राह् ह्या धातूंचीं द्वि. पु. ए. व. आज्ञार्थी रूपें अनुक्रमें पाहा, राहा अशीं होतात.

(३) आज्ञार्थी तृतीयपुरुषी रूपांवरून इच्छा दर्शविणें हा अर्थ सूचित होतो. तृतीयपुरुषी प्रत्यय एकाक्षरी धातूंस लागतांना प्रत्ययापूर्वी 'व' हा आगम होतो. धुवो–धुवोत, देवो–देवोत, येवो–येवोत, जावो–जावोत.

विध्यर्थाचे प्रत्यय

पुरुष	एकवचन			अनेकवचन		
	पु.	स्त्री.	नपुं.	पु.	स्त्री.	नपुं.
प्रथम	आवा	आवी	आवें	आवे	आव्या	आवीं
द्वितीय	आवास	आवीस	आवेंस	आवेत	आव्यात	आवींत
तृतीय	आवा	आवी	आवें	आवे	आव्या	आवीं

हे प्रत्यय लागतांना पररूप संधि होतो. हे प्रत्यय एकाक्षरी धातूंस लागतांना 'आवा' बद्दल यावा व वावा हे प्रत्यय लागतात. द्यावा, व्हावा,

संकेतार्थाचे प्रत्यय

पुरुष	एकवचन			अनेकवचन		
	पु.	स्त्री.	नपुं.	पु.	स्त्री.	नपुं.
प्रथम	तों	तें	तें	तों	तों	तों
द्वितीय	तास	तीस	तेंस	तां	तां	तां
तृतीय	ता	ती	तें	ते	त्या	तीं

हे संकेतार्थीं प्रत्यय लागून झालेलीं क्रियापदाचीं विशिष्ट रूपें वाक्यांत असतील तरच तो संकेतार्थ सांगावा व क्रियापद संकेतार्थी आहे असें म्हणावें. संकेतार्थ असतांना वाक्यांत जर–तर, जरी–तरी, हीं संकेतबोधक उभयान्वयी अव्ययें येतात. पण ज्या ज्या वाक्यांत हीं अव्ययें येतात त्या त्या वाक्यांतील क्रियापदें संकेतार्थीं असतातच असें नाही. 'जर तो औषध घेईल तर बरा होईल.' ह्या वाक्यांत संकेताचा अर्थ आहे पण तो अर्थ केवळ संकेत-बोधक अव्ययांनी साधलेला आहे; वाक्यांतील क्रियापदाच्या रूपाने साधलेला नाही; कारण येथे क्रियापदरूपें हीं भविष्यकाळीं स्वार्थीं आहेत, संकेतार्थीं नाहीत. "जर तो औषध घेता तर बरा होता." ह्या वाक्यांतील क्रियापदांचीं रूपें संकेतार्थीं आहेत व वाक्यांत संकेताचा अर्थ होण्यास ह्या क्रियापदरूपांचें साहाय्य झालेलें आहे. ज्या वाक्यांत क्रियापदाचीं संकेतार्थीं रूपें असतात त्या वाक्यांतील संकेताचा अर्थहि भिन्न असतो. "जर तो औषध घेता, तर बरा होता" हें संकेतार्थीं क्रियापदरूपें असलेलें वाक्य कानीं पडतांच, "त्याने औषध घेतलें नाही म्हणून तो बरा झाला नाही," असा भूतकाळीं प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टीच्या विरुद्ध गोष्टीचा बोध होतो. असा बोध ज्या वाक्यांत फक्त 'जर–तर' हीं संकेतबोधक अव्ययें आलीं आहेत त्या वाक्यावरून होत नाही. ज्या वाक्यांत 'जर–तर' इत्यादि संकेतबोधक अव्ययें आलीं आहेत पण क्रियापदाचीं रूपें वरील संकेतार्थाचे प्रत्यय लागून बनलेलीं नाहीत त्या वाक्याची रचना 'संकेत-दर्शक' आहे असें म्हणतां येईल.

संयुक्तकाळ—कांही विशिष्ट संयुक्त क्रियापदांवरून तिन्ही काळीं

क्रियेची अपूर्णता, पूर्णता, रीति व उद्देश हीं समजतात व ह्यांना अनुसरून प्रत्येक काळाचे चार पोट-प्रकार बनतात. हे काळाचे पोटप्रकार संयुक्त क्रियापदावरून होतात म्हणून त्यांना संयुक्त काळ असें म्हणतात.

(अ) अपूर्ण काळ—

(१) विद्यार्थी पुस्तक वाचीत आहे. अपूर्ण वर्तमानकाळ.
(२) विद्यार्थी पुस्तक वाचीत होता. अपूर्ण भूतकाळ.
(३) विद्यार्थी पुस्तक वाचीत असेल. अपूर्ण भविष्यकाळ.

ह्या तिन्ही वाक्यांत 'वाचीत' हें अपूर्ण क्रियाद्योतक कृदन्त आलेलें आहे व त्या कृदन्तावरून क्रियेची अपूर्णता निर्दिष्ट झाली आहे. कृदन्तापुढे 'अस' धातूचीं अनियमित व नियमित सहाय क्रियापदें आलीं आहेत. त्यावरून अनुक्रमें वर्तमान, भूत व भविष्य हा काळ दर्शविला आहे. अपूर्णकाळीं क्रियापदाचीं रूपें होतांना प्रथम अपूर्ण क्रियाद्योतक 'त' कृदन्त येतें व त्याच्या पुढे 'अस' धातूचीं वर्तमान, भूत, भविष्य ह्या काळाचीं अनियमित व नियमित रूपें येतात.

(ब) पूर्णकाळ—

(१) विद्यार्थ्याने पुस्तक वाचिलें आहे. पूर्ण वर्तमानकाळ.
(२) विद्यार्थ्याने पुस्तक वाचिलें होतें. पूर्णभूतकाळ.
(३) विद्यार्थ्याने पुस्तक वाचिलें असेल. पूर्ण भविष्यकाळ.

ह्या तिन्ही वाक्यांत 'वाचिलें' हें पूर्ण क्रियाद्योतक कृदन्त आलेलें आहे व कृदन्तावरून क्रियेची पूर्णता निर्दिष्ट झालेली आहे. कृदन्तापुढे 'अस' धातूचीं अनियमित व नियमित सहाय क्रियापदें आलीं आहेत. त्यावरून अनुक्रमें वर्तमान, भूत, भविष्य हा काळ दर्शविला आहे. पूर्णकाळीं क्रियापदाचीं रूपें होतांना प्रथम पूर्ण क्रियाद्योतक 'ला' कृदन्त येतें व त्याच्या पुढे अस धातूचीं वर्तमान, भूत, भविष्य ह्या काळाचीं अनियमित व नियमित रूपें येतात.

(क) रीतीकाळ—

(१) विद्यार्थी पुस्तक वाचीत असतो. रीतीवर्तमानकाळ.
(२) (अ) विद्यार्थी पुस्तक वाची.
(ब) विद्यार्थी पुस्तक वाचीत असे. } रीतिभूतकाळ.

(३) (अ) विद्यार्थी पुस्तक **वाचीत राहील.**
(ब) विद्यार्थी पुस्तक **वाचीत जाईल.** } रीतिभविष्यकाळ.

पहिल्या वाक्यांत **वाचीत** हें कृदन्त आहे व **असतो** हें सहाय क्रियापद आहे. **असतो** ह्या क्रियापदावरून वर्तमान काळाचा बोध होतो व 'कृदन्त व सहाय क्रियापद' मिळून झालेल्या संयुक्त क्रियापदावरून वाचण्याची रीत अगर वहिवाट दाखविली जाते.

रीतिभूतकाळ दोन प्रकारांनी झाला आहे. '**वाची**' हें एकेरी क्रियापद रीतिभूतकाळ दाखवितें व '**वाचीत असे**' हें संयुक्त क्रियापदहि रीतिभूतकाळ दाखवितें. '**वाची**' व '**असे**' हीं रूपें धातूपासून रीतिभूतकाळाचे प्रत्यय लावून बनलेलीं आहेत. रीतिभूतकाळाचे प्रत्यय पुढे दिले आहेत. ते तिन्ही लिंगीं समान आहेत.

पुरुष	एकवचन	अनेकवचन
प्रथम	ई (सकर्मक) एं (अकर्मक)	उं ओं
द्वितीय	स	आं आ
तृतीय	ई (सकर्मक) ए (अकर्मक)	त

हे प्रत्यय लावून धातूपासून रीतिभूत होतो.

(१) तुकाराम भजन **करी.** (२) लो. टिळक केसरींत अग्रलेख **लिहीत.** ह्या वाक्यांत **करी** व **लिहीत** हीं रीतिभूतकाळीं रूपें आहेत व तीं वरील तृतीयपुरुषी प्रत्यय लागून बनलेलीं आहेत. ह्या ठिकाणीं रीतिभूत '**करी**' व '**लिहीत**' ह्या एकेरी क्रियापदावरून दाखविला गेला आहे.

'**अस**' ह्या धातूला वरील रीतिभूतकाळाचे प्रत्यय लावून तीं रूपें '**त**' कृदन्तापुढे ठेवून संयुक्त क्रियापदें बनवून रीतिभूतकाळ करण्याचा दुसरा प्रकार आहे.

(१) तुकाराम भजन **करीत असे.** (१) लो. टिळक केसरींत अग्रलेख **लिहीत असत.**

(ड) उद्देश काळ—

(१) विद्यार्थी पुस्तक **वाचणार** आहे. उद्देश वर्तमानकाळ.

(२) विद्यार्थी पुस्तक **वाचणार** होता. उद्देश भूतकाळ.

(३) विद्यार्थी पुस्तक **वाचणार** असेल. उद्देश भविष्यकाळ.

वरील तिन्ही वाक्यांतील संयुक्त क्रियापदांत **वाचणार** हें कृदन्त आलें आहे व त्यावरून प्रत्येक वाक्यांतील कर्त्याच्या वाचण्याचा उद्देश कळतो व त्या कृदन्तापुढे 'अस' ह्या धातूचीं जीं अनियमित व नियमित क्रियापदें आलीं आहेत त्यावरून अनुक्रमें वर्तमान, भूत व भविष्य ह्या काळांचा बोध होत आहे. ह्यावरून उद्देश काळ बनवितांना 'णार' कृदन्तापुढे 'अस' ह्या धातूचीं काळाचीं अनिमित व नियमित रूपें ठेवावयाचीं हें समजून येईल.

संयुक्त क्रियापदांतील कृदन्ताने दाखविलेल्या क्रियेची अपूर्णता, पूर्णता, रीति आणि उद्देश व कृदन्तापुढे आलेल्या 'अस' ह्या धातूच्या तिन्ही काळीं आलेल्या रूपांवरून होणारे संयुक्त काळ म्हणजे काळाचे पोटप्रकार कसे होतात हें आपण पाहिलें. संयुक्तकाळ बनवितांना संयुक्त क्रियापदांत 'अस' ह्या सहाय धातूचीं अनियमित व नियमित रूपें आलीं आहेत असें वर दाखविलें आहे. 'अस' ह्या सहाय धातूच्या काळांच्या रूपांची योजना काळाच्या पोटप्रकारांतील क्रियापदरूपें बनविण्याकरिता करावी लागते म्हणून 'अस' धातूचीं काळाचीं रूपें कशीं बनतात तें खाली दाखविलें आहे. 'अस' धातूचीं काळाचीं रूपें कांही नियमित आहेत तर कांही अनियमित मानावीं लागतात.

मी हजर आहें. आम्ही हजर आहों. ह्या ठिकाणीं 'आहें' व 'आहों' ह्या क्रियापदांकडून कर्त्याची 'असण्याची' स्थिति दाखविली आहे हा वर्तमानकाळ आहे.

मी हजर होतों. आम्ही हजर होतों. ह्या ठिकाणीं 'होतों' ह्या भूतकाळीं क्रियापदाकडून कर्त्याची 'असण्याची' स्थिति दाखविली आहे.

'होतो' ह्याच रूपाची पुढील वाक्यांतील योजना पाहा.

'ह्या खेळांत आता मी म्होरक्या होतों' येथे 'होतों' हा भूतकाळ नाही, तो वर्तमानकाळ आहे व 'होतो' ह्या क्रियापदावरून 'असण्याच्या' स्थितीचा बोध होत नसून 'बनण्याच्या' क्रियेचा बोध होत आहे. "ह्या खेळांत मी म्होरक्या झालों." असें बनण्याच्या क्रियेचें निदर्शक भूतकाळीं रूप होईल. म्हणजे जेव्हा बनण्याची क्रिया निर्दिष्ट केलेली आहे तेव्हा होतो, झाला, होईल अशीं काळदर्शक रूपें होतात व त्यांतील धातू 'हो' म्हणजे 'बनणें' ह्या अर्थी आहे.

'मी हजर आहें,' 'मी हजर होतों.' ह्या ठिकाणीं आहें व होतों हीं असण्याची स्थिति निदर्शक क्रियापदरूपें कोणत्या धातूचीं हा वादग्रस्त प्रश्न आहे. कांही व्याकरणकार 'आहे' हें रूप 'आह' ह्या धातूचें मानतात. पण 'आहतो', 'आहला' अशीं रूपें भाषेमध्ये नाहीत.

'असणें' ह्या अर्थाने जेव्हा 'आहें' व 'होतों' हीं रूपें योजिलीं जातात, त्या ठिकाणीं तीं 'अस' ह्या धातूचीं अनियमित रूपें मानावींत हें युक्त दिसतें. 'अस' ह्या धातूचीं अनियमित रूपें अपूर्णकाळ, पूर्णकाळ व उद्देशकाळ ह्यांच्या संयुक्त क्रियापदांत योजिलीं जातात.

अस धातूची नियमित व अनियमित रूपें (तिन्ही काळांतील) खाली दिलीं आहेत—

धातु–अस–वर्तमानकाळ.

कंसांत दिलेलीं रूपें अनियमित आहेत. बाकीचीं नियमित आहेत.

	एकवचन	अनेकवचन
पु. स्त्री. न.	मी असतों (आहें)	आम्ही असतों (आहों, आहोंत)
पु.	तूं असतोस (आहेस)	तुम्ही असतां (आहां, आहांत)
स्त्री.	तूं असतीस (आहेस)	तुम्ही असतां (आहां, आहांत)
न.	तूं असतेंस (आहेस)	तुम्ही असतां (आहां, आहांत)
पु.	तो असतो	ते असतात
स्त्री.	ती असते (आहे)	त्या असतात (आहेत)
न.	तें असतें	तीं असतात

भूतकाळ

पु.	मी असलों (होतों)	आम्ही असलों (होतों)
स्त्री.	मी असल्यें–लें (होतें)	आम्ही असलों (होतों)
न.	मी असलें (होतें)	आम्ही असलों (होतों)

पु.	तूं असलास (होतास)	तुम्ही असलां–लांत (होतां)
स्त्री.	तूं असलीस (होतीस)	तुम्ही असल्यांत (होतां)
न.	तूं असलेंस (होतेंस)	तुम्ही असलां–लांत (होतां)
पु.	तो असला (होता)	ते असले (होते)
स्त्री.	ती असली (होती)	त्या असल्या (होत्या)
न.	तें असलें (होतें)	तीं असलीं (होतीं)

भविष्यकाळ

पु. स्त्री. न.	मी असेन	आम्ही असूं
पु. स्त्री. न.	तूं असशील	तुम्ही असाल
पु. स्त्री. न.	तो, ती, तें } असेल	ते, त्या, तीं } असतील

करणरूप व अकरणरूप—जेव्हा क्रियापदाने पूर्ण केलेलें विधान होकारार्थी आहे असें समजतें तेव्हा त्या क्रियापदाच्या रूपाला **करणरूप** म्हणतात व जेव्हा **नकारार्थी** असतें तेव्हा त्यास **अकरणरूप** म्हणतात. संतांनी समतेचा उपदेश केला.'—करणरूप. 'परमेश्वराच्या दरबारांत संतांनी जातिभेद मानिला नाही.–अकरणरूप. क्रियापदाचें अकरणरूप 'न, ना, नाही, नये, नको' ह्यांच्या साहाय्याने होतें. **नको** हें क्रियापद आज्ञार्थी द्वितीय पुरुषी व प्रथमपुरुषी अकरणरूप करतांना सहाय क्रियापद म्हणून वापरतात. 'तूं जा–तूं जाऊं नकोस.' विध्यर्थी अकरण रूप करतांना 'नये' हें सहाय क्रियापद योजितात. 'त्याने बसावें–त्याने बसूं नये.' वर्तमानकाळीं व भूतकाळीं अकरण-रूप करतांना 'नस' धातूचीं नियमित व अनियमित रूपें योजितात. 'तो जातो–तो जात नाही.' 'तो गेला–तो गेला नव्हता.'

प्रयोग—'प्रयोग' हा विषय वाक्यरचनेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. प्रत्येक वाक्य क्रियापदाने पुरें होतें. वाक्यांत क्रियापदाचीं काळाचीं अगर अर्थाचीं रूपें योजून बोलणारा आपलें विधान पूर्ण करतो. क्रियापदाचीं हीं काळाचीं व अर्थांचीं रूपें तिन्ही पुरुषीं व तिन्ही लिंगीं प्रत्यय लावून कशीं बनतात हें आपण पाहिलें. पण त्यांची योजना वाक्यांत करतांना प्रयोगाचें ज्ञान आवश्यक आहे. वाक्यांत शब्द विशिष्ट क्रमाने येतात व परस्परांशीं

संबंधित असतात. वाक्यांत अर्थ उत्पन्न होईल ह्या हेतूने शब्दांचें संबंध परस्परांशीं जुळविण्याचें काम प्रामुख्याने प्रत्ययांकडून होतें. कांही ठिकाणीं शब्दयोगी अव्ययांनी होतें तर कांही ठिकाणीं त्या शब्दांचा वाक्यांतील जो क्रम त्या क्रमाने होतें. वाक्यांतील रचना मुख्यतः ज्यांच्या आधाराने होते ते वाक्याचे घटक म्हणजे कर्ता, कर्म आणि क्रियापद हे होत. ह्या प्रधान घटकांची माहिती आपण मिळविली आहे. क्रियापद हा विकारी शब्द आहे. क्रियापदाचें लिंग, वचन, पुरुष हीं कशीं ठरतात? क्रियापद हा जो वाक्यांतील मुख्य घटक त्या घटकाचें लिंग, वचन व पुरुष हीं कांही रचनेंत कर्त्याला अनुसरणारीं असतात; कांही रचनेंत कर्माला अनुसरणारीं असतात तर कांही वेळीं तीं स्वतंत्र असतात म्हणजे कर्त्याला किंवा कर्माला अनुसरणारीं नसतात.

'लिंग, वचन व पुरुष' ह्या बाबतींत क्रियापदाची कर्त्याप्रमाणे किंवा कर्माप्रमाणे किंवा स्वतंत्र अशी जी योजना तिला प्रयोग असें म्हणतात.

वाक्यरचनेच्या दृष्टीने तीन प्रधान प्रयोग होतात—(१) कर्तरि-प्रयोग, (२) कर्मणि प्रयोग, (३) भावे प्रयोग.

कर्त्याच्या लिंग-वचन-पुरुषाप्रमाणे क्रियापदाची जी योजना तिला कर्तरिप्रयोग म्हणतात. 'घोडा लाथ मारतो.' येथे 'मारतो' ह्या क्रियापदाचें लिंग, वचन व पुरुष हीं कर्त्याचें लिंग, वचन व पुरुष ह्यांना अनुसरणारीं आहेत. कर्त्याचें लिंग-वचन-पुरुष हीं बदललीं तर क्रियापदांतहि बदल होतो. 'घोडी लाथ मारते.' 'घोडें लाथ मारतें.' 'तूं पत्र वाच' हा कर्तरिप्रयोग 'तूं' ह्याच्याऐवजी 'तुम्ही' हें अनेकवचन घातलें तर क्रियापदाचें रूप बदलावें लागतें. 'तुम्ही पत्र वाचा.' सकर्मक क्रियापदावरून होणाऱ्या कर्तरिप्रयोगास सकर्मक कर्तरिप्रयोग म्हणतात व अकर्मक क्रियापदावरून होणाऱ्या कर्तरि-प्रयोगास अकर्मक कर्तरिप्रयोग म्हणतात.

कर्माच्या लिंग-वचन-पुरुषाप्रमाणे क्रियापदाची जी योजना तिला कर्मणिप्रयोग म्हणतात. 'भगवान् श्रीकृष्णांनी गीता सांगितली.' येथे 'सांगितली' हें क्रियापद 'गीता' ह्या वाक्यांतील कर्माला अनुसरीत आहे. 'गीता' स्त्रीलिंग, एकवचन, तृतीय पुरुष, 'सांगितली' स्त्रीलिंग, एकवचन व तृतीय पुरुष. जर ह्या वाक्यांतील कर्माचें लिंग, वचन, पुरुष ह्यांपैकी कोणत्यांतहि बदल केला तर क्रियापदाच्या रूपांतहि बदल होतो. 'भगवान् श्रीकृष्णांनी कर्मयोग सांगितला.' 'स्त्रीलिंगी' कर्माच्या ऐवजी 'पुल्लिंगी कर्म घातल्याबरोबर क्रियापदाचें रूप 'पुल्लिंगी' करावें लागलें.

जेव्हा क्रियापदाची योजना स्वतंत्र असते, म्हणजे त्याचें रूप नित्य नपुंसकलिंगी, एकवचनी व तृतीयपुरुषी असतें तेव्हा त्या योजनेस **भावेप्रयोग** म्हणतात. 'गुरुजींनी माल्हस बोलाविलें,' ह्या वाक्यांत **गुरुजींनी** हा कर्ता पुल्लिंगी, तृतीयपुरुषी व आदरार्थी बहुवचनी आहे. **माल्हस** हें कर्म स्त्रीलिंगी, तृतीयपुरुषी व एकवचनी आहे. '**बोलाविलें**' हें क्रियापद आहे. 'यमूने माल्हस बोलाविलें', 'मीं माल्हस बोलाविलें', 'यमूने बाबांस बोलाविलें', 'यमूने तुला बोलाविलें.' कर्त्याचें लिंग-वचन-पुरुष हीं बदललीं, त्याचप्रमाणे कर्माचें लिंग-वचन-पुरुष हीं बदललीं तरी क्रियापदरूपांत बदल झाला नाही. 'बोलाविलें' हें क्रियापदरूप तृतीयपुरुषी, एकवचनी व नपुंसकलिंगी आहे व वरील वाक्यांत तें कर्त्याला किंवा कर्माला अनुसरीत नाही. कर्तरिप्रयोगाप्रमाणे भावेप्रयोगाचेहि **सकर्मक भावे** व **अकर्मक भावे** असे दोन प्रकार होतात. 'यमूने बाबास बोलाविलें' हा सकर्मक भावेप्रयोग. 'मुलांनी जावें' हा अकर्मक भावेप्रयोग आहे.

भावकर्तृक क्रियापदें म्हणजे काय हें आपण पाहिलें. भावकर्तृक क्रियापदांचा प्रयोग **भावकर्तरिप्रयोग** सांगावयाचा. भावेप्रयोगाप्रमाणे भावकर्तरि प्रयोगांत क्रियापदाचें रूप नित्य नपुंसकलिंगी, तृतीयपुरुषी व एकवचनी असतें. 'शेतांतून परत येतांना त्याला सांजावलें, तिला सांजावलें, तुला सांजावलें, तुम्हांला सांजावलें, त्यांना सांजावलें.' भावकर्तृक क्रियापदें हीं क्रियापदें अकर्मक आहेत.

कांही वाक्यरचनेंत मूळ वाक्यांतील जें कर्मपद असतें त्या कर्मपदाला मूळ वाक्याच्या रूपांतरित वाक्यांत कर्तृपदाचें स्वरूप येतें, त्या वेळीं तेथे **कर्मकर्तरिप्रयोग** होतो. 'डाकवाल्याने पत्र टाकलें' ह्या ठिकाणीं कर्मणिप्रयोग आहे व 'पत्र' हें कर्म आहे. 'डाकवाल्याकडून पत्र टाकलें गेलें' टाकलें जाणारें कोण? 'पत्र'. म्हणजे ह्या रूपांतरित वाक्यांत मूळ 'पत्र' ह्या कर्मपदाला कर्तृपदाचें स्वरूप प्राप्त झालें. 'डाकवाल्याकडून पत्र टाकिलें गेलें,' हा कर्मकर्तरिप्रयोग झाला. कर्मकर्तरिप्रयोग 'जा' ह्या धातूच्या साहाय्याने सिद्ध होतो. 'टाकिलें गेलें' हें संयुक्त क्रियापद आहे.

निरनिराळ्या प्रयोगांत कर्ता व कर्म ह्यांच्या विभक्ति कोणत्या असतात तें लक्षांत ठेवून त्या त्या प्रयोगीं कर्ता व कर्म ह्यांचीं योग्य विभक्तिरूपें घालून वाक्यरचना करावी लागते. ह्यासंबंधी महत्त्वाचे नियम पुढे दिले आहेत :–

(१) कर्तरिप्रयोगांत कर्ता नेहमी प्रथमा विभक्तीचा असतो व कर्म असल्यास त्याची विभक्ति (प्रत्यय लागलेली अथवा न लागलेली) द्वितीया असते. 'वसंता पत्र वाचतो', 'गुराखी गाईस बांधतो'.

...3822... ...7eeX... ...22/3/6...

(२) कर्मणिप्रयोगांत कर्ता तृतीयेचा किंवा चतुर्थीचा असतो व कर्म नेहमी प्रथमेचें असतें. 'गोविंदरावांनी हाक मारिली', 'गोविंदरावांना हाक मारवते.'

(३) भावे प्रयोगांत कर्ता तृतीयेचा किंवा चतुर्थीचा असतो व कर्म असल्यास तें सप्रत्यय द्वितीयेचें असतें. 'गुरूने शिष्याला बोलाविलें.' 'वसंताला पोहतां येतें.'

कर्माचें द्वितीयेचें अप्रत्यय रूप केव्हा होतें व सप्रत्यय रूप केव्हा होतें, ह्यासंबंधीचे कांही नियम पुढे दिले आहेत.

(१) निर्जीव पदार्थवाचक नाम अथवा त्याचें सर्वनाम कर्माच्या जागीं असतां त्याचें अप्रत्यय रूप होतें. 'साळी लुगडें विणतो व तें विकतो.'

(२) विशेषनाम किंवा त्याचें सर्वनाम कर्माच्या जागीं असतां त्याचें सप्रत्यय रूप होतें. 'गुरुजींनी हरीला बोलाविलें व त्याला घरीं पाठविलें.'

(३) मनुष्यवाचक सामान्यनाम व इतर प्राणिवाचक नाम अथवा त्याचें सर्वनाम कर्माच्या जागीं असतां कर्माचीं विकल्पाने दोन्हीं रूपें होतात. 'त्याने जेवावयास ब्राह्मण बोलाविला किंवा ब्राह्मणास बोलाविलें.' 'गुराखी गाई (गाईंना) हाकतो व त्या (त्यांना) रानांत नेतो.'

(४) 'मी' व 'तूं' हीं सर्वनामें कोणत्याहि प्रकारच्या नामाबद्दल कर्माच्या जागीं आलीं, तर त्यांचें द्वितीयेचें सप्रत्यय रूप होतें.

संयुक्त क्रियापदाचा काळ, अर्थ व प्रयोग हीं सहाय क्रियापदावरून ठरवतात. (१) 'तो आपलें पुस्तक वाचून टाकतो.' वर्तमान काळ, कर्तरि प्रयोग. (२) 'त्याने आपलें पुस्तक वाचून टाकलें.' भूतकाळ, कर्मणिप्रयोग. क्रियापदाचें लिंग, वचन व पुरुष ह्यांचा बोध सहाय धातूच्या रूपावरून मिळतो. (३) 'तूं आपलें पुस्तक वाचून टाकतोस'— वर्तमानकाळ, पुल्लिंगी, द्वितीय पुरुष, एकवचन, कर्तरि प्रयोग. (४) 'तूं आपलें पुस्तक वाचून टाकतेस' वर्तमानकाळ, स्त्रीलिंगी, द्वितीय पुरुष, एकवचन, कर्तरि प्रयोग. (५) 'गारुड्याने आपल्या सापास मारून टाकिलें.' भावे प्रयोग, भूतकाळ, नपुंसकलिंगी तृतीय पुरुषी एकवचनी.

अभ्यास

१. पुढील वाक्यांतील क्रियापदें सांगून त्यांचे काळ सांगा :—

(१) नारिंगी पतंग मोठमोठे हेलकावे घेत खाली गेला व गर्वाने छाती काढून राक्षसकाय पतंग पुन्हा वर चढला.

(२) आज साऱ्यांनी मिळून पांचशे रुपयांचा चुराडा उडवला आणि माझ्यासारखें एखादें चालतें-बोलतें मनुष्य मरूं लागलें, तर हे वर्गणी गोळा करतात का ?

(३) लोकांना आज ज्या गोष्टी प्रिय आहेत, त्या ह्या हतभाग्य लेखकाला पसंत नसल्यामुळे लोकछंदानुवर्तित्व त्याला अशक्य झालें आहे.

(४) धर्म, राज्य व समाज ह्यांसंबंधाने कांही सिद्धान्त सर्वमान्य होऊन बसले आहेत.

(५) त्यांना घरांतल्या कुरबुरीची हकीगत मोलकरणीकडून कळली होती.

(६) जगांत मुद्दाम लपून बसलेल्या शक्ति माणसाची उगीचच खोडी काढीत असतात.

(७) स्वराज्यांत शिक्षणक्षेत्रांत क्रांतिकारक बदल होत आहेत.

(८) त्या काळांत सर्व मंडळी महायुद्धाच्या भीतिदायक बातम्या सकाळीं वर्तमानपत्रांतून वाचीत असत.

(९) आज हा समाज ज्या विचारांवर टीका करीत आहे, त्याच विचारांना भविष्यकाळीं तो डोक्यावर घेऊन नाचत राहील.

(१०) नानासाहेब पेशवे ह्यांच्या कारकीर्दीत पेशव्यांचें राज्य अत्युच्च शिखरास जाऊन पोहोचलें होतें.

२. पुढील उताऱ्यांतील क्रियापदें सांगून त्यांचे अर्थ सांगा :—

(१) महाराष्ट्राच्या महाराजाला या कमनशीब मराठ्याचा राम-राम सांगा.

(२) हेचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ।

(३) आपण थांबतां तर आपल्यासहि प्रसाद मिळता.

(४) सुसंगति सदा घडो सुजनवाक्य कानीं पडो ।

(५) घेई घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ।

(६) परोपकारीं तव देह लागो ।

३. खालील धातूंचीं कंसांत दर्शविलेलीं रूपें लिहा :—

ये (सर्व पुरुषीं वर्तमान, भूत व भविष्यकाळीं).

पी (आज्ञार्थी, सर्व पुरुषीं)

मार (विध्यर्थी, सर्व पुरुषीं).

बस (संकेतार्थी, सर्व पुरुषीं)

४. खालील व्यक्तींबद्दल रीतिभूतकाळीं विधान करणारें प्रत्येकीं एकेक वाक्य लिहा :—

(१) तुकाराम, (२) शिवाजीमहाराज, (३) अहल्याबाई.

५. पुढील धातूंवरून त्यांच्यापुढे दिलेल्या काळाचीं रूपें बनवून दाखवा :—

पळ (तृ. पु. पुल्लिंगी एकवचन, पूर्णभूत).

धाव (प्र. पु. पुल्लिंगी अनेकवचन, अपूर्ण वर्तमान).

लिह (द्वि. पु. स्त्रीलिंगी एकवचन, पूर्ण वर्तमान).

फाड (तृ. पु. नपुंसगलिंगी एकवचन, उद्देशभूत).

६. पुढील वाक्यांतील प्रयोग सांगा :—

(१) शिवाजी महाराजांनी मराठ्यांचें राज्य स्थापिलें.

(२) शहाजी राजांचा आजा आबाजी पाटील खांद्यावर आसूड घेऊन नांगर हांकीत होता.

(३) कुत्र्याच्याने मांजरास धरवतें.

(४) कारकुनाकडून पगार वांटला गेला.

(५) ढेकणांनी आम्हांला सताविलें.

(६) कांचन भटांनी अखेर म्हाताऱ्याला मुलगी दिली. एका अर्थी त्यांनी मुलीला विकलें.

७. प्रयोग किती आहेत तें सांगून प्रत्येक प्रकार कसा ओळखावयाचा तें स्पष्ट करा.

८. विधानपूरक किंवा विधेयपूरक म्हणजे काय तें सोदाहरण स्पष्ट करा.

९. 'संयुक्त क्रियापद' केव्हा होतें व तें कां मानावें लागतें तें स्पष्ट करा.

१०. खालील धातूंवरून शक्य क्रियापदें बनवा व त्यांचा वाक्यांत उपयोग करा :— पी, खा, पाह.

११. भावकर्तृक क्रियापदाची व्याख्या सांगा व एका भावकर्तृक क्रियापदाचा वाक्यांत उपयोग करून दाखवा.

---

९. अव्ययें

अव्ययांचें वर्गीकरण

आपल्या मनांतील अर्थ पूर्ण स्पष्ट होईल अशा तऱ्हेने शब्दांची विशिष्ट क्रमाने वाक्यांत जुळणी केलेली असते. वाक्यांतील शब्दांचा क्रम व परस्पर-संबंध साधला तर वाक्यांतून अर्थबोध होतो. शब्दांचें मूळ रूप अगर शब्दांचीं निरनिराळीं विशिष्ट रूपें क्रमाने योजून त्यांचा एकमेकांशीं संबंध जोडला गेला असेल तरच तें वाक्य होतें. वाक्यामध्ये जे शब्द येतात व निरनिराळें कार्य करून वाक्याला अर्थ प्राप्त करून देतात अशा शब्दांचे व्याकरणकारांनी दोन गट केले आहेत. कांही शब्दांचा वाक्यांत उपयोग होतांना त्या शब्दांना लिंग, वचन, पुरुष, विभक्ति, काळ, अर्थ इत्यादींमुळे त्यांच्या मूळ रूपांत बदल होऊन त्यांची योजना होते. रूपांत बदल होऊन वाक्यांत योजिल्या जाणाऱ्या शब्दांना **विकारी** अगर **सव्यय** शब्द म्हणतात. ह्यांपैकी नामें, सर्वनामें, विशेषणें, क्रियापदें, ह्या विकारी शब्दांचा आपण अभ्यास केला. शब्दांचा दुसरा गट म्हणजे **अविकारी शब्द** अगर **अव्ययें**. वाक्यांत उपयोग करतांना ज्यांचें मूळ रूप नेहमी कायम राहतें व ज्यांना लिंग, वचन, पुरुष, विभक्ति इत्यादींमुळे विकार होत नाहीत ते सर्व अविकारी शब्द अगर अव्ययें होत. 'अव्यय' हें वाक्यांत नेहमी मूळ रूपांतच योजिलें जातें. ह्या अव्ययांचा आता विचार करावयाचा आहे.

वाक्यांत ज्या कार्याकरिता अव्ययांचा उपयोग केला जातो त्या कार्यावरून अव्ययांच्या चार जाति किंवा प्रकार होतात. ते असे–(१) क्रिया-विशेषण अव्ययें. (२) शब्दयोगी अव्ययें. (३) उभयान्वयी अव्ययें. (४) केवलप्रयोगी अव्ययें.

अव्ययांच्या ह्या चार जातींचें क्रमशः विवेचन करूं.

(१) क्रियाविशेषण अव्ययें व त्यांचे प्रकार.

जीं अव्ययें क्रियेचें स्थल, काल, रीति, परिमाण इत्यादि कोणत्याहि प्रकारची विशेष माहिती देण्याचें कार्य वाक्यांत करतात तीं क्रियाविशेषण अव्ययें होत.

कांही विशेषणांकडून क्रियेसंबंधी विशेष माहिती सांगण्याचें कार्य कसें होतें हें आपण पूर्वी पाहिलें आहे व विशेषणाच्या वर्गीकरणांत 'क्रियाविशेषण'

हा एक प्रकार मानला आहे. क्रियाविशेषणाला लिंग, वचन हीं असतात व त्याप्रमाणे त्यांचें रूप बदलतें. तसें क्रियाविशेषण अव्ययांचें नाही. पाया कच्चा भरला. कांही माणसें तिरपें पाहतात. भक्तासाठी विठ्ठल विटेवर उभा राहिला. ह्या ठिकाणीं जाड टाइपांतील शब्द क्रियाविशेषणें आहेत. क्रियाविशेषणें व क्रियाविशेषण अव्ययें ह्यांच्यामधील साम्य व भेद लक्षांत ठेवावा.

क्रियाविशेषण अव्ययें क्रियापदांतील क्रियेसंबंधीं स्थळ, काळ, रीत, परिमाण ह्यांबाबत माहिती देतात. त्याचप्रमाणे मूळ विधानार्थक वाक्य प्रश्नार्थक करण्याचें किंवा मूळ वाक्यांतील क्रियेचा निषेध दाखविण्याचें कार्य करतात. ह्या त्यांच्या कार्यावरून क्रियाविशेषण अव्ययांचे एकूण सहा प्रकार पडतात.

(१) जीं क्रियाविशेषण अव्ययें क्रिया घडण्याचें स्थळ अगर ठिकाण दाखवितात तीं **स्थलवाचक क्रियाविशेषण** अव्ययें होत.

(२) जीं क्रियाविशेषण अव्ययें क्रिया घडण्याची वेळ अगर काल दाखवितात, तीं **कालवाचक क्रियाविशेषण** अव्ययें होत.

(३) जीं क्रियाविशेषण अव्ययें क्रिया घडण्याची **रीत** म्हणजे क्रिया कशी घडली हें दाखवितात, तीं **रीतिवाचक क्रियाविशेषण** अव्ययें होत.

(४) जीं क्रियाविशेषण अव्ययें क्रियेचें परिमाण दाखवितात, तीं **परिमाणवाचक क्रियाविशेषण** अव्ययें होत.

(५) जीं क्रियाविशेषण अव्ययें वाक्यांना प्रश्नार्थक स्वरूप देण्याचें कार्य करतात तीं **प्रश्नार्थक क्रियाविशेषण** अव्ययें होत.

(६) ज्या क्रियाविशेषण अव्ययांमुळे वाक्यांतील क्रियेचा निषेध दाखविला जातो तीं **निषेधार्थक क्रियाविशेषण** अव्ययें होत.

[१] इकडे पाऊसपाणी ठीक आहे. तिकडे कसें काय आहे ?— ह्या ठिकाणीं **इकडे, तिकडे** हीं **स्थलवाचक क्रियाविशेषण** अव्ययें आहेत. **कोठे** आहे ? इकडे.

[२] **दरसाल** वीस खंडी कापूस मिळतो. केव्हा मिळतो ? दरसाल. **मागे** असें घडल्याचें ऐकिवांत आहे. केव्हा घडल्याचें ? मागे. ह्या ठिकाणीं **दरसाल** व **मागे** ही **कालवाचक क्रियाविशेषण** अव्ययें आहेत.

[३] आईला पाहतांच बालक **खुदकन** हसलें. कसें हसलें ? खुदकन. ह्या ठिकाणीं **खुदकन** हें **रीतिवाचक क्रियाविशेषण** अव्यय आहे.

[४] दहा कोस चालल्याने तो अगदी थकला. किती थकला ? अगदी. तुकारामाचें वागणें जिजाईला **बिलकुल** पसंत नव्हतें. किती पसंत नव्हतें ?

बिलकुल. ह्या ठिकाणीं अगदी व बिलकुल हीं **परिमाणवाचक क्रि. वि. अव्ययें** आहेत.

[५] 'आपण गरिबाच्या उद्धार कराल.' 'आमच्या म्हणण्याला तुम्ही पाठिंबा द्या.' 'मीं आपली वाट पाहावी.' हीं वाक्यें विधानार्थक आहेत. ह्याच्यापुढे अनुक्रमें **काय, का, ना,** हीं क्रियाविशेषण अव्ययें ठेवल्यास ह्या विधानार्थक वाक्यास प्रश्नार्थकाचें स्वरूप येतें. 'आपण गरिबाचा उद्धार कराल **काय?**' 'आमच्या म्हणण्याला तुम्ही पाठिंबा द्याल **का?**' 'मीं आपली वाट पाहावी **ना?**' ह्या ठिकाणीं **काय, का, ना** ह्या क्रियाविशेषण अव्ययांनी मूळ वाक्यांत क्रियापदाने केलेल्या विधानाला प्रश्नार्थकाचें स्वरूप देण्याचें कार्य केलें आहे; म्हणून येथे **काय, का, ना,** हीं **प्रश्नार्थक क्रि. वि. अव्ययें** आहेत.

[६] (१) मी पुष्कळ सांगतों पण तो ऐकेल तर **ना** !
(२) **न** प्रार्थितां जलद दे जल या जनाला ॥

पहिल्या वाक्यांत **ना** ह्या अव्ययामुळे 'ऐकणें' ह्या क्रियेचा निषेध दर्शविला जातो. तेंच कार्य **न** ह्या अव्ययाने दुसऱ्या वाक्यांत केलें आहे. म्हणून ह्या ठिकाणीं **ना, न,** हीं **निषेधार्थक क्रि. वि. अव्ययें** आहेत.

वाक्यामध्ये क्रियाविशेषण अव्यय क्रियेविषयी कोणती माहिती देतें तें पाहून तें कोणत्या पोटप्रकारांत पडतें हें ठरविलें पाहिजे. वाक्यांत क्रि. वि. अव्ययाकडून कोणतें कार्य केलें गेलें हें पाहून त्याचा पोटप्रकार ठरवावा लागतो.

पुढे पाहून पाऊल टाक—स्थलवाचक.

तो **पुढे** बसला—स्थलवाचक.

पुढे काय होईल तें पाहावें—कालवाचक.

'पुढे' हें क्रियाविशेषण अव्यय. वाक्यांत तें जें कार्य करीत आहे त्यावरून त्याचा पोटप्रकार निरनिराळा ठरला हें दिसून येईल.

मराठी भाषेंत उपयोगांत येणारीं कांही क्रियाविशेषण अव्ययें पुढे दिलीं आहेत.

(१) **स्थलवाचक**—येथे, तेथे, इकडे, तिकडे, कोठे, मागे, पुढे, समोर, वर, खाली, अलीकडे, पलीकडे, चोहोकडे, भलतीकडे, सभोवती, आंतून, बाहेरून, अलीकडून, पलीकडून, मधून, जवळून, दूर, लांब, आसपास.

(२) **कालवाचक**—काल, आज, उद्या, परवा, तेरवा, यंदा, गुदस्ता, तिगस्ता, जेव्हा, तेव्हा, केव्हा, कधी, प्रथम, सध्या, हल्ली, पूर्वी, सांप्रत,

इतक्यांत, अमळशाने, जराशाने, तूर्त, कधीकधी, आजकाल, रातोरात, सालोसाल, दिवसाढवळ्या, क्षणभर, दिवसभर.

(३) **रीतिवाचक**—गटगटा, मटमटा, चटकन, वदवदा, सटासट, कडाकड, उभ्याउभ्या, मुद्दाम, सहज, हटकून, सडकून.

(४) **परिमाणवाचक**—अत्यंत, अगदी, बिलकुल, सर्वथा, साफ, खास, बेशक, निखालस, सपशेल, रगडून, जरूर, निवळ, बहुतकरून.

ऊन, त, तां, तांना, हे प्रत्यय लागून धातुसाधितें होतात. त्यांचा अव्ययाप्रमाणे उपयोग होतो. करून, बोलून, चालून, करितां, बोलतां, करतांना, बोलतांना इत्यादि धातुसाधित क्रियाविशेषण अव्ययें होत. **ऊन** प्रत्ययान्त, **तां** प्रत्ययान्त व **तांना** प्रत्ययान्त धातुसाधित अव्ययें हीं सामान्यतः क्रियेचा काळ किंवा रीत दाखवितात. **त** प्रत्ययान्त धातुसाधित अव्ययें हीं रीतिवाचक असतात. उदाहरणें पाहा—(१) तो **बोलतांना** अडखळतो, **कालवाचक.** (२) हुमायून जिन्यावरून पाय **घसरून** प्राणास मुकला, **रीतिवाचक.** (३) वाटेने येत **असतां** वैद्यबोवांना चोरांनी अडविलें, **कालवाचक.** (४) **हासत** कर्म करावें भोगावें **रडत** तेंचि परिणामीं, **रीतिवाचक**

जीं अव्ययें विशेषणांचा किंवा क्रियाविशेषण अव्ययांचा गुण (परिमाण) दाखवितात त्यांसहि क्रियाविशेषण अव्ययें म्हणतात. **फार** उंच झाड. **अति** हुषार मुलगा. ह्या ठिकाणीं **फार** व अति हीं परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्ययें होत. तो **अगदी** हळू बोलतो. तो **भारी** जलद चालतो. येथे **अगदी** व **भारी** हीं अव्ययें पुढील रीतिवाचक क्रियाविशेषणाचें परिमाण दाखवीत आहेत. येथे परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्ययें आहेत. क्रियाविशेषण अव्ययांच्या विशेषणांना क्रियाविशेषण अव्यय म्हणणें योग्य आहे. कारण त्यांचा संबंध त्यांच्यापुढील क्रियाविशेषण अव्ययाबरोबर क्रियापदाशींच पोहोचतो. 'अगदी हळू बोलतो' यांत 'अगदी' ह्याचा संबंध 'हळू' बरोबर 'बोलतो' ह्या क्रियापदाकडे पोहोचतो. पण 'फार उंच झाड' ह्या ठिकाणीं 'फार' ह्याचा संबंध क्रियापदाकडे पोहोचत नसून तो 'उंच' ह्या विशेषणाच्या नामाकडे म्हणजे विशेष्याकडे आहे. असें आहे तरी व्याकरणांत त्यांना क्रियाविशेषण अव्यय असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे.

संस्कृतांतील कांही विभक्त्यंत शब्द व साधित शब्द मराठींत क्रियाविशेषण अव्ययें म्हणून उपयोजिलीं जातात. उदाहरणार्थ— शास्त्रदृष्ट्या, स्वाभाविकरीत्या, बहुशः, दैववशात्, मनःपूर्वक.

(२) शब्दयोगी अव्ययें

नाम व नामाप्रमाणे योजिले जाणारे इतर शब्द ह्यांना जोडून येऊन त्यांचा वाक्यांतील इतर शब्दांशीं संबंध दाखविणारा जो अविकारी शब्द त्यास **शब्दयोगी अव्यय** असें म्हणतात. मनुष्याची किंमत पैशापेक्षा त्याच्या गुणावर अवलंबून असते.

शब्दयोगी अव्ययाकडून विभक्तीचें कार्य केलें जातें, ह्याचें विवेचन विभक्तिविचारांत केलें आहे. ज्या शब्दयोगी अव्ययांकडून विभक्तीचें कार्य केलें जातें, त्यांना **विभक्तिप्रतिरूपक अव्ययें** म्हणतात. कोणतीं शब्दयोगी अव्ययें कोणत्या विभक्तीचें कार्य करतात हें पूर्वीच्या प्रकरणांत दिलें आहे.

च, ही, ना, मात्र, देखील, सुद्धा इत्यादि शब्दयोगी अव्ययें केवल-प्रयोगी अव्ययांशिवाय इतर कोणत्याहि शब्दापुढे येतात व संग्रह, निश्चय वगैरे अर्थ उत्पन्न करण्याचें कार्य करतात. हीं शब्दयोगी अव्ययें शब्दांना जोडून येतांना शब्दाचें सामान्यरूप होत नाही. ह्या शब्दयोगी अव्ययांना 'शुद्ध शब्दयोगी अव्ययें,' असें म्हणतात.

वर, खाली, मागे इत्यादि अव्ययांचा उपयोग वाक्यांत कसा केला आहे, हें पाहून तें कोणत्या प्रकारचें अव्यय हें ठरवावें लागतें.

तो **समोर** उभा होता—क्रियाविशेषण अव्यय.

तो घरा**समोर** उभा होता—शब्दयोगी अव्यय.

शब्दयोगी अव्ययें ज्या शब्दाला जोडून आलेलीं असतात, त्या शब्दाला जोडून लिहावयाचीं. बोलतांना आपण तीं शब्दापासून तोडून बोलत नाही. शिवाय तीं जर तोडून लिहिलीं, तर अर्थामध्ये कमीपणा येतो. **झाडा वर** आंबे आहेत. असें शब्दयोगी अव्यय तोडून लिहावयाचें नाही.

(३) उभयान्वयी अव्यय व त्यांचे प्रकार

क्रियेचा गुण न दाखवितां दोन शब्द किंवा दोन वाक्यें ह्यांचा अन्वय म्हणजे संबंध जोडणारा जो अविकारी शब्द त्यास **उभयान्वयी अव्यय** असें म्हणतात.

उभयान्वयी अव्ययाच्या योगाने दोन शब्दांची सांगड जुळविण्यापेक्षा दोन वाक्यांची सांगड किंवा अन्वय जोडण्याचेंच कार्य मुख्यतः होतें असें बारकाईने पाहिल्यास आढळून येईल. वारा आला आणि पाऊस गेला. येथे

'आणि' ह्या अव्ययाने दोन वाक्यें जोडलेलीं आहेत. 'रामा आणि वसंता हे घरीं गेले'. ह्या वाक्यांत 'आणि' ह्या अव्ययाने 'रामा', 'वसंता' ह्या दोन नामांचा अन्वय घडवून आणल्याचें दिसतें. पण वस्तुतः 'रामा घरीं गेला,' 'वसंता घरीं गेला' ह्या दोन वाक्यांचा संबंध (अन्वय) 'आणि' ह्या अव्ययाने जोडलेला आहे.

उभयान्वयी अव्ययें हीं दोन शब्द किंवा दोन वाक्यें जोडण्याचें काम करतात. दोन वाक्यांतील अगर शब्दांतील अर्थदृष्ट्या जो संबंध जोडला जातो, त्यावरून उभयान्वयी अव्ययांचे एकूण आठ प्रकार होतात.

(१) समुच्चयबोधक— आणि, व, आणखी.

जेव्हा उभयान्वयी अव्ययांकडून जोडलेल्या वाक्यांतील विधानें एकत्र आणण्याचा म्हणजेच समुच्चयाचा, संग्रहाचा, समूहाचा बोध होतो, तेव्हा त्या उभयान्वयी अव्ययांना 'समुच्चयबोधक' म्हणतात.

धन, अधिकार, कुल आणि विद्या ह्यांपेक्षाहि शीलालाच अधिक महत्त्व दिलें पाहिजे.

प्रभु रामचंद्र वनवासास निघाले आणि लक्ष्मणहि त्यांच्याबरोबर निघाला.

(२) विकल्पबोधक— अथवा, किंवा, वा, अगर, कीं.

जेव्हा उभयान्वयी अव्ययांमुळे दोहोंपैकीं एक किंवा अनेकांपैकी एक असा विकल्प सूचित होतो, तेव्हा तीं उभयान्वयी अव्ययें 'विकल्पबोधक' होत.

विद्याधन देऊन किंवा भोगून उर्णे होत नाही.

माझें दुर्दैव आड आलें कीं नारद मध्यें आला.

'नरो वा कुंजरो वा' असें युधिष्ठिर उद्गारला.

(३) न्यूनत्व बोधक— पण, परंतु, तथापि.

पहिल्या विधानांतील कल्पनेच्या विरुद्ध अर्थाचा किंवा कमीपणाच्या अर्थाचा बोध उभयान्वयी अव्ययांनीं जोडलेल्या विधानावरून होतो, तेव्हा तीं 'न्यूनत्वबोधक' उभयान्वयी अव्ययें होत.

औषध दिलें पण अजून गुण नाही.

औरंगजेबाने मराठ्यांस जिंकण्याची पराकाष्ठा केली, परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं.

(४) **कारणबोधक**—कारण, कीं, कां कीं, कारण कीं.

जेव्हा उभयान्वयी अव्ययांकडून पूर्व वाक्यांतील कार्य घडविण्याचें कारण उत्तर वाक्यांत आहे असें दर्शविलें जातें, त्या वेळीं त्या उभयान्वयी अव्ययांना 'कारणबोधक' म्हणतात.

आम्हांला हेच तांदूळ आवडतात **कारण** ते आमच्या शेतांतील आहेत.

(५) **उद्देशबोधक**—सबब, म्हणून, यास्तव, कारण, कां कीं.

जेव्हा एका वाक्यांतील कार्याचा उद्देश त्याला उभयान्वयी अव्ययाने जोडून आलेल्या दुसऱ्या वाक्यावरून कळून येतो, तेव्हा त्या उभयान्वयी अव्ययाला 'उद्देशबोधक' म्हणतात.

डोळ्यास उपाय करावा **म्हणून** मी मुंबईस आलों.
माझी अडचण दूर व्हावी **यास्तव** मी तुमच्याकडे आलों.

(६) **परिणामबोधक**—कीं, म्हणून, सबब.

जेव्हा उभयान्वयी अव्ययांकडून उत्तर वाक्यांतील कार्य हें पूर्व-वाक्यांतील कार्याचा परिणाम आहे असें दाखविलें जातें, तेव्हा तीं 'परिणामबोधक' होत.

पाऊस चांगला पडला **म्हणून** पिकें आलीं.
पाऊस पडला **कीं** सर्वत्र हिरवेगार दिसूं लागतें.

(७) **स्वरूपबोधक**—म्हणजे, कीं, म्हणून.

उभयान्वयी अव्ययामागील शब्द अगर वाक्य ह्यांचें स्पष्टीकरण करण्याचें किंवा स्वरूप दाखविण्याचें कार्य पुढील वाक्य त्या शब्दाला अगर वाक्याला जोडून त्या त्या उभयान्वयी अव्ययांकडून केलें जातें, तेव्हा तीं 'स्वरूपबोधक' होत.

अश्वपति **म्हणून** एक राजा होऊन गेला.
दुर्योधनाने सांगितलें **कीं** मीं पांडवांना एक तसूभरहि जमीन देणार नाही.
शंभर नये पैसे **म्हणजे** एक रुपया.

(८) **संकेतबोधक**—जर–तर, जरी–तरी, यद्यपि–तथापि, म्हणजे, कीं.

जरी प्राण गेला तरी अन्यायापुढे मान वांकविणार नाही.
जर तुमचें देशावर प्रेम असेल **तर** आपसांतील तंटे मिटवा.
तूं निघालास **कीं** मी निघेन.

अशा प्रकारें उभयान्वयी अव्ययांकडून दोन शब्द किंवा दोन वाक्यें जोडण्याचें कार्य ज्या अर्थाने होतें त्यावरून उभयान्वयी अव्ययांचे एकूण आठ पोटप्रकार होतात. उभयान्वयी अव्ययाचा पोटप्रकार निश्चित करतांना ज्या वाक्यांत तीं आलीं आहेत त्यांचा अर्थ नीट लक्षांत घेऊन निश्चित करावा लागतो. उभयान्वयी अव्यय तेंच पण निरनिराळ्या वाक्यांत तें निरनिराळ्या प्रकारचें कार्य करतें व त्या कार्यावरून त्याचा प्रकार सिद्ध होतो. उदाहरणें पाहा—

(१) आज पाऊस पडेल कीं नाही हें मी कसें सांगूं ?—विकल्पबोधक.

(२) गाडीने हिरवें निशाण दाखविलें कीं गाडी सुटते—संकेतबोधक.

(३) तानाजी म्हणाला कीं "मी सिंहगड घेईन."—स्वरूपबोधक.

(४) झाला अनंत वस्त्रें कीं तीस अनाथसें न वाटावें—कारणबोधक.

(५) तो इतकें जेवला कीं शेवटीं त्याला अजीर्ण झालें—परिणामबोधक.

(४) केवलप्रयोगी अव्ययें

केवलप्रयोगी अव्ययें प्रत्यक्षपणें वाक्यार्शी संबद्ध नसूनहि त्या वाक्यांत अभिप्रेत असलेल्या हर्ष, विषाद, दुःख, आश्चर्य इत्यादि भावनांचीं अगर विकारांचीं प्रतीकें या नात्याने वाक्याच्या अर्थाचा परिपोष करण्याचें कार्य करतात.

'केवलप्रयोगी' हें नांव त्या अव्ययाच्या वाक्यांतील योजनेवरून दिलेलें आहे. केवल = एकटें, स्वतंत्र. प्रयोगी = योजिलेलें.

'उद्गारवाचक' हें दुसरें नांव त्याच्या अर्थावरून दिलेलें आहे. उद्गर = हर्षशोकादि मनोविकार दाखविणारे व बोलणाराच्या तोंडून एकदम बाहेर पडणारे शब्द; उद्गारवाचक = उद्गार दाखविणारे.

केवलप्रयोगी अव्ययें अगर उद्गारवाचक अव्ययें ह्या दोन्ही संज्ञा रूढ आहेत.

खालील प्रकारचीं केवलप्रयोगी अव्ययें आपल्या भाषेंत आढळतात व त्यांचा बोलतांना व लिहितांना उपयोग केला जातो.

(१) हर्षदर्शक—वा, वाः, वाहवा, अहाहा, अहा, ओहो.

(२) शोकदर्शक—अरेरे, अगग, देवारे, आईग, हरहर, राम-राम, शिव-शिव, अगाई, हाय.

(३) आश्चर्यदर्शक—आहो, अबब, अगबाई, अरे बापरे.

(४) प्रशंसादर्शक—शाबास, वाहवा, अच्छा, भलेशाबास, खाशी, ठीक.

(५) अनुमोदनदर्शक—होय, ठीक, अच्छा, हं, हूं.

(६) तिरस्कारदर्शक—छे, छट्, छी, थू, हट्, भलतेंच, इश्श, छी छी.

(७) स्वीकारदर्शक—जी, ठीक, बरें, हांहां, जी हां, होय.

(८) विरोधदर्शक—छट्, हट्, छी, छे, अहं, उंहूं.

(९) संबोधनदर्शक—अरे, रे, बा, अगा, हो, हे, ए, अरे, अहो, अग, ग, गे, ए, हे, अहो.

अभ्यास

१. पुढील वाक्यांतील अव्ययें ओळखून तीं पोटप्रकारासहित कोणत्या प्रकारचीं आहेत तें स्पष्ट करा.

(१) दळितां कांडितां तुज गाइन मी अनंता ।
(२) सदासर्वदा योग तूझा घडावा ।
(३) अन्नासाठी दाही दिशा आम्हां फिरविशी जगदीशा ।
(४) देह जावो अथवा राहो पांडुरंगीं दृढ भावो ।
(५) पक्कान्नावर ताव मारुन कधी संतोष ना वाटला ।
ती जाडीभरडीच भाकर हवी खाण्यास आता मला ।

(६) कपडयांना महत्त्व देणें म्हणजे कृत्रिम जीवनाची गुलमागिरी पत्करणें होय.

(७) कांही चमत्कार असे आहेत कीं त्यांच्यापुढे मानवाची मति कुंठित होते.

(८) अद्वैत म्हणजे माझ्यासारखा दुसरा आहे ही भावना. जगांत सर्वत्र दिसून येणाऱ्या दुज्या भावाच्या अंधाराला ऋषींना दूर करावयचें होतें, म्हणून त्यांनीं हा महान् दीप आपल्याला दिला.

(९) जगाच्या सुखाला वैराग्याचें विरजण घालणारें आणि दुःखरोगाला चरें करणारें औषध म्हटलें म्हणजे एक ग्रंथवाचन होय.

(१०) आपण जर पृथ्वीच्या पोटांत गेलों तर कदाचित् ती आगीसारखी जळजळीत असल्याचें आपल्याला दिसेल.

(११) अशा चित्रणांत करुणरसाचे प्रसंग आले कीं माझ्या मित्रासारखे हुबळे जीव डोळे झाकून घेतात आणि ओरडतात, 'छे! हें अगदी असह्य आहे बुवा!'

(१२) आतां जिंकावयाला जग उरलें नाही म्हणून शिकंदर ढळढळा रडला असें सांगतात. पण त्या दिग्विजयी वीराच्या अश्रूंपेक्षा हिंगण्याच्या शाळेंतल्या एका शिक्षकाचे अश्रू मला मोलाचे वाटतात.

(१३) 'जिथं जाल तिथं सुखी असा हाच माझा तुम्हाला आशीर्वाद'; हे बोलतां बोलतां वामनरावजींच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

(१४) कदाचित् ईश्वराची इच्छाच अशी असेल कीं, मला शिक्षा व्हावी आणि मी शिक्षा भोगल्याच्या कारणानेच अंगिकारिलेल्या कार्याला ऊर्जित दशा यावी.

(१५) गुरुदेव, ज्ञान हें सर्वांत श्रेष्ठ आहे ना?

(१६) कासराभर दिवस वर आला तरी तो कामावर गेला नाही. त्याच्या बायकोने त्याच्या अंगावरचें कांबळें खसकन् ओढलें व तें दूर फेकून दिलें.

(१७) डुमडुमत डमरु ये खणखणत शूल ये।
शंख फुंकीत ये येइ रुद्रा।

(१८) जिकडे जावें तिकडे माझीं भावंडें आहेत।
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत।

(१९) थुइथुइ नाचत पाटामधुनी चाले जळ धावत।
वासुदेव का चाळ बांधुनी टाळ वाजवी इथं॥

(२०) हा! दैवा करण्यास नाश पुरता कैसें तुला फावलें।

२. 'म्हणून' ह्या उभयान्वयी अव्ययाचा 'कारणबोधक' व 'स्वरूपबोधक' म्हणून उपयोग करा. 'म्हणजे' ह्या उभयान्वयी अव्ययाचा 'संकेतबोधक' व 'स्वरूपबोधक' म्हणून उपयोग करा.

३. खाली दिलेलीं अव्ययें त्यांच्यापुढे निर्दिष्ट केलेल्या प्रकारांत योजून दाखवा—

(१) अलीकडे—कालवाचक, (२) बाहेर—स्थलवाचक,
(३) काय—प्रश्नार्थक, (४) क्षणोक्षणीं—कालवाचक,
(५) अलीकडे—स्थलवाचक, (६) हळू—रीतिवाचक.

४. पुढे कांही क्रियाविशेषण अव्ययें दिलीं आहेत. त्यांपैकी पुढील वाक्यांत गाळलेल्या ठिकाणीं योग्य तें अव्यय घाला व तेथे तें कोणत्या प्रकारचें क्रियाविशेषण अव्यय झालें तें स्पष्ट करा—

काय, ना, अंशतः, भयंकर, न, पुरेपूर, का, सपशेल.

(१) मीं जेव्हा पहिल्यांदा मिशा काढल्या, तेव्हा माझे वडील माझ्यावर.....रागावले.

(२) संभाजीसारख्या वीराची शेवटीं अशी गत व्हावी..... !

(३) तो अगदी.....तोंडघशी पडला.

(४) स्वराज्य आपल्या अगदी जवळ आहे, पण सर्व पक्षांची एकी होईल तर..... ?

(५) कांही लोक घडाला लागलेलें केळफूल चटकन् छाटून टाकण्याची दक्षता दाखवितात, ती उगीचच..... ?

(६) वैद्यबोवांनी कांहीहि.....खातां थट्टेखोर विनायकरावांनी त्यांच्यावर पोटभर जेवल्याचा आरोप केला.

(७) ज्या ठिकाणीं माझे पूर्वज नांदले व वंशज नांदणार आहेत, त्या भूमीच्या उद्धारापुढे बाकीच्या सर्व गोष्टी तुच्छ मानावयास नकोत..... ?

(८) काशी-रामेश्वराची यात्रा करून पितृऋणांतून.....मुक्त होण्याचें मीं ठरविलें आहे.

(९) सुंदर नव्या सृष्टीबरोबर सतेज नवी दृष्टि यावयास नको..... !

(१०) दारुड्या मनुष्य निशेंत आपलें व्यक्तित्व.....विसरतो.

---

१०. शब्दांचें व्याकरण सांगणें.

आतांपर्यंत आपण नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय व केवलप्रयोगी अव्यय ह्या शब्दांच्या आठ जाति व त्यांचे पोटप्रकार ह्यांचा अभ्यास केला. लिंग, वचन, विभक्ति, विभक्तींचे अर्थ, क्रियापदाचें काळ, अर्थ व प्रयोग ह्या विषयांची माहिती मिळविली. वाक्यांत उपयोजिलेल्या शब्दांसंबंधी ही माहिती सांगणें, ह्यालाच 'शब्दांचें व्याकरण चालविणें' किंवा 'शब्दांचें व्याकरण सांगणें' असें म्हणतात. ह्यालाच कांही व्याकरणकार 'ग्रंथावरून व्याकरण सांगणें'

असें म्हणतात. कांही व्याकरकारांनी ह्याला 'पदपरिस्फोट' अशी संज्ञा दिली आहे.

शब्दांचें व्याकरण चालवितांना प्रत्येक शब्दाबद्दल कोणती माहिती द्यावयाची तें पुढे दिलें आहे—

(१) **नाम**— मूळ शब्द, पोट-प्रकार, लिंग, वचन, विभक्ति, विभक्तीचा अर्थ.

(२) **सर्वनाम**— मूळ शब्द, पोट-प्रकार, लिंग, वचन, विभक्ति, विभक्तीचा अर्थ.

(३) **विशेषण**— मूळ शब्द, पोट-प्रकार, असल्यास विकार, विशेष्य.

(४) **क्रियापद**— मूळ धातु, सकर्मक कीं अकर्मक, रूप, (करणरूप अगर अकरणरूप), काळ किंवा अर्थ, लिंग, वचन, पुरुष, प्रयोग.

(५) **क्रियाविशेषण अव्यय**— क्रियेसंबंधी स्थल, काल, रीत इत्यादि दर्शविलेल्या माहितीच्या आधारें पोट-प्रकार.

(६) **शब्दयोगी अव्यय**— हें ज्याला जोडून आलें आहे, त्याचें व्याकरण सांगून ह्याच्यामुळे झालेला विकार सांगणें.

(७) **केवलप्रयोगी अव्यय**— कोणता विकार व्यक्त होतो तें सांगणें.

(८) **उभयान्वयी अव्यय**— कोणते शब्द किंवा कोणतीं वाक्यें जोडलीं हें सांगून पोट प्रकार सांगणें.

पुढे नमुन्यादाखल वाक्यांतील शब्दांचें व्याकरण चालवून दाखविलें आहे—

(१) रामाने लंकेचा राजा रावण ह्यास मारिलें.

रामाने—मूळ शब्द 'राम', विशेषनाम, पुल्लिंगी, तृतीयेचें एकवचन, तृतीयेचा अर्थ कर्ता, 'मारिलें' ह्या क्रियापदाचा.

लंकेचा—मूळ शब्द 'लंका', विशेषनाम, स्त्रीलिंगी, षष्ठीचें एकवचन, षष्ठीचा अर्थ संबंध 'राजा' ह्या नामाशीं.

राजा—मूळ शब्द 'राजा', सामान्यनाम, पुल्लिंगी, प्रथमेचें एकवचन, प्रथमेचा अर्थ उद्देश 'रावण' ह्या नामाशीं.

रावण—मूळ शब्द 'रावण', विशेषनाम, पुल्लिंगी, प्रथमेचें एकवचन, प्रथमेचा अर्थ उद्देश 'ह्यास' ह्या सर्वनामाशीं.

ह्यास—मूळ शब्द 'हा', दर्शक सर्वनाम, पुल्लिंगी, सप्रत्यय द्वितीयेचें एकवचन, द्वितीयेचा अर्थ कर्म 'मारिलें' ह्या क्रियापदाचें.

मारिलें—क्रियापद 'मार' ह्या सकर्मक धातूचें, करणरूपी, स्वार्थी, भूतकाळी, नपुंसकलिंगी तृतीय पुरुषाचें एकवचन.

ह्या वाक्यांत 'रामाने' हा कर्ता, 'ह्यास' हें कर्म व 'मारिलें' हें क्रियापद. हा सकर्मक भावेप्रयोग.

(२) शेवटीं त्याने पत्र लिहिलें.

शेवटीं—कालदर्शक क्रियाविशेषण अव्यय, 'लिहिलें' ह्या क्रियापदाचें.

त्याने—मूळ शब्द 'तो', तृतीय पुरुषवाचक सर्वनाम, पुल्लिंगी, तृतीयेचें एकवचन, तृतीयेचा अर्थ कर्ता 'लिहिलें' ह्या क्रियापदाचा.

पत्र—मूळ शब्द 'पत्र', सामान्यनाम, नपुंसकलिंगी, प्रथमेचें एकवचन, प्रथमेचा अर्थ कर्म 'लिहिलें' ह्या क्रियापदाचें.

लिहिलें—क्रियापद 'लिह' ह्या सकर्मक धातूचें, करणरूपी, स्वार्थी, भूतकाळी, नपुंसकलिंगी तृतीयपुरुषाचें एकवचन.

ह्या वाक्यांत 'त्याने' हा कर्ता, 'पत्र' हें कर्म, 'लिहिलें' हें क्रियापद हा कर्मणिप्रयोग.

(३) विद्यार्थ्यांनी स्वावलंबी व्हावें.

विद्यार्थ्यांनी—मूळ शब्द 'विद्यार्थी', सामान्यनाम, पुल्लिंगी, तृतीयेचें अनेकवचन, तृतीयेचा अर्थ कर्ता 'व्हावें' ह्या क्रियापदाचा.

स्वावलंबी—विधिविशेषण, 'व्हावें' ह्या क्रियापदाचें.

व्हावें—क्रियापद, 'हो' ह्या अकर्मक धातूचें, करणरूपी, विध्यर्थी, नपुंसकलिंगी, तृतीयपुरुषाचें एकवचन.

ह्या वाक्यांत 'विद्यार्थ्यांनी' हा कर्ता, 'व्हावें' हें क्रियापद, हा अकर्मक भावेप्रयोग.

(४) मी राजाच्या सदनिं अथवा घोर रानीं शिरेन.

मी—प्रथमपुरुषवाचक सर्वनाम, पुल्लिंगी, प्रथमेचें एकवचन, प्रथमेचा अर्थ कर्ता, ' शिरेन ' ह्या क्रियापदाचा.

राजाच्या—मूळ शब्द ' राजा ', सामान्यनाम, पुल्लिंगी, षष्ठीचें एकवचनी सामान्यरूप, षष्ठीचा अर्थ संबंध ' सदनिं ' ह्या नामाकडे.

सदनिं—मूळ शब्द ' सदन ', सामान्यनाम, नपुंसकलिंगी, सप्तमीचें एकवचन, सप्तमीचा अर्थ अधिकरण, ' शिरेन ' ह्या क्रियापदाकडे.

अथवा—विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय. ' सदनिं ' ' रानीं ' ह्यांना जोडणारें.

घोर—गुणविशेषण, ' रान ' ह्या विशेष्याचें.

रानीं—मूळ शब्द ' रान ' सामान्यनाम, नपुंसकलिंगी, सप्तमीचें एकवचन, सप्तमीचा अर्थ अधिकरण, ' शिरेन ' ह्या क्रियापदाकडे.

शिरेन—क्रियापद, ' शिर ' ह्या अकर्मक धातूचें, करणरूपी, स्वार्थी, भविष्यकाळीं, पुल्लिंगी, प्रथम पुरुषाचें एकवचन.

ह्या वाक्यांत ' मी ' हा कर्ता, ' शिरेन ' हें क्रियापद, हा अकर्मक कर्तरि प्रयोग.

(५) त्याला मुलाकडे लक्ष द्यावें लागतें.

द्यावें लागतें—संयुक्त क्रियापद, ' दे ' हा सकर्मक धातु, (' द्यावे ' हें कृदन्त व ' लागतें ' हें सहाय क्रियापद) करणरूपी, स्वार्थी, वर्तमानकाळीं, नपुंसकलिंगी तृतीय पुरुषाचें एकवचन.

ह्या वाक्यांत ' त्याला ' हा कर्ता, ' लक्ष ' हें कर्म, ' द्यावें लागतें ' हें संयुक्त क्रियापद, हा कर्मणि प्रयोग.

(६) शहाण्याची संगत धरावी.

शहाण्याची—मूळ शब्द ' शहाणा ' विशेषणात्मक सामान्यनाम, पुल्लिंगी, षष्ठीचें एकवचन, षष्ठीचा अर्थ संबंध ' संगत ' ह्या नामाकडे.

(७) हें काम कोणीं केलें ?

कोणी—' कोण ' ह्या प्रश्नार्थक सर्वनामाचें नपुंसकलिंगी, तृतीयेचें एकवचन, तृतीयेचा अर्थ कर्ता, ' केलें ' ह्या क्रियापदाचा.

(८) त्याने तुला काय प्रश्न विचारला ?

तुला—'तूं' ह्या द्वितीय पुरुषवाचक सर्वनामाचें चतुर्थीचें एकवचन अर्थ संप्रदान 'विचारला' ह्या क्रियापदाचें.

काय—सर्वनामात्मक विशेषण. 'प्रश्न' ह्या नामाचें.

(९) कोणास कोणीं हसूं नये.

कोणास—'कोण' ह्या सामान्य सर्वनामाचें नपुंसकलिंगी द्वितीयेचें एकवचन, द्वितीयेचा अर्थ कर्म, 'हसूं नये' ह्या संयुक्त क्रियापदाचें.

(१०) जर तूं औषध घेतास तर बरा होतास.

जर—संकेतबोधक उभयान्वयी अव्यय.

घेतास—क्रियापद 'घे' ह्या सकर्मक धातूचें संकेतार्थी, पुल्लिंगी, द्वितीय पुरुषाचें एकवचन.

अभ्यास

पुढील वाक्यांतील प्रत्येक शब्दाचें व्याकरण चालवा—

(१) पक्ष्यांनी आपलीं घरटीं झाडावर बांधलीं.
(२) हे दैवा, तूं मजवर असा कोपूं नकोस.
(३) तो मुंबईहून पुण्यास गेला.
(४) आपण मला क्षमा करावी.
(५) तुकारामाच्या अभंगांत मन रमून जातें.
(६) अन्तरिक्षांतून चमत्कार पाहात रामचंद्र अयोध्येस आले.
(७) पांडवांनी श्रीकृष्णाला हस्तिनापुरास पाठविलें.
(८) माझा मित्र युरोपला जाणार आहे.
(९) वसंतरावांनी फार धावपळ केली.
(१०) जो दीर्घोद्योग करतो तो सुखी होतो.

११. वाक्यपृथक्करण

वाक्यपृथक्करण म्हणजे काय ?

शब्दांचा परस्परांशीं संबंध जुळून पूर्ण अर्थ झाला म्हणजे त्या बोलण्यास आपण वाक्य म्हणतों. वाक्यांतील घटक होणाऱ्या शब्दांच्या विकारी व अविकारी जाति, विकारी शब्दांमधें होणारे विकार ह्यांचा आपण आतापर्यंत अभ्यास केला. वाक्यार्थ हा त्या वाक्यांतील शब्दक्रम म्हणजेच पदक्रम, त्यांचा एकमेकांशीं जुळविलेला संबंध व त्यासंबंधामुळे त्याच्याकडून होणारें कार्य ह्यांवर अवलंबून असतो. वाक्याची रचना किंवा बांधणी शब्दांनी होते. ह्या रचनेंतील प्रधान घटक म्हणजे कर्ता, कर्म व क्रियापद व कांही ठिकाणीं क्रियापदाचें पूरक हे होत. व्याकरणांतील प्रयोग-प्रकरण हें वाक्यरचनेच्या दृष्टीने महत्त्वाचें आहे. प्रयोग-प्रकरणांत कर्ता, कर्म आणि क्रियापद इतक्याच पदांवर आपली सर्व दृष्टि असते. ह्या घटकांशिवाय वाक्यांत येणारे इतर शब्द ह्या घटकांइतके वाक्यरचनेला महत्त्वाचें नसलें, तरी वाक्यार्थाच्या दृष्टीने ते महत्त्वाचे असतात, हें विशेषणें, क्रियाविशेषण अव्ययें, उभयान्वयी अव्ययें ह्यांचा विचार करतांना आपण पाहिलें आहे. 'वाक्यपृथक्करण' हा विषय वाक्यार्थाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. 'वाक्यपृथक्करण' म्हणजे वाक्यांतील घटकांची एकमेकांशीं असलेलीं नातीं अगर परस्परसंबंध हीं स्पष्ट करून वाक्याची बांधणी उकलून दाखविण्याची प्रक्रिया होय. वाक्यांतील भिन्न भिन्न सर्व अवयव निरनिराळे मांडून त्यांचा परस्परसंबंध स्पष्ट करून सांगण्याची पद्धति म्हणजेच 'वाक्य-पृथक्करण'. हें वाक्यार्थाचें पूर्ण आकलन होण्यास उपकारक ठरतें.

मराठीच्या व्याकरणक्षेत्रांत 'वाक्यपृथक्करण' हा विषय आणण्याचें श्रेय कै. प्रि. गोपाळ गणेश आगरकर ह्यांना आहे. प्रि. आगरकर ह्यांनी इ. स. १८८८ सालीं या विषयावर 'वाक्यमीमांसा' नांवाचें पुस्तक लिहिलें व मराठीच्या व्याकरणांत 'वाक्यपृथक्करणा'ला स्थान देणें आवश्यक आहे हें पटवून देऊन, मराठी भाषा व तिचें व्याकरण ह्यांच्या अभ्यासकांची दृष्टि ह्या विषयाकडे आकृष्ट केली. वाक्याचें पृथक्करण करून त्यांतील भिन्न भिन्न सर्व अवयव निरनिराळे मांडून त्यांचा परस्परसंबंध स्पष्ट करून वाक्याची बांधणी उकलून दाखविण्याची ही पद्धति इंग्लिश भाषेच्या व्याकरणांत स्वीकारलेली आहे. ही आंग्लपद्धति मराठी भाषेच्या व्याकरणाचा विषय करून ती मराठी वाक्यांस लावून दाखविण्याचें श्रेय आगरकरांना दिलें पाहिजे. अशा तऱ्हेने

'वाक्यपृथक्करण' हा विषय मराठी भाषेच्या व्याकरणांत प्रविष्ट झाला व व्याकरणांतील वाक्यविचाराच्या दृष्टीनें त्याला महत्त्वाचें स्थान मिळालें.

वाक्यविचाराच्या ह्या पद्धतीस इंग्लिशमध्यें Analysis हा परिभाषिक शब्द योजिलेला आहे. मराठी भाषेच्या व्याकरणांत Analysis ह्याला 'वाक्यपृथक्करण' ही परिभाषिक संज्ञा योजतात. कांही व्याकरणकार 'वाक्य-परिच्छेद', 'वाक्यविग्रह,' अशा संज्ञा उपयोजितात; पण 'वाक्यपृथक्करण' ही संज्ञा सार्थ आहे व ती आता मराठी व्याकरणांत रूढ झाली आहे.

वाक्यपृथक्करणाची परिभाषा—

वाक्यपृथक्करणामध्ये **उद्देश्य** व **विधेय** ह्या संज्ञा अत्यन्त महत्त्वाच्या आहेत; किंबहुना हेच वाक्याचे दोन मुख्य अवयव किंवा प्रधान भाग अगर अंगें आहेत.

ज्याविषयी वाक्यांत कांही सांगितलेलें असतें, म्हणजे ज्याविषयी वक्ता बोलतो किंवा लिहितो, म्हणजेच ज्याच्याविषयी विधान करतो त्यास **उद्देश्य** म्हणतात.

उद्देश्याविषयी वाक्यांत जें विधान करण्यांत येतें त्यास **विधेय** म्हणतात.

(१) 'आमचें मांजर पळालें' (२) 'पृथ्वीराज चव्हाणाने दिल्लीस राज्य केलें' (३) 'आमची काळी गाय पुष्कळ दूध देते' (४) 'माधवरावांचा थोरला मुलगा वसंत काल मोटारीने पुण्यास गेला.' पहिल्या वाक्यांत 'आमच्या मांजरा' बद्दल विधान आहे. दुसऱ्या वाक्यांत 'पृथ्वीराज चव्हाणा' बद्दल विधान आहे. तिसऱ्या वाक्यांत 'आमची काळी गाय' ह्या-बद्दल विधान आहे व चवथ्या वाक्यांत 'माधवरावांचा थोरला मुलगा वसंत' ह्याच्याबद्दल विधान आहे. हा झाला वाक्याचा एक घटक किंवा अंग. दुसरा घटक किंवा अंग म्हणजे विधानाचा. पहिल्या वाक्यांत 'पळालें' हें विधान आहे. दुसऱ्या वाक्यांत 'दिल्लीस राज्य केलें' हें विधान आहे तिसऱ्या वाक्यांत 'पुष्कळ दूध देतें' हें विधान आहे व चवथ्या वाक्यांत 'काल मोटारीने पुण्यास गेला' हें विधान आहे.

अशा तऱ्हेने प्रत्येक वाक्याचे दोन प्रधान भाग पडतात. एक उद्देश्याचा भाग व दुसरा विधेयाचा भाग. वाक्यांत उद्देश्याचा जो भाग त्याला **'उद्देश्यांग'** असें म्हणतात व विधेयाचा जो भाग त्याला **'विधेयांग'** म्हणतात.

कर्ता व कर्त्याच्या नात्याचे शब्द उद्देश्यांगांत येतात आणि क्रियापद व क्रियापदाच्या नात्याचे शब्द विधेयांगांत येतात.

वाक्यांतील जो कर्ता तो उद्देश्यांगांतील 'मूल उद्देश्य' होय व वाक्यांतील जें क्रियापद तें विधेयांगांतील 'मूल विधेय' होय.

'माधवरावांचा थोरला मुलगा वसंत काल मोटारीने पुण्यास गेला' ह्या वाक्यांत 'वसंत' हें मूल उद्देश्य व 'गेला' हें मूल विधेय. 'माधवरावांचा थोरला मुलगा' ह्या शब्दांनी आपल्याला 'मूल उद्देश्य' 'वसंत' ह्यासंबंधी विशेष माहिती मिळते. मूल उद्देश्यासंबंधी माहिती सांगणाऱ्या विशेषणांना आणि त्यासारख्या शब्दांना 'उद्देश्यविस्तार' म्हणतात. 'काल मोटारीने पुण्यास' हे शब्द केव्हा गेला, कशाने गेला, कोठे गेला ह्याविषयी मूलविधेयाबद्दल माहिती देऊन त्या मूल विधेयाचा विस्तार करीत आहेत. म्हणून त्यांना 'विधेयविस्तार' म्हणतात. स्थल–काल–रीति–परिमाण यांचीं वाचक असलेलीं क्रि. वि. अव्ययें, क्रियाविशेषणें, शब्दयोगी अव्ययान्त शब्द हीं सर्व विधेयविस्तारांत मोडतात.

'क्रियापद म्हणजे मूल विधेय'. क्रियापदें जेव्हा सकर्मक असतात, तेव्हा वाक्यांत कर्म घातल्याशिवाय 'क्रियापद' वाक्यार्थ पुरा करूं शकत नाही. 'पुष्कळ दूध देते' हें तिसऱ्या वाक्यांतील 'विधेयांग' आहे. येथे 'देते' हें मूल विधेय. ह्या विधेयाला पूर्णता आणण्याचें काम 'दूध' ह्या कर्माने केलें आहे. कर्मवाचक शब्दांना वाक्यपृथक्करणांत 'विधेयपूरक' म्हणतात. त्याचप्रमाणे कांही सकर्मक क्रियापदें व कांही अकर्मक क्रियापदें हीं 'अपूर्णविधान' असतात व त्यांना 'पूरकां'ची आवश्यकता असते हें आपण पूर्वी पाहिलें आहे. 'पूरकाचें' काम करणारे शब्दहि 'विधेयपूरकें' होत. तो वेडा झाला. ह्यांत 'वेडा' हें विधेयपूरक होय. 'संभाजीने कलुषास प्रधान नेमिलें' ह्या ठिकाणीं 'प्रधान' हें विधेयपूरक होय.

वाक्यपृथक्करणाच्या दृष्टीने विधेयांगांतील 'विधेयपूरक' हा जो वाक्याचा एक अवयव त्याचे दोन पोट अवयव होतात. कर्माच्या ठिकाणीं नाम येतें व ज्याप्रमाणे मूळ उद्देश्याचीं विशेषणें इत्यादि माहिती देणारे शब्द असतात तसे कर्माची विशेष माहिती देणारे शब्दहि वाक्यांत येतात. 'आमची काळी गाय पुष्कळ दूध देते.' येथे 'दूध' हें कर्म व 'पुष्कळ' हें विशेषण. वाक्यपृथक्करणांत 'पुष्कळ दूध' हा विधेयांगांतील भाग 'सविस्तारकर्म' म्हणून मानला जातो. अपूर्णविधान सकर्मक व अपूर्णविधान अकर्मक क्रियापदामध्ये जीं 'पूरकें' येतात त्यांनाहि विशेषणात्मक शब्द असतात. वाक्य-

पृथक्करणांत त्या शब्दांसह त्या पूरकांना 'सविस्तार पूरक' अशी संज्ञा आहे. म्हणजे विधेयांगांतील 'विधेयपूरक' ह्या भागाचे दोन पोट-भाग झाले. एक 'सविस्तार कर्म' व दुसरा 'सविस्तार पूरक'.

ह्या सर्व विवेचनावरून आता हें लक्षांत येईल की, वाक्यपृथक्करणांत प्रथमतः वाक्याचे दोन प्रधान घटक किंवा अवयव मानले आहेत (१) उद्देश्यांग, (२) विधेयांग.

'उद्देश्यांग' ह्या घटकाचे किंवा अवयवाचे दोन पोट अवयव होतात– (१) मूल उद्देश्य (२) उद्देश्यविस्तार.

'विधेयांग' ह्या घटकाचे किंवा अवयवाचे तीन पोट अवयव होतात– (१) विधेयविस्तार, (२) विधेयपूरक, (अ) सविस्तार कर्म, (ब) सविस्तार-पूरक, (३) मूल विधेय.

ही विभागणी स्पष्ट दिसावी व सोयिस्कर रीतीने मांडून दाखवितां यावी म्हणून रकाने पाडून पुढीलप्रमाणे स्तंभात्मक तक्ता तयार करून त्यांत वाक्याचे हे अवयव किंवा घटक दाखवून वाक्यपृथक्करण लिहितात.

उद्देश्यांग		विधेयांग			
उद्देश्यविस्तार	मूल उद्देश्य	विधेय-विस्तार	विधेयपूरक		मूल विधेय
			सविस्तार कर्म	सविस्तार पूरक	

केवलवाक्यें व त्यांचें पृथक्करण

वाक्यपृथक्करणाच्या दृष्टीने वाक्यांचे तीन प्रकार मानले आहेत. (१) केवलवाक्य (२) मिश्रवाक्य (३) संयुक्तवाक्य.

'ज्या वाक्यांत एकच उद्देश्य असून एकच मूल विधेय म्हणजे क्रियापद असतें त्यास 'केवल वाक्य' म्हणतात.

पारिभाषिक संज्ञांचें विवेचन करतांना जीं चार वाक्यें उदाहरणादाखल घेतलीं आहेत तीं सर्व 'केवलवाक्यें' आहेत.

केवलवाक्यांचें पृथक्करण कसें करावें हें ध्यानांत यावें म्हणून नमुन्याकरिता कांही केवल वाक्यें घेऊन त्यांचें तक्त्यांत पृथक्करण करून दाखविलें आहे.

केवलवाक्यें

(१) गादीवर बसतांच पूर्वीच्या मुत्सद्द्यांस दूर करून संभाजीने कलुशाला आपला प्रधान नेमिलें.

(२) विद्या व ऐश्वर्य प्राप्त झालीं असतां थोर लोक अधिकच नम्र होतात.

(३) अगोदरच संपुष्टांत येणारी बादशाही सत्ता ह्या स्वारीमुळे बहुतेक नष्ट झाली.

(४) अहल्याबाई ही स्वधर्मावर पराकाष्ठेची निष्ठा ठेवणारी असूनहि परधर्माचा द्वेष करीत नसे.

(५) ह्या प्रांतांतील सर्व मंडळी महायुद्धाच्या भीतिदायक बातम्या रोज सकाळीं वर्तमानपत्रांतून वाचीत.

(६) बाळ गंगाधर टिळक ह्यांचा जन्म सत्तावन सालचें बंड सुरू होण्याच्या आधी दहाच महिने रत्नागिरी शहरांत २३ जुलई १८५६ या दिवशीं झाला.

(७) आम्ही भारतवासी लोक फार प्राचीन कालापासून ज्ञानाची उपासना करीत आलों आहोंत.

पृथक्करण (केवल वाक्यें)

वाक्य क्रमांक	उद्देश्यांग		विधेयांग			
				विधेयपूरक		
	उद्देश्य विस्तार	मूल उद्देश्य	विधेयविस्तार	सविस्तार कर्म	सविस्तार पूरक	मूल विधेय
१		संभाजीने	गादीवर बसतांच पूर्वीच्या मुत्सद्द्यांस दूर करून	कलुशाला	आपला प्रधान	नेमिलें.
२	थोर	लोक	विद्या व ऐश्वर्य प्राप्त झालीं असतां		अधिकच नम्र	होतात.

३	अगोदरच संपुष्टांत येणारी बादशाही	सत्ता	ह्या स्वारीमुळे		वहुतेक नष्ट	झाली.
४	अहल्याबाई	ही	स्वधर्मावर पराकाष्ठेची निष्ठा ठेवणारी असून	परधर्माचा द्वेष		करीत नसे.
५	ह्या प्रांतांतील सर्व	मंडळी	रोज सकाळीं वर्तमानपत्रांतून	महायुद्धच्या भीतिदायक वातम्या		वाचीत.
६	वाळ गंगाधर टिळक ह्यांचा	जन्म	सत्तावन सालचें वंड सुरूं होण्याच्या आधी दहाच महिने रत्नागिरी शहरांत २३ जुलई १८५६ ह्या दिवशीं			झाला.
७	भारतवासी लोक	आम्ही	फार प्राचीन काळापासून	ज्ञानाची उपासना		करीत आलों आहोंत.

मिश्रवाक्यें व त्यांचें पृथक्करण

ज्या वाक्यांत दोन अथवा अधिक पोटवाक्यें असतात परंतु त्यांपैकी एका वाक्यांत मुख्य अर्थ असून त्यावर दुसरीं वाक्यें अवलंबून असतात त्या समस्त वाक्यास मिश्र वाक्य असें म्हणतात.

मिश्रवाक्यांतील मुख्य उद्देश्य व मुख्य विधेय ह्यांनी होणाऱ्या पोटवाक्यास त्या मिश्रवाक्यांतील प्रधानवाक्य म्हणतात व त्यावर अवलंबून असलेल्या एक किंवा अनेक पोटवाक्यास गौणवाक्य असें म्हणतात. गौणवाक्यास कांही व्याकरणकार 'अवलंबी वाक्य' अशीहि संज्ञा देतात.

बोलणाराला जें मुख्य विधान करावयाचें असतें तें मिश्रवाक्यांतील प्रधानवाक्यांत असतें. म्हणजे मिश्रवाक्यांतील ज्या पोटवाक्यांत मुख्य विधान केलेलें असतें तें त्या मिश्रवाक्यांतील प्रधानवाक्य होय. प्रधानवाक्यांतील जें

विधान असतें त्याचा अर्थ पुरा करण्याचें काम किंवा अर्थांत भर घालण्याचें काम गौणवाक्यांकडून होतें. गौणवाक्यें हीं स्वतःच्या अर्थाच्या दृष्टीने प्रधान-वाक्यावर अवलंबून असतात.

'जेव्हा सूर्य उगवला तेव्हा पक्षी गाऊं लागले.' ह्या समस्त वाक्यांत दोन पोटवाक्यें आहेत–(१) जेव्हा सूर्य उगवला. (२) तेव्हा पक्षी गाऊं लागले. 'तेव्हा पक्षी गाऊं लागले' हें ह्या ठिकाणीं बोलणाराला मुख्यतः– प्रधानतः सांगावयाचें आहे. म्हणून ह्या ठिकाणीं समस्त वाक्यांतील 'तेव्हा पक्षी गाऊं लागले' हें प्रधानवाक्य झालें. पण ह्या एका प्रधान वाक्यावरून बोलणाराचें सर्व म्हणणें कळत नाही. बोलणाराचें सर्व म्हणणें कळण्यास दोन्हीहि पोटवाक्यांची जरूरी आहे. केव्हा गाऊं लागले ? ह्याचें उत्तर पहिल्या पोटवाक्यांत आहे. दुसऱ्या पोटवाक्यांतील घटनेचा काल पहिल्या पोटवाक्याने दाखविला आहे. प्रधानवाक्यांतील 'तेव्हा' हें पद केवळ 'जेव्हा' ह्या गौण-वाक्यांतिल अपेक्षेने आलें आहे.

मिश्रवाक्यांतील पोटवाक्यांपैकी एक वाक्य प्रधान किंवा मुख्य असून बाकीचीं त्याच्यावर अवलंबून असणारीं गौण वाक्यें असतात. कोणत्याहि मिश्रवाक्यांत प्रधानवाक्य एकच असतें पण गौणवाक्यें एक किंवा अनेक असूं शकतात. मिश्रवाक्यांतील प्रधानवाक्य केव्हा समस्त वाक्याच्या आरंभीं येतें तर कधी शेवटीं येतें. गौणवाक्यांचे तीन प्रकार आहेत— (१) नामगौणवाक्यें (२) विशेषण-गौणवाक्यें (३) क्रियाविशेषण-अव्यय-गौणवाक्यें—

ह्या तीन प्रकारच्या गौणवाक्यांचा आता विचार करूं.

नामगौणवाक्यें—नामगौणवाक्य हें मिश्रवाक्यांत नामाचें कार्य करतें. नामगौणवाक्य नामाचें हें कार्य पुढील प्रकारांनी करतें.

नामगौणवाक्य हें मिश्रवाक्यांतील प्रधानवाक्याच्या किंवा दुसऱ्या गौणवाक्याच्या (१) क्रियेच्या उद्देश्याशीं समानाधिकरण असतें. (२) क्रियेच्या कर्मस्थानीं येतें अगर कर्माशीं समानाधिकरण असतें. (३) एखाद्या नामाशीं समानाधिकरण असतें. (४) क्रियेच्या पूरकाशीं समानाधिकरण असतें.

'यमूने गाडीने जावें हें गोविंदराव म्हणाले ही गोष्ट वसंताने स्पष्ट केली.' ह्या मिश्रवाक्यांत 'ही गोष्ट वसंताने स्पष्ट केली,' हें प्रधानवाक्य आहे व बाकीचीं दोन गौण वाक्यें आहेत. 'ही गोष्ट वसंताने केली.' हें प्रधान वाक्य. कोणती गोष्ट ? 'हें गोविंदराव म्हणाले' ही गोष्ट. म्हणजे हें गौणवाक्य प्रधान वाक्यांतील 'गोष्ट' ह्या नामाशीं समानाधिकरण आहे.

म्हणून तें 'नामगौणवाक्य' ठरतें. 'हें गोविंदराव म्हणाले,' हें नामगौण-वाक्य. ह्या वाक्यांत 'हें' कर्म आहे. 'हें' म्हणजे काय? 'यमूने गाडीने जावें.' तेव्हा हें गौणवाक्य 'म्हणाले' ह्याचें कर्म अगर 'म्हणाले' ह्याच्या 'हें' ह्या कर्माशीं समानाधिकरण आहे म्हणून तें 'नामगौणवाक्य' होय.

'शेवटीं त्याने उद्गार काढले कीं, "आपल्या मुलांना योग्य शिक्षण कोणतें द्यावें," हा आज लोकांपुढे प्रश्न आहे.' ह्या मिश्र वाक्यांतील 'शेवटीं त्याने उद्गार काढले.' हें प्रधानवाक्य आहे. काय उद्गार काढले? 'हा आज लोकापुढे प्रश्न आहे' हें नामगौण वाक्य; कारण तें प्रधान-वाक्यांतिल 'उद्गार' ह्या नामाशीं समानाधिकरण आहे. 'हा आज लोकापुढे प्रश्न आहे.' ह्या गौणवाक्यांत 'हा' कर्ता आहे व प्रश्न हें नाम ह्या गौण-वाक्यांतील क्रियापदाचें 'पूरक' आहे. कोणता प्रश्न? 'आपल्या मुलांना योग्य शिक्षण द्यावें' हें गौणवाक्य नामगौणवाक्य होय. कारण तें 'प्रश्न' ह्या विधेयपूरकाशीं समानाधिकरण आहे.

'एखाद्याने सर्वांशीं सारखें भांडावें, हें बरें नाहीं.' ह्या मिश्र-वाक्यांत 'हें बरें नाहीं' हें प्रधान वाक्य आहे व 'एखाद्याने सर्वांशीं सारखें भांडावें' हें गौणवाक्य प्रधानवाक्यांतील 'हें' ह्या उद्देश्याशीं समानाधिकरण आहे म्हणून तें 'नामगौणवाक्य' होय.

'नामगौणवाक्य' हें मिश्र वाक्यांतील प्रधान वाक्याला किंवा दुसऱ्या गौण वाक्याला कसें जोडलें जातें तें लक्षांत धरावें. 'नामगौणवाक्य' अगोदर असतां हें, असें, म्हणून, ह्यांपैकी कोणते तरी शब्द त्यांच्यापुढे येऊन नंतर प्रधान वाक्य किंवा दुसरें गौण वाक्य त्याच्यापुढे येतें. कित्येक वेळीं गौण-वाक्यापुढे 'म्हणून' हें उभयान्वयी अव्यय येऊनहि तें पुढील वाक्याशीं जोडलें जातें. 'उन्हांत हिंडूं नका म्हणून बाबांनी मुलांना ताकीद दिली!' नामगौण-वाक्याचा संबंध त्याच्यापूर्वी आलेल्या प्रधान वाक्याशीं किंवा गौण वाक्याशीं असेल, तर त्या नामगौणवाक्यापूर्वी 'कीं' हें स्वरूपदर्शक अव्यय येतें.

विशेषणगौणवाक्यें— मिश्र वाक्यांतील गौणवाक्यें जेव्हा विशेषणाचें कार्य करतात, तेव्हा तीं 'विशेषणगौणवाक्यें' होत.

'ती जेथे राहात होती त्या गांवापासून आगगाडीने मुंबई दीड तासाच्या रस्त्यावर आहे.' ह्या ठिकाणीं 'ती जेथे राहात होती' हें गौण वाक्य पुढील प्रधान वाक्यांतील 'गांव' ह्या नामाची विशेष माहिती देत आहे म्हणून तें 'विशेषणगौणवाक्य' होय.

'तो जेवढें बोलला तेवढें ध्यानांत घरून पुढे काम करा.' ह्या ठिकाणीं 'तो जेवढें बोलला' हें पुढील वाक्यांतील 'तेवढें' ह्याचें 'बोलणें' ह्या अध्याहृत विशेष्याच्या (नामाच्या) विशेषणाचें कार्य करीत आहे, म्हणून 'तो जेवढें बोलला' हें गौण वाक्य येथे 'विशेषणगौणवाक्य' होय.

'आज जी कीर्ति त्यानें मिळविली, ती त्याने आपल्या कार्याने मिळविली आहे हें पहावयास नको काय?' ह्या ठिकाणीं 'आज जी कीर्ति त्याने मिळविली' हें 'विशेषणगौण' आहे, कारण तें पुढील वाक्यांतील 'ती' ह्या कर्माचा विस्तार करीत आहे. 'ती' ह्या कर्मावरून विशेष माहिती सांगत आहे.

'ज्या दसऱ्याला आता मराठे लोक फक्त शमी-पूजनासाठी सीमोल्लंघन करतात, त्या दसऱ्याला पूर्वी मराठे सरदार शत्रूवर मोहीम करण्यास निघत.' ह्या ठिकाणीं 'ज्या दसऱ्याला.....करतात' हें गौण वाक्य पुढील वाक्यांतील 'दसरा' ह्या नामाच्या अर्थाचें पोषक आहे म्हणजे 'दसरा' ह्या नामाच्या अर्थात भर घालीत आहे व विशेषणाचें कार्य करीत आहे म्हणून तें 'विशेषणगौण' आहे.

विशेषणगौणवाक्यें दुसऱ्या गौण वाक्याशीं किंवा प्रधान वाक्याशीं जोडण्याचें कार्य जो, जी, जें हीं संबंधी सर्वनामें व जितका, जेवढा हीं संबंधी विशेषणें करतात. विशेषणगौणवाक्याच्या आरंभीं हीं बहुधा येतात व विशेषण-गौणवाक्याचा ज्या गौण वाक्याशीं किंवा प्रधान वाक्याशीं संबंध असेल, त्याच्या आरंभीं तो, ती, तें हीं सर्वनामें व तितका, तेवढा हीं विशेषणें येतात.

क्रियाविशेषणअव्यय गौणवाक्यें—क्रियेचा काळ, स्थल, रीत, संकेत, कारण, परिणाम वगैरेंचा बोध क्रियाविशेषण अव्ययामुळे होतो. ज्या मिश्र वाक्यांतील गौण वाक्यामुळे ह्या गोष्टींचा बोध होतो, त्या गौण वाक्यास 'क्रियाविशेषणअव्ययगौणवाक्य' म्हणतात.

'जेव्हा शेवटची घंटा होते, तेव्हा मुलें शाळेबाहेर पडतात.' ह्या ठिकाणीं 'जेव्हा शेवटची घंटा होते' हें गौण वाक्य प्रधान वाक्यांतील क्रियापदांतील क्रियेचें कालदर्शक आहे म्हणून तें 'क्रियाविशेषणअव्ययगौण' होय.

'वैभवाच्या काळांत जेथे भगवे झेंडे फडकले, तेथे आज कोल्ह्या-कुत्र्यांची वसती असावी ना!' ह्या ठिकाणीं 'वैभवाच्या काळांत..... फडकले' हें गौण वाक्य प्रधान वाक्यांतील क्रियेचें स्थलदर्शक आहे म्हणून तें 'क्रियाविशेषणअव्ययगौण' आहे.

'ज्याप्रमाणे प्रल्हादाच्या हांकेला ओ दिलीस, त्याप्रमाणे माझ्या बाबतींत कां करीत नाहीस ?' ह्या ठिकाणीं 'ज्याप्रमाणे.....ओ दिलीस' हें गौण वाक्य प्रधान वाक्यांतील 'करणें' ह्या क्रियेचें रीतिदर्शक आहे म्हणून तें 'क्रियाविशेषणअव्ययगौण' आहे.

'ज्या अर्थी त्याने इतका प्रयत्न केला आहे, त्या अर्थी त्याला यश मिळणार.' ह्या ठिकाणीं 'ज्या अर्थी.....केला आहे' हें गौण वाक्य प्रधान वाक्यांतील क्रियेचें संकेत-दर्शक आहे म्हणून तें 'क्रियाविशेषणअव्ययगौण' होय.

'दिवाळींत फराळावर त्याने झोड उठविली म्हणून तो आजारी झाला.' 'दिवाळींत..... झोड उठविली' हें क्रियाविशेषणअव्ययगौण कारण तें प्रधान वाक्यांतील क्रियेचें कारणदर्शक आहे.

स्थलवाचक, कालवाचक, रीतिवाचक इत्यादि क्रियाविशेषण अव्ययांनी त्याचप्रमाणें संकेतबोधक व कारणबोधक उभयान्वयी अव्ययांनी क्रियाविशेषण-अव्ययगौणवाक्यें हीं मिश्र वाक्यांतील प्रधान वाक्याशीं अगर दुसऱ्या गौण वाक्याशीं जोडलेलीं असतात.

मिश्र वाक्याचें पृथक्करण करतांना प्रथम त्या समस्त वाक्यांतील क्रियापदें–विधेयें–पाहावींत. ह्यावरून त्या समस्त मिश्र वाक्यांत एकूण किती पोटवाक्यें आहेत हें समजतें. मग त्यांतील प्रधान वाक्य शोधून मांडावें. प्रधान वाक्यावर अवलंबून असणारें गौण वाक्य पाहावें व तें लिहावें. मग त्या गौण वाक्यावर जीं इतर गौण वाक्यें अवलंबून असतील, तीं पाहावींत व तीं लिहावींत. समस्त मिश्र वाक्यांतील सर्व पोटवाक्यें अशा तऱ्हेनें योग्य क्रमांक देऊन लिहून झालीं म्हणजे प्रत्येकाच्या पुढे त्या त्या पोटवाक्याची मिश्र वाक्याच्या दृष्टीने होणारी जाति व तिचें स्पष्टीकरण लिहावें व नंतर स्तंभात्मक पृथक्करण करावें.

नमुन्याकरिता एका मिश्रवाक्याचें पृथक्करण लिहून दाखविलें आहे.

वाक्य—सॉक्रेटीस ज्या वेळीं तरुणांच्यापुढे भाषणें करूं लागला त्या वेळीं लोकांचें असें मत झालें कीं, तो जें शिकवितो तें ऐकून तरुण खास बिघडतील.

स्पष्टीकरण—ह्या समस्त वाक्यांत एकूण चार पोटवाक्यें आहेत.

(१) त्या वेळीं लोकांचें असें मत झालें. — प्रधान वाक्य.

(२) कीं तें ऐकून तरुण खास बिघडतील. — नामगौण वाक्य. प्रधान वाक्यांतील 'मत' ह्याच्याशीं समानाधिकरण.

(३) तो जें शिकवितो. — विशेषणगौणवाक्य. दुसऱ्या वाक्यांतील 'तें' ह्याचें स्पष्टीकरण.

(४) सॉक्रेटीस ज्या वेळीं तरुणापुढे भाषण करूं लागला. — क्रियाविशेषणअव्ययगौणवाक्य. कालदर्शक–संबंध 'झालें' ह्या प्रधान वाक्यांतील क्रियापदाकडे.

ह्या समस्त वाक्यांत एक प्रधान व बाकीचीं गौण म्हणून हें समस्त वाक्य मिश्र होय. ह्याचें स्तंभात्मक पृथक्करण पुढीलप्रमाणे होईल—

वाक्य क्रमांक	जोडशब्द	उद्देश्यांग		विधेयांग			
		उद्देश्य विस्तार	मूल उद्देश्य	विधेय विस्तार	विधेयपूरक		मूल विधेय
					सविस्तार कर्म	सविस्तार पूरक	
१		लोकांचें असें	मत	त्या वेळीं			झालें.
२	कीं		तरुण	तें ऐकून खास			बिघडतील.
३			तो		जें		शिकवितो.
४			सॉक्रेटीस	ज्या वेळीं तरुणांच्या पुढे	भाषणें		करूं लागला.

संयुक्तवाक्यें व त्यांचें पृथक्करण

अर्थदृष्ट्या स्वतंत्र व पूर्ण अशीं एकापेक्षा अधिक वाक्यें (केवल किंवा मिश्र) 'आणि', 'व', 'परंतु' इत्यादि उभयान्वयी अव्ययांनीं जोडून जें समस्त वाक्य तयार होतें त्यास 'संयुक्तवाक्य' म्हणतात.

'सूर्य उगवला आणि पक्षी गाऊं लागले.' ह्या वाक्यांत दोन पोटवाक्यें आहेत व तीं 'आणि' ह्या उभयान्वयी अव्ययांनी जोडलीं आहेत. 'सूर्य उगवला' हें केवल वाक्य अर्थाच्या दृष्टीने स्वतंत्र आहे. त्याच्या अर्थाच्या परिपूर्णतेकरिता तें त्याला जोडलेल्या दुसऱ्या केवल वाक्यावर अवलंबून नाही. तसेंच दुसऱ्या पोटकेवलवाक्याचें आहे. ह्या ठिकाणीं दोन केवलवाक्यांनी संयुक्तवाक्य बनलें आहे. समस्त वाक्यांतील दोन्ही केवलवाक्यें समान महत्त्वाचीं, समबल व स्वतंत्र आहेत. बोलणाराला जें विधान करावयाचें आहे तें समग्र दोन्ही वाक्यांद्वारें कळतें. 'सूर्य उगवला' हें एक स्वतंत्र विधान व 'पक्षी गाऊं लागले' हें दुसरें स्वतंत्र विधान. दोन्ही गोष्टी बोलणाराला सांगावयाच्या आहेत. म्हणून दोन्ही स्वतंत्र विधानें 'आणि' ह्या उभयान्वयी अव्ययांनी जोडून एकत्र आणून एक जोडवाक्य तयार झालें आहे. दोन्ही जोडलेलीं वाक्यें स्वतंत्र समान (समबल) आहेत. म्हणून समस्त वाक्य 'संयुक्तवाक्य' होय. दोनांपेक्षा अधिक केवलवाक्यें उभयान्वयी अव्ययाकडून जोडलीं जाऊन 'संयुक्त वाक्य' बनतें. 'आकाशांत मेघांचा गडगडाट झाला, भयंकर विजा चमकूं लागल्या आणि मुसळधार पाऊस पडूं लागला.' ह्या ठिकाणीं तीन केवलवाक्यें स्वतंत्र समान आहेत व त्यांवरून समस्तवाक्य बनलें आहे. तें संयुक्तवाक्य आहे. 'गंगेची शीघ्रगति मंद झाली; तिच्या प्रचंड लाटा कमी झाल्या; तिचें विस्तीर्ण पात्र आकुंचित झालें आणि तिचें गढूळ पाणी स्फटिकासारखें स्वच्छ झालें.' हें संयुक्त वाक्य चार केवळ स्वतंत्र-समान वाक्यांनी सिद्ध झालें आहे.

संयुक्तवाक्य केवळ दोन किंवा दोनपेक्षा अधिक स्वतंत्र समान केवल वाक्यें उभयान्वयी अव्ययांनी जोडून समस्त वाक्य होऊन बनतें असें नाही. केवळ व मिश्र किंवा मिश्र व मिश्र अशीं स्वतंत्र समान वाक्यें उभयान्वयी अव्ययांनी जोडलेलीं समस्त वाक्यें हींहि संयुक्तवाक्यें होत.

'मीराबाईने परत येऊन देवभक्ति करीत चितोडास खुशाल रहावें म्हणून कुंभराण्याने बहुत यत्न केला; परंतु मीराबाईने त्याचें म्हणणें ऐकलें नाही.' हें संयुक्त वाक्य आहे. येथे एक मिश्र व एक केवल अशीं दोन स्वतंत्र समान वाक्यें जोडून संयुक्त वाक्य बनलें आहे.

'इतिहासाच्या वाचनाने विचारशक्ति वाढते हें अगदी उघड आहे; परंतु ती कां वाढते व कशी वाढते, यावर अमळ विस्तार करणें आवश्यक आहे.' ह्या ठिकाणीं दोन स्वतंत्र समान मिश्रवाक्यांचें संयुक्त वाक्य बनलें आहे.

संयुक्त वाक्यांतील स्वतंत्र समान वाक्यें परस्परांस जोडणारीं अव्ययें पुढे दिलीं आहेत.

उभयान्वयी अव्ययें	}	समुच्चयबोधक—आणि, व, आणखी.
		विकल्पबोधक—किंवा, अथवा, अगर, कीं.
		न्यूनत्वबोधक—पण, परंतु, तथापि.

संयुक्त वाक्यार्चें पृथक्करण लिहितांना प्रथम तें संयुक्तवाक्य ज्या स्वतंत्र-समान वाक्यांनी बनलें आहे तीं द्यावींत. त्यांतील जीं मिश्र असतील त्यांतील प्रधान वाक्य व गौण वाक्यें सांगावींत व नंतर स्तंभात्मक पृथक्करण करावें. पुढे नमुना दिला आहे तो पाहा.

वाक्य—इतिहासाच्या वाचनाने विचारशक्ति वाढते हें अगदीं उघड आहे; परंतु ती कां वाढते व ती कशी वाढते ह्यावर अमळ विस्तार करणें जरूर आहे.

स्पष्टीकरण—

(१) इतिहासाच्या वाचनाने विचारशक्ति वाढते हें अगदी उघड आहे.

(२) ती कां वाढते व ती कशी वाढते ह्यावर अमळ विस्तार करणें जरूर आहे.

हीं दोन मिश्रवाक्यें 'परंतु' या उभयान्वयी अव्ययाने जोडलीं आहेत व तीं स्वतंत्र-समान आहेत. म्हणून ह्या दोहोंमिळून होणारें हें समस्त वाक्य संयुक्तवाक्य आहे.

वाक्य नंबर १

(अ) हें अगदी उघड आहे.	—	प्रधान वाक्य
(ब) इतिहासाच्या वाचनाने विचारशक्ति वाढते.	—	नामगौण वाक्य (अ) मधील 'हें' ह्याच्याशीं समानाधिकरण

वाक्य नंबर २

(अ) ह्यावर अमळ विचार करणें जरूर आहे.	—	प्रधान वाक्य
(ब) ती कां वाढते.	—	नामगौण } अ मधील 'ह्यावर' ह्यांतील 'ह्या' सर्वनामाशीं समानाधिकरण
(क) ती कशी वाढते.	—	नामगौण }

ह्याचें स्तंभात्मक पृथक्करण पुढीलप्रमाणे होईल :—

वाक्यक्रमांक	जोड-शब्द	उद्देश्यांग		विधेयांग			
		उद्देश्य विस्तार	मूल उद्देश्य	विधेय विस्तार	सविस्तार कर्म	सविस्तार पूरक	मूल विधेय
१अ			हें			अगदी उघड	आहे.
१ब			विचारशक्ति	इतिहासाच्या वाचनाने			वाढते.
२अ		ह्यावर अमळ विस्तार	करणें			जरूर	आहे.
२ब	परंतु		ती	कां			वाढते.
२क	व		ती	कशी			वाढते.

१. पुढील वाक्यांचें पृथक्करण लिहा—

(अ) (१) सार्वजनिक आरोग्य चांगलें राखण्याची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीवर पडते.

(२) स्मरणशक्ति खूप कमावलेली असल्याने गोखल्यांचें इंग्रजी भाषेचें पाठांतर फार चांगलें होतें.

(३) शिकारीच्या नादांत एकदा दुष्यन्त राजा भटकत भटकत कण्व-ऋषींच्या तपोवनांत गेला.

(४) जोराच्या तुफानांतहि धीर न सोडतां खलाशांनी आपलें जहाज सुरक्षितपणें किनाऱ्यास लावलें.

(५) आपल्या प्रेमळ चुलत्याचा खून केल्यानंतर राज्यारोहण-प्रसंगीं लोकांना खूष करण्याकरिता अल्लाउद्दिनाने पैशाची खैरात केली.

(ब) (१) रामायणाचें खरें वैशिष्ट्य हें आहे की, त्यांत एका कुटुंबाची हकीकत अत्यंत विशाल स्वरूपांत दाखविली आहे.

(२) अशा उदात्त आणि रम्य प्रदेशांत जो जाईल तो कवि होऊन माघारी येईल ह्यांत शंका वाटत नाही.

(३) ' जिथं जाल तिथं सुखी असा, हाच माझा तुम्हांला आशीर्वाद ' हें बोलतां बोलतां वामनरावजींच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

(४) कदाचित् ईश्वराची इच्छाच अशी असेल की, मला शिक्षा व्हावी आणि शिक्षा भोगल्याच्या कारणानेच मीं अंगिकारिलेल्या कार्याला ऊर्जित दशा यावी.

(५) ' आमच्या आयुष्यांतील आठवणी ' या सरस ग्रंथांत जीं प्रकरणें वाङ्मयदृष्ट्या विशेष चांगलीं वठलीं आहेत त्यांत ' करमाळ्याचें दुखणें ' हें प्रकरण विशेष सरस ठरलें ह्यांत शंका नाही.

(क) (१) हे श्लोक चंद्रशेखर म्हणूं लागले कीं, त्यांची भूमिका उज्ज्वल होई व हिमालयाच्या पवित्र शिखरावर बसून हा कोणी वेदकालीन महात्माच सर्व विश्वास आवाहन करीत आहे, असें ऐकणाराला वाटे.

(२) आमचा महाराष्ट्र पुष्कळांना कठोर वाटतो; परंतु महाराष्ट्राचा हा कठोरपणा नारळाचा कठोरपणा आहे आणि ह्या ओबडधोबड महाराष्ट्राच्या अंतरंगीं प्रखर उन्हांतहि न सुकणारे झरे वाहात असतात, हें इतिहासाने सिद्ध केलें आहे.

२. पुढील मिश्र वाक्यांतील गौण वाक्यें सांगून तीं कोणत्या प्रकारांत (नामगौण, विशेषणगौण, क्रियाविशेषणअव्ययगौण) पडतात त्याचें स्पष्टीकरण करा.

(१) शहाणपण वयावर अवलंबून असतें असें कांही लोक मानतात.

(२) आज मनुष्याने सृष्टीवर जें स्वामित्व प्रस्थापित केलें आहे तें केवळ बुद्धिसामर्थ्याच्या साहाय्यानेच केलें आहे.

(३) जर मनुष्याने लोखंडाचें साहाय्य घेतलें नसतें तर आजची सुधारणा दिसली नसती.

(४) लोकांनी आपल्याला चांगलें म्हणावें ही इच्छा मनुष्यमात्राच्या ठिकाणीं दिसून येते.

(५) चंद्रशेखरांचें म्हणणें असें कीं, कवीला श्रम करावे लागत नाहीत, हें मत भ्रामक आहे.

(६) हातांत सोन्याचे कण घेतले तर ते वाळूचे कण होतील इतका माझा हात अपेशी आहे.

(७) असें म्हणतात कीं, अहल्याबाईने आपल्या हयातींत जितका दानधर्म कला तितका दानधर्म कोणत्याहि राजेरजवाड्यांनी केला नाही.

(८) ज्यांना आपल्या अंतःकरणाच्या तारुण्याबद्दल विश्वास वाटत नाही त्यांच्यासाठी बाजारांतले सारे कलप आहेत.

(९) संकटाच्या वेळीं ज्यांचें नैतिक सामर्थ्य ढासळत नाही तेच खरे नीतिमान् होत.

(१०) जेव्हा जेव्हा मजवर एखादें संकट येतें तेव्हा तेव्हा मला त्यापासून कांही तरी फायदाच होतो.

३. खालील वाक्यांत रिकाम्या जागीं गौणवाक्य घाला व तें गौण-वाक्य कोणत्या प्रकारांत पडतें तें सांगा—

(१) धर्मभास्कर संभाजीने औरंगजेबास सांगितलें की.....

(२) .....अशा मनुष्यास परमेश्वर धीर देतो.

(३) .....तितका स्वार्थत्याग प्रत्येकाने केलाच पाहिजे.

(४) .....म्हणून रामाने रावणाशीं लढाई केली.

४. पुढील वाक्यापैकी कोणतें केवल, कोणतें मिश्र व कोणतें संयुक्त तें सकारण सांगा—

(१) जोराचा पाऊस पडला असतांना देखील मुलें पाण्यांत खेळत होतीं.

(२) जेव्हा जोराचा पाऊस पडला तेव्हा मुलें पाण्यांत खेळत होतीं.

(३) जोराचा पाऊस पडला होता व मुलें पाण्यांत खेळत होतीं.

(४) आमच्या घरीं नानाप्रकारचीं माणसें येऊन गेलीं.

(५) आमच्या घरीं नाना प्रकारचीं माणसें आलीं आणि गेलीं.

(६) ठोंबरे ह्यांना चार पत्रें टाकिलीं तरी त्यांनी उत्तर पाठविलें नाही.

(७) ठोबरे ह्यांना चार पत्रें टाकिलीं पण त्यांनी उत्तर पाठविलें नाही.

१२. समास

'समास' म्हणजे काय?

आपल्या नेहमीच्या बोलण्यांत 'ईश्वरोपासना,' 'तोंडपाठ,' 'ऋण-मुक्त,' 'रोगग्रस्त,' 'अष्टभुजा,' 'यावज्जीव,' 'यथाशक्ति' ह्यांसारखे कितीतरी शब्द आपण वापरतों. हे सर्व जोडशब्द आहेत. म्हणजे दोन शब्द एके ठिकाणीं येऊन ते सिद्ध झालेले आहेत. अशा प्रकारचे जोडशब्द वापरावयाचें प्रयोजन काय? आपलें म्हणणें थोडक्या शब्दांत सांगतां यावें, त्याला सुटसुटितपणा यावा आणि भाषेला डौलदारपणा व सौंदर्य आणावें यासाठी अशा जोडशब्दांचा उपयोग करण्याची प्रवृत्ति बहुतेक सर्वच प्रगत भाषांत आढळते व तशी ती आपल्या भाषेतहि आढळते.

'ईश्वराची उपासना' ह्या आठ अक्षरांऐवजी 'ईश्वरोपासना' असें म्हटल्याने आपलें फक्त सहा अक्षरांनी काम भागतें.

'तो ऋणमुक्त झाला,' हें वाक्य 'तो ऋणापासून मुक्त झाला' ह्यापेक्षा अधिक सुटसुटित व डौलदार वाटतें.

'नवरात्रांत लोक आठ आहेत भुजा जिला अशा देवीच्या दर्शनाला जातात,' ह्याऐवजी 'नवरात्रांत लोक अष्टभुजा देवीला जातात,' हें वाक्य केव्हाहि सुटसुटित व डौलदार वाटतें.

हे जोडशब्द कसे बनले आहेत तें पाहा—

'ईश्वराची उपासना – ईश्वरोपासना.' 'तोंडाने पाठ – तोंडपाठ.' 'ऋणापासून मुक्त–ऋणमुक्त.' 'रोगाने ग्रस्त–रोगग्रस्त' 'आठ आहेत भुजा जिला अशी–अष्टभुजा.' 'जीव आहे तोपर्यंत–यावज्जीव.' 'शक्तीप्रमाणें–यथाशक्ति.' जोडशब्दांची ही जी फोड करून दाखविली त्यावरून असें दिसून येईल की, पहिला व दुसरा शब्द ह्यांमधील परस्परसंबंधदर्शक विभक्तिप्रत्यय, शब्दयोगी अव्यय, अगर इतर शब्द गाळून किंवा त्याचा लोप करून हे जोडशब्द बनविले आहेत. अशा जोडशब्दांना व्याकरणांत 'सामासिक शब्द' म्हणतात.

दोन किंवा अधिक शब्दांमधील विभक्तिप्रत्यय गाळून किंवा परस्पर-संबंध दाखविणारे शब्द गाळून जोडशब्द तयार करण्याच्या रीतीस **समास करणें** म्हणतात व जो जोडशब्द सिद्ध होतो त्याला **समास** किंवा **सामासिक शब्द** म्हणतात.

समासांतील घटक शब्दास सामासिक पद म्हणतात आणि ह्या पदांतील परस्परसंबंध दाखविणारे विभक्तिप्रत्यय, शब्दयोगी अव्ययें अगर इतर शब्द जेथल्या तेथे घालून फोड करून दाखविणें ह्याला **विग्रह** करणें असें म्हणतात.

वर जीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांतील 'ईश्वराची उपासना', 'तोंडाने पाठ' इत्यादि त्यांच्यापुढे दिलेल्या समासांचे विग्रह आहेत.

समासांचे प्रधान प्रकार

समासाचे मूलभूत घटक किंवा पदें ह्यांची संख्या दोन हीं असल्यामुळे ह्या दोन घटकांच्या एकमेकांशीं असलेल्या संबंधावरून समासाच्या जाति अगर प्रकार ठरतात. समासांत जीं दोन पदें असतात त्या पदांपैकी समासाच्या अर्थाच्या दृष्टीने ज्या पदाला प्राधान्य असतें त्यावरून समासाचे एकूण चार प्रकार होतात. थोडक्यांत सामासिक शब्दामधील पदप्राधान्यावरून समासाच्या चार प्रधान जाति ठरविल्या गेल्या आहेत.

(१) ज्या समासामध्ये दुसरें पद प्रधान असतें त्याला **तत्पुरुष समास** म्हणतात.

ईश्वरनिर्मित–ईश्वराने निर्मित.

रोगमुक्त–रोगापासून मुक्त.

कूपमंडूक– कूपांतील मंडूक.

ह्या ठिकाणीं कोणीं निर्मित, कशापासून मुक्त, कोणता मंडूक इत्यादि समासांतल्या दुसऱ्या पदाला प्राधान्य देऊन त्यांच्याविषयींच बोलावयाचें आहे व तसें बोलतांना त्या दोन शब्दांमधील परस्परसंबंध दाखविणारे विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्ययें हीं गाळलीं आहेत. अशा प्रकारच्या समासांना 'तत्पुरुष' समास म्हणतात.

(२) ज्या समासामध्ये दोन्ही पदें प्रधान असतात, त्याला **द्वंद्व समास** म्हणतात.

'कृष्णार्जुन रथावर चढले.' 'रामलक्ष्मण वनांत गेले.' **कृष्णार्जुन**– कृष्ण आणि अर्जुन. येथे दोन्हीहि पदांना प्राधान्य आहे. चढले कोण? कृष्ण आणि अर्जुन.

रामलक्ष्मण– राम आणि लक्ष्मण. येथे दोन्हीहि पदांना प्राधान्य आहे. गेले कोण? राम आणि लक्ष्मण.

ह्या समासांत जीं दोन पदें आहेत त्या दोन्हींबद्दल मुख्यतः बोलावयाचें आहे, अर्थाच्या दृष्टीने दोन्हीहि पदें महत्त्वाचीं म्हणजे प्रधान आहेत व समास बनवितांना उभयान्वयी अव्यय 'आणि' ह्याचा लोप झाला आहे. अशा समासांना 'द्वंद्व' समास म्हणतात.

(३) ज्या समासामध्ये दोन्ही पदांना प्राधान्य नसून त्यांच्या जुळणीने तिसरें पद सूचित होतें, त्या समासाला बहुव्रीहि समास म्हणतात.

चतुर्मुख—चार आहेत मुखें ज्याला तो; ब्रह्मदेव.

गजानन—गजासारखें आनन आहे ज्याचें तो; गणपति.

गजानन हा सामासिक शब्द. गज + आनन हीं ह्यांतील दोन घटक पदें. 'गजाननाला नमस्कार करा.' कोणाला नमस्कार करावयाचा ? 'गजाला' कीं 'आननाला' ? 'गज' म्हणजे 'हत्ती' व 'आनन' म्हणजे 'तोंड'. 'गजाचें आहे आनन म्हणजे तोंड ज्याला असा जो' **गणपति** त्याला नमस्कार करावयाचा. म्हणजे गज + आनन ह्या दोन पदांच्या जुळणीने जो 'गजानन' असा समास झाला त्या समासांतील दोन्ही पदांना प्राधान्य नसून त्या दोन्ही पदांच्या जुळणीवरून 'गणपति' अशा तिसऱ्या पदाचा अर्थ सूचित होतो. दोन्हीहि पदांनी सूचित होणारी व्यक्ति तिसरीच आहे. अशा समासांना 'बहुव्रीहि' समास म्हणतात.

(४) ज्या समासामध्ये पहिल्या पदाला प्राधान्य असतें व संबंध जोडशब्द अव्ययाचें काम करतो तेव्हा त्याला **अव्ययीभाव समास** म्हणतात.

महात्मा गांधींनी आपलें देशसेवेचें व्रत आमरण चालविलें.

प्रत्येकाने **यथाशक्ति** देशसेवा करावी असा त्यांचा संदेश होता.

आमरण—आ + मरण – मरणापर्यंत (आ = पर्यंत)

यथाशक्ति—यथा + शक्ति – शक्तीप्रमाणे (यथा = प्रमाणे)

ह्या ठिकाणीं अर्थाच्या दृष्टीने पहिलीं पदें 'आ' व 'यथा' ह्यांना प्राधान्य आहे व दोन्ही ठिकाणीं जोडशब्दांनी 'अव्यया'चें कार्य केलं आहे. अशा समासांना 'अव्ययीभाव' समास म्हणतात.

अशा रीतीने समासांचे मुख्य चार प्रकार मानिले आहेत— (१) तत्पुरुष (दुसरें पद प्रधान), (२) द्वंद्व (दोन्ही पदें प्रधान), (३) बहुव्रीहि (दोन्ही पदें गौण), (४) अव्ययीभाव (पहिलें पद प्रधान).

तत्पुरुष

ज्या समासामध्ये दुसरें पद प्रधान असतें त्या समासाला 'तत्पुरुष' समास म्हणतात. ह्या समासाचे भेद किंवा पोटप्रकार कोणते तें पाहूं.

(१) विभक्ति तत्पुरुष—ज्या समासांत दुसरें पद प्रधान असतें व पहिल्या पदाच्या विभक्तीचा लोप झालेला असतो त्यास 'विभक्ति तत्पुरुष' म्हणतात. सामान्यतः विभक्तितत्पुरुष ही संज्ञा न योजतां 'तत्पुरुष' ही संज्ञा योजिली जाते. पहिल्या पदाची जी विभक्ति गाळलेली असते तिच्यावरून ह्या समासाचे पुन्हा प्रकार होतात. शब्दयोगी अव्ययें विभक्तिप्रत्ययांचें काम करतात. म्हणून विग्रह करतांना जरूर तेथे तीं अव्ययें घालतात. गाळलेले प्रत्यय अगर अव्यय ज्या विभक्तीचें असतें त्यावरून तो तो तत्पुरुष त्या त्या विभक्तीचा मानला जाऊन, त्या विभक्तीवरून त्याला नांव दिलें जातें.

द्वितीया तत्पुरुष—कृष्णाश्रित—कृष्णाप्रत आश्रित.
स्थानापन्न—स्थानाप्रत आपन्न.
द्वितीया तत्पुरुष समास थोडे आढळतात.

तृतीया तत्पुरुष—भक्तिवश – भक्तीने वश
—ईश्वरनिर्मित – ईश्वराने निर्मित

चतुर्थी तत्पुरुष—ब्राह्मणभोजन– ब्राह्मणाकरिता (ब्राह्मणांना) भोजन.
—यज्ञस्तंभ – यज्ञाकरिता स्तंभ.

पंचमी तत्पुरुष—रोगमुक्त – रोगापासून मुक्त
—चोरभय – चोरापासून भय.

षष्ठी तत्पुरुष —सूर्यप्रकाश – सूर्याचा प्रकाश
—राजवाडा – राजाचा वाडा.

सप्तमी तत्पुरुष—गृहप्रवेश – गृहामध्ये प्रवेश
—रणशूर – रणामध्ये शूर.

(२) उपपद तत्पुरुष—ज्या तत्पुरुष समासांतील दुसरें पद, ज्याचा वाक्यांत स्वतंत्रपणें उपयोग होत नाही अशा प्रकारचें कृदन्त अगर धातुसाधित असतें त्या तत्पुरुष समासाला 'उपपद तत्पुरुष' समास म्हणतात.

मधुप —मधु + प —मधु पिणारा
शेतकरी—शेत + करी—शेत करणारा

कुंभकार—कुंभ + कार—कुंभ करणारा

द्विज —द्वि + ज —दोनदा जन्मणारा

ह्या ठिकाणीं 'प', 'करी', 'कार', 'ज' इत्यादि दुसरीं पदें आहेत. स्वतंत्र शब्द म्हणजेच 'पद' म्हणून त्यांचा वाक्यांत अर्थपूर्ण उपयोग करतां येत नाही. अशा शब्दांना 'उपपद' ही संज्ञा देऊन असे शब्द ज्या तत्पुरुष समासांत दुसऱ्या पदाच्या ठिकाणीं येतात त्या तत्पुरुष समासांना 'उपपद तत्पुरुष' अशी संज्ञा दिली आहे.

(३) **नञ् तत्पुरुष**—तत्पुरुष समासाचें पहिलें पद नकारार्थी अव्यय असल्यास त्यास 'नञ् तत्पुरुष' म्हणतात.

अयोग्य —अ + योग्य —नव्हें जें योग्य तें

नास्तिक—न + आस्तिक—नव्हे जो आस्तिक तो.

अभाव किंवा निषेध ह्या अर्थी व्यंजनादि शब्दांच्या पूर्वी 'अ' व स्वरादि शब्दांच्या पूर्वी 'अन्' किंवा 'न' हीं अव्ययें येऊन नञ् तत्पुरुष समास बनतात.

(४) **अलुक् समास**—कित्येक विभक्ति तत्पुरुषांमध्ये पहिल्या पदाची विभक्ति कायम राहते (त्या विभक्तीचा लोप होत नाही) अशा विभक्ति-तत्पुरुषांना 'अलुक् समास' म्हणतात. (अ म्हणजे नाही व लुक् म्हणजे लोप)

अग्रेसर —अग्रे + सर —पुढे सरणारा तो

युधिष्ठिर—युधि + स्थिर—युद्धामध्ये स्थिर तो

'अग्रे' ही 'अग्र' ह्याची सप्तमी व 'युधि' ही 'युध्' ह्याची सप्तमी; सामासिक शब्दांत ती कायम राहिली आहे. तिचा लोप झाला नाही.

(५) **कर्मधारय**—ज्या तत्पुरुष समासामध्ये दोन पदांचा संबंध 'विशेषण-विशेष्य' स्वरूपाचा असतो किंवा 'उपमेय-उपमान' ह्या स्वरूपाचा असतो तेव्हा त्या तत्पुरुष समासाला 'कर्मधारय' समास असें म्हणतात. कर्मधारयाचे दोन प्रकार होतात—(अ) विशेषणत्वसूचक कर्मधारय, (ब) उपमासूचक कर्मधारय.

(अ) **मंगलकार्य**—मंगल असें कार्य. पहिलें पद विशेषण व दुसरें विशेष्य. येथे 'कार्या'-संबंधी बोलावयाचें आहे म्हणून दुसरें पद प्रधान आहे. हा विशेषणत्वसूचक कर्मधारय झाला.

पुरुषोत्तम—उत्तम असा पुरुष. पहिलें पद विशेष्य आहे व दुसरें पद विशेषण आहे. विग्रहांत पहिल्या पदाला दुसऱ्या पदाच्या ठिकाणीं स्थान देऊन अर्थाचें स्पष्टीकरण होतें. हाहि विशेषणत्वसूचक कर्मधारय झाला.

पहिलें पद विशेषण असेल, तर तो ' विशेषण पूर्वपद ' कर्मधारय.

दुसरें पद विशेषण असेल, तर तो ' विशेषण उत्तरपद ' कर्मधारय.

कांही कर्मधारय समासांत दोन्हीं पदें विशेषणें असतात. त्या वेळीं त्या कर्मधारय समासाला ' विशेषणोभयपद ' कर्मधारय असें म्हणतात.

श्यामसुंदर— श्याम आणि सुंदर – दोन्ही पदें विशेषणें.

शुक्लकृष्ण, कृताकृत, दृष्टादृष्ट, स्नातानुलिप्त इत्यादि समास ' विशेषणोभयपद ' कर्मधारयाचीं उदाहरणें आहेत.

(ब) **कमलमुख**— कमलासारखें मुख – ह्या ठिकाणीं ' मुख ' ह्यासंबंधी मुख्यतः बोलावयाचें आहे. ' मुख ' हें उपमेय व ' कमल ' हें उपमान आहे. दोघांमध्ये कविकल्पनाजनित तुलना किंवा साम्य दाखविलें आहे. हा उपमासूचक कर्मधारय झाला.

मुखकमल— कमलासारखें मुख – हाच विग्रह ह्या समासाचा होतो. पण ' उपमेय ' पहिलें पद आहे व ' उपमान ' दुसरें पद आहे. हाहि उपमासूचक कर्मधारय झाला. हा समास ' मुख हेंच कमल ' असाहि सोडवितात. रूपकामध्येहि उपमेचीच सूचना आहे.

उपमासूचक कर्मधारयाचे दोन प्रकार होतात.

पहिलें पद उपमान असेल, तर ' उपमान पूर्वपद ' कर्मधारय,

दुसरें पद उपमान असेल, तर ' उपमान उत्तरपद ' कर्मधारय.

मुखकमल, मुखचंद्र, भवसागर ह्या समासांचे विग्रह पुढीलप्रमाणेहि करतात—' मुख हेंच कमल ', ' मुख हाच चंद्र ', ' भव हाच सागर, ' असा विग्रह करून त्यांना ' अवधारणा पूर्वपद ' कर्मधारय अशी संज्ञा देतात. प्रथम पदाच्या अर्थावर उत्तरपदाच्या अर्थाचा आरोप केलेला असतो म्हणून त्याला ' अवधारणा पूर्वपद ' कर्मधारय म्हणतात.

(६) **द्विगु**— विशेषणत्वसूचक कर्मधारय हा प्रकार आपण पाहिला. द्विगु हा विशेषणत्वसूचक कर्मधारयाचाच एक प्रकार आहे. ज्या विशेषणत्वसूचक कर्मधारय समासामध्ये पहिलें पद संख्याविशेषण असून त्या समासाने

समुदायाचा अगर समूहाचा अर्थ सुचविला जातो, त्यास 'संख्या पूर्वपद कर्मधारय' अगर 'द्विगु' असें म्हणतात.

त्रिभुवन – (त्रि) तीन भुवनांचा समुदाय – येथे पहिलें पद संख्या-विशेषण आहे व समासाचा अर्थ समूहवाचक (समुदायवाचक) आहे; म्हणून हा द्विगु समास होय.

पंचवटी, पंचारती, अष्टाध्यायी, पंचक्रोशी, नवरात्र हे द्विगु समास आहेत.

चतुर्वेद, षड्रिपु, सप्तर्षि, सप्तरंग, अष्टदिशा, नवग्रह हे सामासिक शब्द आहेत. ह्यांतील पहिलें पद संख्याविशेषण आहे व दुसरें पद प्रधान आहे. समासाकडून समूह सुचविला जात नाही म्हणून हे 'द्विगु' समास नाहीत. ते कर्मधारय समास आहेत.

(७) **मध्यमपदलोपी**— ज्या कर्मधारय समासांत मधलें पद गाळलें जातें, तो मध्यमपदलोपी समास होय.

साखरभात— साखर युक्त भात.

भोजनभाऊ— भोजना पुरता भाऊ.

घोडेस्वार— घोडा असलेला स्वार.

चुलतभाऊ— चुलत्याच्या द्वारां झालेला भाऊ.

ह्या समासांत दुसरें पद प्रधान आहे व पहिल्या पदाचा दुसऱ्या पदाशीं विशेषणाचा संबंध आहे. म्हणजे हा विशेषणत्वसूचक कर्मधारय आहे, पण समासाचा विग्रह करतांना जें तिसरें पद (उदा० 'युक्त', 'पुरता', 'असलेला') घालावें लागतें, तें समास बनवतांना लुप्त झालें आहे. मधलें पद गाळलें गेलें आहे, म्हणून अशा समासांना 'मध्यमपदलोपी' समास म्हणतात.

द्वंद्व—

ज्या समासांत दोन्ही पदें प्रधान असतात तो द्वंद्व समास होय.

द्वंद्व समासाचे (१) इतरेतर द्वंद्व, (२) वैकल्पिक द्वंद्व, (३) समाहार द्वंद्व असे तीन उपभेद मानिले आहेत.

(१) ज्या द्वंद्व समासांतील पदें विग्रह करतांना 'आणि', 'व' या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडलीं जातात, त्यास 'इतरेतर द्वंद्व' म्हणतात.

रामलक्ष्मण, कौरवपांडव, लक्ष्मीनारायण, ब्रह्माविष्णुमहेश हे इतरेतर द्वंद्व समास होत.

(२) ज्या द्वंद्व समासांतील पदें विग्रह करतांना 'किंवा', 'अथवा' या विकल्पबोधक अव्ययांनी जोडलीं जातात, त्यास 'वैकल्पिक द्वंद्व' असें म्हणतात.

सत्यासत्य, पापपुण्य हे वैकल्पिक द्वंद्व आहेत.

(३) ज्या द्वंद्व समासांत पदांनी दर्शविलेल्या वस्तूंचाच केवळ बोध होत नसून त्यांच्यासारख्या इतर वस्तूंचाहि सामासिक शब्दाच्या अर्थात समावेश होतो, त्याला 'समाहार द्वंद्व' म्हणतात.

भाजीभाकरी— ह्याचा विग्रह 'भाजी आणि भाकरी' असा न होतां 'भाजी, भाकरी आणि त्याच प्रकारच्या इतर वस्तु' असा होतो. 'भाजीभाकरी' हा समाहार द्वंद्व समास आहे.

आंथरूणपांघरूण, शेतमळा, घरदार, ताकभात, पाऊसपाणी हीं समाहार द्वंद्वाचीं उदाहरणें आहेत.

बहुव्रीहि—

ज्या समासामध्ये दोन्ही पदांना प्राधान्य नसून त्यांच्या जुळणीने तिसरें पद सूचित होतें, त्या समासाला 'बहुव्रीहि' समास म्हणतात.

(१) बहुव्रीहि समासाचा विग्रह करतांना विग्रहांत शेवटीं संबंधी सर्वनाम येतें. त्याची जी विभक्ति त्या विभक्तीचें नांव त्या बहुव्रीहि समासाला देतात. तत्पुरुष समासांत विग्रहाच्या वेळीं मध्ये विभक्ति येते, त्यावरून त्या विभक्ति तत्पुरुषाला नांव देतात. त्याचप्रमाणे बहुव्रीहि समासांत विग्रहाच्या वेळीं संबंधी सर्वनामाची विभक्ति शेवटीं येते, त्यावरून नांव देतात. पुढील उदाहरणें पाहा—

दत्तधन— दत्त आहे धन ज्याने तो – तृतीया बहुव्रीहि
चतुर्मुख— चार आहेत मुखें ज्याला तो – चतुर्थी बहुव्रीहि
गलितपर्ण— गलित आहेत पर्णें ज्यापासून तो – पंचमी बहुव्रीहि
चक्रपाणी— चक्र आहे पाणीच्या ठायीं ज्याचा तो – षष्ठी बहुव्रीहि
भीमादि— भीम आहे आदि ज्यामध्ये – सप्तमी बहुव्रीहि

वर जे विग्रह केले आहेत त्यांतील मूळ सामासिक शब्दांतील पदांची विग्रहांत कोणती विभक्ति आहे ती पहा.

'दत्तधन' व 'चतुर्मुख' ह्या समासांच्या विग्रहांत 'दत्त', 'धन,' व 'चतुः', 'मुख,' ह्या पदांच्या विभक्ति समान आहेत म्हणजे एकच आहेत. पण 'चक्रपाणी' ह्या समासाच्या विग्रहांत 'चक्र' व 'पाणी' ह्या दोन पदांच्या विभक्ति विग्रहामध्ये भिन्न भिन्न आहेत. ह्यावरून बहुव्रीहीचे दोन प्रकार मानतात—(१) **समानाधिकरण बहुव्रीहि** (२) **व्यधिकरण बहुव्रीहि.**

ज्या बहुव्रीहि समासाच्या विग्रहांत दोन्हीं पदें एकाच विभक्तींत असतात त्याला '**समानाधिकरण बहुव्रीहि**' म्हणतात.

ज्या बहुव्रीहि समासाच्या विग्रहांत दोन्हीं पदें भिन्न भिन्न विभक्तींत असतात त्याला '**व्यधिकरण बहुव्रीहि**' असें म्हणतात.

समानाधिकरण—

आहिताग्नि—**आहित** (ठेवलेला, पूजिलेला) आहे **अग्नि**
ज्याचा तो (ब्राह्मण)—(षष्ठी बहुव्रीहि)

भक्तप्रिय—**भक्त** आहे **प्रिय** ज्याला तो (देव)—(चतुर्थी बहुव्रीहि)

व्यधिकरण—

चंद्रमौली—**चंद्र** आहे **मौलीवर** (मस्तकावर)
ज्याच्या तो (शिव)—(सप्तमी बहुव्रीहि)

पद्मनाभ—**पद्म** आहे **नाभींत** ज्याच्या
तो (विष्णु)—(सप्तमी बहुव्रीहि)

(२) **नञ् बहुव्रीहि**— ज्या सामासिक शब्दाचें आद्य पद अ, अन्, निर् किंवा नि असें नकारार्थक असतें व त्या समासाचा विशेषणासारखा उपयोग होत असल्यास त्या समासाला '**नञ् बहुव्रीहि**' समास म्हणतात.

अनादि—नाही आदि ज्याला तो (परमेश्वर)
अनंत—नाही ज्याला अन्त तो (ईश्वर)
नीरस—नाही ज्यांत रस असा (ग्रंथ)
असंख्य—नाही संख्या ज्यांना ते (लोक)

(३) **सह बहुव्रीहि**— जेव्हा बहुव्रीहि समासामध्ये पूर्वपद म्हणून '**सह**' हें अव्यय अथवा त्याचें '**स**' हें संक्षिप्त रूप येतें तेव्हा त्या बहुव्रीहि समासास '**सह बहुव्रीहि**' असें म्हणतात.

सवत्स–स + वत्स–वत्साने सहित जा (गाय)

सहकुटुंब–सह + कुटुंब–कुटुंबाने सहित जो (पुरुष)

(४) **विशेषण पूर्वपद–विशेषण उत्तरपद**—कर्मधारय समासामध्ये विशेषण-विशेष्य हा दोन पदांचा संबंध पाहून जसे कर्मधारय समासाचे प्रकार केले आहेत तसे बहुव्रीहि समासाचेहि होतात. समासाचा अर्थ कळण्याच्या दृष्टीने हे प्रकार लक्षांत ठेवावेत.

लंबोदर—लंब आहे उदर ज्याचें तो–हा षष्ठी बहुव्रीहि समास आहे. ह्यांत ' लंब ' हें ' उदर ' ह्याचें विशेषण आहे म्हणून हा " विशेषण पूर्वपद " बहुव्रीहि ह्या प्रकारांत येतो.

मोदकप्रिय—मोदक आहे प्रिय ज्याला तो–हा चतुर्थी बहुव्रीहि समास आहे. ह्यांत ' मोदक ' हें पहिलें पद विशेष्य आहे व दुसरें पद ' प्रिय ' हें विशेषण आहे. हा ' विशेषण-उत्तरपद ' बहुव्रीहि ह्या प्रकारांत येतो.

(५) **अव्यय पूर्वपद बहुव्रीहि**—ज्या बहुव्रीहि समासांत पूर्वपद हें प्र, परा, अप, सम्, वि, निस् इत्यादि उपसर्गात्मक अव्ययांपैकी येतें व विग्रहांत त्याची फोड विशेषणासारखी होते तेव्हा तो अव्ययपूर्वपद बहुव्रीहि होतो.

दुर्मति—(दुस् + मति)–दुष्ट आहे बुद्धि ज्याची तो.

सुदति—(सु + दति)–(चांगले) आहेत दात जिचे ती.

निर्बळ—(निस् + बळ)–निर्गत आहे बळ ज्याचें तो.

विधवा—(वि + धवा) विगत आहे धवः (भ्रतार) जिचा ती.

निष्कांचन—(निस् + कांचन)–निर्गत आहे कांचन ज्यापासून तो.

निर्घृण, निर्दय, निष्फल, विफल, उच्छृंखल, उन्मुख, निस्पृह, निस्संग, निर्लेप, निष्कंटक, निःशंक, निष्काम, विमुख, विरूप इत्यादि बहुव्रीहि समास हे अव्ययपूर्वपद बहुव्रीहि होतात.

अव्ययीभाव

ज्या समासांत पहिलें पद प्रधान असतें व सामासिक शब्द वाक्यांत क्रियाविशेषण अव्ययाचें कार्य करतो त्यास ' अव्ययीभाव ' समास म्हणतात.

संस्कृत भाषेंतील अव्ययीभाव समासांत पहिलें पद अव्यय असतें आणि दुसरें पद नाम किंवा विशेषण असतें; पण निव्वळ मराठीमधील अव्ययीभाव

समासांत अव्ययाच्या जागीं नाम आलेलें असतें. कांही ठिकाणीं दोन्हीं पदें नामें असतात.

यथा (प्रमाणे), आ (पर्यंत-पासून), प्रति (प्रत्येक), यावत् (पर्यंत), वि (शिवाय) हीं अव्ययें ज्यांत प्रथम येतात असे संस्कृत अव्ययीभाव समास मराठींत बहुधा फार येतात.

यथाशक्ति, यथाविधि, यथान्याय, यथायुक्त, यथायोग्य, यथाक्रम, यथावकाश, आमरण, आजन्म, प्रतिदिन, प्रतिक्षण, प्रतिवर्ष, यावज्जीव, व्यर्थ.

मराठीमध्ये 'प्रति' ह्याचा उपयोग न करतां त्या अर्थाने नामच द्विरुक्त होऊन अव्ययीभाव समास होतो.

घरोघर, जागोजाग, गावोगाव, दारोदार, घडोघडी.

पुढील फारसी किंवा अरबी जोडशब्द हे मराठीमध्ये अव्ययीभाव समास म्हणून उपयोजिले जातात.

दरकूच, दरमजल, बिनधोक, बिनहरकत, बिनतक्रार, बेलाशक, बेमालुम, बेकायदा, बरहुकूम, हरहमेष.

सामासिक शब्दांविषयी कांही विशेष गोष्टी

(१) सामासिक शब्द दोन किंवा अधिक शब्द एकमेकांना जोडले जाऊन सिद्ध होतो. तेव्हा संधिनियमाप्रमाणे संधि करून ते एकत्र जोडले जावेत. संस्कृत शब्दांमध्ये हे संधि अवश्य होतात. मराठी व अन्य भाषांतील शब्दांत कधी कधी होत नाहीत. लंब+उदर = लंबोदर, दश+आनन = दशानन, मनस् + भंग = मनोभंग, परंतु पुढील ठिकाणीं संधि झालेला नाही. जावई + आग्रह = जावईआग्रह, बे + इमान = बेइमान.

(२) कोणत्याहि सामासिक शब्दास विभक्तिप्रत्यय अगर शब्दयोगी अव्यय लावतांना तीं त्या समासांतील शेवटच्या पदास लावतात.

जितशत्रूने, मुखचंद्राला, रणधुरंधराने, देवपूजेसाठी.

(३) सामासिक शब्दाचें लिंगवचन सामान्यतः त्यांतील शेवटच्या पदावरून ठरतें. देवपूजा–स्त्रीलिंगी एकवचन. देवघर–नपुंसकलिंगी एकवचन. क्रीडांगणें–नपुंसकलिंगी अनेकवचन.

(४) सामासिक शब्द बनवितांना त्यांत येणारे शब्द किंवा पदें हीं एकाच भाषेतील असावींत. 'हस्तिचर्म' हा शुद्ध सामासिक शब्द झाला. 'हस्तिचामडें' हा अशुद्ध (सदोष) सामासिक शब्द झाला. निरनिराळ्या

भाषांतून आलेल्या शब्दांचा समास सहसा करूं नये, हा सामान्य नियम झाला. पण ह्या नियमाला कांही अपवाद आहेत. निरनिराळ्या भाषांतून आलेल्या शब्दांचे समास रूढ झाले आहेत. 'शाळामास्तर', 'आगबोट', 'दिवाबत्ती', 'पायाशुद्ध', अशा प्रकारचे नवीन परिस्थितीस अनुसरून जे समास भाषेंत रूढ झाले आहेत, त्यांचा स्वीकार करावा लागतो. तथापि होतां होईल तों विजातीय म्हणजे निरनिराळ्या भाषांतून आलेल्या शब्दांचा समास न करणें हें भाषादृष्ट्या श्रेयस्कर होय.

(५) समास सोडवून लिहितांना—(१) प्रथम सामासिक शब्द, (२) नंतर त्यांतील पदें, (३) नंतर विग्रह, (४) नंतर नांव ह्या क्रमाने माहिती सांगावयाची किंवा लिहावयाची असते. समासाचें नांव लिहितांना संक्षिप्त रूपें कधीहि योजूं नयेत. षष्ठी तत्पुरुष असें संबंध लिहावें. 'ष. त.' असें संक्षिप्त लिहूं नये.

नमुन्यादाखल एक कविता घेऊन त्यांतील समास सोडवून लिहून दाखविले आहेत. त्याचें निरीक्षण करा—

पितामह वदे तया "प्रबळ तूं पृथानंदना!
रमेश रथिं सारथी चतुर वागवी स्यंदना;
स्वये गतवयस्क मी सरस वीर तूं रे नवा;
भिडे रणधुरंधरा जय घडो सुखें वा न वा" ॥

सामासिक शब्द	त्यांतील पदें	विग्रह	नांव
पृथानंदन	पृथा + नंदन	पृथेचा नंदन	षष्ठी तत्पुरुष समास
रमेश	रमा + ईश	रमेचा ईश	षष्ठी तत्पुरुष समास
गतवयस्क	गत + वयस् + क (कांही बहुव्रीहि समासान्तीं 'क' हें अक्षर लागतें)	गत आहे वय ज्याचें असा	षष्ठी बहुव्रीहि समास
सरस	स + रस	रसासहित असा	सह बहुव्रीहि समास
रणधुरंधर			
१. रणधुर	रण + धुर (धुर = धुरा = जूं)	रणाची धुरा	षष्ठी तत्पुरुष समास
२. रणधुरंधर	रणधुर + धर	रणधुरा धरणारा	उपपद तत्पुरुष समास

कधी कधी सामासिक शब्द तोच पण अर्थानुरोधाने त्या ठिकाणीं तो कोणत्या प्रकारचा समास आहे हें निश्चित करावें लागतें.

'सत्यव्रत महात्मा गांधींनी आपलें सत्यव्रत कधीहि सोडलें नाही.' ह्या वाक्यांतील पहिला आलेला 'सत्यव्रत' हा बहुव्रीहि समास आहे. त्याचा विग्रह 'सत्य हेंच व्रत होतें ज्यांचें' असा करावयाचा. 'सत्यव्रत' सोडलें नाही, ह्या ठिकाणीं 'सत्यव्रत' हा षष्ठी तत्पुरुष आहे. 'सत्याचें व्रत' असा विग्रह करावयाचा.

१. पुढील सामासिक शब्दांचे विग्रह करून समासांचीं नांवें सांगा—

(अ) (१) धनसंपन्न. (२) रत्नमाला. (३) सेवातत्पर. (४) अग्निभय. (५) दानशूर. (६) शौर्यहीन. (७) पोळपाट. (८) कुलोत्पन्न. (९) कार्यदक्ष. (१०) दीर्घोद्योग. (११) सदुपदेश. (१२) उद्योगतत्पर. (१३) पदवंदन. (१४) रघुश्रेष्ठ. (१५) गीतामृत.

(ब) (१) टीकाकार. (२) नवरात्र. (३) सप्ताह. (४) अनीति. (५) अनास्था. (६) सुखद. (७) अग्रेसर. (८) अंबुद. (९) भोजन-भाऊ. (१०) सरसिज. (११) त्रिभुवन. (१२) शेषशायी. (१३) ध्यानस्थ.

(क) (१) वसंतोत्सव. (२) शीतकाल. (३) भालचंद्र. (४) गुणावगुण. (५) जयापजय. (६) सूक्ष्मदृष्टि. (७) धर्मरत. (८) ग्रामान्तर. (९) परस्मैपद. (१०) अरक्षित. (११) सिंहकटी. (१२) दीर्घबाहु. (१३) चंद्रशेखर. (१४) व्यंजनान्त. (१५) धर्मादि. (१६) हिमांशु (१७) भग्नहृदय. (१८) दुमजली. (१९) जीवजंतु. (२०) सोयराधायरा. (२१) स्नानसंध्या. (२२) यथासंभव. (२३) आमरण. (२४) नातसून. (२५) चतुर्मास. (२६) भवसागर. (२७) दयारस. (२८) क्रोधाग्नि.

२. खालील पद्यपंक्तींतील जाड ठशांतील समास सोडवा—

(१) हा गीताञ्जलिने दिगन्त पसरी हिन्दी **मनोवैभव**।
इच्छी पश्चिमपूर्वयोग निवडूं पाहे खरी संस्कृति॥

(२) ते आम्ही **परवाङ्मयांतील** करूं चोरून **भाषान्तरें**।

(३) सह्याद्रीच्या तळीं शोभतें हिरवें **तळकोकण**।
राष्ट्रदेविचें निसर्गनिर्मित केवळ नंदनवन॥

(४) कंठीं **मौक्तिकहार**, चंदनउटी अंगीं **घनश्यामला**।
ऐशी राघवमूर्ति यावर कधी भेटेल वत्सा! मला॥

(५) हृन्मंदिरीं संस्मृतिशरस्वागत
हस्तांचि करिती कुटुंबहितरत
गृहस्थ जे हरि उरांत रिझवित
सदनीं फुलबागा रचिती । तेये कर माझे जुळती ॥

३. पुढे समासांचे विग्रह दिले आहेत. त्यावरून सामासिक शब्द बनवून लिहा व तो कोणता समासप्रकार झाला तें सांगा.

(१) त्यक्त (टाकलेली) आहेत आयुधें ज्याने तो.

(२) पद्म आहे नाभीवर ज्याच्या तो.

(३) चंड (प्रखर) आहेत अंशु (किरण) ज्याचे तो.

(४) ज्याला आदि (आरंभ) नाही असा.

(५) लाकडें तोडतो तो.

(६) नाही जें पसंत तें.

(७) नव्हे जो भाव तो.

(८) दोनदा जन्मलेला तो.

(९) पांच आरत्यांचा समुदाय.

(१०) पथ्य अथवा अपथ्य.

४. रामाचें कमलमुख पाहून मला आनंद झाला. कमलमुख रामाला पाहून मला आनंद झाला. जाड टाइपांतील समास कोणते आहेत तें सांगून त्यांचे विग्रह करा.

५. पुढीलपैकी कोणते समास कर्मधारय व कोणते द्विगु तें सकारण सांगा. त्रिदल, पंचवटी, षड्रिपु, अष्टदिशा, बारभाई, सप्तर्षि.

---

१३. शुद्धलेखन

शुद्धलेखन म्हणजे काय ?

भाषा हें विचार व्यक्त करण्याचें प्रभावी साधन आहे. आपले विचार आपण भाषेने बोलून दाखवितों किंवा लिहून दाखवितों. आपलें बोलणें व लिहिणें हें शुद्ध असलें पाहिजे. आपलें बोलणें हें वाक्ययोजनेच्या द्वारें होतें. वाक्यांतील शब्द विशिष्ट कार्य करीत असतो. त्यावरून त्या वाक्यांत त्या शब्दाची व्याकरणदृष्ट्या जात ठरते. त्या शब्दाकडून वाक्यांत जें कार्य व्हावयाचें तें लक्षांत घेऊन तो शब्द किंवा त्या शब्दाचें योग्य रूप वाक्यामध्ये विशिष्ट ठिकाणीं घालावें लागतें. वाक्यांतून अर्थबोध होण्याकरिता शब्दांचा क्रम व शब्दांचीं योग्य रूपें इकडे लक्ष द्यावें लागतें. शब्दांच्या प्रधान जाति कोणत्या व त्यांचें वाक्यांतील कार्य कोणतें ह्याचा आपण समग्र अभ्यास केला आहे. त्या अभ्यासाच्या आधारें शुद्धाशुद्ध विचार करून आपण आपलें बोलणें व लिहिणें शुद्ध ठेविलें पाहिजे. " मराठीमध्ये कोणतें लेखन शुद्ध व कोणतें अशुद्ध ह्याचा कांही धरबंध नाही, " असें कांही लोक त्रासून म्हणतांना आपण ऐकतों पण हें खरें नाही. हा धरबंध दिसत नाही, ह्याचें कारण शुद्धलेखनाकडे जितकें लक्ष पुरविण्यास पाहिजे तितकें पुरविलें जात नाही. शुद्धलेखनाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी पुढील गोष्टींकडे लक्ष देणें आवश्यक आहे—

(१) वाक्यरचना (२) शब्द लिहितांना त्यांतील वर्णांचें शुद्धोच्चारानुसारी लेखन (३) विरामचिन्हें (४) अनुस्वार.

आतापर्यंत ह्या व्याकरण विभागांत व्याकरणविषयक जो अभ्यास आपण केला तो लक्षांत ठेवला तर ह्या चार गोष्टींकडे योग्य लक्ष पुरविलें जाईल व लेखन शुद्ध स्वरूपांत होईल.

कै. वा. म. जोशी ह्यांनी त्यांच्या " इंदू काळे व सरला भोळे " ह्या कादंबरींतील ' विनायकराव ' ह्या पात्राने लिहिलेल्या एका पत्रांत शुद्धलेखनविषयक विचार प्रकट केले आहेत. त्यावरून शुद्धलेखनाचें महत्त्व ध्यानीं येईल.

" तुझ्या पत्रांत मराठी शुद्धलेखनाकडे तुझें पूर्ण दुर्लक्ष आहे, असें दिसतें. इंग्रजी स्पेलिंगमध्ये एखाद्याने चूक केली म्हणजे तुम्ही मुलीदेखील त्याला हसतां; पण मराठी लेखनांत शुद्धाशुद्धतेचा तुम्ही विटाळ मानीत नाही, असें दिसतें. असल्या क्षुल्लक गोष्टींकडे मीं दुर्लक्ष करणेंच कदाचित् श्रेयस्कर

होईल; पण आचरटपणाचें आचरण पाहून मनाला बोचल्यासारखें होतें; तसें अशुद्धलेखनहि मला बोचतें. एखाद्या सुशील युवतीला सुशिला बनवून दगडाच्या पंक्तीला तिला बसविणें मला कसें आवडेल ? रामाच्या सीतेला कधी तूं सिताच बनवितेस; शिताची योग्यता तिला आणीत नाहीस हें तिचें व माझें नशीबच म्हणावयाचें ! कुंकूं लावण्यासंबंधी अलीकडच्या बायका जसा निर्बंध पाळीत नाहीत, त्याप्रमाणेच अनुस्वाराचीं टिंबें देण्यासंबंधीहि तुझा अनिर्बंध व्यवहार आहे, हेंहि बरोबर नाही."

वाक्यरचना

वाक्यरचनेच्या दृष्टीने वाक्यांतील पदांचा क्रम व पदांचा परस्परसंबंध ह्यांना महत्त्व आहे. वाक्यरचनेची शुद्धाशुद्धता ह्यावर अवलंबून आहे. विकारी शब्द व अविकारी शब्द ह्यांचें वाक्यांतील कार्य ह्याचें सूक्ष्म विवेचन ह्यापूर्वी आलेलें आहे. त्यावरून ह्या शब्दांची वाक्यांत योजना करतांना शुद्धाशुद्धतेच्या दृष्टीने कोणतें धोरण ठेवणें अगत्याचें आहे हें स्पष्ट झालें आहे. ह्या ठिकाणीं कांही महत्त्वाचे नियम पुढे दिले आहेत. अर्थव्यक्तीच्या दृष्टीने शब्दाची योजना वाक्यांत योग्य त्या ठिकाणींच झाली पाहिजे, हा सामान्य नियम लक्षांत ठेवला पाहिजे.

मराठीमध्ये वाक्यरचना करतांना सामान्यतः कर्ता, कर्म, क्रियापद असा क्रम असतो. कर्त्याचीं विशेषणें व त्याशीं संबंध असणारे शब्द कर्त्याच्या मागे म्हणजे मूल उद्देश्याचा विस्तार करणारे शब्द कर्त्याच्या मागे, कर्माचीं विशेषणें व त्याशीं संबंध असणारे शब्द कर्माच्या मागे म्हणजे कर्मविस्तारक शब्द कर्माच्या मागे आणि क्रियाविशेषणें, विधानपूरकें हीं क्रियापदाच्या अगोदर पण कर्मानंतर बहुधा असतात.

वाक्यांत संप्रदानार्थी चतुर्थी असल्यास ती कर्त्याच्या नंतर व कर्माच्या पूर्वी घालावी.

विशेषण-विशेष्य संबंध लक्षांत घेऊन विशेषण हें त्याच्या विशेष्यापूर्वी व शक्य तितकें विशेष्यालगत घालावें व त्याचें लिंगवचन हीं त्याच्या विशेष्याप्रमाणे असावींत.

विशेषण जसें त्याच्या विशेष्यापूर्वी योजावयाचें तसेंच क्रियाविशेषण क्रियापदापूर्वी शक्य तितकें क्रियापदालगत असावें.

अपूर्ण विधान सकर्मक व अपूर्ण विधान अकर्मक क्रियापदांचीं रूपें क्रियापदस्थानीं असतां त्यांचीं विधेयपूरकें, विधिविशेषणें हीं क्रियापदाच्या मागे लगत असावींत.

नाम, सर्वनाम ह्यांचा संबंध लक्षांत घेऊन सर्वनामाचें लिंगवचन हीं तें ज्या नामाकरिता आलें असेल त्या नामाच्या लिंगवचनानुसार योजावीत.

प्रयोगाला वाक्यरचनेच्या दृष्टीनें महत्त्व आहे. क्रियापदाचें रूप हें वाक्याच्या प्रयोगावर अवलंबून असतें. कर्ता, कर्म व क्रियापद ह्यांचा लिंगवचन-संबंध वाक्यांतील प्रयोगानुरूप असावा.

कर्तरिप्रयोगांत समानलिंगीं व समानपुरुषीं अनेक कर्ते असल्यास क्रियापद त्याच लिंगीं, त्याच पुरुषीं पण अनेकवचनीं असतें. 'राम व लक्ष्मण वनवासास गेले.' 'मालन, गोंदू व मीना शाळेंत गेल्या.'

कर्तरिप्रयोगांत भिन्न पुरुषीं कर्ते असतां क्रियापद प्रथमपुरुषीं अनेकवचनीं असतें. प्रथमपुरुषीं सर्वनाम वाक्यांत नसेल तर क्रियापद द्वितीय पुरुषीं अनेकवचनीं असतें. 'मी, तूं व ती उद्यां मुंबईला जाऊं.' 'तूं आणि ती उद्या मुंबईला निघा.'

कर्तरिप्रयोगांत भिन्न लिंगांचे कर्ते असल्यास क्रियापद नपुंसकलिंगी अनेकवचनीं असतें. अरविंद, वसंत व त्याची आई गावाला गेलीं.

भिन्नलिंगीं कर्ते अगर कर्मे एका ठिकाणीं आलीं असतां त्या सर्वांबद्दल 'हा' किंवा 'असा' ह्या शब्दांचा अनेकवचनी उपयोग करणें अधिक प्रशस्त होय. 'तोफा व शिपाई हीं लढाईंत फार उपयोगाचीं आहेत.' 'बाबांनी बाजारांतून भाजी व फळें हीं आणलीं.' 'हा' ह्या सर्वनामाचा उपयोग करतांना तें नपुंसकलिंगी अनेकवचनी योजावयाचें, त्याचें लिंगवचन शेवटच्या नामाप्रमाणे ठेवावयाचें नाही. पागोटीं, रुमाल व टोप्या ह्या शिरोभूषणें होत. हें अशुद्ध. पागोटीं, रुमाल व टोप्या हीं शिरोभूषणें होत. हें शुद्ध.

कालवाचक व स्थलवाचक क्रि. वि. अव्ययें, संकेतबोधक उभयान्वयी अव्ययें, संबोधनान्त शब्द व केवलप्रयोगी अव्ययें बहुधा आरंभीं येतात.

मिश्र वाक्यांत आणि संयुक्त वाक्यांत कधी कधी एकच कर्ता असून क्रियापदें मात्र दोन योजिलेलीं असतात. ह्या दोन्ही क्रियापदांचीं रूपें प्रयोगानुरूप वापरलीं पाहिजेत. 'त्याने अखेर टांगा केला व स्टेशनवर गेला' ह्या ठिकाणीं पूर्वार्ध वाक्य हें कर्मणि प्रयोगांत आहे. पण उत्तरार्ध वाक्य हें कर्मणि प्रयोगाचें नाही. ते कर्तरि प्रयोगाचें आहे. येथे कर्ता घातलेला नाही. कर्ता न घातल्यामुळे 'त्याने' हा कर्ता घेतला तर वाक्यांत 'त्यानें स्टेशनवर गेला' असा अपप्रयोग होतो. पूर्वार्ध कर्मणि असेल व उत्तरार्ध कर्तरि असेल तर उत्तरार्धांत योग्य कर्त्याची योजना करावी. वरील उत्तरार्धांत 'तो' हा

कर्ता आवश्यक आहे. कर्तरि आरंभ व कर्मणि शेवट असें असलें तरी वरील नियम लक्षांत ठेवावा.

जेव्हा–तेव्हा, ज्याप्रमाणे–त्याप्रमाणे, जर–तर, जरी–तरी, जोवर–तोवर, इत्यादि संबंधी व अनुबंधी शब्दांच्या जोड्यांतील संबंधी शब्द वापरतांना योग्य काळजी घेऊन ते योग्य ठिकाणीं वापरावेत.

विरामचिन्हें

आपण बोलतांना वाक्यामध्ये मधून मधून थोडें थांबतों, विराम घेतों, सर्व वाक्य एका दमांत बोलत नाही. लेखनांत हा विराम दाखविण्याकरिता कांही खुणा योजतात, त्यांना विरामचिन्हें म्हणतात. लेखनांत विरामचिन्हांचा योग्य ठिकाणीं उपयोग करावा लागतो. लेखनांत विरामचिन्हांचा उपयोग केल्यामुळे पुढील गोष्टी साध्य होतात.

(१) लेखनाचा अर्थ स्पष्ट होतो व संदिग्धता राहात नाही.

(२) अर्थाच्या दृष्टीने व व्याकरणाच्या दृष्टीने शब्दांचा व वाक्यांचा परस्परसंबंध कळण्यास मदत होते. उदा०—

(३) भावना, विकार दाखविण्याचें कार्य होतें.

(४) वाचकाला कोठे थांबावयाचें, वाचतांना कोठे आघात द्यावयाचा वगैरे गोष्टी समजतात.

एखादें विरामचिन्ह भलत्या ठिकाणीं पडलें तर अर्थाचा विपर्यास होतो. कित्येक वेळीं अनर्थ होतो. उदा०—

मी चोरी करणार. नाही केली तर मला शिक्षा व्हावी.

मी चोरी करणार नाही. केली तर मला शिक्षा व्हावी. केवळ एक 'पूर्णविराम' पुढचा मागे सरकल्यामुळे मूळ अर्थाचा किती विपर्यास झाला आहे हें वरील उदाहरणावरून समजून येईल.

मुख्य विरामचिन्हें कोणतीं व त्यांचा उपयोग कोठे करावयाचा तें आता पाहूं.

प्रश्नचिन्ह—वाक्यांत प्रश्नाचा अर्थ असतां म्हणजे वाक्य प्रश्नार्थक असतां त्याच्या शेवटीं प्रश्नचिन्ह द्यावें.

प्रत्येक कार्यांत आघाडीवर असणारे भाऊराव ह्या प्रसंगीं मागे कसे राहणार ! परदेशी कपड्यांची होळी होऊं लागली मग भाऊरावांना स्वस्थ कसें बसवणार ?

उद्गारचिन्ह—ज्या शब्दांनी किंवा वाक्यांनी मनांतील हर्ष, शोक इत्यादि मनोविकार दाखविले जातात त्यांच्या शेवटीं हें चिन्ह द्यावें.

थर्मामीटर पाहातात तों काय, वसंताला १०५ डिग्री ताप !

अहाहा ! तुला सौंदर्यवान् म्हणावयास सगळ्या जगाचे डोळे फुटले पाहिजेत !

पूर्णविराम—वाक्यामध्ये प्रश्नाची अगर हर्ष, शोक इत्यादि भावना दर्शविणाऱ्या उद्गारांची सूचना नसेल त्या वेळीं वाक्याच्या शेवटीं पूर्णविराम द्यावा. वाक्यांत कधी कधी कांही शब्द संक्षेप करून लिहिले जातात, तेव्हा संक्षेपरूप करणाऱ्या अक्षरांपुढे पूर्णविराम द्यावा.

हा झेंडा उभा राहण्यासाठी दीडशें वर्षें हिंदी लोकांना लढावें लागलें. नाना प्रकारचीं संकटें सहन करावीं लागलीं.

विष शरिराचा नाश करतें, त्याप्रमाणें गुलामगिरी राष्ट्राचा नाश घडवून आणते.

इ. स. १९४७ मध्ये आपला भारत स्वतंत्र झाला.

स्वल्पविराम—(१) संबोधनवाचक शब्दापुढे स्वल्पविराम द्यावा.

देवा, तूं आमचें रक्षण कर.

(२) समानाधिकरण असे अनेक शब्द, वाक्यांश अगर पोटवाक्यें ह्यांची योजना वाक्यांत झाली असतां त्यांतील प्रत्येकापुढे स्वल्पविराम द्यावा. हे समानाधिकरण शब्द, वाक्यांश अगर पोटवाक्यें जोडण्याकरिता 'आणि', 'व', 'किंवा' ह्या उभयान्वयी अव्ययांचा उपयोग केला असतां त्या अव्ययामागे स्वल्पविराम देऊं नये.

१. कधी कधी सडी स्वारी घोड्यावरून जाई. त्या वेळेस दासी, आश्रित, पायदळ वगैरे कोणी बरोबर नसत.

२. कोणास शौर्य गाजविण्याची, कोणास श्रीमंत होण्याची, कोणास विद्वान् होण्याची किंवा कोणास प्रधानपद मिळविण्याची अशी निरनिराळ्या प्रकारची इच्छा निरनिराळ्या माणसांत आढळते.

३. रांगोळ्या घातल्या, पानें वाढलीं, व्याहीमंडळी आली, फक्त बाबासाहेबच यायचे उरले आहेत.

(३) गौण वाक्य प्रधानवाक्यापासून वेगळें दाखविण्याकरिता गौणवाक्याच्या शेवटीं स्वल्पविराम देतात.

हिंदी लोकांनी शांततेची व समानतेची उपासना केली पाहिजे, हा या अशोकचक्राचा संदेश आहे.

'आपल्या निशाणावर अशोक चक्र कां आहे, हें आपण समजावून घेतलें पाहिजे.' येथे 'आपल्या निशाणावर अशोक चक्र कां आहे' हें गौण वाक्य प्रधान वाक्यांतील 'हें' ह्याच्याशीं समानाधिकरण असून तें 'नाम-गौण वाक्य' आहे. म्हणून त्याच्यापुढे तें प्रधान वाक्यापासून वेगळें दाखविण्याकरिता स्वल्पविराम दिला आहे. तें वाक्य प्रश्नार्थक असलें तरी येथे त्याचा नाम-गौण-वाक्य म्हणून समस्त वाक्यांत उपयोग झाला आहे. म्हणून स्वल्पविरामाऐवजी प्रश्नविराम दिला तर ती चूक होते.

(४) 'कीं' ह्या अव्ययाचा उपयोग स्वरूपबोधक अव्यय असेल तर त्याच्यापुढे स्वल्पविराम द्यावा; पण स्वरूपबोधक नसेल तेव्हा त्याच्या मागील वाक्याच्या शेवटीं स्वल्पविराम द्यावा.

प्रत्येकाने हें लक्षांत ठेवावें कीं, जगामध्ये ज्ञानासारखी पवित्र वस्तु नाही.

एवढें तुम्ही मनावर घेतलें, कीं सर्व कांही जमून येईल.

(५) अवतरणचिन्हांतील मजकूर सुरूं होण्यापूर्वी जो शब्द येतो त्याच्यापुढे स्वल्पविराम द्यावा.

बादशहा शिक्कानविसाकडे वळून म्हणाला, "आमचा शिक्कामोर्तब शिराळशेटींच्या स्वाधीन करा."

अर्धविराम—दोन किंवा अधिक स्वतंत्र समान वाक्यांचा अर्थदृष्ट्या निकट संबंध असल्यास त्यांचा पृथक्पणा दाखविण्याकरिता समस्त वाक्याच्या शेवटीं पूर्णविराम द्यावा व मागील वाक्याच्या शेवटीं अर्धविराम द्यावा.

हिंदुस्थानला जाण्यासाठी कोलंबस मोठ्या उत्साहाने निघाला; पण त्याला खरोखर हिंदुस्थान सांपडलें नाही.

आकाशांत जिकडे तिकडे ढग दिसूं लागले; सोसाट्याचा वारा सुटला; थोडक्याच वेळांत पाऊसहि सुरू झाला.

अवतरणचिन्ह—वाक्यांतील कांही विशिष्ट शब्दांकडे वाचकांचें लक्ष वेधावयाचें असेल किंवा दुसऱ्याचें म्हणणें जसेंच्या तसेंच त्याच्याच शब्दांत उध्दृत करावयाचें असेल तर (' ') (" ") ह्या अवतरणचिन्हांचा उपयोग करतात.

एका गृहस्थाच्या घरीं त्याच्या 'उपवधू' भावावद्दल गळे घालण्याकरिता मी व तिंबूनाना गेलों होतों.

इकडे हळूहळू मिरवीत येत असलेला टिळकांचा देह आणि इकडे आपल्या म्हाताऱ्या आईची उडत असलेली दुर्दशा पाहून तो खिस्ती मनुष्य हळूच तिला म्हणाला, "आई, घाबरूं नकोस बरे. हें पाहा, टिळकांकरितां देवसुद्धा रडत आहे!"

'सोन्याची जळली भट्टी उरलें खापर!' ह्या शब्दांनी सगनभाऊने पानिपतच्या हाहाःकाराचें चित्र रेखाटलें आहे.

शब्द लिहितांना त्यांतील वर्णांचें शुद्धोच्चारानुसारी लेखन—

मराठींत शब्द लिहितांना त्यांतील सर्व वर्ण शुद्धोच्चारानुसारी लिहावे. पुढे शुद्ध शब्द देऊन त्यांचें अशुद्ध लेखन कंसांत दिलें आहे—

किल्मिष (किल्मिश), संतोष (संतोश), तुषार (तुशार),
दूषण (दूशण), विषयी (विशयी), खुशामत (खुषामत),
अशाने (अश्याने), लौकिक (लोकिक).

जोडाक्षरें लिहितांना त्यांच्या उच्चारांतील पौर्वापर्याप्रमाणेच त्यांचा वर्णानुक्रम लिहावा. जोडाक्षरयुक्त शब्द लिहितांना ज्या नेहमीच्या चुका दिसतात त्यांतील कांही खाली दिल्या आहेत. शुद्धरूप लिहून पुढे कंसांत अशुद्ध दाखविलें आहे—

शब्द (शद्ध), चमत्कार (चमक्तार), समाप्त (समाप्त)
कल्पना (कप्लना), हत्यार (हत्त्यार), हृदय (ऱ्हदय)
गृहस्थ (ग्रहस्थ), अनुग्रह (अनुग्रह), प्रयत्न (प्रयन्त)
प्रत्येक (प्रत्तेक), आशिर्वाद (आर्शिवाद)
उत्सव (उच्छव), शिष्ट (शिष्ठ), समाविष्ट (समाविष्ठ)
महत्त्व (महंत्व), सत्त्व (सत्व), तत्त्व (तत्व)
अरिष्ट (अरिष्ठ)

कांही ठिकाणीं विसर्ग असतांना तो दिला जात नाही. शुद्धरूप कंसाबाहेरचें :—

अक्षरशः (अक्षरशह्या), अधःपात (अधप्पात)
कःपदार्थ (कप्पदार्थ)

कांही ठिकाणीं विसर्ग नसतांना तो दिला जातो. शुद्धरूप कंसाबाहेरचें :—

धिक्कार (धिःकार), निष्कंप (निःष्कंप)
निश्चित (निःश्चित), निष्पाप (निःष्पाप)

ऱ्हस्वदीर्घ प्रकरण

(१) निव्वळ मराठी शब्दांतील अन्त्य इ–कार, उ–कार दीर्घ असतात. मी, तूं, पी, काळी, गोरी, वरती, खाली, आवळकाठी, हळू, लागू. ('आणि' ऱ्हस्वान्त लिहितात. 'परंतु,' 'यथामति,' 'अद्यापि,' ऱ्हस्वान्त लिहितात.)

(२) निव्वळ मराठी अ–कारान्त शब्दांतील उपान्त्य इ–कार व उ–कार दीर्घ असतात. खीळ, बीळ, वीत, वीर, जाऊन, करून, फूल, मूल.

(३) निव्वळ मराठी अकारान्ताशिवाय इतर शब्दांतील उपान्त्य इ–कार व उ–कार ऱ्हस्व असतात. विटा, खिळा, मुळा, मुलें, फुलें.

(४) निव्वळ मराठी शब्दांतील अन्त्य व उपान्त्य यांमागील इ–कार व उ–कार ऱ्हस्व असतात. चिमटा, चिमणी, हिरवा, चुलता, मुलगा, चिमुकला.

(५) मूळ संस्कृतांतून घेतलेले तत्सम शब्द मूळ संस्कृतमध्ये असतील तसे लिहावयाचे. ऱ्हस्व 'इ'कारान्त व 'उ'कारान्त तत्सम शब्द प्रथमेच्या उभयवचनांत ऱ्हस्वान्तच लिहावे. कवि, गति, गुरु.

(६) सामान्यरूप नेहमी दीर्घ.

कवीने, बुद्धीस, युक्तीचा, मधूकडे, गुरूपासून.

(७) उपान्त्य दीर्घ 'इ' व 'उ' असलेले अकारान्त शब्दांचें सामान्यरूप होतांना उपान्त्य स्वर ऱ्हस्व होतो.

शरीर–शरिराचा, जीव–जिवाचा, फकीर–फकिराचा.

अपवाद — सूत्र–सूत्रांत, गीता–गीतेंत.

(८) 'हि' हें अव्यय नेहमी ऱ्हस्व लिहावें.

(९) 'विनंती' शब्द दिर्घान्त लिहावा.

अनुस्वार

अनुस्वार कोठे द्यावे ह्यासंबंधी महाराष्ट्र साहित्य परिषदेने केलेले नियम महाराष्ट्र शिक्षणखात्यानें मान्य करून त्याप्रमाणे शिक्षणसंस्थांमधून अनुस्वारांचें लेखन व्हावें असा आदेश दिला आहे. साहित्य परिषदेने अनुस्वार कोठे द्यावेत ह्याबद्दलचे केलेले नियम पुढे दिले आहेत.

(१) मराठीमध्ये अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदु द्यावा. अर्थभेद असेल तर मात्र परसवर्ण लिहावा. उदाहरणार्थ—तंटा, चिंच, आंबा. देहांत (सप्तमी), देहान्त (शिक्षा).

(२) संस्कृतप्रमाणे य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् ह्यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वाराबद्दल मराठींत केवळ शीर्षबिंदूच द्यावा. उदाहरणार्थ—सिंह, संयम, कांस.

(३) नामाच्या किंवा सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ, लोकांस, मुलांस, मुलांना, तुम्हांस.

(४) नपुंसकलिंगी दीर्घ 'ई' कारान्त, दीर्घ 'ऊ' कारान्त व 'ए' कारान्त नामाच्या शेवटीं उभयवचनी प्रथमा विभक्ति असतां अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ—मोतीं, मोत्यें; वासरूं, वासरें; केळें, केळीं; बोलणें, बोलणीं.

(अपवाद – पाणी, लोणी, गुळवणी इत्यादि)

(५) लिंगानुसार ज्यांचीं रूपें बदलतात अशा विशेषणांच्या नपुंसकलिंगी एकवचनी 'ए'कारान्त व अनेकवचनी 'ई'कारान्त प्रथमेच्या रूपांवर अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ—चांगलें (फळ), चांगलीं (फळें.)

(६) व्युत्पत्तीने सिद्ध न होणारे अनुच्चारित अनुस्वार गाळावे उदाहरणार्थ--हास, धाव, केस, काच (भिंग ह्या अर्थी)

(७) व्युत्पत्तीने आलेले अनुच्चारित अनुस्वारहि अर्थभेदास जरूर असतील तेथेच कायम ठेवावे. उदाहरणार्थ—

नांव (संज्ञा), नाव (नौका); पांच (संख्या), पाच (रत्नविशेष); कां (कारण), का (काय).

(८) अर्थभेद होत नसेल तेथे व्युत्पत्तीने सिद्ध होत असले तरी ते अनुच्चारित अनुस्वार गाळावे. उदाहरणार्थ–सावळा, कोवळा.

(९) 'मी' ह्या सर्वनामाच्या रूपावर अनुस्वार देऊं नये. उदाहरणार्थ–मी जातों. परंतु 'मी' तृतीया विभक्तींत असतांना अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ–मीं काम केलें.

(१०) 'तूं' ह्या सर्वनामावर नेहमी (प्रथमा व तृतीया विभक्तींत) अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ–तूं आहेस. तूं केलें.

(११) 'आम्ही' 'तुम्ही' ह्यांवर प्रथमा विभक्तींत अनुस्वार देऊं नये. तृतीया विभक्तींत द्यावा. उदाहरणार्थ– आम्ही गेलों, तुम्ही गेलां; आम्हीं केलें, तुम्हीं पाहिलें.

(१२) नपुंसकलिंगी 'ए' कारान्त सर्वनामावर उभयवचनी अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ–हें (मूल), हीं (मुलें,), जें (पुस्तक), जीं (पुस्तकें), (चित्र), तीं (चित्रें).

(१३) 'कांही' शब्दांत 'कां' वर अनुस्वार ठेवून 'ही' वरील काढावा.

(१४) द्वितीया व चतुर्थी या विभक्तींच्या 'ना' प्रत्ययावर अनुस्वार नसावा.

(१५) तृतीयेच्या 'ने' 'नी' ह्या प्रत्ययांवर अनुस्वार देऊं नये. 'आं-ईं-एं-शीं-हीं' ह्या प्रत्ययांवर अनुस्वार असावा.

(१६) वर्तमानकाळांत व भूतकाळांत क्रियापदाच्या प्रथमपुरुषी उभयवचनांच्या अन्तीं अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ-मी-आम्ही करतों, मी-आम्ही असतों, मी-आम्ही गेलों, मी-आम्ही होतों.

(१७) भविष्यकाळीं उभयवचनी प्रथमपुरुषी क्रियापदांच्या रूपांच्या अंतावर अनुस्वार द्यावा. 'मी-आम्ही जाऊं'. 'मी-आम्ही करूं'.

(१८) क्रियापदाच्या प्रथमपुरुषी रीतिभूतकाळच्या रूपांच्या अंतावर अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ-मी करीं, आम्ही करूं. मी जात असें-जाईं, आम्ही जात असूं-जाऊं.

(१९) क्रियापदाच्या अनेकवचनी वर्तमान, भूत, रीतिभूत ह्या काळांच्या रूपांच्या अंतावर अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ-तुम्ही-करतां-करां-करींत असां-गेलां.

(२०) लिंगानुसारी बदलणारें क्रियापद नपुंसकलिंगी असतांना त्याच्या अंतावर अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ—मूल जातें, मूल गेलें, त्याने काम केलें.

(२१) भावे व भावकर्तरिप्रयोगांत क्रियापदाच्या अंतावर अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ—रामाने रावणास मारलें. त्याला सांजावलें. मला फावलें.

(२२) 'नाही' प्रथम पुरुषी असतांना त्याच्या अंतावर अनुस्वार ठेवावा. उदा० मी-आम्ही नाहीं. इतर पुरुषी असतांना अनुस्वार देऊं नये. उदा०-तूं नाहीस, तो नाही, तें नाही.

(२३) अव्ययाच्या अंतावर सामान्येकरून अनुस्वार देऊं नये. उदाहरणार्थ—जेथे, तेथे, एकदा, मागे, कधी, खाली, हळू.

(२४) विभक्तिरूपक अव्ययान्तावर हळी अनुस्वार देतात; परंतु ते गाळावे. उदा०-द्वारा, मुळे, प्रमाणे, पेक्षा, विषयी.

(२५) 'तां' प्रत्ययान्त व 'ऊं' प्रत्ययान्त धातुसाधित अव्ययांच्या अंतावर व 'तांना' प्रत्ययान्ताच्या 'उपान्तावर' अनुस्वार द्यावा. उदाहरणार्थ बोलतां, जातां (—येतें); करूं, देऊं, हसूं, रडूं (—लागला); बोलतांना, जातांना.

विशिष्ट रूपें

'राहणें', 'वाहणें', 'पाहणें', हीं रूपें शुद्ध समजावीं. रहाणें–राहाणें वहाणें–वाहाणे, पहाणें–पाहाणें, हीं अशुद्ध समजावीं.

'कोणता' 'एखादा' हीं रूपें ग्राह्य; 'कोणचा' 'एकादा' हीं अग्राह्य समजावीं.

'सुरू' ह्या अव्ययावर अनुस्वार नको. 'चालू' हा शब्द विशेषण असतांना त्यावर अनुस्वार नको 'चालू वर्ष.'

अभ्यास

१. पुढील उताऱ्यांत योग्य विरामचिन्हें घालून ते पुन्हा लिहा—

(१) कोणतीहि युद्धकथा रम्य असतेच पण स्वातंत्र्यासाठी लढल्या गेलेल्या युद्धाची कथा स्फूर्तिप्रद असते त्यांतहि सर्व जगांत अपूर्व असा जो अहिंसक संग्राम भारताने आपल्या स्वातंत्र्यासाठी केला त्याचा इतिहास म्हणजे नानाविध उदात्त गुणांची खाणच त्यांत उज्ज्वल ध्येयनिष्ठा आहे अपार त्याग-बुद्धि आहे अकुंठित साहसवृत्ति आहे निस्सीम देशभक्ति आहे सर्व कांही आहे.

(२) ही स्वातंत्र्यसेना पुलापाशी आली मामलेदार कचेरी दिसूं लागली कचेरीच्या मैदानांत सशस्त्र पोलीस उभे असलेले दिसूं लागले मामलेदार पुढे झाले व जमिनीवर एक रेषा ओढून म्हणाले ही रेघ आलांडाल तर मराल तुम्ही मरायला तयार आहांत काय होय आम्ही मरण्यास तयार आहोंत करें गे या मरें गे हें आमचें ध्येयवाक्य आहे.

२. पुढील उताऱ्यांतील शब्दावरचे अनुच्चारित अनुस्वार गाळलेले आहेत. ते योग्य शब्दावर देऊन उतारा पुन्हा लिहा.

या घनदाट अंधारात आपल्या तपश्चर्येचे तेज पसरविणारा एक महापुरुष निघाला. त्याचे नाव प्रा. भनसाळी. गांधीजींच्या आश्रमातील ते एक त्यागी, निष्ठावंत, अबोल कार्यकर्ते आहेत. ते आपले प्राण ओंजळीत घेऊन चिमूरकडे निघाले. पोलिसानी त्याना अडविले आणि वर्ध्यास पाठविले. पुनः ते तेथून निघाले व परत त्याना सोडण्यात आले. ६७ दिवस त्यानी उपोषण केले. गांधीजींनी तुरुंगातून सरकारला लिहिले. सारे राष्ट्र खवळून उठले. शेवटी सरकारने चौकशी करण्याचे मान्य केले. सत्याग्रह सफळ झाला.

लेखन



१. काव्यांगें : वृत्तें आणि अलंकार

गद्य आणि पद्य

गद्य आणि पद्य हे वाङ्मयाचे दोन विभाग होत. गद् म्हणजे बोलणें. त्यापासून 'गद्य' हा शब्द निर्माण झाला. गद्य हें बहुधा आपण ज्या पद्धतीनें बोलतों, त्याप्रमाणें लिहिलेलें असतें. गद्यांत शब्दांची किंवा वाक्यांची केलेली मांडणी साधी, बहुधा रोजच्या व्यवहारांतील, अशीच असते. पद्यांतील एकूण मांडणीच गद्यापेक्षा वेगळ्या स्वरूपाची व वेगळ्या पद्धतीची असते. आपण कविता चालीवर वाचूं किंवा गाऊं शकतों. या दृष्टीने पद्यांत जी गेयता किंवा लयबद्धता असते ती त्यांतील भावना किंवा विचार अधिक आकर्षक रीतीनें व्यक्त करूं शकते. 'आयुष्याच्या प्रभातकाळीं चित्ताच्या क्षितिजावर कांही चांगलीं स्वप्नें क्षणभर चमकून पुन्हा अदृश्य झालीं' हा गद्यांतील आशय बालकवींनी पद्यांत किती उत्कृष्ट रीतीनें मांडला आहे तें पहा –

आयुष्याच्या प्रभातकाळीं
चित्ताच्या क्षितिजावर आलीं,
सुस्वप्नें तीं क्षण लकलकलीं–
विलयाला गेलीं !

पद्य लिहितांना कांही नियमांचें पालन करणें आवश्यक असतें.

पूर्व दिशा मधु मृदुल हांसते गालींच्या गालीं ।
हर्षनिर्भरा दिशा डोलती या मंगल कालीं ॥

या ओळींतील लयबद्धता तुमच्या लक्षांत आलीच असेल. शिवाय प्रत्येक चरणाच्या शेवटीं कवीने 'लीं' या अक्षराचें यमक साधलें आहे तेंहि लक्षांत आलें असेल. पद्यरचना करतांना वृत्त, जाति किंवा छंद यांसारख्या कांही रचनेच्या कांही नियमांचें बंधन पाळावें लागतें. गद्यरचनेंत वृत्त, जाति, छंद यांचीं बंधनें पाळण्याचें कारण नसतें. शुद्धलेखनाचे नियम पाळणें, एवढेंच फार तर गद्यलेखनांतील एकमेव बंधन आहे, असें म्हणतां येईल.

कवितेंतील चरणांच्या रचनेचें स्वरूप—

कवितेंतील अक्षरांचे दोन ठळक विभाग पडतात. अ, इ, हे स्वर ज्यांत आहेत अशा अक्षरांना लघु अक्षरें म्हणतात. उदा० (ख, खि, खु, स, सि, सु इत्यादि) आणि ज्या अक्षरांमध्ये आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ हे स्वर असतात, त्यांना दीर्घ अक्षरें म्हणतात. (उदा० खा, खी, खु, सा, सी, सू इत्यादि.) म्हणजेच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें झालें तर लघु अक्षरांचा उच्चार 'ऱ्हस्व' होतो व गुरु अक्षरांचा ऊच्चार 'दीर्घ' होतो. ऱ्हस्व अक्षरांत अनुस्वार असल्यास किंवा ऱ्हस्व जोडाक्षर आल्यास तें (ऱ्हस्व अक्षर) दीर्घ होतें. चरणाच्या शेवटचें अक्षर बहुधा 'गुरु' असतें. लघु अक्षरासाठीं 'ल' आणि गुरू अक्षरासाठी 'ग' असा संक्षेप वापरतात.

चरणांतील तीन तीन अक्षरांचा मिळून एक 'गण' तयार होतो. गण पुढील पद्धतीने पाडतां येतात :—

'वनीं देखतां मेघ नीळासमोर'

या चरणाचे गण— 'वनीं दे । खतां मे । घ नीळा । समोर' असे गण पाडतात. यांतील लघु-गुरू अक्षरें कोणतीं तेंहि आपण पाहूं.

व नी दे ख तां मे घ नी ळा स मो र
ल ग ग ल ग ग ल ग ग ल ग ग

तीन तीन अक्षरांच्या या गणांना विशिष्ट नांवें दिलीं आहेत. गण आठ आहेत— य, र, त, भ, ज, स, म, न हे ते आठ गण होत. या प्रत्येक गणांतील लघु व गुरू अक्षरें ठरलेली असतात. लघु अक्षरासाठीं ˘ अशी खूण करतात व गुरू अक्षरासाठीं — अशी खूण करतात.

गणाचें नांव	त्याचा तपशील	चिन्ह (उदाहरणात्मक)	गण-शब्द
य गण	पहिलें अक्षर लघु असतें.	˘ — —	यमाचा
र गण	मधील अक्षर लघु असतें.	— ˘ —	राधिका
त गण	शेवटचें अक्षर लघु असतें.	— — ˘	ताराप
भ गण	पहिलें अक्षर गुरु असतें.	— ˘ ˘	भाकर
ज गण	मधील अक्षर गुरु असतें.	˘ — ˘	जनास
स गण	शेवटचें अक्षर गुरु असतें.	˘ ˘ —	समरा
न गण	सर्व अक्षरें लघु असतात.	˘ ˘ ˘	नमन
म गण	सर्व अक्षरें गुरु असतात.	— — —	मानावा

अशा प्रकारें गण पाडून त्यास विशिष्ट नांव दिल्याने कवितेचें वृत्त कोणतें तें आपणांस ओळखतां येतें.

'तुझ्या बहुत शोधिले अघानिधी पदाच्या रजे' या चरणाचे गण पाडून त्यांस कोणतीं नांवें देतां येतील तें पाहूं.

तुझ्या व	हुत शो	धिले अ	घनिधी	पदाच्या	रजें
ल ग ल	ल ल ग	ल ग ल	ल ल ग	ल ग ग	ल ग
⏑ – ⏑	⏑ ⏑ –	⏑ – ⏑	⏑ ⏑ –	⏑ – –	⏑ –
ज	स	ज	स	य	ल ग

या वृत्तांतील प्रत्येक चरणांत १७ अक्षरें असून त्यांत ज स ज स य ल ग हे गण आहेत. 'पृथ्वी' या अक्षर-वृत्ताचें हें उदाहरण आहे.

चरण म्हणतांना जेथें आपण थांबतों, त्यास 'यति' असें म्हणतात. बहुधा 'यति' चरणाच्या शेवटींच येतो. तथापि चरण म्हणण्याच्या किंवा अर्थाच्या सोयीसाठी क्वचित् चरणामध्येहि हा 'यति' येण्याची शक्यता असते.

अक्षरवृत्तें, छन्दोवृत्तें आणि मात्रावृत्तें (जातिवृत्तें) असे पद्यरचनेचे तीन प्रकार आहेत. त्यांना अनुक्रमें वृत्तें, छंद आणि जाति असें म्हणतात. ज्या पद्यांतील प्रत्येक चरणांतील अक्षरें सारखीं असतात व त्यांचा लघु गुरु क्रमहि सारखाच असतो त्यास अक्षरगणवृत्त (किंवा वृत्त) असें म्हणतात. ज्या पद्यांतील प्रत्येक चरणांत फक्त अक्षरांचाच सारखेपणा आढळतो त्यास 'छंद' असें म्हणतात. मात्रावृत्तांत किंवा जातिवृत्तांत प्रत्येक चरणांत फक्त ठराविक मात्राच असतात.

अक्षर उच्चारण्यास जो वेळ लागतो त्यास 'मात्रा' असें म्हणतात. लघु अक्षराची एक मात्रा व गुरु अक्षराच्या दोन मात्रा होतात.

पुढें वृत्तांचे आणि जातींचे विविध प्रकार दिले आहेत.

वृत्तें

इंद्रवज्रा

लक्षण : — अक्षरें : ११; गण : त, त, ज, ग, ग. यति : ५.

उदाहरण :—उत्फुल्ल ऐशा नवकुंजभागीं ।
दे गंध आनंदचि जागजागीं ।
ते भृंग मकरन्द नेती ।
गुंजारवें मंगल नाम गाती ॥

लक्षण :— अक्षरें ११; इंद्रवज्रा व उपेंद्रवज्रा हीं वृत्तें मिळून हें वृत्त झालें आहे.

उदा० :— हा जातिविध्वंसन काल आला ।
समानतेच्या उभवा ध्वजाला ।
राष्ट्रीय जो सर्व जनाभिमानी ।
न जाति तो वा उपजाति मानी ॥

उपेन्द्रवज्रा

लक्षण :— अक्षरें ११; गण – ज, त, ज, ग, ग.

उदा ० — प्रसन्न झालें जग चंद्रिकेनें ।
जणों सतीच्या भरलें यशानें ।
प्रफुल्ल वल्ली तरुवल्लभातें ।
स्वपल्लवी दाविती कौतुकातें ॥

पृथ्वी

लक्षण :— अक्षरें : १७ ; गण : ज, स, ज, स, य, ल, ग. यति : ८.

उदा ०— कदा नवजलें तुझी वरसतील पृथ्वीप्रती ।
कदा नदनद्यांतुनी उचमळोनि तीं धांवतीं ।
कदा तरी वनस्थलीं चमकतील पाचेपरी ।
जलार्द्रपवनें कदा डुलत रे तरूवल्लरी ॥

भुजंगप्रयात

लक्षण :— अक्षरें : १२ ; गण : य, य, य, य. यति : ६

उदा. — फिरे वावरे वात सर्वांत जैसा । चळे नी वळेही स्पष्ट तैसा ॥
धरीतां बळें संधि नाहीं धराया । तयाचे परी स्फूर्ति दे देवराया ॥

मंदाक्रांता

लक्षण :— अक्षरें : १७; गण : म, भ, न, त, त, ग, ग. यति : ४; १०; १७.

उदा० :— मोठ्या खोट्या छलक कुमती बोलती दुष्ट वाचा
बोभाटा हा अजवरि जगीं गाजतो सासवांचा
ऐशा खोट्या विपरित मिषें तूं न चित्ता विटाळी
एक्या हातें कधिं तरी मुळी वाजते काय टाळी ?

मंदारमाला

लक्षण :— अक्षरें : २२; गण : त, त, त, त, त, त, त, ग (सात 'त' गण व एक गुरू). यति : ४, १०, १३, २२.

उदा. :— सृष्टी तुला वाहुनि धन्य मातें अशी रूपसंपन्न तूं निस्तुला ।
तूं कामधेनू खरी कल्पवल्ली , सदा लोभला लोक सारा तुला ॥

मालिनी

लक्षण :— अक्षरें १५; गण : न, न, म, य, य. यति : ८, १५.

उदा. — गवतहि सु मभूषा हा दाखवी आज देहीं ।
धरणी हरितवस्त्रा मालिनी साजते ही ॥

शार्दूलविक्रीडित

लक्षण :— अक्षरें १९; गण : म, स, ज, त, त, ग. यति : १२, १९.

उदा०:— कंठी मौक्तिकहार चंदन उटी अंगीं घनश्यामला ।
ऐसी राघवमूर्ति यावर कधी भेटेल वत्सा मला ॥

शिखरिणी

लक्षण :— अक्षरें : १७ ; गण : य, म, न, स, भ, ल, ग. यति : ६, १७.

उदा०:— न रंजे कारंजे, निरखुनि फणीनें फणफणी ।
मुदेनें मोदेना , नल-गुण-गणीं जे गुणगुणी ॥

स्रग्धरा

लक्षण :— अक्षरें : २१; गण : म, र, भ, न, य, य, य; यति : ७, १४, २१.

ऐशी कीर्ती तुझी ही परिसुनि दुरूनी पातलों आश्रयातें ।
कांटे झाडें अम्हां ही अडवुनि धरिती कां ? तरी वार यातें ॥

वसंततिलका

लक्षण :— अक्षरें १४; गण : त, भ, ज, ज, ग, ग. यति : ८, १४

उदा. :— आला वसंत कविकोकिल हाहि आला ।
आलापितो सुचवितो अरुणोदयाला ॥

जाति

आर्या

लक्षण :— चरण १ व ३ : १२ मात्रा; चरण २ व ४ : मात्रा १८

उदा० :—हंसें मुक्ता नेलीं
मग केला कलकलाट काकांनीं
हाकांनीं नभ भरलें
जाय सुरांच्याहि नाद हा कानीं ॥

उद्धव

लक्षण :— । – । प । – + । मात्रा १४.

उदा० :—उद्धवा शांतवन कर जा, त्या गोकुलवासि जनांचें ।

चंद्रकांत (पतितपावन)

लक्षण :—प । प । प + । मात्रा २६

उदा० :—पतीतपावन नाम ऐकुनी आलों मी दारां ।

परिलीना

लक्षण :—भ्र । भ्र । भ्र । – + } मात्रा २२
६ + ६+ ६ + ४ }

उदा० :— अजुनि चालतोचि वाट माळ हा सरेना ।

पादाकुलक

लक्षण :—प । प } मात्रा १६
८ +८ }

उदा० :—त्या सुंदर मखमालीवरती । फुलराणी ही खेळत होती ॥

मुक्तछन्द :—वृत्तांत किंवा जातींत काव्यरचना करतांना कवि विशिष्ट नियमांचें किंवा बंधनाचें पालन करतो. वृत्तांत अक्षरांच्या संख्येचें बंधन असतें तर जातींत मात्रांच्या संख्येचें बंधन असतें. मुक्तछंदांत मात्र असा प्रकार आढळत नाही. काव्यरचनेचीं बहुतेक सर्व बंधनें मुक्तछंदांत आढळत नाहीत– यामुळेच या छंदाला 'मुक्त' छंद असें नांव दिलें आहे. प्रत्येक चरणांत अक्षरांची संख्या किती असावी, मात्रांची संख्या किती असावी यासारखीं

कुठलींच बंधनें मुक्तछंदांत आढळत नाहीत. मुक्तछंदांतील चरण कितीहि मोठे किंवा लहान असूं शकतात. त्याचप्रमाणे एका कडव्यांत अमुक इतक्याच ओळी असाव्यात असेंहि बंधन मुक्तछंदांत रचना करतांना कवि पाळीत नाही. जेथे सलग असा वाक्याचा अर्थ संपतो, तेथे मुक्तछंदांतील एक कडवें संपतें. लघुगुरुत्वाचें बंधनहि कवि मुक्तछंदांत रचना करतांना पाळत नाही. तथापि, असें असूनहि मुक्तछंद वाचतांना किंवा म्हणतांना मात्र त्यांत एक प्रकारची तालबद्धता किंवा लयबद्धता असल्याचा प्रत्यय येतो. मुक्तछंद वाचतांना प्रत्येक दीर्घ आणि ह्रस्व अक्षरांचा उच्चार दीर्घ व संथपणें करण्याची पद्धत आहे. त्यामुळें उच्चारांत आघाताचा भास उत्पन्न होऊन उच्चार ठसठशीत वाटतात. त्यांना वजनदारपणा येतो. अनिल, वा. ना. देशपांडे, डॉ. वि. म. कुलकर्णी आणि मंगेश पाडगांवकर इ. कवींनी मुक्तछंदांत रचना केली आहे.

मुक्तछंदांतील रचनेचें एक उदाहरण पुढे देत आहोंत :—

पेर्ते व्हा

व्याकुळ पृथ्वी
प्रखर उन्हांत होरपळतां
जळतांना जागोजाग वणव्यांत
नव्हती एकहि हुंदका देत
दिसूं देत अश्रू नयनांमधे
दाबीत होती आंतल्या आंत
दुःखाचे कढ
करुनी आपल्या जिवाचें पाणी
पुरवीत होती खोल मुळांना
फुटत होती तरुतला
नवी पालवी
फुलोर, बहर, फुलाफळांचा
गाऊं लागले बुल्बुल आणि
कोकिळहि घेऊं लागले ताना
उन्मत्त प्रीतीच्या, विरहार्ततेच्या
नवोन्मेषाच्या
वसंत... वसंत .. !
... तूं मात्र शांत !

—अनिल

अलंकार

गद्यांत किंवा पद्यांत अलंकार असल्यास त्याच्या सौंदर्यांत आणखी भर पडते. साधाच अर्थ विशिष्ट, चमत्कृतिपूर्ण पद्धतीने सांगितल्यास तेथे अलंकाराची निर्मिति होते. शब्दांच्या विशिष्ट योजनेमुळे गद्यांत किंवा पद्यांत सौंदर्य निर्माण झाल्यास तेथे शब्दालंकाराची निर्मिति होते.

नभांत भरला
दिशांत फिरला
जगांत उरला
मोद विहरतो चोहिंकडे । आनंदी आनंद गडे ॥

या पद्यांतील ठळक दिसणारे शब्द पुनः पुन्हा आल्याने त्यांतून एक प्रकारचें सौंदर्य व्यक्त होतें. हें शब्दालंकाराचें उदाहरण होय.

जेथे अर्थाच्या स्वरूपांतील चमत्कृति किंवा सौंदर्य प्रकट होते तेथे अर्थालंकार होतो.

जैसी पुष्पांमाजीं पुष्प मोगरी
कीं परिमळामाजीं कस्तुरी
तैसी भाषांमाजी साजिरी, मराठीया ॥

या कडव्यांत मराठी भाषेची तुलना मोगरीशीं आणि कस्तुरीशीं केली आहे. फुलांत जसें मोगरीचें फूल चांगलें, कस्तुरीचा सुवास हा सर्व प्रकारच्या सुगंधांत जसा श्रेष्ठ, त्याप्रमाणे सर्व भाषांत मराठी भाषा श्रेष्ठ आहे असें कवीनें येथे सांगितलें आहे. या कडव्याच्या अर्थांत सौंदर्य प्रकट झालें असल्यानें या ठिकाणीं अर्थालंकार निर्माण झाला आहे असें म्हणतां येईल.

शब्दालंकार

यमक

जेव्हां एका चरणाच्या शेवटीं असलेलें एक अक्षर (किंवा अनेक अक्षरें) दुसऱ्या चरणाच्या शेवटीं येतात, त्या वेळीं हा अलंकार होतो.

उदा० (१) अजूनहि झाडें सारीं अंधारांत झाकलेली ।
निजेंत ही नीरवता ओथंबून वाकलेली ॥

(२) ओतीव विखारी वातावरणी आग ।
हा वळसे घालित आला मंथर नाग ॥

अनुप्रास

एखाद्या वाक्यांत किंवा कवितेच्या चरणांत एखादा वर्ण पुनःपुन्हा आल्यामुळे हा अलंकार होतो.

उदा० हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशीं का शिरीं ?

या चरणांत 'ट' या वर्णाची पुनरावृत्ति झाली आहे.

अर्थालंकार

उपमा—जेथे दोन वस्तूंतील साम्य (सारखेपणा) सुंदर रीतीनें वर्णन केलेलें असतें तेथे हा अलंकार होतो. हें साम्य दाखविण्यासाठी बहुधा सारखे, सम, समान, प्रमाणें, जसा, तसा, परी, तुल्य इ० शब्दांचा उपयोग करतात.

उदा० (१) त्याचें मन धुतल्या तांदळासारखें स्वच्छ आहे.

(२) जळापरी मन निर्मळ ज्यांचें
गेलें तेथें मिळलें हो।
सिंधूसम हृदयांत जयांच्या
रस सगळे आकळले हो।

उपमेचीं चार अंगें मानतात. ज्या वस्तूचें वर्णन करावयाचें असतें तिला 'उपमेय' असें म्हणतात, ज्या वस्तूची उपमा दिलेली असते तिला 'उपमान' असें म्हणतात; दोन वस्तूंतील जो सारखेपणा (साम्य) दाखविलेला असतो त्यास 'समानधर्म' असें म्हणतात आणि हा सारखेपणा दाखविण्यासाठी जो शब्द (सम, समान, जसा, तसा, परी, तुल्य, सदृश इ०) वापरतात त्यास समानधर्मसूचक शब्द असें म्हणतात. वरील पहिल्या क्रमांकाच्या उदाहरणांत मन हें उपमेय आहे, धुतले तांदूळ हें उपमान आहे. 'स्वच्छ'पणा हा या दोन वस्तूंतील समानधर्म (सारखेपणा) आहे व 'सारखे' हा समानधर्मसूचक शब्द यांत साम्य दाखविण्यासाठी वापरला आहे.

उत्प्रेक्षा—उपमेय हें जणुं उपमानच आहे, असें वर्णन जेथे केलेलें असतें तेथे हा अलंकार होतो. दोन वस्तूंतील हें साम्य दाखविण्यासाठी या अलंकारांत बहुधा जणुं, जाणो, जणुं काय, गमे, वाटे, भासे इ० शब्दांचा उपयोग करितात.

उदा० (१) किती उंचावरूनी तूं। उडी ही टाकिसी खालीं
जणों व्योमांतुनी येसी। प्रपाता खालिं पाताळीं॥

(२) संस्कृति मी जणुं समूर्त, स्त्री माझें नांव असे।

रूपक—उपमेय व उपमान यांत इतका सारखेणाप किंवा साम्य आहे कीं. त्या दोहोंत कांही भेद किंवा वेगळेपणाच आढळत नाही, असें वर्णन जेथे केलेलें असतें, तेथे हा अलंकार होतो.

उदा० (१) हिरवे हिरवेगार गालिचे
हरिततृणाच्या मखमालीचे ।
(२) ध्येय हाच देव ?

अपह्नुति—एखादी वस्तु काय आहे हें माहीत असूनहि ती, ती नाहीच तर ती, दुसरीच वस्तु आहे असें वर्णन जेथे केलेलें असतें, त्या ठिकाणी हा अलंकार होतो.

उदा० (१) न चंद्र हा, नावचि चालताहे ।
(२) हिरवळलेली दरी नसे ही सृष्टि पदर पसरी ।

अनन्वय—ज्या वस्तूचें वर्णन करावयाचें तिच्यासारखी दुसरी कोणतीच वस्तु नसून तिच्यासारखी तीच आहे असें वर्णन जेथे केलेलें असतें, तेथे हा अलंकार होतो.

उदा० (१) तूं तुजसम बहु, न देखिला इतर ।
(२) झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा ॥

व्यतिरेक—उपमेय हें उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे, असें वर्णन जेथें केलेलें असतें, तेथे हा अलंकार होतो.

उदा० (१) वज्राहुनी कठीण हृदयें दुष्टांचीं असतीं ।
(२) तुझ्या कांतिनें चंद्र झळझळे
फुला फूलपण गे तुजमुळे

[येथे कवीने फुलापेक्षा (उपमानापेक्षा) स्त्रीचा (उपमेयाचा) नाजुकपणा श्रेष्ठ कसा आहे, तें सांगितलें आहे.]

प्रतीप—उपमेय व उपमान यांतील विरोध जेथे दाखविलेला असतो, तेथे हा अलंकार होतो.

उदा० मृत्यो ! निष्ठुर तूं काय ? स्त्रिया कां न तुझ्यासम ?

भ्रांतिमान—उपमान आणि उपमेय यांत इतका सारखेपणा वर्णिलेला असतो कीं, त्यामुळे उपमानाच्या ठिकाणीं उपमेयच आहे काय असा भ्रम निर्माण होतो.

उदा० भृंगें विराजित नवीं अरविंदपत्रें
पाहून मानून तिचींच विशाल नेत्रें
घालीन अंजन अशा मतिनें तटा कीं,
हंसा, वृथा उतरलों, भिजलों विलोकीं !

(येथें अरविंदपत्रें म्हणजे कमळाचीं पानें हेच जणूं नेत्र (डोळे) आहेत असा भ्रम होतो.)

विरोधाभास

दोन वस्तूंत प्रत्यक्षपणे विरोध नसतांनाहि त्यांत विरोध आहे असें वर्णन जेथे केलेलें असतें, तेथें हा अलंकार होतो.

उदा० वज्रापेक्षांहि कठिणें, पुष्पाहुनि मृदु अशीं !
लोकोत्तरांचीं हृदयें कोणा जाणवतील तीं ?

अतिशयोक्ति

एखाद्या गोष्टीचें अत्यंत फुगवून वर्णन केलेलें असतें, त्या ठिकाणीं हा अलंकार होतो.

उदा० माझी झोंप फार सावध आहे. फार काय सांगूं ? माझें घोरणें-देखील मला झोंपेंत अगदीं स्पष्ट ऐकूं येते !

व्याजस्तुति

दिसावयास वरून निंदा पण आंतून स्तुति किंवा वरकरणीं स्तुति पण खऱ्या अर्थानें निंदा, अशा प्रकारचें वर्णन जेथे केलेलें असतें, तेथे हा अलंकार होतो.

उदा० सर्वांस सर्व देशी ही मिथ्या स्तुति तुझी महीपाला ।
न परस्त्रियां दिलें त्वां वक्ष न वा पृष्ठ तव विपक्षांला ॥

(हे राजा तूं सर्वांना सर्व कांही देतोस ही तुझी स्तुति व्यर्थ आहे, तूं परस्त्रीस वक्ष दिलें नाहीस व शत्रूस पाठ दिली (दाखविली) नाहींस. या वर्णनांत राजाची वरकरणीं निंदा केल्यासारखें वाटतें पण खऱ्या अर्थानें कवीने त्याची स्तुतीच केली आहे. राजा हा आपल्या पत्नीशीं एकनिष्ठ असून तो भ्याड नाही, अशा प्रकारची स्तुति दुसऱ्या चरणांत कवीने केली आहे.)

दृष्टांत

एखाद्या गोष्टीच्या स्पष्टीकरणासाठी दुसऱ्या एखाद्या विशेष गोष्टीचें उदाहरण दिलें जातें, तेथे हा अलंकार होतो.

उदा० निंबाचिया झाडा साखरेचें आळें । आपलीं ती फळें न संडीच ।
तैसें अधमाचें अमंगळ चित्त । वमन तें हित करूनी सांडी ॥
परिसाचे अंगीं लाविलें खापर । पालट अंतर नेघे त्याचें ।
तुका म्हणे वेळू चंदनासंगतीं । काय ते नसती जवळिक ?

अर्थांतरन्यास

एखाद्या घटनेच्या निवेदनानंतर तिच्या आधारें एखादा सर्वसामान्य सिद्धान्त सांगून त्यासाठी घटनेचें निवेदन करतात तेथे हा अलंकार होतो.

उदा० देशी ताप परी जसा वरिवरी येशी नभीं, भास्करा ।
अत्युच्चीं पदिं थोरहि विघडतो हा बोल आहे खरा ॥

(सूर्य हा जसजसा वरवर जाऊं लागतो, तसतसा त्याचा ताप (त्रास) वाढूं लागतो. उच्च स्थानावर आरूढ झाल्यावर चांगला माणूसहि बिघडतो, यांचेंच हें प्रतीक नाही काय ?)

स्वभावोक्ति

जेथे एखाद्या गोष्टीचें हुबेहूब वर्णन करतात तेथे हा अलंकार होतो. सकाळचें हें वर्णन पाहा—

असंख्य फुलें
डोलत आहेत उषःप्रभेचीं
झुळझुळणाऱ्या तरल वायुच्या लहरीबरी
निळा रंग त्यांचा
तसेंच वरती निळें आकाश
प्रसन्न प्रभात
नभांत–मनांत.

अन्योक्ति

ज्या गोष्टीचें वर्णन करावयाचें तिजविषयीं कांही न सांगता दुसऱ्या कुणा गोष्टीविषयीं वर्णन करून कवि किंवा लेखक आपलें मनोगत सुचवितो त्या ठिकाणीं हा अलंकार होतो.

उदा० सांवाऱ्या पिंडीतें वससि अधिष्ठून वृश्चिका, आज ।
परि तो आश्रय सुटतां खेटर उतरील रे तुझा माज ॥

(या ठिकाणीं कवीने विंचवाच्या निमित्ताने क्षुद्र माणसाविषयी विवेचन केलें आहे.)

पर्यायोक्त (पर्यायोक्ति)

नेहमीपेक्षा निराळ्या शब्दांनी किंवा वेगळ्या पद्धतीने अर्थ प्रकट केल्यास तें विधान अधिक आकर्षक वाटतें. अशा ठिकाणीं पर्यायोक्त हा अलंकार होतो.

उदा० 'माधव कधीहि एके ठिकाणीं आढळणार नाही'

हा अर्थ व्यक्त करण्यासाठी 'माधव म्हणजे बारा पिंपळावरचा मुंजा आहे' असें विधान करून अर्थ अधिक आकर्षक रीतीने व्यक्त करतां येतो.

प्रश्नालंकार

जेव्हा वाक्यांत किंवा कडव्यांत प्रश्न विचारलेला असतो व त्यांतच त्याचें उत्तरहि असतें, त्या वेळीं हा अलंकार होतो.

उदा० म्हैस कितीहि दूध देत असली तरी तिला कधीं कामधेनूची सर येईल काय ?

परिकर

विशेषणाचा विशिष्ट अर्थाने उपयोग करून विधान अधिक आकर्षक करतात त्या ठिकाणीं हा अलंकार होतो.

उदा० 'सुधांशुशेखर करो शिव तापनिवारण'

या ओळींत शंकरास 'सुधांशुशेखर' (म्हणजे अमृतासारखे किरण असलेला चंद्र ज्याच्या मस्तकावर आहे असा शंकर) म्हटलें आहे. अमृतासारखे किरण असलेला चंद्र ज्याच्या मस्तकावर आहे असा शंकर तुमच्या तापाचें निवारण करो, हें विधान 'शंकर तुमच्या तापाचें निवारण करो' या विधानापेक्षा अधिक आकर्षक झालें आहे यांत संशय नाही. शंकराचें वैशिष्ट्य दाखविणारा 'सुधांशुशेखर' हा शब्द वापरल्यामुळे विधानाच्या आकर्षकतेंत भर पडली आहे.

सार

एका गोष्टीमधील उत्कृष्ट भाग सांगून पुन्हा त्याहीपेक्षा उत्कृष्ट काय आहे, तें सांगण्याच्या पद्धतीचा उपयोग जेथे करतात तेथे हा अलंकार होतो.

उदा० :— काव्यांत नाटकें रम्य
नाटकांत शकुंतला ।
त्यांत चार चतुर्थ अंक
त्यांतहि श्लोक चार ते ॥

श्लेष

जेव्हा केवळ एखाद्या शब्दामुळेच दोन अर्थ उत्पन्न होत नसून संपूर्ण वाक्याचेच दोन अर्थ होतात, तेव्हां हा अलंकार होतो.

उदा० 'औषध नलगे मजला' या दमयंतीच्या उत्तरांत 'नलराजा हेंच माझें औषध' असा एक अर्थ सूचित होतो तर मला कुठलेहि औषध 'न लगे', त्या औषधांचा कांहीहि उपयोग होणार नाही, हा दुसरा अर्थहि सूचित होतो.

---

२. कांही गद्य वाङ्मय-प्रकार

लघुकथा—

जीवनांतील एकाद्या उत्कट प्रसंगाचें चित्रण लघुकथेंत केलें जातें. यासाठी प्रसंग आणि पात्रांची निवड लेखक अत्यंत कौशल्याने, दक्षतेने करतो. लघुकथेचा व्याप कादंबरीइतका मोठा नसल्याने लेखकास जें सांगावयाचें असतें तें कमींत कमी प्रसंग आणि कमींत कमी पात्रें यांच्या साहाय्यानें शक्य तितक्या परिणामकारक रीतीने तो सांगतो. लघुकथेची सुरवात आकर्षक असावी आणि शेवट परिणामकारक असावा याचीहि तो दक्षता घेतो. लघुकथेंतील प्रसंगांतून लेखक उत्कृष्ट असें वातावरण निर्माण करून जीवनाच्या एखाद्या अंगाचें दर्शन वाचकांना घडवितो. त्याचप्रमाणें पात्रांच्या स्वभावचित्रणांतून त्यांच्या मनोवृत्तीचें यथार्थ दर्शनहि तो घडवितो. प्रा. ना. सी. फडके. आणि श्री. वि. स. खांडेकर. यांनी मराठी लघुकथा-वाङ्मयांत मोलाची भर घातली आहे. मराठवाड्यांतील श्री. बी. रघुनाथ यांच्या लघुकथांनी मराठी कथेचें दालन समृद्ध केलें आहे. नवीन लघुकथालेखकांत (नवकथाकारांत) सर्वश्री गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, पु. भा. भावे, अरविंद गोखले,

शंकर पाटील, द. मा. मिरासदार यांचा उल्लेख अवश्य करावयास हवा. शेवग्याच्या शेंगा (य. गो. जोशी), सोनचांफा (वि. स. खांडेकर), पार्वती (प्रा. ना. सी. फडके), विनचेहऱ्याची संध्याकाळ (गंगाधर गाडगीळ), कातरवेळ (अरविंद गोखले) या मराठींतील कांही उल्लेखनीय लघुकथा होत.

निबंध—

एकाद्या विषयाचें ओझरतें दर्शन लेखक निबंधांत घडवितो. त्या विषयाविषयीं लेखकानें केलेला विचार निबंधांत प्रकट होतो. निबंधास विषयाचें असें बंधन नसलें तरी विचार-प्रकटीकरणास योग्य असा विषय (विवेचनाच्या दृष्टीने) आवश्यक असतो. ज्या विषयाविषयीं विवेचन करावयाचें त्याच्या वेगवेगळ्या बाजूंचा विचारहि निबंधकार करतो आणि त्यांतून स्वतःस पटणारें मत कोणतें तें सांगण्याचा व वाचकांस पटवून देण्याचा तो प्रयत्न करतो. विषयाच्या या मांडणीस निबंधांत महत्त्वाचें स्थान असतें. त्या दृष्टीने निबंधकारास आपला विषय कसा व कोणत्या पद्धतीनें वाचकांसमोर मांडावयाचा, याची एक सुसूत्र योजनाच निबंधलेखनापूर्वी करावी लागते. या योजनेमुळेच निबंधांत क्रमाने, एकानंतर एक असे महत्त्वपूर्ण विचार मांडले जातात व प्रतिपाद्य विषयाची कल्पना वाचकांना येऊं लागते. निबंधाची सुरुवात या दृष्टीने अत्यंत आकर्षक असणें आवश्यक असतें. त्यामुळे वाचकांच्या मनांत निबंधाच्या विषयासंबंधीं एक प्रकारचें कुतूहल निर्माण होतें व मग हळूहळू, त्यानंतरच्या परिच्छेदांत त्यास त्या विषयाचा परिचय होऊं लागतो. त्या विषयाच्या वेगवेगळ्या बाजू व त्यावरील मतेंहि निबंधकार मांडतो तेव्हां त्या विषयाची यथार्थ कल्पना त्यास येते व शेवटीं, लेखकाचें प्रतिपाद्य विषयाविषयीं मत कोणतें, तेंहि त्यास समजतें. या संपूर्ण विवेचनाबरोबरच निबंधाच्या शीर्षकासहि त्या निबंधाच्या दृष्टीने महत्त्व असतें. योग्य असें शीर्षकहि वाचकांच्या मनांत निबंधांतील प्रतिपाद्य विषयाविषयीं एक प्रकारची जिज्ञासा निर्माण करूं शकते. निबंधाची भाषा विषयास अनुकूल अशीच असावयास हवी. प्रतिपाद्य विषयाचें विवेचन करणारे हे निबंध बहुधा वस्तुनिष्ठ असतात. देशोन्नति (विष्णुशास्त्री चिपळूणकर), तरुण सुशिक्षितांस विज्ञापना (आगरकर), दोन शब्दांत दोन संस्कृति (सावरकर), जातीच्या हरळीचें मूळ (माटे) हे मराठी वाङ्मयांतील कांही प्रातिनिधिक निबंध होत.

लघुनिबंध (गुजगोष्ट)—

लघुनिबंधाची बैठक निबंधापेक्षा बरीचशी वेगळी असते. निबंधांस विचार-प्रकटीकरण्यासाठी योग्य असा विषय लेखकास निवडावा लागतो,

त्याप्रमाणे लघुनिबंधास विशिष्ट असाच विषय लागतो असें नाही. विषय अत्यंत महत्त्वाचा असो किंवा अत्यंत सामान्य असो, लघुनिबंधकार त्याविषयीं आपली भूमिका सहजपणे मांडूं शकतो. लघुनिबंधाची मूळ बैठक वेगळी असल्याने त्यांत विषयाच्या गांभीर्यास किंवा प्रौढ तत्त्वविवेचनास फारसा वाव नसतो. आपल्या एकाद्या मित्राप्रमाणें लेखक लघुनिबंधांत आपल्याशीं गप्पागोष्टी करूं लागतो, जीवनांतील कांही अनुभव आपल्याला सांगतो आणि त्याविषयी त्याच्या मनांत ज्या भावनांची जपणूक त्याने केलेली असते, त्या भावना तो लघुनिबंधांत व्यक्त करतो. कांही लेखक लघुनिबंधांच्या अखेरीस जीवनाविषयीचा आपला दृष्टिकोणहि व्यक्त करतात. लघुनिबंधांत लेखकाची भूमिकाच अशा प्रकारें बदलल्यामुळेच त्याच्या स्वरूपांत, मांडणींत आणि निबंधाच्या स्वरूपांत बराच फरक आढळतो. निबंध लिहितांना चिपळूणकरांना 'देशोन्नति' किंवा 'ग्रंथावर टीका' यासारखे गंभीर विषय निवडावे लागले, तर लघुनिबंध लिहितांना 'पहिला पांढरा केस' किंवा 'रिकाम्या बाटल्या' यासारखे विषयसुद्धा लघुनिबंधकारांना योग्य असेच वाटले! लघुनिबंधास कोणताहि विषय चालतो. त्या विषयाच्या अनुषंगाने लेखक हंसतखेळत जें विवेचन करतो, त्याचें स्वरूप कांही अंशीं शिळोप्याच्या गप्पासारखे असतें. लघुनिबंधांत अशा प्रकारें लेखक वाचकांना आपल्या विश्वासांत घेतो. त्याचें व्यक्तिमत्व त्याच्या लघुनिबंधांत प्रकट होतें तें असें. यामुळेच लघुनिबंधांत आत्माविष्कार साधलेला असतो किंवा लघुनिबंध हे आत्मनिष्ठ असतात असें म्हणतात. प्रा. फडके, वि. स. खांडेकर, अनंत काणेकर, ना. मा. संत. यांच्या लघुनिबंधांना महाराष्ट्रांत अमाप लोकप्रियता लाभली. मराठवाड्यांतील प्रा. भगवन्त देशमुख यांचा 'आलोक' हा लघुनिबंधसंग्रह प्रसिद्ध आहे.

नाट्यछटा—

नाट्यछटेंत लेखक एखाद्या काल्पनिक व्यक्तीचे विचार, तिच्या भावना व कल्पना तिच्या शब्दांत व तिच्याच तोंडून वदवीत असतो. नाट्यछटेंत बोलणारी व्यक्ति एकच असते. तथापि ती इतरांशीं बोलत आहे असें ज्या वेळीं लेखकास दाखवावयाचें असतें, त्या वेळीं इतरांचे विचारहि ती व्यक्ति आपल्या भाषणांतच सांगते. या वाङ्मय-प्रकारांत एकादी लहानशी घटना नाट्यमय रीतीने रंगविलेली असते. या घटनेच्या निमित्ताने नाट्यछटेंतील व्यक्ति वाचकांशीं अगदी मनमोकळेपणाने, कुठलाहि आडपडदा न ठेवता, बोलत असते. यामुळे तिच्या विचारांशीं, भावना—कल्पनांशीं वाचकांचा परिचय तर होतोच पण तिच्या स्वभावांतील कांही वैशिष्ट्यपूर्ण पैलूंचें दर्शनहि त्यांना घडतें. बहुधा विरोधावर नाट्यछटेची उभारणी झालेली असते. नाट्यछटेंत नाटका-

प्रमाणे एखादें सलग, संपूर्ण कथानक मुळीच सांगितलेलें नसतें तर केवळ, जीवनांतील एखाददुसऱ्या वैशिष्ट्यपूर्ण प्रसंगाचेंच चित्रण केलेलें असतें. त्याचप्रमाणें नाट्यछटेंत रंगाविलेल्या व्यक्तीच्या स्वभावाचें संपूर्ण दर्शनहि त्यांत घडविण्याचें कार्य लेखकाने अंगिकारलेलें नसतें, तर तिच्या स्वभावांतील कांही, लक्षांत घेण्याजोग्या, पैलूंवरच लेखकाचें लक्ष केंद्रित झालेलें असतें. नाट्यछटेच्या विविध वैशिष्ट्यांमध्ये भाषेचा विचार होणें अवश्य आहे. पात्राची मनोवृत्ति व प्रसंगाचें स्वरूप लक्षांत घेऊनच त्यास अनुरूप अशा भाषेंत लेखक नाट्यछटा लिहितो. अशी अनुरूप भाषा नाट्यछटेंत नसल्यास ती मुळीच रंगणार नाही व वाचकांवर तिचा तितकासा प्रभावहि पडणार नाही. समर्पक शीर्षक हाहि नाट्यछटेचा एक विशेष होय. अशा प्रकारच्या शीर्षकामुळे वाचकांच्या मनांत उत्सुकता निर्माण होते.

कै. दिवाकर यांनी लिहिलेल्या नाट्यछटा मराठी वाङ्मयांत अजरामर झाल्या आहे. 'तेवढेंच ज्ञानप्रकाशांत', 'कारण चरित्र लिहावयाचें आहे!' 'पण बॅट नाही!' या त्यांच्या नाट्यछटा आजचा मराठी वाचकहि मोठ्या आवडीने वाचतो.

शब्दचित्र—

एखादी व्यक्ति, प्रसंग किंवा दृश्य यांचें शब्दांच्या सहाय्याने हुबेहूब रेखाटलेलें चित्र व त्यामुळे व्यक्तीविषयी, प्रसंगाविषयी किंवा दृश्याविषयी लेखकाच्या मनांत जे विचार निर्माण झाले असतील त्यांचें दर्शन शब्दचित्रांत घडतें. जेव्हा एखाद्या व्यक्तीचें शब्दचित्र रेखाटावयाचें असतें त्या वेळीं लेखक तिच्या स्वभावाची यथातथ्य कल्पना देण्याचा प्रयत्न करतो. निसर्गातील एखाद्या दृश्याचें किंवा जीवनांतील एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण प्रसंगाचें चित्रण करतांनाहि तें दृश्य किंवा तो प्रसंग अत्यंत उठावदारपणे कसा मांडतां येईल व त्यांतील सौंदर्य कसें अधिकाधिक प्रमाणांत टिपतां येईल, याची दक्षता लेखक घेतो. शब्दचित्रांत लेखकाच्या सूक्ष्म निरीक्षणाचा प्रत्यय येतो. शब्दांच्या अर्थपूर्ण योजनेस शब्दचित्रांत महत्त्वाचें स्थान असतें. वाचकांच्या मनावर त्या व्यक्तीचा, दृश्याचा किंवा प्रसंगाचा ठसा उमटण्याच्या दृष्टीनें शब्दचित्रांतील हे विविध विशेष अत्यंत उपयुक्त ठरतात. अप्पांची बैलांची जोडी (कुमार रघुवीर), भांगेंतील तुळस (माटे), सुधा (तळवलकर), सुटलेलीं खेळकर पानें (काका कालेलकर) या शब्दचित्रांत वरील वैशिष्ट्यें आपणांस पाहावयास सांपडतात.

एकाद्या व्यक्तीच्या स्वभावांतील गुण-दोषांचें यथार्थ व कलात्मक वर्णन ज्या शब्दचित्रांत आढळतें त्यास 'व्यक्तिचित्र' म्हणतात. श्री. व्यंकटेश माडगूळकर यांनी 'माणदेशी माणसें' या संग्रहांत अशा प्रकारचीं अनेक व्यक्तिचित्रें रेखाटलीं आहेत.

चरित्र—

लेखक चरित्रामध्यें एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण महत्त्वाच्या व्यक्तीचें जीवन चित्रित करतो. ज्या व्यक्तीचें जीवन चित्रित करावयाचें तिला 'चरित्रनायक' असें म्हणतात. सामान्य माणसास ज्यांच्या जीवनाविषयीं कुतूहल, जिज्ञासा वाटेल, ज्यांचें जीवन सामान्य माणसांना आदर्शभूत वाटेल, अशा व्यक्तींची निवड लेखक चरित्रनायक म्हणून करीत असतो. त्या व्यक्तींच्या आयुष्याचें यथातथ्य दर्शन घडावें म्हणून तो त्यांच्याविषयींची सर्व माहिती मिळवितो. ही माहिती त्या व्यक्तीच्या जीवनाशीं परिचित असलेल्या मंडळींकडून, पत्रांतून, दैनंदिनींतूनहि मिळूं शकते. अशा प्रकारें मिळविलेली विविध स्वरूपाची माहिती जेव्हा चरित्रकार मिळवितो, तेव्हा त्याच्यावर त्या साहित्यांतून चरित्रास उपयुक्त तेवढेंच साहित्य व चरित्रनायकाच्या जीवनांतील आवश्यक तेवढेच प्रसंग निवडण्याची जबाबदारी येऊन पडते. आदर्श चरित्रांत चरित्रनायकाच्या जीवनाचें व व्यक्तिमत्वाचें स्वरूप उत्कृष्टरीत्या प्रकट होतें. चरित्रनायकाच्या गुणांबरोबरच त्याच्या दोषांचाहि उल्लेख चरित्रकार आपल्या ग्रंथांत केल्याशिवाय राहात नाही. कारण तसें केलें नाही तर त्या चरित्रांत चरित्रनायकाच्या जीवनाचें खरें (यथार्थ) स्वरूप प्रकट होणार नाही. या दृष्टीनें चरित्रकार हा निःपक्षपाती असणें आवश्यक असतें. चरित्रनायकाच्या जीवनाबरोबरच त्याने केलेल्या कार्याचाहि विचार लेखक चरित्रांत करीत असतो. विशिष्ट काळांत चरित्रनायकाच्या जीवनाचा प्रवाह कसा वाहत गेला व त्याने आपल्या समाजावर, काळावर व अन्य गोष्टींवर आपल्या कर्तृत्वाचा ठसा कसा उमटविला याचाहि विचार या अनुषंगानेंच केला जातो. चरित्राची भाषा प्रवाही, ओघवती असल्यास त्यांतून चरित्रनायकाचें जीवन सुलभ रीतीनें प्रकट होऊं लागतें, साकार होऊं लागतें. डॉ. जॉन्सन (चिपळूणकर), दादाभाई नवरोजी (प्रा. फडके), मॅझिनी (सावरकर) हीं चरित्रें उल्लेखनीय आहेत.

आत्मचरित्र (आत्मवृत्त)—

आत्मवृत्तांत लेखकाने स्वतःच आपलें जीवन चित्रित केलेलें असतें. आपल्या जीवनांत, बहुधा जीवनाची बरीच वाटचाल संपल्यावर एक दृष्टिक्षेप टाकावा, असें कुणालाहि वाटणें साहजिक आहे. मात्र त्याचबरोबर आत्मचरित्र

लिहितांना, आपल्या जीवनांतील प्रसंगांची निवड करतांना लेखकास फार दक्षता बाळगावी लागते. प्रसंगीं अशा प्रकारच्या लेखनांत आत्मस्तुतिपर भाग येण्याची विशेष शक्यता असते. यासाठी आत्मवृत्त-लेखकास प्रसंगीं तटस्थपणानें व प्रसंगीं आपल्या जीवनाशीं समरस होऊन आत्मचरित्र लिहावें लागतें. गुणांबरोबरच आत्मवृत्त-लेखकानें आपले दोषहि सांगणें आवश्यक असतें. आपल्या जीवनाच्या मागें व्यतीत केलेल्या कालखंडाचें चित्रण व त्याचें केलेलें परीक्षण आत्मवृत्तांत आपणांस पाहावयास मिळतें. लेखकाच्या व्यक्तित्वाचें दर्शन—यथार्थ दर्शन—यामुळे आपणांस घडूं शकतें. लेखकाचें व्यक्तिमत्व अशा प्रकारें साकार होणें ही त्या आत्मचरित्राच्या यशाची एकमेव खूणच होय असें म्हणावयास हरकत नाहीं. पाल्हाळ हा आत्मचरित्रांत रसहानि निर्माण करणारा एक महत्त्वाचा दोष होय. वाचकांना ज्या प्रसंगांत किंवा घटनांत रस वाटणार नाही, गोडी वाटणार नाही, त्याप्रमाणें जे निरर्थक प्रसंग आपल्या आयुष्यांत विखुरले आहेत, अशा प्रसंगांना किंवा घटनांना आत्मचरित्रकाराने फाटा देणें अत्यंत आवश्यक असतें. असें केलें नाही तर आत्मचरित्राच्या रचनेची संपूर्ण घडीच विसकटून जाते. आपल्या आयुष्याचें केलेलें प्रामाणिक चित्रण म्हणजेच आत्मचरित्र, अशी एका टीकाकाराने केलेली आत्मचरित्राची व्याख्या वरील वैशिष्ट्यें लक्षांत घेतल्यास सार्थ आहे असें वाटतें. श्री. न. चिं. केळकर यांची 'जीवनयात्रा,' लक्ष्मीबाई टिळक यांचीं 'स्मृति-चित्रें,' सावरकरांची 'जन्म-ठेप' हीं मराठींतील गाजलेलीं आत्मचरित्रें होत.

नाटक—

प्रा. फडके यांनी 'रंगभूमीवर अभिनयाच्या व भाषणाच्या द्वारें लोक-समुदायास सांगितली जाणारी कथा म्हणजे नाटक' अशी नाटकाची व्याख्या केली आहे. जीवनांतील विविध घटनांतून निवडलेलें उत्कट कथानक, त्यासाठी आवश्यक अशा प्रकारच्या वातावरणाची निर्मिति, कथानकासाठीं लागणाऱ्या पात्रांची निर्मिति आणि कथानकास व्यक्त स्वरूप देण्यासाठी घेतलेलें संवादांचें साहाय्य—या सर्वांतून साधलेला रसाविष्कार अशा प्रकारचीं विविध वैशिष्ट्यें नाटकांत आपल्याला दिसतात. नाटकासाठीं जें कथानक निवडावयाचें तें प्रेक्षकांवर कसा व कितपत परिणाम करूं शकेल, त्यांतील संघर्ष नाटक रंगविण्यास समर्थ आहे कीं नाही याचाहि विचार लेखकास करावा लागतो. त्या कथानकाचें स्वरूप व सौंदर्य प्रेक्षकांच्या लक्षांत येऊन ते त्याचा आस्वाद घेऊं शकतील एवढ्याच निवडक प्रसंगांना नाटकांत स्थान द्यावयास हवें. एरवी पाल्हाळामुळे रसहानि होण्याची शक्यता असते. केवळ भाषणाच्या किंवा संवादांच्या साहाय्याने लेखकास आपलें कथानक प्रेक्षकांसमोर मांडावें

लागतें, ही रचनेच्या दृष्टीनें एक अत्यंत अवघड अशी बाब आहे. कादंबरींत लेखक मधूनमधून प्रकट होऊन विविध प्रसंगांची सांखळी आपल्या निवेदनाने भरून काढूं शकतो. नाटकांत मात्र या गोष्टीस फारसा वाव नसतो. कारण नाटककारास जें कांही सांगावयाचें तें पात्रांच्या संवादांच्या साहाय्यानेच सांगतां येतें. नाटकाची भाषा हेंहि त्या नाटकाचें एक वैशिष्ट्यच असतें. प्रसंग व पात्र यांचा विचार करून लेखकाने त्यास अनुरूप अशा भाषेचा उपयोग केला तरच नाटक रंगूं शकतें. ऐतिहासिक नाटकांची भाषा आपण नेहमी बोलतों त्या भाषेपेक्षां कितीतरी वेगळी असते हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल. नाटक हें रंगभूमीवर (स्टेजवर) होत असल्याने रंगभूमीच्या किंवा स्टेजच्या मर्यादाहि नाटककारास लक्षांत घ्याव्या लागतात. उदाहरणार्थ, संपूर्ण युद्धाचा देखावा रंगभूमीवर उभारणें बरेंच कठीण असतें. यासाठी लेखकास या गोष्टी केवळ सुचवाव्या लागतात किंवा त्या प्रेक्षकांच्या लक्षांत याव्यात यासाठी आणखी कांहीं योजना करावी लागते. मराठींतील पूर्वीची नाटकें 'संगीत नाटकें' म्हणून ओळखलीं जात. या नाटकांत पात्रांच्या तोंडीं पदें घालण्याची प्रथा होती. सध्या संगीत नाटकांची परंपरा कांहीशी खुंटली आहे. देवलांचें 'शारदा,' गडकऱ्यांचें 'भावबंधन' किंवा 'एकच प्याला,' आचार्य अत्र्यांचें 'घराबाहेर' किंवा 'उद्यांचा संसार,' पु. ल. देशपांडे यांचें 'तुझें आहे तुजपाशीं' हीं मराठी नाटकें महाराष्ट्रांत अत्यंत लोकप्रिय झालीं आहेत. उत्कृष्ट नाटकाचीं बहुतेक सर्व वैशिष्ट्यें या नाटकांत आढळतात.

कादंबरी—

नाटकाप्रमाणेच कादंबरींतहि कथानकास अत्यंत महत्त्वाचें स्थान असतें. जीवनांतील विविध प्रसंगांची निवड करून लेखक त्यांचें दर्शन घडविण्याचा प्रयत्न कादंबरींत करतो. जीवनांतील विविध प्रश्नांचें, समस्यांचें चित्रणहि कादंबरींत करतां येते. या कथानकाची जडणघडण किंवा रचना करतांना कांही प्रसंगांची निवड लेखक करतो. त्या सर्व प्रसंगांमध्ये एक प्रकारचा एकसूत्रीपणा आपल्याला आढळतो. या सर्व प्रसंगांचा विशिष्ट असा परिणाम वाचकांच्या मनावर होतो. जीवनांतील सौंदर्याचें दर्शन लेखक अशा प्रकारें घडवितो.

कादंबरींतील कथानकासाठी सामाजिक पात्रांची आवश्यकता असते. या पात्रांच्या स्वभावपरिपोषांतून व त्यांच्या विविध कृतींतून कादंबरीचें कथानक वाचकांसमोर अवतरत असतें, प्रकट होत असतें. या पात्रांच्या स्वभावाचें चित्रण करणें हेंहि कादंबरीलेखकांचें एक महत्त्वाचें कार्य होय. या कार्यासच 'स्वभावलेखन' किंवा 'स्वभावरेखाटन' असें म्हणतात. विविध पात्रांच्या स्वभावांतील विशेष

ठळक अशा प्रवृत्तींबरोबरच सूक्ष्म मनोविकारांचें चित्रण करण्याचा प्रयत्नहि कादंबरीकार करीत असतो.

कथानकाची रचना, घटना किंवा प्रसंग यांची जुळणी, पात्रांचें स्वभाव-चित्रण यांबरोबरच कादंबरींत अनुरूप अशा वातावरणाची निर्मिति होणेंहि आवश्यक असतें.

कादंबरींतील प्रसंगचित्रणांतून व स्वभावरेखाटनांतून कादंबरीकार विविध रसांचा आविष्कार करीत असतो. उत्कट रसाविष्कारामुळे कादंबरीच्या लालित्यांत मोलाची भर पडते. पात्रानुरूप व प्रसंगानुरूप भाषा हें कादंबरीचें एक महत्त्वपूर्ण अंग आहे. कादंबरीचा आस्वाद घेतांना अशा प्रकारच्या भाषेचेंच सहाय्य होतें. कादंबरींत विविध प्रकारच्या वर्णनांस बराच वाव असतो. या वर्णनांमुळेहि कादंबरीच्या सौंदर्यांत निश्चितपणें भर पडत असते. प्रा. ना. सी. फडके आणि श्री. वि. स. खांडेकर या कादंबरीकारांच्या सर्व कादंबऱ्यांतून अशा प्रकारचीं सुंदर सुंदर वर्णनें जागोजाग विखुरलीं आहेत. विशेषत: खांडेकरांच्या निसर्गवर्णनांचें मराठी वाचकांना विस्मरण होणें अशक्य आहे.

कादंबरीच्या रचनेचा थोडक्यांत विचार करून हा भाग संपवूं. कादंबरींत एकादें कथानक रंगविलेलें असतें याविषयी यापूर्वी उल्लेख केलाच आहे. प्रकरणा-प्रकरणांतून हें कथानक वाचकांसमोर प्रकट होत असतें. या मुख्य कथानकाच्या जोडीला बहुधा कादंबरींत मुख्य कथानकास जोडलेलें असें उपकथानकहि असतें. मात्र या दोन्ही कथानकांचा वाचकांवर योग्य तोच संस्कार होईल, याची दक्षता कादंबरीकार घेत असतो. कादंबरीचा प्रारंभ व शेवट आकर्षक व परिणामकारक कसा होईल आणि संपूर्ण कादंबरी वाचीत असतांना वाचकाची उत्कंठा उत्तरोत्तर कशी वाढत जाईल याचाहि विचार लेखकास करावा लागतो.

हरिभाऊ आपटे यांच्या 'पण लक्षांत कोण घेतो?', 'वज्राघात'; प्रा. ना. सी. फडके यांच्या 'दौलत', 'जादूगार', 'प्रवासी'; श्री. वि. स. खांडेकर यांच्या 'उल्का', 'क्रौंचवध', 'सुखाचा शोध', 'ययाति'; प्रा. वा. म. जोशी यांच्या 'सुशिलेचा देव', 'रागिणी' आणि माडखोलकरांची 'मुक्तात्मा' यासारख्या कादंबऱ्यांनी मराठी वाङ्मय समृद्ध झालें आहे.

---

३. कांही काव्य-प्रकार

सुनीत —

इंग्रजी 'सॉनेट' या काव्यप्रकारावरून हा प्रकार मराठींत आला. तेराव्या शतकांत इटली नांवाच्या देशांत या काव्यप्रकाराचा जन्म झाला. हा काव्यप्रकार नव्याने मराठींत आल्यावर चतुर्दशक, स्वनीतक–अशीं विविध नांवें या काव्यप्रकारास मराठींत सुचविलीं गेलीं. तथापि माधवराव पटवर्धन (कवि, माधव ज्यूलियन्) यांनीं या प्रकारास दिलेलें सुनीत हेंच नांव पुढे लोकप्रिय ठरलें.

वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे सुनीत या काव्यप्रकाराचें वेगळेंपण आपल्या नजरेंत भरतें. रचनादृष्ट्या सुनीताचे दोन प्रकार मानले जातात:–(१) शेक्स्पियरचें सुनीत आणि (२) मिल्टनचें सुनीत. दोनहि प्रकारांच्या सुनीतांत चौदा ओळीच असतात. तथापि यांपैकीं प्रत्येक प्रकारांत या चौदा ओळींचे दोन विभाग पाडण्यांत येतात. त्यावरून शेक्स्पियरचें सुनीत आणि मिल्टनचें सुनीत आपापल्या परीने स्वतंत्र कशीं आहेत, तें पाहतां येतें.

शेक्स्पियरच्या सुनांतांत पहिल्या बारा ओळींचा एक विभाग असून पुढील दोन ओळींचा दुसरा विभाग असतो. पहिल्या विभागांत एखाद्या विचाराचा किंवा एखाद्या भावनेचा परिपोष केलेला असून दुसऱ्या विभागांत त्या विचाराचा किंवा भावनेचा समारोप करण्याचा किंवा पहिल्या विभागांतील विचारास वा भावनेस सुंदरशी कलाटणी देण्याचा प्रयत्न कवि करतो. या दृष्टीने शेक्स्पियरच्या सुनांतांत या दुसऱ्या (दोन ओळींच्या) विभागास विशेष महत्त्व असतें.

मिल्टनच्या सुनीतांतहि दोन विभाग असतात. आठ ओळींचा पहिला विभाग असून पुढील सहा ओळींचा मिळून दुसरा विभाग होतो. या सुनीतास 'षड्सुनीत' असेंहि म्हणतात. या सुनीताच्या दोन विभागांत दोन प्रसंग, दोन भावना किंवा दोन विचार यांचें प्रतिपादन कवि करतो. कधी कधी कवि पहिल्या विभागांत एखादा प्रसंग वर्णून त्याविषयींच्या भावनेचें प्रतिपादन दुसऱ्या विभागांत करतो.

भावनेबरोबरच विचारासहि सुनीतांत प्राधान्य दिलें जातें. मराठींत बहुधा यासाठी उपकारक ठरणारें 'शार्दूलविक्रीडित' ह्या वृत्ताचा उपयोग करतात.

'आम्ही कोण?' (केशवसुत), 'मयूरासन आणि ताजमहाल' (केशवसुत), 'दिवाळी तो – आणि मी' (अनंत काणेकर), 'घ्यावा जन्म पुनः पुन्हां' (यशवंत) हीं मराठींतील सुनीत या काव्यप्रकाराचीं कांही ठळक उदाहरणें होत.

भावगीत—

हा काव्यप्रकारहि मराठींत इंग्रजी वाङ्मयांतून आला आहे. इंग्रजींत भावगीतास 'लिरिक्' (Lyric) असें म्हणतात. मराठींत या काव्यप्रकारास 'वीणा काव्य', 'वैणीक', 'गीतिका' इ० नांवें दिलीं गेलीं. पण पुढें विशेषेंकरून 'भावगीत' हें रविकिरण मंडळानें दिलेलें नांव रूढ झालें व आजतागायतहि या काव्यप्रकारास हेंच नांव दिलें जातें.

या काव्यप्रकारांत भावनेस अत्यंत महत्त्वाचें स्थान असतें हें वेगळें सांगावयाचें कारण नाहीं. या काव्यप्रकाराच्या नांवावरूनच हें स्पष्ट होतें. कवीच्या उत्कट भावनेचा आविष्कार या काव्यांत झालेला असतो–म्हणजेच आपल्या मनांतील भावना कवि या काव्यप्रकाराच्या सहाय्याने व्यक्त करीत असतो. हर्ष, शोक, प्रेम, वात्सल्य इ० विविध भावनांनी कवीचें अंतःकरण जेव्हा हेलावतें तेव्हां त्या भावना त्याच्या भावगीतांत व्यक्त होतात. विचारांच्या प्रतिपादनास भावगीतांत स्थान नसतें, हें उघड आहे.

भावगीत या शब्दांतील भाव आणि गीत हे दोनहि शब्द महत्त्वाचे आहेत. भावनांचें प्रकटीकरण आणि गेयता दोनहि गोष्टी भावगीतांत असणें आवश्यक आहे. भावगीतांतील गेयतेमुळेंच तें गुणगुणावें असें आपणांस वाटतें. भावगीतांत कवीच्या भावनेस प्राधान्य असल्याने त्यांत त्याचा आत्माविष्कारहि साधलेला असतो.

'म्हातारी' (केशवसुत), 'फुलपांखरूं' (केशवसुत), 'पांखरा येशिल कधिं परतून' (टिळक), 'सारंगी' (यशवंत), 'सागरास' (सावरकर)

हीं मराठी भावगीतें अत्यंत लोकप्रिय झालीं आहेत.

उद्देशिका—

हें काव्य कुणाला तरी उद्देशून, संबोधून लिहिलेलें असतें व यासाठींच या काव्यप्रकारास उद्देशिका असें नांव दिलें आहे. कांही टीकाकारांनीं 'पूज्य आणि महान् विभूतींना उद्देशून लिहिलेलें स्तुतिपर काव्य' अशीहि उद्देशिकेची व्याख्या केली आहे. इंग्रजींत या काव्यप्रकारास 'ओड' (Ode) असें म्हणतात.

'तुतारी' (केशवसुत), 'हिंदवंदना' (चंद्रशेखर), 'धुवडास' (गोविंदाग्रज), 'माझ्या जन्मभूमीचें नांव' (टिळक), 'एकच शांतिस्थान' (गिरीश) ह्या मराठी उद्देशिकांचा येथे उदाहरणांदाखल उल्लेख करावयास हवा.

विलापिका—

विलापिकेंत एकाद्या व्यक्तीच्या मृत्यूमुळे कवीस झालेलें दुःख वर्णिलेलें असतें. मृत व्यक्तीचें गुणवर्णन, त्याच्या मृत्यूमुळें झालेली हानि आणि त्यानंतर बहुधा जीवनाविषयींची तात्त्विक चर्चा विलापिकेंत आढळते. भावना आणि विचार यांचा सुंदर संगम विलापिकेंत झाल्याचें आढळतें. जिच्या मृत्यूमुळे कवीस दुःख वाटतें, ती व्यक्ति महान् असलीच पाहिजे असेंहि नाही. एका इंग्रजी कवीने वेड्या कुत्र्याच्या मृत्यूवरदेखील एक विलापिका लिहिली आहे! तिचें नांव 'Elegy on the death of a mad dog' असें आहे. 'शोकावर्त' (लेंभे) आणि 'बापाचे अश्रु' (टिळक) यांसारख्या विलापिका मराठी काव्यांत आढळतात.

नाट्यगीत—

नाट्यगीतांत कवि इतरांच्या भावना त्यांच्याच शब्दांत व्यक्त करतो. नाटकांतील संवादांतून ज्याप्रमाणे विविध पात्रांचे विचार व भावना प्रकट होतात, त्याचप्रमाणें नाट्यगीतांचेंहि आहे. कवि आपल्या कल्पनेच्या साहाय्यानें जणूं नाट्यगीतांत एखाद्या काल्पनिक व्यक्तीचें रूप घेतो व तिचे विचार, तिच्या भावना यांशीं संपूर्णपणे समरस होऊन, ते विचार व त्या भावना व्यक्त करतो. यामुळे नाट्यगीतांत एक प्रकारची नाट्यमयताहि येते. डॉ. वि. म. कुलकर्णी यांनी नाट्यगीतास 'पद्यरूप नाट्यछटा' असें नांव दिलें आहे, तें कांही अंशीं योग्यच आहे असें वाटतें. नाट्यगीतांत भावगीतांची विविध वैशिष्ट्येंहि आढळतात. काल्पनिक पात्रांच्या भावनेचा व कल्पनांचा आविष्कार, नाट्यमय प्रसंगाची निवड हीं नाट्यगीतांचीं वैशिष्ट्यें होत. 'राजकन्या आणि तिची दासी' (तांबे), 'तर मग गट्टी कोणाशीं?' (तांबे), 'संगमोत्सुक डोह' (माधव ज्युलियन), 'घाल घाल पिंगा वाऱ्या' (निकुंब), 'न्यारिचा वकूत' (यशवन्त) हीं कांही ठळक मराठी नाट्यगीतें होत.

बालगीत (शिशुगीत)—

बालगीतांत मुलांच्या कल्पना, त्यांच्या भावना व त्यांचे विचार कवि त्यांच्याच भाषेंत व्यक्त करतो. बालगीतांची भाषा अत्यंत सोपी व मुलांना समजण्याजोगी असते. प्रा. मायदेव यांनी विपुल प्रमाणांत बालगीतें लिहिलीं आहेत. 'छोटें घरकूल,' 'हिरवी साडी,' 'कधीं होईल मोठा मी?' हीं त्यांची

बालगीतें होत. वि. म. कुलकर्णी, मंगेश पाडगांवकर, विंदा करंदीकर या कवींनीहि मराठी वाङ्मयांत सुंदर शिशुगीतांची भर घातली आहे.

विडंबन काव्य—

एखाद्या कवितेची चाल, तिच्यामधील शब्दप्रयोग व काव्य घेऊन विनोदनिर्मितीसाठी तिचें अनुकरण करण्याचा प्रयत्न विडंबन काव्यांत केलेला असतो. मूळ कवितेची ती एक प्रकारची नक्कल असते. मूळ कवितेंतील विचार किंवा भावना चांगल्या व्यक्तीविषयी किंवा वस्तूविषयी व्यक्त केलेली असते. तशाच प्रकारची भावना (तुलनेने) वस्तूविषयी किंवा व्यक्तीविषयी प्रकट करण्याचा प्रयत्न विडंबन काव्यांत केल्यामुळे विसंगति जाणवते व विनोद निर्माण होतो. ' पांखरा येशिल कधिं परतून ? ' या रे० टिळकांच्या कवितेचें विडंबन आचार्य अत्रे यांनी ' परटा, येशिल काधिं परतून ? ' या कवितेंत केलें आहे. अत्र्यांनीं–विडंबन गीतांचा समावेश ' झेंडूचीं फुलें ' या संग्रहांत केला आहे. चिपळूणकरांच्या मराठी ' मेघदूत ' काव्याचें विडंबन श्री. ना. गं. लिमये यांनी ' बल्लवदूत ' या काव्यांत केलें आहे.

गद्यकाव्य—

या प्रकाराचा समावेश काव्यांतच करावयास हवा. कारण हें लेखन जरी गद्यांत केलेलें असलें तरी त्यांतील पद्यमयता किंवा काव्यमयता हीच वाचकांच्या प्रत्ययास प्रामुख्याने येतें. पद्य हें गातां येण्याजोगें असतें म्हणून त्यांत ' गेयता ' हा गुण आढळतो. गद्यकाव्य हें गद्यांत लिहिलेलें असल्यामुळे त्यांत गेयता येणें शक्य नसतें म्हणूनच काव्याचीं इतर सर्व वैशिष्ट्यें त्यांत आढळावींत असा प्रयत्न कलावंत करीत असतो. गद्यकाव्यांत विशिष्ट भावनेचा उत्कट व परिणामकारक आविष्कार अत्यंत कौशल्याने केलेला असतो. हळुवार भावना, लालित्यपूर्ण शब्दांची योजना, रूपकाचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उपयोग गद्य-काव्यांत करून त्या अधिकाधिक काव्यमय करण्याचा प्रयत्न कवि करीत असतो. शिवरामपंत परांजपे यांचें बहुतेक सर्व लेखन गद्यकाव्यात्मकच आहे. वि. स. खांडेकर यांच्या लेखनांतून गद्यकाव्याचीं कितीतरी उदाहरणें आढळतात.

गद्यकाव्याचा एक नमुना—

विरोधाभास !

मी आडोशाला उभा राहिलों अन् सभोर पाहूं लागलों. केवढं उग्र स्वरूप धारण केलं होतं साऱ्या सृष्टीनं त्या वेळीं ! थोड्याच वेळापूर्वी ज्या आकाशांतून सूर्य तळपला होता, त्याच आकाशांत आतां जिकडेतिकडे काळ्या

ढगांचा थर साचला होता आणि प्रचंड जलधारा सारख्या खाली पडत होत्या. त्या धारांच्या गर्द दाटींतून समोरच्या दरीचं मेघाचं तें दृश्य दिसणं अशक्य झालं होतं. अगदी जवळचंच वृक्ष काय ते दिसत होते. पण त्यांच्यासुद्धां फक्त अस्पष्ट कृष्णवर्ण आकृतीच ! जणूं एखाद्या मोठ्या पडद्यावर एखाद्या चित्रकारानं काळ्या रंगाचे मोठमोठे शिडकावे फासून ठेवले होते अन् लांकडें पहाणाऱ्याला तीं झाडं असावींत असा भास होण्यासारखा होता. जलधारांचा वृक्षपर्णांवर पडून होणारा सळसळाट अगदीं कानठळ्या बसण्यासारखा होता, अन् मध्येच विजेचा कडकडाट होऊन धूसर आकाशभागावर विलक्षण तेजःपुंज वांकड्या-तिकड्या लांबलचक रेघा प्रगट होऊन लुप्त झाल्या कीं क्षणमात्र ऐकूं येईनासा झालेला तो सळसळाट पुन्हा येऊं लागे. जणूं एखादं हिंस्र श्वापद क्षणमात्र भीतीनं श्वास कोंडून धरून पुन्हा आपला विचित्र चीत्कार-नाद करूं लागत होतं. सृष्टीचं तें तांडवनृत्य इतक्याजवळून, त्याच्या ऐन तुफानाच्या मध्ये उभे राहून मी यापूर्वी कधी पाहिलं नव्हतं.

मी सहज वर दृष्टी वळविली तों त्या खोपटाच्या छपराच्या एका जागीं लहानसं घरटं होतं अन् त्या घरट्यावर दोन पांखरं एकमेकांला बिलगून पंखांत चोंची घालून बसलीं होतीं. मधूनच तीं थरथर कांपत आणि आणखी एक-मेकांच्या जवळ सरकत. मध्येच तीं चिवचिवाट करीत आणि एकमेकांच्या चोंचीला चोंच लावीत. जणूं परस्परांच्या भेदरलेल्या जीवांना तीं धीर देत अन् एकमेकांला सांगत, 'भिऊं नकोस ! मी आहे ना वरं तुझ्याजवळ !' त्या घरट्यांत त्यांचीं पिलं असतील किंवा पिलांच्या अपेक्षेनं त्यांनीं घरटं बांधून ठेवलं असेल. प्रेमाचं अन् वात्सल्याचं याहून सुंदर अन् निर्मळ दृश्य दुसरं कुठलं असेल का ? भोंवतालच्या सृष्टींत जिकडे-तिकडे घनचक्कर माजली होती, पण एवढ्याशा वीतभर जागेंतल्या त्या घरट्यांत किती मृदु, नाजूक भावनांचा विलास चालला होता !

---

४. रस आणि रसग्रहण

रस

रस म्हणजे काय ?—

ज्याचा आपण आस्वाद घेतों, तो रस होय. काव्य किंवा गद्य वाचीत असतांना आपणांस त्यांतील सौंदर्याचें दर्शन घडतें, आपण त्या सौंदर्याचा आस्वाद घेऊं लागतों. हा आस्वाद घेतांना त्या वाङ्मयप्रकारांतील वैशिष्ट्यांचीहि

आपणांस कल्पना येते. या वैशिष्ट्यांमुळेच त्या वाङ्मयप्रकारांतून एक प्रकारचें सौंदर्य प्रकट होत असतें. ह्या वाङ्मयप्रकारांत जेथें जेथें सौंदर्य आढळतें, तेथे लेखकाने किंवा कवीने रसाचा आविष्कार केलेला असतो. या 'रसा'ला काव्याचा किंवा वाङ्मयाचा आत्मा असेंहि संबोधण्यांत येतें.

रसनिर्मिति—

स्थायी भाव, व्यभिचारी भाव, विभाव व अनुभाव यांच्या साहाय्याने रसनिष्पत्ति किंवा रसाची निर्मिति होते. विशिष्ट कलाकृतींतील प्रमुख किंवा कायम टिकणाऱ्या भावांना स्थायी भाव असें म्हणतात. 'ज्यांचा ठसा अन्तःकरणावर बराच काल उमटून राहतो, त्या भावना म्हणजे स्थायीभाव होत' अशीहि स्थायी भावांची व्याख्या करतात. शृंगार (रति), हास्य, शोक, क्रोध, उत्साह, भीति, किळस, आश्चर्य हे स्थायी भाव होत.

व्यभिचारी भाव म्हणजे वाङ्मयांतील स्थायी भावांचा परिपोष करणारे भाव. स्थायी भावाप्रमाणे यांचा कायमचा ठसा मनावर उमटत नाहीं, तथापि मुख्य भावनेच्या आविष्कारासाठी मात्र यांची फार आवश्यकता असते. विभावांमुळे स्थायी भावांचा आस्वाद घेण्यास अनुकूल असें वातावरण निर्माण होतें. अनुभाव हे स्थायीभावांचा अनुभव घडवितात. ते स्थायीभावांचा शरिरावर होणारा परिणाम (कंप, रोमांच, अश्रु इ०) दाखवितात.

रससंख्या—

सामान्यतः रस आठ किंवा नऊ असल्याचें मानतात. त्यांच्याविषयीची माहिती पुढे दिली आहे—

'रति' हा शृंगाररसाचा स्थायी भाव होय. पुरुष आणि स्त्री यांना एकमेकांविषयी जें कामुक प्रेम वाटतें त्या भावनेस 'रति' असें म्हणतात. हंसूं येणें ही हास्यरसांतील मुख्य भावना असते. विसंगति किंवा अतिशयोक्ति त्यांच्या चित्रणानें बहुधा या रसाची निर्मिति होते. हृदयद्रावक गोष्टींचें वर्णन जेथे केलेलें असतें, तेथे करुणरसाचा आविष्कार होतो. शोक किंवा दुःख करुणरसाचा स्थायीभाव आहे. धीरोदात्त किंवा पराक्रमयुक्त वर्णनांमुळे वीर रसाची निर्मिति होते. उत्साह हा या रसाचा स्थायीभाव आहे. वाचकांना आश्चर्य वाटेल अशा प्रसंगांची निर्मिति जेथे केलेली असते तेथे अद्‌भुत रस निर्माण होतो. आश्चर्य हाच या रसाचा स्थायीभाव आहे. वाचकांना किळस (जुगुप्सा) वाटेल असें वर्णन ज्या ठिकाणीं केलेलें असतें तेथे बीभत्स रस निर्माण होतो. 'किळस' हा या रसाचा स्थायीभाव होय. देवाविषयी किंवा अन्य व्यक्तीविषयीची श्रद्धा व आदरभाव भक्तिरसयुक्त काव्यात प्रकट होतो. 'भीति' हा भयानक रसाचा

स्थायीभाव आहे. ज्यांच्यामुळे भीति वाटेल अशा प्रकारच्या वर्णनांत भयानक रसाचा आविष्कार होतो. उदात्त प्रसंगांतील 'उदात्तता' हा शांत रसाचा स्थायीभाव होय. क्रोध हा रौद्र रसाचा स्थायीभाव होय. ज्या ठिकाणीं क्रोधाची भावना प्रदीप्त होते त्या ठिकाणीं रौद्र रसाची निर्मिति होते.

याशिवाय कांही टीकाकार 'वत्सल' रसहि मानतात. प्रेयान् किंवा वात्सल्याची भावना हा या रसाचा स्थायीभाव होय.

काव्यांत किंवा कुठल्याहि वाङ्मयप्रकारांत रसपरिपोषास फार महत्त्वाचें स्थान दिलें जातें. कारण रसांमध्येच त्या कलाकृतींतील सौंदर्य सामावलेलें असतें. या सौंदर्याचा अनुभव किंवा आस्वाद जितका अधिक प्रमाणांत वाचकांना घेतां येईल, त्या प्रमाणांत त्या त्या कलाकृतीचें यश अधिकाधिक वाढत जातें.

एखाद्या वाङ्मयप्रकाराचें रसग्रहण कसें करावें याविषयी पुढे विवेचन केलें आहे.

रसग्रहण—

विशिष्ट गद्य किंवा पद्य उताऱ्याचें रसग्रहण करतां येणें ही भाषेच्या अभ्यासाच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे. 'रसग्रहण' या शब्दावरून त्यांतील अभिप्रेत असलेली कल्पना आपल्या लक्षांत येते. रसग्रहण करतांना दिलेला उतारा हा कोणत्या वाङ्मयप्रकारांत मोडतो, हें लक्षांत घ्यावें व मग त्या वाङ्मयप्रकाराचीं कोणकोणतीं वैशिष्ट्यें त्यांत कशीं आढळतात किंवा आढळत नाहीत याविषयीचें विवेचनहि रसग्रहणांत यावें. दिलेल्या उताऱ्यांतील प्रमुख (मध्यवर्ति) कल्पना कोणती व ती लेखकाने किती सुंदर रीतीने वाचकांसमोर मांडली आहे, त्यासाठी त्याने कोणकोणत्या कल्पना मांडल्या आहेत, त्या अर्थपूर्ण व कलात्मक वाटतात काय, अशा प्रकारचें विवेचनहि रसग्रहणांत यावें. उताऱ्याचें शीर्षक (नांव) कितपत बरोबर वाटतें, त्यामुळेहि त्यांतील सौंदर्य प्रकट झालें आहे काय, तेंहि रसग्रहणांत स्पष्ट करावें. एकूण रसग्रहणांत आपण त्या कलाकृतीचा आस्वाद कसा घेतला, हें स्पष्ट करावयास हवें. त्यांतील सौंदर्यस्थलें कोणतीं हें दाखवावयास हवें.

लघुनिबंधाचें रसग्रहण

सुगंध : दिखाऊ अन् टिकाऊ

प्रा. ना. सी. फडके यांनी हा लघुनिबंध लिहिला आहे. मराठी लघुनिबंधाच्या प्रमुख प्रवर्तकांत प्रा. फडके यांची गणना होते. त्यांच्या बहुतेक सर्व लघुनिबंधांत लघुनिबंधाचीं प्रमुख वैशिष्ट्यें अगदी सहजपणे प्रकट होतात.

पुस्तकांना सुगंध लावल्यास त्यांचा खप वाढेल अशी एक अभिनव कल्पना एका अमेरिकन प्रकाशकास सुचली. या कल्पनेचाच विचार, या कल्पनेमुळे लेखकाच्या मनांत निर्माण झालेल्या भावना-कल्पना त्याने या लघुनिबंधांत अगदीं खेळीमेळीच्या भाषेंत सांगितल्या आहेत.

या लघुनिबंधांत जागोजाग विखुरलेला विनोद—हलका-फुलका विनोद-एक प्रकारचें प्रसन्न वातावरण निर्माण करतो. या विनोदांत गंमतीदार उपहासाची सूक्ष्म छटा दडली आहे. 'पुस्तकांच्या सुगंधी आवृत्ति निघूं लागल्या तर पुस्तकविक्रेत्याच्या दुकानांतील उदासपणा थोडा तरी कमी होणार नाही कां?' 'एक मोठी अडचण अशी कीं, प्रतिपाद्य विषयाचा गंधहि नसतांना जे ग्रंथ लेखकांकडून लिहिले जातात, त्यांना प्रकाशकानं तरी कुठला गंध आणून फासायचा?' 'हट्टी, अहंमन्य, मत्सरी, चिरचिरे, स्तुतिलंपट अशा एकेक जातीच्या लेखकागणिक भिन्न भिन्न सूचक सुगंध प्रकाशकानं आणायचे कुठून?' 'आधींच ठराविक ठशाचे अभिप्राय ठोकून द्यायला सवकलेलें पुस्तक-परीक्षक सुगंधी ग्रंथांची कल्पना प्रचारांत आली तर अधिकच आळशी बनतील आणि पुस्तक न वाचतां त्याच्या बाह्यांगावर चार मोघम शब्द लिहिण्यास त्यांना अधिकच वाव मिळेल' यासारख्या कल्पनांतील खुसखुशीत विनोद व कोपरखळ्या यांनी या लघुनिबंधाच्या वैशिष्ट्यांत भर टाकली आहे.

पुस्तकांना सुगंध लावल्यास त्याचे चांगले व वाईट परिणाम कसे होतील याविषयीं लेखकाने विविध उदाहरणें देऊन विवेचन केलें आहे. मात्र हें संपूर्ण विवेचन विचारप्रधान नाही, गंभीर, तात्त्विक चर्चेसाठी त्यास हें विवेचन करावयाचें नाही, तर या विषयाच्या अनुषंगाने आपल्या मनांतील भावना—कल्पना व्यक्त करावयाच्या आहेत इतकेंच. आपल्या वाचकांना विश्वासांत घेऊन त्यांना त्याने आपल्या मनांतील या भावना व कल्पना सांगितल्या आहेत. येथे लेखकाची भूमिका जिव्हाळ्याच्या मित्राची आहे. तो जणू मनमोकळेपणाने वाचकांबरोबर गप्पागोष्टी करीत आहे असें वाटतें. यांतून त्याचें व्यक्तिमत्व वाचकांसमोर प्रकट होतें. त्याच्या आवडीनिवडींची, विचारांची, कल्पनांची जाणीव वाचकांस होते.

आपल्या लघुनिबंधांत खेळीमेळीचें वातावरण निर्माण करण्यांत लेखक यशस्वी झाला आहे. आपल्या नित्य परिचयांतील गोष्टींची विस्मृति त्यास होत नाही. पुस्तकें सुगंधित झाल्यास या नित्य परिचयाच्या गोष्टींवर कोणता परिणाम होईल हें सांगतांना तो म्हणाला,

'पुस्तक विकत घेण्याऐवजी लोकांकडून मागून आणून तें परत करायला

विसरण्याची जी कला आमच्या वाचक-वर्गाच्या ठिकाणी दिसून येते, ती ग्रंथ सुगंधी झाले कीं, तावडतोब वाढत जाईल. रामरावांकडून मागून आणलेलं पुस्तक शामराव नुसतं वाचून थांबणार नाहीत, तर आपल्या कपड्याच्या पेटींत ठेवून मोकळे होतील !'

पुस्तकें सुगंधित केल्यास जे चांगले आणि वाईट परिणाम घडतील, त्यांचा विचार करून शेवटीं लेखकाने या वरकरणीं लावलेल्या सुगंधाऐवजी पुस्तकांतील ज्ञानाचा सुगंध कसा मौलिक असतो, त्याविषयी माहिती सांगितली आहे. कालिदासाच्या 'शाकुंतल' या नाटकाचा उल्लेख करून तो म्हणतो कीं, हें नाटक 'केव्हांहि उघडलं तरी वाचणाऱ्याच्या अंतरंगांत एक अवर्णनीय सुगंध दरवळतो, याचं कारण हेंच !' ग्रंथांतील ज्ञानाचा सुगंध हाच चिरकाल टिकणारा सुगंध होय, असें लेखकास यांतून सुचवावयाचें आहे.

या लघुनिबंधाचा प्रारंभ व शेवट अत्यंत आकर्षक असून वाचकाची उत्कंठा हा लघुनिबंध वाचतांना उत्तरोत्तर वाढत जाते. पुस्तकें सुगंधित करण्याची अभिनव कल्पना, ह्या कल्पनेचा हलक्या फुलक्या पद्धतीने केलेला आविष्कार, या कल्पनेविषयी लेखकाच्या मनांत निर्माण झालेले विचार, या निमित्ताने लेखकाने केलेला आत्माविष्कार (त्याने वाचकांस घडविलेलें आपल्या व्यक्ति-मत्त्वाचें दर्शन), शेवटीं वरील अभिनव कल्पना आपणांस कितपत योग्य वाटते याविषयी मांडलेलें मत, खेळीमेळीची भाषा, हलकाफुलका मिस्किल विनोद, योग्य असें शीर्षक या सर्वच वैशिष्ट्यांमुळे या लघुनिबंधाच्या सौंदर्यांत भर पडली आहे, यांत शंका नाही.

नाट्यछटेचें रसग्रहण

बोलावणं आल्याशिवाय नाही !

"...सांगूं तरी आतां किती जणांना ? येतो तो हेंच विचारतो ! असतील ! चार नाही छप्पन्न नोटिसा निघाल्या असतील ! करायचंय काय मला त्यांच्याशीं ! जायचं असेल त्यांनीं जावं खुशाल. मी थोडाच जातोंय् तसा ? —अरे राहयलं ! नाही तर नाही ! इथं थोडंच माझं कांही अडलं आहे ? हपापलेलीं चार खतरुडीं पोरं गोळा करा आणि हव्वं तें करा म्हणावं ! —नाही सगळ्या गॅदरींगच्या नाटकाचा बट्ट्याबोळ झाला, तर नांव कशाला ! —अवे जा रे ! मोठा शाळेचा मला अभिमान सांगतो आहे ! आम्हांला तेवढा अभिमान नसावा ! —आणि शाळेला ? तिनं हवं तसं आम्हाला लाथाडावं होय ? —अलबत् ! नाहीच भागायचं नुसत्या नोटिशीनं ! कांही थोडींथोडकीं

वर्षे नाही काम केलेलीं मीं ! –अन् तींहि पुन्हा अशींतशीं ? चौथींत आल्या-बरोबर धडाक्याला कॅन्यूटचं काम ! सारख्या टाळ्या ! तीच तन्हा दुसऱ्या वर्षी ! पुढे पांचवींत येतांच...अश्वत्थाम्याचं काम ! जो कांही त्यांत माझा आवाज लागला तसा अद्याप एकाचाहि कोणाचा लागला असेल तर शपथ ! दोन कांरे ? पांचवींत तर ओळीनं तीन वर्षं काम केलीं मीं ! –अन् सहावींतलीं दोन ठाऊकच आहेच तुम्हांला ! –नाही, संभाजीचं काम तें दुसऱ्या वर्षी ! वा ! त्या वर्षी तर किती जणांनीं आंत येऊन सांगितलं कीं, 'धंदेवाल्यापेक्षाहि तुझं काम छान झालं ! –' अरे, त्या वर्षी तर स्पेशल पदक मिळालं मला ! तेंच पुन्हा सातवींत आल्यावर ! पहिलंच अगदी सीझरचं काम –दुसऱ्याला चांगलं दिलेलं... पण त्याचं काढून मुद्दाम मला दिलं. नाटक पाहयला कुणी युरोपियन आला होता, त्यानं काम पाहून, विशेषतः ॲक्सेंट्स् ऐकून... तोंडांत बोट घातलं म्हणतात ! पुढं दुसऱ्या वर्षी... ? –हां, बरोबर ! धुंडी-राजाचं काम ! तेव्हां तर काय... ? हसतां हसतां पुरेवाट झाली लोकांची ! –अन् सगळ्यांत बाबा कळस झाला गेल्या वर्षी ! –शॉयलॉकचं काम ! –पाहून लोक इतके चिडले कीं, एकानं तर चक्क धोंडा मारला स्टेजवर ! –तेव्हा बोला आतां इतका जिथं माझा अनुभव... आणि दर्जा वाढलेला, तिथं असल्या फासक्याफुसक्या नोटिशीनं जायचं ! –साफ नाही यायचा तसा मी ! मास्तरचा जर एवढा ऐटा आहे ...सांगितलं ना ! मास्तरांचाच जर इतका तोरा आहे तर साफ यायचा नाही मी बोलावणं आल्याशिवाय..."

–दिवाकर

रसग्रहण

'बोलावणं आल्याशिवाय नाहीं !' ही दिवाकरांची एक उत्कृष्ट नाट्यछटा आहे. या नाट्यछटेंत शाळेंतील नाटकांत 'नट' म्हणून काम करणाऱ्या एका विद्यार्थ्याच्या मनोवृत्तींचें दर्शन घडविलें आहे. ह्या नटास नाटकांतल्या कामाबद्दल बक्षिसें मिळतात पण नाटकाच्या कामांतच वेळ गेल्यानें तो प्रत्येक इयत्तेंत तीन तीन वर्षें काढतो–आणि पुढे शाळेच्या नाटकांत काम करण्यासाठी शाळेकडून खास 'आमंत्रण' मिळत नाही म्हणून हा नट कसा रागावतो याचें गंमतीदार वर्णन दिवाकरांनी या नाट्यछटेंत केलें आहे. या विद्यार्थ्याच्या स्वभावाचीं वैशिष्ट्यें, त्याचा शाळेवरील राग, आपण नाटकांत जीं जीं कामें केलीं त्यांचा त्याला वाटणारा अभिमान या सर्व गोष्टी या नाट्यां-तून चांगल्या रीतीनें व्यक्त झाल्या आहेत.

विशेषतः शाळेनें 'नाटकांत काम करण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षकांना भेटावें' ही जी नोटीस लावली तिच्यावर हा विद्यार्थी अत्यंत चिडला आहे. 'चार नाहीं, छप्पन्न नोटिसा निघाल्या असतील! करायचंय् काय मला त्यांच्याशीं!' असें तो म्हणतो, एवढेंच नव्हे, तर आपण नाटकांत काम केलें नाही म्हणजे शाळेच्या 'नाटकाचा बट्ट्याबोळ' झाल्याशिवाय रहणार नाही अशीहि त्याला खात्री वाटते.

'दोन कां रे, पांचवींत तर ओळीनें तीन वर्षे कामं केलीं मीं!' अन् सहावींतलीं दोन ठाऊकच आहेत तुम्हांला!' या किंवा 'माझी शायलॉकची भूमिका पाहून लोक इतके चिडले कीं एकानं तर चक्क घोंडा मारला स्टेजवर!' यासारख्या वाक्यावाक्यांतून पेरलेला विनोद हें या नाट्यछटेचें दुसरें महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.

या नाट्यछटेंतील विद्यार्थी आपल्या मित्रास उद्देशून जें कांहीं सांगत आहे तो संपूर्ण प्रसंग आपल्यासमोर उभा करण्याचें कार्य या नाट्यछटेंत लेखकाने अत्यंत कौशल्यानें केलें आहे यांत शंका नाही. त्याचप्रमाणे नाट्यछटेची रचना, बोलणाऱ्या व्यक्तीच्या मनांतील भाव-भावनांचें व विचारांचें प्रकटीकरण लेखकाने चांगलें केलें आहे. मधेमधे नाट्यछटेंतील हा विद्यार्थी आपल्या मित्राच्या प्रश्नाचें उत्तर देत आहे, त्याच्याशीं बोलत आहे, असेंहि दाखवून लेखकाने एक प्रकारच्या नाट्यपूर्ण वातावरणाची निर्मिति अगदीं सहजपणे केली आहे. 'अरे राह्यलं! नाही तर नाही! इथं थोडंच माझं कांही अडलं आहे!'

'आल्याबरोबर घडाक्याला कॅन्यूटचं काम! सारख्या टाळ्या!' किंवा 'मास्तरांचाच जर इतका तोरा आहे तर साफ यायचा नाही मी बोलावणं आल्याशिवाय...' यासारख्या वाक्यावाक्यागणिक या विद्यार्थ्याला स्वतःच्या अभिनय-कुशलतेविषयी वाटणारी ऐट आणि तोराच वाचकांच्या लक्षांत येत नाही काय?

रचनेच्या दृष्टीने या नाट्यछटेचा प्रारंभ व शेवट अत्यंत आकर्षक आहे. 'बोलावणं आल्याशिवाय नाही' हे या नाट्यछटेचें शीर्षकहि अत्यंत सूचक असून त्यामुळे वाचकांच्या मनांत कुतूहल किंवा उत्सुकता निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. नाट्यछटेच्या भाषेंत विद्यार्थ्यांच्या नेहमीच्या बोलण्यांतील शब्दप्रयोग उपयोजिल्यामुळे अनुकूल वातावरणाची निर्मिति करण्यांत लेखकाने यश मिळविलें आहे.

कवितेचें रसग्रहण—

बालकवींच्या 'श्रावणमास' या कवितेचें आपण रसग्रहण करूं या. मूळ कविता अशी आहे—

श्रावणमास

श्रावणमासीं हर्ष मानसीं हिरवळ दाटे चोंहिकडे;
क्षणांत येतें सरसर शिरवें, क्षणांत फिरूनी ऊन पडे.
वरती बघतां इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे,
मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपीं कुणि भासे !
झालासा सूर्यास्त वाटतो, सांज अहाहा ! तों उघडे;
तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळें पिवळें ऊन पडे.
उठतीं वरतीं जलदांवरतीं अनंत संध्याराग पहा;
सर्व नभावर होय रेखिलें सुंदरतेचें रूप महा.
बलाकमाला उडतां भासे कल्पसुमांची माळाचि ते,
उतरुनि येती अवनीवरती ग्रहगोलचि कीं एकमतें.
फडफड करूनी भिजले अपुले पंख पांखरूं सांवरिती,
सुंदर हरिणी हिरव्या कुरणी निजबाळांसह बागडती.
खिल्लारें हीं चरतीं रानीं, गोपहि गाणीं गात फिरे
मंजुळ पावा गाय तयाचा श्रावणमहिमा एकसुरें.
सुवर्णचंपक फुलला, विपिनीं रम्य केवडा दरवळला;
पारिजातहि बघतां भामारोष मनींचा मावळला !
सुंदर परडी घेउनी हातीं पुरोपकंठीं शुद्धमती;
सुंदरबाला या फुलमाला रम्य फुलें-पत्री खुडती.
देवदर्शना निघती ललना, हर्ष माइना हृदयांत;
वदनीं त्यांच्या वाचुनि घ्यावें श्रावण महिन्याचें गीत.

—बालकवि

रसग्रहण

श्रावण महिन्याचें एक सुंदर दृश्य या कवितेंत बालकवींनी रेखाटलें आहे. या दृश्यांतील सौंदर्य कडव्या-कडव्यांतून, एक एक नवीन कल्पना मांडून त्यांनी व्यक्त केलें आहे.

श्रावण महिन्यांत सृष्टीने किती मनोहर रूप धारण केलेलें असतें ! चोंहिकडे दिसणाऱ्या दाट हिरवळीने वातावरणांत जिकडे तिकडे उल्हास ओतप्रोत भरला आहे असें वाटतें. क्षणांत ऊन पडतें तर क्षणांत पावसाची सर येते. मधूनच इंद्रधनुष्य आकाशावर रेखाटलें जातें. झाडांच्या शेंड्यांवर, घरांवर संध्याकाळच्या वेळीं पिवळें पिवळें ऊन चमकूं लागतें, तेव्हां तें दृश्य किती मनोरम दिसतें ! बगळ्यांचे थवे आकाशांत स्वैर विहार करितात. सुंदर हरिणी वनांमध्ये आपल्या पिलांसह मनसोक्त बागडतात. रानांवनांत चांफा, केवडा यांचा सुगंध दरवळतो. सुंदर मुली हातांत परड्या घेऊन पारिजाताचीं पांढरीं शुभ्र फुलें खुडतात. तरुणी फुलांच्या माळा घेऊन देवदर्शनास जातात. या दृश्याने कवीने कविता संपविली आहे.

एकूण, श्रावण महिन्यांतील वातावरण कसें आल्हादकारक असतें आणि त्यामुळे ' हर्ष माइना हृदयांत ' अशा अवस्थेचा अनुभव आपणा सर्वांना कसा येतो, याचें चित्रण कवीने या कवितेंत अत्यंत सुंदर रीतीने केलें आहे.

या दृश्यांतील सौंदर्य व्यक्त करण्यासाठी त्याने ज्या कल्पनांचा उपयोग केला आहे, त्याहि लक्षांत घेण्याजोग्या आहेत. श्रावणमासांत मध्येच आकाशांत उमटणारें इंद्रधनुष्य व रंगीबेरंगी ढग पाहून ' सुंदरतेचें महान् रूपच ' सृष्टीने आपल्यासमोर चित्रित केलें आहे असें कवीस वाटतें. आकाशांत उडणाऱ्या पांढऱ्या शुभ्र बगळ्यांना पाहून जणूं ती कल्पनारूपी पुष्पांची माळच असावी असें कवि म्हणतो. हे बगळे म्हणजे आकाशांतून उतरलेले ग्रहलगोल असावेत असें त्यांस वाटतें.

एकमागून एक येणाऱ्या सुंदर कल्पनांनी कवितेच्या सौंदर्यांत भर टाकली आहे. त्यांतील प्रत्येक कल्पनेतून ' श्रावणमहिना ' किंवा श्रावण महिन्याचें सौंदर्य व्यक्त होतें व वाचकांस कविता वाचीत असतांना या अपूर्व सौंदर्याचा प्रत्यय येतो. ' श्रावणमास ' कवितेचें शीर्षकहि किती सार्थ आहे याची जाणीव होते. कवीने रेखाटलेल्या या दृश्याशीं वाचकहि तन्मय होतो.

श्रावणांतील दृश्यांची सुंदर मांडणी, विविध कल्पनांचा त्यावर चढविलेला साज, मध्यवर्ति कल्पनेचा केलेला उत्कट आविष्कार, सौंदर्यस्थलांचें कुशल चित्रण, त्याआधारें साधलेला रसाविष्कार आणि सार्थ शीर्षक ही या कवितेचीं प्रमुख वैशिष्ट्यें होत.

---

५. निबंध—लेखन

तंत्र आणि मंत्र

नमुनेदार निबंध-लेखन कष्टसाध्य आहे—

मातृभाषेच्या प्रश्नपत्रिकेंत ज्या प्रश्नासंबंधीं विद्यार्थ्यांत अनेक विचार-प्रवाह आढळतात तो प्रश्न म्हणजे निबंध-लेखनाचा. बहुसंख्य विद्यार्थ्यांना निबंध-लेखन ही एक डोकेंदुखी वाटते. कुणीकडून अपेक्षित ओळींची संख्या पूर्ण केली, चार थापा मारल्या, शब्दांत जास्त अंतर ठेवून पानें वाढविलीं, त्याच त्याच मुद्यांची चमत्कारिक, कंटाळवाणी लांबण लावली कीं संपलें एकदाचें निबंध-लेखन अशी कित्येकांची कल्पना असते. त्यामुळे मराठीच्या उत्तरपत्रिका वर्गांत वाटल्यानंतर किंवा शालान्त परीक्षा मंडळाकडून विषयवार गुणपत्रक हातीं आल्यानंतर मराठींत शेंकडा तीस ते चाळीस किंवा त्यापेक्षाहि कमी गुण मिळालेले पाहतांच आपल्यावर भयंकर अन्याय झाला आहे, अशा उंच स्वरांत त्या मार्कांचें स्वागत केलें जातें.

उत्तरपत्रिकेंत काय किंवा निबंध-लेखनांत काय किती ओळी लिहिल्या होत्या अगर किती पुरवण्या जोडल्या होत्या याला अजिबात महत्त्व नाहीं. मराठी आमची मायबोली आहे हा अभिमान बाळगणारे हे तिचे 'पुत्र' पाहिल्यानंतर खरोखर मायबोलीची आणि तिचे 'पांग' फेडण्याची भाषा करणाऱ्या या पुत्रांची कींव करावीशी वाटते. परीक्षकाकडून मातृभाषेच्या उत्तर-पत्रिकेंत प्रत्येक उत्तराचा जो विशिष्ट दर्जा, जो मुद्देसूदपणा अपेक्षित असतो. तो दुर्दैवाने शेंकडा पांच उत्तरपत्रिकांतहि आढळून येत नाही. याचें प्रमुख कारण हेंच कीं, मराठी काय ऐन वेळच्या तयारीवर जाईल जमून—मातृभाषेचा आणखी निराळा अभ्यास तो काय करावयाचा असतो, ह्या भ्रामक आणखी वृथा अभिमानांत कित्येक विद्यार्थी मराठीकडे सडकून दुर्लक्ष करतात. मराठींत पोटापुरते मार्क्स् मिळतात आणि मिळतीलहि ही दृष्टि त्यांनी कधीतरी सोडलीच पाहिज.

निबंध-लेखनाचा प्रश्न आत्मविश्वासाने आणि सफाईने सोडवितां यावा, त्यांत वीसपैकीं १२ ते १५ गुण मिळविण्याची शिताफी यावी, निबंध-लेखनाचा सूक्ष्म धाक व तज्जन्य दुर्लक्ष विद्यार्थ्यांतून नाहींसें व्हावें, त्या ऐवजीं निबंध-लेखनाविषयी त्यांना कमालीचें औत्सुक्य वाटावें, ईर्षा वाटावी आणि निबंध-लेखनाच्या प्रश्नाप्रमाणेंच संपूर्ण मराठीची उत्तरपत्रिका त्यांनी नमुनेदार लिहावी हें सारें असाध्य नसलें तरी कष्टसाध्य मात्र आहे खास !

निबंध–स्वरूपविचार—

नि + बंधू – सुसूत्र बांधणी. निबंध शब्दाचा हा धात्वर्थ मनांत वागविला असतां 'एखाद्या विषयांवर सूत्रबद्ध, विचारपूर्ण आकर्षक लेखन करणें' अशी निबंध या शब्दाची स्थूल मानानें व्याख्या बनवितां येईल. निबंध-लेखनाच्या प्रश्नामागे विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानाची खोली, मातृभाषेवरील त्यांचें प्रभुत्व, दिलेल्या विषयावर त्यांना संगतवार, आकर्षक आणि विस्तृत लेखन करतां येतें काय हें अजमावण्याचा हेतु असतो. निबंधांत काय लिहिलें हें जसें महत्त्वाचें आहे तसेंच तें कसें लिहिलें आहे हेहि महत्त्वाचें आहे. निबंध-लेखनांतील हें 'काय' म्हणजेच विषयाचें विवेचन. या विवेचनास निबंधाचें अंतरंग म्हणतां येईल. तें विवेचन कसें केलें आहे म्हणजे निबंधाची मांडणी कशी केली आहे, तिला निबंधाचें बाह्यांग असें म्हणतां येईल. निबंधाचें अंतरंग सुसंगत, नीटस विचारांनी गुंफलेलें हवें. बाह्यांग त्या विचारांच्या आकर्षक, वाचनीय आविष्काराने सजलेलें पाहिजे.

अंतरंग—

आणि या विचारांचीच तर फार मोठी वाण विद्यार्थ्यांना जाणवते. दैनंदिन जीवनांत विषयांना तोटा नाही. 'साध्याहि विषयांत आशय कधी मोठा किती आढळे' असें अनेकदां म्हटलें जातें. परंतु मुळांत ह्या साध्या विषयाकडेच लक्ष जायला हवें. मग त्यांतील आशय आढळणार! 'माझ्या खिडकींतून दिसणारें जग,' 'एक अविस्मरणीय व्यक्ती' अशा, लेखनास भरपूर वाव असणाऱ्या गंमतीदार विषयावर निबंध लिहितांना शब्दाशब्दावर जर लेखणी अडखळूं लागली, तर त्याचा अर्थ इतकाच की, खिडकींतूनच दिसणारें काय पण खिडकीबाहेरील जगहि विद्यार्थ्यांनी पाहिलेलें नसावें. अनेक प्रकृतींच्या व्यक्ती ज्या पदोपदीं आपल्या संबंधांत, अवलोकनांत येत असतात त्यांची दाद-दखल आपण घेत नसतों. त्यामुळे अविस्मरणीय व्यक्ती लक्षांत राहणें दूरच, पण त्यांच्यांतील 'अविस्मरणीयहि' लक्षांत राहणें आणीकच कठीण होऊन बसतें. म्हणून मग, 'मला खिडकींत बसून बाहेर पाहणें भलतेंच आवडतें. माझ्या खिडकींतून खूप मौज दिसते, रस्ता दिसतो, समोरच्या रामभाऊंचें घर दिसतें. रस्त्यावर ही गर्दी असते. अनेक माणसें सारखीं येत-जात असतात' असें कांहीतरी लिहून विद्यार्थी मोकळे होतात.

यासाठी विचारांची समृद्धी वाढविणें आवश्यक आहे. अनेक सुंदर ग्रंथांचें परिशीलन केलें असेल, दैनिक वृत्तपत्रांतील चित्रपटांच्या जाहिरातींबरोबरच इतर जीवनस्पर्शी बातम्यांचें डोळस वाचन केलें असेल, वृत्तपत्रांतील

आणि मासिकांतील अनेकविध अंगोपांगांचें नियमित वाचन असेल तर कोणत्याहि विषयावर निबंध लिहिणें फारसें कष्टाचें वाटणार नाही. या वाचनास थोड्याशा लेखनाची जोड दिली तर? हें सारें वाचीत असता सुंदर शैलीने, तत्त्वपूर्ण विचारांनी नटलेलीं अर्थपूर्ण वाक्यें, कांही बहारीचा कल्पनाविलास, कांही प्रभावी शब्द मनास मोहून टाकतात. छोट्या नोंदवहींत त्याच वेळीं या विचार-धनाची नोंद ठेवण्याची संवय लावून घ्यावी. या विचारधनांत काय नाही? त्यांत विचार-सौंदर्य आणि भाषासौंदर्य नाही काय? शिवाय आपल्या ऐकण्यांत अनेक अर्थपूर्ण सुभाषितें, अनुभवांच्या जणुं खाणीच अशा म्हणी, जीवनावर आणि मानवी स्वभावावर प्रकाश टाकणारे विनोदी चुटके, थोरांच्या आठवणी येतात. गांवांत थोर विद्वानांचीं, पुढाऱ्यांचीं भाषणें होतात, आपले शिक्षक रंगांत येऊन शिकवतांना कांही सुंदर ज्ञान देतात, हें सारें नुसतें ऐकून सोडून देऊं नये. त्याची साठवणूक करावी. या सुभाषितांनी, म्हणींनी आपली मायबोली जशी संपन्न केली आहे तशीच ती बोलणाऱ्यांची संस्कृती, इतिहास आणि तत्त्वज्ञान त्यांनी जोपासली आहे. दहा वाक्यें लिहून किंवा बोलून जो अर्थ नीटसा सांगता यायचा नाही तो एकच सुभाषित किंवा म्हण सहजगत्या व्यक्तवूं शकते.

'अमक्या तमक्याला मी पंचवीस रुपये दिले आणि चटकन् काम झालें' हेंच जर, 'मी त्याची मूठ दाबली म्हणून काम फत्ते झालें'...'दाम करी काम!' असें म्हटलें तर? 'भाऊगर्दी', 'पानपत होणें', 'महाभारत होणें', 'कली संचारणें', 'अटकेवर झेंडा लावणें', 'सत्याग्रह करणें' या सर्व वाक्प्रचारांत केवढा अर्थ भरून राहिला आहे! या वाक्प्रचारांनी भाषा समृद्ध दिसते. आपला इतिहास, तत्त्वज्ञान, संस्कृति त्यांतून प्रतिबिंबित होते. ज्या विद्यार्थ्याजवळ या विचारवैभवाचें अक्षयी भांडवल आहे त्याला निबंध लिहितांना विचारांची तूट पडेल काय?

बाह्यांग—

वाचन, श्रवण, अवलोकन, आणखी मनन या वर सांगितलेल्या चतुःसूत्रीने संपन्न झालेले विचार व भाषा निबंधांत सुसंगतपणे, मनोवेधकपणे वापरतां येणें हें खरोखर कौशल्याचें काम आहे. विचारांची सूत्रबद्धता हें निबंधाचें निर्म्मे यश होय, हा मूलमंत्र कटाक्षाने पाळल्यावर पुढील नियम स्थूलपणे पाळावेत.

. निबंधाचा विषय पाहतांच अनेक विचार, कल्पना मनांत गर्दी करून उसळणें अगदी साहजिक आहे. केव्हाहि हे सारेच्या सारे विचार सुचतील, तसे भराभर

कागदावर उतरविणें साफ चुकीचें होय. प्रथम या विचारांतून महत्त्वाचे विचार कोणते, गौण कोणते, अनवश्यक कोणते हें तारतम्य ठेवून महत्त्वाच्या विचारांची व त्यांना पोषक विचारांची मुद्देसूद रूपरेषा तयार करावी. अर्थात् लिहितां-लिहितांहि कांही नवे विचार सुचतात. परंतु मूळ रूपरेषा तयार असल्याने या अशा नवागत विचारांना योग्य तें स्थान देणें जड जात नाही. मनांतील विचारांची ही रूपरेषा क्रमशः व तर्कशुद्ध लिहिली जाण्यासाठी निबंधाचे (१) प्रारंभ (२) मध्य आणि (३) अखेर असे तीन टप्पे पाडावेत.

निबंधाचा 'प्रारंभ' म्हणजे विषयाची जणूं तोंडओळखच. हा प्रारंभ मनोवेधक, तावडतोब प्रस्तुत विषयाकडे घेऊन जाणारा असाच असावा. 'पहिलें मत तें अखेरचें मत' अशी एक इंग्रजी म्हण आहे. आकर्षक प्रारंभानें वाचकाचें मत अनुकूल झालें तरच तो पुढे उत्कंठेने वाचीत जाणार. प्रारंभ आकर्षक असावा हें ठीक. पण तो आकर्षक करण्याच्या नादांत मूळ विषयापासून आपण दूर तर जात नाहीना याचेंहि अवधान ठेवलें पाहिजे. मघाचाच विषय घेऊं या. "माझ्या खिडकींतून दिसणारें जग" या निबंधाची सुरवात समजा अशी असेल.

"माझ्या खोलीला तीन खिडक्या आहेत. जणूं शंकराचे तीन डोळेच. खिडक्यांना पोलादी गज आहेत. निळ्या रंगाचे पडदे त्यावर वाऱ्याने झुलत असतात. मला खिडकींतून बाहेर पाहणें आवडतें. खिडकींतून बाहेर पाहणें न आवडणारा मनुष्य शोधून सांपडणार नाही." .....आतांही सुरवात किती लांबणार आणि 'बाहेर दिसणाऱ्या जगाकडे' केव्हा वळणार हें निबंधलेखकच जाणें. आतां खरी आकर्षक आणि तावडतोब विषयप्रवेश करणारी ही दुसरी सुरवात पाहा—

"बाहेरील जगाची बसल्या जागेवरून ओळख करून देणारी माझ्या खोलीची खिडकी मला फार प्रिय आहे. बाहेरील जगापासून अलिप्त राहूनहि त्याची मौज लुटायची असेल तर या खिडकींत खुशाल घटकाभर बसावें."

निबंधाचा 'मध्य' म्हणजे त्याचा गाभाच. या भागांत विषय पुरतेपणीं फुलला पाहिजे. संबंधित मुद्यांचा गैरेबाज विकास त्यांत साधला जावा. सांगावयाचे मुद्दे सर्व सांगून झाले. विशेष सांगावयाचें कांही राहिलें नाही त्या ठिकाणीं निबंध संपत येतो. तेथेंच चटकन् थांबणें परिणामाच्या दृष्टीनें श्रेयस्कर. 'अरेच्या! संपला वाटतं निबंध...' अशी रम्य चुटपूट वाचकांस वाटली पाहिजे. 'एक अविस्मरणीय व्यक्ती' या निबंधाची दोन प्रकारची अखेर पाहा.

(१) ' म्हणून म्हणतों की, ' क्ष ' ला मी कधीच विसरणार नाही. माझ्या अल्पमतीनुसार हा निबंध लिहिला आहे. अविस्मरणीय व्यक्ती म्हटलें की, केव्हाहि ' क्ष ' च माझ्या डोळ्यापुढे येतो. त्याच्यावर किती लिहूं आणि किती नको असें मला होतें '...

(२) ' पुढील जीवनांत अनेक व्यक्ती आल्या नि गेल्या. परंतु ' क्ष ' ला मी विसरलों नाही आणि विसरणारहि नाही.'...या दोन अखेरांमधील कोणती अखेर परिणामकारक आहे हें निराळें सांगणें नको.

भाषा—निबंधाच्या भाषेविषयीं कांही गैरसमज आढळतात. सोपी, माफक अलंकारयुक्त भाषा, मोजकीं अवतरणें, बंदिस्त परिच्छेद, विपुल शब्द-संपत्ती या सर्वांचा निबंधाच्या आकर्षकतेवर निश्चित परिणाम होत असतो. निबंधाची भाषा भारदस्त हवी हें खरें. पण ती फाजील संस्कृतप्रचुर असणेंहि अनिष्टच. खिडकींतून दिसणाऱ्या जगावर लिहितांना समजा, खालील सन्हांची भाषा वापरली गेली तर काय होतें पाहा.

(१) ' अस्मादिकांना गवाक्षांतून दृश्यमान होणाऱ्या बाह्य विश्वाचें अवलोकन करणें प्रिय वाटतें. ...'

(२) ' मला किनई खिडकींतून बाहेर बघत रहाणं भारी आवडतं '...

(३) ' खिडकींतून भलता मार्व्हलस् व्हयू दिसतो. तो पाहणें माझा हॉबीच आहे म्हणाना '—...

(४) ' खिडकींतून बाहेरची दुनिया काय मारू दिसते ' ...

या चारी तऱ्हांत तऱ्हेवाईकपणा नाही का? पहिल्या सुरुवातींतील संस्कृत प्राचुर्य हास्यास्पद आहे. दुसरींतील लाडिकपणा पोरकट वाटतो. तिसरींतील इंग्लिश शब्दांची ' एंट्री ' निबंधाच्या गांभीर्याचा धुव्वा उडवते. चवथींतील भाषा उघड उघड अशिष्टपणाची आहे. आपली मायबोली खरोखर अशी आहे का ? तिच्यावर असा अन्याय करण्याचा काय अधिकार आहे आपल्याला ?

तात्पर्य, भाषा सुबोध, रसाळ, अर्थपूर्ण व वेधक हवी. त्यासाठीं वाक्य-रचनेकडे जागरूक लक्ष पुरविलें पाहिजे. सार्थ, बिनचूक शब्दांचें सुटसुटीत वाक्य लिहिणें हें खरोखर प्रयत्नानेंच साधतें. अशा अनेक वाक्यांतून विचारा-मागून विचार उलगडत गेले पाहिजेत. संपूर्ण मुद्यांचा विचार संपला की, दुसरा विचारगट पुढे आला पाहिजे. म्हणजेच परिच्छेदयोजना आली. यशस्वी निबंध

म्हणजे यशस्वी परिच्छेदनलेखन.

परिच्छेदांना आकार देणारीं वाक्यें व तीं बनविणारे शब्द जे तुम्हीं लिहाल ते शुद्धलेखनाचा विधिनिषेध ठेवून लिहा. भाषासौंदर्याची हानी होते ती मुख्यतः भरमसाट अशुद्धलेखनाने. भाषेंत डोकावूं पाहणारी ग्राम्यता, प्रादेशिक अगर बोली भाषेची गैरवाजवी योजना ही शक्यतों टाळावी. नाहीतर निबंधाच्या सर्व तयारीवर पाणी पडेल. शुद्धलेखनाचे वाद नित्याचेच आहेत. तरीसुद्धा निर्दोष व्याकरणदृष्टी, ऱ्हस्वदीर्घ, अनुस्वार व विरामचिन्हें यांचें पथ्य सांभाळल्यास कितीतरी चुका कमी होतील.

नमुनेदार निबंधलेखनासाठी आवश्यक अशा वैचारिक तयारींत प्रथमतः ज्या सुभाषितांचें वगैरे महत्त्व सांगितलें तीं सुभाषितें, त्या म्हणी, आणि ते वाक्यप्रचार निबंधांत योग्य त्या ठिकाणीं वापरतां आले पाहिजेत. त्यांचा अतिरेकी वापरहि योग्य नाहीच. विषयविवेचनांत अन्य लेखकांचीं वा कवींचीं कांही अवतरणें देणें हितप्रदच. पण तीं शक्य तों बिनचूक असावींत. स्मरणावर विसंबून देण्याचा प्रयत्न करूं नये. इंग्लिश, संस्कृत, अगर हिंदी अशा अन्यभाषीय सुभाषित, म्हणींच्या लेखनांत त्यांच्या शुद्धतेकडे विशेष लक्ष पुरवावें.

निबंध पूर्ण लिहून झाल्यावर तो पुन्हा एकदा वाचून तपासण्याची संवय ठेवावी.

निबंधलेखनाचा प्रश्न केव्हा सोडवावा ?—

असा प्रश्न अनेकदा विचारण्यांत येतो. भाषाविषयाच्या परीक्षेच्या तीन तासांत हा प्रश्न केव्हा लिहावयाचा यापेक्षा तो किती वेळ लिहावयाचा हें महत्त्वाचें आहे. हा प्रश्न प्रथम लिहावयाचा, की मध्यंतरीं, की अगदी शेवटच्या तासांत, हें ज्याच्या त्याच्या तयारीवर आणि आवडीवर अवलंबून आहे. निबंधलेखनास जास्तींत जास्त चाळीस ओळींची मर्यादा अपेक्षित असते. त्या चाळीसच हव्यात अशी कांही कुणाची सक्ती नाही. सारांश, प्रश्नपत्रिकेंतील प्रत्येक प्रश्नास समानसंधि व समान कालावधि मिळाला पाहिजे. दिलेल्या तीनचार विषयांतून आपणांस निश्चितपणे ज्या विषयावर दर्जेदार निबंध अपेक्षित कालमर्यादेंत लिहितां येईल त्याच विषयावर शांतपणे निबंध लिहावा हें बरें. वर्षभरांतून कमींत कमी पंचवीस-तीस निबंध सुयोग्य मार्गदर्शनाखाली लिहिले असतील तर हे ऐन वेळचे महत्त्वाचें निबंधलेखन धोका खंचित देणार नाही.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
वर्गांक ....४४३९८ दिः २५.८.९५
नोंद दिः २२.१३५

निबंधप्रकार—

विषयांच्या स्वरूपावरून निबंधाचे चार प्रकार मानले आहेत.

(१) वर्णनपर निबंध, (२) कथनात्मक निबंध, (३) कल्पनाप्रधान निबंध, (४) विचारप्रधान किंवा चिंतनपर निबंध.

स्थूलमानानें मानलेल्या या चारी निबंधप्रकारांच्या लेखनास सारखीच तयारी लागते. या चारी प्रकारांचीं नांवें सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास प्रत्येकांत विचार, कल्पना व निवेदनशैली यांची सारखीच अपेक्षा आहे, हें सहज कळून येईल.

(१) वर्णनपर निबंध—

यांत वर्ण्य विषयाचें प्रभावी वर्णन करावयाचें असते. त्यासाठी सूक्ष्म अवलोकन हवें. वर्ण्यविषयाचें वर्णन करीत असतां त्यांतहि कोणत्या गोष्टींना प्राधान्य द्यावयाचें, कोणत्या गौण गोष्टी टाळावयाच्या ह्याला महत्त्व आहे. या वर्णनांतून वर्ण्यविषयासंबंधींच्या लेखकाच्या भावना, मतें आणि मतभेद, अपेक्षा वाचकांना समजल्या पाहिजेत. राष्ट्रध्वजावर निबंध लिहिताना,...

'आमचा राष्ट्रध्वज तिरंगी झेंडा आहे. तो चौकोनी असतो. खादीचा बनविलेला असतो. खादी हें आमच्या स्वावलंबनाचें प्रतीक आहे. त्यांत तीन रंग असतात. हिरवा, पांढरा आणि केशरी. मध्यभागीं चक्र असतें. पूर्वी चरखा असे.'

असे रुक्ष तपशील देऊन भागणार नाही. 'आमचा राष्ट्रध्वज' यांत आमचा, राष्ट्र आणि ध्वज हे प्रत्येक शब्द विचारांत घेतले पाहिजेत. आमचा, आमच्या राष्ट्राचा ध्वज हे शब्द उच्चारतांच त्या ध्वजाभोंवती ज्या राष्ट्रीय उज्ज्वल भावना निगडीत झाल्या आहेत, ज्या ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांनीं या ध्वजाची मान उंच ठेवण्यासाठीं दिव्य त्याग केला आहे त्या सर्वांची महती, आपल्या राष्ट्रध्वजाचा मान आपण कसा ठेवावा, त्याविषयीं आपलीं कर्तव्यें कोणतीं या अत्यावश्यक मुद्यांचें प्रतिपादन त्यांत आल्याखेरीज त्यांस पूर्णत्व येणार नाही.

सामान्यतः प्राणी, व्यक्ती यांचीं शब्दचित्रें, लोक, स्थल, खेळ, सण-समारंभ, राष्ट्रीय उत्सव, मनोरम अगर भीतिप्रद देखावे—जसे दीपोत्सव, भीषण आग, अपघात, पहिला पाऊस, महापूर या व अशा अनेकरंगी व अनेकढंगी त्यांचा समावेश वर्णनपर निबंधांत होतो.

(२) कथनात्मक निबंध—

ज्या निबंधाचा आत्मा कथन आहे तो कथनात्मक निबंध होय. एखादी गोष्ट किंवा घटना जितक्या तन्मयतेने आपण सांगतों तीच वेधक तन्मयता या निबंधप्रकारांत यायला हवी. कथन आलें म्हणजे स्मृतीकथन आलें, प्रसंगकथन आलें. या स्मृती आपल्या स्वतःच्या जीवनांतील असतील तशाच त्या आपल्या प्रिय आप्तांच्या, मित्रांच्या व आपल्याला आदरणीय अशा थोर हयात वा दिवंगत स्त्री-पुरुषांच्या असूं शकतील. अर्थातच या प्रकारांत आत्माविष्कारास म्हणजेच भावभावनांना वाव जास्त. मनमोकळेपणास अनुकूलता जास्त. मात्र आपल्या मतांचा आविष्कार करतांना त्यांत पूर्वग्रहांना, आग्रही प्रचारास, पक्षपातीपणास अवाजवी स्थान तर मिळत नाही ना, याची खबरदारी घेतली पाहिजे. समजा आपण एखाद्या व्यक्तीचें चरित्र सांगत आहोंत. तें सांगतांना आदराच्या भरांत अंधविभूतीपूजेच्या आहारीं जाऊन इतर समकालीन अगर गतकालीन थोर व्यक्तीवर ताशेरे झोडण्याचें आपणांस कांहीच कारण नाही. तो आपला अधिकारहि नाही. निबंधांत वादाचा धुराळा उडवून त्याचा आखाडा करण्यांत काय गंमत आहे ? कथाविषयाचा आवश्यक तपशील खुलवून वाचकांची उत्कंठा वाढवील असाच सांगावा.

(३) कल्पनाप्रधान निबंध—

ज्या निबंधांत कल्पनेस प्राधान्य आहे तो कल्पनाप्रधान निबंध होय. विद्यार्थ्यांच्या कल्पनाविलासास यांत भरपूर क्षेत्र असतें. हा कल्पनाविलास शेखमहंमदी थाटाचा मात्र नको. पूर्वज्ञानावर, पूर्व अनुभवावर उभारलेल्या कल्पनाविलासाने या निबंधास खरी रंगत येते. आत्मवृत्त—सजीव प्राण्यांचें—व्यक्तींचें, निर्जीवांचें—स्थळें—वस्तु इत्यादींचें, असें असतें तर, मी असुक झालों तर, असुक कांही नाहीसें झाल्यास—अशा जरतारी पद्धतीच्या स्वैर कल्पना-विलासाचे निबंध या प्रकारांत मोडतात.

आत्मनिवेदनांत गाढवापासून ते सिंहापर्यंत, काजव्यापासून ते सूर्या-पर्यंत सर्व मंडळींना मुक्तद्वार आहे. हे आत्मवृत्तकथन प्रभावी होण्याचा मूलमंत्र हा की, ज्याचें आत्मकथन आपण लिहिणार त्याच्या भूमिकेशीं प्रथम आपण समरस व्हायला हवें. त्याच्या भावना, आशा-आकांक्षा, कैफियती समजून घेतल्या पाहिजेत. त्याशिवाय त्यांत हृद्य जिवंतपणा येणें अशक्य. लेखकाच्या स्वप्नांत येऊन निवेदकाने आत्मवृत्तकथन करणें ही एक रूढ व सर्वमान्य पद्धत बरेचजण अंगिकारतात. या पद्धतींत सोपेपणा असेल परंतु तींत एक प्रकारचा कृत्रिम कंटाळवाणेपणा आहे. हेतुपुरस्सरता आहे. सजीव क

निर्जीव काय, जर आत्मकथन करूं शकण्यास समर्थ असतील तर कुणाच्या स्वप्नांत येण्याची त्यांना आवश्यकता काय! प्रयोगशील मनोवृत्तीच्या लेखकांनी व विद्यार्थ्यांनी तसेंच शिक्षकांनीहि आत्मकथनांतील हें 'स्वप्न प्रकरण' मर्यादित करून या निबंधप्रकाराच्या नवनव्या लेखनपद्धतींचे प्रयोग करावेत असें त्यांना नम्रतेने सुचवावेसें वाटतें.

"मी अमुक. माझा जन्म येथें...असा...झाला. मी लहानाचा मोठा झालों. आता माझे हाल कुत्रें खात नाही. माझी कैफियत अशी आहे... सवत्र देवाशपथ खरे सांगतों की ही माझी कहाणी.....काय ही माझी दुर्दशा" ...असें कोर्टातील साक्षीदाराप्रमाणे अथवा अर्जातील नीरस माहितीप्रमाणे हें आत्मनिवेदन नसावें. आत्मनिवेदनांत निवेदकाच्या जीवित-वृत्तांताएवढेंच त्याच्या जीवन-कार्यास, त्याच्या जीवनांतील स्थित्यंतरांना, त्याच्या सुखदुःखादि भावजीवनास प्रमुख स्थान आहे. त्याच्या त्या तक्रारीने वाचकांच्या मनांत एकंदर सहानुभूती उत्पन्न व्हावी. अतिपरिचयाने या निवेदकाची कशी अक्षम्य हेळसांड होत आहे हें त्यांना पटलें पाहिजे.

'अमुक झालें तर'.....हा या प्रकारांतील जरतारी थाटाचा दुसरा प्रकार. मी मुख्यमंत्री झालों तर!..... सूर्य न उगवल्यास!... न्हावी संपावर गेल्यास! .... मानव मुका झाला तर! ...असे हे गंमतीदार विषय. ह्या विषयावर लिहितांना कमालीची सुसंगती हवी. ती तर्क-शुद्ध हवी. "सूर्य उगवला नाही तर भयंकर अनर्थ होईल. दिवस उजाडणार नाही. कोंबडा आरवणार नाही. लोक दिवसा दिवे लावतील. आकाशांत तारका राहतील. थंडी पडेल. पाऊस पडणें बंद होईल." अशी लांबलचक शुष्क यादी कुणीहि देईल. ही यादी तर द्यायला पाहिजेच, परंतु ती सुरस, अद्‌भूत आणि चमत्कारिकहि व्हायला हवी. आज सूर्य उगवतो, न्हावी इमानेइतबारें मानवजातीची सेवा बजावीत आहेत, मानवाला वाचाशक्ती आहे, मी मुख्यच काय पण मंत्रीहि नाही म्हणून कांही गोष्टी निश्चित व नियमित घडत आहेत. क्षणभर या जीवनोपयोगी कालचक्राची गति एकदम बंद पडली किंवा बदलली तर असा विचार करतांच होणारा अनर्थ भयानकपणें जाणवेल. आज सूर्य उगवतो, उद्यां उगवला नाही तर आज सूर्य उगवल्याने निश्चित घडणाऱ्या घटना उद्या खाडकन् बंद पडतील. म्हणूनच या प्रकारचे निबंध लिहिण्यापूर्वी आज जें आहे तें डोळ्यापुढे ठेवून पुढे ते नष्ट झाल्यास होणारे परिणाम लिहावेत. दुसरें असें की अमुक एखादें नष्ट व्हावें, अमुक एखादें असें घडावें असें लेखकास उत्कटतेनें कां वाटलें याची समर्थनीय पार्श्वभूमि रेखाटतां आली तर ह्या कल्पनाविलासास तार्किक बैठक लाभेल. पाहा—'उद्यां मानव मुका झाल्यास!'

" फ्ल्यूंतून नुकताच उठलों होतों. अंग न् अंग गळून गेलें होतें. नितांत शांततेची आवश्यकता होती. पण छे!... शेजारीं रेडिओचा सांस्कृतिक आक्रोश चालूं होता. आंतल्या खोलींत भावंडांचा जन्मसिद्ध हक्क असा धिंगाणा चालूं होता. खालीं नळावर कुंभमेळा भरला होता, आणि समोर लिंबाच्या गर्द सांवलींत एक किळसवाणा भिकारी दर क्षणाला खपाटी गेलेल्या पोटावर हाताची जोरदार चापटी मारून तितक्याच जोरदार आवाजांत 'हे राम... हे राम... हे राम...' ओरडत होता. असें वाटलें की, या सर्वांची वाचा एकदम बंद व्हावी. म्हणजे क्षणार्धांत सारें कसें शांत शांत होईल! ....."

पुढील परिच्छेदांत 'वाचाबंदी' नंतरच्या मुक्या गंमतीजंमती लिहिणेंहि कांही कमी गंमतीचें नाही! सारांश निश्चित विचारसूत्राभोवतीं तर्कशुद्ध कल्पनाविलासाची रंगबिरंगी व ढंगदार गुंफण म्हणजेच कल्पनाप्रधान निबंध होय. अशा कल्पनाविलासाने फुलणारा हा निबंधप्रकार लघुनिबंधाच्या सीमेवर घुटमळतो असें म्हटल्यास कुणाची हरकत येऊं नये.

(४) विचारप्रधान किंवा चिंतनपर निबंध—

विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानाची, स्वतंत्र विचारशक्तीची व ते विचार साधकबाधकपणें मांडण्याची कुवत अजमाविणें हा या निबंधप्रकाराचा उद्देश असतो. (१) यंत्र—शाप कीं वरदान? (२) दारूबंदी—इष्ट कीं अनिष्ट? (३) विज्ञानानें मानव सुखी झाला आहे काय? असे चर्चात्मक विषय या प्रकारांत विचारण्यांत येतात. यांत उघडउघड दोन पक्ष पडतात. या उभयपक्षांची साधकबाधक चर्चा करून अखेरीस स्वतःचें मत सप्रमाण सिद्ध करून दाखवावें लागतें. यंत्र–शाप कीं वरदान? हाच विषय चर्चेसाठी घेऊं या. सोईसाठी प्रथम या विषयाचे मुद्दे पाडले तर ते असे पडतील—

यंत्र म्हणजे काय? यांत्रिक शक्ति मिळविण्याचीं साधनें–यंत्रपूर्व मानवी जीवन–यंत्राची आवश्यकता–पंचमहाभूतें आणि यांत्रिक शक्तीसाठी त्यांचा वापर. प्राथमिक शोधापासून अणु-युगापर्यंत मानवी प्रयत्नांचा धावता इतिहास. यांत्रिक युगाच्या उत्क्रांतीच्या प्रत्येक टप्प्यांत बदलत गेलेलें मानवी जीवन–यंत्रयुगाने मानवी जीवनक्रमांत उद्भवलेलीं सुख-दुःखें–स्पर्धा–कलह आणि विषमता–विचारवंतांची यंत्रयुग किंवा विज्ञानयुगाकडे पाहण्याची दृष्टी–यंत्र शाप मानणारे विचारवंत–वरदान मानणारे विचारवंत–खरोखर यंत्र शापवत् आहे काय? असल्यास कां? मग तो दूर कसा करतां येईल? वरदान असल्यास कां? यंत्र शाप की वरदान ठरविण्याची अंतिम कसोटी कोणती? तुमच्या मतें यंत्र शाप की वरदान?–चर्चा–समारोप.

या सर्व मुद्यांवरून हें स्पष्ट होतें की, उभय बाजूंचीं मतें ह्या निबंधांत साधक-बाधक चर्चेसाठी विचारात घ्यावीं लागणार. या चर्चेनंतर स्वतःचें कांहीतरी निश्चित मत प्रतिपादण्याची जबाबदारी लेखकांवर आहे. "म्हटलें तर यंत्र शाप आहे; म्हटलें तर वरदान आहे" असें 'नरो वा कुंजरो वा' पद्धतीचें मत देऊन चालणार नाही. पूर्वपक्ष-विरुद्ध बाजूचीं मतें देणें-मंडन-या मतांचें खंडन करून म्हणजेच आपलीं मतें सप्रमाण सिद्ध करून प्रस्थापित करणें-उत्तरपक्ष मांडणें अशीहि एक पद्धत हा निबंध लिहिण्याची आहे. पद्धत कोणतीहि घेतली तरी उभयपक्षांच्या मतमतांतरांचा परामर्श घेणें, सयुक्तिकपणें स्वतःचें मत प्रतिपादिणें-आपलें मत सबळ करण्यासाठी त्यास इतर विद्वानांच्या व अधिकारी लेखक तत्त्वज्ञांच्या मतांचा पाठिंबा घेणें, हा पाठिंबा घेतांना अवतरणें, दाखले बिनचूक देणें, क्वचित् एखादी आख्यायिका-ऐतिहासिक वा पौराणिक-उद्धृत करणें या बाबींना या निबंधप्रकारांत निर्विवाद स्थान आहे. इतर निबंध-प्रकारांप्रमाणे याहि प्रकारांत प्रभावी प्रारंभ, आशयघन मध्य व आपल्या मतांचा सारांशवजा आढावा घेऊन साधलेला नीटस समारोप ह्यांना अग्रस्थान आहे, आणि द्यावेंहि. प्रकृतीने गंभीर व आकृतीने बांधेसूद असा हा अवघड निबंधप्रकार नित्याच्या सरावाखेरीज लिहितां येणें अशक्यच.

कांही नमुनेदार निबंध—

यशस्वी निबंधलेखनाचें एवढें तंत्र आणि मंत्रदर्शन झाल्यावर आतां आपण कांही नमुनेदार निबंध वाचूं या. हें वाचन करीत असतां त्यांतील पुढील अंगोपांगांचा विशेष अभ्यास करा—(१) विषय. (२) प्रारंभ. (३) विषयप्रवेश. (४) मध्य. (५) अखेर. (६) परिच्छेद-रचना. (७) भाषाशैली. (८) विषयास परिपुष्ट करणारीं सुंदर वाक्यें, सुभाषितें, म्हणी, अवतरणें. (९) निबंधवाचनानंतर मनावर होणारा संकलित परिणाम. (१०) या निबंधवाचनाने तशा प्रकारच्या अन्य विषयांवर निबंध लिहिण्यास होणारें उपयुक्त मार्गदर्शक फायदे.

(१) वर्णनपर निबंध

परीक्षा केन्द्रावरील पंधरा मिनिटें—

परीक्षाकेंद्रावर जाण्याचा योग प्रत्येकाला येतो. परीक्षा देण्याकरिता कांहीजण जातात तर इतरांना परीक्षेला पोहोंचविण्याकरिता कांहीजण जातात. तेथील वातावरण जरा वेगळेंच असतें. आमच्याजवळच एक कॉलेज आहे आणि तेथे नेहमी कसल्या ना कसल्या परीक्षा चालू असतात परीक्षा सुरू

होण्यापूर्वी पंधरावीस मिनिटें फार महत्त्वाचीं असतात. त्या वेळीं तेथे जाऊन आपणहि त्यांतील एक होण्याची इच्छा मला होते; आणि मग मी त्या परीक्षाकेंद्राकडे वळतों.....

आता परीक्षेला १५।२० मिनिटेंच राहिलेलीं असतात. वेळ भरत आल्यामुळे धांवपळ चालू असते, परंतु मंडईतील धावपळीपेक्षा ही धांवपळ निराळी असते. त्यांत गडबड-गलबला नसतो. कितीहि हुशार विद्यार्थी असला तरी परीक्षेच्या वेळीं त्याचा आत्मविश्वास गडबडतो. कितीहि तयारी केलेली असली तरी हें आपल्याला आठवेल ना? लिहितां येईल ना? या भीतीने तो बेजार झालेला असतो; आणि पुन्हा पुन्हा पुस्तकें चाळीत असतो.

आज शालान्त परीक्षा सुरू होणार होती. ह्या विद्यार्थ्यांनी आतापर्यंत अनेक परीक्षा दिल्या असल्या तरी केंद्रावर जाऊन परीक्षा देण्याची ही त्यांची पहिलीच वेळ. हे सर्व विद्यार्थी मनांतून घाबरले होते. परंतु वरकान्ती ते एकमेकांना धीर देत होते. इतक्यांत पहिली घंटा झाली. अजून परीक्षा सुरू होण्यास पंधरा मिनिटें होतीं, तरी पण सर्वजण घाईघाईने आपल्या माणसांचा निरोप घेत होते. बरोबर आणलेलीं वह्यापुस्तकें त्यांच्याबरोबर परत देत होते. पेन-पेन्सिल इत्यादि आपलीं सर्व शस्त्रसाधनें नीट आहेत की नाहींत हें अजमावून पहात होते. घरच्यांनाहि काळजी. अनेक सूचना ते करीत होते. 'फी—पावती आहे ना रे!' 'पेपर नीट लिही, घाबरूं नकोस' मायेच्या पोटीं या सूचना होत होत्या आणि विद्यार्थीहि घाबरलेल्या मनःस्थितींत त्यांना 'होकार' देत होते. परीक्षेच्या दिवाणखान्यांत शिरतांना ते आपल्या दोस्तांना सुयश चिंतीत होते.

घड्याळाचा काटा पुढे सरकूं लागला. परीक्षानिरीक्षक उत्तरपत्रिका घेऊन वर्गाकडे येऊं लागले. वर्गांत आल्याबरोबर त्यांनी सर्व मुलें नीट बसलीं आहेत कीं नाही हें पाहिलें. कोणाची कांही अडचण असल्यास दूर केली आणि मग पुस्तकें-वह्या दूर ठेवण्याची त्यांना आठवण करून दिली. विद्यार्थी आपलें शस्त्र—पेन घेऊन तयार होते. इतक्यांत दुसरी घंटा झाली.

आतां निरीक्षकांची धांवपळ सुरू झाली. उत्तरपत्रिकांच्या चवडी घेऊन ते वाटूं लागले. त्या वेळीं त्यांच्या चेहऱ्यावरील भाव पाहण्यासारखे होते. आपण कोणीतरी मोठे! ह्या दिव्यांतून बाहेर पडलेले यशस्वी वीर, असें त्यांना वाटत होतें.

उत्तरपत्रिका हातांत पडल्यावर विद्यार्थ्यांच्या छातींतील धडधड अधिकच वाढली. उत्तरपत्रिकेवर अनेक नियम दिलेले होते. विद्यार्थी ते नियम वाचीत

होते. परंतु मनस्थिति इतकी गोंधळल्यासारखी झाली होती कीं, त्यांना कांहीहि समजत नव्हतें.

अशा मनस्थितींत असतांनाच तिसरी घंटा झाली. निरीक्षकांनी प्रश्न-पत्रिका विद्यार्थ्यांच्या हातांत दिल्या. अधाशी नजरेने ते ती वाचूं लागले, आणि धडधड जरा कमी झाली. कारण सर्व केलेलाच भाग आला होता.

लगेच पेन सरसावून हे वीर लिहावयास लागले. किती लिहूं आणि किती नको असें त्यांना झालें होतें. एवढ्या मोठ्या त्या इमारतींत आता संपूर्ण शांतता होती. आता आपल्याला उभे राहतां येणार नाही हें उमजून मी परत फिरलों. वर्गावर्गांत नजर टाकल्यास कांही विद्यार्थी हताश बसलेले होते. वर्षभर अभ्यास न केल्याचा पश्चात्ताप त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

निरीक्षक आता फेऱ्या मारीत होते. तीन तास केव्हा संपतील याची वाट पाहात होते.

(देसाई आणि अडाल्जा)

(२) कथनपर निबंध

शाळेंतील माझा शेवटचा दिवस (स्मृतिकथन)

किती वर्षें होऊन गेलीं, पण अजूनहि त्या दिवसाची मधून मधून मला आठवण होते. आजहि तसेंच कारण घडलें. शेजारच्या मधूचे कोचिंग क्लासेस संपले व तो शाळेंतून परत येऊन स्तब्धतेने आपल्या खोलींत गेलेला मला दिसला. तें पाहून मला माझ्या शाळेंतील शेवटच्या दिवसाची स्मृति झाली. जीवनांतील कांही दिवस असे असतात कीं, ते विसरा म्हणून म्हटल्याने मनुष्य विसरत नाही. अशा दिवसांपैकीं मला माझा शाळेंतील शेवटचा दिवस वाटतो. आमच्या वर्गातील मुलांची खोडया व गडबड करण्याबद्दल प्रसिद्धी होती. तिसरी घंटा होऊन शिक्षक वर्गांत येईतोंपर्यंत चर्चेला अगदी रंग आलेला असायचा; पण त्या दिवशीं मात्र अगदी शांत वातावरण होतें. आदल्या दिवशींच 'उद्यां आतां तुमचा ह्या शाळेंतील शेवटचा दिवस. आम्ही तुम्हांला निरोप देणार' असें आमच्या अध्यापकांनी उद्गार काढले होते. त्याची जाणीव होऊनच कीं काय, जो तो आपल्या विचारांत दंग होता. त्या दिवशीं अभ्यास होणार नव्हता. वर्गशिक्षक आम्हांला निरोप देणार होते. ते येऊन काय बोलणार ह्यासंबंधीं आपल्याशींच जो तो तर्क करीत होता. इतक्यांत आमचे वर्गशिक्षक येत असलेले दिसले. नेहमीच्या उत्साही वृत्तीने त्यांनी वर्गांत प्रवेश केला व दररोजच्या थाटांत ते टेबलाला थोडेसे रेलून उभे राहिले.

वर्गशिक्षक आमच्याशीं किती आस्थेने व प्रेमाने बोलले ! ते त्यांचे बोल मी कधीहि विसणार नाही. कसल्याहि प्रकारचा विरह हा दुःखदायक असतो, ह्याचा अनुभव त्या दिवशीं मला आला. इतर विद्यार्थी व आमचे अध्यापक ह्यांनाहि तोच अनुभव आला असावा. बोलतांना कित्येक वेळा आमच्या वर्ग-शिक्षकांचा गळा दाटून येई. वर्षभर आम्ही व त्यांनी मिळून केलेल्या कार्यांचें त्यांनी थोडक्यांत सिंहावलोकन केलें. अभ्यास व अभ्यासेतर गोष्टी ह्यांमध्ये विद्यार्थ्यांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना शाबासकी दिली.

हो ! सहकार्य हाच त्यांचा शब्द ! सहकार्याशिवाय शाळेचें दैनंदिन कार्य होणें शक्य आहे का ? शालेय जीवनांतच काय, पण रोजचें जीवनहि एक-मेकांच्या सहकार्याशिवाय अगदी अशक्य होईल. आमच्या वर्गशिक्षकांनी उत्साही, निगर्वी अशा आपलेपणाच्या वृत्तीने सदैव प्रेमळ शिस्तीचें वातावरण ठेविलें व त्यामुळेंच आम्ही अभ्यास व अभ्यासेतर गोष्टी आनंदाने व नेटानें पार पाडल्या. वर्षांमध्ये आमच्या मार्गांत ज्या अडीअडचणी आल्या, त्यांची आम्ही मनमोकळेपणाने चर्चा केली. त्या दिवशींच्या चर्चेचा फायदा आमच्या मागून येणाऱ्या शालेय बंधूंना मिळणार, ह्यांतच आम्हांला आनंद वाटत होता. परीक्षेच्या दिवसांत कसें वागावें, प्रश्नपत्रिका सोडवितांना कोणत्या गोष्टीकडे लक्ष पुरवावें, ह्यासंबंधीं बोलून शिक्षकांनी स्मितपूर्वक आम्हांला गोड निरोप दिला.

"यान्येव अस्माकं सुचरितानि तान्येव सेव्यानि नो इतराणि" (आमच्या चरित्रांतून फक्त चांगल्या तेवढ्याच गोष्टींचें अनुकरण करा) हा त्यांचा संदेश. वडील मनुष्य म्हणजे सर्व गुणांचा पुतळा, त्याच्या हातून प्रमाद होणें अशक्य अशीच वडीलजनांची – आणि त्यांतच अध्यापकवर्ग येतो – दृढ समजूत झालेली असते. ह्या सामान्य नियमाला आमचे वर्गशिक्षक अपवाद ठरले. त्यांनी ह्या संस्कृत वचनावर भाष्य करून आम्हांला जो उपदेश केला, त्यामुळे त्यांच्याबद्दलचा आमचा आदर द्विगुणीत झाला. आत्मनिरीक्षणाशिवाय असे उद्गार कोण काढतो ? आम्ही सर्वजणांनी परीक्षेमध्ये यश मिळवावें अशी शुभेच्छा त्यांनी व्यक्त केली व 'नमस्ते' करून ते बाहेर पडले व आम्हीहि आमच्या घराची वाट धरली.

दररोज परत जातांना गप्पा, टीका, चर्चा हीं व्हावयाचीं पण त्या दिवशीं मात्र जो तो आपापल्या विचारांत मग्न ! तो दिवसच तसा होता. ज्या शालामातेने व गुरुजींनी आम्हांला जीवन दिलें, त्यांच्यापासून आम्ही दूर जात होतों. मी घरीं आलों व तसाच खोलींत गेलों. खोलींत स्वस्थ बसल्यावर माझ्या मनांत शालेय जीवनांतील कितीतरी गोड स्मृतींबरोबरच रुसण्या-फुगण्याचे, धुसफुसण्याचे, रागाचे, शिक्षेचे, कडू शब्दांचे प्रसंगहि आठवले.

पण त्या प्रसंगांतहि एक प्रकारची माधुरी होती. 'अनुरागाच्या पोटीं राग' ह्या तत्त्वामुळेच असे प्रसंग निर्माण होतात. पार्श्वभूमीला असलेलें अनुरागाचें पार्श्वसंगीत त्या वेळेपुरत्या कटु वाटणाऱ्या असल्या प्रसंगांना गोड करतें. मी जेव्हा दुःखीकष्टी होतों, तेव्हा शाळा, सवंगडी, अध्यापक ह्या सर्वांशीं निगडीत झालेल्या ह्या गोड स्मृतींनी मला आनंदाच्या क्षणांचा लाभ दिला आहे. म्हणून ती शाळा, ते सवंगडी व ते अध्यापक ह्यांचे मी नेहमी उपकार मानीत असतों.

(शं. बा. आंबेकर)

(३) कल्पनाप्रधान निबंध

वेळापत्रकांतून निबंधलेखनाचा तास रद्द झाल्यास !—

निबंध-लेखनाचा कंटाळा आलेल्या आम्ही सर्वांनी 'सर, आज निबंधाऐवजी दुसरें कांही घ्या' अशी तक्रार–विनंतीवजा ओरड—केली. पण मराठीचे सर कसले दाद देतात. खट्याळपणे हंसत त्यांनी निबंधाचा विषय फळ्यावर लिहिलाच. थोड्याशा नाराजीनेच आम्ही तो वाचला; पण तो वाचतांच आम्हाला त्यांत एकदम गोडी वाटूं लागली. विषय असा होता, "वेळापत्रकांतून निबंध-लेखनाचा तास रद्द झाल्यास !"

एरव्ही मला निबंध-लेखनाचा मनस्वी कंटाळा. परंतु आजचा हा विषय असा स्फूर्तिदायक होता की, त्यावर माझें डोकें भराभर विचार करूं लागलें. मला वाटलें, निबंध-लेखनाचा तास बंद होणें, म्हणजे प्रथम माझ्यासारख्या 'निबंधशत्रु' विद्यार्थ्यांचा मुक्तीदिनच ! त्यानंतर ज्या असंख्य विषयांवर निबंध नांवाच्या चाळीस ओळी बळजबरीने लिहून घेतल्या जातात, त्या असंख्य विषयांची मुक्तता. ह्या ओळी लिहितांना मातृभाषेवर जे अन्याय, अत्याचार होतात तिची सुटका ! आमचे वर्गबंधु – त्यांत मीहि आलोंच – निबंधाऐवजी 'न बंध' थाटाचें विलक्षण लेखन करणार, त्यासाठी महागाईच्या वह्यांचा सत्यनाश करणार, उगीच डोकें (नसलेलें !) खाजवून खाजवून निबंध पुरा करणार आणि नंतर त्यांतील अशुद्धलेखनासाठी, विषयांतरासाठी, पाल्हाळासाठी मास्तरांची निबंधापेक्षा दुप्पट लांबीचीं बोलणीं खाणार, त्यापेक्षा ह्या तासाचें उच्चाटनच झालेलें काय वाईट ?

शिवाय हे निबंधाचे विषय तरी सिधेसरळ असावेत. पण छे ! 'संपत्ती श्रेष्ठ की ज्ञान श्रेष्ठ ?,' 'माझी सुखी जीवनाची कल्पना', 'वर्तमानपत्रें बंद

झाल्यास'. आधीं आम्हाला वर्षाच्या वर्षाला पास व्हायची मारामार! त्यांतून ज्ञान श्रेष्ठ की संपत्ती श्रेष्ठ हें ठरवीत कुठें बसणार? रोजचे गृहपाठ, सतराशेसाठ विषयांचा अभ्यास, घरचीं, दारचीं कामें या सर्व व्यापांतून निबंधासाठी आवश्यक सामान्यज्ञान वाढविणार केव्हा, शुद्धलेखन सुधारणार केव्हा? त्यापेक्षा हा तासच बंद व्हावा. सगळ्यांचीच मोठी सोय होईल. निबंधांच्या वह्यांचें ओझें बाळगावें लागायचें नाही. निबंधांच्या वह्यांचे गट्ठे तपासून लालीलाल करण्याचा मास्तरांचा खटाटोप वांचेल. त्या लाल खुणांच्या चुका पांच पांच वेळा शुद्ध लिहिण्याचें आमचें सव्यापसव्य वांचेल. पेपरमध्येहि निबंधाच्या प्रश्नाचे फुकट जाणारे मार्क बळी जाणार नाहीत. निबंध-लेखनाच्या पायीं निष्कारण वाया जाणारा अमूल्य वेळ इतर महत्त्वाच्या विषयांच्या अभ्यासाकारणीं लावतां येईल.

दारूबंदीमुळे एका विशिष्ट वर्गाला जसा धक्का बसला तसा हा तास बंद झाला तर निबंधलेखनाच्या कैवाऱ्यांना बसेल. निबंधावर जाडींजाडीं पुस्तकें लिहिणारे जाडे विद्वान्, तीं छापणारीं प्रकाशकमंडळी, तीं विकणारे बुकसेलर्स, हे सारे कपाळावर हात मारून निबंधांच्या पुस्तकांचे गट्ठे रद्दीवाल्याला विकून लाखाचे झालेले बारा हजार घेऊन निसुटपणे हात चोळीत बसतील? निबंध-लेखनांत रुपयात बारा आणे मार्क पटकावणारी स्कॉलर मंडळी मात्र 'दिवाळें' निघाल्यासारखे चेहेरे करून निबंधलेखनाच्या वह्या व त्यांचीं पुस्तकें ज्ञानेश्वरी-शेजारी ठेवून रोज त्यांची पूजा करतील! हें कांही काळ चालेल. मग हे कैवारी बंड पुकारतील. 'निबंधलेखन सुरू झालेंच पाहिजे' 'निबंधावरचे निर्बंध दूर करा.' 'निबंधावाचून शिक्षण म्हणजे पाण्यावाचून जीवन' असे फलक घेऊन मोर्चे निघतील. प्राणांतिक उपोषणें, सत्याग्रह होतील...कदाचित् 'युनो'कडेहि हें प्रकरण जाईल! निबंधप्रेमी शिक्षणतज्ज्ञांच्या व्याख्यान व लेखसत्रांनीं व या कैवाऱ्यांच्या अट्टाहासाने मात्र कदाचित् निबंधलेखनावरची बंदी उठेल. कदाचित् निबंधाऐवजीं त्याचा दुसरा पर्याय शिक्षणक्षेत्रांत घुसेल म्हणजे आगींतून सुटून फुफाट्यांत पडण्यासारखेंच होणार! त्यापेक्षा आपला निबंध परवडला आणि कसेंहि असलें तरी गेल्या कित्येक वर्षांच्या थोड्याफार तयारीनेच मी हा निबंध लिहूं शकलों कीं! छे! उद्या खरोखरच निबंध-लेखनावर अशी कांही गदा येणार असेल तर त्यावरून होणाऱ्या चळवळींत पहिला हुतात्मा मीच होईन?...

—जयंत आंबेकर

(४) विचारप्रधान निबंध (चिंतनपर)

मानवी जीवनांत गप्पागोष्टींचें महत्त्व—

" गप्पा ! आणि त्यांचें महत्त्व ! ! आणि तेंहि मानवी जीवनांत ! ! ! कांहीतरी गप्पा मारतां झालें ! " असें म्हणून कांही लोक नाकें मुरडतील. पण कोणत्याहि गोष्टीचा चांगला अगर वाईट उपयोग करून घेणें सर्वस्वी आपल्या हातांत आहे. अग्नीचा उपयोग थंडीच्या दिवसांत शेकण्याकडेहि होतो किंवा दुसऱ्याच्या घराला आग लावण्याकडेहि होतो. गप्पासारख्या 'साध्याहि विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे' ही थाप नव्हे ! या गप्पा नव्हेत, एका कवीची सुंदर काव्यपंक्ती आहे.

दिवसभर काम करून दमूनभागून आलेल्या लोकांना तर गप्पा ही एक विनखर्चाची नि सुंदर करमणूक आहे. गप्पा मारल्या म्हणजे त्यांचा शीण थोडासा कमी होतो. खेडेगांवांत, दिवसभर नांगर चालवून दमलेल्या शेतकऱ्याच्या चावडींत आपण गप्पा नाही का ऐकत? हातावर तंबाखू चोळत, गप्पा मारीत जातांना आपण कितीतरी मजूर संध्याकाळीं पाहतों. स्वयंपाकाचा व घरकामाचा शीण घालविण्याकरता दुपारच्या वेळीं स्त्रिया गप्पा मारीत बसलेल्या आपण पहातों. अलीकडे विनोदाला जसें प्राधान्य येऊं लागलें आहे तसेंच गप्पांनाहि मानवी जीवनांत महत्त्व येऊं लागलें आहे.

गप्पांना मुद्देसूदपणा नसतो. गप्पांची गाडी लहर लागेल तिकडे वळते. कधी राजकारण तर कधी समाज. कोणत्याहि विषय गप्पांना चालतात. दोनचार विनोदी गप्पीदास, थोडासा रिकामा वेळ, कोणतेंहि ठिकाण एवढी सामुग्री असली म्हणजे गप्पांची करमणूक होते. गप्पांना अमुकच ठिकाण, अमुकच वेळ, काळ पाहिजे असें नाही. तसेंच अमुक वयाचा, पेशाचा, देशाचा सोबती पाहिजे असेंहि नाही.

विनाकारण माशा मारीत बसण्यापेक्षा गप्पा मारीत बसलेलें काय वाईट! गप्पा मारण्याची सुद्धा कला आहे. लेखकांत आणि गप्पीदासांत फारसा फरक नाही. गप्पीदास भाषणांत कल्पनेच्या भराऱ्या मारतो आणि यालाच आपण प्रतिभा म्हणत नाही का? गप्पा मारायला सुद्धा प्रतिभा लागते. असे गप्पीदास दुसऱ्यांची उत्कृष्ट लेखकाप्रमाणे दोनचार तास करमणूक करूं शकतो.

गप्पा म्हणजे जादुगाराची पोतडी. जादुगार जसा आपल्या पोतडींतून निरनिराळ्या वस्तू बाहेर काढतो, तसेंच गप्पीदास आपल्या गप्पांतून निरनिराळे विषय काढीत असतो. या विषयांत कावळा-चिमणीपासून अगदी हिटलरच्या राजकारणापर्यंत सर्वांना प्रवेश आहे.

गप्पा मारल्या म्हणजे एक प्रकारची मनास शांतता लाभते, उत्साह उत्पन्न होतो. मनमोकळेपणाने वागतां येते. कुढेपणा जातो व मनुष्य आनंदी व हसतमुख बनतो. नवीन नवीन ओळखी होतात. प्रेम संपादितां येतें.

गप्पा आणि कुटाळकी यांत मात्र फरक आहे. कोणाचीहि निंदा होणार नाही, अस्तित्वांत असलेल्या जवळच्या व्यक्तींची नालस्ती होणार नाही याची काळजी आपण घेणें अवश्य आहे. प्रसिद्ध झालेल्या पुस्तकावर, आगामी घडामोडीवर, चालू राजकारणावर बोलतांना गप्पा आणि कुटाळक्या यांतलें अंतर नीट लक्षांत ठेवलें पाहिजे. ऐकणारांचें मनोरंजन करण्यासाठी कुचेष्टा करण्याचा मोह होतो तो मात्र आवरला पाहिजे.

(संक्षेपाने) कै. प्रा. गं. भा. निरंतर.

(५) आत्मवृत्त

घड्याळाचें आत्मवृत्त—

आमच्या नांवाचा अर्थ तरी कोणाला कळतो की नाही याविषयी मला शंका आहे. घड्याळ म्हणजे घट्यालय आणि घटयालय म्हणजे घटि दाखविणारें आलय, म्हणजे वेळ दाखविणारें घर किंवा यंत्र. आमचे पूर्वज कोण याचा छडा संशोधकांनी लावला आहे. पण आमचे पूर्वज कोणत्या काळीं जन्माला आले याचा तलास मात्र कोणाला लागलेला नाही.

ठराविक वेळ गेली असें दाखविण्यासाठी माणसांनी निरनिराळ्या युक्त्या योजिल्या. डमरूच्या आकाराचे दोन काचेचे फुगे करून त्यांच्यामध्ये एक बारीक छिद्र ठेवीत आणि सगळी वाळू खालच्या फुग्यांत गळाली, की एक तास झाला असें समजत. किती वाजले याचा बोध मात्र यावरून होत नसे. आपल्या देशांत एक घटिकापात्र असे. याच्या बुडाला एक बारीक छिद्र ठेवीत. हें पात्र एखाद्या गंगाळांतील पाण्यावर ठेवीत. त्या छिद्रांतून गंगाळांतील पाणी घटिपात्रांत येऊं लागे व तें जसें जसें साठत जाई तसतसें पात्रहि हळूहळू खालीं जाऊं लागे. पात्र पूर्ण भरलें की, तें एकदम बुडत असे. असें झालें म्हणजे एक घटका झाली असें समजत. कांही कांही ठिकाणीं सावल्यांनीहि वेळेचें माप घेत असत व अमुक वाजले असें सुचवीत असत. "सांवल्या निम्म्या अंगणांत आल्या आहेत." "सांवल्या भिंतीवर चढल्या आहेत" असें म्हणत. पण हा सारा हिशोब अनमानघपक्याचाच होत असे. स्प्रिंगच्या जन्मापासून आमचा अवतार झाला असें थोडक्यांत सांगतों. त्या-

पूर्वी सांगितलेली आमची कुलपरंपरा गेल्या दोनतीन शतकांपूर्वीपर्यंत चालू होती.

आमची रचना करणाऱ्या कसबी कारागिरांनी आम्हांला देखणी व आम्ही अगदी मनगटावर बसूं शकूं इतकी छोटी रूपें दिलीं. त्यामुळे आम्ही प्रत्यक्ष अलंकारच बनलों. लक्षावधी लोक आम्हांला हातावर वागवितात. कांही कसबी लोकांनी तर याहिपेक्षा कमाल केली. तिकडे व्हिक्टोरिया राणीच्या अंगठीच्या खडयांत नेऊन बसविलें. आम्ही अणूसारखेहि असतों आणि आकाशासारखेंहि असतों. अंगठीच्या खड्यावरहि बसतों आणि राजाबाई टॉवरमध्येहि बसतों. कसेंहि असो, आमच्यावाचून सध्या कोणाचेंहि पान हालत नाही.

खुद्द माझ्याविषयी म्हणाल तर माझा जन्म जर्मनींत सुमारे शंभर वर्षांपूर्वी झाला. तेव्हा जर्मन राणीपाशी मी होतों. ऑस्ट्रियाशीं युद्ध होऊन, जय मिळवून जर्मन योद्धे परत आले तेव्हा हिंडेन्बुर्ग यांच्या पराक्रमावर खूष होऊन राणीने मला हिंडेन्बुर्गना देऊन टाकलें. हा शिपाई माणूस मोठा करडा व वक्तशीर वागणारा होता. त्याने माझी उत्तम निगा ठेवली. त्याच्याबरोबर सर्वत्र हिंडून मी त्याची पराक्रमी कारकीर्द सर्व पाहिली. पुढे ते जर्मनीचे अध्यक्ष झाले. होतां होतां आम्ही दोघेहि थकलो. हिंडेन्बुर्गच्या पश्चात् त्यांच्या चिरंजीवांनी त्यांची आठवण म्हणून मला वाड्यांतील एका कपाटांत ठेवून दिलें आहे. प्रशियाची राणी, हिंडेन्बुर्ग सेनापति यांच्या स्मृति माझ्याशीं निबद्ध झाल्या आहेत म्हणून अजूनहि लोक माझ्याकडे कौतुकाने पहातात.

(संक्षेपाने) कै. श्री. म. माटे.

(६) शब्दचित्र

किसन—

हा किसन अगदी सागरगोटयासारखा आहे. त्याचा तो वाटोळा चेहरा अगदी शांत, निर्भय व निर्विकार दिसतो. त्यावर हुरहुर दिसत नाही अथवा खळबळ दिसत नाही. कांही मुलांच्या चेहऱ्यावर विचारांचें क्षुब्ध वादळ व कांहीच्या चेहऱ्यावर भीतीची अखंड छाया दिसते. हा अगदीच वेगळा आहे.

किसनच्या कपाळावर तांबड्या-पांढऱ्या गंधाचे अनेक छाप असावयाचे. एखादें पत्र पत्ता चुकत चुकत आलें म्हणजे त्यावर कितीतरी शिक्के आणि खाडाखोड असते. किसनचें कपाळ त्या पत्रासारखें दिसे. कारण घरांतलें

कोणीहि मोठें माणूस स्नान करून संध्येला बसलें, की ही स्वारी गंधासाठी दत्त म्हणून उभी रहावयाची. किसनच्या कपाळावर इतके वेगवेगळे शिक्के आढळतील की, त्यावरून शैव, वैष्णव, वारकरी वाटेल त्या पंथावर त्याला हक्क सांगतां येईल.

किसनची स्मरणशक्ति जबर आहे. विशेषतः संगीताचें पाठांतर फार. या पाठांतरांत वडील भावाच्या शाळेंतील सर्व कविता, आईचीं पदें, शेजाऱ्या-पाजाऱ्यांचीं गाणीं सर्व यायचें. तो ध्रुवपदापलीकडे फारसें लक्षांत ठेवण्याच्या भानगडींत पडत नाही. ध्रुवपदें एकमेकांपुढे जोडून तो आपलें गाणें बनवितो.

त्याला 'शांत बंडखोर' ही पदवी देतां येईल. त्याला जें पाहिजे असेल तें मिळविल्याखेरीज तो रहात नाही. तुम्ही कामांत असला आणि त्याच्या मागणीकडे दुर्लक्ष केलें, तरी तो हिरमुसलेला होईल, असें मुळीच नाही. "मला दोली पाहिजे" असें एकदां म्हणेल, पुनः पांच मिनिटें गेलीं कीं, "एवढीशी द्या, काल दिलीत तशी" अशी मागणी करील. भाषा बदलून त्याच शांत स्वरांत तो इतक्या वेळां मागणी करील की, अखेर तुम्ही कंटाळून जाल आणि उठून त्याची मागणी पुरी कराल. कधी कधी तो लाघवी भाषणाने तुम्हाला वश करूं पाहील. त्याच्या त्या लाघवीपणाने तुम्ही खुष व्हाल.

तो केव्हा लक्षांत ठेवतो कोणास ठाऊक, पण पतीपत्नींचीं नातीं त्याच्या लक्षांत राहतात. वहिनींनी विडा दिला व त्याला सांगितलें की, "किसन, हा विडा बाहेर नेऊन दे" तर किसन तडक नानांकडेच जातो. मामांनीं दूध आणायला सांगितलें म्हणजे स्वयंपाक घरांत तो मामीकडे येऊन म्हणायचा, "अहो मामी, तुमच्या मामांना दूध पाहिजे." काकांची वर्दी बरोबर काकीकडे पोंचवायचा.

शब्दांवाचून त्याचें कधी अडावयाचें नाही. आपणाला ठाऊक असलेल्या गोष्टींतील साम्य नवीन गोष्टींत शोधून तिचेंच नांव तो नव्या गोष्टीला देणार. एकदा वडील रुपये मोजीत होते. रुपयांच्या चवडी टेबलावर होत्या. त्या पाहून किसन म्हणाला, "अबब! किती हे पैशांचे गट्टे!" अशा गंमती त्याच्या बोलण्यांत येतात.

त्याचा हा कार्यसाधूपणा व धिम्मेपणा असाच टिको, असें मी नेहमीं चिंतीत असतों.

(सक्षेपाने) —गोपीनाथ तळवलकर.

(७) चरित्रात्मक निबंध

नव-स्त्री-निर्माता (महर्षि कर्वे)—

दादरच्या शिवाजी पार्कवर माणसांची गर्दी लोटली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे ते दिवस होते. परंतु आजच्या सभेचें स्वरूप वेगळें होतें. साऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद नुसता ओसंडत होता आणि आजच्या सभेचा विशेष म्हणजे सभेकरिता जाणाऱ्या श्रोतृवंदांत नारीगण अधिक होता. केस पिकलेल्या वृद्धेपासून परकऱ्या मुलीपर्यंत सर्व प्रकारच्या स्त्रिया घाईघाईने जात होत्या; आणि त्यालाहि कारण तसेंच होतें. अबलेला प्रबला करणाऱ्या महर्षि कर्वे यांचा सत्कार होता. त्यांची शताब्दि साजरी करण्याकरिता आज त्यांचे सर्व चहाते जमणार होते; आणि त्याच वेळीं सध्याच्या चालूं असलेल्या महाराष्ट्राच्या चळवळीबद्दल अण्णा काय बोलतात, याबद्दल सर्वांना उत्सुकता होती. 'मुंबई महाराष्ट्राचीच आहे' असें शांतपणें अण्णांनी उद्गार काढले तेव्हा साऱ्या लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

हा अण्णांचा शांतपणा त्यांच्या साऱ्या जीवनांत त्यांचा सोबती आहे. अण्णांनी कधी गर्जना करून भाषणें केलीं नाहीत. कधी जहाल लेख लिहिले नाहीत. कधी निवडणूक लढविली नाही. तरीपण ते फार मोठे आहेत आणि म्हणून महर्षि आहेत.

तरुणांच्या अंगांतील रक्त तापलेलें होतें अशा क्रांतिकारक साली १८५८ मध्ये १८ एप्रिलला अण्णांचा जन्म झाला. त्यांच्या आईचा सोशिकपणा त्यांच्यांत पुरेपूर उतरला होता. परिस्थितीने त्यांच्या शिक्षणांत अनेक अडथळे उत्पन्न केले. ११० मैल पायीं कऱ्हाडला चालत जाऊनहि त्यांना पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षेला वयाच्या अडचणीमुळे बसतां आलें नाही. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांनी इंटरचा पहिला पाठ घेतला; आणि वयाच्या २६ व्या वर्षी ते बी. ए. झाले. नोकरी आणि शिकवण्या करून त्यांनी आपलें एम्. ए. पर्यंतचें अध्ययन पूर्ण केलें.

अण्णा मुंबईस आपल्या एका मित्राबरोबर रहात असतांना त्या मित्राची बहीण विधवा झाली होती. वैधव्य म्हणजे काय हें देखील न कळणारी ती विधवा पाहून अण्णांच्या हृदयाला पीळ पडे. त्या वेळीं विधवाविवाहाबाबत समाजाची चाललेली प्रक्रिया ते मोठ्या काळजीपूर्वक निरखीत होते. त्याच वेळीं त्यांची प्रथम पत्नी वारली.

कर्व्यांनी निश्चय केला. आपल्या मातेचें मन वळविलें, आपल्या मित्राच्या विधवा बहिणीच्या म्हणजे बायाच्या वडिलांची अनुमति मिळविली आणि बायाशीं पुनर्विवाह केला. कर्व्यांनी बायाचा उद्धार केला. हें ऋण लक्षांत ठेऊन बायांनी अण्णांच्या प्रत्येक कार्यांत सक्रिय भाग घेतला.

बायाशीं पुनर्विवाह करून आपण एका स्त्रीचा प्रश्न सोडविला; परंतु आपल्या समाजांत अशा अनेक विधवा आहेत की, ज्या अन्यायाच्या पंकांत बुडून गेल्या आहेत. या विधवांना आपण शिक्षण दिलें तर ह्याच स्वतः आपलें भवितव्य उज्ज्वल करतील असें अण्णांना जावणलें. त्यांनी अनाथ बालिकाश्रम काढला. त्याकरिता ते दारोदार हिंडले, फंड गोळा केला. अण्णांनी आपल्या आयुष्यांत लाखों रुपयांची वर्गणी गोळा केली. आपल्या भिडस्त व लाजऱ्या स्वभावाने वर्गणी जमा करण्याच्या कार्यांत यावें तितकें यश आलें नाहीं असें ते म्हणतात.

पुण्याच्या प्लेगच्या काळांत एका उदार गृहस्थाच्या देणगीमुळे पुण्याचा बालिकाश्रम हिंगण्यास गेला. १९०७ सालीं महिला विद्यापीठ स्थापन केलें. १९१५ त मुंबईतील राष्ट्रीय सामाजिक परिषदेचें अध्यक्षस्थान अण्णांकडे आलें त्याच वेळीं दोघां विद्वानांनी अण्णांना जपानमधील स्त्रियांकरिता असलेल्या नरुसे विद्यापीठाची माहिती दिली; आणि अण्णांना स्त्रियांच्या उद्धाराचा नवा मार्ग सांपडला.

स्त्रियांचें कार्यक्षेत्र वेगळें म्हणून अण्णांनी स्त्रियांसाठी वेगळा अभ्यासक्रम तयार केला. त्यांनी संकल्प सोडला, देणग्या येऊं लागल्या. सर ठाकरसींनी विद्यापीठासाठीं मोठी देणगी दिली आणि विद्यापीठ साकार झालें. परदेशांच्या सफरी करून अण्णांनी या कार्यासाठीं कोटींनी धन आणलें.

विद्यापीठ बाळसें धरूं लागलें तसें अण्णा त्यापासून दूर झाले. भारतरत्न हा किताब देऊन सरकारने अण्णांचा गौरव केला. प्रत्येक स्त्रीच्या मनांत अण्णांना फार मोठें स्थान आहे. संजीवनी मराठे म्हणतात,

'ज्ञानसागरी नारीजनता
वात्सल्यें न्हावून आजवर
कुचंबणेच्या पंकामधूनी
तये काढिले अबलांना वर।'

(संक्षेपाने) (देसाई आणि अडाल्जा)

स्वाध्याय

[१] पुढील मुद्यांवरून निबंध लिहा—

(१) वर्णनपर— मतदान-केंद्रावर अर्धातास—

मतदानाचा दिवस–गांवांतील वातावरण–मतदान केंद्राकडे जातांना दिसणारीं दृश्यें–मतदान-केंद्रावर पोंचल्यानंतर–मतदारांच्या रांगा–निवडणुकी-विषयीं त्यांचीं मतें--तक्रारी–अपेक्षा–स्वयंसेवक, शिपाई, केंद्राधिकारी यांची वागणूक–मधूनच होणारीं भांडणें–मतें देऊन परतणारांचे अनुभव–निकालाचे अंदाज–लोकशाहींत मतदानकेंद्राचें स्थान–समारोप.

(२) कथनपर— माझा आवडता छंद

छंद म्हणजे काय–जीवनांतील छंदाचें स्थान–आवश्यकता–इतर आवडी-निवडी व छंद यांतील फरक–माझ्या कांही आवडीनिवडी–विशिष्ट छंदाची माहिती–तो निर्माण व्हायचें कारण–त्याची जोपासना–त्यापासून होणारे फायदे–आनंद–समारोप.

(३) कल्पनाप्रधान—वर्तमानपत्रें नाहींशीं झालीं तर !..

मोठा पाऊस–वर्तमानपत्रें येत नाहींत–चुकल्याचुकल्यासारखी भावना–वर्तमानपत्रें खरोखरच बंद पडलीं तर हा विचार–जगांतला निम्मा प्राण गेल्या-सारखें होईल–सकाळीं उठल्यापासून ते जीवनाच्या प्रत्येक वाटचालींतील वर्तमानपत्रांचें महत्त्व–तीं नाहींशीं होतांच ही वाटचाल खडतर होईल–दैनंदिन बातम्या, समाजकारण, राजकारण, क्रीडा, वाङ्मय, जाहिराती, उद्योगधंदे यांवर होणारे परिणाम–वर्तमानपत्रांवर उपजीविका करणाऱ्यांची होणारी अनवस्था–एकंदर निर्माण होणारी पोकळी–आणखी कांही गंमती–समारोप.

(४) आत्मकथन—वर्गांतील फळ्याचें आत्मकथन

फळ्याचा रंग पुरता गेला–मोडकळीस आलेला जुना फळा–नवे फळे येणार–जुने अडगळीच्या खोलींत जाणार–जुन्याचें दुःख–या दुःखापोटीं आत्मनिवेदनास प्रारंभ–हेतु–स्वतःची कैफियत–उपयुक्तता पटवून देणें–फलक, फळी–दुकानावरील बोर्ड्स्–सर्वत्र आढळणारे सूचनाफलक–विद्यार्थ्यांच्या पाट्या –हीं त्यांचीं भावंडें–जन्मकथन–जीवितकार्य–शालेय जीवनांतील अटळ व अढळ

स्थान–शैक्षणिक उपयुक्तता–अतिपरिचयाने अवज्ञा–अन्याय–उपेक्षा–त्यांचें सात्विक दुःख–कांही मागण्या–विनंत्या–समारोप.

(५) शब्दचित्र—रस्त्यावरील ज्योतिषी

वैशिष्ट्यपूर्ण वेष–मुद्रा–बोलण्याची पद्धत–हातवारे–पुढ्यांतील अनेकविध वस्तु–सामान्यतः त्याच्याभोवतीं कोणते लोक आढळतात–त्यांची भविष्यविषयक जिज्ञासा–या गिऱ्हाइकांचें समाधान करण्याची त्याची चातुरी–मानवी स्वभावाचें ज्ञान–जसें गिऱ्हाईक तसें बोलण्याची हातोटी–शब्दांत न सापडण्याची कला–गोडगुलाबीनें पैसा काढण्याचें कसब–तुमचा त्याचा परिचय होण्याचें कारण–तुमच्या त्याच्याविषयीच्या भावना–समारोप.

(६) चरित्र—डॉ. आंबेडकर—

आंबेडकरांच्या आयुष्यांतील एखादा महत्त्वाचा प्रसंग देणें–त्या प्रसंगाकडून त्यांच्या चरित्राकडे वळणें–जन्म–बालपण–शिक्षण–बालपणांतील हुशारी–समकालीन परिस्थितीचे त्यांच्या व्यक्तीमत्वावरील अनुकूल वा प्रतिकूल परिणाम–वैचारिक व सामाजिक दृष्टिकोन–एकंदर कार्य–भारतीय घटनेचे शिल्पकार–आजचे व भावी इतिहासांत राहणारें स्थान–चरित्रापासून घेतां येणारी स्फूर्ति–समारोप.

(७) चिंतनपर—गणवेषाचें महत्त्व—

गणवेषाचा अर्थ–गण = समुदाय, वेष = पोशाख. गणांचा = समुदायाचा विशिष्ट पोशाख–गणवेषामागील मूळ भूमिका–विशिष्ट समुदायाचा विशिष्ट वेष–त्या वैशिष्ट्यांचा निदर्शक–त्या समुदायाच्या अस्तित्वाची, कार्याची ध्येयाची जागती जाणीव–पोलिस–पोस्टमन–मिलिटरी, नाविक दल, शाळांतील विद्यार्थी, रेल्वे, एस्. टी. कर्मचारी इत्यादींचे गणवेष–गणवेषाचें मानसिक कार्य–संघवृत्ती–समता–आपल्या संस्थेच्या, संघटनेच्या, पेशाच्या जबाबदाऱ्या कर्तव्यपूर्णतेने जाणवत राहणें–त्यामुळे तो घालतांच येणारें वेगळेपण–स्फूर्ति–तत्परता–सामाजिक महत्त्व–निरनिराळ्या पेशांतील, खात्यांतील कर्मचारी–घटकवर्ग यांना चटकन् ओळखतां येणें–त्यांच्याशीं सहकार्य देणें सुलभ–लोकशाहींतील गणवेषाचें स्थान–कांही अनुकूल, प्रतिकूल मतें–समारोप.

— स्वाध्याय —

[२] पुढील गटांतील निबंधप्रकारांचें योग्य मार्गदर्शनाखाली लेखन करा

(१) वर्णनपर—

(१) वसंतऋतूंतील एक पहाट.
(२) पौर्णिमेंतील फेरफटका.
(३) पहिला पाऊस.
(४) मी पाहिलेला एक अपघात—आग—महापूर.
(५) प्रदर्शनांतील फेरफटका.
(६) गर्दीतील चेहरे.
(७) चित्रपटगृहाच्या आसपास.
(८) कोणत्याहि क्यूंत एक अर्धातास.
(९) स्वातंत्र्यदिनोत्सव.
(१०) प्रजासत्ताक दिन.
(११) पंडित नेहरूंच्या सभेचा वृत्तांत.
(१२) विद्यार्थी स्नेहसंमेलन दिन.
(१३) रद्दीवाला, फेरीवाला, बांगडीवाला.
(१४) रिझल्टचा दिवस.
(१५) रेल्वे प्लॅटफॉर्मवरील दृश्ये.
(१६) अष्टप्रहर.
(१७) निसर्गरमणीय स्थलवर्णन.
(१८) इतिहासप्रसिद्ध-स्थळ-किल्ला.
(१९) तिसऱ्या वर्गातील प्रवास.
(२०) चौपाटीवरील अथवा आपल्या गांवांतील उद्यानांतील एक संध्याकाळ.
(२१) शिरडींतील एक दिवस.
(२२) ताजमहालाच्या सहवासांत.

(२) कथनपर—

(१) माझीं कांही सुखस्वप्नें.
(२) माझ्या जीवनांतील कांही निराशेचे प्रसंग.
(३) गतायुष्यांतील कांही आठवणी.
(४) माझा पहिला प्रवास.
(५) मी केलेलें श्रमदान.
(६) माझे आवडते खेळ.
(७) माझें आवडतें पुस्तक.
(८) माझें आवडतें शिक्षक.
(९) माझे आवडते सण.
(१०) माझे आवडते बोलपट.
(११) माझे आवडते गायक व गायिका.
(१२) मला पडलेलें स्वप्न.
(१३) मी पाहिलेलें एक लग्न.
(१४) शालेय जीवनांतील कांही आठवणी.
(१५) माझा आवडता वार.

(३) आत्मनिवेदनपर—

(१) राष्ट्रध्वजाचें आत्मवृत्त.
(२) लालकिल्ल्याचें आत्मवृत्त.
(३) राजघाटाची आत्मकथा.
(४) आनंदभुवनाचें आत्मनिवेदन.

(५) दिल्लीची आत्मकथा.
(६) आपल्या गांवातील पडक्या किल्ल्याचें आत्मनिवेदन.
(७) जालियनवाला बागेचें आत्मकथन.
(८) रायगडचें आत्मकथन.
(९) सर्कशीतील सिंहाचें आत्मकथन.
(१०) वर्गातील बाक-फळा-भिंतींचें आत्मकथन.
(११) शाळेच्या घंटेचें आत्मकथन.
(१२) सायकलचें आत्मकथन.
(१३) पानशेत धरणाची कैफियत.
(१४) महापुरानंतरच्या पुण्याचं गाऱ्हाणें.
(१५) पुस्तकाचें आत्मकथन.
(१६) फाउंटन पेनची आत्मकथा.
(१७) पोस्टाच्या पेटीचें, तिकिटाचें आत्मनिवेदन.
(१८) फाटक्या रुपयाच्या नोटेचें गाऱ्हाणें.
(१९) फाटक्या शर्टच्या कांही मागण्या.
(२०) रेडिओचें आत्मवृत्त.
(२१) नया पैशाची आत्मकथा.
(२२) प्रश्न-पत्रिकेचें आत्मकथन.
(२३) तुरुंगाचें आत्मवृत्त.

(४) कल्पनाप्रधान—

(१) चित्रपटगृहें–केशकर्तनालयें–वाचनालयें–उपाहारगृहें–रेडिओ–बीज–पाण्याचे नळ–सूर्य–चंद्र–पाऊस–शेतकरीवर्ग–घड्याळें–कॅलेंडर्स–पंचांगें–शिंपी–सोनार–गवंडी–डॉक्टर्स–चांभार–भटजी–इत्यादींपैकीं कोणतेंहि एक बंद अगर नाहींसें झाल्यास.

(२) मी मुख्याध्यापक–मुख्यमंत्री–नगराध्यक्ष–परीक्षक वगैरे झालों तर. (३) मला एक लाख रुपये मिळाल्यास. (४) मला माझ्या मृत्यूची तारीख माहीत झाल्यास. (५) गतजीवनांतील कांही वर्षें मला परत मिळाल्यास. (६) मला ईश्वर भेटला तर. (७) मनुष्य अमर झाला तर. (८) परीक्षा रद्द झाल्यास.

(५) विचारप्रधान (चिंतनपर)–

(१) स्वातंत्र्य म्हणजे स्वेच्छाचार नव्हे.
(२) गरज ही शोधाची जननी आहे.
(३) ग्रंथ हेच आपले गुरु होत.
(४) दारूबंदी इष्ट का अनिष्ट?
(५) नरेंचि केला हीन किती नर!
(६) देवदानवां नरें निर्मिलें.
(७) लोकशाहीस विघातक कांही प्रवृत्ती व त्यावर उपाययोजना.
(८) वाशिलेबाजी नष्ट करतां येईल का?
(९) साक्षरताप्रसार यशस्वी कसा करतां येईल?
(१०) बचत-योजना व राष्ट्रीय विकास-योजना.
(११) वृक्षारोपणाचें महत्त्व.
(१२) सक्तीचें लष्करी शिक्षण.

(१३) इंग्रजींचें संपूर्ण उच्चाटन योग्य कीं अयोग्य ?
(१४) आराम हराम है।
(१५) भूदानाची आवश्यकता.
(१६) विद्यार्थी व चित्रपट.
(१७) आजचे विद्यार्थी खरोखर बेजबाबदार आहेत.
(१८) जाहिरातींचें युग.
(१९) नभोवाणीचें शिक्षणक्रमांत स्थान.
(२०) १४ जुलै १९६० व अष्टग्रहीनें जगास काय शिकविलें ?
(२१) स्त्रिया आणि नौकरी.
(२२) भविष्यज्ञान इष्ट कीं अनिष्ट.
(२३) स्त्रिया व रंगभूमि.
(२४) स्त्रिया व समाजसेवा.
(२५) साहित्य व समाज-सुधारणा.
(२६) शाळांतील मुलांची संख्या अनवश्यक वाढली आहे काय ?
(२७) लोकशाही व पंचायतराज्य.
(२८) वाढत्या लोकसंख्येनें जीवन बिकट होत चाललें आहे.
(२९) हुंडाबंदी.
(३०) जीवनांतील सणांचें स्थान.
(३१) जीवनांतील हास्यविनोदाचें स्थान.
(३२) प्रयत्नवाद कीं दैववाद ?

(२) चिंतन-(सुभाषित इत्यादींवरून)

(१) न ऋण जन्मदेचें फिटे.
(२) जगीं सर्व सुखी असा कोण आहे ?
(३) हें विश्वचि माझें घर.
(४) शिवराजाचें आठवावें रूप... प्रताप.
(५) कठीण समय येतां कोण कामास येतो ?
(६) विवेकें कार्य साधतें.
(७) फुलासंगे मातीस वास लागे.
(८) मरावें परी कीर्तिरूपें उरावें.
(९) मरणांत खरोखर जग जगतें.
(१०) ...तयासारिखें भोगणें प्राप्त झालें.
(११) धीर धरी रे, धीरापोटीं असतीं मोठीं फळें गोमटीं.
(१२) असाध्य ते साध्य, करितां सायास.
(१३) भावना भंगोनी जाता जीव मेला या जगाला।
(१४) जग हें आळवावरचें पाणी।
(१५) थांबला तो संपला.
(१६) करावें तसें भरावें.
(१७) तोचि संत जो सोशी जगाचे आघात।
(१८) अतिपरिचयादवज्ञा।
(१९) द्रव्येण सर्वे वशाः।
(२०) मौनं सर्वार्थसाधनम्॥
(२१) यथा राजा तथा प्रजा !
(२२) स्वभावो दुरतिक्रमः।
(२३) व्याप तितका संताप.
(२४) शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं.
(२५) सुभाषितें हीं अर्धसत्यें होत.
(२६) शितावरून भाताची परीक्षा.
(२७) सत्यमेव जयते.

(६) चरित्रलेखन—

(१) महात्मा गांधी. (२) सरदार पटेल. (३) सरोजनी नायडू. (४) एडिसन. (५) सर विश्वेश्वरय्या. (६) यशवंतराव चव्हाण. (७) ज्ञानेश्वर. (८) तुकाराम. (९) रामदास. (१०) म० ज्योतिबा फुले. (११) विवेकानंद.. अशा थोर व्यक्तींचीं चरित्रें मिळवून त्यांवर निबंध लिहा.

---

६. पत्रलेखन

स्वरूप व कला

पत्रलेखन कालचें व आजचें—

पत्रें आणि वृत्तपत्रें हीं आधुनिक युगांतील जुळीं भावंडेंच होत. वृत्तपत्रांनी भोंवतालच्या जगाची खबरबात कळते, तर दिवसा दोन दिवसाआड येणाऱ्या पत्रांनीं आप्तेष्टांचें, इष्टमित्रांचें, व्यवसायबंधूंचें कुशल-अकुशल, नवें-जुनें, समजतें. आपल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनलेल्या या पत्रांचें लेखन कसें करतात—कसें करावें; पत्रलेखन ही एक कला कशी आहे, तिचें स्वरूप कसें असतें हें येथे पाहावयाचें आहे.

संस्कृत वाङ्मयांत प्रियकर-प्रेयसींनीं लिहिलेल्या पत्रांचे काव्यात्म उल्लेख सांपडतात पण ते विरळच. मराठेशाहींतील मनाचें व मराठी बाण्याचें दर्शन घडविणारा प्रचंड पत्रव्यवहार इतिहास-संशोधकांनी शोधून काढला आहे. आधुनिक मराठी वाङ्मयांतहि कांही थोर लेखकांचीं पत्रें वाङ्मयाचीं भूषणें ठरलीं आहेत. एक काळ असा होता कीं, पत्रें लिहिणें, तीं ज्याची त्याला सुरक्षित पोचणें, त्यांचीं उत्तरें येणें हें सारें फार कठीण होतें. विज्ञानयुगाने अनुकूल करून दिलेल्या दळणवळणाच्या साधनांनीं, लेखनसामुग्रीच्या वैपुल्याने पत्रलेखन ही एक सहजसुलभ व जीवनोपयोगी सुखसोय आपणांस लाभली आहे.

वाहतुकीच्या गतिमान् साधनांनी वेळ पडेल तसें आपण चटकन् आपल्या इष्ट माणसांची भेटगांठ घेऊं शकतो. मात्र प्रत्येक वेळीं कांही आपणांस घर सोडून छोट्यामोठ्या कामासाठी बाहेरगांवीं जाणेंयेणें होणार नाही. परंतु पत्रलेखनाने, आणि अगदीं आवश्यकता असेल तेव्हा तार पाठवून आपण ही गैरसोय दूर करूं शकतों. म्हणजे जणुं असेंच कीं पत्रलेखनाने आपण आपल्या इष्ट व्यक्तींची निम्मी भेटगांठ घेऊं शकतों. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' तसेंच व्यक्ती तितक्या पत्रांच्या

प्रकृती असूं शकतात. पत्रें हीं व्यक्तींतील संबंधानुसार, वेळकाळानुसार लिहिलीं जाणार तेव्हां हया संबंधाचे जेवढे प्रकार तेवढेच पत्रलेखनाचे प्रकार होणार.

खेदाची गोष्ट ही की, या पत्रलेखनाची उपेक्षा आजचे विद्यार्थींच काय पण इतर जबाबदार सुशिक्षितहि करतांना दिसतात. मराठींत पत्रें लिहिणें त्यांना कांहींसें कमीपणाचें वाटतें. कोणे एके काळीं मोडींत पत्रव्यवहार होत असे. आता मोडींतच काय पण बालबोध मराठींतहि पत्रें लिहितांना कांहींना लाज वाटते, तर कांहींना ती एक आपत्ती वाटते. स्वत:चें वेगळेपण दाखविण्यासाठी कांहीं इंग्रजीप्रेमी इंग्रजीचा आश्रय करून ज्यांची इंग्रजीची पोंच बेताचीच आहे अशा बिचाऱ्या नातलगांना इंग्रजींतून पत्रें टाकतात. इंग्रजी पत्रलेखनहि अवघडच आहे. त्यावरहि हवें तेवढें प्रभुत्व नसल्याने पत्र वाचणाराचे, खुद्द पत्राचे आणि इंग्रजीचेहि हाल होतात. खेडयांत राहणाऱ्या पालकांना, " होस्टेलचे चार्जेस मंथएन्डपर्यंत भरायचे आहेत. तेव्हा एक्झाम् फी, होस्टेल-चार्जेस आणि संड्री एक्स्पेन्सेस असे सर्व मिळून २२५ रु. एम्. ओ. ने पाठवा " असें धेडगुजरी पत्र लिहिलें कीं एम्. ओ. ताबडतोब धाडली जाते अशी या होस्टेलवासीयांची ' आयडिया ' असल्यास न कळे !

जुन्या पत्रव्यवहाराची माहिती नाही, इंग्रजी पत्रलेखन संपूर्णत: जमत नाही. त्यामुळे आजच्या आपल्या पत्रव्यवहारास कांहींसें धेडगुजरी स्वरूप प्राप्त झालें आहे.

सारांश, पत्रें म्हणजे निम्मी भेट, पत्रें आपले मनोगत कळविण्याकरिता लिहिलीं जातात हें मान्य करून त्या दृष्टीने पत्राचे प्रकार किती, त्या प्रकारा-नुरूप त्यांचें स्वरूप कसें असावें हें पाहूं या.

प्रकार—जीवनाचा बराचसा भाग अनौपचारिक पत्रव्यवहाराने व्यापला आहे. हीं पत्रें आप्तस्वकीयांची खुशाली कळण्याकरतां आपली खुशाली त्यांना कळविण्यासाठी लिहिलीं जातात. शिवाय कामकाजानिमित्त, नैमित्तिक पत्रेंहि लिहिलीं जातात.

(१) **नित्य पत्रव्यवहार**—अनौपचारिक पत्रें.

(२) **नैमित्तिक**—कांही विशेष निमित्ताने—उदा० लग्न, मुंजी, जन्म, मृत्यु, अनुकूल—प्रतिकूल घटना, उद्योगधंद्याविषयी, निमंत्रणाचीं, अभिनंदनाचीं सांत्वनाचीं पत्रें हीं सर्व नैमित्तिक पत्रव्यवहारांत म्हणजेच **औपचारिक पत्र-व्यवहारांत** समाविष्ट करूं.

(१) नित्य किंवा अनौपचारिक पत्रें—

हीं पत्रें आपल्या भावजीवनाचा रम्य भाग आहे. ज्या व्यक्तींनी आपलें भावजीवन घडतें त्यांना हीं कुशल-क्वचित् अकुशल पत्रें लिहितांना त्यांत भरपूर मनमोकळेपणा, स्नेहाळपणा व्यक्त झाला पाहिजे. पत्रांतील या दिलखुलासपणाने ही मंडळी आपल्या सुखदुःखांत सहभागी झालीं पाहिजेत. परंतु या पत्रांना एक विशिष्ट पथ्य आहे. तें म्हणजे या पत्रलेखनांत ज्या व्यक्तींना आपण हीं पत्रें लिहितों त्यांच्या वयाच्या, अधिकाराच्या व स्नेहाच्या मर्यादा कटाक्षाने पाळणें, हा एक शिष्टसंमत ठराव आहे. त्या दृष्टीने अशा पत्रांचे आरंभ, मध्य, शेवट हे प्रत्येक भाग महत्त्वाचे ठरतात. असें एक अनौपचारिक पत्र खाली दिलें आहे. त्याचें सूक्ष्मवाचन करूं या.

नमुना १—

॥ श्री ॥

मधुकर बाळकृष्ण जोशी.
गणपती गल्ली,
जोशी वाडा;
जालना.

दिनांक १–३–१९६०

तीर्थरूप बाबांस कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार, विनंती विशेष.

तुमचें दिनांक २४–२ चें पत्र पोंचलें. त्यांत तुम्ही माझ्या प्रकृतीची व अभ्यासाची चौकशी केली आहे. खरें म्हणजे हें मी यापूर्वीच आपणास कळवायला हवें होतें, परंतु अभ्यासाच्या गडबडींत राहून गेलें. क्षमस्व.

माझी प्रकृती ठीक आहे. माझी वार्षिक परीक्षा एप्रिलच्या ६ तारखेस सुरूं होणार. यंदा मी भरपूर अभ्यास केला आहे. मागील वर्षी मी गणिताकडे दुर्लक्ष केलें होतें त्यामुळे मला वर्ष गमवावें लागलें. यंदा प्रथमपासूनच मी गणिताची योग्य ती काळजी घेतली. आतां मी त्यांत सहज चांगले मार्क्स् मिळवूं शकेन. इतरहि विषयांकडे योग्य तें लक्ष पुरविलें आहे, काळजी नसावी.

तुमच्या सांगण्याप्रमाणे जाग्रणें फार करीत नाही. सकाळीं दूध घेतों व संध्याकाळीं खेळावयास जातों. पुढील महिन्यांत दोन महिन्यांची फी व परीक्षा-फी भरावी लागेल. वसतिगृहाची फी नेहमीप्रमाणेच आहे. पहिल्या आठवड्या-पर्यंत आपली मनीऑर्डर येईलच.

हेंच पत्रीं ती. सौ. आईस साष्टांग नमस्कार, प्रभाकर दादास सा. न. व चि. चंदूस अनेक आशीर्वाद. कळावें,

आपला आशाधारक
मधुकर



TO

FROM (किंवा)
प्रेषक—

म. बा. जोशी
गणपती गल्ली,
जोशी वाडा,
जालना.

श्री. बा. रं. जोशी,
५२८ नेहरू चौक,
अंबड, ता. जालना,
जि. औरंगाबाद.
AMBAD

वैशिष्ट्यें—

(१) पत्रांत शिरोभागीं ॥ श्री ॥ हा मंगलवाचक शब्द आहे. असें लिहिण्यांतील सांस्कृतिक भाग चिंतनीय आहे. असें लिहिल्यानें पत्रांतील कुशल सूचित होतें. ॥ श्री ॥ प्रमाणेच ॐ, श्री गजानन प्रसन्न, कुलस्वामिनी प्रसन्न, आणि अलीकडे जयहिंद, वंदेमातरम्, जयभारत असेंहि आपापल्या आवडीनुसार लिहितात. पूर्वी व अजूनहि कांही जुनी वृद्ध मंडळी पत्राच्या शिरोभागीं 'क्षेम' लिहितांना दिसतात. सामान्यतः पत्रांत कांही अशुभ असलें तर कांहीच मंगलवाचक लिहीत नाहीत. अशुभ पत्रांच्या कडांना जाड काळ्या रेषांची षौकट मारण्याचीहि एक नवी पद्धत रूढ होऊं पाहते आहे.

(२) पत्र लिहिण्यास सुरवात करण्यापूर्वी लेखकाने पत्राच्या वरच्या उजव्या हाताला स्वतःचें संपूर्ण नांव, सध्याचा संपूर्ण पत्ता व दिनांक वा गोष्टी

आवर्जून लिहिल्या आहेत. पत्ता लिहितांना विरामचिन्हें कशीं लिहिलीं आहेत तीं पाहा. पत्रलेखन बिनचूक व्हावयाचें म्हणजे हें सारें अवधानपूर्वक लिहिलें पाहिजेच. ज्याला आपण पत्र लिहितो त्याला आपला सध्याचा पत्ता माहीत असेलच असें नाही. आपल्या पत्रांतून त्याला आपला पत्ता समजलाच नाही, तर तो त्याला उत्तर कसें पाठविणार! स्मरणावर विसंबून पत्ते लिहिण्याने साराच पत्रव्यवहार गोंधळाचा व त्रासदायक होत असतो. तसेंच तारखेचेंहि आहे. आपल्या पत्राचें उत्तर लिहितांना तो तें कोणत्या तारखेचें आहे हें प्रथम पाहणार! सारांश, आपला सध्याचा पत्ता व पत्रलेखनाचा दिनांक हे पत्राच्या स्वरूपांतील आवश्यक भाग आहेत.

(३) हें पत्र परगांवीं शिक्षणासाठीं असलेल्या मुलाने आपल्या वडिलास लिहिलें आहे. पत्रांत त्याला आपली खुशाली व परीक्षेची तयारी घरीं कळवायची आहे. सुरवातीस त्याने "तीर्थरूप बाबास कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विनंती विशेष" असें लिहिलें आहे. या अभिवादनास 'मायना' असें म्हणतात. निरनिराळ्या व्यक्तींना पत्रे लिहिताना त्यांच्या योग्यतेनुसार नमस्कार वगैरे लिहिण्याच्या शिष्टाचारास 'मायना' असें म्हणतात.

पत्राचा शेवट करताना घरातील सर्व मंडळींना आठवणीने व आवर्जून वयपरत्वे नमस्कार, आशीर्वाद लिहिले आहेत. त्यांत पत्रलेखकाचें सुसंस्कृत मन, कौटुंबिक ओढ व्यक्त होते. गोष्टी साध्या असतात पण त्या पाळाव्या लागतात. आपली संस्कृति अशा अनेक छोट्यामोठ्या गोष्टींनी बनली आहे. पत्र संपविताना हें लिहिलेंच नाही तर एक प्रकारची बेफिकिरी, आळस व अशिष्टपणा जाणवून कदाचित् आपल्यावर कृतघ्नतेचा, व्यवहारशून्यतेचा शिक्का बसण्याची दाट शक्यता असते.

(४) पत्राचा मधील मजकूर किती मुद्देसूद लिहिला आहे; वडिलांच्या कोणत्या पत्रास आपण उत्तर लिहित आहोंत; आपल्या पत्रांतून त्यांना कोणत्या खुलाशाची अपेक्षा आहे याची आठवण ठेवून इतर अनावश्यक गोष्टी लिहीत न बसतां मुख्य गोष्टीच कळविल्या आहेत. मागील वर्षी गणिताकडे दुर्लक्ष झाल्याचें प्रांजलपणें कबूल केलें आहे. आपला दररोजचा जीवनक्रम आडपडदा न ठेवता कळविला आहे. असे व्यवस्थित व जिव्हाळ्याचें पत्रोत्तर वाचतांना मधुकरच्या वडिलांना केवढें समाधान वाटेल!..

शेवटीं आपली सही करतानां 'आपला आज्ञाधारक, मधुकर' असें विनम्रतेने लिहिलें आहे. या नम्रतेचाहि फार मोठा परिणाम वाचकाच्या

मनावर होत असतो. ज्या व्यक्तीस आपण पत्र लिहितो तिच्या वय, अधिकार, योग्यतेनुसार तिचे व आपले संबंध व्यक्त होतील अशा तऱ्हेने ही सही करावी लागते.

निष्कर्ष—

(१) पत्राच्या शिरोभागी मंगलवाचक शब्द लिहावा.

(२) पत्राच्या वरच्या उजव्या भागी आपलें नांव, आपला सध्याचा पत्ता व पत्रलेखनाचा दिनांक न विसरतां लिहावा.

(३) पत्राचा प्रारंभ म्हणजे मर्यादशील मायना.

(४) पत्राचा मध्य म्हणजे कळवावयाच्या गोष्टींचा नेमका, सुस्पष्ट खुलासा. या खुलाशांतून जिव्हाळा, मनमोकळेपणा असावा.

(५) अखेर म्हणजे नम्रतापूर्वक निरोप घेणें. पत्रवाचकाचे व आपले कौटुंबिक हितसंबंध अगर प्रेमसंबंध अगत्यपूर्वक सूचित होतील, अशा रीतीने पत्रवाचकाच्या संबंधित कुटुंबीय मंडळींना स्मरणपूर्वक नमस्कार व आशीर्वाद लिहिणें श्रेयस्कर असतें.

(६) पत्राखाली सही करतांना आपले संबंध सूचित होतील असें लिहून सही व आवश्यक तेथे पूर्ण नांव लिहावें. यांत आपलें घरगुती नांव व व्यावहारिक नांव प्रसंगानुसार लिहिणें. परीक्षेत मात्र पत्राचा प्रश्न सोडवितांना आपण जें पत्र लिहूं त्याखाली आपलें खरें नांव लिहावयाचें नाहीं असा नियम आहे. तेथें सहीदाखल 'क्ष' 'अ च क' असें किंवा एखादें काल्पनिक नांव लिहावें हें बरें !

(७) पत्रावर पत्ता लिहितांना स्मरणावर विसंबून कधीहि लिहूं नये. ज्याला पत्र लिहावयाचें त्याचें घरगुती नांव पत्त्यांत येऊं नये. त्याच्या आडनांवापूर्वी त्याची आद्याक्षरें लिहून त्याचा सध्याचा पत्ता, गल्ली, घरमालकाच्या नांवासकट त्याच्या रहात्या घराचा, क्रमांकासकट उल्लेख करून मग गांव, तालुका, जिल्हा या गोष्टी बिनचूक लिहाव्यात. यामुळे पत्र लवकर पोंचते. उदा० —वरील नमुनापत्राखालील चौकटींत त्या पत्रावरील पत्ता दिला आहे तो पाहा.

आतां पुढील मायने व पत्रांचे शेवट स्मरणार्थ मननपूर्वक वाचा —

(१) वडिलांस—

१. आरंभ—(१) तीर्थरूप राजमान्य राजश्री बाबांस साष्टांग नमस्कार विनंती विशेष,

(२) ती. बाबांस कृतानेक। सविनय। सादर। वंदन। प्रणाम। नमस्कार। विनंती विशेष.

संक्षेप—(१) ती. बाबांस. कृ. सा. न. वि. वि.

(२) ती. बाबांस सा. न. वि. वि. वगैरे.

२. शेवट—(१) सेवेसीं श्रुत होय, हे विज्ञापना, कळावें, काळजी नसावी ही विनंती.

(२) कळावे ही, हे, विनंती. आशीर्वाद असावा, काळजी नसावी.

३. संबंधसूचक— आपला नम्र, आज्ञाधारक, विनीत, आज्ञांकित वगैरे.

(२) आईस—

आरंभ—(१) तीर्थरूप सौभाग्यवती आईस साष्टांग नमस्कार, विनंती विशेष। विज्ञापना विशेष.

(२) तीर्थरूप सौभाग्यवती आईस सप्रेम। सादर। सविनय, नमस्कार विनंती विशेष.

(३) आरंभ— आई विधवा असल्यास— तीर्थरूप श्रीमती आईस (गं. भा.—वगैरे आजकाल फारसें लिहीत नाहीत.) सप्रेम नमस्कार ... वगैरे.

संक्षेप— ती. सौ.। ती. श्रीमती। आईस, सा. न. वि. वि.। स. न. बि. वि. वगैरे.

२. शेवट— वरीलप्रमाणेंच.

३. संबंधसूचक—तुझा मुलगा। तुझा आज्ञाधारक। सदैव तुझाच, .. बगैरे.

(३) आईवडिलांखेरीज इतर वयानें थोर नातलगांस—

(१) आरंभ— तीर्थस्वरूप... (सर्व थोर आप्तांसाठीं)..... कृ. सा. न. वि. वि.... वगैरे.

(२) शेवट—वरीलप्रमाणेच.

(३) संबंधसूचक—आपला नम्र। आज्ञाधारक। वगैरे वरीलप्रमाणेच.

(४) आपल्यापेक्षा वयानें लहान भावंडांना—

१. आरंभ—(१) चिरंजीव...यास...चे अनेक आशीर्वाद उपरी.
(२) चिरंजीव...हीस...अनेक आशीर्वाद...
(३) चिरंजीव...सप्रेम नमस्कार वगैरे.

संक्षेप—चि... स. न. अनेक आशीर्वाद.

२. शेवट—(१) कळावें, प्रकृतीस सांभाळून असावे । पत्रोत्तर वेळच्या वेळीं देण्याचें करावें । नियमित पत्रें लिहावींत, वगैरे.

३. संबंधसूचक—तुझा... । सदैव तुझाच । प्रेमळ वगैरे.

(५) मित्रास—

१. आरंभ—मित्रवर्य राजमान्य राजश्री । प्रिय मित्र । प्रिय सुहृद । प्रिय ...घरगुती नांव । सप्रेम नमस्कार...विनंती विशेष.

संक्षेप—प्रिय...स. न. वि. वि.

२. शेवट—कळावें, लोभ आहेच, वृद्धी व्हावी, अधिक काय लिहूं ? असाच लोभ असावा । लोभवृद्धि व्हावी, वगैरे.

३. संबंधसूचक—(१) आपला मित्र । स्नेहांकित । स्नेहाकांक्षी । स्नेहाभिलाषी वगैरे.

(६) इतर सद्गृहस्थास (परिचितांपैकी)

१. आरंभ—श्री. राजमान्य राजश्री । श्रीयुत.. (घरगुती नांव) सा. न. वि. वि. स. न. वि. वि,

२. शेवट—आपला,...वरील थोर मंडळींना लिहावयाच्या पत्रांच्या शेवटाप्रमाणेच वगैरे.

(२) नैमित्तिक किंवा औपचारिक पत्रें—

विशेष निमित्ताने लिहावयाचीं पत्रें म्हणजे औपचारिक पत्रें. यांचे स्थूलमानाने खालील प्रकार पडतात.

(१) अभिनंदन, सांत्वन, निमंत्रण, आभारदर्शक.

(२) उद्योगधंद्यानिमित्त—दुकानदार-बहुविध उद्योगधंद्यांतील धंदेबाइकांना विशेष कामानिमित्त पत्रें. उदा०— हव्या असलेल्या मालाची ऑर्डर

देणें, पोंचलेल्या मालाची पोंच, थकबाकीची मागणी. खरेदी केलेल्या माला-विषयीं कांही तक्रार.

(३) वैयक्तिक कामानिमित्त— रजा, नोकरीचे अर्ज, आपली विशिष्ट मागणी सुचविचारें विनंतीपत्र, वर्तमानपत्रांतून एखादें सूचनापत्र अगर बातमीपत्र,.. निरनिराळ्या खात्यांच्या अधिकारीवर्गाशीं विशेष कारणाने केला जाणारा पत्रव्यवहार.

आणखीहि खोलांत जाऊन आणखी पोटभेद दाखवितां येतील. मुख्यतः या पत्रांचें स्वरूप कसें असतें, कसें असावें हें येथे पाहावयाचें आहे.

स्वरूप— अनौपचारिक पत्राप्रमाणें यांत मनमोकळेपणा, स्वैरपणा, कौटुंबिक उल्लेख हें येऊन चालणार नाही. निव्वळ व्यावहारिक काटेकोरपणा व सुस्पष्ट विवेचन आवश्यक आहे. मजकूर नीटनेटका, स्थलकालाच्या मर्यादा पाळून आटोपशीर लिहावा. खालील कांही नमुने पाहा.

(१) अभिनंदनपर पत्र—

रमेश नागोराव कुलकर्णी,
८४० सहस्रबुद्धे वाडा,
औरंगापुरा;
औरंगाबाद.
दिनांक ८–६–३१

मित्रवर्य, कांतराव पळशीकर, ह्यांस सप्रेम नमस्कार, वि. वि.

कालच बी. ए. चे निकाल वृत्तपत्रांतून पाहण्यांत आले. प्रथमश्रेणीच्या हातावर मोजण्याइतक्या निवडक क्रमांकांत तुझा क्रमांक झळकतांना पाहून किती आनंद झाला हें शब्दांनी नीटसें लिहितां येत नाही. आपल्याला इतक्या विद्वान् मित्राची देणगी ईश्वराने दिली या साभिमान जाणिवेच्या आनंदांत कालचा दिवस डुंबत होता. कांता, मनपूर्वक अभिनंदन करतों. भावी जीवनांतहि असेंच उज्वल यश तुला लाभो हीच सदिच्छा. पुढील भेटींत या घवघवीत सुयशाबद्दल जंगी मेजवानी दिली पाहिजे हं ! पत्रोत्तर यावें ही विनंती.

हेंच पत्रीं श्री. काकासाहेब पळशीकरांस व तुझ्या सौ. मातोश्रीस स. न. तुझ्या भावंडांस अनेक उत्तम आशीर्वाद. कळावें ही विनंती.

सदैव तुझा मित्र,
रमेश.

हें अभिनंदनपर पत्र आहे. मित्राच्या सुयशाने झालेला आनंद पत्रांतून व्यक्त झाला आहे. अशीं अभिनंदनाचीं पत्रें लिहिणें हें एक प्रेमळ कर्तव्यच असतें. आपलें पत्र मिळतांच आपल्या यशस्वी मित्राचा आनंद शतगुणित होईल. कल्पना करा, आपण परीक्षेंत यशस्वी झालों आणि अशीं पत्रें आपणांस आलीं नाहींत तर आपल्याला काय वाटेल ! ही एक देवाण-घेवाण असते.

हें पत्र नैमित्तिक आहे. पण तें मित्रास लिहिलें आहे तेव्हां त्यांत दिसून येणारा मनमोकळेपणा व अल्पसा घरगुतीपणा जितका क्षम्य तितकाच आवश्यक आहे. तथापि अभिनंदन आणि शुभेच्छा यांखेरीज अन्य मजकूर त्यांत डोकावतां कामा नये. या पत्रांतील प्रारंभ, मध्य, शेवट व अखेरची संबंधदर्शक सेंही हें सारें व्यवस्थित आहे.

(२) सांत्वनपर पत्र—

रमेश आपटे.
बुरलीधर निवास,
स्टेशन रोड, परभणी.
१२–६–६१.

प्रिय सुहृद, रत्नाकर बाजीराव जोशी.

काल एम्. ए. चा रिझल्ट पाहिला. त्यांत तुझा क्रमांक दिसला नाहीं. आश्चर्यपूर्वक खेद वाटला. असो, जें झालें त्याला उपाय नाहीं. तूं किती कसून अभ्यास केला होतास तें मी जाणतों. दैवानें साथ दिली नाहीं त्याला तूं काय करणार ? विनंती एवढीच की, या अपयशाने नाउमेद होऊन खचून जाऊं नये. पुढील वर्षी पुन्हा एकदा प्रयत्न करून या अपयशाचा वचपा काढणें. तसा तूं काढशीलहि याची मला खात्री आहे. अपयशाने मानसिक व शारीरिक त्रास करून घेऊं नये हें आवर्जून सांगतों. पत्रोत्तर यावें. सर्वत्रांस स. न. कळावें ही विनंती.

तुझा स्नेहांकित,
रमेश.

या सांत्वनपर पत्रांत परीक्षेंत अनुत्तीर्ण झालेल्या मित्रास नाउमेद न होण्याविषयी दिलासा द्यावयाचा आहे. अशा सांत्वनपर पत्रांत नसता उपदेश व तत्त्वज्ञान सांगण्याचा मोह टाळावा. " एम्. ए. चा नाद सोडून बी. टी. ला जावें " वगैरे भलतें वाक्य लिहिलें तर आगींत तेल पडण्याचेच परिणाम होणार. ज्याचें सांत्वन करायचें त्याच्या दुःखाशीं सहभागी असल्याचें वातावरण पत्रांत निर्माण व्हावें.

(३) रजेकरिता अर्ज—

नारायण भाऊराव शिंदे,
सरकारी वसतीगृह,
खोली क्र. ३३
जालना

माननीय वर्गशिक्षक ११ वी अ ह्यास विनंती अर्ज करतों की, काल संध्याकाळपासून माझी प्रकृती अचानक बिघडली. रात्री खूप तापहि भरला होता. आज खूप अशक्तता आली असून विश्रांतीची फार आवश्यकता आहे, असें डॉ. श्री. थत्ते यांचें म्हणणें आहे. तेव्हां कृपावंत होऊन माझी आजपासून तीन दिवसांची रजा मंजूर करावी. या तीन दिवसांतील मागे पडलेला अभ्यास मी निश्चित पुरा करीन. तसदीबद्दल क्षमस्व.

आपला
कृपाकांक्षी विद्यार्थी
नारायण शिंदे
११ वी. अ.
क्रमांक ४
दि. १२-२-६१

हा रजेचा अर्ज आहे. रजेचें निश्चित कारण, रजेच्या आवश्यकतेबद्दलची सबळ कारणें, रजेच्या काळांतील बुडणाऱ्या अभ्यासाविषयीची काळजी, वर्ग-शिक्षकांस लिहितांना पाळलेली आदराची वृत्ति, आजारपणांतहि वसतीगृहांतील खोली क्रमांक, वर्गातील क्रमांक व दिनांक लिहिण्याची घेतलेली खबरदारी या ह्या रजेच्या अर्जातील उल्लेखनीय गोष्टींचा अवश्य विचार करा.

(४) प्रवासखर्चाच्या सवलतीसंबंधी रेल्वे अधिकाऱ्यास विनंती–अर्ज

मल्टिपर्पज हायस्कूल,
लातूर,
दि. २० सप्टेंबर, ६२

माननीय रेल्वे विभागाधिकारी ह्यांस,

या दिवाळीच्या सुटींत आमच्या हायस्कूलमधील आम्ही इयत्ता १० बी 'ब' चे कांही व ११ वी–'अ' 'ब' चे कांही विद्यार्थी असे जवळ जवळ १५० विद्यार्थी दिल्लीची सफर करणार आहोंत. या प्रवासांत कांही आणखी

प्रेक्षणीय स्थळें पाहण्याची व आमच्या ज्ञानांत भर घालण्याची आमची मनीषा आहे. या लांबवरच्या प्रवासाचा खर्च आम्हापैकीं बऱ्याचजणांना झेपणार नाही. तरी नम्र विनंती की, आपणांकडून आम्हांस तिकिटखर्चांत कांही सवलत मिळावी. तसेच या सवलतीच्या दरांची जी नियमावली असेल तिचीहि एक प्रत आम्हांस माहितीसाठी पाठवावी. आपल्या कृपापत्रावर आमची ही प्रवास-योजना आम्ही अवलंबून ठेवली आहे. या अर्जाचें अनुकूल व सहानुभूतीपूर्वक उत्तर येईल अशी आशा आहे. तसदीबद्दल क्षमस्व.

आपले अर्जदार,

१ विजयकुमार सोनार.
२ गंगाधर जटाळे.
३ शरद कामतीकर.
४ सय्यद महंमुदअली.
५ हशम अबदुलनबी.

चिटणीस–सहल विभाग,
मल्टिपर्पज हायस्कूल
लातूर.

या विनंती–अर्जाचा मायना, सहलीची रूपरेषा, एकंदर नम्रतेची भाषा, अर्जाखालील अर्जदारांच्या सह्या ह्या विशेष गोष्टी लक्षांत घ्या.

(५) जवाहर मार्केटमध्ये सायकल–स्टँड असण्याबद्दल नगराध्यक्षांस नागरिकांचा विनंती–अर्ज

अहमदनगर,
दि. १५–४–६२.

माननीय नगराध्यक्ष,

अहमदनगर नगरपालिका,

महोदय,

अर्जास कारण कीं, नगरचा भाजीबाजार आपण पुष्कळच अद्यावत् केला आहे. परंतु आमच्या अनुभवांवरून त्यांत आणखी एक सुधारणा सुचवावीशी वाटते. ही सुधारणा म्हणजे या बाजारांत एक सायकल–स्टँड असणें.

भाजीबाजारांत येणारे कित्येक नागरिक सायकली घेऊन बाजारास येतात. सायकल-स्टँडची सोय नसल्याने बाजारांतील गर्दीत सायकलींची भर पडते. भरगर्दीत सायकली आडव्या येतात. येणाऱ्याजाणाऱ्या व बाजार उरकण्याची घाई असणाऱ्यांना सायकलींचे धक्के खावे लागतात. एकंदर मोठी गैरसोय होते.

सबब, नम्र सूचना की, जवाहरमार्केटच्या पिछाडीस असणाऱ्या मोकळ्या जागेंत सुमारें ५० सायकली व्यवस्थितपणें व सुरक्षित उभ्या राहतील असा मजबूत सायकलस्टँड नगरपालिकेनें बांधावा. सायकल-चोरांपासून संरक्षण मिळावें म्हणून या स्टँडवर एखाद्या जबाबदार नोकराची नेमणूकहि करावी. यामुळे मार्केटमधील सुखसोय व शिस्त यांत निश्चित भर पडेल असें आम्हांस खात्रीपूर्वक वाटतें. सदर विनंती-अर्जाचें पालिकेकडून पूर्ण विचारांती योग्य तें उत्तर मिळेल अशी आशा आहे.

आपले

कृपाकांक्षी अर्जदार,

(१) रावसाहेब सोनवणे.

(२) सांवता फुलारी.

(३) महादु रामजी वाघमारे.

व इतर अनेक— वॉर्ड नंबर २५

तोफखाना,

मु. अहमदनगर.

प्रस्तुत अर्जांत नागरिकांची मागणी सबळ कारणानिशीं सादर करण्यांत आली आहे. मागणीची भाषा अर्थातच नम्र. कित्येकदां अशा स्वरूपांच्या अर्जांत कांही पक्षनिष्ठ पूर्वग्रह व आग्रहीपणा येतो. तो अर्जाच्या निर्णयास निश्चित विघातक. या अर्जांत "नागरिकांकडून भरमसाट कर गिळंकृत करून नगरपालिकेने गरीब जनतेसाठी काय केलें? ह्या विनंतीची तावडतोब अंमलबजावणी व्हावी, नाहीपेक्षा पुढील निवडणुकांत तुमची-आमची गांठ आहेच" अशी वृथा दमदाटीची भाषा वापरण्याचा मोह या अर्जदारांना झाला असता तर? तात्पर्य, उद्या जबाबदार नागरिक होणाऱ्या आजच्या विद्यार्थ्यांनीं या गोष्टीचा आत्तापासून इशारा घ्यावा. 'सक्तीची भाषा वापरून कामें होत नसतात तर कामें नासतात!' आपल्या अर्जास जनमताचा पाठिंबा आहे हें सिद्ध करण्यासाठी आणखी कांही नागरिकांच्याहि सह्या अर्जावर घेण्याची दक्षता अर्जदारांनीं घेतली आहे.

(६) नोकरीसाठी अर्ज—

अंबादास एकनाथ गायकवाड,
नळगल्ली, सेलू.
दि. १–८–६१

मॅनेजर, सहकारी साखरकारखाना,
साखरनगर, जि. पुणें, ह्मांशी.

सा. न. वि. वि.

दि. २४–७ च्या दैनिक 'अजिंठा' मध्यें आपल्या कारखान्यांत एका कारकुनाची नेमणूक करावयाची आहे अशी जाहिरात वाचण्यांत आली. त्या जागेसाठी मी अर्ज करीत आहे. माझी वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे आहे.

नांव—गायकवाड अंबादास एकनाथ

वय—२०. शैक्षणिक पात्रता :– शालान्त परीक्षा बोर्डाची ११ वी ची परीक्षा उत्तीर्ण, हिंदी आणि ड्रॉईंगच्या परीक्षांत उत्तीर्ण. मी इंग्रजी, मराठी व हिंदी या भाषा चांगल्या तऱ्हेने लिहूं व वाचूं शकतों. तसेच शॉर्टहँड व टायपिंगचा कोर्सहि मी पूर्ण केला आहे.

उमेदवारासंबंधीच्या आपल्या अटी मी पूर्ण करीत असल्याने माझ्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार होईल आणि माझा अर्जाचा निर्णयहि योग्य कालावधींत कळविला जाईल अशी आशा आहे. आपल्या कारखान्याची सेवा करण्याची संधि मला मिळाली तर मी समाधानकारक काम करीन अशी ग्वाही देतो. या अर्जासोबत खालील शिफारसपत्रांच्या अस्सल नकला जोडीत आहे. शिफारसपत्रांच्या मूळ प्रति मुलाखतीच्या वेळीं सादर करीन. कळावें ही विनंती.

आपला नम्र,
अंबादास एकनाथ गायकवाड.

सोबत जोडलेले कागदपत्र :—

(१) शालान्त परीक्षामंडळाचें प्रमाणपत्र.
(२) शालान्त परीक्षेचे गुणपत्र.
(३) हिंदी परीक्षामंडळाचें प्रमाणपत्र.
(४) ड्रॉईंग परीक्षेचें गुणपत्र.

(५) टंकलेखनाच्या परीक्षेचें प्रमाणपत्र.
(६) माझ्या शाळेच्या मुख्याध्यापकांचें सद्वर्तनाबद्दलचें शिफारसपत्र.
(७) आमदार श्री. देशपांडे, वकील व तहसीलदार श्री. गणेशराव यांचीं सद्वर्तनासंबंधी शिफारसपत्रें.

हा अर्ज एका जाहिरातीचें उत्तर आहे. अर्ज करूं इच्छिणाऱ्या उमेदवारांनीं निश्चितपणे कोणती माहिती अर्जांत पुरवावी ह्याचा स्पष्ट उल्लेख जाहिरातीमध्ये असतो. तेवढीच माहिती बिनचूक व क्रमवार अर्जांत लिहावी लागते. वय, परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या तारखा, शिफारसपत्रांच्या अस्सल नकला, निरनिराळ्या परीक्षांचीं दाखल केलेलीं गुणपत्रकें या सर्वांत कोणताहि संदिग्धपणा असून भागत नाही. अर्जांत विनंती असावी पण गयावया करून केलेली याचना नसावी. अर्ज स्वहस्ताक्षरांत असेल तर सुवाच्य अक्षरांत लिहावा. टंकलिखित असेल तर पाठविण्यापूर्वी एकदोनदां तपासून पाहिलेला असावा. अर्जांतसुद्धा मुद्याप्रमाणे परिच्छेदरचना असावी. अर्ज पाठवितांना बिनचूक पत्ता लिहावा. निर्दोष अर्ज म्हणजे निम्मी सहानुभूति मिळावितें.

(७) वाचनालयासाठी हव्या असणाऱ्या पुस्तकांची ऑर्डर देणें

यशवंत बहुउद्देशीय विद्यालय,
रांजणी,
दि. १–८–६२.

मेसर्स जोशी आणि लोखंडे,

प्रतिभा मुद्रणालय, पुणें २ यांस, स. न. वि. वि.

आमच्या विद्यालयाच्या वाचनालयासाठी पुढील पुस्तकें व्ही. पी. पार्सलने पाठविण्याची कृपा करावी. त्याचप्रमाणे आपल्या नव्या प्रकाशनांचीं माहितीपत्रकेंहि सोबत पाठवावींत.

(१) प्राचीन भारतीय कला	...	४ प्रती
(२) भारतीय लोकसत्ता	...	४ प्रती
(३) राष्ट्रनायक नेहरू	...	४ प्रती
(४) नाटककार गडकरी	...	२ प्रती
(५) महाराष्ट्र-जीवन, भाग १ व २	..	प्रत्येकीं ४ प्रती
(६) नवमहाराष्ट्रांतील विचारप्रवाह–माला	...	२ प्रती
(७) महाराष्ट्रांतील वाङ्मयीन प्रवाह	...	२ प्रती

(८) प्राचीन भारतीय संस्कृतीचा इतिहास	...	२ प्रती
(९) मानसशास्त्राचीं मूलतत्त्वें	...	२ प्रती
(१०) आधुनिक अर्थशास्त्र	...	२ प्रती
(११) शिक्षणशास्त्र	...	४ प्रती
(१२) शालेय रंगभूमि	...	३ प्रती
(१३) मराठीरूपदर्शन	...	२५ प्रती
(१४) मराठी अते आमुची मायबोली ५ वी, ६ वी, ७ वी	...	प्रत्येकीं २५ प्रती
(१५) शेतीशास्त्र	...	५ प्रती

आपल्या रिवाजाप्रमाणे वरील पुस्तकांच्या किंमतीवर आपण कमिशन द्यालच. परंतु कांही विशेष सवलत दिल्यास आमच्या वाचनालयास उत्तेजन मिळेल.

कळावें, लोभ असावा, ही विनंती.

पुस्तकें पाठविण्याचा पत्ता
श्री. मुख्याध्यापक,
यशवंत बहुउद्देशीय विद्यालय.
रांजणी, जि. औरंगाबाद.

आपला
प्रभाकर महादेव देशपांडे
ग्रंथपाल.
(मुख्याध्यापकाकरितां)

कोणत्याहि मालाची ऑर्डर देतांना बाजारपेठेची व माल पाठविण्याच्या पद्धतींची संपूर्ण माहिती असणें महत्त्वाचें आहे. ऑर्डरमध्ये ह्व्या असलेल्या वस्तूंची निश्चित आंकडेवारी, ऑर्डरींत नोंदविलेल्या मालाची/वस्तूंची. पोंच कशी स्वीकारली जाईल, कमिशनची वगैरे अपेक्षा आहे काय या बाबींचा स्पष्ट खुलासा असावा.

(८) वर्तमानपत्रांस तक्रारपत्र.

समाजहिताच्या दृष्टीने कांही वेळां वर्तमानपत्रांतून कांही तक्रारींना तोंड फोडणें आवश्यक होतें. वृत्तपत्रांतील स्थलकालाच्या मर्यादा लक्षांत ठेवून. हीं पत्रें अत्यंत मोजक्या शब्दांत लिहावयाचीं असतात. हीं पत्रें पाठवितांना त्यांना वर्तमानपत्रांत योग्य तें स्थान त्वरित मिळावें म्हणून तक्रारपत्रासोबत संपादकास एक विनंतीपत्रहि जोडावयाचें असतें. त्याचा नमुना असा.

द. स. गोडबोले,
४५३८ कसबा,
आझादनगर,
दि. ११-९-६२.

(अ) श्री. संपादक महाशय, 'लोकसत्ता' मुंबई यांसी—

स. न. वि. वि.

सोबतच्या तक्रारपत्रास समाजहिताच्या दृष्टीने आपल्या वृत्तपत्रांत योग्य ती प्रसिद्धी द्यावी ही विनंती. सदर पत्र 'एक नागरिक' या नांवाने प्रसिद्ध व्हावें अशी माझी इच्छा आहे. माझें संपूर्ण नांव व पत्ता वर दिला आहेच. कळावें ही विनंती.

आपला नम्र
र. स. गोडबोले.
आझादनगर.

(ब) तक्रारपत्र...

आझाद नगरांत बेवारशी कुत्र्यांचा सुळसुळाट.

गेल्या चार महिन्यांपासून आझादनगरांत बेवारशी कुत्र्यांचा भयंकर सुळसुळाट झाला आहे. हीं कुत्रीं व त्यांचीं पिलें हमरस्त्यावरून, गल्लीबोळांतून स्वैर हिंडत असतात. यांत कांही पिसाळलेलीं कुत्रीं आहेत, कांही लूत भरलेलीं रोगट कुत्रीं आहेत. दिवसा येणारा-जाणाऱ्यांच्या अंगावर भुंकणें, रहदारीस अडथळा करणें, कुणाच्याहि घरांत शिरणें असा त्यांचा उपद्रव सतत चालू असतो. रात्रीं १२ नंतर गांवांतील विजेचे दिवे बंद असतात. मध्यरात्रीं एक व पहाटे एक अशा दोन गाड्या स्टेशनवर येतात. मध्यरात्रीनंतर चित्रपट सुटतात. या अंधारांत स्टेशनवरून गांवांत येणाऱ्या जनतेचे आणि चित्रपट पाहून आनंदाने घरोघर परतणाऱ्या नागरिकांचे या कुत्र्यांमुळे फार हाल होतात. थोडी चाहूल लागली कीं हीं कुत्रीं एकसुरांत तारस्वरांत किंचाळूं लागतात. पहाटेचा भोंगा झाला, कीं दचकलेली ही श्वानजनता भयानक आवाजांत विव्हळूं लागते. तें विव्हळणें भारी अभद्र वाटतें. तिन्हाइताच्या मागे धावणें व कित्येकांना चावणें हें तर रोजचेंच झालें आहे. या त्रासामुळे गांवांतील प्रत्येकजण त्रासून गेला आहे. फक्त पाळीव कुत्रीं सोडून या बेवारशी कुत्र्यांना विषारी गोळ्या घालून ठार मारण्याचें समाजहिताचें कार्य नागरिकांच्या हिताच्या गप्पा मारणारी नगरपालिका अजून सुरूं कशी करीत नाहीं याचें आश्चर्य वाटतें. एकीकडे उद्यानें, बीजपुरवठा, पाणीपुरवठा, खुलीं नाट्यगृहें वगैरे सुधारणा करणाऱ्या नगर-पित्यांच्या लक्षांत हा उपद्रव कसा येऊं नये! खरोखर 'सुधारणा नको पण कुत्रीं आवर' अशी आझादनगरवासीयांची स्थिति झाली आहे. आतां तरी नगर-पालिका या तक्रारीची योग्य ती दाद घेईल अशी आशा आहे.

— एक नागरिक.

पत्रलेखन–एक कला–

तंत्रशुद्ध पत्रलेखन करतां येणें यांत एक कलात्मक आनंद आहे. वर दिलेल्या विविध पत्रांतून जीवनाचें विविधरंगी दर्शन होतें आहे. हा पत्रव्यवहार अनेक व्यक्तींनी अनेक कारणांनी केला आहे. त्या त्या कारणांनुसार आणखी त्या त्या व्यक्तीनुसार पत्रांतील भाषा भिन्न भिन्न झाली आहे. विशेषतः अनौपचारिक पत्रांतून तीं लिहिणारांचें व्यक्तित्व प्रकट होतें. औपचारिक पत्रांतून त्या लेखकांची व्यावसायिक व सामाजिक दृष्टी कळून येते. पत्रें म्हणजे निम्मी भेटच होय, हें वरील अनौपचारिक पत्रांतील जिव्हाळा, मनमोकळेपणा व परस्परांविषयींची ओढ यामुळें भावनात्मक रीतीने सिद्ध होतें.

निबंधलेखनाच्या पूर्वतयारीसाठी सांगितलेल्या वैचारिक व भाषेच्या जोपासनेने अशीं पत्रें तुम्हालाहि लिहितां येतील. त्याचप्रमाणें तंत्रशुद्ध पत्रलेखनाचें तंत्र तुम्ही माहीत करून घेतलें पाहिजे. "कलावस्तूचें तंत्र खरें पाहतां तिच्या अंगाखांद्यावरच असतें. तिच्याकडे नीट न्याहाळून पुनःपुन्हा पाहावें म्हणजे तें कोणी न सांगतां आपल्याला दिसूं लागतें. गोष्टींच्या तंत्रावरील सर्वोत्कृष्ट पुस्तक म्हणजे त्या गोष्टीच." प्रो. फडके यांच्या या यथार्थ विधानांत अगदीं थोडा बदल करून पत्रांच्या बाबतींत असेंच म्हणतां येईल कीं, "पत्रांचें सर्वोत्कृष्ट तंत्र म्हणजे तीं पत्रेंच."

प्रत्यक्ष जीवनांत इष्टमित्रांच्या, आप्तमंडळींच्या भेटीगांठी फार थोड्या होतात. त्यांतूनहि हे स्नेहसंबंध ताजे ठेवायचे, वाढते ठेवायचे म्हणजे पत्रलेखनाइतकें दुसरें प्रभावी साधन नाही. खास पत्रलेखनांसाठी निराळा सुंदर, दर्जेदार कागद वापरणें, सुवाच्य, सुंदर अक्षरांत ती रम्य व संग्राह्य होतील अशा हर्षेनें लिहिणें, आकर्षक लिफाफ्यांतून सुवाच्य व बिनचूक पत्त्यानिशी वक्तशीर त्या त्या व्यक्तींना पाठविणें व त्यांच्याकडून येणाऱ्या उत्तरांची उत्कंठेनें वाट पाहात राहणें यांत कांही कमी आनंद नाही. आपलीं पत्रें इतकीं भावस्पर्शी, अंतःस्पर्शी हवींत कीं, आपल्याकडून पत्रव्यवहारांत थोडा जरी विलंब झाला अगर खंड पडला कीं आपल्या संबंधित मंडळींना चुटपूट लागून त्यांना एक प्रकारची शंकाकूल अस्वस्थता यावी. पत्रमैत्रीचा छंद आपल्यापैकी कित्येकांनी जडवून घेतलेला असतो, तो या कलात्मक नि भावनारम्य आनंदाच्या प्राप्तीसाठीच.

पत्रें आणि ताजा कलम—

पत्र लिहून झाल्यानंतर एखादी गोष्ट आठवते. ती लिहावीशी वाटते. तशी ती लिहितांना मराठींत 'ताजा कलम' (संक्षेप—ता. क.) व इंग्रजींत

Post Script (P. S.) असें लिहितात. ताजा कलम या नंतरच्या लिहावयाच्या मजकुराविषयी येथे एवढेंच सांगतां येईल की, पत्र लिहिल्यानंतर कांही लिहावयाचें राहून गेलेलें आठवणें अगदी स्वाभाविक आहे. तथापि पत्रांत लिहावयाच्या मजकुराची संपूर्ण मुद्देसूद रूपरेखा, निश्चित पूर्वकल्पना आधीच मनाशीं योजिलेली असल्यास सहसा ताजा कलम लिहिण्याची पाळी येणार नाही. अनौपचारिक पत्रांत ता. क. लिहिणें एक वेळ क्षम्य. औपचारिक पत्रांत मात्र त्यायोगें पूर्ण विचारांतीं पत्र लिहिलें नाही असा वेंधळेपणाचा दोष पदरीं येण्याची शक्यता जास्त.

'ताजा कलम' या विषयावर प्रो. फडके यांनी 'ताजा कलम' ही एक ललितरम्य गुजगोष्ट (लघुनिबंध) लिहिली आहे. ह्या गुजगोष्टींत अनौपचारिक पत्रव्यवहारांतील ताज्या कलमाची काव्यात्म तरफदारी करतांना ते म्हणतात, "ताजा कलम" लिहिल्याशिवाय न राहवणाऱ्या या माणसांची मनोरचना मला मोठी मनोरंजक वाटते. मी त्या मनोरचनेचा जों जों विचार करतों तों तों मला अधिकाधिक असं वाटूं लागतं कीं, त्यांची विचारक्रियाच थोडीशी अव्यवस्थित असली पाहिजे. आपल्या पत्रांत अमुक इतक्या गोष्टी लिहायच्या आहेत हें पत्र लिहायला बसण्यापूर्वी त्यांना ठरवतांच येत नसलं पाहिजे. पत्राच्या खालीं सही केल्यावर मग त्यांना सुचतं कीं, अरेच्या, अमकी गोष्ट लिहायची राहिली. मायन्यापासून सहीपर्यंतच्या अवकाशांत व्यवस्थित अन् आटोपशीरपणे सुसंबद्ध पत्र लिहिणाराबद्दल मला आदर वाटतो. पत्राच्या अखेर एक किंवा अधिक 'ताजे कलम' लिहिणाऱ्या माणसांच्या स्वभावांत अव्यवस्थितपणा असला पाहिजे असा माझा ग्रह होतो. याचा अर्थ कोणत्याहि पत्रांत 'ताजा कलम' दिसल्याबरोबर मला त्या पत्राविषयीं अप्रियता वाटूं लागते असा मात्र नाही. उलट कांही पत्रं तर त्यांतल्या 'ताज्या कलमां'मुळे मला विशेष आवडतात. कारण, त्यांतल्या ताज्या कलमांना विसराळूपणाचा अगर अव्यवस्थितपणाचा दर्प येत नसून काव्यमय हृदयाचा सुगंध येत असतो. उदाहरणार्थ पुढील पत्र पाहाः—

"प्रिय अप्पासाहेब,

या वेळेस तुमच्या पत्राची तुम्ही मला नेहमीपेक्षा अधिक वाट पहायला लावलीत. तुम्ही किती कामांत होतां हें तुमच्या पत्रावरून मला आतां समजलं म्हणून मी आता तुमच्यावर रागावत नाही. तुम्ही म्हणतां तीं पुस्तकं वाचनमंदिरांतून आणून मी जरूर वाचीन. वाचनाच्या हौसेंत व्यत्यय आला कीं पुष्कळदा वाटतं मोठ्या शहरांत राहिलेलं अधिक बरं. याचा अर्थ मला इथे

राहण्याचा कंटाळा आला आहे असा मात्र करूं नका. शक्य तितकं आनंदित राहून मी इथं दिवस काढीत आहे. माझी प्रकृतीहि छान आहे. प्रवासाहून 'तुम्ही परत याल तेव्हां तुमच्या टेबलावर माझं मोठं पत्र खास हजर असेल तेव्हां आतापुरतां निरोप घेऊं काय?

ता. क. तुम्ही शिकवलेलं गाणं आतां दिलरुब्यावर चांगलं वाजवायला यायला लागलं आहे. पुढच्या भेटींत मी वाजवून दाखवीन."

पत्रांतल्या मुख्य मजकुरापेक्षांहि असल्या ताज्या कलमांतच अधिक अर्थ भरलेला असतो. जें मजकुरांत प्रगट झालेलं नसतं तें या ताज्या कलमांत नाजुकपणानं उघड केलेलें दिसतं. या ताज्या कलमांतला अभिप्राय असा स्पष्ट असतो कीं, पत्र लिहिणाऱ्या व्यक्तीला माझा निरोप घेणं कष्टदायक होत असून कांहींतरी मिषानं ती माझ्याशीं आणखी बोलत आहे.

आतां प्रो. वा. म. जोशी यांच्या 'इंदु काळे व सरला भोळे' ह्या पत्रात्मक कादंबरींतून उद्धृत केलेलें आणखी एक पत्र वाचा.

॥ श्री ॥

पाचबावडी

ता. १०-१२-२४

प्रिय मित्र भाऊराव काळे ह्यांस—

विनायकराव भोळे यांचा सा. न. वि. वि.

रात्रीच्या शाळेकरितां, सामाजिक कार्याकरितां आणि आमच्या खाजगी कार्याकरितां आपण जेवढे रुपये पाठविता तेवढे सगळे मी सामाजिक कार्यांत खर्च करून टाकतों, हा माझा कदाचित् दोष असेल पण ही खोड मेल्याशिवाय जायची नाहीं. कारण माझ्याभोवती मला इतकें दारिद्र्य दिसतें आणि मदतीची इतकी जरूरी भासते, की जवळ पैसे असतां ते पेटींत ठेवणें माझ्या जिवावर येते. माझ्यासारख्या वृत्तीच्या लोकांनीं आपण होऊन स्वीकारलेल्या दारिद्र्याच्या दीक्षेला सुसंगत वागावयाचें म्हणजे असेंच वागलें पाहिजे, नाहींतर गैरसमज होऊन "फंडगुंड"पणाचे आरोप येतील. सभोंवतालीं इतकं दारिद्र्य आणि आपत्ती पसरल्या आहेत कीं अनावश्यक सांपत्तिक सुखोपभोग घेणें मला पाप वाटतें.

तरीपण सुख व समाधान ह्या बाबतींत मी आणि सौ. दारिद्र्यांत खास नाहीं, हें माझ्या श्रीमंत आप्पासाहेबांना समजावून सांगावें, म्हणजे जांबयाच्या दारिद्र्याचे त्यांना दुःख होणार नाहीं.

सौभाग्यवतीची प्रकृती उत्तम आहे. ती मला हरतऱ्हेने सामाजिक व बौद्धिक कार्यांत मदत करते. ती खरी सहधर्मचारिणी आहे. छोटूला आपण श्रीमंती कपडे व अलंकार करूं शकत नाहीं याचेंच फक्त तिला वाईट वाटतें. स्त्रीहृदय हें असें आहे.

मी स्वतः छोटूचें बोट धरून त्याला बाजारांत वगैरे घेऊन जातों. लोक मला चमत्कारिक म्हणून हसतात. पण छोटूच्या आनंदपूर्ण हास्यापुढे लोकांच्या हसण्याची किंमत काय ! कळावें लोभ असावा, ही विनंती.

आपला,
विनायकराव भोळे

(वा. म. जोशी ह्यांच्या 'इंदू काळे व सरला भोळे' ह्या पत्रात्मक कादंबरींतून हें पत्र उद्धृत केलें आहे. दारिद्र्याचा वसा घेऊन सामाजिक कार्यास वाहून घेतलेल्या समाजसुधारकानें आपल्या मेव्हण्याला लिहिलेलें हें पत्र. खाजगी पत्राला आवश्यक असा निष्कपटी मोकळेपणा त्यांतून प्रतिबिंबित होतो आहे.)

स्वाध्याय

पुढील विषयांवर पत्रलेखन करा—

(१) उच्च शिक्षणासाठीं परदेशी जाणार असणाऱ्या मित्रास अभिनंदनपर पत्र.

(२) निवडणुकींत बहुमताने निवडून आलेल्या समाजसेवक मित्रास अभिनंदनपर पत्र.

(३) कथास्पर्धेंत यशस्वी झालेल्या लेखक मित्रास अभिनंदनपर पत्र.

(४) नाट्यस्पर्धेंत उत्कृष्ट अभिनयाबद्दल यशस्वी होऊन पारितोषिक मिळविणाऱ्या कलावंत मित्रास अभिनंदनपर पत्र.

(५) घरफोडी होऊन तुमच्या मित्राची/आत्याची/शेजाऱ्याची/चोरी झाली आहे, त्याला सांत्वनपर पत्र.

(६) आजारी असणाऱ्या मित्रास/आत्यास/सहकाऱ्यास/बहिणीस/आईस/बहिणीस/ समजुतीचें व उत्तेजनपर पत्र.

(७) अचानक आलेल्या पुराने बेघर झालेल्या दूरस्थ मित्रास/आप्तास पत्र.

(८) अपघाती मृत्यू पावलेल्या तुमच्या मित्राच्या मातापित्यांना सांत्वनपर पत्र.

(९) बेकार असणाऱ्या तुमच्या मित्रास/घाकटया भावास/वर्गमित्रास उत्तेजनपर पत्र.

(१०) वाढदिवसानिमित्त मित्रास / वरिष्ठ अधिकाऱ्यास / आप्तवर्गीयां पैकी एखाद्यास अभिनंदनपर पत्र.

(११) विवाहाबद्दल सहकाऱ्यास/मित्रास/आप्तास शुभेच्छादर्शक व अभिनंदनपर पत्र.

(१२) वसतिगृहांत राहून उनाडक्या करणाऱ्या भावंडास उपदेशपर पत्र.

(१३) येणाऱ्या पावसाळ्यांत घर न गळावें म्हणून आधींच शाकारणी वगैरे करून घेण्यासंबंधीं घरमालकास पत्र.

(१४) घरांत फार उंदीर झाले आहेत. पिंजरा व विषारी गोळ्या पुरविण्यासाठीं नगरपालिकेस पत्र.

(१५) तुमच्या शेजाऱ्याचा अनेक कारणांनीं तुम्हांस उपद्रव होतो, त्यास समज देण्याविषयीं घरमालकास विनंतीपत्र.

(१६) गल्लींत विजेच्या दिव्याची आवश्यकता असल्याचें वीजकंपनीस विनंतीपत्र.

(१७) पाण्याचा नळ कुठेंतरी फुटला आहे. त्याची दुरुस्ती करण्यासंबंधी नगरपालिकेस पत्र.

(१८) आजारीपणामुळे/वैयक्तिक कामाबद्दल/घरगुती मंगल कार्यासाठी/घरांतील दुःखद घटनेनें/वगैरे/रजा हवी आहे–वरिष्ठ अधिकाऱ्यास अर्ज.

(१९) तुम्हांला नोकरी हवी आहे/तुम्हांस हव्या त्या खात्याची जाहिरात वृत्तपत्रांत आली आहे. तिला उद्देशून नोकरीचा अर्ज.

(२०) परीक्षेच्या ऐन दिवसांत गांवांतील रेडिओ व लाऊडस्पीकर्सचा भयंकर त्रास होतो. त्यासंबंधी संबंधित अधिकारी/वृत्तपत्रांतून तक्रार/शेजारीच/गल्लींत असा रेडिओ अगर लाऊडस्पीकर असेल तर त्यांना सूचनावजा/विनंतीपत्र.

(२१) विवाहासाठीं एस्. टी. च्या गाड्या रिझर्व करण्यासंबंधी एस्. टी. अधिकाऱ्यास अर्ज.

(२२) तुम्ही दुकानदार आहांत. एखाद्याकडे दुकानची थकबाकी आहे ती संबंधी सौम्य शब्दांत/कडक शब्दांत मागणीपत्र.

(२३) परीक्षेची तयारी कशी करावी, तुम्ही कशी केली आहे, याविषयीं भावंडांस/वडिलांस/पत्र.

(२४) एका ठिकाणचें जेवणाचें आमंत्रण कांहीं अपरिहार्य कारणाने ऐन वेळीं स्वीकारतां येत नाहीं–दिलगीरीदर्शक पत्र.

(२५) जेवण्यास येण्याचें मित्रास/आप्तास/सहकाऱ्यास/अधिकाऱ्यास विनंती–प्रेमपूर्वक-निमंत्रणपत्र.

(२६) गांवांतील कॉलेजच्या नव्या इमारतीच्या उद्घाटनसमारंभाचें वृत्तपत्रासाठी बातमीपत्र.

(२७) तुम्हांला हव्या असलेल्या शैक्षणिक/क्रीडाविषयक/संगीतविषयक/गृहोपयोगी/विवाहाप्रीत्यर्थ/सामानाची मागणी करणारें संबंधित दुकानदारास मागणीपत्र.

(२८) तुम्ही शिक्षक आहांत. वर्गांतील एका अती उनाड विद्यार्थ्याचा बंदोबस्त करण्याविषयीं मुख्याध्यापकांस/त्या मुलाच्या पालकांस पत्र.

(२९) तुमच्या मित्राने तुम्हांस कांही वस्तु पोस्टाने पाठविल्या–त्या पोंचल्या नाहीत–पोष्टमास्तरला तक्रारअर्ज.

(३०) तुमच्या दिल्ली/काश्मिर/शिरडी/कोयना/पंढरपूर/अजंठा–वेरूळ/म्हैसूर/परदेशाचा प्रवास, यांपैकी प्रवासवर्णनाचीं, स्थलवर्णनाचीं इष्टमित्रांस, आप्तांस/पत्नीस/वडिलांस/वगैरे पत्रें.

(३१) सुटींतील तुमचा कार्यक्रम–वडिलांस, मित्रास, भावंडास, सहकाऱ्यास पत्र.

(३२) बहिणीचें/भावाचें लग्न ठरलें आहे. त्याची निमंत्रणपत्रिका तयार करा.

(३३) धाकट्या भावाची मुंज आहे; निमंत्रण-पत्रिका तयार करा.

---

७. कल्पनाविस्तार

प्रास्ताविक—भाषेचा फार मोठा भाग म्हणींनी, सुभाषितांनी आणि लोकप्रिय काव्यपंक्तींनी व्यापला आहे. वर्षानुवर्षांचें जीवितविषयक तत्त्वज्ञान, मानवी मनाचा सखोल अभ्यास, व्यावहारिक नीति, आचार, विचार व उच्चार यांचें चातुर्यज्ञान या साऱ्यांचें अगदी मोजक्या शब्दांत बोधप्रद दर्शन घडवून देण्याचें ज्ञानदायी कार्य हे भाषाविशेष करीत असतात.

(१) करावें तसें भरावें.

(२) नरो वा कुंजरो वा.

(३) स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी....

या त्रिविध सूक्तींत पहिली एक सर्वमान्य म्हण आहे, दुसरे महाभारतांतील उद्गार आहेत तर तिसरी एक सुप्रसिद्ध काव्यपंक्ती आहे.

(१) 'करावें तसें भरावें' ही म्हण आहे. 'म्हणी या अनुभवांच्या खाणी असतात' असें विद्वान् म्हणतात. हींत व्यावहारिक सत्य गोविलें आहे. हिचा उच्चार करणेंहि मजेचें आहे. कारण तींत अनुप्रास आहे. जशी इच्छा, जशी कृति तशींच फळें परिणामीं मिळतात. तेव्हा माणसाचें पूर्वचरित्र, त्याच्या इच्छा व त्याचा आचार शक्य तितका विशुद्ध असावा हेंच या म्हणीने अगदी मोजक्या शब्दांत शिकविलें आहे. एक प्रकारचा धोक्याचा, सावधगिरीचा आणि विशुद्ध चारित्र्याच्या इशाराच ही म्हण देत नाहीं काय ?

(२) 'नरो वा कुंजरो वा' या उक्तीला महाभारतीय युद्धाची पार्श्वभूमि लाभली आहे. सत्यप्रिय धर्मराजानें द्रोणाचार्यास चकविण्यासाठी असें गुळमुळीत उत्तर अश्वत्थामा मारला गेल्यानंतर दिलें होतें. स्थलकालानुसार सत्यप्रियतेसहि मुरड घालावी लागते, असा तत्त्वबोध या उक्तीनें केला आहे.

(३) महाराष्ट्र कवि 'यशवंत' यांच्या 'आई' या विख्यात कवितेतील ही विख्यात काव्यपंक्ती आहे. तींत 'विनोक्ती' अलंकार आहे. मातेच्या महतीचा काव्यमय गौरव आहे.

अशा शेंकडो उक्ती, म्हणी आणि सुभाषितें आहेत. यांत सुप्रसिद्ध संतवचनेंहि येतात. या सर्वांच्या पोटीं जो अर्थ, जें तत्त्वज्ञान दडलेलें असतें तें विद्यार्थ्यास स्वतःच्या ज्ञानबलावर उलगडून दाखवितां आलें पाहिजे. अशा प्रकारच्या लेखनास कल्पनाविस्तार म्हणतात.

कल्पना-विस्तार कसा करावा–कसा लिहावा ?

कल्पनाविस्तारासाठीं एखादें सुप्रसिद्ध सुभाषित, म्हण, संस्कृत सुभाषित अगर काव्यपंक्ती दिली जाते. त्यांतून एखादी कल्पना गोंवलेली असते. ही कल्पना कल्पनाविस्तार करण्यापूर्वी समजावून घ्यावी. कल्पनाविस्तारासाठी दिलेल्या ओळींत एखादी महाभारतीय, ऐतिहासिक, मानवी स्वभावावर प्रकाश टाकणारी स्वभावकथा ग्रथित झालेली असते, हें आपण पाहिलें. कल्पनाविस्तार सुरू करण्यापूर्वी या सूचित कथेकडे, तीमधील अर्थाकडे लक्ष द्यावें. कित्येकदां या ओळींत एखादें रूपकहि असतें. उदा०–(१) ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी, (२) सुसरीबाई, तुझी पाठ मऊ. यांत (१) चोराच्या वाटा चोराला ठाऊक या न्यायाने एका गांवांतील माणसें एकमेकांना ओळखून असतात, (२) दुष्ट माणसाची क्रमाक्रमानें स्तुती करून गोड भाषणाने कार्य-भाग साधावा हें कसब रूपकांतून शिकविलें आहे. या रूपकाचा अर्थ विचारांत क्रमशः स्पष्ट व्हायला हवा.

अशा तऱ्हेने कल्पनाविस्तारासाठी दिलेल्या विषयांत मूलभूत कल्पना नीट समजल्यानंतर ती कल्पना दोनतीन परिच्छेदांत विस्ताराने तर्कशुद्धपणे लिहितां आली पाहिजे. या परिच्छेदांत प्रारंभ, मध्य, अखेर हे तीन टप्पे येणार.

प्रारंभांत कल्पनाविस्तारासाठीं दिलेल्या ओळींचा सरळ अर्थ स्पष्ट करावा. मध्यभागांत त्या कल्पनेस सबळ करणारे व तिच्यांतच सहचारी असणारे सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक वगैरे दाखले समर्थनार्थ मांडावेत. अखेरच्या टप्प्यांत मूळ कल्पना कशी सार्थ आहे हें थोडक्यांत पटवून द्यावें. कल्पना-विस्तारासाठी दिलेला विचार मुळांतच सर्वमान्य सत्य असल्याने त्यास अनुकुल वा प्रतिकूल विचारप्रवाहांचें, मतें व मतभेदांचें स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाही.

सारांश, कल्पनाविस्तारांत स्वतंत्र कल्पनाविलासास फार थोडा वाव आहे व हा कल्पनाविलास मूळ कल्पनेचें अर्थवैभव वाढविणारा व सुसंगत असाच हवा. विषयांतर अजिबात नको. या लेखनप्रकारांत विद्यार्थ्यांची बहुश्रुतता, तार्किक विवेचन-कौशल्य आणि मूळ कल्पनेचा अर्थपूर्ण विस्तार करण्याचें कौशल्य या गुणांची परीक्षा होते.

प्रात्यक्षिक :— खालील कल्पना-विस्तार मननपूर्वक वाचा :—

धीर धरी रे, धीरापोटीं असतीं मोठीं फळें गोमटीं ॥

'सतारीचे बोल' या कवितेंतून कवि केशवसुतांनी हा अर्थपूर्ण संदेश मानवास दिला आहे. मनुष्य मुळांत थोडा उतावळा आहे. थोडेसें अपयश आलें, थोडें कांही मनाविरुद्ध झालें कीं तो हताश होतो, चिडतो नि खचून जातो. रोज जमिनींत रुजलेलें बीं उकरून किती झाड आलें हें पाहणाऱ्या व निराश होणाऱ्या एका उतावळ्या मुलाची गोष्ट आपल्याला माहीत आहे. मोठमोठ्या मनुष्यांच्या हातून घडणाऱ्या उतावळेपणाच्या गोष्टी पाहिल्यानंतर या मुलाला हंसण्यांत काय अर्थ आहे असेंच वाटतें.

कित्येक वर्षें धीर धरावा तेव्हां पेरलेल्या बीजाचा डौलदार वृक्ष तयार होतो व रसाळ फळांनी लगडतो. इष्ट फलप्राप्ति पदरीं पडण्यासाठी थांबावें हें लागतेंच. मानवी जीवनाचा इतिहास अगदी अश्म युगापासून तपासला तर अणुयुगापर्यंत येऊन पोचण्यासाठी त्याने मोठ्या धीराने पंचमहाभूतांशीं झुंज दिली असल्याचेंच दिसून येईल. आता अंतराळाकडे त्याचा वेगवान मोर्चा वळला आहे. १५० वर्षें धीराने पारतंत्र्याविरुद्ध झुंज दिल्यानंतर १९४७ साली १५ ऑगस्ट उजाडला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ५-५ वर्षांच्या टप्प्याटप्प्यांनी संपन्न व स्वावलंबी भारताच्या स्वप्नपूर्तीकरितां आपण झटत आहोंत.

प्रयत्नांतीं परमेश्वर, धीर सो गंभीर, Haste is Waste, विवेकें कार्य साधतें, सहसा विदधीत न क्रीयाम्-अविवेकानें केलेलें कार्य परम आपत्तींना जन्म देतें. अशीं अनेक सुभाषितें धीरगंभीर आचरणाचाच मंत्र देत नाहीत काय! 'पी हळद हो गोरी' हें कसें शक्य आहे? तूप खातांच रूप लाभेल काय?

मात्र धीर धरणें म्हणजे आळसानें बसून राहणें नव्हे. 'धांवत्याला शक्ति येई आणि मार्ग सांपडे' या उक्तीप्रमाणेच चालणाराचें नशीबहि चालतें आणि अंतिम यशाच्या टप्प्यापाशीं तो पोचतो, हें कोलंबसाच्या उदाहरणावरून सिद्ध होत नाही काय! कष्ट करून मिळणारें जेवण पुरतें सिद्ध होईपर्यंत धीरच धरावा लागतो व तोंडापर्यंत हात नेण्याचे कष्ट केल्याखेरीज तें पोटांत जात नाही. तद्वत्‌च इष्ट प्राप्तीच्या सिद्धीसाठी प्रयत्न करावा, परिपक्व फळ पदरांत पडेपर्यंत थांबावें आणि धीराधीरानेंच, चवीने त्याचा आस्वाद लुटावा, यांतच खरें स्वारस्य आहे!.....

या कल्पनाविस्तारांतील विस्ताराचा क्रमशः विकास पाहा. प्रारंभीं काव्यपंक्तीचा अर्थ दिला आहे. मग उतावळ्या मुलाची गोष्ट दिली आहे. मध्यभागीं म्हणजे दुसऱ्या परिच्छेदांत धीर धरून मानवजातीने प्राप्त करून घेतलेल्या उत्तमोत्तम गोष्टींचे विवेचन आहे. अखेरच्या परिच्छेदांत काव्यपंक्तीस

अभिप्रेत अशी प्रयत्नवादाची बाजू सोदाहरण रंगविली आहे. अखेरीच्या वाक्यांत पंक्तींचें यथार्थत्व स्पष्ट केलें आहे. काव्यपंक्तीस परिपोषक म्हणींचा सुक्तहस्ताने अर्थपूर्ण उपयोग केल्याने मूळ कल्पना प्रभावी रीतीने स्पष्ट झाली आहे.

– स्वाध्याय –

याच पद्धतीनें खालील कल्पनांचा कल्पना-विस्तार करा—

(१) अतिपरिचयादवज्ञा (२) अडला नारायण गाढवाचे पाय धरी. (३) अरसिकेषु कवित्वनिवेदन शिरसि मा लिख मा लिख मा लिख । (४) अहोरूपमहोध्वनि (५) अतिसर्वत्रवर्जयेत् (६) द्रव्येण सर्वे वशाः (७) देवो दुर्बलघातकः (८) न मातुः पर दैवतम् (९) मौनं सर्वार्थसाधनम् (१०) यथा राजा तथा प्रजा (११) वचने किं दरिद्रता (१२) वादे वादे जायते तत्त्वबोधः (१३) विनाशकाले विपरीतबुद्धिः (१४) स्वभावोदुरतिक्रमः (१५) अर्थस्य पुरुषो दासः (१६) ऐकावें जनाचें करावें मनाचें (१७) बळी तो कान पिळी (१८) परदुःख शीतळ (१९) एकनूर आदमी दसनूर कपडा (२०) गर्वाचें घर खालीं (२१) शीर सलामत तो पगडी पचास (२२) जग ही एक रंगभूमि आहे. (२३) अततील शितें तर जमतील भुतें. (२४) बुन्दसे गई वो हौदसे नही आती. (२५) संत जेणें व्हावें । तेणें जगबोलणें सोसावें. (२६) जया अंगीं मोठेपण । तया यातना कठीण. (२७) भाव तैसा देव. (२८) मरावें परी कीर्तिरूपें उरावें. (२९) फुलासंगे मातीस वास लागे. (३०) नरेच केला हीन किती नर. (३१) रात्रीच्या गर्भीत उद्याचा असे उषःकाल. (३२) मरणांत खरोखर जग जगतें. (३३) जुनें तें सोनें. (३४) आराम हराम है ।

८. कल्पनाग्रहण व सारांशलेखन

एका नाण्याच्या दोन बाजू :—

विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याची कसोटी आणखी एका प्रश्नाने घेतली जाते. हा प्रश्न म्हणजे काल्पनाग्रहणाचा किंवा सारांशलेखनाचा. हा प्रश्न विचारण्याच्या दोन पद्धती आहेत. पहिल्या पद्धतीप्रमाणे विद्यार्थ्यांना अपरिचित असा एखादा स्वयंपूर्ण गद्य उतारा किंवा एखादी कविता देण्यांत येते. या उताऱ्यावर सूचक असे मार्गदर्शक प्रश्न दिलेले असतात. दिलेला उतारा विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वाचावयाचा; वाचतां वाचतां त्यावर दिलेल्या प्रश्नांचीं उत्तरें शोधायचीं. तीं उत्तरें निश्चित ठरलीं कीं प्रश्नांच्या अनुक्रमाने लिहावयाचीं. या पद्धतीस 'कल्पनाग्रहण', 'विचारग्रहण', 'आकलन' अशींहि दुसरीं नांवें आहेत. इंग्रजींत यास 'Comprehension of a prose passage or of a poem' असें म्हणतात.

कांही वेळां उताऱ्यावर प्रश्न वगैरे कांहींच न देतां त्याचा सारांश किंवा आशय स्वतःच्या शब्दांत मूळ उताऱ्याच्या १/३ प्रमाणांत विद्यार्थ्यांस लिहावयास सांगतात. ही झाली दुसरी पद्धत. सारांशलेखनासाठी दिलेला उतारा मनःपूर्वक वाचून त्यांतील मूळ विचारपरंपरेस धक्का लागणार नाही अशा बेताने-कौशल्याने लिहावयाचा असतो. सारांश लिहून झाल्यानंतर त्यास समर्पक, अन्वर्थक व सुटसुटीत शीर्षक विद्यार्थ्यांनी द्यावें अशी अपेक्षा असते. ह्या पद्धतीस मराठींत 'सारांशलेखन', 'संक्षेप' किंवा 'कल्पनासंकोच' अशीं नांवें आहेत. इंग्रजीत यास 'Precis Writing' म्हणतात.

उताऱ्यावर मार्गदर्शक प्रश्न देणें किंवा न देणें एवढा भेद सोडल्यास या दोन्ही पद्धतींत तत्त्वतः फरक नाही. उलट कल्पनाग्रहण हा यशस्वी सारांशलेखनाचा पायाशुद्ध अभ्यास होय असेंच म्हणावें लागेल.

उद्देश व स्वरूप—

भाषेचा काय किंवा कोणत्याहि विषयाचा काय जो अभ्यास करावयाचा असतो तो वाचन, श्रवण, मनन, स्मरण आणि लेखन या पांच अंगांनी करावयाचा असतो. वाचन करण्याचा मुख्य हेतु त्या विषयाचें अंतर्बाह्य आकलन करून घेणें. जें समजलें तें संकलित रूपांत सांगतां येणें किंवा लिहितां येणें हें

अभ्यासानेंच साध्य होतें. स्मरणशक्तीला एका विशिष्ट शिस्तीची आवश्यकता आहे. कुठलेंहि फळ खातांना त्याची साल व बी खायचें काय असा फरक फळाफळानुसार आपण करतों. त्याचप्रमाणें जें वाचलें त्यांतलें स्मरणशक्तीकडे कोणतें सोपवायचें व विसरून कोणते जायचे, संस्मरणीय मुद्यांचा क्रम कोणता ! पुन्हा त्या संस्मरणीय मुद्यांत विशेष महत्त्वाचे कोणते आणि गौण किंवा दुर्व्यम कोणते ह्याचा चिकित्सकपणें विचार करावा लागतो. इतका सारा विचार झाल्यानंतरच जें आपण वाचलें त्याचें 'सारभूत' स्मरणीय विशेष आपण स्मरणशक्तीकडे सुपूर्त करूं शकतों. अशा तऱ्हेनें पद्धतशीर वाचन झालें नसेल तर स्मरणशक्तीला योग्य ती शिस्त लागत नाही व लिहितांना अगर बोलतांना आपल्या लिहिण्यांत अगर बोलण्यांत विस्कळितपणा डोकावूं लागतो.

आतां आपण खालील सुप्रसिद्ध गोष्ट वाचूं—

" कडक उन्हाळ्याच्या मान्याने सर्वत्र रखरखीत झालें होतें. जलाशय, नद्या, झरे, डबकीं सारेंच कांही कोरडे ठणठणीत ! खूप तहान लागलेला एक कावळा पाण्याच्या शोधांत चोच उघडून सैरावैरा हिंडत होता. कुठे थोडासा तरी ओलावा दिसेल तर शपथ ! बिचारा तहानेने व्याकूळ झाला, कोठेच पाण्याचें टिपूसहि न दिसल्यानें निराश झाला. पण त्याचें नशीब थोडेंसें जोरावर होतें. थोडेंसें जोरावर होतें असें म्हणण्याचें कारण कीं, एका झाडाखाली त्याला एक मडकें दिसलें. परंतु त्यांत अगदी थोडें पाणी, पार तळाशी गेलेलें असें त्याला दिसलें. बैतागाने पंख फडफडवीत त्याने मडक्याभोवती फेऱ्या मारल्या. मडक्यावर चोचहि आपटून पाहिली. गरज ही शोधाची जननी असते म्हणतात ना ? त्यालाहि एक उपाय सापडला. बिचाऱ्याने छोटे छोटे खडे गोळा केले आणि एक एक खडा त्या तळाशीं चमकणाऱ्या पाण्यांत टाकला. पाणी थोडें थोडें वर येऊं लागलें. आनंदून जाऊन त्याने भराभर खडे टाकले. अखेर त्याची चोच पोचेल इतक्या वरपर्यंत पाणी वर आलें. अधाशीपणें पाणी पिऊन तो तृप्त झाला आणि मजेने काव काव करीत दूर उडून गेला. "

या कथेंत सुमारें १५० शब्द आहेत. कल्पना करा की, या कथेचा सारांश आपणांस सांगावयाचा आहे किंवा लिहावयाचा आहे. तो सांगतांना आपण कोणकोणत्या गोष्टींना महत्त्व देऊं ? कोणत्या गोष्टी दुर्व्यम म्हणून वगळूं ? (१) कडक उन्हाळा (२) तृषार्त कावळा (३) मडकें दिसल्याचा आनंद व निराशा (४) युक्ती (५) परिणाम. हे पांच मुद्दे महत्त्वाचे आहेत. ही संपूर्ण गोष्ट सारांशरूपाने कशी सांगतां येईल पाहा—

"एका तहानलेल्या हुशार कावळ्याने तळाशीं अगदीं थोडें पाणी असलेल्या मडक्यांत खूपसे खडे टाकले व त्यामुळे वरपर्यंत आलेलें पाणी पिऊन त्याने आपली तहान भागविली." हा सारांश किती शब्दांचा झाला? अवघा २३ शब्दांचा! आतां या सारांशास 'चतुर कावळा' हें शीर्षक कसें शोभून दिसेल? चतुर या एका शब्दांत कथेंतील त्याचें चातुर्य स्पष्ट होत नाही काय?

सारांशाला सुटसुटीत, समर्पक शीर्षक देणें म्हणजे जणुं सारांशाचें सार देण्यासारखेंच होय.

याच कथेवर समजा खालील प्रश्न दिले आहेत—

(१) कावळ्याला कोठेहि पाणी कां मिळेना?
(२) मडकें पाहून त्याला काय वाटलें?
(३) त्याने कोणती युक्ती लढविली?
(४) तिचा परिणाम काय झाला?
(५) या कथेवरून तुम्ही काय शिकला?

या प्रश्नांचीं छोटीं छोटीं उत्तरें व वर दिलेला सारांश यांत विशेष असा काय फरक आहे? कल्पनाग्रहण म्हणजे सारांशलेखनाचा पायाशुद्ध अभ्यास असें म्हटलें तें याच अर्थाने. म्हणूनच कल्पनाग्रहण व सारांशलेखन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असें विधान प्रारंभीं केलें आहे.

कल्पनाग्रहण कसें करावें?

प्रथम अर्थातच उतारा संपूर्ण वाचला पाहिजे. त्यांतील मध्यवर्ती कल्पना शोधून काढायची. त्या मध्यवर्ती कल्पनेभोंवतीं कांही पूर्वापार संबंधाने व कार्य-कारणभावाने संबद्ध झालेल्या कल्पना, विचार समजावून घ्यायचे. म्हणजे परिच्छेदाचा गोषवारा लक्षांत येतो. खालीं दिलेल्या मदतनीस प्रश्नांचीं उत्तरें त्या प्रश्नाआड डोकावूं लागतात. आतां राहिलें तीं उत्तरें लिहिण्याचें काम. हीं लिहितांना एवढीच खबरदारी घ्यायची कीं पदरचें नवें कांही लिहायचें नाही; किंवा मुळांतलें कांही गाळायचें नाही. उत्तरांची भाषा स्वतःची असावी.

सारांशलेखन कसें लिहावें?—

कल्पनाग्रहणाचेच बरेचसे नियम सारांशलेखनास लागूं पडतात. सारांश-लेखन साधारणतः मूळ उताऱ्याच्या लांबीच्या एकतृतीयांश प्रमाणांत व्हावें अशी अपेक्षा असते. अर्थात् अगदीं हिशोबाने एकतृतीयांशच व्हावा असें

मात्र नाही. उताऱ्याच्या लेखकाच्या शैलीवर व प्रत्यक्ष उताऱ्यांतील अवांतर विचारांच्या फुलोऱ्यावर सारांशलेखनाची व्याप्ती अवलंबून राहणार !

सारांश लिहितांना मूळ विचारांचा क्रम तोच ठेवणें योग्य. मुळांतील अलंकार, विशेषणें, क्रियाविशेषणें, उद्गारवाचक शब्द, वर्णनें, अवतरणें, कथा, आख्यायिका होता होईल तों टाळून तो लिहावा. हा सारांश स्वयंसिद्ध व स्वयंपूर्ण वाटला पाहिजे. मुद्द्यावरून कथा किंवा निबंध लिहिण्यासाठी मुद्दे देतात. तसा त्रोटक किंवा शब्द गाळलेल्या व ते पुन्हां भरून पुऱ्या करावयाच्या कथेसारखा तुटक वाटतां कामा नये. मूळ उताऱ्याचा डौल न बिघडवितां त्याची काटछाट तर करावयाची, पण मूळ सौंदर्याला धक्का पोचू द्यायचा नाही असें कसब दाखवायला हवें. सारांशलेखनांतहि मूळांतलें कांही गाळायचें नाही व पदरच्या आगंतुक विचारांना थारा द्यावयाचा नाही, ही खबरदारी घ्यावी लागते. 'तार' करतांना जें संक्षेपकौशल्य आपण दाखवितों तेंच येथेहि दाखविलें पाहिजे.

पद्य उताऱ्याचें सारांशलेखन :—

गद्य-उताऱ्याचें सारांशलेखन करतांना जीं पथ्यें पाळावयाचीं असतात तींच पथ्यें पद्य-उताऱ्याचें कल्पनाग्रहण किंवा सारांशलेखन लिहितांना कटाक्षाने पाळावयाचीं असतात. केव्हाहि दिलेला कविता किंवा पद्यांश पूर्ण समजेपर्यंत वाचा. म्हणजे मग त्यांतील मध्यवर्ती कल्पना वा मुख्य विषय लक्षात येईल. हा सारांश लिहितांना शब्दशः अर्थ अगर संपूर्ण भावार्थहि द्यावयाचा नाही हें लक्षांत असूं द्या. काव्याचा मुख्य आशय स्वतःच्या भाषेंत व तोहि गद्यांत द्यावयाचा आहे. म्हणजे त्या काव्यांतील अलंकारांचा साजशृंगार, वर्णनाचीं काव्यमय आवरणें, हलक्या हाताने दूर केलीं कीं त्यांच्या पडद्याआड दडलेला मूलभूत आशय हातीं येईल. हा आशय मोजक्या, निवडक शब्दांत मूळ क्रमाने मांडणें हें पुढचें काम. तो मांडतांना पुन्हा एकदां मुळांतील कांही गाळायचें नाही व नवें भाष्य करावयाचें नाही ही गोष्ट लक्षांत ठेवलीच पाहिजे. पद्य उताऱ्याचें मूळ शीर्षक दिलें असेलच असें नाही. मध्यवर्ती कल्पना सूचित करणारें सोपें, सुटसुटीत शीर्षक याहि प्रकारांतील सारांशास द्यावयाचें असतें.

गद्याचें किंवा पद्याचें सारग्रहण करतांना मला समजलेला हा आशय मी स्वतः कसा लिहिला असता हा प्रश्न स्वतःशीं करून मग तो लिहिला तर तो कितीतरी आकर्षक व अकृत्रिम पद्धतीने लिहितां येईल; म्हणजेच त्यांत सहज-सुलभता उत्पन्न होईल.

कल्पनाग्रहण आणि सारांशलेखन हे लेखनप्रकारहि अभ्यासाने व सरावानेच साधणारे आहेत हें येथें पुन्हां सांगावेसें वाटतें.

कल्पनाविस्तार आणि कल्पनाग्रहण यांमधील फरक—

कापसाचा लांब सलग व पिळदार धागा काढावा त्याप्रमाणे मूळ कल्पना पिंजून तिच्यांतून काढलेल्या धाग्यांनी विणलेलें वस्त्र म्हणजे कल्पना-विस्तार. उलट कल्पनासंकोच म्हणजे एखाद्या रसाळ फळाच्या साली व बिया काढून त्याच्या आस्वाद्य अशा आकर्षक फोडी बनवून त्या सुंदर बशींत ठेवून खाण्यासाठीं सिद्ध ठेवणें.

या ठिकाणीं सुभाषितावरून निबंध लिहिणें या निबंधप्रकाराची कांहींना आठवण येईल. कल्पनाविस्तारांत फक्त मूळ कल्पेनचा सलग अर्थ विस्तृतपणें मांडावयाचा असतो. त्यावर पूर्वपक्ष, उत्तरपक्ष अशा चौफेर पद्धतीने चिंतन-पूर्वक भाष्य करावयाचें नसतें. फक्त ती कल्पना किती व कशी सार्थ आहे हें मोजक्या ओळींत पटवून द्यायचें असतें.

कल्पनाग्रहण हा सारांशलेखनाचा पाया त्याप्रमाणेंच कल्पनाविस्तार हा सुभाषितावरून निबंधलेखन या निबंधप्रकाराचा पाया हें लक्षांत ठेवलें म्हणजे या चारी लेखन-प्रकारांच्या सीमारेषा व मर्यादा यांचा गोंधळ व सरमिसळ होणार नाही.

कल्पनाग्रहणाचा नमुना—

(१) पाश्चात्य जगांत एकोणिसाव्या शतकामध्ये विज्ञानाची प्रगति फार झाली. मनुष्याला असें वाटूं लागलें कीं, आपण आतां कर्तुमकर्तुम् झालों. सृष्टीचीं कांहीं रहस्यें कळल्यासुळे गूढ असें कांहीच उरलें नाही, असा त्याचा मह झाला. अर्थात् गूढतेमुळें जी ईश्वरविषयक श्रद्धा होती ती कोलमडली. पण निसर्गावर विजय मिळविल्यानेहि मनुष्याला शांति अशी लाभेना. राधाकृष्णन् यांनी म्हटल्या-प्रमाणे माणूस माशासारखा पाण्यांत खोल जायला शिकला, पक्षाप्रमाणे अंतराळांत वावरूं लागला; परंतु माणसाप्रमाणें मात्र तो वागूं शकत नाही. याच उणीवेमुळे माणूस असंतुष्ट होत गेला. विशेषतः भौतिक संपन्नता जेथे वाढत होती तेथे हा प्रकार विशेष तीव्रतेने घडूं लागला. केवळ बुद्धि मनाचें समाधान करूं शकेना. निसर्गावरील विजयानें खरा आनंद होईना. रुक्षतेच्या वाळवंटांत सापडून माणसाला कासावीस झाल्यासारखें वाटूं लागलें. अशा वेळीं उपनिषदांतील आनंदकलशांत भक्तीचा मधुर रस भरलेला गीतांजलींत आढळून आला. ज्यासाठी शोष पडला होता तें मिळालें आणि त्याचमुळे पाश्चात्य जगाने गीतांजलीचा एवढा जयजयकार केला.

— गोपीनाथ तळवलकर.

(१) विज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवी मनावर काय काय परिणाम झाले ?

(२) विज्ञानाच्या प्रगतीसंबंधाने राधाकृष्णन् ह्यांनी कोणतें मत व्यक्त केलें ?

(३) केवळ बुद्धि मानवी मनाचें समाधान कां करूं शकेना ?

(४) गीतांजलीचा जयजयकार होण्याचीं कारणें सांगा.

(५) खालील शब्दांचा अर्थ स्पष्ट करा :—

(१) कर्तुमकर्तुम् (२) भौतिक (३) उपनिषदें (४) शोष (५) ग्रह.

(६) खालील शब्दांचा संधि सोडवा :—

(१) कर्तमकर्तुम् (२) गीतांजली

(७) उताऱ्याला योग्य शीर्षक सुचवा.

मूळ उतारा मननपूर्वक वाचल्यानंतर वरील प्रश्नांचीं उत्तरे सहज देतां येतील. आतां याच उताऱ्याचा खालीं दिलेला सारांश वाचा, त्याला दिलेलें शीर्षकहि पाहा. तुम्हाला दुसरें एखादें शीर्षक सुचतें काय याचा विचार करा.

गीतांजलीचा गौरव

एकोणिसाव्या शतकांत पाश्चात्त्यांनी झपाट्याने विज्ञानाची प्रगती केली. सृष्टीचीं कांही रहस्यें उलगडल्याने ईश्वरविषयक श्रद्धा मनुष्य गमावून बसला. भौतिक संपन्नता वाढली परंतु मनुष्य, माणुसकी, समाधान आणि मनःशांति ह्यांना पारखा झाला. या अशांत मनास गीतांजलीने भक्तीरस पाजून तृप्त केलें. तृप्त पाश्चात्यांनीं गीतांजलीचा जयजयकार केला.

२. नमुना-पद्य उताऱ्याचें कल्पनाग्रहण व सारांशलेखन :—

धन्य नरजन्म देऊनीया मला
देवराया, केला उपकार
सृष्टीचें भांडार केलें मला खुलें
लोचन हे दिले आलोकना
दिली ग्राह्य बुद्धी, दिघली जिज्ञासा
सौंदर्य-पिपासा वाढविली

कारागिरींतील जाणाया रहस्य
दिलें रसिकत्व हृदयाला
वाणीस या माझ्या दिली काव्यशक्ती
वर्णाया महती देवा तुझी !

—ग. ह. पाटील.

(१) देवाने माझ्यावर उपकार केला असें कवि कां म्हणतो ?

(२) कवीला लोचन, ग्राह्यबुद्धी व रसिकता देण्यांत ईश्वराचा हेतु कोणता ?

(३) कवीच्या मतें देवरायाने दिलेल्या वाणीचा खरा उपयोग कोणता ?

(४) कवितेस योग्य असें शीर्षक द्या.

कविता इतकी सोपी आहे की, एकदोनदां ती वाचतांनाच ह्या प्रश्नांचीं उत्तरें तुम्ही सहज देऊं शकाल. याच कवितेचा सारांश खालीं दिला आहे. त्यास शीर्षकहि दिलें आहे. तुम्हांला दुसरें एखादें शीर्षक सुचतें काय याचा विचार करा.

धन्य नरजन्म

धन्य असा नरजन्म देऊन ईश्वराने माझ्यावर मोठा उपकार केला आहे. या नरजन्माबरोबरच दृष्टि, बुद्धि, रसिकता देऊन त्याच्या सृष्टींतील आनंद लुटण्यास त्याने मला समर्थ बनविलें आहे आणि विशेषतः त्याचा मोठेपणा मी वर्णन करावा म्हणून माझ्या वाणीस त्याने काव्यशक्ती दिली आहे.

स्वाध्याय

पुढे दिलेल्या उताऱ्यांचें कल्पनाग्रहण व सारांशलेखन लिहा. पहिल्या दोन उताऱ्यांवर मार्गदर्शक प्रश्न दिले आहेत. त्यापुढील उताऱ्यांवर मात्र दिले नाहीत. तुम्ही लिहिलेल्या प्रत्येक सारांशास योग्य तें शीर्षक द्या.

(१) स्वातंत्र्याच्या नाशापायीं आमचीं कितीक नुकसानें झालीं आहेत पहा. एक तर आमचें जगांतून अस्तित्वच नाहीसें झालें आहे. केवळ प्राणधारण करून आम्ही आहों इतकेंच काय तें ! गेल्या शतकांत हिंदु लोकांचीं राज्यें, हिंदु लोकांची संपत्ति, हिंदु लोकांची विद्या वगैरे शब्दांचा जसा अर्थ होता तसा आतां कांही राहिला आहे काय ? सांप्रत आमचे लहानमोठे सर्व राजे म्हटले म्हणजे सरासरी बुद्धिबळांतलेच होत; हालतां नये, बोलता नये, बडे साहेबांच्या सदोदित मुठींत. आमची संपत्ति म्हटली तर एखाद्या वेश्येपाशीं जशी असते

तशा प्रकारची. कोणी वस्ताद आला आणि तोंडांत मारून घेऊं लागला, तर तिचा बचाव करण्यापुरतीहि आमच्यांत ताकद नाहीं.

आमची अलीकडील विद्वत्ता म्हणून जी आम्ही एवढ्या डौलाने मिरवितों, ती वस्तुतः पाहतां पाश्चात्य विद्येचा एक रजःकण आहे. तींत आमचें स्वतःचें बहुधा कांहीच नाही व आहे तेंहि प्रायः शब्दज्ञानात्मकच आहे. उद्यां जर आमचें सरकार आम्हास सोडून गेलें तर तिला दीडदमडीलाहि कोणी विचारील कीं नाही कोण जाणे ! इंग्रज लोक जर एकदम आमच्या देशांतून अंतर्धान पावले तर आमच्या बडया विद्वानांत कोणी रेल्वे एंजिन् करणारा मिळेल किंवा तारायंत्र जुळवून देणारा मिळेल याचा वानवाच वाटतो; त्याप्रमाणे शेकडो प्रकारचे कारागीर जे आमच्या देशांत आज शेकडों वर्षे नांदत आले, ते अलीकडेच एकामागून एक जे नाहींसे होत गेले व चालले आहेत, ते तरी पुन्हा उत्पन्न व्हावयाचे म्हणजे केवढी दुरापास्त गोष्ट आहे ! सारांश, जसा एखादा आयतोजी असतो व त्याला पाटावर बसवून ठेवून त्याचें सर्व कामकाज दुसऱ्यांनी करावें, त्यासारखी आमची स्थिति दिवसेंदिवस होऊं पाहात आहे. असें होता होतां लवकरच काडीचाहि वकूब नाही असें आम्ही नादान होऊन जातों कीं काय कोण जाणे !

तेव्हा एकंदरींत पाहतां आम्ही तूर्त जगांतून उठल्यासारखें झालों आहोंत. ज्यांस आम्ही प्रथमतः थारा दिला व जे आमच्या पुढे पुढे कित्येक दिवस करीत होते, तेच आतां आमचे धनी होऊन बसले आहेत व साऱ्या देशांतील जमीन, जंगलांतील प्रत्येक झाड, झाडाचें प्रत्येक पान सरकारचें. देशांतील लोक म्हणजे सारे बैल. त्यांस आम्ही जसे वागवूं तसें त्यांनी वागलें पाहिजे, त्यांस वस्तुतः म्हणजे कांहीच हक्क नाहीत, आम्ही मेहेरबानी करून काय हक्क देऊं तेवढे घेऊन त्यांनी मुकाट्यानें रहावें व आमची निरंतर स्तुति गात बसावें. असें जो न करील तो राजद्रोही समजला जाईल. अशा प्रकारची एकंदर आमची हालहवाल आहे. हा सर्व प्रकार कशापासून ! तर स्वातंत्र्य गमावल्यापासून.

— वि. कृ. चिपळूणकर

प्रश्न—(१) स्वातंत्र्यनाशामुळे आमचे राजे, संपत्ति व विद्या ह्यांची कशी स्थिति झाली आहे ?

(२) इंग्रज एकदम आमच्या देशांतून गेले तर काय होईल ?

(३) आम्ही नादान कां झालों ?

(४) इंग्रज राजद्रोही कोणाला समजतात ?

(५) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

२. बांधवहो, विचारकलहाला तुम्ही इतके कशासाठी भितां? दुष्ट आचारांचें निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धि, सत्यसंशोधन व भूतदयेचा विचार इत्यादि मनुष्यांच्या सुखाची वृद्धी करणाऱ्या गोष्टी विचारकलहाखेरीज होत नाहीत. आजपर्यंत या देशांत हा कलह माजावा तितका कधींच न माजल्यामुळें व बहुधा आमचे लोक गतानुगतिक असल्यामुळें हें भरतखंड इतकीं शतकें अनेक प्रकारच्या विपत्तींत खितपत पडलें आहे! सुधारक आणि दुर्धारक, चपल सुधारक आणि मंद सुधारक, थंडे सुधारक आणि गरम सुधारक, अथवा नाना प्रकारच्या मतांचे नवे आणि जुने लोक यांमध्ये सांप्रतकालीं जी दुही माजून राहिली आहे, ती पाहून घाबरून जाण्याचें बिलकूल कारण नाही. पाश्चिमात्य शिक्षणामुळे ज्या दिवशीं या वादास आरंभ झाला तो दिवस हिंदुस्थानच्या भावी इतिहासांत महोत्सव करण्यासारखा होईल. त्या दिवशीं अनेक शतकें गाढ निद्रेत घोरत पडलेला हिंदुस्थान देश किंचित् जागा होऊन चावळूं लागला, किंवा प्रेतावस्थ झालेल्या त्याच्या विस्तीर्ण देहांत ईशकृपेने पुनः एकवार चैतन्यावतार झाला असें म्हणण्यास हरकत नाही. त्या दिवशीं त्याचें स्थाणुत्व नाहींसें होऊन त्याला जी यत्किंचित् गति मिळाली ती प्रतिवर्षी अगदी यवप्रमाणांत का होईना, पण सारखी वाढत आहे व जो जो हा विचारकलह निकराचा होऊं लागेल तो तो झपाट्याने होऊं लागणार आहे.

— गो. ग. आगरकर

प्रश्न—(१) विचारकलहामुळे मनुष्यजातीस कोणकोणते फायदे होतात?

(२) भरतखंड इतके दिवस खितपत कां पडलें?

(३) सांप्रतकालीं जी दुही दिसते तिला घाबरण्याचें कारण नाही, असें लेखक कां म्हणतो?

(४) ज्या दिवशीं या वादास आरंभ झाला तो दिवस हिंदुस्थानच्या इतिहासांत महोत्सव करण्यासारखा आहे, असें कां म्हटलें आहे?

(५) विचारकलहाने आपल्या देशाच्या स्थितींत कोणते बदल झाले असें लेखक म्हणतो?

(६) प्रस्तुत उताऱ्यास अन्वर्थक शीर्षक द्या.

३. समजा कीं, एखादें गोड व सुरस पक्वान्न पाहून एकाने तें गव्हाचें दुसऱ्याने तुपाचें व तिसऱ्याने साखरेचें आहे असें आपापल्या अभिरुचीप्रमाणे

म्हटलें तर त्यांपैकी आपण कोणतें खरें मानणार ? तिघेहि आपापल्या परी खरेंच आहेत; आणि इतकें झालें तरी तें पक्वान्न कोणतें हा प्रश्न पुन्हा शिल्लक राहतो तो राहतोच. कारण गहूं, तूप आणि साखर हे तिन्ही पदार्थ एकत्र करून त्यापासून लाडू, जिलबी, मोतीचूर इत्यादि अनेक पक्वान्नें तयार करतां येण्यासारखीं असल्यामुळे त्यांपैकी प्रस्तुत पक्वान्न कोणतें याचा निर्णय ते गोधूमप्रदान, घृतप्रधान किंवा शर्करांप्रधान आहे, एवढें म्हटल्यानेच होऊं शकत नाही. समुद्रमंथनाचे वेळीं ज्याप्रमाणे एकास अमृत तर दुसऱ्यास विष, आणि कित्येकांस लक्ष्मी, ऐरावत, कौस्तुभ, पारिजात वगैरे निरनिराळ्या वस्तु मिळाल्या तरी तेवढ्याने समुद्राच्या वास्तविक स्वरूपाचा निर्णय झाला नाही, तद्वतच सांप्रदायिकरीत्या गीतासागराचें मंथन करणाऱ्या टीकाकारांची अवस्था झाली आहे, किंवा कंसवधाचे वेळीं रंगमंडपांत शिरलेले एकच भगवान् श्रीकृष्ण ज्याप्रमाणें प्रत्येक प्रेक्षकास निरनिराळे—मल्लास वज्रासारखे, प्रियास मदनासारखे, आपल्या माता-पितरांस पुत्रासारखे इत्यादि प्रकारें भासले, त्याप्रमाणें भगवद्गीता एकच असतांहि निरनिराळ्या सांप्रदायिकांस ती निरनिराळी दिसूं लागली आहे असें म्हणण्यास हरकत नाही.

— लोकमान्य टिळक

४. आपल्यापुढे मराठी भाषेला शक्ति कशी उत्पन्न करावी हा पहिला प्रश्न आहे; का कीं जगाच्या चढाओढींत टिकणें, जिवंत राहणें हें व्यक्तीचें किंवा संस्थेचें आद्य कर्तव्य होय व जिवंत रहाण्यासाठी शक्ति नसल्यास वाढविणें हें कर्तव्य उत्पन्न होतें. वाङ्मय केवळ आपल्या अंतर्गत सौंदर्याने जिवंत राहूं शकत नाही. वाङ्मय सुंदर असेल व भाषा जर मर्त्य असेल तर वाङ्मय अधिक अमर्त्य भाषेचा आश्रय करतें. याच नियमाप्रमाणे कथा-ग्रंथ मूळ जरी प्राकृतामध्ये निर्माण झाले तरी ते संस्कृत भाषेचाच आश्रय घेऊन जिवंत राहूं शकले. तर आपणांपुढे प्रश्न असा आहे कीं, मराठी भाषेस शक्ति कशी उत्पन्न होईल व मराठी वाङ्मयास चिरकालता कशी प्राप्त होईल ? वाङ्मय भाषेचें आयुष्य कितपत वाढवितें व भाषेच्या आश्रयानें विशिष्ट वाङ्मयास चिरस्थायित्व कितपत येते, यासंबंधाने विचार करूं लागले असतां वाङ्मय व भाषा यांचा जरी बऱ्याच अंशीं चिरकालत्व स्थापन करण्यांत अन्योन्याश्रय दिसून आला, तरी दोहोंचें चिरकालत्व दुसऱ्या अनेक गोष्टींवर अवलंबून आहे हें आपण विसरून चालावयाचें नाही. भाषा वाङ्मयाला चिरकालत्व कसें देतें, याचें उदाहरण प्राचीन काळच्या कथांस संस्कृत भाषेने चिरकालत्व कसें दिलें, यावरून स्पष्ट करतां येतें. उलटपक्षीं वाङ्मय भाषेस चिरकालत्व कसें आणतें याचें उदाहरण

आपणांस असें देतां येईल कीं, जसजशी भाषेंत ग्रंथरचना होऊन त्या ग्रंथांच्या योगाने समाजांतील अनेक लोकांच्या गरजा भागूं लागतात, तसतसें भाषेस स्थैर्य येतें व अनागरांच्या संसर्गाने भाषेची विकृति होते, ती बंद पडूं लागते.

— डॉ. श्री. व्यं. केतकर

५. तुम्ही आपले मुलांची काळजी करून त्यास शहाणीं करा, व सर्व लोकांची काळजी करा. नित्य कांही तरी सर्व देशाचें कल्याण केल्याशिवाय एक दिवस जाऊं देऊं नका. मुख्य ईश्वरभजन करण्याचा हा मार्ग आहे कीं, कोणास दुःख देऊं नये व सर्व लोकांचें हित करावें. स्वदेशाचें हित इच्छावें आणि परदेशाची हानि इच्छावी असें नाही. परंतु सांप्रत आपले लोक फार वाईट अवस्थेंत आहेत, सबब फार खबरदारी ठेवली कीं, या लोकांचें कल्याण होईल. पैका मिळाला तर अब्रू वाढते असें नाही; अब्रू खरेपणा व निर्मळपणा यांपासून उत्पन्न होते. विद्या केली तर त्याप्रमाणें वागणूक पाहिजे. नाही तर विद्या व्यर्थ आहे. फक्त पोटच भरणारी ती विद्या नव्हे. ती मजुरी आहे. विद्या म्हणजे ज्ञान, जेणेंकरून मनुष्य निर्मळ होतो, विचारी होतो, समर्थ होतो.

— लोकहितवादी

६. महाराष्ट्रांतील डोंगरी किल्ले म्हणजे महाराष्ट्राचें वैभव आहे. या किल्ल्यांचा राजा रायगड होय. पांच मैलांची चढण चढावी, मध्येच एकदा खूबलढ्या बुरजापाशीं किल्ला अगदीं गाठला असें वाटावें आणि पुन्हा डोंगराच्या तळाशीं प्रवाशानें सरसरत यावें; आणि पुन्हा सारी चढण चढावी, मांड्या आणि उर चढतांना भरून यावेत, तेव्हां कोठे रायगडचा तो भव्य दरवाजा दृष्टीस भेटतो ! सुमारें पन्नास वर्षांपूर्वी एका थोर इंग्रज अधिकाऱ्याने छत्रपतींच्या या तक्ताच्या जागेची दैना डोळ्यांनी पाहून वर्णन केली. तेव्हांपासून आमचे डोळे उघडूं लागले आणि या स्थळाचें ऊर्जित या नव्या काळांत थोडेंथोडें होऊं लागलें आहे. हें स्थळ शिवाजीमहाराजांचें हृदय आहे, आणि प्रत्येक मराठा म्हणविणाराने त्याचें दर्शन घेणें त्याचें कर्तव्य आहे. सिंहगड, पुरंधर, शिवनेरी, प्रतापगड, राजमाची, लोहगड, राजगड वगैरे अनेक प्रचंड भव्य गड आम्हां मराठ्यांस अद्यापहि आमच्या पूर्वीच्या वैभवाची आठवण करून देत आहेत आणि आमच्या कर्तव्याची दिशा दाखवीत आहेत.

— द. वा. पोतदार

७. आपल्या वाङ्मयांतील विनोदाची उपेक्षा कां झाली हें स्पष्ट करतांना वामनराव म्हणतात कीं, "अगदी खरी गोष्ट अशी आहे कीं, मराठींत घंदेवाईक विदुषकाचें सोंग घेतलें तरच सामान्यतः विनोद ओळखूं येतो असं दिसतं. मराठींतला विनोद अजून अतिशयोक्तीच्या उलट्या-सुलट्या कोलांट्या मारण्यांतच धन्यता मानीत आहे." वामनरावांच्या ह्या विधानाची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु एवढें खरें कीं, त्यांच्या लिखाणांतील प्रसन्न विनोदाची आमच्या टीकाकारांनी फारशी दखल घेतली नाही. त्या लिखाणांतील इतर गुणविशेषांनी-विशेषतः त्यांतील तत्त्वनिष्ठेने व तत्त्वशोधनाने त्यांचें मन इतकें आकर्षून घेतलें की, ज्यामुळे तें कलात्मक तत्त्वशोधन इतकें हृदयंगम व वाचनीय झालेलें होतें, त्या त्यांचे ठिकाणीं असलेल्या अंगभूत विनोदबुद्धीकडे त्यांचें साहजिकच दुर्लक्ष झालें. तत्त्वजिज्ञासावृत्ति व विनोदबुद्धी ह्यांचा सुंदर मिलाफ दिसत असतांनाहि केवळ ह्या दोन विरोधी भासणाऱ्या गुणांची सांगड अपरिचित असल्यामुळे वाचकांचे लक्षांत तेवढी तत्त्वजिज्ञासा आली, परंतु तिला पूरक ठरलेली विनोदबुद्धि आली नाही; वामनरावांच्या विनोदवृत्तीचा अखंड झरा त्यांच्या सगळ्याच लिखाणांतून वाहात असला तरी त्याचें कार्य भोंवतालच्या तत्त्वशोधनाच्या वनश्रीला निरलसपणें गाजावाजा न करतां, स्वतःला कोणाच्या दृष्टीस फारसें पडूंहि न देतां, जीवन देण्याचें असल्यामुळे, वरवर पाहणाऱ्यांच्या दृष्टीला ती वनश्रीच तेवढी दिसली व तिच्या पायाशींच खळखळपणें वाहणारा तो झरा दिसला नाही यांत काय नवल?

—वा. ल. कुलकर्णी.

[वामन मल्हार—वाङ्मयदर्शन.]

८. ज्ञान जसजसें वाढत जातें तसतसें जगांतलें काव्य नाहींसें, होतें, हा पूर्वपक्षाचा पहिला मुद्दा होता. 'काव्या'चा शब्दसृष्टींतला अर्थ जरी घेतला, तरी विद्वत्त्वाच्या वाढीबरोबर कवित्वशक्ती किंवा कविताभिरुचि हीनबल होते, असें मेकॉले वगैरेचें जें म्हणणें आहे, तें अनुभवाच्या व युक्तिवादाच्या विरुद्ध आहे. ज्ञानदेव ज्ञाते झाले; म्हणून त्यांची स्फूर्ति किंवा रसिकता कमी झाली होती असें तुम्हांस वाटतें काय? मला तर वाटतें कमी न होतां, या शक्ती वृद्धिंगत होऊन त्यांना तेज व कांति आली; आणि म्हणून ज्ञानेश्वरीसारखा विद्वन्मान्य व रसिकमान्य ग्रंथ आपणांस मिळाला. तुकाराम महाराज आपल्या एका अभंगांत सांगतात की, प्रथम मी अज्ञानी होतो व मग पुराणें व कथा वगैरे ऐकून व सत्संगति करून थोडेंबहुत ज्ञान मिळविलें आणि तदनंतर मला अभंग रचण्याची स्फूर्ति झाली. तुकाराम जर अज्ञानीच राहाते, तर त्यांची

सुप्रसिद्ध अभंगवाणी आपणांस उपलब्ध झाली असती काय? आपल्या इकडील एकनाथ, मुक्तेश्वर, वामन पंडित इत्यादि जुने कवि किंवा केशवसुत, रे० टिळक, गडकरी इत्यादि आधुनिक कवि व तसेंच इंग्लंडांतील टेनिसन, ब्राऊनिंग वगैरे कवि यांनी जें ज्ञान मिळविलें, त्यामुळें त्यांच्या स्फूर्तीचा व रसिकतेचा नाश झाला म्हणण्यापेक्षां, त्यामुळे या गुणांना योग्य वळण मिळून त्यांना बहर आला असें म्हणणें अधिक योग्य होणार नाही काय? पुष्कळ विद्वानांत कवित्वशक्ती नसते व पुष्कळ कवि विद्वान् नसतात, म्हणून विद्वत्ता आणि कवित्व यांमध्ये पुष्कळसा विरोध दिसतो; पण याचा खरोखर अर्थ असा आहे कीं, कवित्व हें विद्वत्तेवर अवलंबून नाही. तें मूळचेंच असावें लागतें.

— वा. म. जोशी

९. आपण शेती करतों. पृथ्वीची झीज होते. ती झिजून आपणांस धान्य देते. तिचा कस, तिचें सत्त्व कमी होतें, आपण तिची झीज भरून काढली पाहिजे. आपण तिला नांगरून ठेवतों. सूर्याची उष्णता तिच्या आंत शिरते. आपण तिच्यांत खत घालतों. अशा रीतीने तिचा कस पुनः आपण भरून काढतों. आपण पृथ्वीसाठी जी ही झीज सोसली, उन्हांत नांगरलें, खत ओतून पैसे खर्च केले, ही जी आपण शारीरिक व आर्थिक झीज पृथ्वीसाठी केली, ती झीज उत्कृष्ट पीक देऊन पृथ्वी भरून काढते. ती माझ्यासाठीं झिजते, मी तिच्यासाठीं झिजतों.

गीतेच्या तिसऱ्या अध्यायांत हें महान् यज्ञतत्त्व सांगितलें आहे. आज मानवी समाजांत तें पाळण्यांत येत नाही, म्हणून मानवी समाज दुःखी आहे. मजुरांनी म्हणावयाचें, 'शेटजी! तुमच्यासाठी आम्ही यंत्राजवळ झिजतों. सारी संपत्ति तुमच्याजवळ देतों, घ्या.' शेटजीनें म्हणावयाचें, 'बंधूनो! ही सारी संपत्ति पुन्हां तुमच्यासाठी मी देऊन टाकतों, घ्या.' अशा रीतीनेच समाजांत आनंद होईल. परस्पर जर याप्रमाणें वागतील तर समाजांत समता राहील. एकीकडे खळगे व एकीकडे टेकाडे दिसणार नाहींत. एकीकडे प्रचंड प्रासाद व दुसरीकडे क्षुद्र झोपडया हें दुःख दिसणार नाही. एकीकडे आनंदमय संगीत तर दुसरीकडे शोकाचें रडगाणें असा हृदयभेदक देखावा दिसणार नाही.

— साने गुरुजी.

१०. पण चौफेर पसरत चाललेल्या पुणें शहरांतल्या नव्या शोभिवंत इमारतींकडे पाहून उत्पन्न झालेला हा विषाद नाहीसा करणारा असाहि एक

विचार माझ्या मनांत लगेच येतो. ठिकठिकाणीं माझा मृत्यु घडत आहे. घडेना ! मरतां मरतां नव्या परिस्थितीचे नवे ताजे कोष धारण करून मी जगत आहें. याचा प्रत्यय मला पुन:पुन्हा येत असतांना त्या विनाशाचें दु:ख मी काय म्हणून करावें ? होय, मी मनाशीं अशीच समजूत घरली पाहिजे कीं, अंशत: मेल्याबांचून जीवनाची क्रिया सतत चालूं राहात नाही. छायेवाचून प्रकाश नाही, तद्वत् मेल्यावांचून जगतां येत नाही. जें लयाला जात आहे त्याला कवटाळून अश्रू गाळण्यापेक्षां जें उदयाला येत आहे त्याचें माणसाने स्वागत केलें पाहिजे ना ! राष्ट्राचाच नव्हे, तर व्यक्तीचा जिवंतपणा देखील यावरच अवलंबून आहे.

— ना. सी. फडके.

११. मला खरोखरच प्रामाणिकपणें वाटतें कीं, माणसामध्ये थापा मारण्याची जी प्रवृत्ति असते, तिला आपण उत्तेजन द्यावें. थापा मारण्याची इच्छा तरी कां होते, याचा सूक्ष्म विचार करतां मला असें वाटतें कीं, प्रत्येक मनुष्याच्या डोळ्यासमोर त्याच्या अगदी जिव्हाळ्याचें असें कांहींतरी ध्येय असतें, आणि बहुधा तें साधणें शक्य नसतें. तें साधल्यानंतर जो आनंद मिळणार असतो, तो उपभोगण्याकरिता सत्यसृष्टींत तें साधत नाही, निदान कल्पनासृष्टींत तरी तें साधावें; आणि खरोखरीच सत्यसृष्टींत तें साधलें आहे असें लोकांना सांगून तो लोभनीय आनंद उपभोगावा, हाच निरागस हेतु थापा मारणाऱ्याचा असतो.

— अनंत काणेकर.

१२. श्रावणाची सांखळी असते तशीच वसंताची. फाल्गुन, चैत्र आणि वैशाख हे तीन महिने वसंताच्या पुष्पमुद्रेचें चिन्ह ल्यालेले, बेसुमार रंगांनीं नटलेले, प्रखर उन्हानें अंग भाजणारे, पण त्याच वेळीं अत्यंत शीतल सुखकारक अशा दक्षिणानिलांनी गात्रांना सुखविणारे, दृष्टीला भ्रांत करणारे, प्राणिमात्रांतल्या निर्मितीच्या शक्तीच्या उन्मादक वृत्तींना चेतविणारे, असे हे महिने आहेत. एक दुसऱ्यांत मिसळला आहे. तरी पण चैत्र हा खरा वसंतात्मा आहे, मधुमास आहे. ऋतुराज वसंताचें स्पंदन पावणारें हृदय आहे, यांत शंका नाही. चैत्र हा कुसुमाकर आहे. 'पुष्पधुळीमाजी लोळे वसंत' असें मुक्तेश्वरांनी म्हटलें आहे. याच महिन्यांत परागांवर वसंत खरोखर लोळत असतो. ऋतुराजाचें लक्षण ज्ञानेश्वरांनी सुंदर रीतीने वर्णन केलें आहे :

जैसे ऋतुपतीचें द्वार । वनश्री निरंतर ।
वोळगे फळभार । लावण्येंसी ॥

—दुर्गा भागवत.

१३. राजकारणाशिवाय, तसेंच लेखनवाचनाशिवाय जीवनांत दुसरी कसली गोडी जवाहरला नाही असें त्याला नीट न ओळखणारे लोक समजत असतात; परंतु ही गोष्ट सर्वस्वी खरी नाही. दुसरेहि त्याचे आवडते नाद, नाना छंद आहेत. परंतु इच्छा असूनहि त्या इतर गोष्टींसाठी, छंदांसाठी त्याला भरपूर वेळ देतां येत नाही. राजकारणांतून वांचलेला वेळ तो वाचनांत दवडतो. कधी कधी लेखनांतहि. परंतु तो लिहिण्याचें काम बहुधा तुरुंगांतच करतो. तो खंदा घोडेस्वार आहे. पोहोण्याचा नाद असून पोहोण्याची संधि त्याला क्वचितच मिळते. आम्ही आग्रहच केला तर तो नाटकसिनेमाला येतो व ते चांगले असेल तर त्यांत रस घेतो. परंतु त्याचा खुला दिल जेव्हा तो मुलांत असतो तेव्हा पाहावा. मुलें लहान असोत वा मोठीं असोत, तो त्यांच्यात रमतो. मुलेंहि त्याला जीव कीं प्राण करतात. जवाहरमध्ये आणखी एक गुण आहे. तो कोठेहि असो, कितीहि कामांत अगर थकलेला असो, तो कोणाचा जन्मदिवस कधी विसरत नाही. तसेंच वार्षिक दिवस, आणखी असेच महत्त्वाचे प्रसंग तो विसरणार नाही. जे त्याला ओळखतात ते त्याच्यावर यासाठीच अपार प्रेम करतात.

—कृष्णा हाथीसिंग.

१४. हीं सुंदर लोकगीतें रचणाऱ्या स्त्रियांना लिहितां-वाचतांहि नीट येत नव्हतें; पण तरीहि या गीतांतील विचार आणि भावना किती मोहक आहेत! उत्कृष्ट भावदर्शनाचें सामर्थ्य या खेडुतांच्या साध्याभोळ्या शब्दांतूनहि प्रकर्षाने प्रकट झालेलें नाही काय? हीं प्रांतोप्रांतीचीं लोकगीतें प्रांतवैशिष्ट्यानें सजलेलीं असलीं आणि विविध बोलींतील शब्दरूपांनी फुललेलीं असलीं तरी प्रीति, वात्सल्य, भय, भक्ती इत्यादि साऱ्या मानवी भाव-भावना चोहींकडेच सारख्या असणार! त्यामुळे ह्या गीतकुसुमांच्या विविध रंगतींतहि सुगंधाचा आस्वाद आपण घेऊं शकतों.

महाराष्ट्रांतील सुशिक्षित समाजांपासून दूर राहिलेलें पण खेड्यापाड्याच्या परिसरांत मात्र गुणगुणलें गेलेलें ग्रामीण जनतेचें हें खरें काव्य म्हणजे महाराष्ट्र—शारदेचें एक उपेक्षित लेणें आहे, साहित्याच्या प्रासादांतील एक दुर्लक्षित दालन आहे. सुशिक्षितांनीच आतां पुढाकार घेऊन महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत दडलेलें व लज्जेनें दडपलें जात असलेलें हें लोकसाहित्य पुढें आणलें पाहिजे. ग्रामीण जीवनांतील समरसलेल्या मराठ—मोळा स्त्रीवर्गाला उत्तेजन देऊन बोलकें केलें तर अद्याप कितीतरी मनोहर, सहजालंकृत भावगर्भ काव्य उजेडांत येऊं शकेल व मराठी काव्याचा प्रासाद समृद्ध होऊं शकेल.

—सौ. मालतीबाई दांडेकर.

१५. कसेंहि असो; तेव्हापासून मला मध्यरात्रीच्या सौंदर्याचें वेड लागलें व तिनें मला कितीतरी गुजगोष्टी सांगितल्या, आपल्या हृदयभांडारांतील कितीक रत्नें मला तिनें दाखविलीं, कितीदां तिने माझें सांत्वन केलें. कितीदां तिच्या चेहऱ्यावरचे मृदु भाव, अलौकिक भाव पाहतां पाहतां माझे डोळे भरून आले.

चिरंतन सौंदर्याविषयींच्या कविलोकांच्या कल्पनेप्रमाणे खरोखरच मध्यरात्रीचें सौंदर्य क्षणाक्षणाला व स्थलींस्थलीं बदलत असतें, नाविन्याने विलसत राहतें. एकमेकांवर अपरंपार प्रेम करणाऱ्या दोन व्यक्तींमधील भावनांदोलनें कशीं परस्परपूरक असतात ? तसेंच होतें मध्यरात्रीच्या वृत्तीचें. तुम्ही ज्या वृत्तीनें तिच्याकडे जाल, ती वृत्ति समजून घेऊन, तिच्याशीं सहभागीं होऊन नकळतच ती तुम्हांला शांतवून सोडते. तुमचा एकटेपणा नाहींसा करते.

—कुसुमावती देशपांडे.

(ब) पुढील कवितांचा आशय (सारांशरूपानें) सांगा—

१६. सारांशास योग्य शीर्षक द्या—

आतां विश्वात्मकें देवे। येणें वाग्यज्ञें तोषावें। तोषोनि मज द्यावें। पसायदान हें ॥ १ ॥ जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो। भूतां परस्परे जडो। मैत्री जीवाचें ॥ २ ॥ दुरितांचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो। जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात ॥ ३ ॥ वर्षत सकळमंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी। अनवरत भूतळीं। भेटो तया भूतां ॥ ४ ॥ चलां कल्पतरूंचे अरव। चेतनचिंतामणींचे गांव। बोलत जे अर्णव। पीयूषाचे ॥ ५ ॥ चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन। ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु ॥ ६ ॥ किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होवोनि तिहीं लोकीं। भजिजो आदि पुरुषीं। अखंडित ॥ ७ ॥

—ज्ञानेश्वर.

१७. जोडोनियां धन उत्तम वेव्हारें। उदास विचारें वेंच करी ॥ १ ॥
उत्तमचि गती तो एक पावेल। उत्तम भोगील जीवखाणी ॥ २ ॥
पर उपकारी नेणें परनिंदा। परस्त्रिया सदा बहिणी मायी ॥ ३ ॥
भूतदया गाईपशूंचें पालन। तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥ ४ ॥
शांतिरूपें नव्हे कोणाचा वाईट। वाढवी महत्त्व वडिलांचे ॥ ५ ॥
तुका म्हणे हेंचि आश्रमाचें फळ। परम पदबळ वैराग्याचें ॥ ६ ॥

—तुकाराम.

१८. ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेउन
निळासांवळा झरा वाहतो वेटावेटांतुन,
चार घरांचें गांव चिमुकलें पैल टेकडीकडे;
शेतमळ्यांची दाट लागली हिरवी गरदी पुढें.
पायवाट पांढरी तयांतुनि अडवीतिडवी पडे;
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे,
झांकळुनी जळ गोड काळिमा पसरी लाटावर;
पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर.

—बालकवि

१९. आकाशीं ध्रुवतारका बघुनियां माझ्या मना वाटतें
स्थैर्यामाजीं तदीय भाग्य अथवा तें पुण्य हो कोणतें ?
बाकीची ग्रहमालिका भ्रमतसे ही भिंगरीसारखी
जो एकाच पदीं खिळून बसला तो कां म्हणावासुखी ? ॥ १ ॥
राहाया चिरकाल शान्त रुचते का सागराला तरी
मागे आणि पुढे किती घुसळतो तो मस्तवालापरी
ये दैवी स्थिरता म्हणून झुरती रात्रंदिनीं डोंगर
चित्तींचे कढ त्यांचिया उसळुनी क्षेत्रांत येती वर ॥ २ ॥
सृष्टीचा जरी " मित्र " त्याहि असती सूर्यास अस्तोदय
विश्रुत " औषधिपति " तया चन्द्रास वृद्धि क्षय
देखा भिन्न ऋतूमुळेच वसुधा दावू शके विभ्रम
नोहे काय तिचा विलाप अवघा तो चक्रनेमिक्रम ॥ ३ ॥
देखोनि ध्रुवतारका कधि कधि माझ्या मना वाटते
देवाने दिधला तयास वर कां ? कीं शाप हो ? स्थैर्य तें ॥

—महाराष्ट्रकवि यशवंत

२०. येती धावत कल्पना जधि पुढे ना दौत ना कागद
जेव्हा कागद दौत येउनि पडे हो कल्पना गारद
जेव्हा ना पदरीं छदाम मनिंची औदार्यता केवढी
पैशाची परि वृष्टि होत असतां औदार्य मारी दडी ॥

पाते ही शुभमंगला घटि परि तो सांपडेना भट
हा आला भट तीथ नाहि, धरणें हा व्यर्थ अंतर्पट
सारे बत्तीस दांत, लभ्य नव्हते साधे चणेहि तधीं
आतां दांत न एकही परि इथे खुशाल राशी किती !
ह्याला संतति, एक खंडिभर ती, खाया परि ना दिसे
ह्याच्या बालकशून्य ह्या गृहिं परी ही अन्नपूर्णा हसे
काव्याची लतिका किती बहरते माझी, मती आगळी
'त्यांच्या' सन्निध मात्र काव्यलतिके ना फूल ना पाकळी

— लक्ष्मीबाई टिळक

२१. दैवजात दुःखें भरतां, दोष ना कुणाचा
पराधीन आहे जगतीं पुत्र मानवाचा
माय कैकयी ना दोषी, नव्हे दोषि तात
राज्यत्याग काननयात्रा, सर्व कर्मजात
खेळ चाललासे माझ्या पूर्वसंचिताचा ॥ १ ॥
तात स्वर्गवासी झाले, बंधु ये वनांत
अतर्क्य ना झालें कांही, जरी अकस्मात
मरण कल्पनेशीं थांबे, तर्क जाणत्यांचा ॥ २ ॥
दोन ओंडक्याची होते सागरांत भेट
एक लाट तोडी दोघां, पुन्हा नाही गांठ
क्षणिक तैंवि आहे बाळा, मेळ माणसांचा ॥ ३ ॥
संपल्याविना ही वर्षें दशोत्तरी चार
अयोध्येस नाही येणें, सत्य हें त्रिवार
तूंच एक स्वामी आतां, राज्य संपदेचा ॥ ४ ॥
दैवजात दुःखें भरतां दोष ना कुणाचा
पराधीन आहे जगतीं पुत्र मानवाचा.

— ग. दि. माडगूळकर

९. भाषांतर

(इंग्रजी उताऱ्यांचें मराठी भाषांतर)

एक कला—

कांही कलावंत वेषांतरांत प्रवीण असतात. वेषांतर करणें म्हणजे नुसता वेष बदलणें नव्हे. ज्या भूमिकेप्रमाणे वेषांतर केलें असेल त्या भूमिकेशीं समरस होऊन तिच्या भावभावनासुद्धां मुद्राभिनयाने व बोलण्याचालण्यांतून हुबेहूब व्यक्तवितां आल्या तरच वेषांतराची परिपूर्तता होत असते. वेष बदललेली मूळ व्यक्ती तीच असते, फक्त वेष व हावभाव, चालणें-बोलणें बदललेलें असतें इतकेंच.

यशस्वी भाषांतराचें असेंच आहे. कोणत्याहि परकीय भाषेंत व्यक्त झालेले विचार आपल्या मातृभाषेंत सांगणें किंवा आपले विचार परकीय भाषेंत सफाईदारपणे सांगणें ह्या दोन्ही गोष्टी अवघड आहेत. वेषांतराप्रमाणे भाषांतरहि नुसती भाषा बदलून चालतें असें नाही. ज्या भाषेंतील विचार आपण भाषांतरित करीत आहोंत त्या भाषेची घाटणी, लकबी व ऐट आणि तीमधील विचार-वैभव अविकृत रूपांत आपल्या भाषांतरांत आविष्कृत व्हायला हवेत. त्यासाठी उभय भाषांवर थोडेंफार प्रभुत्व हवे. दोन्ही भाषांचा व्याकरणशुद्ध अभ्यास हवा. त्यांची वाक्यरचना त्यांच्यांतील शब्दांचें व अर्थांचें वैभव वाढविणारे वाक्प्रचार नि अलंकार ह्यांतील साम्यभेदांची शास्त्रशुद्ध माहिती हवी. यासाठी मुळांत आपली शब्दसंपत्ति समृद्ध हवी, जोपासलेली हवी आणि तिची अर्थ-पूर्ण योजना करण्याचें चातुर्य आपल्यापाशीं हवें. भाषांतर यशस्वी व मुळाबर-हुकूम झालें कीं नाहीं याची एक मुख्य कसोटी अशी सांगतां येईल कीं, भाषांतर कोणत्या उताऱ्याचें केलें आहे असा संदेह वाचकांस क्षणभर पडला पाहिजे. अगदी नामांकित भाषाप्रभु विद्वानांप्रमाणे नव्हे तरी एका विशिष्ट दर्जाच्या अपेक्षा पूर्ण करणारें भाषांतर प्रत्येकास करतां येणें ही आजच्या बहुभाषिक व संमिश्र समाज-रचनेंतील वैचारिक, व्यावहारिक जीवनाची एक मूलभूत गरज आहे.

स्वरूप—यशस्वी भाषांतरास आवश्यक अशीं सूत्रें प्रमाण मानल्यानंतर भाषांतराच्या स्वरूपाकडे वळूं

(१) भाषांतर म्हणजे शब्दशः भाषांतर करून, शब्दापुढे शब्द जुळवीत जाणें नव्हे.

(२) भाषांतर म्हणजे भाष्य, विषयांतर अगर स्वैर लेखन नव्हे.

(३) भाषांतर स्वतंत्र वाटावें परंतु स्वच्छंदी वाटूं नये.

(४) भाषांतर म्हणजे एका भाषेंतील विचार आणि कल्पना अविकृत व आकर्षक स्वरूपांत दुसऱ्या भाषेंत आणणें.

प्रत्यक्ष भाषांतर करीत असतां :—दिलेला उतारा प्रथम शब्दशः काळजीपूर्वक वाचणें. विशेष अवघड आणि अपरिचित शब्दसमूहांचा मराठी अर्थ प्रथमतः सहजगत्या सुचेल तो लिहून ठेवणें. हा अर्थ लिहून ठेवल्यानंतर भाषांतराची घाई मात्र करूं नये. दिलेला उतारा घाईघाईने वाचून कशीबशी अर्थाची गोळाबेरीज करणें व ती भराभरा लिहून काढणें म्हणजेहि भाषांतर नव्हे. प्रत्येक भाषेच्या विचारप्रकटीकरणाच्या कांही खासं लकबा असतात, तीमध्ये कांही विशिष्ट सहचारी भावनांनी व कल्पनांनी संबद्ध असे शब्दसमूह असतात. भाषांतर करतांना या शब्दसमूहांना, वाक्प्रचारांना आणि अलंकारांना दुखवून चालत नाही. तसेंच त्यांचें शब्दशः भाषांतर करूनहि चालत नाही. ह्या शब्दसमूहादींच्या अर्थच्छटा बऱ्याच अंशानें व्यक्त करणारे समानार्थी शब्दसमूह आपल्याहि भाषेंत असतात. अशा समानार्थक शब्दसमूहांना कुशलतेनें राबवावें लागतें. शब्दशः भाषांतर करण्याचा घसमुसळेपणा भाषासौष्ठवास सोसवत नाही. खालील शब्दशः भाषांतरें व विचारपूर्वक केलेलीं भाषांतरें पाहिल्यास हें अधिक स्पष्ट होईल.

क्र.	मूळ इंग्लिश	शब्दशः भाषांतर (अयोग्य)	विचारपूर्वक भाषांतर (योग्य)
	१	२	३
१	Bag and baggage	पेटी व वळकटी	चंबूगबाळें ..
२	Safe and sound	सुरक्षित व ठणठणीत.	सुखरूप व सुरक्षित...
३	The long and short of it	त्याचा लांब व आखूड अर्थ हा.....	त्याचा मथितार्थ हाच कीं...
४	To blow one's own trumpet	स्वतःची तुतारी वाजविणें	स्वतःभोंवतीं दिवे ओवाळून घेणें.
५	To carry coals to New Castle	न्यूकॅसलला कोळसे वाहून नेणें.	काशीस गंगा नेणें.

क्रमांक दोनच्या रकान्यांतील भाषांतरें कशीं हास्यापद व मूळ अर्थाचा विपर्यास करणारीं आहेत ? पण क्र. ३ च्या खान्यांतील भाषांतरास भाषांतराचा थोडा तरी वास येतो का ? भाषांतरांत कलेचा भाग असतो तो हाच !

वाक्यरचनेकडून भाषांतरशास्त्राकडे :—

आतां वाक्यरचनेच्या दृष्टीने भाषांतरांत कोणते फरक पडतात व कोणती दक्षता घ्यावी लागते हें पाहूं.

अ.	मूळ इंग्रजी वाक्य. १	अयोग्य व अशास्त्रीय भाषांतर २	योग्य, शास्त्रीय भाषांतर ३
१	A clever boy studies daily.	एक हुशार मुलगा अभ्यास करतो दररोज.	हुशार मुलगा दररोज अभ्यास करतो.
२	Who is that boy?	कोण आहे तो मुलगा ?	तो मुलगा कोण आहे ?
३	Can you tell me his name?	सांगूं तूं शकतोस मला त्याचें नांव ?	तूं त्याचें नांव मला सांगूं शकतोस काय ?
४	We know that the earth is rouud.	आम्हाला माहीत आहे कीं पृथ्वी गोल आहे.	पृथ्वी गोल आहे हें आम्हांला माहीत आहे.
५	He is a player and scholar too.	तो खेळाडू आणि हुशार सुद्धा आहे.	तो खेळाडू असून हुशारहि आहे. (अभ्यासूहि आहे.)
६	It is too hot to go out.	इतकें गरम आहे की कोणी बाहेर जाऊं शकत नाही.	बाहेर पडवत नाही इतकें ऊन्ह आहे.
७	He said that he would come.	तो म्हणाला कीं तो येईल.	मी येईन असें त्यानें सांगितलें.
८	He was laughed at by the people.	तो सर्व लोकांकडून हंसला गेला.	१. सर्व लोक त्याला हंसले. २. त्याचें लोकांत हंसें झालें. ३. त्याने लोकांत आपलें हंसें करून घेतलें.
९	I have no acquaintance with him.	माझी त्याच्याबरोबर ओळख नाही.	मी त्याला ओळखत नाही.
१०	Write in ink.	शाईत लिही.	शाईनें लिही.
११	After death the doctor.	मृत्यूनंतर डॉक्टर.	वरातीमागून घोडें.
१२	White as snow.	बर्फाप्रमाणे पांढरें.	१. पिठासारखें शुभ्र. २. हिमधवल.

वरील रकान्यांतील पहिल्या वाक्यांतील इंग्रजी व मराठी वाक्यरचनेचा सूक्ष्म अभ्यास केल्यास A हें उपपद क्र० ३ च्या रकान्यांतील योग्य भाषांतरांत आढळत नाही. तसेंच कर्ता, कर्म, क्रियापद व वाक्यांतील विशेषण-क्रियाविशेषणें यांचीं स्थानें भाषेनुरूप बदललीं आहेत असें दिसून येईल. वाक्य नंबर २ व ३ यांतील प्रश्नार्थक सर्वनाम (Who) व प्रश्नार्थक सहाय्यार्थी क्रियापद (Can) यांचीं स्थानें मराठींत कशीं बदललीं आहेत तें पाहा.

वाक्य नंबर ४ मध्ये We know हे Principal किंवा प्रधान वाक्य आहे व that the earth is round हा Noun Clause म्हणजे नामगौण वाक्य आहे. मराठी भाषांतरांत नामगौण वाक्य 'पृथ्वी गोल आहे.' हें प्रारंभीं आलें आहे. मिश्र वाक्यांच्या (Complex) भाषांतराचीं आणखी कांही उदाहरणें पहा--

(1) The soldiers who had come to destroy the city were surprised to see the gates swing open.

यांत Who had come to destroy the city हें विशेषणगौण वाक्य आहे. मराठी भाषांतरांत याची योजना कुठे होईल तें पहा-- शहराचा नाश करण्याकरता जे सैनिक त्या ठिकाणीं आले होते, त्यांना शहराचे सताड उघडे दरवाजे पाहून (मोठें) आश्चर्य वाटलें. यांत who .....city = 'जे सैनिक... होते,' हें विशेषणगौण वाक्य. 'त्यांना शहराचे.....आश्चर्य वाटलें,' या प्रधान वाक्यापूर्वी आलें आहे. यावरून स्थूलमानाने एक नियम असा सांगतां येईल, if, when, as, while, though, that, which यांनी सुरू होणारीं गौणवाक्यें मराठींत प्रधान वाक्यापूर्वी येतात.

वाक्य क्र. ५ व ६ मधील Too या क्रियाविशेषणाचा संदर्भानुसार जो निरनिराळा अर्थ होतो तो पाहावा. वाक्य क्र. ६ मध्ये विशेषतः Too ने नकारार्थ साधला आहे. ती नकारार्थी छटा मराठी भाषांतरांत कशी आली आहे लक्षांत घ्या.

वाक्य क्र. ७ मध्ये अप्रत्यक्ष निवेदनपद्धतीची रचना आहे. (Indirect speech.) मराठींत ही पद्धति विशेषशी प्रचारांत नाही. म्हणून मूळ वाक्याचें भाषांतर आपण प्रत्यक्ष निवेदनपद्धतीनें (Direct speech) केलें आहे. मी येईन असें तो म्हणाला. किंवा मी येईन असें त्यानें सांगितलें. म्हणजे मूळ इंग्रजींत अप्रत्यक्ष निवेदनपद्धति असेल तर भाषांतर करतांना तें प्रत्यक्ष निवेदन-पद्धतीनें केलें पाहिजे.

वाक्य क्र. ८ मध्ये इंग्रजी वाक्य Passive voice मध्ये आहे. मराठींत Passive voice किंवा कर्मकर्तरि प्रयोग फार क्वचित् वापरला जातो. म्हणून

Passive voice असलेल्या इंग्रजी वाक्यांचें भाषांतर कर्तरी प्रयोगांत (Active voice) करणें योग्य.

He is eating a mango :— तो आंबा खातो आहे.

A mango is being eaten by him :—' आंबा त्याच्याकडून खाला जातो आहे ' असें आपण म्हणत नाही.

वाक्य क्र. ९ मधील With या शब्दयोगी अव्ययाचें (Preposition) भाषांतर मराठींत ' त्याला ' असें आपण केलें नाही. With चा मराठी अर्थ नें, ई, शीं असा तृतीयेप्रमाणे होत असतांना येथे चतुर्थीप्रमाणे घेतला आहे. With चे ' सह ', ' कडून ' इत्यादीहि अर्थ मराठींत केले जातात. इंग्रजींत शब्दयोगी अव्ययें क्रियापदापुढे येतात व एकाच क्रियापदाचे अर्थ पुढे येणाऱ्या शब्दयोगी अव्ययानुसार बदलतात.

उदा० :—

(i) This shopkeeper deals in tea and coffee.

१. हा दुकानदार चहा व कॉफीचा व्यापारी आहे.

(ii) You must not deal with that dishonest merchant.

२. तूं त्याच्यासारख्या अप्रामाणिक दुकानदाराशीं संबंध ठेवूं नयेस.

या उदाहरणांत deal या क्रियापदाचे अर्थ in व with प्रमाणे बदलत आहेत आणि भाषांतरांत in व with साठी आपण षष्ठी व तृतीया वापरली आहे. सारांश, शब्दयोगी अव्ययांचा योग्य तो अर्थ संदर्भानुसार ओळखून तेथे योग्य ती मराठींतील विभक्ती वापरावी.

वाक्य क्र. १० मध्ये एक इंग्लिश म्हण (Proverb) आहे. भाषांतर करतांना तिच्याशीं समानार्थक अशी मराठींतील दुसरी म्हण वापरून आपण मोठा कार्यभाग साधला आहे. यासाठी इंग्लिश म्हणींशी समानार्थक अशा ज्या अनेक म्हणी मराठींत आहेत त्यांचें पूर्वज्ञान, संग्रह व स्मरण असणें श्रेयस्कर. कांही उदाहरणें पाहा—

(i) Might is right = बळी तो कान पिळी.

(ii) A bad workman quarrels with his tools = नाचतां येईना अंगण वाकडें.

(iii) An empty mind is devil's workshop = रिकामें मन सैतानाची धन.

(iv) Shallow water makes much noise = उथळ पाण्याला खळखळाट फार.

(v) Honesty is the best policy = सत्यमेव जयते.

कित्येकदा वाक्यांतील अर्थास आणखी परिणामकारकता मिळवून देण्यासाठी मूळ होकारार्थी (करणरूप) (Affirmative) वाक्याचें भाषांतर नकारार्थी (अकरणरूप) (Negative) करणें सोयीचें ठरतें.

उदा० :— The House of Commons is a difficult place in which to speak—वक्तृत्वासाठी हाऊस ऑफ कॉमन्स अवघड जागा आहे. असें अवघडलेलें लिहिण्यापेक्षां 'वक्तृत्वाकरितां हाउस ऑफ कॉमन्स ही जागा फारशी अनुकूल नाही' असें नकारार्थसूचक लिहिलें तर मूळ अर्थ अधिक परिणामकारकतेने व्यक्त होतो.

समारोप :—वरील नियम हे ढोबळ मानानें व मार्गदर्शक म्हणून दिलेले आहेत. भाषांतर करतांना कित्येक वेळा नियमापेक्षां वैयक्तिक अभिरुचि, व्याकरणाचा अभ्यास व सराव ह्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आता एक मुद्दा राहिला तो पर्यायी शब्द वापरण्याचा. शास्त्रीय पारिभाषिक शब्द, विशेष रूढ झालेले इंग्लिश शब्द यांना लोकप्रिय आणि अचूक अर्थवाहक शब्द शोधण्याचे, प्रस्थापित करण्याचे व रूढ करण्याचे विविध प्रयोग जोंवर चालूं आहेत तोंवर आग्रहीपणाने असे अर्धरूढ व अपरिचित शब्द भाषांतरांत वापरून भाषासौंदर्य व तिची अर्थवाहकता कितपत सुरक्षित राहतील हाहि एक प्रश्नच आहे. क्लास-टीचर, हेडमास्तर, प्रिन्सिपॉल, चॅन्सेलर, फर्स्टक्लास, प्रिंटिंग प्रेस, सॅलरी या (व अशा कित्येक शब्दांचे) पर्यायी शब्द आजपर्यंत सहजगत्या रूढ होऊन ते अनुक्रमें वर्गशिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य, कुलगुरु, प्रथमश्रेणी, मुद्रणालय, वेतन, असे प्रचारांतहि योजिले जात आहेत. भाषांतरांत हे पर्यायी शब्द (प्रतिशब्द) वापरण्यास कांहीच हरकत नाही. पण 'प्रिन्सिपॉलनी मला होस्टेल-मधून हाकलून दिलें,' 'काल वर्गशिक्षकांनी आमच्या टर्मिनलचा रिझल्ट डिक्लेअर केला' अशी हेंगाडी भाषा वापरणें खास अयोग्य आहे. तथापि शास्त्रीय परिभाषा निश्चित होण्यापूर्वी विवाद्य असे प्रतिशब्द जे आहेत त्यांचा बापर केल्याने अर्थहानीच होणार. 'माझ्या टॉन्सिल्स वाढल्यात म्हणून मी पेनिसिलीनचें इंजेक्शन घेतलें' हें वाक्य एक वेळ खपेल, पण 'कंठनलिकांतर्गत ग्रंथी वृद्धिंगत झाल्यामुळें बुरशीनिर्मित जंतुघ्न लस मी टोचून घेतली' हा 'द्राविडीप्राणायाम' करण्यापेक्षा टॉन्सिल्स व पेनिसिलीन हे शब्द सरळ सरळ बापरलेले काय वाईट? प्रादेशिक शब्दांच्या योजनेविषयी हेंच सांगतां येईल.

भा त्रासून गेलों, मी परेशान झालों, मी वैतागलों, यांतील परेशान हा शब्द तितकासा परिचित नाही. वाचकास प्रादेशिक शब्दांची ठेच लागू न देण्याची दक्षता घेऊन अर्थसुलभ नाविन्य म्हणून त्यांची योजना केली तर ते उपकारकच ठरेल. अखेर, भाषासौष्ठवास धक्का न लावतां व इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांचे हाल न करतां जितकें सरळ, सुबोध व सुंदर भाषांतर करतां येईल तितकें करण्याची संवय अभ्यासपूर्वक व परिश्रमपूर्वक लावून घ्यावी एवढेंच सांगणें आहे.

– स्वाध्याय १ –

नमुन्यादाखल दोन भाषांतरित उतारे

(१) मराठींत भाषांतर करा—

Good manners come from having sympathy with others and from understanding our own limitations. 'The Truth' is too big for any one of us to understand. 'The Truth' as we see it, is only our truth and part of the real truth. We should always realise that we are humble, unimportant little people on this earth and try to help the world as much as we can in our short time here.

J. C. Hill.

१. इतरांविषयीं वाटणाऱ्या सहानुभूतींतून आणि स्वतःच्या मर्यादांच्या जाणिवेंतून शिष्टाचार उत्पन्न होत असतो. 'सत्य' हें इतकें भव्य आहे कीं, आपणांपैकीं कुणालाच त्याचें पुरतेपणीं आकलन होऊं शकणार नाही. ज्याला आपण 'सत्य' म्हणतों तें आपल्यापुरतें सत्य असतें व पूर्ण सत्याचा एक अंश असतें. या दुनियेच्या पसाऱ्यांत आपण किती दुर्बल, यःकश्चित् आणि छोटीं माणसें आहोंत ह्याची नित्य जाणीव ठेवावी आणि येथल्या आपल्या अल्पकालच्या मुक्कामांत यथाशक्ती जगाच्या उपयोगीं पडावें.

(२) मराठींत भाषांतर करा—

'Rules', I said, 'are necessary things, but there are rules and rules. Some are hard and fast rules, like the rule of the road, which cannot be broken without danger to life and limb. But some are only rules for your guidance, which you can apply or wink at as commonsense dictates. They are not a whip put

in your hand to scourge your passengers with. They are meant to be observed in the spirit, not in the letter— for the comfort and not for the discomfort of the passengers. You have kept the rule and broken its spirit. You want to mix your rules with a little good will and good temper'.

He took it very well and when I got off the bus he said, "Good night" quite amiably.

—A. G. Gardiner.

२. मी म्हणालों, "कायदे किंवा नियम ह्या आवश्यक गोष्टी आहेत. कायदेहि अनेक असतात. कांही नियमांचें सक्तीनें पालन करावें लागतें. (उदाहरणार्थ), प्राणावरचें किंवा दुखापतीचें संकट ओढवून घेतल्याखेरीज रस्त्यावरून चालण्यासंबंधीचे जे नियम आहेत ते मोडतां येत नाहीत. परंतु कांही कायदे असे सांगतात कीं, ते तुमच्या मार्गदर्शनासाठी असतात व तारतम्य ठेवून वेळप्रसंगीं तुम्ही त्यांच्याकडे डोळेझांकहि करूं शकतां. उतारूंना फटके मारतां यावेत म्हणून कायद्याचे चाबूक तुमच्या हातीं दिलेले नाहीत. नियमामागील भूमिकेनुसार त्यांचें परिपालन तुम्ही करावयाचें असतें, शब्दशः नव्हे. त्यांच्या अंमलबजावणीचा हेतु उतारूंचा संतोष हा आहे, असंतोष नव्हे. तुम्ही कायदा पाळलात परंतु त्यांच्या मुळाशीं असणाऱ्या तत्त्वाची गळचेपी केलीत. तुम्ही तुमच्या कायद्यांना सदिच्छा आणि सुस्वभाव यांची जोड द्यायला हवी."

हें सारें त्यानें शांतपणे ऐकून घेतलें आणि मी बसमधून उतरलों तेव्हां प्रसन्नतेनें, 'गुड नाईट' म्हटलें.

तौलनिक अभ्यास :—

वर नमुन्यादाखल दोन इंग्रजी उताऱ्यांचीं मराठी भाषांतरें करून दाखविलीं आहेत. मूळ इंग्रजी उतारा व त्याचें मराठी भाषांतर हीं दोन्ही तुलनात्मक दृष्टीनें वाचा. क्र० १ च्या उताऱ्यांतील—Good Manners, limitations, part of the real truth, realise, humble, world, in our short time या शब्दांचीं मराठी भाषांतरें एकंदर उताऱ्याच्या आशयाकडे लक्ष ठेवून व तो आशय मराठींत साहजिकपणे कसा व्यक्त होईल याकडे विशेष लक्ष पुरवून केलीं आहेत. 'The Truth' is too big.....understand' या वाक्यांतील मूळ नकारार्थसूचक आशय मराठींत कसा भाषांतरित केला आहे तें पाहा.

क्र० २ चा उतारा 'A. G. Gardiner' च्या 'All about a dog' या विख्यात लघुनिबंधांतून घेण्यांत आला असून त्याच्या मराठी भाषांतरांतील पुढील वैशिष्ट्याकडे लक्ष द्या. लघुनिबंधाचा तात्पर्यार्थच असा हा अखेरचा परिच्छेद आहे. बस् कंडक्टर आणि खुद्द लेखक यांचें हें संभाषण मुळांत प्रत्यक्ष निवेदन पद्धतीनेच (Direct speech) निवेदन केलें आहे. भाषांतरांतहि तींच पद्धत अंगिकारली आहे. संभाषण सूचित करणारीं अवतरण-चिन्हें कित्येकदां घाईमुळें लिहिलीं जात नाहीत. भाषांतरांतसुद्धा विरामचिहें व अवतरण-चिन्हें यांचें अवधान ठेवावें लागतेंच. इंग्रजी भाषेंत 'तुम्ही', 'आपण' इत्यादि आदरार्थी बहुवचनें नाहीत. मराठींत मात्र आहेत आणि त्रयस्थास, अल्प परिचितास, अधिकारीवर्गास व वडिलधाऱ्या-वयस्कर-मंडळीशीं बोलतांना योग्य तीं आदरार्थी बहुवचनें वापरणें हा आपल्या संभाषणपद्धतीचा शिष्टाचारदर्शक असा आवश्यक भाग आहे. म्हणून भाषांतरांत 'तुम्ही' हे आदरार्थी बहुवचन वापरणें क्रमप्राप्त ठरतें. संभाषणांतील व्यक्तींचे परस्परसंबंध ओळखून त्यानुसार योग्य तीं 'संबोधनें' व आदरार्थी बहुवचनें वापरणें महत्त्वाचें आहे.

याहि उताऱ्यांतील, Hard and fast, life and limb, guidance, wink at, commonsense, to scourge your passengers with, spirit, you want to mix..... a good will आणि good temper, amiably या शब्दांचीं व वाक्प्रचारांचीं अर्थसुलभ भाषांतरें कशीं केलीं आहेत हें चिंतनपूर्वक बघावें. 'बस्' व 'गुडनाईट' ह्या रूढ शब्दांचा वेगळा असा अनुवाद केलेला नाहीं.

स्वाध्याय २

वरील नियमांप्रमाणे पुढे दिलेल्या इंग्रजी उताऱ्यांचें सुबोध मराठींत भाषांतर करा—

(1) And what is science? We know that it is something that confronts us at every turn. We are told that we live in a "Scientific Age"—so we do—but people forget that the age dawned almost as soon as man started to think—as soon, indeed, as he began to respond to one of the strongest of his instincts, the instinct of curiosity. Science is ordered knowledge arranged in such a way that we can make use of it. Knowledge by itself is not science.

—Cyeill Hill.

(2) Only a month back we celebrated our School Day. The Annual social gathering of the school is the greatest and grandest function of the year and is celebrated with magnificence and grandeur. Of course we had a holiday and we were asked to be present in our classes at two in the afternoon. The School building was decorated inside and out, with flags, leaves and flowers and the passage beautifully decorated. On a raised platform, covered with fine cloth, were placed cushion chairs for the honoured guests of the evening. The function opened with a welcome song of little boys and girls. At the end of the song our Head Master made a welcome speech. Then followed a few recitations and scenes from some plays. After that, the annual report, giving a brilliant account of the progress of the school was read out by the Head Master. The honoured guest of the evening distributed prizes to all those who had shown special merit whether in study or in sport. The address of the honoured guest was eloquent and instructive. The whole function ended with a vote of thanks to the guest of the evening and to the others who were present at the function.

(इतका प्रदीर्घ उतारा येथे देण्याचा हेतु हा कीं, हा विषय विद्यार्थ्यांच्या विशेष परिचयाचा आहे. विद्यार्थ्यांतील हौशी व नवोदित लेखकमंडळी निरनिराळ्या इंग्रजी कथांचीं वगैरे भाषांतरें करीत असतात. या उताऱ्याचा सुंदर मराठी अनुवाद त्यांनी व अर्थात् इतरांनीहि केला तर स्नेहसंमेलन दिनावरील इंग्रजी व मराठी निबंध-लेखनाची अशी दुहेरी तयारी केल्यासारखें होईल; व सामान्यतः शालेय कार्यक्रमासंबंधी रूढ असे इंग्रजी आणि मराठी शब्द त्या त्या भाषेंत कसे वापरले जातात, त्याची त्यांना थोडीफार कल्पना येईल.)

(3) The saying 'Time is Money' gives a fair idea of the value of time, no doubt, but it fails far short of conveying to the mind the actual worth of time as money, but it is even more valuable than money. Money, once lost, may be recovered. Similarly, lost health and even lost honour may be regained but lost time is beyond recovery. "Time and tide wait for no man". Neither wealth nor position can take away a jot from fleeting time and once it has passed away nothing can bring it back. If such be the nature of Time and if such be its value, is it wise and prudent on our part to spend such a valuable thing carelessly ?

(4) But though I was none the worse for having neglected exercise, I still am paying the penelty of another neglect. I do not know whence I got the notion that good handwriting was not a necessary part of education, but I retained it until I went to England. I then saw that bad handwriting should be regarded as a sign of an imperfect education. Let every young man and woman understand that good handwriting is a necessary part of education.

— Mahatma Gandhi.

(5) It should not be forgotten that the message of Buddha is as helpful to-day as it was when Buddha himself preached. The world is to-day full of the spirit of strife. Man is not at peace with himsel for with his neighbours. Everywhere men are afraid of each other. They look upon each other as enemies. For all these difficulties Buddha offers the best solution. He asks us to be friendly with one another. We should not have any kind of hate in us. Thus Buddha the prophet of love and non-violence utters over again the simple, noble Vedic precept, "Let us look upon each other with eyes of friends."

— Diwanchand Sharma.

(6) Shivaji is great equally for his philosophy of life, for his genius in administration, for his contribution to Indian culture. In his personal life he exemplified purity and regulated it by a high sense of morality. Deeply religious in nature, he showed the spirit of tolerance which is the real mark of a religious man. He imposed high standards of morality and purity upon others and never spared those who showed intolerance in their dealings with others and especially with those of other faiths.

— Diwanchand Sharma.

(7) The great advantage of early rising is the good start it gives us in our day's work. The early riser has done a large amount of hard wark before other men have got out of bed. In the early morning the mind is fresh, and there are few sounds or other distractions, so that work done at that time is generally well done. In many cases the early riser also finds time to take

some exercise in the fresh morning air, and this exercise supplies him with a fund of energy that will last until the evening.

(8) Men who are always grumbling about their poverty, complaining of their difficulties, whining over their troubles, and thinking that their lot in this world is mean and poor, will never get any happiness out of life or achieve any success. However mean our life may be, if we face it bravely and honestly and try to make the best of it, and we shall find that after all it is not so bad as we thought; and we may have our time of happiness and the joys of success. There is nothing common or unclean, until we make it so by the wrong attitude we adopt towards it.

(9) Timidity and self-distrust are almost as great faults as vanity and over-confidence. There are many people who have real talent in different lines, and yet who never accomplish anything, because they are afraid to make the first venture; and in this way many good and useful things are lost to the world. A reasonable amount of confidence in one's own powers is neccessary for success.

(10) Several scenes in nature are of over-powering splendour. Sunrise or sunset, especially when seen in the high mountains, is one of them. So also is the sight of the stars in the heavens. The stars are best seen as a spectacle, not from everyday surroundings where trees and buildings, to say nothing of street lighting, distract the attention too much, but from a ship at sea. Then the vault of heaven appears incredibly large and seems to be covered by uncountable number of fiery points of light.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
क्रमांक ..... दि: .....
खर्च ..... बीं दि: .....
मराठी संशोधन मंडळ
दा. क. 9397
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

[पुढील पुस्तकें विद्यार्थ्यांसाठी सुचविलेलीं आहेत. मराठी वाङ्मयांतील हीं निवडक उत्कृष्ट पुस्तकें आपल्या जीवनांत नवा आनंद निर्माण करतील.]

१ गड आला पण सिंह गेला– कै. ह. ना. आपटे
२ स्मृतिचित्रें– कै. लक्ष्मीबाई टिळक
३ नाट्यछटा– कै. दिवाकर
४ यशोधन– महाराष्ट्र कवि यशवंत
५ विशाखा– कुसुमाग्रज
६ साष्टांग नमस्कार– आचार्य प्र. के. अत्रे
७ काही म्हातारे आणि एक म्हातारी– वि. द. घाटे
८ सुदाम्याचे पोहे– कै. श्री. कृ. कोल्हटकर
९ बाळकराम– कै. रा. ग. गडकरी
१० माझा प्रवास– कै. गोडसेभटजी
११ गुजगोष्टी– प्रा. ना. सी. फडके
१२ गोड गोष्टी– कै. साने गुरुजी
१३ श्यामची आई– कै. साने गुरुजी
१४ चिमण्या– डॉ. कमलाबाई देशपांडे
१५ काळेपाणी– बॅ. वि. दा. सावरकर
१६ गोट्या– कै. ना. धों. ताम्हणकर
१७ सुंदर पत्रें– कै. साने गुरुजी
१८ गॅरिबॉल्डी– कै. न. चिं. केळकर
१९ अस्पृष्टाच्या डायरींतील पानें– कै. श्री. म. माटे
२० गृहरत्ने– गोपीनाथ तळवलकर
२१ रामायणांतील गोष्टी
२२ महाभारतांतील गोष्टी
२३ मृगया– कै. रा. वि. फडतरे
२४ अरबी भाषेंतील सुरस आणि चमत्कारिक गोष्टी
२५ माणदेशी माणसें– व्यंकटेश माडगूळकर
२६ सुंदर कहाण्या
२७ नवनीत– (कवितासंग्रह)
२८ शांति-निकेतन– गोपीनाथ तळवलकर
२९ गीतरामायण (कविता)– ग. दि. माडगूळकर
३० भाऊसाहेबांची बखर

[पुढील शिक्षण व साहित्यावरील पुस्तकें शिक्षकांनी अभ्यासावी. अध्यापनाला या निवडक ग्रंथांचा आधार फार मोठा आहे.]

१ महाराष्ट्र-सारस्वत (वाङ्मयेतिहास)– वि. ल. भावे
२ प्रतिभा साधन– (वाङ्मय स्वरूप)– प्रा. ना. सी. फडके
३ मतें आणि मतभेद (टीका)– प्रा. वा. ल कुलकर्णी
४ दृष्टि आणि दृष्टिकोन (टीका)– प्रा. वा. ल. कुलकर्णी
५ संस्कृति संगम– प्रा. द. के. केळकर
६ जीवन-शिक्षण (चर्चा)– आचार्य भागवत
७ साहित्य आणि सौंदर्य (टीका)– कै. बा. सी. मर्ढेकर
८ महाराष्ट्र-भाषाभ्यास (निबंध)– य. रा. दाते
९ रसवंतीची जन्मकथा (निबंध)– कै. श्री. म. माटे
१० भाषा आणि संस्कृति– डॉ. ना. गो. कालेलकर
११ अध्यापन कला:- मंत्र आणि तंत्र (शिक्षण)– प्रा. चंद्रकुमार डांगे
१२ मातृभाषेचें अध्यापन (शिक्षण)– प्रा. चंद्रकुमार डांगे
१३ मराठी घटना-रचना परंपरा (व्याकरण)– मंगरूळकर–अर्जुनवाडकर
१४ सौंदर्यशोध आणि आनंदबोध (टीका)– प्रा. रा. श्री. जोग
१५ शारदा विहार (भाषणें)– महाराष्ट्र शारदा मंदिर, पुणें २
१६ मराठी वाङ्मयाचा इतिहास– कै. ल. रा. पांगारकर
१७ रसग्रहण:- कला व स्वरूप (टीका)– प्रा. गो. म. कुलकर्णी
१८ आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास– डॉ. अ. ना. देशपांडे
१९ मराठी गद्याचा इंग्रजी अवतार– द. वा. पोतदार
२० अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका– गं. बा. सरदार
२१ मराठी नाट्याचा इतिहास– श्री. ना. बनहट्टी
२२ मराठी साहित्य समालोचन– वि. सी. सरवटे
२३ शालेय रंगभूमि (शिक्षण)– प्रा. चंद्रकुमार डांगे
२४ अभिनव-काव्यप्रकाश– प्रा. रा. श्री. जोग
२५ रसविमर्ष– डॉ. के. ना. वाटवे

निबंध
२२।३।६७


REFBK-0013117

महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने संमत केलेल्या
अभ्यासक्रमावर आधारलेली माला

मराठी असे आमुची मायबोली

इयत्ता ५, ६ व ७ साठी तयार केलेलीं उपयुक्त पुस्तकें.

व्याकरण, निबंध-लेखन यांचाअभ्यास, स्वाध्यायासाठी प्रश्न.

इ. ५ वी—मूल्य ५० न. पै.
इ. ६ वी—मूल्य ७५ न. पै.
इ. ७ वी—मूल्य १ रुपाया

संपादक

प्र. ल. करंबेळकर
शं. वि. लिंग्रस
ल. ह. सावंत
प्रा. चंद्रकुमार डांगे
प्रा. स. शं. माळी

शिक्षक व शाळेंतील भांडारासाठी १५ टक्के कमिशन. मागणीसोबत निम्मी रक्कम पाठवावी. उरलेली रक्कम व्ही. पी. करून मागविली जाईल अगर बँकेकडे रवाना होईल. पॅकिंग, पोस्टेज व रेल्वे-खर्च निराळा पडेल. स्टेशन व बँकेचें नांव कळवावें.

आपली मागणी तावडतोब रवाना करा.

काकडे-साळवी-डांगे प्रकाशन

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण :

प्रतिभा प्रेस, टिळक रस्ता, पुणे २.